
श्रीदत्तमहाराज कवीश्वर

चरित्र





श्रीदत्तमहाराज कवीश्वर

चरित्र आणि विचारधन

डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर



इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे

* श्रीगुरुःशरणम् *

❒ **श्रीदत्तमहाराज कवीश्वर-चरित्र आणि विचारधन**
डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर
६०१, मेरीलँड कॉर्नर,
सायन (पूर्व), मुंबई ४०० ०२२.
दूरध्वनी : ४०७२३६८ / ४०७२९१५

❒ ISBN-81-7418-094-X
Shri DattaMaharaj Kavishwar -
Charitra Ani Vichardhan (Marathi)
Dr. Sharadchandra Kopardekar

❒ **प्रकाशक**
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य प्रकाशन
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०.
दूरध्वनी : ४४५८५९८
४४८ १८६७

❒ **© सौ. पौर्णिमा कोपर्डेकर**

❒ **प्रकाशन दिनांक**
५ नोव्हेंबर, १९९९

❒ **मुखपृष्ठ सजावट व मुद्रक**
सुगम मुद्रण,
माहीम, मुंबई - १६

❒ **सेवाभावी मूल्य ८० रुपये**

पृष्ठसंख्या : ४६२
रंगीत छायाचित्रे : ४०

प्रथम मुद्रण : फेब्रुवारी ९८
द्वितीय मुद्रण : मार्च ९८
तृतीय मुद्रण : एप्रिल ९८
चतुर्थ मुद्रण : जून ९८
पाचवे मुद्रण : जुलै ९८
सहावे मुद्रण : डिसेंबर ९८
सातवे मुद्रण : डिसेंबर ९९



अठराव्या शतकांत अवतीर्ण झालेले

थोर संत

श्रीकृष्ण दयार्णव

यांच्या चरणी

श्रद्धापूर्वक समर्पण



इंद्रायणी साहित्य प्रकाशन यांनी प्रकाशित केलेली श्रीदत्तमहाराजांविषयीची पुस्तके

१. श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन (सातवी आवृत्ती)
पृष्ठे - ४७०. सेवाभावी मूल्य - ८० रुपये.

२. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन भाग - १ (तिसरी आवृत्ती)
पृष्ठे - २५०. सेवाभावी मूल्य - ५० रुपये.

३. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे विचारधन भाग - २ (तिसरी आवृत्ती)
पृष्ठे - २००. सेवाभावी मूल्य - ५० रुपये.

४. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा - विचारधन भाग-३
(तिसरी आवृत्ती) पृष्ठे - १९२ सेवाभावी मूल्य - ५० रुपये.

ही पुस्तके सर्वत्र मिळतात. काही प्रमुख प्राप्ती स्थाने पुढे दिली आहेत.

पुणे -१. इंद्रायणी प्रकाशन
२७३, शनिवार पेठ,
ओंकारेश्वर मंदिरासमोर,
पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४५ ८५९८
४४८ १८६७

२. वासुदेव निवास
४२/१७ एरंडवणा,
गोगटे पेट्रोलपंपामागे,
कर्वे रोड, पुणे - ३०.

३ वामन निवास,
तुळजाभवानी आरोग्य धाम,
३७/२ एरंडवणा, कर्वे रोड,
दशभुजा गणपती मंदिरामागे,
पुणे - ४११ ०३८.
दूरध्वनी : ३६८२३१

४ रसिक साहित्य
अप्पा बळवंत चौक,
पुणे.

मुंबई - आयडियल बुक कंपनी
छबिलदास हायस्कूल समोर,
दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी : ४३० २१२६

मॅजेस्टिक एजन्सीज्
विष्णू निवास, टिळक पुलाजवळ,
सेनापती बापट मार्ग, दादर-२८.
दूरध्वनी : ४३० ५९१४.

* श्रीगुरुःशरणम् *

जालना - श्रीदत्त आश्रम
सद्गुरू नगर, नाव्हा रोड,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२-३६८०५.
३४११७

नागपूर - आर्वीकर वेदपाठशाळा
''श्रुतिसदन'', संघकार्यालयासमोर,
महाल, नागपूर - ४४० ००२.
दूरध्वनी : ७२३३१६/७२३७८२.

अमरेश्वर - श्रीदत्त अमरेश्वर मंदिर
औरवाड, नृसिंहवाडी समोर,
तालुका - शिरोळ,
जिल्हा - कोल्हापूर.

***

* अनुक्रमणिका *

प्रस्तावना : डॉ. अशोकमहाराज कवीश्वर - ९

आशीर्वाद : - १७

मनोगत : डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर

पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने - २८

तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने - ४९

चौथ्या आवृत्तीच्या निमित्ताने - ५९

सातव्या आवृत्तीच्या निमित्ताने - ६९

ऋणनिर्देश : - ७८

प्रकाशकाचे मनोगत : श्याम कोपर्डेकर

पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने - ७९

सातव्या आवृत्तीच्या निमित्ताने - ८२

श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र - ८६

* कुलवृत्तांत - ८६. * श्रीवक्रतुंडमहाराज - ८९. * श्रीधुंडिराजमहाराज ९३.
* श्रीदत्तमहाराज - ९८. * विद्ययाऽमृतमश्नते : - ९९. * बालपण - १०१.
* शिक्षण - १०३. * पहिला भागवतसप्ताह - १०५. * श्रीदत्तप्रभूचे दर्शन - १०९.
* श्रीदत्तमहाराजांचा विवाह - १११. * माहुरची ओहरयात्रा - ११४.
* अध्ययन - ११५. * पुण्याला बिऱ्हाड केले - १२३.
* अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतव्यथः - १२५.
* श्रीशंकराचार्यांच्या सहवासात - १२९. * श्रीवासुदेवानंदसरस्वती वाङ्मय प्रकाशन - १३२. * मद्रासमध्ये झालेला गौरव - १४५. * श्रीधुंडिराजमहाराज यांची भमरथ शांती व अमृतमहोत्सव - १४६. * श्रीगुळवणीमहाराज यांची भमरथ शांती व अमृतमहोत्सव - १४६. * सुखदुःखे समेकृत्वा - १४७. * शक्तिपातदीक्षा - १५१.
* श्रीवासुदेवनिवास आश्रम - १५४. * वेदान्त पारिजात सौरभ - १५७.
* श्रीदत्तमहाराज षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ - १५८. * पिताजींकडून मंत्रोपदेशाचा अधिकार - १५९. * तत्त्वज्ञान विद्यापीठातील जागा नाकारली - १६०.
* श्रीगुरूमहाराजांचे महानिर्वाण - १६१. * श्रीवामननिवास - १६२.

✻ श्रीदत्तअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार - १६४. ✻ आगळेवेगळे उत्तराधिकारी - १६६.
✻ मूर्तिमंत ऋजुता -१७३. ✻ श्रीमहाराजांची प्रवचने - १७४.
✻ साधकांच्या प्रश्नांना उत्तरे - १७६. ✻ श्रीमहाराजांची पत्रे - १७७.
✻ काही चमत्कार - १८०. ✻ संतांच्या जीवनातील चमत्कारांची मीमांसा - १८३.
✻ जे ज्ञानगंगे नाहाले । ते पूर्णता होऊनि धाले । - १८५. ✻ श्रीदत्तमहाराजांची दैवी संपत्ती - १८७. ✻ लोकोद्धारासाठी झालेला पूर्णावतार - १९६.

✻ सर्व पुण्यकर्मे ऋणमुक्त झाली - १९८.

✻ सद्गुरू मला क्षमा करा - १९९.

परिशिष्टे

क्रमांक : १ - अलौकिक सहजीवन २०३
क्रमांक : २ - अवतार समाप्ती २१२
क्रमांक : ३ - वासुदेवनिवास शक्तिपीठ २२४
क्रमांक : ४ - वासुदेवनिवास व्यवस्थापन व कार्यपणाली २७०
क्रमांक : ५ - डॉ. अशोकमहाराज २७५
क्रमांक : ६ - कवीश्वर कुटुंबीयांची माहिती ३०३
क्रमांक : ७ - श्रीधुंडिराजमहाराजांची आरती व श्रीदत्तमहाराजांची आरती ३२६

सौ.ताईमहाराजांना झालेले श्रीमहाराजांचे दर्शन - ३३०

सद्गुरूचरणी वाक्सुमने - डॉ.अशोकमहाराज कवीश्वर ३३४

असे वत्सल पिता, असे प्रेममूर्ती सद्गुरू - ३४९

लीला समस्त अजित प्रभुराजयाची - ३५७

एका वासुदेवनिवासी साधकाच्या आठवणी - ३६२

साधकांच्या आठवणी व अनुभव - ३७९

✻ १. समोरच्या भक्ताच्या मनांतील विचार ओळखून मार्गदर्शन - ३८१.
✻ २. मुंबईचे एक भक्त सांगतात -३८३. ✻ ३. अनुग्रह घेताना आलेला अनुभव - ३८५.
✻ ४. आश्रमात वास्तव्य करीत असताना आलेला अनुभव - ३८६.
✻ ५. स्पर्शदीक्षेचा गूढ अनुभव - ३८६. ✻ ६. चरणस्पर्शाचा गूढ अनुभव - ३८८.

✻ ७. न पाहिलेल्या घराचे अचूक वर्णन केले - ३८९. ✻ ८. अनाग्रही परंतु स्पष्ट व निश्चित मार्गदर्शन - ३८९. ✻ ९. एक आगळेवेगळे दर्शन - ३९२.

✻ १०. अहेतुक प्रेमाचा वर्षाव - ३९२. ✻ ११. पाय ठेवणारा कोण आहे? - ३९४.

✻ १२. श्रीगुरूमहाराजांच्या खडावांना पदस्पर्श कसा करता येईल? - ३९४.

✻ १३. व्यक्तिगत देणगीही आश्रमात जमा केली - ३९५. ✻ १४. अभंग स्वतः गाऊन दाखवला - ३९६. ✻ १५.समाधीचा अनुभव स्वप्नांत दिला - ३९६.

✻ १६. विकारांच्या पलीकडे जाण्याचा अनुभव - ३९७. ✻ १७. दूरध्वनीवरून झालेले संभाषण -३९७. ✻ १८. इतर व्यक्तींच्या माध्यमांतून प्रेम - ३९८.

✻ १९. ध्यान कसे करावे याचे मार्गदर्शन - ३९९. ✻ २०. अतींद्रिय शक्ती - ४००.

✻ २१. मार्गदर्शनातील सुसंवाद - ४०१. ✻ २२. आंतरिक पातळीवरील संदेशांची देवाणघेवाण - ४०२. ✻ २३. आंतरिक पातळीवरील संदेश - ४०३.

✻ २४. श्रीमहाराजांच्या देहातीत अवस्थेचा अनुभव - ४०५. ✻ २५. एका बालभक्ताचे अनुभव - ४०७. ✻ २६. कोणाही जीवाचा न घडो मत्सर - ४१०.

✻ २७. नार्शीच्या भागवतसप्ताहातील आठवण - ४१२.

✻ २८. हृदयांतील अथांग प्रेम - ४१२. ✻ २९. जसा भाव तसे दर्शन - ४१३.

✻ ३०. शास्त्रग्रंथांतील ज्ञान व अनुभूती यांचे मूर्तिमंत रूप - ४१५.

✻ ३१. एक आगळे दर्शन - ४१७.

✻ ३२. एका ज्येष्ठ भक्त-भगिनीच्या आठवणी - ४१८.

✻ ३३. भक्तसाधिकेवर कृपा - ४२०.

✻ ३४. अखंड भगवंताच्या अनुसंधानांत असतात - ४२१.

✻ ३५. मूर्तिमंत अमानित्व -४२३. ✻ ३६. गुरूकृपा - ४२५. ✻ ३७. शस्त्रक्रियेच्यावेळी उपस्थिती - ४२९. ✻ ३८. अचूक रोगनिदान, सुयोग्य उपाययोजना - ४३०.

✻ ३९. डॉक्टरांचे डॉक्टर - ४३४. ✻ ४०. आगळी गुरूपौर्णिमा - ४४२.

✻ ४१. चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम् - ४४५.

स्थूलदेह ठेवल्यानंतर साधकांना आलेले अनुभव - ४४७

✻ ४२. स्वप्नामध्ये दृष्टान्त दिला - ४४७. ✻ ४३. विरक्तीचा अनुभव - ४४९.

✻ ४४. चरणसेवा - ४५०. ✻ ४५. पाठीला स्पर्श - ४५१.

✻ ४६. मोठा निर्मळ माणूस - ४५४.

✻ संदर्भ ग्रंथ - ४५८.

✻ डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर यांचे संतसाहित्य - ४६०.

* प्रस्तावना *

डॉ. अशोकमहाराज कवीश्वर

''श्रीदत्तमहाराज कवीश्वर-चरित्र आणि विचारधन'' या ग्रंथाच्या सातव्या आवृत्तीला प्रस्तावना लिहितांना मनांत अनेक संमिश्र भावना आहेत. श्रीदत्तमहाराजांचा ज्येष्ठ पत्र होण्याचे भाग्य लाभले, त्याचप्रमाणे ते दीक्षागुरू आणि मंत्रगुरू म्हणूनही प्राप्त झाले आणि श्रीदत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वाचे अनेक पैलू जवळून पहायला मिळाले हे केवढे भाग्य आहे. आनंदही वाटतो, अभिमानही वाटतो, धन्यताही वाटते, आणखी खूप काही वाटते जे शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही.

प्रस्तुत चरित्रासाठी प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने सद्गुरूचरणी वाक्सुमने अर्पण करण्याची संधी मिळते आहे ही सुद्धा भाग्याचीच गोष्ट आहे. परंतु असे वाटते की श्रीदत्तमहाराजांचे गुणवर्णन यथार्थ शब्दांत करणे कोणालाही शक्य होणार नाही. केवळ शिष्यभाव म्हणून हे लिहीत आहोत.

श्रीदत्तमहाराजांनी स्वतःला नेहमीच झाकून घेतले होते. स्वतःबद्दल ते कधीच काही बोलत नसत. कोठे सन्मान झाला, गौरव झाला, मोठा पुरस्कार मिळाला तरी घरी आल्यावर ते चुकूनही त्याचा उल्लेख करायचे नाही. बाहेरूनच कळले तर घरातील मंडळींना कळायचे. त्याचप्रमाणे अध्यात्मक्षेत्रात त्यांना स्वतःला काय अनुभूती आल्या याचा उल्लेख घरात कोणी त्यांच्या तोंडून कधीही ऐकला नाही.

श्रीदत्तमहाराजांचे अमानित्त्व व निरहंकारी वृत्ती खरोखरीच अलौकिक होती. त्यांच्याच प्रेरणेने झालेल्या मोठ्या उत्सवात किंवा कार्यक्रमांतही ते असे काही वावरत की जणू त्यांचा कशाशी काही संबधच नाही. त्यांच्या एखाद्या गुणाबद्दल कोणी उल्लेख करायला लागला तरी ते संकोचून जात. त्यावेळी त्यांना फार अवघड वाटायचे.

प्रसिद्धीपासून पूर्णतया दूर रहाणे हा त्यांचा स्वभावच होता. त्यांच्याबद्दल कोणी काही लेख लिहितो म्हटले की त्यांचा विरोधच असायचा. त्यांचा आदरसत्कारही त्यांना नको वाटायचा. स्वतःचे गुणवर्णन ऐकणेही त्यांना रुचत

नसे. त्यांच्या हातून फार महान कार्य घडत होते. पण या महान कार्याची त्यांना जाणीवही नाही असे वाटावे असेच त्यांचे मन पूर्ण निरहंकारी होते. याची घरातील सर्वांना सतत प्रचीती येत रहायची. ईश्वरच सर्व करतो आहे ही पूर्ण धारणा असल्याने कर्तेपणाचा भावही त्यांच्या मनांत कधी यायचा नाही. कर्माचे ठायी कर्तेपणाचा अभिमान न ठेवता प्रत्येक प्राणीमात्राचे ठिकाणी ईश्वरभावच कसा ठेवता येतो हे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत प्रत्यक्ष पहायला मिळायचे.

श्रीदत्तमहाराजांच्या विभुतीमत्त्वाचे अनेक असे पैलू वेळोवेळी जाणवत असत. परंतु श्रीदत्तमहाराजांचे अमानित्त्व आणि प्रसिद्धीविन्मुखता एवढी मोठी होती की त्यांच्या जीवनचरित्रात काय काय घडले याचे ज्ञान आज कोणालाही पूर्ण असेल असे वाटत नाही. त्यांचे बरेचसे चरित्र आजही अज्ञातच आहे. म्हणूनच त्यांचे संपूर्ण चरित्र संकलीत होणे व प्रसिद्ध होणे अशक्यच आहे.

फार मोठे ईश्वरी कार्य त्यांच्या हातून घडत होते. परंतु आमच्या घराच्या अगदी नजीक रहाणाऱ्या अनेक मंडळींनाही त्यांच्या कार्याचा मोठेपणा ज्ञात झाला नव्हता. साहजिकच त्यांच्या चरित्रांतून-विशेषतः प्रस्तुतच्या चरित्रातून जेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वाची आणि त्यांच्या थोर कार्याची माहिती लोकांपर्यंत पोचली, तेव्हा विस्मय, आदर, श्रद्धा, भक्ती अशा अनेक भावना वाचकांच्या मनांत दाटून आल्या. त्यांचे चरित्र वाचून अनेक लोक श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती येऊ लागले. तरुण मंडळी म्हणत - भागवतात वर्णन केलेला पूर्ण पुरुष आज विसाव्या शतकांत इथे प्रत्यक्ष पहायला मिळतो आहे हे आमचे मोठेच भाग्य आहे. अनेक लोकांना वाटत राहिले - यापूर्वीच या महान विभूतीच्या कृपाछायेत येता आले असते तर फार बरे झाले असते.

प्रस्तुत चरित्रांत श्रीदत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वासंबंधी आणि त्यांच्या चरित्रासंबंधी जो भाग आला आहे तो भागही फार थोडा आहे. खोल समुद्रांत एखादा मोठा हिमनग लपलेला असावा आणि त्याचे केवळ शिखर दिसावे तसे हे चरित्र आहे. तथापि प्रस्तुत चरित्रावरून श्रीदत्तमहाराजांच्या थोरवीची कल्पना करता येते हेही तितकेच खरे आहे. म्हणूनच प्रस्तुतचे चरित्र एवढे लोकप्रिय झाले असावे आणि केवळ दीड वर्षाच्या कालावधीतच त्या चरित्राची सातवी आवृत्ती प्रसिद्ध होण्याचा योग आला असावा.

जेव्हा भगवद्गीता पहिल्यांदा वाचली तेव्हा असे वाटले की भगवद्गीतेत ज्या पूर्णपुरुषाचे वर्णन केलेले आहे तो पूर्णपुरुष घरातच प्रत्यक्ष बघायला मिळतो आहे हे केवढे भाग्य आहे.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी स्थितप्रज्ञ व गुणातीत पुरुषाची लक्षणे सांगितली आहेत. ज्ञानप्रधान आंतरिक सन्यांसी कसा जीवन जगतो हे सांगितले आहे. अहंकार पूर्णपणे गेल्यावर ज्ञानी कर्मयोगी कर्म करीत रहातो आणि तरीही त्याचे कर्म निष्कर्म कसे असते हेही सांगितले आहे. फळाची आशा सोडून दिल्यावर योगी असंग वृत्तीने कसे कर्म करतो हेही सांगितले आहे. पूर्ण शांती प्राप्त करून घेतलेल्या धीरगंभीर पुरुषाचे वागणे कसे असते हेही सांगितले आहे. अनन्य ईश्वरनिष्ठा असलेल्या ज्ञानी भक्ताची वर्णने केली आहेत. दैवी प्रकृतीच्या पूर्णपुरुषाची गुणलक्षणे वर्णन केली आहेत. भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी ज्या अशा पूर्णपुरुषाचे वर्णन केले आहे, तो पूर्णपुरुष भगवान श्रीकृष्ण स्वत:च आहेत. गीतेतील ही गुणवर्णने भगवान श्रीकृष्णांना स्वत:लाच पूर्णतया लागू पडतात. भगवान श्रीकृष्णांनी एकप्रकारे स्वत:चे आंतरिक चरित्रच भगवद्गीतेतून सांगितले आहे.

भगवद्गीतेत पूर्णपुरुषाचे केलेले गुणवर्णन जसे भगवान श्रीकृष्णांना पूर्णतया लागू पडते, तसेच ते श्रीदत्तमहाराजांनाही पूर्णतया लागू पडते. असे होणे हा काही चुकून घडलेला केवळ एक योगायोग नाही. भगवंत जेव्हा जेव्हा अवतीर्ण झाले, तेव्हा तेव्हा आपले संपूर्ण आंतरिक गुणवैभव बरोबर घेऊनच ते अवतीर्ण झालेले आहेत. परंतु भगवंतांचे आंतरिक गुणवैभव काही अवतारात पूर्णत: प्रकट झाले तर काही अवतारात ते अंशत: प्रकट झाले. एखाद्या अवतारात आपले गुणवैभव पूर्णतया प्रकट करायचे का अंशत: प्रकट करायचे हे भगवंताच्याच योजनेप्रमाणेच होत आले आहे. श्रीदत्तमहाराजांमध्ये ते गुणवैभव पूर्णतया प्रकटले हे आपल्या सर्वांचेच मोठे भाग्य आहे.

श्रीदत्तमहाराजांचा सर्वात मोठा गुणविशेष म्हणजे त्यांचा साक्षीभाव. भोवतालच्या जगाकडे, घटनांकडे आणि व्यक्तींकडे ते नेहमी साक्षीभावानेच बघायचे. जे होईल ते होईल ही वृत्ती असायची.

श्रीदत्तमहाराजांना कुटुंबीयांबद्दल प्रेम नव्हते असे नाही. त्यांच्या मनांत प्रेम होतेच. पत्नी, मुले विशेषतः नातवंडांवर त्यांच्या मनांत असीम प्रेमभावना असायची. पण ते प्रेम त्या त्या प्रसंगापुरते, त्या त्या क्षणापुरते असायचे आणि पूर्णतया निरपेक्ष असायचे. त्या प्रेमात स्वामित्वाची भावना किंवा आसक्तीची भावना कधीच निर्माण झाली नाही. घर, घरांतील वस्तू, घटना, प्रसंग याकडे पहाण्यात एक प्रकारचा अलिप्तपणा होता.

प्रपंचात सुखदुःखे येणारच. आनंदाचे प्रसंगही येणार आणि विषाद वाटावा असे प्रसंगही येणार. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांतही असे सुखदुःखाचे अनेक प्रसंग सतत येतच राहिले. पण त्या सुखदुःखांनी श्रीदत्तमहाराजांना भांबावून टाकलंय, विचलीत केलंय असं कधीच घडलं नाही. कुटुंबीयांचे आजारपण, जीवघेण्या व्याधी आणि काही निकटच्या व्यक्तींचे मृत्यू या प्रसंगांतूनही ते अगदी स्थिरचित्त असायचे. थोरल्या आईसाहेबांच[1] निर्वाण, पिताश्रींच[2] निर्वाण किंवा आईसाहेबांचे[3] निर्वाण या प्रसंगांतही ते अविचलीतच दिसले. शोक नाही, मोह नाही, काही नाही. वाऱ्याची झुळुक आली आणि गेली तरी एखादा उंच मनोरा जसा स्थिरच रहातो तसे त्यांचे वागणे- बोलणे त्या कठीण प्रसंगांतही स्थिरचित्त होते.

श्रीदत्तमहाराजांच्या मनांतील समत्वभावना एवढी मोठी होती की तुलना करायला कोणतीही उपमा सुचत नाही. काही भावोत्कट प्रसंगात असं वाटायचं, श्रीदत्तमहाराजांचं मन आकाशाइतकं मोठं आहे. अधिक विचार केला म्हणजे परत वाटायचं त्यांचं मन आकाशाहूनही मोठं आहे - अनेक आकाशं ज्यात सहजगत्या सामावून जातील एवढं ते मोठं आहे. असे कितीतरी प्रसंग आठवतात. विस्तारभयास्तव त्या प्रसंगांचा येथे उल्लेख करत नाही.

श्रीदत्तमहाराजांची भगवंतावर एवढी निष्ठा होती की काया-वाचा-मनाने त्यांना भगवंताशिवाय दुसऱ्या कोणाचेच प्रेम नाही असे वाटावे. काही वेळा

टीप : १. सौ. सरस्वती आईसाहेब - श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्री.

२. श्रीधुंडिराजमहाराज - श्रीदत्तमहाराजांचे पिताश्री.

३. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब - श्रीदत्तमहाराजांच्या पत्नी.

तर ते भगवंताशी आपल्या प्रेमभक्तीने एकरूपच झाल्याची स्पष्ट प्रतीती यायची. म्हणूनच तर असा जगाबद्दलचा साक्षीभाव श्रीदत्तमहाराजांमध्ये पूर्णत्वाला पोचलेला दिसून यायचा. लोकांमध्ये ते वावरत असले, कुटुंबीय व आप्त मंडळीत ते बसलेले असले तरीही मनाने श्रीदत्तमहाराज एकांतातच आहेत असे वाटायचे. त्यांचे मन ऐहिक जगापासून दूर आहे, उदात्त पातळीवर उच्च ठिकाणी कोठेतरी विहार करीत आहे असे जाणवत रहायचे.

श्रीदत्तमहाराज महाज्ञानी होते असे अनेक विद्वान सांगतात. शास्त्रग्रंथ जीभेवरच असायचे हे सर्वांच्या प्रत्ययाला येतच होते. वेद, उपनिषदे, भागवत, महाभारत आणि पुराणे या ग्रंथांवर त्यांचे संपूर्ण प्रभुत्त्व होते. न्याय, व्याकरण, वेदान्त, मीमांसा, महायोगविज्ञान आणि धर्मशास्त्र ही शास्त्रेही श्रीदत्तमहाराजांना पूर्णतया अवगत होती. यापैकी कोणत्याही एका शास्त्राचा अभ्यास पूर्ण व्हायला अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या विद्वानालाही एक जन्म पुरायचा नाही ही वस्तुस्थिती आहे.

यापैकी केवळ एकाच शास्त्राचा अभ्यास अनेक विद्वान जन्मभर करीत रहातात आणि तरीही आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांचे अध्ययन पूर्ण होत नाही. केवळ एकाच शास्त्राचे ज्याने आयुष्यभर अध्ययन केले असा विद्वान समोर आला तरी महाराजांचे त्या शास्त्राचे ज्ञान आलेल्या विद्वानापेक्षा कांकणभर जास्तच दिसायचे. म्हणूनच न्यायशास्त्र, वेदान्त, व्याकरणशास्त्र वगैरे शास्त्राबाबत चर्चा करण्यासाठी देशविदेशांतून विद्वान मंडळी यायची, मोठ्या गहन चर्चा व्हायच्या आणि आलेल्या विद्वानांचे पूर्ण समाधान होऊनच ते विद्वान परत जायचे. अनेक विद्वान जातांना म्हणायचे - आज खूप काही नवीन प्राप्त करूनच तृप्त मनाने परत जातो आहे.

पण तो विद्वान परत गेला की पुन्हा त्या शास्त्रांतील ज्ञानाचा उल्लेखही श्रीदत्तमहाराज करीत नसत. जणू त्या शास्त्रांतील ज्ञानाचा एक वेगळा कप्पा आहे. तो त्यांनी तेवढ्यापुरता उघडला होता आणि पुन्हा आता तो कप्पा बंद झाला आहे असे वाटावे असेच त्यांचे वागणे व बोलणे असायचे.

घरांतील मंडळींना खूप कुतुहल होते की महाराजांना किती शास्त्रे अवगत आहेत. घरात कोणीकोणी स्पष्टपणे तसे विचारलेही होते. पण महाराज हा प्रश्न

ऐकून फक्त स्मित करायचे. त्यांनी या प्रश्नाचं उत्तर कधीच दिलं नाही. फक्त एकदा आपल्या नातवाबद्दलच्या प्रेमामुळेच त्यांच्या तोंडून काहीसे स्पष्ट-अस्पष्ट उद्गार निघाले होते. तो प्रसंग लिहिल्यावाचून रहावत नाही.

श्रीदत्तमहाराजांच्या एका शालेय वयातील नातवाने बाहेर ऐकले की त्याचे आजोबा महाज्ञानी आहेत. काहीशा अभिमानाच्या भावनेनं तो घरी आला आणि आजोबांना विचारू लागला, "महाराज, खरंखरं सांगा. आपल्याला सर्व शास्त्रांचे पूर्ण ज्ञान आहे ना?"

या प्रश्नाचे उत्तर एरवी कोणालाच मिळणे शक्य नव्हते. पण नातवाच्या चेहेऱ्यावरील ते निरागस भाव पाहून महाराजांनी त्याला शंकराचार्यांची गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "एका शिष्यानं हा प्रश्न विचारला, तेव्हा शंकराचार्य-स्वामीमहाराजांनी आपला दंडा समुद्राच्या पाण्यात बुडवला आणि तो बाहेर काढून म्हणाले होते, जगांतलं एकूण ज्ञान या महासागराएवढं आहे आणि मला झालेलं ज्ञान या दंड्याच्या तळाला लागलेल्या एका थेंबाएवढं आहे, शंकराचार्यांचे हे उद्गार सांगून श्रीदत्तमहाराज पुढे म्हणाले, "आमची स्थितीही याहून वेगळी नाही."

श्रीदत्तमहाराजांनी दिलेले हे उत्तर ऐकून नातवाचा चेहरा एकदम हिरमुसला. तो काहीसा खिन्न झाल्यासारखा झाला. आपले आजोबा महाज्ञानी आहेत या त्याच्या अभिमानाला तडा गेला होता. आपल्या नातवाच्या डोळ्यांतील ते भाव श्रीदत्तमहाराजांनी पाहिले आणि त्यांच्या मुखावर मंद स्मित झळकले, ते म्हणाले, "असे असलं तरी कोणीही कोणत्याही विषयांतलं काहीही आम्हाला विचारलं तरी आम्हाला सांगता येईल."

श्रीदत्तमहाराज सर्वज्ञानी आहेत याची काहीशी स्पष्ट-अस्पष्ट कबुली श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून बाहेर उमटली होती. ते सर्वज्ञानी आहेत हे मान्य करणारे उद्गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडले होते. केवळ आपल्या नातवावरील प्रगाढ प्रेमामुळे. त्यांचे ते उद्गार ऐकून नातवाच्या चेहऱ्यावर पुन्हा तोच अभिमान उमटला. हे पाहून श्रीदत्तमहाराज अगदी मनापासून हसले.

श्रीदत्तमहाराज सर्वज्ञानी होते हे तर खरेच आहे. पण ते स्वतःच अनेकदा म्हणत, "ऐहिक आणि पारलौकिक गोष्टींबद्दलचं ज्ञान हे खरं ज्ञानच नव्हे.

ऐहिक व पारलौकिक ज्ञान खरं म्हणजे अज्ञानातच जमा होते. खरे ज्ञान म्हणजे परमात्मतत्त्वाची अनुभूती. आत्मस्वरूपाची अनुभूती हेच खरे ज्ञान."

हे खरे ज्ञान कसं प्राप्त करून घ्यावं हा प्रश्न विचारला की श्रीदत्तमहाराजांचे उत्तर यायचं , "ईश्वरकृपेनेच हे ज्ञान प्राप्त होतं-स्वतःच्या प्रयत्नांनी नव्हे."

म्हणूनच शेवटी शेवटी श्रीदत्तमहाराज ईश्वरभक्तीत पूर्ण रंगून गेले होते. "नारायण भज रे मानस" हे श्रीकृष्णदयार्णव यांचे भक्तीपर पद त्यांना चोवीस तास अखंडपणे ऐकू येत होते. ते पद ऐकण्यात श्रीदत्तमहाराज इतके तल्लीन झाले होते की कुणी काही विचारलं तर ते म्हणायचे, "आता शब्द नको वाटतात. ऐहिक ज्ञानही नको वाटतं आणि पारलौकिक ज्ञानही नको वाटतं. केवळ ईश्वरभक्तीतच डुंबत रहावसं वाटतं."

कोणी म्हणतात श्रीदत्तमहाराज महाज्ञानी होते. कोणी म्हणतात ते सर्वज्ञानी होते. कोणी म्हणतात श्रीदत्तमहाराज ज्ञानाचे सगुण साकार मूर्तिमंत रूप होते . पण मला वाटते ही सगळी वर्णने अपुरी आहेत. यथार्थ शब्द वापरायचे झाले तर असं म्हणता येईल की श्रीदत्तमहाराज ज्ञानामागील अनुभूतीचे सगुण साकार रूप होते. ज्ञानामागील अनुभूती म्हणजे परब्रह्म असे शास्त्रकार सांगतात. म्हणूनच श्रीदत्तमहाराज स्वतःच परब्रह्म होते असे म्हणणे यथार्थ होईल.

केवळ जगाच्या कल्याणासाठी भगवंत स्वतः श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने अवतीर्ण झाले होते. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत जे काही घडले ती सर्व भगवंताची लीला होती. जगाच्या कल्याणासाठी स्वतः भगवंतांनी केलेली ती लीला होती.

प्रस्तुत चरित्रांत श्रीदत्तमहाराजांचे हे खरं स्वरूप व्यक्त झालं आहे. म्हणूनच हे चरित्र सर्वांना स्वीकारार्ह वाटलं आणि ते चरित्र झालं.


प्रस्तुत चरित्राचे लेखक डॉ.शरदचंद्र कोपर्डेकर हे श्रीदत्तमहाराजांचे अनुगृहीत आहेत. त्यांना श्रीदत्तमहाराजांची शक्तिपातदीक्षा लाभली, मंत्रदीक्षाही लाभली आणि चाक्षुषीदीक्षा व स्पर्शदीक्षाही घेण्याचे भाग्य लाभले. त्यांच्या पूर्वसुकृतामुळे ते श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती आले, स्थिरावले आणि त्यांचे अध्यात्मजीवन उजळून निघाले.

त्यांच्या हातून हे चरित्र लिहिले गेले हे ईश्वरीशक्तीचेच कार्य आहे. स्वतः चरित्रलेखकाला त्याची पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच चरित्रलेखक आपल्या मनोगतात पुनःपुन्हा वेगवेगळ्या शब्दांत म्हणताहेत की मी केवळ निमित्तमात्र आहे. चरित्रलेखकाची ही भावना खरीखुरी आहे, अंतःकरणाच्या गाभ्यातून आलेली आहे हे उघड आहे. कारण चरित्रलेखकावर श्रीदत्तमहाराजांची पूर्ण कृपा झालेली आहे.


चरित्रलेखकांचे कल्याण होवो किंबहुना सर्वांचेच कल्याण होवो ही आमची श्रीदत्तप्रभुंच्या चरणी सदैव प्रार्थना आहे.

।। अवधूतचिंतन श्रीगुरूदेव दत्त ।।

डॉ. अशोकमहाराज कवीश्वर



श्रीदत्तमहाराज कवीश्वर



श्रीदत्तमहाराज कवीश्वर

* श्रीगुरुःशरणम् *

- आशीर्वाद -

''आपले पुस्तक अभ्यासपूर्ण आहे एवढेच नव्हे तर ते प्रसाद, ओज व माधुर्य या गुणांनी युक्त आहे. श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे भूषण असलेले अखिल भारतीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची आंतरिक ओळख या पुस्तकाद्वारे आपण करून दिल्याबद्दल वैयक्तिक आमचे व शंकराचार्य करवीर पीठाचे शुभाशीर्वाद.''

विद्या शंकरभारती-स्वामीमहाराज
श्री स्वामी जगद्गुरू शंकराचार्य पीठ करवीर

***

''श्रीदत्तमहाराज कवीश्वर चरित्र'' या ग्रंथाद्वारे ग्रंथकर्ते डॉ.श्री. शरद्चंद्र कोपर्डेकर यांचा अधिक परिचय झाला. मा.श्री. शरद्चंद्र जसे गुरूवर्य प.पू. कवीश्वरांचे श्रद्धाळू साधक आहेत तसेच ते एक सव्यसाची, अभ्यासू व प्रज्ञावंत लेखकही आहेत याची प्रचिती उपरोक्त ग्रंथरचनेतून ठायी ठायी प्रत्ययाला येते. स्वतःची श्रद्धा जपूनही त्यांनी वास्तवतेचे उत्तम भान ठेवले आहे याचा वाटत रहाणारा आनंदही वेगळाच आहे.

माझ्या बालपणापासून प.पू. वामनमहाराज गुळवणी यांचा सहवास सुगंध मला अनेकदा लाभलेला होता. प.पू.कवीश्वरमहाराजांच्या सहस्त्रचंद्र कार्यक्रमाला उपस्थित रहाण्याचे सद्भाग्यही मला लाभले होते. त्यावेळी हुबळीच्या शंकराचार्यांशी गुरूवर्य दत्तमहाराजांच्या कार्याविषयी वार्तालाप करण्याचाही सुयोग लाभला होता. प्रथमपासून श्रीगुळवणीमहाराजांच्या आश्रमकार्याशी पूर्ण परिचित असल्याने उपरोक्त चरित्र वाचतांना ते अधिक जवळीकेचे वाटत होते.

श्रीदत्तमहाराजांच्या चरित्राच्या सर्व बाजू लेखकाने हळुवार पण संयमपूर्वक छान उलगडून दाखविल्या आहेत. श्रीगुळवणीमहाराजांचा वारसा श्रीदत्तमहाराजांनी ज्या दिव्यतेने सांभाळला आहे, त्याचे अत्यंत योग्य चित्रण लेखकाच्या समर्थ लेखणीने केले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या जीवन चरित्राचा अन्वयार्थ समाज मनाला भावतील असे विहंगम दर्शित झाले आहे. लेखकाची

लेखणी श्रीमहाराजांचे विचारदर्शन घडवितांना किती सिद्ध आहे याचा विलोभनीय अनुभव आल्याखेरीज रहात नाही. चरित्रलेखक अनेक असतात. परंतु चरित्रमय झालेले लेखक किती असतात हा मूळांत प्रश्न आहे. डॉ. शरद्चंद्र हे चरित्रमय झालेले ग्रंथकर्ते आहेत याचा विलक्षण अभिमान वाटतो. डॉ. शरद्चंद्र सर्वार्थाने चिरंजीव होवोत हाच त्यांना शुभाशीर्वाद. इत्यलम् ।

श्रीदत्तपद्मस्वामी
श्रीशक्ति पीठाधिश परिव्राजकाचार्य
परमहंस राजराजेश्वर योगीराज
श्रीविद्या पीठम हृषिकेश
शाखा पीठम-शक्ति पीठम

***

''हा ग्रंथ Magnum Opus (महाकाव्य सदृश श्रेष्ठ साहित्यकृती) म्हणावा असा उत्तम झाला आहे. विचारधनमधील गुरूशिष्य संवाद अत्यंत रोचक, कोणालाही समजेल असा सुबोध व चित्तवेधक झाला आहे. श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे वेदान्ताचे मर्म स्पष्टपणे सांगणारी व त्यांची अनुभूती सूचित करणारी आहेत. या ग्रंथाचे जर इंग्रजीत भाषांतर झाले तर श्री. महेंद्रनाथ गुप्त तथा 'म' यांच्या ''श्रीरामकृष्णवचनामृत'' (Gospel of Shri Ramakrishna) या ग्रंथाप्रमाणे सर्व देशांतील अध्यात्मप्रेमींना ते आवडेल, उपयुक्त वाटेल. त्याचा जगभर प्रसार होईल व त्याला जागतिक स्तरावर ''श्रीरामकृष्ण वचनामृत'' इतकीच मान्यता मिळेल.''

स्वामी श्रीनगरकरजीमहाराज
शिवानंद आश्रम, ऋषीकेश

***

पुस्तक अत्यंत सुंदर व संग्राह्य झाले आहे. त्यात श्रीमद्पूज्य महाराजांचा यथार्थ चरित्र भाग व महत्त्वपूर्ण असे विषय आले आहेत. श्रीधुंडिराजमहाराजांचे, सौ.आईसाहेबांचे तथा चिरंजीवांचे सुरेख व परिपूर्ण वर्णन केले आहे. त्यात उचित नवीन छायाचित्रे घातल्यामुळे चरित्र अधिक

आकर्षक बनले आहे. खरोखरच श्रीदत्तमहाराज हे आदर्श सत्पुरुष होते असे आम्ही अनुभवाने सांगतो. पुण्यपुरुषांचे गुणगान हे एक साधनच होय. ते आपण साधत आहात. या काळात श्रीदत्तमहाराजांसारखी सर्व दृष्टीने उत्तम व पवित्र व्यक्ती दुर्मिळच आहे.

वेदमूर्ती भालचंद्रशास्त्री उप्पिनबेटगेरी, धारवाड.

***

या चरित्राने अनेक मुमुक्षुंच्या जिज्ञासा तृप्त होतील आणि साक्षात्कारी पुरूष कसा असतो हे समजेल. सर्व मुमुक्षुंना हे चरित्र म्हणजे त्यांच्या अध्यात्ममार्गावरील वाटचालीत पाथेय म्हणून उपयोगी पडेल.

साधकांना त्यांच्या प्रश्नांची अधिकृत उत्तरे येथे मिळतील आणि त्यामुळे त्यांची पुढील वाटचाल अधिक आत्मविश्वासाने होईल. हा ग्रंथ ठायी ठायी आपली गुरूभक्ती प्रकट करतो. ग्रंथ संपूर्णपणे निर्दोष असून अध्यात्ममार्गावरील गुरूंचे चरित्र कसे लिहिले जावे या बाबतीत आदर्शच आहे.''

चरित्राच्या शेवटी असलेल्या प्रश्नोत्तरांतून तत्त्वज्ञानाची ओळख होते आणि व्यावहारिक जीवनांत प्रत्यक्ष कसे जगावे हे समजते. त्यानंतर असलेल्या भक्तांच्या अनुभवांतून साधकाला आपले अनुभव पडताळून पाहता येतील. अध्यात्माची आवड असलेल्या माणसाने हे चरित्र अवश्य वाचले पाहिजे. त्यामुळे त्याला कसे आणि कोठे जायचे आहे हे समजेल. या चरित्र लेखनाने संतवाङ्मयामध्ये अनमोल भर घातली आहे.

डॉ. श्री. म. भातखंडे, ठाणे.

***

('जीवनविकास' या रामकृष्ण मिशनच्या मुखपत्रातील आशीर्वाद)

या ग्रंथात श्रीदत्तमहाराजांच्या प्रदीर्घ आयुष्यातील मनोरम घटनांचा आलेख आलेला आहे. यात कौटुंबिक बाबींबरोबरच गुरूवर्यांशी (श्रीगुळवणीमहाराजांशी) असलेल्या त्यांच्या मधुर संबंधाचे अनेक उल्लेख आहेत. तसेच त्यांचे विद्याध्ययन आणि पुढे विद्यादान व ग्रंथलेखन यासंबंधीची सारी माहिती सविस्तर आली आहे.

या ग्रंथात भक्तांना आलेले आध्यात्मिक अनुभव नमूद करण्यात आले आहेत. यापैकी काही चमत्काराच्या स्वरूपाचे वाटण्याचा संभव आहे. परंतु एकंदर ग्रंथात श्रीदत्तमहाराजांच्या शुद्ध व सौम्य अशा निरभिमान चारित्र्यावर अधिक भर आहे. वाचकांतील सात्त्विक भाव जेणेकरून जागृत होतील आणि ते भक्तिमार्गाकडे वळतील अशा रीतीनेच पुस्तकातील विचारांची मांडणी केली आहे. निरनिराळ्या कालखंडातील श्रीदत्तमहाराजांचे अनेक रंगीत फोटो ग्रंथात अंतर्भूत केले आहेत. त्यामुळे त्यांची मूर्ती नजरेसमोर आणणे सोयीचे झाले आहे. वाचकाकडून या मूर्तीचे अनायासे ध्यान होते. एकंदरीत हा ग्रंथ सिद्ध करून लेखकाने दत्त संप्रदायाच्या वाङ्मयात मोलाची भर घातली आहे असे म्हणावेसे वाटते.

डॉ. नरेंद्रनाथ ब. पाटील,

***

ग्रंथाची घाटणी, आतील चित्रे, जागोजागी पेरलेली वेदान्त व संतवचने सर्व सर्वकांही वाखाणण्याजोगे आहे. ग्रंथ अत्यंत प्रासादिक झाला आहे. कोणत्याही उपनिषदाच्या दर्जाचा झाला आहे. हा ग्रंथ वाचल्यावर इतर उपनिषदे वाचायची शिल्लकच रहात नाहीत या मताला मी येऊन पोहोचलो आहे.''

श्री. श्रीवल्लभ बलदवा,लातूर.

***

तिसऱ्या मुद्रणाच्या निमित्ताने व्यक्त केलेले विचार वाचले. गुरूत्त्वाच्या गुणांवर टाकलेला तो विशेष प्रकाशझोत आहे. या लेखात आपल्याला श्रीगुरूसेवेने लाभलेली जीवन कृतार्थता व्यक्त करता आली आहे. आपले अंतःकरणपूर्वक अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. आपल्या विशाल लेखनाने विचारांना परिपक्वता आलेली आहे. श्रीगुरूकृपेने श्रद्धा आणि भक्ती शबल झाली आहे. संतश्रेष्ठ पू. श्रीकृष्णदयार्णवांची भक्ती आपल्यामध्ये संक्रमीत झाली आहे. पू. श्रीकृष्णदयार्णवांच्या आणि पू. श्रीदत्तमहाराजांच्या परमकृपेच्या छायेने आपल्या वैभवसंपन्न लौकिक जीवनाला अध्यात्माची जोड मिळाल्याने सुवर्ण सुगंधीत झाले आहे. आपण धन्य आहांत.

श्री. अच्युतराव सिद्धनाथ पोटभरे , पुणे

''श्रीदत्तमहाराजांचे कार्य कर्तृत्त्व फारें मोठे आहे. त्यामुळे त्यांचे चरित्र वाचकांसमोर येणे अत्यंत जरूरीचे होते. हे कार्य तुम्ही अत्यंत श्रद्धेने व कर्तव्यभावनेने केलेत हे चांगले झाले. ही मोठीच सेवा झाली असे म्हणावे लागेल. अत्याधुनिक व्यवस्थापन क्षेत्रात असूनही आपण श्रद्धा, भक्ती व प्रेम हे महत्त्वाचे गुण जपले आहेत, ही गोष्ट आजकाल दुर्मिळ झालेली आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तित्त्वाचे विविध पैलू तुम्ही समर्थपणे उलगडून दाखवलेत, भक्तांच्या प्रश्नांना त्यांनी दिलेल्या उत्तरांचे जाणतेपणाने स्पष्टीकरण दिलेत व दत्तमहाराजांच्या सान्निध्यात आलेल्या मंडळींचे प्रत्ययकारी अनुभवही दिलेत. यामुळे चरित्र ग्रंथाला एक प्रकारची खोली व सर्वांग परिपूर्णता लाभली आहे. आपण वाङ्मय क्षेत्रातले व भक्तिमार्गातले हे जे महत्त्वाचे कार्य केलेत त्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो.

श्री. बाळासाहेब जगन्नाथमहाराज पंडित
मुख्य विश्वस्त, ज्ञानेश्वरमहाराज संस्थान, आळंदी.

***

हे पुस्तक संत चरित्राला लावल्या जाणाऱ्या सर्व कसोट्यांना पूर्णपणे उतरणारे ठरेल. भारतीय अध्यात्म दर्शनाचा मूर्तिमंत आविष्कार या ग्रंथात पहायला मिळतो. ग्रंथातील प्रत्येक ओळ, साधकांच्या जीवनास विवक्षित वळण देण्यास समर्थ आहे असे म्हणावेसे वाटते. परमार्थ मार्गावर वाटचाल करतांना साधकांना दिसणारे कांही मैलाचे दगड या ग्रंथात शेवटी दिलेल्या अनुभूतीतून दिसून येतात. त्यामुळे वाचकांची परमार्थ मार्गावरील श्रद्धा बळकट होईल आणि वाटचाल करायला आंतरिक बळ प्राप्त होईल.

ही प्रश्नोत्तरी म्हणजे, श्रीदत्तमहाराजांच्या माध्यमांतून प्राप्त झालेला 'हितोपदेश' आहे. यांतून साधकांना नेमकी वाट दाखवित आहे. 'विचारधन'मधील गुरूशिष्य संवाद अत्यंत रोचक, कोणालाही समजेल असा सुबोध व चित्तवेधक झाला आहे. श्रीदत्तमहाराजांनी दिलेली उत्तरे वेदांताचे मर्म स्पष्टपणे सांगणारी व त्यांची अनुभूती सूचित करणारी आहेत.

श्री. वामन गो. तांबवेकर, मुख्य विश्वस्त,
समर्थ रामदासस्वामी कृपा ट्रस्ट, मुंबई .

* श्रीगुरुःशरणम् *

चरित्र वाचून असे वाटले की संतश्रेष्ठ श्रीकृष्ण दयार्णव यांचा आध्यात्मिक वारसा आपल्याकडे आला आहे. आनंद वाटला आणि समाधानही वाटले. विजयी भव हाच शुभाशीर्वाद.

मालती माजगांवकर, सातारा.

***

श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन'' हा सुंदर ग्रंथ प्राप्त झाला. एकाच बैठकीत ग्रंथ संपूर्ण वाचण्याचा मोह टाळता आला नाही. अत्यंत ओघवत्या व रसाळ वाणीचा प्रसाद ग्रंथातील प्रत्येक पानांत मिळत राहिला. महाराजांचे प्रसन्न व पारदर्शक व्यक्तिमत्व प्रत्येक शब्दात जाणवले. ज्यांना महाराजांचे अत्यंत प्रेम लाभले व अमोल मार्गदर्शनही मिळाले, त्यातील आम्ही एक आहोत. या ग्रंथाच्या निमित्ताने काही लेखन करावे व महाराजांचे विचार सर्व दूर पसरविण्यात खारीचा वाटा उचलावा अशी इच्छा आहे. २१ व्या शतकात सामान्य व असामान्य अशा सर्वांसाठी हा ग्रंथ मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

डॉ. मो. स. गोसावी, नाशिक.

***

संसार करूनही अध्यात्ममार्ग पत्करता येतो, हे श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनी आपल्या कृतीने सिद्ध केले आहे. त्यांचे 'विचारधन' तर सामान्यांना मार्गदर्शन नव्हे तर वाट चुकलेल्यांना पुन्हा मार्गावर आणणारे असे आहे. सध्याच्या या धकाधकीच्या जीवनांत श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र मनशांती देणारे असे असून क्षणभर आपण सांसारीक चिंता यामुळे विसरतो, असे हे पुस्तक संग्राह्य तर आहेच तसेच वाचनीय आणि अध्यात्माची उकल साध्या आणि सोप्या भाषेत करणारे असे आहे. त्यामुळे हे पुस्तक प्रत्येकाने वाचावे असेच मी म्हणेन, आपण हे असे अमूल्य पुस्तक मला भेट दिल्याबद्दल पुन्हा मी आपले आभार मानतो.

मा. गजानन कीर्तिकर
गृहराज्य मंत्री, महाराष्ट्र राज्य

पुस्तकाचे बहिरंग सुदंर व आकर्षक आहेच, त्याहून अंतरंग अधिक समृद्ध आहे. पू.श्रीदत्तमहाराजांचे यथार्थ चरित्र व विचारधन आपण प्रकाशात आणलेत. आपला महिमा वाढू नये म्हणून आपली असामान्य विद्वत्ता आणि आध्यात्मिक अधिकारी दक्षतेने गुप्त राखणाऱ्या ज्ञानयोग्याच्या चरित्राची नेमकी वैशिष्ट्ये हेरून त्यांचा परिचय घडविणे हे कार्य सोपे नाही. ते आपण या चरित्रगंथातून समर्थपणे आणि सहजतेने केले आहे.''

श्री. वासुदेव चोरघडे, नागपूर

***

पुस्तक फारच अप्रतिम आहे. सतत वाचनीय व मननीय आहे याबद्दल शंकाच नाही. पुस्तकाच्या अद्वियतेबद्दल जेवढे लिहावे तेवढे कमीच आहे. पू.दत्तमहाराज आपले सद्गुरू आहेत व त्यांच्या चरित्र गायनांत आपण रंगून गेला आहांत. सर्व शक्ती एकवटून आपण हे चरित्रलेखन केले आहे. आजच्या विसाव्या शतकामध्ये असा एक अद्वितीय महापुरूष संतोत्तम पुण्यामध्ये विद्यमान आहे त्याची आमच्यासारख्या महाराष्ट्रापासून दूर असणाऱ्या लोकांना कल्पनाच नव्हती. आपण श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल त्यांच्या दैवी गुण संपदेबद्दल, त्यांच्या पारमार्थिक अधिकाराबद्दल, त्यांच्या अनुभूतीबद्दल जे काही लिहिले आहे ते वाचून मन भारावून गेले आहे.

श्री. वामन शंकर पारनेरकर, इन्दोर

***

नुकतेच तुम्ही लिहिलेले'विचारधन' शब्दन् शब्द वाचले. दोन दिवस सतत वाचीत होतो. मी इतका भारावलो की भाव स्पष्ट करण्यास माझ्याजवळ शब्द अपुरे आहेत. 'विचारधन' हे पुस्तक नव्हे हा मौलिक गंथ आहे. सतत पुनःपुन्हा वाचावासा वाटणारा ग्रंथ आहे. मांडणी अत्यंत उत्तम, सुबद्ध भाषा, प.पू.श्रीदत्तमहाराज यांचे आकर्षक फोटो आणि इतर अनेक गुणांमुळे हा ग्रंथ प्रत्येक साधकाने सतत वाचीत राहिला पाहिजे असे वाटते.

प्रा.द.श्री. सबनीस, सांगली.

***

* श्रीगुरुःशरणम् *

आपले पुस्तक सद्गुरू भक्तांना परमानंद देणारे आहे.

श्री. भा.पु. चक्रपाणी, नागपूर.

***

मांडणी व बांधणी या दोन्ही दृष्टीने पुस्तक सुंदर झाले.

श्री. गु. वा. पिंपळापुरे, नागपूर.

***

पुस्तक फारच प्रभावी आहे. आपण खूप खोलवर अभ्यास करून पुस्तक लिहिले असल्याचे जाणवते. बारीक सारीक माहिती देण्यातही यशस्वी झाला आहांत. पुस्तक एकूण फारच चांगले लिहिले गेले आहे. महाराजांची घरगुती माहिती व घरांतील आणि घराबाहेरील लोकांची दिलेली माहिती फारच छान आहे. त्याबाबत आपण बरेच कष्ट घेतलेले दिसतात. त्यांचे विचार मनावर चांगलेच प्रभाव करीत रहातात. एका सत्शील, संत गृहस्थावर लिहिलेले इतके चांगले पुस्तक मी प्रथमच पाहतो आहे, वाचतो आहे. फारच छान.

डॉ.भाऊसाहेब गुळवणी, नेबापूर, पन्हाळा.

***

आपण मोठेच भाग्यवान, जे पुरूष सत्य जगले त्यांचा संग आपल्याला लाभला. त्यांच्याच कृपेने आपली प्रज्ञा-प्रतिभा अक्षररूपात अवतीर्ण होत आहे. 'श्रीदत्तमहाराजांचे चरित्र आणि विचारधन' खरोखरी अद्भुत आहे. धरावेत असे पाय दिवसेंदिविस कमी होत चालले असतांना, तेच पाय आपल्या घट्ट मिठीत असल्याचे दृश्य मी डोळ्यापुढे आणतो तेव्हा आपल्या भाग्याची खात्रीच पटते. आपण 'तेची पुरुष दैवाचे' आहात.

प्राचार्य डॉ. ह.श्री. साने, पुणे

***

आपले पुस्तक अतिशय अप्रतिम व चांगले आहे. आपण आमच्यासारख्या सामान्य साधकावर अतिशय उपकार केलेले आहेत. प.पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र वाचतांना साक्षात त्यांची तेजःपूंज मूर्ती डोळ्यासमोर

उभी रहाते. तसेच भगवतीस्वरूप प.पू.सौ.ताईमहाराजांची माहिती समजल्यावर आमच्यासारख्या सामान्य साधकांच्या ज्ञानांत भर पडली. 'विचारधन भाग-२' वाचल्यावर मनाच्या अनेक प्रश्नांचा उलगडा झाला.

श्री. रु.प. देवळे, कल्याण

***

हे पुस्तक सर्वांग सुंदर आहे. श्रीदत्तमहाराजांसारख्या थोर संताचे 'चरित्र व विचारधन' इतक्या समर्पक शब्दांत वाचायला मिळणे हाही भाग्याचा योगच आहे असे वाटते.

श्री. मो.वि. गवंडी, पुणे

***

श्रीदत्तमहाराज हे इतके सात्त्विक, संकोची ऋजु आणि अमानी होते की प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात ते कधी आलेच नाहीत आणि त्यांच्या खऱ्या आध्यात्मिक अधिकाराची ओळख सर्वसामान्य समाजाला फारशी झालीच नाही. डॉ.कोपर्डेकर यांच्या ''श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन'' या ग्रंथामुळे महाराजांचे दिव्य विभूतिमत्त्व आणि त्यांची विशुद्ध आध्यात्मिक भावधारा यांचे शब्दरूप दर्शन आपल्याला घडते.

लेखक स्वतः सद्गुरूकृपांकित आहे आणि त्याचे आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन व चिंतनदेखील व्यापक तसेच सखोल आहे. सामान्यतः संतसत्पुरुषांची चरित्रे चमत्कारांवर भर देऊन लिहिली जातात. पण या ग्रंथाचे स्वरूप अगदी वेगळे आहे. आत्मसाक्षात्काराची साधना, आत्मबोध आणि सिद्धपुरुषाचा व्यवहार यावरच डॉ.कोपर्डेकर यांचा सर्वस्वी भर आहे. सर्व दैवी गुणसंपदेचा आविष्कार श्रीदत्तमहाराजांच्या प्रापंचिक तसेच सार्वजनिक जीवनांत कसा झाला होता हे प्रसंगा प्रसंगाने डॉ.कोपर्डेकरांनी उत्तमप्रकारे विशद केले आहे. वेदान्त तत्त्वज्ञानाचे विविध पैलूही अनुषंगाने निदर्शनास आणून दिले आहेत.

हे पुस्तक वाचतांना सतत जाणवत रहाते ती महाराजांची आत्मस्थिती आणि जिज्ञासूंना व भक्तांना त्यांनी वेदान्तज्ञान मुक्तपणे - तेही अगदी सुबोध भाषेत वितरीत केले हे त्यांचे औदार्य. हे वितरण भागवतसप्ताह, प्रवचने,

सत्संग, व्यक्तिगत संभाषणे अशा सर्व मार्गांनी झाले आहे. सामान्य प्रापंचिक अडचणी घेऊन आलेल्यांनाही त्यांनी खऱ्या परमार्थाकडे वळविले हे विशेष.

अनेकविध प्रश्नांची उत्तरे महाराजांनी साध्या, सोप्या भाषेत दिली आहेत. वेदान्तजडता त्यात कुठेही नाही. सगळी उत्तरे सहजस्फूर्त आणि अनुभूतीचा स्पर्श असलेली आहे. वेदविद्येचे भक्कम अधिष्ठान त्यांना आहे.

साधकांचे जे अनुभव दिलेले आहेत ते ज्ञान त्यांची पातळी ज्ञानप्रधान व उपासनाप्रधान राखली आहे. हा ग्रंथ प्रकाशित होऊन लोकांपर्यंत पोचल्यानंतर अल्पावधीतच महाराजांनी देहत्याग केला. त्यामुळे त्यांच्या दर्शनाचा, सहवासाचा आणि उपदेश श्रवणाचा लाभ इतःपर मिळावयाचा नाही, याची पुष्कळांना हळहळ वाटेल.

चं.प. भिशीकर, दै. सकाळ.

***

ऋतंभरा प्रज्ञा, सखोल चिंतन आणि वेदान्ताचा व्यासंग यांचा संगम

शंकर सारडा, दैनिक देशदूत

***

पुस्तक अत्यंत वाचनीय आहे. त्यातील 'कर्मविपाक' विषयक चर्चा, नाममंत्र मिळाल्यानंतर साधकांना मार्गदर्शनपर विवेचन, श्रीगुरुःशरणम् मधील चर्चा-तत्त्वज्ञान सोप्या भाषेत मांडल्यामुळे त्याचा फायदा वाचकांना निश्चितच होईल. श्रीदत्तमहाराजांबद्दल ज्या उत्कट भक्तिभावना व्यक्त केल्या आहेत त्यावरून आपल्या जीवनांतील प्रत्येक क्षण एका अर्थी सद्गुरू पूजनातच सत्कारणी लागत आहे असे वाटते. गुरूकृपेने आपली साधना निर्वेध, अखंड चालेल हे निश्चित.

डॉ. ग. वा. तगारे, सांगली

***

इतका महत्त्वपूर्ण व हृदयांत खोलवर भिडणारा आशय अत्यंत सोप्या भाषेत सांगणे हे फारच कठीण आहे. परंतु महाराजांच्या कृपाप्रसादाने ते आपल्याला सहज शक्य झाले आहे. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र आणि विचारधन साधकांना पैलतीराला सहजपणे नेऊ शकेल असे वाटते.

प्रा. प्रमोद देव, सौ. अजिता देव, नागपूर

***

* मनोगत (पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने)

-डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर

वैदिक काळांत भारतभूमीवर अनेक थोर ऋषी होऊन गेले. अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी त्यांनी सखोल चिंतन केले. त्यांच्याजवळ ऋतंभरा प्रज्ञा होती, कुशाग्र बुद्धीमत्ता होती आणि तरल संवेदन क्षमताही होती. चिंतन करीत असतांनाच त्यांनी स्वतः अनेक प्रयोग केले आणि आलेले अनुभव डोळसपणे परंतु तटस्थपणे अभ्यासले. त्यामुळे त्यांच्या चिंतनाला प्रयोगनिष्ठ व स्वानुभवनिष्ठ संशोधनाचे स्वरूप प्राप्त झाले. या चिंतनातून त्यांनी विश्वाच्या निर्मितीचे व कार्यप्रणालीचे रहस्य जाणून घेतले.

हे रहस्य व्यक्त करण्यासाठी वैदिकऋषींनी अनेक मंत्र सांगितले. उच्च भावावस्थेत असतांना ऋषींना हे मंत्र स्फुरले होते. म्हणूनच या ऋषींना मंत्रद्रष्टे ऋषी असे म्हणतात. वेद, उपनिषदे व पुराणे अशा रीतीने मानवाला उपलब्ध झाली. हेच भारतीय अध्यात्मशास्त्र. यालाच वेदान्त असेही म्हणतात. वेदान्तामध्ये असलेले अध्यात्म विवेचन मूलगामी आहे, वास्तवाचे यथार्थ वर्णन करणारे आहे, पूर्ण सत्य आहे. आत्मविकासाची निश्चित प्रक्रिया शास्त्रशुद्ध पद्धतीने त्यात सांगितली आहे.

* वेदान्त खरा विश्वधर्म

वेदान्त या नावाने प्रसिद्ध असलेले अध्यात्मविवेचन तर्कशुद्ध आहे, वस्तुनिष्ठ आहे आणि वास्तवानुगामी आहे असे अनेक थोर विचारवंत सांगत आले आहेत. गेल्या काही शतकांत अनेक क्षेत्रात जे मूलगामी व शास्त्रशुद्ध संशोधन झाले आहे, त्यावरूनही वेदान्त विवेचन वस्तुनिष्ठ व वास्तवानुगामी आहे असेच दिसून येत आहे.

वैदिकऋषींनी सांगितलेली चार महावाक्ये अत्यंत महत्त्वाची मानली जातात. त्या चार महावाक्यांतच अध्यात्मविवेचनाचा गाभा त्यांनी सांगितलेला आहे. (१)अहं ब्रह्मास्मि। (मी ब्रह्म आहे), (२) तत्त्वमसि। (ते ब्रह्म तू आहेस), (३) अयमात्मा ब्रह्म। (हा आत्मा ब्रह्म आहे.) आणि (४) प्रज्ञानम् ब्रह्म। (ब्रह्म ज्ञानस्वरूप आहे.)

त्याशिवाय या ऋषींनी आणखी दोन तितकेच महत्त्वाचे मंत्र सांगितले आहेत. (१) सर्वं खलु इदं ब्रह्म । (या विश्वांतील सर्व काही ब्रह्म आहे.) (२) सकलमिदं अहं च वासुदेवः। (विश्वांतील सर्व काही वासुदेव म्हणजे परब्रह्म आहे आणि मी स्वतःसुद्धा परब्रह्मच आहे) या महावाक्यातूनच वैदिक ऋषींनी जो स्वतःचा अनुभव सांगितला आहे, त्या अनुभवालाच अद्वैत अनुभूती असे म्हणतात. ही अद्वैत अनुभूती काही थोड्या साधकांनाच स्वतः अनुभवता येईल याची जाणीव वैदिक ऋषींना होती. म्हणूनच त्यांनी समाजाची संपूर्ण धारणा करण्यासाठी वेदान्त तत्त्वज्ञान सविस्तरपणे मांडून ठेवले आहे. वेदान्त, तत्त्वज्ञान सांगितलेल्या काही अनुभूतींवरच आज प्रचलित असलेले जगांतील सर्व धर्म आधारलेले आहेत. वेदान्ताच्या एका एका अंगावरच आजचे सर्व धर्म उभे आहेत. वेदान्त तत्त्वज्ञानच जगातील सर्व धर्मांचा मूलभूत पाया आहे. अखिल विश्वांतील मानव समाजाची धारणा करण्याचे सामर्थ्य आजही वेदान्तामध्ये आहे. म्हणूनच वेदान्त हा खरा विश्वधर्म आहे असे निश्चितपणे म्हणता येईल.

वेदान्त या शब्दाचा अर्थ नीट समजावून घेतला पाहिजे. वेदांचा अंत किंवा वेदांचा शेवटचा भाग असा वेदान्त या शब्दाचा अर्थ नाही. अंतभाग म्हणजे निश्चयात्मक भाग. सर्व काही सांगणारा भाग. ज्याच्यापुढे काहीच सांगायचे राहिले नाही असा भाग. आत्मा व अनात्मा या पदार्थांसंबंधी मूलगामी विचार वेदान्त शास्त्रांत मांडले आहेत. म्हणूनच वेदान्त हे अंतिम सत्य सांगणारे शास्त्र आहे. कोणत्याही संस्कृतीच्या लोकांना आचरणात आणता येईल व त्यामुळे समाजाची परिपूर्ण धारणा होईल असा हा वेदान्त धर्म आहे. म्हणून एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या जगातील अनेक थोर विचारवंतांनाही जाणीव झाली आहे की वेदान्त हाच खरा वैश्विक धर्म आहे. वेदान्त हाच खरा सर्वकालीन वा सर्वजनीन धर्म आहे.

"धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।"

वेदकाळात धर्माचे जे तेजस्वी मूलरूप होते. त्याला काळाच्या ओघात वारंवार ग्लानी आलेली दिसते. जगाच्या कोणत्याही भागात एखादी विशिष्ट संस्कृती, राजवंश किंवा साम्राज्य फार काळ टिकून रहात नाही. त्यांचा

ऱ्हास होत जातो. मग महापुरुष अवतीर्ण होतात आणि धर्म व संस्कृती यांची पुनर्स्थापना करण्याचे कार्य करतात. या त्यांच्या कार्यालाच धर्मजागरण असे म्हणतात. धर्मजागरण करणारे महापुरुष ईश्वरी शक्तीचीच रूपे आहेत. त्यांनाच ईश्वरी अवतार असे आपण म्हणतो. समर्थ रामदास सांगतात, **"धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार। झाले आहेत पुढे होणार। देणे ईश्वराचे ।।"** भारतात असे अनेक अवतार झाले आहेत, काही पूर्णावतार, काही अंशावतार.

ईश्वर का अवतार घेतो याची तीन प्रयोजने भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितली आहेत. साधुंचे संरक्षण, दुर्जनांचा नाश आणि धर्मस्थापना अशी अवतार घेण्याची तीन प्रयोजने भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात. परंतु प्रत्येक माणसाला त्यांच्या कर्माची फळे भगवंत अलिप्तपणे देत असतात. म्हणजे साधुंच्या सत्कर्माचे फळ म्हणूनच साधुंचे संरक्षण भगवंत करतात. तसेच दुर्जन अधर्माने वागतात म्हणूनच त्या दुर्जनांचा नाश होतो. त्यामुळे साधुंचे संरक्षण करणे आणि दुर्जनांचा नाश करणे ही ईश्वराने अवतार घेण्याची मुख्य कारणे (प्रयोजने) आहेत असे म्हणता येत नाही. धर्मजागरण करणे म्हणजे धर्माची स्थापना हेच ईश्वरी अवताराचे मुख्य प्रयोजन असते. धर्मजागरण करण्याचे आणि जीवांचा उद्धार करण्याचे ईश्वराचे कार्य पृथ्वीच्या पाठीवर असे सतत चालू आहे. धर्मजागरण करतांना अवतारी पुरुष काळाच्या ओघात झालेले बदल लक्षात घेतात व त्याप्रमाणे वेदान्ततत्त्वज्ञान पुन्हा प्रचलित भाषेत मांडतात. आद्य शंकराचार्य,श्रीज्ञानदेव, श्रीएकनाथ, समर्थ रामदासस्वामी, नानक, कबीर असे अनेक अवतारी पुरुष भारतभूमीवर धर्मजागरणासाठी आले आहेत. या मालिकेत सर्वार्थाने शोभतील असे श्रीदत्तमहाराज कवीश्वर महाराष्ट्रभूमीत धर्मजागरण करण्यासाठी अवतीर्ण झाले आहेत. आद्यशंकराचार्य, श्रीज्ञानदेव, श्रीएकनाथ हे धर्मपुरुष जसे ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप आहेत. तसेच श्रीदत्तमहाराजही ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप आहेत. वेदांतील शाश्वत तत्त्वज्ञानच ते आजच्या समाजाला समजेल अशा भाषेत समाजापुढे पुन्हा मांडत आहेत.

आधुनिक काळांत अनेक धार्मिक पंथ, शाखा व प्रशाखा हिंदु धर्माचे कार्य करीत आहेत. त्यांच्या अनुयायांचे विचार व आचरण एकमेकांपेक्षा खूपच वेगळे दिसते. या पंथामध्ये विचार व आचार याबद्दल मतभेदही निर्माण झालेले दिसतात. त्यामुळे हिंद् धर्माचे यथार्थ स्वरूप जाणून घेणे भारतीयांनाही कठीण झाले आहे. विदेशीयांच्या मनांतही हिंदू धर्माच्या यथार्थ स्वरूपाबद्दल गोंधळ निर्माण झालेला दिसतो.

वास्तविक पहाता वेदान्त हाच खरा हिंदुधर्म आहे. तोच सनातन धर्म आहे. या सनातन धर्माचे पुनरुत्थापन व्हावे यासाठी वेदान्ताचे शुद्ध स्वरूप लोकांपुढे ठेवण्याचे कार्य श्रीदत्तमहाराज करीत आहेत. हा सनातन धर्म विशुद्ध स्वरूपात त्यांनी पूर्णतः स्वतःच्या जीवनात आचरणांत आणला आहे. त्यामुळे वेदान्त धर्माचे प्रत्यक्ष जिवंत उदाहरण लोकांना पहावयास मिळत आहे.

प्राचीन भारतीय अध्यात्मशास्त्राच व्युत्पन्न द्रष्टे

श्रीदत्तमहाराज प्राचीन भारतीय अध्यात्मशास्त्राचे व्युत्पन्न द्रष्टे आहेत. वेद, उपननिषदे व पुराणे त्यांना अवगत आहेत. न्याय, मीमांसाशास्त्र, वेदान्त आणि सहा वेदांगे यांचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला आहे. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, परामानसशास्त्र, गुढानुभव विद्या व मंत्रशास्त्र यांचाही गाढा व्यासंग त्यांनी केलेला आहे. म्हणूनच या सर्व विषयांतील तज्ज्ञ श्रीदत्तमहाराजांना प्रकांड पंडित किंवा महापंडितच मानतात. ऋतंभरा प्रज्ञा, सखोल चिंतन, गाढा व्यासंग व प्रतिभेची उत्तुंग झेप यामुळे श्रीदत्तमहाराजांच्या अध्यात्म विवेचनाला एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले आहे.

आपल्या विवेचनातून श्रीदत्तमहाराज प्राचीन भारतीय अध्यात्मशास्त्रातील मंत्र, सूत्रे व मूल्ये यांचेच विवेचन करतात. परंतु हे विवेचन आधुनिक विचार प्रणालीच्या स्वरुपात असते. सोप्या आणि स्पष्ट भाषेत असते. त्यामुळे त्यांचे विवेचन श्रोत्यांना अत्यंत आकर्षक वाटते. कुशाग्र बुद्धी असल्यामुळे श्रीदत्तमहाराज कोणत्याही विषयांत अगदी खोलवर, मुळापर्यंत जाऊ शकतात. तर्कशुद्ध विचार पद्धती, सखोल चिंतन, स्वतः केलेले अनेक प्रयोग व स्वानुभव यांचा खंबीर पाया श्रीदत्तमहाराजांच्या अध्यात्म विवेचनाला लाभला आहे.

त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे अध्यात्म विवेचन आधुनिक काळांतील सुशिक्षित तरुणांनाही मोहून टाकते. त्यांनाही श्रीदत्तमहाराजांचे अध्यात्म विवेचन वस्तुनिष्ठ वाटते, तर्कसंगत वाटते, मूलगामी वाटते आणि वास्तवानुगामी (वास्तवाचे योग्य वर्णन करणारे) वाटते. काळाच्या ओघांत समाजांतील परिस्थिती बदलली आहे. ही बदललेली परिस्थिती लक्षांत घेऊन श्रीदत्तमहाराज विवेचन करीत असतात. परंतु आपल्या विवेचनात कोणतीही विकृती किंवा दोष येऊ नये आणि वेदान्त हा अध्यात्मशास्त्राचा गाभा विशुद्ध मुळस्वरूपांतच मांडला जावा याची ते पूर्ण दक्षता घेतात.

* वेदान्त तत्त्वज्ञान कसे जगावे याचे प्रत्यक्ष उदाहरण

परमार्थ करण्यासाठी संसार सोडावा लागत नाही किंवा वनात जाऊन रहावे लागत नाही. नगरामध्ये रहात असतांनाच आपला व्यवसाय उत्तमप्रकारे करून व प्रपंच नेटका सांभाळून आत्मविकास करून घेता येतो आणि अद्वैत अनुभूतींपर्यंत सुद्धा जाता येते. वेदान्तात सांगितलेले तत्त्वज्ञान आजही आपल्या दैनंदिन व्यवहारातही पूर्णपणे आचरणांत आणता येते असे श्रीदत्तमहाराज सांगतात. ते जे काही सांगतात ते त्यांनी आपल्या स्वतःच्या जीवनात पूर्णपणे आचरणांत आणलेले आहे. त्यांची शिकवण स्वानुभवावर आधारलेली आहे आणि म्हणूनच त्यांचे जीवन व त्यांची शिकवण एकरूप आहे. वेदान्तातील तत्त्वज्ञान ते स्वतः जगत आहेत. म्हणूनच ते जे काही सांगतात ते त्यांचे जीवन पाहूनही समजून येते. वेदान्तातील शिकवण चिरंतन कशी आहे व ती आधुनिक काळांत कोणीही आचरणात कशी आणू शकेल याचे प्रात्यक्षिक म्हणून श्रीदत्तमहाराजांचे जीवन आपल्यासमोर आहे. वेदान्त तत्त्वज्ञान आजही कसे प्रत्यक्ष जगता येते याचे साक्षात उदाहरण म्हणजे श्रीदत्तमहाराजांचे जीवन कार्य असे निश्चितपणे म्हणता येते.

वैदिक काळात ऋषी स्वतः जीवन ज्ञानसाधनेत कसे व्यतीत करीत असतील, त्यांच्या मनांतून ऐहिक कामना पूर्णपणे नाहीशा झाल्यामुळे वेदान्तात निवेदन केलेली चिरंतन सत्ये त्यांच्या हृदयात कशा आविर्भूत होत असतील आणि मंत्ररूपाने लोकांपुढे प्रकटत असतील हे श्रीदत्तमहाराजांचे जीवन पाहून समजून येते. वैदिक संस्कृती कशी असेल



श्रीदीक्षितमहाराज

आणि वैदिकऋषींच्या आश्रमांतील सांस्कृतिक वातावरण कसे असेल हे "रेणुकानिवास" या श्रीदत्तमहाराजांच्या निवासस्थानी प्रवेश केल्यावर प्रत्यक्ष पहायला मिळते.

वेदान्ताचे प्रामाण्य आणि अतींद्रिय सत्याचे प्रामाण्य अशाप्रकारे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनावरून आधुनिक काळांत आपोआप सिद्ध होत आहे.

* वेदान्ताचे विसाव्या शतकांतील महनीय प्रवक्ते

वेदान्ताची शिकवण समाजापुढे मांडण्यासाठी गेली सत्तर वर्षे श्रीदत्तमहाराज भागवतसप्ताह आणि प्रवचने करीत आले आहेत. आत्तापर्यंत श्रीदत्तमहाराजांनी सुमारे एक हजार भागवतसप्ताह स्वतः केले आहेत. या भागवतसप्ताहात ते भागवताची संस्कृत संहिता वाचतात आणि नंतर मराठी भाषेतून भागवतातील कथेचे रसाळपणे निरूपण करतात. कथा सांगतानाच ते चिंतनपर वाक्ये सांगतात, उपदेशपर निवेदने करतात आणि वेदान्तातील तत्त्वज्ञान आचरणात कसे आणता येते हे सोप्या भाषेत श्रोत्यांच्या मनावर ठसवतात. प्रासंगिक प्रवचनेही सतत चालू असतात. या प्रवचनात ते जे काही सांगतात त्याला वेदान्तातील तत्त्वज्ञानाचा भक्कम पाया असतो. प्रवचनात तत्त्वज्ञानाची नुसती शाब्दिक मांडणी ते करीत नाहीत. वेदान्तातील अनुभूती स्वतः कशा घेता येतात हे ते सांगतात आणि ती अनुभूती श्रोत्यांपर्यंत पोचवतात. भागवत, रामायण, महाभारत वगैरे ग्रंथातील प्रमुख व्यक्तींच्या जीवनातील प्रसंग सांगतात आणि धर्मनिष्ठ जीवन कसे जगावे हे श्रोत्यांना समजावून सांगतात. श्रीदत्तमहाराजांनी आत्तापर्यंत केलेल्या प्रासंगिक प्रवचनांची संख्या पंधरा हजाराहून अधिक झालेली आहे.

संयोजकांनी प्रवचनाला दिलेला अवधी ध्यानांत घेऊन त्या वेळातच विषय संपूर्ण मांडणे व विवेचनाची मांडणी बांधेसूद, आखीव व रेखीव ठेवणे हे या प्रवचनांचे वैशिष्ट्य असते. पंधराच मिनिटे मिळाली असतील तर त्या पंधरा मिनिटांतच श्रीदत्तमहाराज संपूर्ण विषय मांडतात, सोळावे मिनिटही ते घेत नाहीत. परंतु त्याच विषयावर विवेचन करायला दोन तास अवधी मिळालेला असेल तर ते विषय फुलवतात. पाल्हाळ, पुनरुक्ती किंवा एखादा मुद्दा जास्त ताणला जाणे हे

दोष विवेचनांत येत नाहीत आणि तरीही विवेचनाची मांडणी प्रमाणबद्धही असते, प्रभावीही असते व प्रत्ययकारीही असते.

श्रोत्यांचा अधिकार व योग्यता पाहून त्यांना समजेल अशा पद्धतीने विवेचन करणे हे श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनांचे प्रमुख वैशिष्ठ्य असते. अभ्यासू शास्त्रीपंडितांसमोर जेव्हा एखादा विषय मांडायचा असतो, तेव्हा श्रीदत्तमहाराज संस्कृत भाषेत विवेचन करतात. विषयाची मांडणी सर्वार्थाने शास्त्रीय असते. त्यामुळे अभ्यासू शास्त्रीपंडित प्रभावित होतात. त्याच विषयावर नागरी भागातील सुशिक्षित श्रोत्यांसमोर बोलावयाचे असते, तेव्हा श्रीदत्तमहाराज नागरी बोलीत विचार मांडतात आणि नागरी जीवनातील उदाहरण देऊन विषयाचे प्रतिपादन करतात. त्यामुळे या प्रवचनाला आधुनिक विचारशैलीचे स्वरूप प्राप्त होते आणि नागरी भागांतील सुशिक्षित श्रोते प्रभावित होतात. जेव्हा तोच विषय ग्रामीण भागातील अल्पशिक्षित लोकांसमोर मांडावयाचा असता, तेव्हा श्रीदत्तमहाराज सोप्या भाषेत बोलतात. ग्रामीण जीवनातील भाषेत मांडायचा असेल तेव्हा ते श्रोत्यांना परिचित असलेली संतवचने सांगून तो विषय ग्रामीण भाषेत मांडतात. त्यामुळे ते श्रोतेही प्रभावित होतात. संतवचने सांगून तो विषय ग्रामीण भाषेत मांडतात. शाळेत शिकणाऱ्या मुलांसमोर एखादा विषय मांडायचा असला की ते स्वतःच एक मूल होऊन जातात आणि आपल्या समवयस्क मित्रांशी हितगूज करावे अशा पद्धतीने बोलतात. त्यामुळे मुलेही त्यांचे विचार ऐकतांना समरस होऊन जातात. दुर्गम भागातील आदिवासी लोकांसमोर प्रवचन करावयाचा योगही श्रीदत्तमहाराजांना आला होता. तेव्हाही त्या श्रोत्यांच्या अंतरंगापर्यंत आपले विचार पोचतील अशाच पद्धतीने ते बोलले आहेत. प्रवचन झाल्यावर एक वृद्ध आदिवासी म्हणाला होता, ''बराबर सांगितला बाबांनी''.

श्रोते कोणतेही असोत, बोलीभाषा कोणतीही असो, प्रवचनाची शैली कोणतीही असो, श्रीदत्तमहाराजांच्या सर्व विवेचनाला वेदान्ताचाच मूलाधार असतो. श्रीदत्तमहाराजांच्या सर्व प्रवचनांतून प्रखर वेदान्ती ही मूळ भूमिकाच प्रत्ययास येते.

परंपरेने श्रीदत्तमहाराजांकडे शास्त्रीपंडित ही भूमिका आली आहे. श्रीधुंडिराजमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज यांच्या संप्रदायामध्ये ते उत्तराधिकारी आहेत. या परंपरांची चौकट न मोडता आणि शास्त्रमर्यादा न ओलांडता ते वेदान्त श्रोत्यांपुढे मांडतात. श्रीदत्तमहाराज आंधळी निष्ठा घेतलेले परंपरापूजकही नाहीत किंवा अविश्वासाने प्रेरित झालेले परंपराभंजकही नाहीत. रूढीपूजकही नाहीत किंवा रूढीभंजकही नाहीत. विवेचनाच्या ओघांत विषय निघाला म्हणजे रूढी व परंपरा यांच्यामागील शास्त्रीय भूमिका ते समजावून सांगतात आणि आधुनिक काळातील जीवनाला उपयुक्त असलेल्या रूढी व परंपरांचे पालन करावे असे सुचवतात. रूढीप्रमाण्य आणि कर्मकांडापेक्षा विवेकनिष्ठा व आध्यात्मिक उन्नती त्यांना जास्त महत्वाची वाटते. त्यांच्या विचारांचा अधिक परिचय झाल्यावर लक्षात येते की अंतिम सत्याचा मूलगामी शोध घेणे ही त्यांच्या चिंतनाची व अध्यात्म विवेचनाची एकमेव प्रेरणा आहे. श्रीदत्तमहाराज खऱ्या अर्थाने सत्यशोधक आहेत, विवेकनिष्ठ आहेत, प्रखर बुद्धीवादी आहेत आणि म्हणूनच श्रीदत्तमहाराज आधुनिक काळातील यथार्थ अध्यात्मवादी आहेत.

श्रीदत्तमहाराजांची शिकवण माणसाला संसारापासून दूर नेणारी किंवा समाजापासून दूर नेणारी नाही. समाजातच राहून आणि समृद्ध कौटुंबिक जीवन जगूनही परमार्थ करता येतो. भौतिक जीवन चांगल्याप्रकारे जगत असतानांच आध्यात्मिक जीवनही विकसित करता येते हे श्रीदत्तमहाराज समजावून सांगतात. ईश्वर सर्वत्र भरलेला आहे, आचरण विशुद्ध राखले आणि सतत ईश्वराचे अनुसंधान ठेवून सर्वांवर प्रेम करीत राहिले म्हणजे साधकाचे उन्नयन होत जाते आणि साक्षात्काराच्या अवस्थेपर्यंत पोचता येते हा विचार श्रीदत्तमहाराज प्रामुख्याने सांगतात. अर्थ आणि काम यांच्या उद्दिष्टांना श्रीदत्तमहाराज विरोध करीत नाहीत. अर्थ आणि काम यांच्या अर्जुनाला धर्माचे बळकट अधिष्ठान असावे असे ते सांगतात. ईश्वरच तुम्हाला अर्थ आणि काम देतो आहे याची सतत जाणीव ठेवायला ते सांगतात. मग समृद्ध कौटुंबिक जीवन जगतांनाच परमार्थाची शिकवण आचरणात आणता येते.

केवळ शरीराने भौतिक सुखसोयींचा त्याग करणे फारसे महत्वाचे नाही. मनात अनासक्त वृत्ती असणे आणि मनांतील इच्छा व वासना कमीकमी करीत जाणे हे जास्त महत्त्वाचे आहे असे श्रीदत्तमहाराज सांगतात. कोणताही व्यवसाय आपल्या वाटाला आला असला तरीही अनासक्त वृत्ती ठेवून आपला व्यवसाय उत्तम प्रकारे करता येतो आणि कौटुंबिक जीवनातही उत्तम प्रकारे जगता येते. कारण परमार्थ म्हणजे अनासक्त वृत्तीने सर्व व्यवहार करीत रहाणे, सर्व कर्तव्ये पार पाडणे आणि अलिप्त मनाने सर्व कर्म करणे असे श्रीदत्तमहाराज आवर्जून सांगत असतात. जीवनांतील सर्व सुखे तुम्हाला मिळू देत परंतु ती सुखे देणाऱ्या परमेश्वराला तुम्ही विसरु नका असे श्रीदत्तमहाराज आपल्या प्रवचनांतून श्रोत्यांना सांगतात.

* सनातन परंपरा व आधुनिक जीवनशैली यांचा समन्वय

भौतिक विकास आणि पाश्चात्य संस्कृती यांचा भारतीय लोकांवर पडलेला प्रभाव श्रीदत्तमहाराज नजरेआड करीत नाहीत. आधुनिक विचार प्रवाहांचे विश्लेषण ते करतात आणि योग्य वाटणाऱ्या नव्या विचारांचे ते स्वागतही करतात. आधुनिक विज्ञानाने मानवी समाजाला ज्या सुखसोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत, त्यांना श्रीदत्तमहाराज विरोध करत नाहीत. भौतिक प्रगतीचे ते स्वागतच करतात.परंतु समृद्ध भौतिक जीवन जगत असतांना प्रत्येकाने आध्यात्मिक मूल्यांची जोपासना केली पाहिजे आणि स्वतःमध्ये आंतरिक बदल घडवून आणण्याकडे अधिक लक्ष पुरविले पाहिजे अशी त्यांची शिकवण आहे. आपल्या विवेचनात श्रीदत्तमहाराज शास्त्रांचे मूलाधार सोडत नाहीत आणि तरीही त्यांनी केलेले विवेचन आधुनिक शैलीत असते. त्यामुळे त्यांच्या विवेचनात सनातन परंपरा व आधुनिक जीवनशैली यांचा समन्वय दिसून येतो. पूर्व आणि पश्चिम यांचा उचित संगम इथे पहायला मिळतो. धर्म, संप्रदाय, पंथ, भाषा आणि संस्कृती ही कुंपणे ओलांडून ते समाजापुढे वेदान्त मांडतात. म्हणूनच श्रीदत्तमहाराज वेदान्ताचे म्हणजेच विश्वधर्माचे एकविसाव्या शतकातील महनीय प्रवक्ते आहेत. त्यांची प्रवचने ऐकायला सुशिक्षित तरुण स्त्री-पुरुषही मोठ्या संख्येने येतात. प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनियर, चार्टर्ड अकाऊंटन्ट, वरिष्ठ प्रशिक्षित व्यवस्थापक असे

खूप शिकलेले लोकही त्यांच्या प्रवचनांमुळे मंत्रमुग्ध होऊन अध्यात्माकडे वळल्याची अनेक उदाहरणे आहेत. आता श्रीदत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहांची आणि प्रवचनांची पुस्तके, ध्वनिफिती व चित्रफिती प्रकाशित झालेल्या असल्यामुळे हा अमोल ठेवा भावी काळातही सर्वांना उपलब्ध राहणार आहे.

* निवडक जिज्ञासूंसाठी निरूपणे

निवडक जिज्ञासूंपुढे श्रीदत्तमहाराज निरूपणेही करतात. ब्रह्मसूत्रे, योगसूत्रे,वेद, शंकराचार्यांचे वाङ्मय, संस्कृत स्तोत्रे हे त्यांचे निरूपणांचे विषय असतात. पारिभाषिक व तांत्रिक शब्दात न अडकता या अध्यात्म वाङ्मयातील रहस्यांचे स्पष्टीकरण श्रीदत्तमहाराज अगदी सोप्या भाषेत करतात.

दुर्बोध ऋचा, जटील सूत्रे व कूट स्वरूपाचे श्लोक यांतील गुढार्थही जेव्हा श्रीदत्तमहाराज समजावून सांगतात तेव्हा अभ्यासू शास्त्रीपंडितही चकित होतात. अशा रचनांचा अर्थ श्रीदत्तमहाराज व्याकरण शास्त्राप्रमाणे सांगत नाहीत. जी अनुभूती सांगण्यासाठी या रचना केल्या गेल्या ती अनुभूती ऋतंभरा प्रज्ञेच्या बळाने श्रीदत्तमहाराज जाणून घेतात व श्रोत्यांपर्यंत ती अनुभूती पोचवतात. म्हणूनच त्यांचे निरूपण जाणकारांनाही प्रभावित करणारे असते.

* विचारधन - जिज्ञासूंच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे

जिज्ञासू साधक श्रीदत्तमहाराजांना आपल्या शंका विचारतात. अनेक वेळा साधकांचा अनुभव व ज्ञान तोकडे असल्याने त्याला आपल्या शंका नीटपणे स्पष्ट शब्दांत मांडता येत नाहीत. इतर ऐकणाऱ्यांना तो प्रश्न अगदी सामान्यही वाटतो. पण श्रीदत्तमहाराज अतींद्रिय शक्तीच्या माध्यमांतून त्या साधकाच्या अंतरंगातील जिज्ञासा जाणून घेतात व त्या साधकाचे पूर्ण समाधान होईल असे विवेचन करतात. अशा प्रश्नोत्तर संवादांना अनेक वेळा सुसंवादाचे स्वरूप प्राप्त होते. अनेक साधक हे संवाद ध्वनिमुद्रित करून लिहून ठेवतात. काही निवडक प्रश्नोत्तरे 'विचारधन' या नावाने तीन भागात प्रसिद्ध झाली आहेत.

श्रीदत्तमहाराजांची प्रवचने व विचारधन वाचतांना असे सतत जाणवत रहाते की श्रीदत्तमहाराजांची भाषा सोपी आहे. नेमका आशय मोजक्या शब्दांतच सांगितला आहे. जे सांगायचे ते स्पष्टपणे आणि निसंदिग्धपणे सांगितले आहे. तांत्रिक शब्द न वापरता, पारिभाषिक संज्ञा टाळून आपल्या रोजच्या बोलीभाषेतच विचार व्यक्त केले आहेत. भाषेचे अलंकार वापरलेले नाहीत. तरीही त्यांची भाषा प्रभावी आहे. त्या भाषेला एक ताल आहे, एक नाद आहे, गोडवा आहे, माधुर्य आहे आणि प्रवाही गतीही आहे. श्रीदत्तमहाराजांचे शब्द करुणेत भिजून आलेले असल्यामुळे ते हृदयात खोलवर पोचतात व तेथे आंतरिक बदल घडवून आणतात. नामवंत भाषाप्रभू साहित्यिकांना व अनुभवी वक्त्यांनाही हे सहजगत्या जमणार नाही.

'विचारधन'मध्ये जागोजागी ऋतंभरा प्रज्ञेच्या व उच्च आध्यात्मिक अनुभूतीच्या खूणा अनेक ठिकाणी दिसतात. आत्मसाक्षात्काराच्या प्रक्रिया व रहस्ये यांवर श्रीदत्तमहाराजांनी चांगला प्रकाश टाकला आहे. स्वानुभव व आध्यात्मिक अनुभूतीतून आलेली अनेक प्रमाणवचने या उत्तरात आहेत. एखाद्या नास्तिक माणसाने मोकळ्या मनाने विचारधन वाचले तर तो निश्चितच अंतर्मुख होईल व ईश्वरभक्तीकडे वळेल.

कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देतांना श्रीदत्तमहाराज आपल्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर अगदी खोलवर मूळापर्यंत जातात आणि त्यांची दृष्टी जीवनाच्या अंतिम सत्यावरच केंद्रीत झाली आहे. अनेक वाक्ये मंत्रगर्भ सूत्रांसारखी आहेत. अनेक शब्द वेदांतील शब्दाचे मंत्ररूप घेऊन आले आहेत, वेदांतील ऋचांसारखी किंवा संहितासारखी अनुभूतिसंपन्न व आशयघन वचने ठायी ठायी दिसतात. सर्व विवेचनाला वेदान्ताचा मूलाधार आहे. बुद्धिप्रामाण्य, विवेकनिष्ठा व तर्कशुद्ध विचार यांचा दृढ पाया आहे. संपूर्ण विवेचनांत श्रीदत्तमहाराजांची शास्त्रीय भूमिका पूर्णतः प्रकट झालेली दिसते. मानवी जीवनाला भौतिक पातळी, मानसिक पातळी व आध्यात्मिक पातळी अशा ज्या तीन पातळ्या आहेत, त्या तीनही पातळ्यांचा विचार करूनच श्रीदत्तमहाराजांनी सर्व प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. तसेच प्रत्येक उत्तर देतांना अखिल विश्वांतील प्राणीमात्रांच्या जीवनाचा सम्यक विचार केलेला आहे.

विषयाचा भारदस्तपणा सातत्याने सांभाळलेला आहे. वैयक्तिक व कौटुंबिक जीवन आणि समाजजीवन यांतील प्रमुख समस्यांचा विचार करूनच समतोल उत्तरे दिली आहेत.

त्यामुळे विचारधनमधील श्रीदत्तमहाराजांची उत्तरे पुनःपुन्हा वाचावीशी वाटतात, त्यावर मनन व चिंतन करावेसे वाटते आणि प्रत्येक वेळी नव्या नव्या अनुभूती मिळत रहातात. विचारधन वाचतांना साधकांना असे सतत जाणवत रहाते की वैदिक परंपरेला ललामभूत असलेले आधुनिक बोलीभाषेतील उपनिषदंच आपण वाचत आहोत. म्हणून साधकांना विचारधन वेदमंत्राप्रमाणेच मंत्रमय वाटते आणि श्रद्धेय वाटते आणि पूजनीय वाटते.

पूर्ण ज्ञान हे श्रीदत्तमहाराजांचे बहिरंग असले तरी अद्वैत अनुभूती व अद्वैत भक्ती हेच श्रीदत्तमहाराजांचे अंतरंग आहे. परोक्ष व अपरोक्ष ज्ञान आणि पराभक्ती यांची श्रीदत्तमहाराज साक्षात मूर्ती आहेत. ब्रह्मानंदाच्या अवस्थेत सतत त्यांच्या शब्दांना आत्मानुभवाचा परिसस्पर्श झालेला आहे.

कल्पवृक्षाच्या छायेत बसून हातात चिंतामणी धरला की जी जी इच्छा करावी ते ते सारे काही मिळत रहाते असे म्हणतात. अगदी तशीच अवस्था विचारधन वाचतांना मुमुक्षुंची होते. ज्याची ज्याची आठवण करावी ते समोर उपस्थित होते. ज्याची ज्याची इच्छा करावी ते 'विचारधन'मध्ये पुढे येते. मुमुक्षुंचे इच्छाभोजन म्हणजे ब्रह्मभोजन. ते इथे अगदी आकंठ तृप्त होईपर्यंत मिळतेच. ब्रह्मभोजनानंतर दक्षिणा म्हणून स्वात्मानंदाचा कुबेरखजिना समोर येतो. त्यामुळे 'विचारधन' वाचणाऱ्या मुमुक्षुंची काय अवस्था होत असेल ते फक्त दुसऱ्या मुमुक्षुलाच समजू शकेल.

भारतीय अध्यात्मशास्त्र व योगशास्त्राने आधुनिक काळांत सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. पाश्चात्य जगांत विविध स्तरांवरून भारतीय अध्यात्मशास्त्राचा व योगशास्त्राचा अभ्यास चालू आहे. वैदिकऋषींनी निर्मिलेली स्वानुभवनिष्ठ व प्रयोगनिष्ठ संशोधन पद्धती पाश्चात्यांच्या कुतुहलाचा, चिंतनाचा व प्रयोगाचा विषय बनली आहे. भारतीय अध्यात्मशास्त्र व योगशास्त्रातील अनेक सूत्रांसंबंधी पाश्चात्य जगात अनेक

प्रयोग केले जात आहेत व वेदान्ताचे नव्याने परिशीलन व मूल्यमापन केले जात आहे. म्हणून श्रीदत्तमहाराजांचे विचारधन हिंदी आणि अन्य प्रमुख भारतीय भाषांतून अनुवादित झाले पाहिजे आणि इंग्रजी भाषेतून पाश्चात्य विचारवंतांपुढे मांडले गेले पाहिजे. त्यांनाही हे विचारधन तर्कशुद्ध यथार्थ वाटेल आणि पूर्णपणे वास्तवानुगामी वाटेल यात शंका नाही.

* दीक्षागरू

श्रीगुळवणीमहाराजांचे उत्तराधिकारी या नात्याने श्रीदत्तमहाराजांना दीक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. तसेच श्रीधुंडिराजमहाराजांचे उत्तराधिकारी या नात्याने श्रीदत्तमहाराजांना दीक्षा देण्याचा अधिकार मिळालेला आहे. या दोन्ही परंपरांमध्ये श्रीदत्तमहाराजांनी आतापर्यंत हजारो शिष्यांना दीक्षा दिलेली आहे. अशी दीक्षा घेतलेले शिष्य भारतांत सर्वत्र पसरलेले आहेत. दीक्षा दिलेल्या शिष्यांची जबाबदारी श्रीदत्तमहाराज घेतात आणि त्याच्या ऐहिक व पारमार्थिक जीवनांत सतत उन्नयन होत राहील याकडे श्रीदत्तमहाराज लक्ष ठेवतात. शिष्यांची श्रद्धा जेवढी वाढत जाईल आणि साधना जितकी उत्कटतेने होत जाईल तितके अनुभव येत रहातात व आध्यात्मिक उन्नयन होत जाते. सद्गुरू म्हणजे साक्षात परमेश्वर अशा श्रद्धेने असंख्य शिष्य नित्य साधनेत राहिलेले आहेत.

श्रीदत्तमहाराज जेव्हा एखाद्या शिष्याला दीक्षा देतात तेव्हा त्या शिष्याच्या हृदयामध्ये ते शक्तीसंचार करीत असतात. त्यांच्या ठिकाणी असलेल्या सिद्धशक्तींमुळे ते आपल्या शिष्यांच्या मनावर संस्कार करून त्याच्या मनात बदल घडवून आणू शकतात आणि फारच अल्पकाळात ते आपल्या शिष्याच्या जीवनाची गती अध्यात्माकडे वळवू शकतात. शास्त्र असे सांगते की सिद्धमंत्रांची शक्ती अमोघ असते. विशेष करून ती सिद्ध मंत्रशक्ती श्रीदत्तमहाराजांसारख्या आत्मज्ञ अशा सद्गुरुंच्या माध्यमातून जेव्हा संक्रमित होत असते तेव्हा ती अधिकच फलदायी ठरते. श्रीदत्तमहाराजांची कृपा झाल्यामुळे अनेक शिष्यांना असा अनुभव आला आहे की शिष्यांच्या ठिकाणी असलेले विकार कमी कमी होत गेले आहेत. साधना नित्य व अप्रतिहत चालू राहिली म्हणजे शिष्यांना अनेक दिव्य अनुभूती येत जातात.



श्रीदत्तमहाराज कवीश्वर



श्रीदत्तमहाराज कवीश्वर

वेदान्तात सांगितलेल्या अनेक अनुभूती गुरुकृपेने असंख्य शिष्यांना प्राप्त झालेल्या आहेत. हजारो शिष्यांनी श्रीदत्तमहाराजांच्या मार्गदर्शनाप्रमाणे साधना करून आत्मविकास करून घेतलेला आहे. प्रपंच सांभाळून परमार्थ उत्तम प्रकारे करणारे हजारो शिष्य आहेत. परंतु संसारबंधन दूर व्हावे आणि केवळ परमार्थ मार्गालाच सर्वस्व वाहून ईश्वराचा लाभ व्हावा हेच एकमेव उद्दिष्ट ठेवलेले साधकही कमी नाहीत. त्या शिष्यांना तसे अनुभव गुरुकृपेने प्राप्त झालेले आहेत.

* दर्शनार्थी भक्तांमध्ये घडणारा आंतरिक बदल

श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला येणारे बहुसंख्य भक्त प्रापंचिकच असतात. प्रापंचिक अडचणींनी त्रस्त होऊन ते दर्शनाला आलेले असतात. त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी श्रीदत्तमहाराज मार्गदर्शन करतात आणि समयोचित उपदेश करून त्या भक्तांमध्ये आंतरिक बदलही घडवून आणतात. आपल्या मनांत परमार्थ साधनेचे बीज श्रीदत्तमहाराजांनी आपल्या नकळत रोवले आहे हे अनेक भक्तांच्या लक्षातही येत नाही. परंतु असे आंतरिक बदल निश्चितपणे होतात व प्रापंचिक भक्तांचे जीवनही निष्काम भक्तीच्या पातळीकडे उंचावत जाते. प्रपंचात राहूनच शुद्ध मनाने आपली दैनंदिन कर्तव्यकर्मे करीत रहावी, नित्य नियमाने थोडी पारमार्थिक साधनाही करावी आणि मनःशांती मिळवून समाधानाने प्रापंचिक जीवन जगावे असे श्रीदत्तमहाराज प्रापंचिक भक्ताना सांगतात.परंतु साधकांची योग्यता व अधिकार ओळखूनच त्याप्रमाणे श्रीदत्तमहाराज उपदेश करीत असतात.

शरणागत भावाने स्वतःला सद्गुरूच्या चरणी पूर्णपणे सोपवले की सद्गुरू भक्ताचा क्षणोक्षणी सांभाळ करतात असे अनेक संत सांगत आले आहेत. श्रीदत्तमहाराजांना शरण गेलेल्या अनेक भक्तांनाही हाच अनुभव येत असतो.

श्रीदत्तमहाराज शरणागत भक्तांचा प्रापंचिक योगक्षेमही चालवतात व पारमार्थिक योगक्षेमही चालवतात. श्रीदत्तमहाराज आपल्याला सर्वार्थाने क्षणोक्षणी सांभाळत असतात असा अनुभव आल्याने अनेक भक्त कृतज्ञतापूर्वक सांगतात. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनामुळे अनेक साधकांना उच्च अनुभूती येत राहतात. म्हणूनच एक भक्त म्हणतो- श्रीदत्तमहाराजांचे

दर्शन म्हणजे सतत उसळणाऱ्या दिव्यत्त्वाच्या कारंजाचे दर्शन. या कारंजातून अनेकरंगी प्रकाशांत न्हालेले व ईश्वरी तेजाने चमकणारे चैतन्यकण सतत वर उसळत असतात आणि दाही दिशांना आनंद व शांती मुक्तपणे उधळीत असतात. साधकांच्या योग्यतेप्रमाणे आध्यात्मिक अनुभूती देऊन साधकांचा पारमार्थिक अधिकार व योग्यता वाढवायला श्रीदत्तमहाराज सहाय्य करतात.

* पत्रांतून शक्ती जागृत करतात

साधकांच्या पत्रांना श्रीदत्तमहाराज आवर्जून उत्तरे पाठवतात. आतापर्यंत पंचवीस हजारांहून अधिक उत्तरे त्यांनी साधकांना पाठवली आहेत. ते स्वतःच्या हाताने पत्रे लिहितात. अनेक वेळा त्यांच्या पत्रात प्रासंगिक मजकूर किंवा उपदेश असतो, परंतु पत्राला त्यांच्या हातांचा स्पर्श झालेला असतो. पत्रातील शब्द त्यांच्या विशुद्ध अंतःकरणातून आलेले असतात. पत्रांवर त्यांची दृष्टी काही क्षण स्थिरावलेली असते. साधकाचे कल्याण व्हावे या संकल्पानेच ही पत्रे त्यांनी लिहिलेली असतात. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांची पत्रे म्हणजे "विचारधन", "ईश्वरी शब्द", "ईश्वरी स्पर्श", "ईश्वरी दृष्टी", आणि "ईश्वरी संकल्प" या चारही शक्ती प्रवाहांचे केंद्रीकरण असते. पत्र वाचणाऱ्या साधकांच्या हृदयात ईश्वरी शक्तीचे तेजःकण प्रवेश करतात. त्यांची पत्रे म्हणजे ईश्वरी शक्ती वाहून आणणाऱ्या तेजाच्या धारा किंवा ईश्वरी तेजाचे पुंज आहेत असा साधकांना अनुभव येतो. आपल्या पत्रातून श्रीदत्तमहाराज साधकांची शक्ती जागृत करीत आलेले आहेत. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाने जसा अपार शांतीचा अनुभव येतो, तसाच अनुभव श्रीदत्तमहाराजांची पत्रे वाचतानाही येतो.

* प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा समन्वय

श्रीदत्तमहाराज गृहस्थाश्रमी आहेत. परंतु आंतून पूर्ण संन्याशाजवळ असलेली अनासक्ती त्यांच्याजवळ आहे. प्रवृत्ती व निवृत्ती यांचा सुरेख समन्वय त्यांच्या जीवनांत दिसून येतो. जीवनमुक्ताची सर्व लक्षणे असूनही ते व्यवहाराच्या भूमिकेवर सफल जीवन जगतांना दिसतात. खरा परमार्थ व चोख व्यवहार एकत्र कसा नांदू शकतो हे त्यांच्या जीवनात पहायला मिळते.

"गृहस्थाश्रम न सांडिता । कर्म रेखा न ओलांडिता ।।
निज व्यापारी वर्तता । आत्मबोध न मळीये ।।"

ही श्रीज्ञानदेवांची शिकवण श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात मूर्तिमंत साकार झालेली दिसते. सर्वांभूती परमेश्वर पहायला सांगणारे व्यापक व उदात्त तत्त्वज्ञान ते प्रवचनांतून सांगतात आणि तेच तत्त्वज्ञान स्वतःच्या जीवनात पूर्णपणे आचरणात आणून समाजापुढे एक आदर्श ठेवतात. वेदांत व भारतीय संस्कृतीचे मर्म श्रीदत्तमहाराजांनी आत्मसात केले आहे आणि आपल्या आचरणाने ते मर्म समाजापुढे ठेवीत आहेत.

नेटका प्रपंच व उत्कट परमार्थ यांचा हा सुरेख मेळ त्यांच्या जीवनात बघायला मिळतो, याचे श्रेय श्रीदत्तमहाराजांच्या सत्त्वमूर्ती पत्नी प.पू.सौ.आईसाहेबांनाही आहे. प.पू.सौ.आईसाहेबांसारखी कर्तव्यदक्ष व अनुकूल गृहलक्ष्मी असल्यामुळे रेणुका निवासमध्ये सदैव शांती व समृद्धी नांदतांना दिसते. येणाऱ्या प्रत्येकांला प.पू.सौ.आईसाहेबांचे अगत्यशील आतिथ्य व वात्सल्य अनुभवायला मिळते. त्यामुळे साधकांना रेणुका निवास हे आपले माहेरघरच वाटते. "वसुधैव कुटुंबकम् ।" या वचनाचे रेणुका निवास हे साक्षात उदाहरण आहे. सगुणोपासना, नामस्मरण, नित्यकर्मे, भजन व अन्नदान तेथे घडतच असते. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्ञानदान तेथे सतत चालू असते. त्यामुळे रेणुका निवासमध्ये प्रवेश केला की आपण शुचित्व, पावित्र्य व मांगल्याने भरलेल्या एका तेजोमय मंदिरातच प्रवेश केला आहे असे वाटते. आध्यात्मिकतेची स्पंदने तेथे सतत जाणवत रहातात आणि सद्चिदानंद तेथे कायम वास्तव्याला आला आहे असे अनुभवायला मिळते.

श्रीदत्तमहाराजांचे अहेतुक प्रेम आणि अपार वात्सल्य यांचा वर्षाव अनुभवला म्हणजे अनेक भक्तांना असे वाटते की जन्मजन्मांतरीची कायमची आईच भेटली आहे आणि मग त्या आईला भेटण्याच्या ओढीने सद्गुरूमाऊलीच्या दर्शनाला ते भक्त सातत्याने येत राहतात.

श्रीदत्तमहाराज बाहेरून गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पाळतांना दिसतात आणि तरीही अंतरंगात ते सदैव आत्मानंदातच रंगलेले असतात. रेणुकानिवासचा प्रपंच जसा ते नेटकेपणाने सांभाळतात, तसेच त्यांचा संबंध असलेल्या

संस्थांचे व्यवहार श्रीदत्तमहाराज चोखपणे व नेटकेपणे सांभाळतात. ज्ञानदान तर सतत चालू असते. मात्र ते आत्मानंदातच सदैव रत असतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पूर्ण अमानित्त्व आहे आणि अकर्ता ही भूमिका आहे. ब्रह्मनिष्ठा कायम असूनही भक्तीचा जिव्हाळा ओतप्रोत भरलेला आहे. दया, क्षमा, शांती, श्रद्धा आणि अहेतूक प्रेम हे दैवी गुण त्यांच्या घरी वास्तव्याला आलेले दिसतात.

साम्यावस्था हा व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव असला म्हणजे मनाचे 'अमन' कसे होते ही श्रीज्ञानदेवांनी सांगितलेली अवस्था श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत प्रत्यक्ष पहायला मिळते. लोकांबद्दल त्यांना जी करूणा वाटते त्या करुणेच्या भावनेतूनच त्यांचे सर्व व्यवहार होत असतात. परंतु मन वासनाशून्य असल्यामुळे त्यांचे समाधान कधीच भंग पावत नाही. ते सदैव शांत, पूर्ण समाधानी व नित्य तृप्तच दिसतात. "शांतीची पै शांती। निवृत्ती दातारा ।।" हे श्रीज्ञानदेवांनी केलेले वर्णन श्रीदत्तमहाराजांना पूर्णपणे लागू पडते. "हे विश्वचि माझे घर। ऐसी मती ज्याची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।" या ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील ओवीत श्रीज्ञानदेवांनी जी अवस्था सांगितली आहे, तिचे साक्षात उदाहरण श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात पहायला मिळते.

* लोकोद्धारासाठी जीवन

श्रीदत्तमहाराज संसारातच आहेत. पण मनाने ते संसारापासून पूर्णपणे अलिप्त आहेत. ते स्वतःसाठी जीवन जगत नाहीत. वैयक्तिक स्वरूपाची एकही कामना किंवा इच्छा त्यांच्या जीवनांत प्रवेश करीत नाही. लोकांचे अज्ञान दूर करणे, भोगांत गुरफटलेल्यांना जागे करणे, त्यांना चिंतनशील बनवणे, त्यांना अध्यात्माकडे वळवणे या कार्यातच ते सतत रत असतात. पारमार्थिक मार्गदर्शन करणे, साधकांच्या आत्मविकासासाठी सहाय्य करणे, खरा आनंद देणे आणि खरीखुरी शांती वितरीत करणे असे लोकोद्धाराचे कार्य सतत चालू असते. पूर्ण ज्ञान, पराभक्ती आणि निष्काम कर्म यांचा समन्वय त्यांच्या जीवनांत दिसून येतो.

श्रीशंकराचाय-महाराजांनी सांगितले आहे की पूर्ण ज्ञान, पराभक्ती व निष्काम कर्म सर्वोच्च पातळीवर पोचले म्हणजे एकरूप होतात. हा त्यांचा स्वतःचा अनुभव आहे. ज्ञान, कर्म व भक्ती यांची सर्वोच्च पातळीवरील एकात्मता श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांच्या जीवनांत प्रत्यक्ष अवतरली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या जीवनांतही पूर्ण ज्ञान, पराभक्ती व निष्काम कर्म यांच्या सर्वोच्च पातळीवरील एकात्मतेचे दर्शन घडते. असे ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप येथे अवतरले हे मराठी लोकांचे भाग्य आहे.

❊ सद्गुरूंचे दर्शन

लहानपणापासून मला अध्यात्माची गोडी लागली होती. सद्गुरू भेटावेत म्हणून खूप हिंडलो होतो. अनेक वेळा हिमालयातही भ्रमण केले होते. अनेक सत्पुरुषांना भेटून खूप काही विचारीत राहिलो होतो. मनन चिंतन व्हावे यासाठी खूप काही वाचत होतो आणि लिहोतही होतो. अनुभूतीचो प्रतीक्षा करीत होता.

नोकरी निमित्ताने मुंबईला स्थायिक झालो आणि माझे भाग्य उजळले. श्रीमती नीलाताई जोशी यांची एका प्रवचनाच्या निमित्ताने ओळख झाली. माझी तहानलेली स्थिती त्यांनी जाणली आणि त्या मला श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला घेऊन गेल्या. श्रीमती नीलाताईंनी उत्तेजन दिल्यामुळेच मी वारंवार पुण्याला जाऊ लागलो. श्रीदत्तमहाराजांच्या घरी जाऊन त्यांना खूप प्रश्न विचारीत राहिलो. त्यांनी दिलेली उत्तरे ध्वनिमुद्रित करुन ती लिहून ठेवू लागलो. त्यांची प्रवचने ऐकत राहिलो. श्रीमती नीलाताई जोशी त्यांच्याप्रमाणेच श्री.गोपाळराव गोडसे, डॉ.सौ. माधुरीताई पणशीकर, श्रीमती आशाताई धारप, सौ.प्रभाताई मोहरीर, नारायणराव दाते, विद्याधर फडके, प्रसाद पाटणकर व यशोधन कुळकर्णी यांच्याकडूनही श्रीदत्तमहाराजांच्याबद्दल खूप ऐकायला मिळाले. या सर्वांचे ऋण कधीही फिटण्यासारखे नाही हे सांगण्यातही आनंद आणि कृतज्ञता माझ्या मनात दाटून आले आहेत.

श्रीदत्तमहाराज ईश्वरीशक्तीचे परीपूर्ण रूप आहेत हे ध्यानात आले ते केवळ सौ.ताईमहाराज यांनी कृपा केल्यामुळेच. सौ.ताईमहाराजांनी माझ्यावर कृपा केली आणि वीज चमकल्यामुळे सारा आसमंत उजळून लख्ख दिसावे तसे झाले.

भगवती प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेले "विचारधन भाग - एक" हे पुस्तक पुनःपुन्हा वाचत राहिलो आणि प्रत्येक वाचनाच्या वेळी नव्या अर्थछटा जाणवत राहिल्या, नव्या अनुभूती येत राहिल्या. श्रीज्ञानेश्वरी कितीही वेळा वाचली तरी नवीनच वाटते. प्रत्येक वाचनाच्या वेळी नव्या अनुभूती जाणवतात. तसाच अनुभव "विचारधन" या पुस्तकाच्या बाबतीतही मला आला.

* भगवतीचा सत्यसंकल्प

श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहावे अशी इच्छा झाली यात ईश्वरी सत्तेचे गुणगान करावे हाच हेतू होता. 'तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ । सुखी होऊ सर्वकाळ ॥' हे श्रीतुकाराम महाराजांचे वचन या चरित्र-लेखनामागील प्रेरणा आहे. नाहीतर श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहिणे म्हणजे श्रीज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे 'सूर्याच्या अंगाला उटणे लावण्यासारखेच आहे.'

श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहिण्याची अनुमती मिळावी ही प्रार्थना सौ.ताईमहाराजांच्या चरणी सादर केली. त्यांनी संमती दिली. 'विशाल वटवृक्षाच्या सावलीला बसल्यासारखे चरित्र वाचतांना वाटेल असे लिहावे' या त्यांच्या आज्ञेतच त्यांचा संकल्प होता. प्रत्यक्ष भगवतीचा सत्यसंकल्प तो. त्यामुळे सर्व अडचणी आपोआप दूर होत गेल्या.

चरित्रलेखनाला जेव्हा सुरुवात करायचे ठरले तेव्हा लक्षात आले की हे चरित्रलेखनाचे काम माझ्या अवाक्याबाहेरचे आहे. श्रीदत्तमहाराज ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप आहेत. श्रीदत्तमहाराजांची आत्मस्थिती हा मानवी विचारांचा आणि मानवी शब्दांचा विषय होऊ शकत नाही. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे चरित्र श्रीव्यासांसारख्या महामुनींनाही सहजपणे लिहिता येणार नाही. मग माझ्यासारख्या सामान्य जीवाला ते कसे जमणार? श्रीदत्तमहाराजांचे चरित्र लिहिण्याचा मी प्रयत्न करणे म्हणजे चिमणीच्या पिलाने आपली चोच महासागराच्या पाण्यांत घालून त्या समुद्राची खोली मोजण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. आकाशाला कवळायचे असेल तर आकाशापेक्षा मोठे व्हावे लागेल. सामान्य जीवाला ते अशक्यच असते.

या वस्तुस्थितीची जाणीव झाल्यामुळे सौ.ताईमहाराजांच्या चरणी प्रार्थना केली की चरित्रलेखनाचे हे काम आपणच मजकडून करून घ्यावे. सौ.ताईमहाराजांनी प्रसन्न हास्य करून आशीर्वाद दिले. त्यानंतरच या चरित्रलेखनाला सुरुवात होऊ शकली.

❊ कृतज्ञता निर्देश

श्रीमती नीलाताई जोशी आणि श्री.अच्युतराव पोटभरे यांनी लिहिलेली श्रीदत्तमहाराजांची दोन चरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत. श्रीवासुदेव निवास या त्रैमासिकातही श्रीदत्तमहाराजांच्या अनेक आठवणी व त्यांच्यावरील लेख प्रसिद्ध झाले आहेत. श्री.गोपाळराव गोडसे यांनी श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील प्रसंग, संभाषणे, उपदेश आणि प्रवचने यांचा संग्रह केला आहे. चरित्रलेखनासाठी हा संग्रह मला द्यावा, अशी विनंती करताच श्री.गोडसे यांनी त्या धारीका मोठ्या उत्साहाने माझ्या स्वाधीन केल्या. डॉ.सौ.माधुरी पणशीकर यांनी श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनांची पुस्तके संपादित करतांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले आहेत आणि श्रीदत्तमहाराजांच्या अंतरंगाचा आणि अनुभूतींचा शोध घेतला आहे. या सर्व साहित्याचा प्रस्तुत चरित्र लिहितांना उपयोग झाला. श्रीमती नीलाताई जोशी, श्री.अच्युतराव पोटभरे, श्री.गोपाळराव गोडसे व डॉ.सौ.माधुरी पणशीकर यांच्याबद्दल कितीही कृतज्ञता व्यक्त केली तरी ती अपुरीच ठरेल.

सौ.ताईमहाराज यांनी श्रीदत्तमहाराजांचे त्यांना झालेले दर्शन यथार्थ शब्दात उभे केले आणि ते या चरित्रात समाविष्ट करण्याची अनुज्ञा दिली, त्यामुळे या पुस्तकाचे मोल अनेक पटींनी वाढले आहे. सौ.ताईमहाराजांचा हा सर्व साधकांवरील अनुग्रहच आहे, कृपाच आहे.

सौ.ताईमहाराजांनी आशीर्वाद दिल्यावरच चरित्रलेखनाला सुरूवात झाली. चरित्रासाठी हवी ती माहिती आपोआप उपलब्ध होत गेली, आवश्यक साहित्य पाहिजे तेव्हा समोर आले आणि पान उघडताच हवा तो संदर्भही लगेच दिसला. लिहायला बसताच शब्द धावत आले. वाक्ये वेगाने

कागदावर धावू लागली. मग लक्षात आले की सद्गुरूच हे लेखनाच काम करीत आहेत. मी फक्त निमित्त आहे. शेतकरी पाभरीवर चाडे ठेवून त्यातून बी पेरतो. म्हणजे बी पेरणारा शेतकरी असतो, चाडे नव्हे. शेतातील बी पेरणीमध्ये चाडाचे जे स्थान असते तेच या चरित्र लेखनात माझे स्थान आहे. सर्व कर्तृत्त्व सद्गुरूंचेच आहे.

श्रीदत्तमहाराज स्वतःबद्दल कधी बोलत नाहीत. परंतु त्यांचे शब्द अनुभूतींतून आलेले असतात. त्यामुळे जसे 'श्रीज्ञानेश्वरी' श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे आंतरिक चरित्र आहे, तसेच 'विचारधन' हेच श्रीदत्तमहाराजांचे खरे आंतरिक चरित्र आहे. पूर्णज्ञान हे त्यांचे बहिरंग असले तर अद्वैत अनुभूती व अद्वैतभक्ती हेच त्यांचे अंतरंग आहे. श्रीदत्तमहाराजांची ओळख त्यांच्या विचारधनांतून होते. म्हणून "विचारधन भाग - दोन" या चरित्रांत समाविष्ट केला आहे.

हे 'विचारधन' अमृताचे ताटच असल्यामुळे त्यांत इतरांचा शब्द येणे हे अमृताच्या ताटात नारळाची करवंटी ठेवण्यासारखे झाले असते. श्रीदत्तमहाराजांचे शब्द ध्वनिफितींवरुन जसेच्या तसे मिळवण्याची काळजी घेतली आहे. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र आणि त्यांची शिकवण एकरूप आहे. त्यांच्या चरित्रातूनच त्यांची शिकवण प्रतीत होते आणि त्यांच्या शिकवणुकीतच त्यांचे चरित्र दिसते.

* सलगीची विनवणी

अनेक जन्मांत माझे पुण्य साठले होते, त्याचे फळ म्हणूनच या जन्मी श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेण्याचे भाग्य मला लाभले. श्रीदत्तमहाराज म्हणजे दयेचे सागर, माझ्यासारख्या सामान्य जीवाची त्यांना करुणा यावी यांत नवल नाही. त्यांनी मला जवळ केले, कृपेचा वर्षाव केला आणि माझ्यावर मायेचे पांघरुण घातले हे त्यांचेच मोठेपण आहे. वस्तुतः श्रीचरणांवरील धुळीचा कण होण्याचीही माझी पात्रता नाही. मग "श्रीदत्तमहाराजांचा मी शिष्य, प्रशिष्य, अनुयायी किंवा भक्त आहे" असे म्हणण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. सद्गुरूंनी मला जवळ केले आहे आणि मला आपला म्हटले आहे यांतच मी भरून पावलो आहे आणि मला सर्व काही मिळाले आहे.





श्रीदत्तमहाराज कवीश्वर व सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब

* श्रीगुरुःशरणम् *

श्रीदत्तमहाराजांनी मला आपला म्हटले असल्याने एक "सलगीची विनवणी " श्रीचरणी सादर करीत आहे. सर्व साधकांवर कृपा करावी ही श्रीचरणी एकच विनवणी आहे. सर्व साधकांमध्ये माझाही समावेश असल्याने या माझ्या 'सलगीच्या विनवणीत' खूपच 'आर्तता' आलेली आहे. श्रीदत्तमहाराजांच्या मनांत 'विश्वाचे आर्त' प्रकटले असल्याने सर्व साधकांवर (आणि त्यामुळे माझ्यावरही) त्यांच्या कृपारूपी अमृताचा वर्षाव सतत हात रहाणार आहे, या विचाराने माझ्या मनांत परमशांती प्रवेश करीत आहे.

डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर

५ फेब्रुवारी, १९९८

***

* मनोगत (तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने)

डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर

"श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन'' या पुस्तकाचे तिसरे मुद्रण वाचकांपुढे सादर करतांना आनंद व समाधान या भावना मनात दाटून आल्या आहेत. या पुस्तकाच्या लेखनात अनेक अडचणी आल्या होत्या. केवळ सद्गुरूंची कृपा असल्यामुळेच सर्व अडचणी पार होऊ शकल्या व लेखन पूर्णत्वाला जाऊन पुस्तक प्रकाशित होऊ शकले.

पुस्तकाला वाचकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला आणि पहिल्या मुद्रणाच्या वेळी छापलेल्या सर्व प्रती एका आठवड्यातच संपल्या. वाचकांची मागणी असल्यामुळे तातडीने दुसरे मुद्रण करून पुस्तकाच्या प्रती उपलब्ध करून घ्याव्या लागल्या. दुसऱ्या मुद्रणाच्या वेळी काढलेल्या प्रतीही काही दिवसातच संपल्यामुळे तिसऱ्यांदा मुद्रण करून हे पुस्तक वाचकांना उपलब्ध करून दिले आहे. पहिल्या मुद्रणात अनावधानाने राहिलेले काही ठळक मुद्रणदोष या तिसऱ्या मुद्रणात दुरुस्त केले आहेत. परंतु पहिल्या मुद्रणाच्या वेळी तयार केलेल्या शब्दसाच्यांवरूनच (Plates) हे तिसरे मुद्रण केलेले असल्यामुळे लेखनात भर घालणे किंवा सर्व मुद्रणदोष

दूर करणे शक्य होऊ शकले नाही ही अडचण वाचक समजून घेतील अशी आशा आहे.

हे पुस्तक वाचल्यानंतर अनेकजणांनी "रेणुकानिवास" या श्रीदत्तमहाराज यांच्या निवासस्थानाचा पत्ता मिळवला व कुतुहलाच्या आणि जिज्ञासेच्या भूमिकेतून ते श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आले. त्या तरूणांची संख्या खूपच मोठी आहे. वैदिकऋषींच्या परंपरेला शोभून दिसेल अशी श्रीदत्तमहाराजांसारखी व्यक्ती या विसाव्या शतकाच्या अखेरीसही या भूमीवर आहे ही वस्तुस्थिती अनेकांना नवलाईचीही वाटली आणि अभिमानाचीही वाटली. त्याचप्रमाणे भारतीय अध्यात्मशास्त्र सनातन, नित्यनूतन व त्रिकालाबाधित कसे आहे याचा श्रीदत्तमहाराजांचे विचारधन आणि दर्शन यामुळे प्रत्यय आला अशी भावना अनेक तरूणांनीही व्यक्त केली. ही प्रतिक्रिया निश्चितच आनंददायी आहे.

पहिल्या दोन मुद्रणात श्रीदत्तमहाराजांचे दीक्षागुरू श्रीगुळवणीमहाराज यांचे छायाचित्र समाविष्ट केलेले नव्हते ही उणीव काही वाचकांनी नजरेला आणली. श्रीगुळवणीमहाराजांचे चित्र या मुद्रणात समाविष्ट करून ही उणीव दूर केली आहे.

वास्तविक पहाता श्रीदत्तमहाराजांचे पितृदैवत श्रेष्ठ होते. त्यांचे प्रपितामह व इतर गुरूही श्रेष्ठ होते. परंतु श्रीगुळवणीमहाराजांच्या ठायी श्रीदत्तमहाराजांचा आगळाच भाव आहे. श्रीगुळवणीमहाराज यांचा उल्लेख श्रीदत्तमहाराज "श्रीगुरूमहाराज" या शब्दात करत असतात. श्रीगुरूमहाराजांच्या ठायी असलेला आपला भाव श्रीदत्तमहाराजांनी सोलापूरचे श्री. कुबडे यांना लिहिलेल्या एका पत्रात पुढील शब्दांत व्यक्त केला आहे. "सांप्रदायिक नात्याने ती. दादा (श्रीगुळवणीमहाराज) मला पितृव्य स्थानी आहेत व त्यांचीही तशीच माझ्यावर लहानपणापासूनच वात्सल्यपूर्ण दृष्टी आहे. म्हणून कोणताही संकोच न करता मी केलेली प्रार्थना त्यांनी आजपर्यंत कधीही अमान्य केलेली नाही. 'अत्रैव्य प्राणाः समवनीयते' या श्रुतीप्रमाणे ब्रह्मनिष्ठ पुरुषाचे देहत्रय ब्रह्मात लीन होत असले तरी त्यांचे नाम शिल्लक रहाते. स्वमहिमाख्यापक भगवान श्रीगुरूनाथ सर्व करणारे समर्थ आहेत."

श्रीगुरूमहाराजांच्या जीवनातील सर्व कार्यक्रमांमध्ये श्रीदत्तमहाराजांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष योगदान आहे. श्रीगुरूमहाराजांची प्रत्येक इच्छा ही अंतिम आज्ञाच आहे या श्रद्धेने श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरूमहाराजांच्या प्रत्येक इच्छेचे कसोशीने पूर्णतया पालन केले आहे. त्याचप्रमाणे स्वतःच्या जीवनातील प्रत्येक कार्य अगदी प्रवचनाचा प्रसंग सुद्धा श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरूमहाराजांना निवेदन केला आहे आणि त्यांची पूर्वसंमती घेऊनच प्रत्येक कार्य श्रीगुरूमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे पूर्ण केले आहे. श्रीगुरूमहाराजांनी एखाद्या कार्यक्रमाला बोलावले तर आपले सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द करून श्रीगुरूमहाराजांनी बोलावलेल्या कार्यक्रमांना श्रीदत्तमहाराज उपस्थित राहिले आहेत. दीक्षागुरूच्या ठायी असा श्रद्धाभाव क्वचितच पहायला मिळतो हे लक्षात घेतले म्हणजे श्रीगुरूमहाराजांचेही मोठेपण समजून येते आणि श्रीदत्तमहाराजांचे मोठेपणही समजून येते.

श्रीगुरूमहाराज खऱ्या अर्थाने द्रष्टे हाते, खरे रत्नपारखी होते. श्रीदत्तमहाराजाचे अलौकिक गुण श्रीगुरूमहाराजांनी पूर्णतया ओळखले होते. श्रीदत्तमहाराजांचे परिपूर्ण ज्ञान व अनुभूती, ज्ञानप्रसाराची स्वाभाविक प्रवृत्ती व करूणा श्रीगुरूमहाराजांनी पूर्णतया ओळखली होतीच. परंतु श्रीदत्तमहाराजांची साधी राहणी, प्रगाढ अनुभूतीतून आलेली अंतर्मुख अवस्था व अखंड आत्मरतवृत्ती श्रीगुरूमहाराजांनी पूर्णतया जाणली होती. अमानित्त्व, शुचिता, क्षमा, तेजस्वीपणा, दया व हृदयातील कोमलपणा ही दैवी संपत्ती श्रीदत्तमहाराजांच्या ठायी परिपूर्ण रूपात प्रगटलेली आहे हे श्रीगुरूमहाराजांनी अचूकपणे हेरले होते. म्हणूनच त्यांनी श्रीदत्तमहाराजांना इतके जवळ केले आणि त्यांच्यावर कृपेचा, वात्सल्याचा व स्नेहाचा वर्षाव केला. श्रीदत्तमहाराजांचे वंदनीयत्त्व व पूजनीयत्त्व लोकांपुढे यावे यासाठी श्रीगुरूमहाराज सदैव दक्ष राहिले आणि श्रीदत्तमहाराजांना पुढे करून श्रीगुरूमहाराजांनी लोकोद्धाराचे फार मोठे कार्य सुरू केले.

श्रीदत्तमहाराजांनी स्वीकारलेल्या प्रत्येक कार्यात अगदी प्रत्येक प्रवचन, भागवतसप्ताह, शास्त्रचर्चा व परिसंवादातसुद्धा श्रीदत्तमहाराजांना संपूर्ण यश मिळाले. जवळ जवळ प्रत्येक प्रसंगी श्रीदत्तमहाराजांचा गौरवच होत

गेला. श्रीदत्तमहाराजांना मिळालेल्या गौरवाचा एक शतांश गौरव जरी इतर कोणाच्या वाट्याला आला असता तरीही त्याचे मस्तक अभिमानाने उन्नत झाले असते. परंतु श्रीदत्तमहाराजांची गोष्टच वेगळी आहे. त्यांनी आपले झालेले सर्व सत्कार व गौरव श्रीगुरूमहाराजांना आत्मनिवेदन भक्तीने समर्पित केले. त्यामुळे अहंकार किंवा अभिमान श्रीदत्तमहाराजांच्या जवळपासही फिरकू शकला नाही. उलट प्रत्येक गौरवामुळे श्रीदत्तमहाराज अधिकच विनीत होत गेले. या विनीत भावनेची व पूर्णसमर्पणाची जाणीव असल्यामुळेच श्रीदत्तमहाराज जवळपास असले म्हणजे श्रीगुळवणीमहाराज प्रत्येकाला श्रीदत्तमहाराजांना नमस्कार करायला सांगत होते.

आपल्याला कोणी नमस्कार करावा या विचाराचा श्रीदत्तमहाराजांना कधी स्पर्शही झाला नाही. उलट कोणी नमस्कार करायला आले की श्रीदत्तमहाराजांना विलक्षण संकोच होत राहिला आहे. केवळ श्रीगुरूमहाराजांची इच्छा होती म्हणूनच श्रीदत्तमहाराज असे नमस्कार स्वीकार करीत राहिले आहेत. श्री.अच्युतराव पोटभरे सांगतात की श्रीगुरूमहाराजांनी अनेक वेळा श्रीदत्तमहाराजांना स्वतः नमस्कार केला आहे. हा नमस्कार श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी असलेल्या अध्यात्मज्ञानाला व अनुभूतीला असे. श्रीदत्तमहाराजांकडे कोणत्या दृष्टीने पहावे याचाच तो पाठ असे. श्रीदत्तमहाराजांना नमस्कार केल्यामुळे साधकांना कोणते पारमार्थिक लाभ होतात याची पूर्ण जाणीव श्रीगुरूमहाराजांना होती. म्हणूनच त्यांनी श्रीदत्तमहाराजांना आपले उत्तराधिकारी नेमले. सर्व कारभार श्रीदत्तमहाराजांवर सोपवला आणि एक दिवस ते स्थूल देहाने अदृष्य झाले.

सर्वसामान्यपणे लेखन व प्रवचन यामुळे माणसाचे मन बहिर्मुख होते व त्याच्या मनात लोकेशनेची आवड निर्माण होते याची श्रीगुरूमहाराजांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच लेखन व प्रवचन करू नये असे श्रीगुरूमहाराज आपल्या शिष्यांना सांगत असत. याला एकच अपवाद होता. तो म्हणजे श्रीदत्तमहाराज. श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना लेखन व प्रवचन बंद करायला कधीच सांगितले नाही. श्रीदत्तमहाराजांच्या भागवतसप्ताहांना व प्रवचनांना श्रीगुरूमहाराजांची पूर्ण संमती असे. परिपूर्ण ज्ञान व अनुभूती

यामुळे श्रीदत्तमहाराज सर्व विकारांच्या पलीकडे आहेत याची जाणीव श्रीगुरूमहाराजांना होती. म्हणूनच श्रीगुरूमहाराजांनी स्वतः पुढाकार घेऊन श्रीदत्तमहाराजांचे अनेक भागवतसप्ताह व प्रवचने ठरविली व श्रीगुरूमहाराज स्वतः श्रोता म्हणून उपस्थित राहिले. श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह व प्रवचन ही त्यांची साधनेही बैठकच आहे असे मत श्रीगुरूमहाराजांनी व्यक्त केले होते असे श्री.अच्युतराव पोटभरे सांगतात.

श्रीगुरूमहाराजांनी आपले सर्वस्व श्रीदत्तमहाराजांना दिले व समाजाला भरभरून देण्याचे लोकोद्धाराचे कार्य श्रीदत्तमहाराजांवर सोपवले. स्वतः श्रीगुरूमहाराजांनी कधीही लेखन प्रवचन केले नाही. परंतु भावकोमल, विवेकनिष्ठ, प्रतिभाशाली व अनुभूतीसंपन्न श्रीदत्तमहाराजांजवळ समाजाला सांगण्यासारखे खूप आहे हे ओळखून श्रीगुरूमहाराजांनी सदैव श्रीदत्तमहाराजांना बोलते ठेवले. त्यांच्यामागे मूकपणे उभे राहून त्यांच्या शक्ती प्रवाहीत केल्या. आपला अधिकार, सत्ता व सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या मागे उभे करून श्रीगुरूमहाराजांनी जगावर अध्यात्मविद्येच्या अमृताचा वर्षाव केला व स्वतः नामानिराळे राहिले. श्रीज्ञानदेवांना पुढे करून श्रीज्ञानेश्वरीच्या माध्यमातून श्रीनिवृत्तीनाथ जगावर अमृताचा वर्षाव करीत आहेत तसेच येथे घडत असलेले दिसते.

श्रीदत्तमहाराज हे सदैव श्रीगुरूमहाराजांचे हृदगत् व्यक्त करणारे होते. समारंभातील श्रीगुरूमहाराजांचे मनोगत लिहिणारे आणि वाचून दाखविणारे श्रीदत्तमहाराज असत. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज (टेंबेस्वामी) यांच्या समग्र वाङ्मयाचे प्रकाशन श्रीगुरूमहाराजांनी केले आहे. या वाङ्मयाच्या बाराही खंडात श्रीगुरूमहाराजांनी प्रकाशकाचे निवेदन समाविष्ट केले आहे. ही निवेदने अत्यंत अभ्यासपूर्ण व विस्तृत अशी आहेत. श्रीगुरूमहाराजांच्या आज्ञेवरून ही निवेदने श्रीदत्तमहाराजांनी लिहिली आहेत. परंतु मुद्दाम सांगितल्याशिवाय ते कोणाच्याही लक्षात येत नाही. ही निवेदने वाचत असताना श्रीगुरूमहाराजांच्या निकटवर्ती शिष्यांनाही श्रीगुरूमहाराजांचेच हृदगत आपण वाचत आहोत असा प्रत्यय येतो याचे कारण श्रीगुरूमहाराज व श्रीदत्तमहाराज एकरूपच झालेले होते.

श्रीगुरूमहाराज श्रीदत्तमहाराजांच्या हृदयांतरी राहून श्रीदत्तमहाराजांच्या मखातूनच बोलत होते. गुरू व शिष्य यांच्या एकरूपतेविषयी श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

म्हणोनि शिष्य आणि गुरूनाथु । या दोहों शब्दांचा अर्थु ।
श्रीगुरूचि परी होतु । दोहो ठायी ॥ (अमृतानुभव)

अमृतानुभवातील ही ओवी लिहिताना शिष्याची एक विशिष्ठ उंची व अवस्था श्रीज्ञानदेवांना अभिप्रेत आहे. ती उंची व अवस्था श्रीदत्तमहाराजांच्या ठायी पूर्णतया आहे. म्हणूनच "श्रीगुरूमहाराज" आणि "श्रीदत्तमहाराज" ही गुरूशिष्यांची जोडी एकरूप झाली.

श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांच्या एकरूपत्त्वाचे वर्णन करतांना श्रीज्ञानेश्वरामहाराज लिहितात,

हृदया हृदय एक जाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले ।
द्वैत न मोडिता केले । आपणाऐसे अर्जुना ॥

हेच भावाद्वैत श्रीनिवृत्तीनाथ व श्रीज्ञानेश्वरमहाराज या गुरूशिष्यांचे जसे आहे तसेच श्रीगुळवणीमहाराज व श्रीदत्तमहाराज या गुरूशिष्यांचेही आहे.

श्रीगुरूमहाराज व श्रीदत्तमहाराज यांच्या एकरूपतेच्या विभिन्न पैलूंमध्ये अद्वैततत्त्व विलोभनीय रूप घेऊन आपल्या पुढे येते. अद्वैताचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जशी श्रीनिवृत्तीनाथ व श्रीज्ञानदेव ही गुरूशिष्यांची जोडी, तशीच श्रीगुरूमहाराज व श्रीदत्तमहाराज ही गुरूशिष्यांची जोडी आहे. या गुरूशिष्य जोडीमध्ये अद्वैत खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण झाले आहे, साकार झाले आहे. यामुळेच श्रीगुरूमहाराजांनी सुरू केलेले धर्मजागरणाचे व लोकोद्धाराचे कार्य श्रीदत्तमहाराज पुढे नेऊ शकले. श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' हा अक्षयनिधी असल्याने विचारधनद्वारा श्रीदत्तमहाराजांचे लोकोद्धाराचे कार्य भारतभूमीवर अनेक शतके प्रकर्षाने होत रहाणार आहे हेच यातून सूचित होत आहे.

वैराग्य, पावित्र्य व शुचिता यांची श्रीदत्तमहाराज घनीभूत मूर्तीच आहेत. संसारात राहूनही आपल्या जीवनांतील कोणतेही कर्म ईश्वरसाधनेत कसे परावर्तित करता येते आणि प्रपंच नेटकेपणाने सांभाळत असतांनाच 'भक्ती',

'ध्यान' व 'ज्ञान' यांची सर्वोच्च पातळी कशी गाठता येते हे श्रीदत्तमहाराजांचे जीवन पाहून समजून येते. मानवतेच्या कल्याणासाठी त्यांनी जे 'विचारधन' आपल्यापुढे ठेवले आहे, ते त्यांच्या स्वतःच्या जीवनांत आचरणरूपाने पूर्णतया प्रतिबिंबित झालेले स्पष्टपणे दिसून येते.

नेमके शब्द, सोपी व सुटसुटीत परंतु आशयघन वाक्ये आणि पारिभाषिक शब्द टाळून केलेले प्रतिपादन ही श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'ची वैशिष्ठ्ये आहेत. स्वतः अनुभूती घेऊन मगच विवेचन केले असल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनांत ठामपणा व निःसंदिग्धपणा आपोआपच आला आहे. अनेक वाक्ये भावावस्थेत स्फुरलेली आहेत व त्यामुळे मंत्ररूप घेऊन प्रगटलेली आहे असे वाचकांना सतत जाणवत रहाते.

श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'मध्ये ज्या उदार धर्मभावना प्रगटल्या आहेत, त्यात प्राचीन व अर्वाचीन यांचा अभिनव स्वरूपाचा समन्वय आहे. आधुनिक काळातील विश्वसंस्कृतीला पोषक ठरेल अशी प्रेरकशक्ती प्राचीनतेतून कशी घेता येते हे श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'मध्ये प्रकर्षाने दिसून येते. त्यामुळे या विचारांचे अनुकरण करणारे लोक जितके वाढत जातील तितके मानवी जीवनाचे कल्याण आपोआपच साधत जाईल.

उपनिषदात जो आत्मज्ञानाचा अमृतकुंभ प्रगटला आहे, तोच अमृतकुंभ श्रीदत्तमहाराजांच्या विचारधनमध्ये नवे रूप घेऊन प्रगटला आहे. आत्मज्ञानाचे अमृत तेच असले तरीही श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनात व विचारधनमध्ये या कुंभाने आधुनिक काळाला साजेसे नवे आकर्षक रूप धारण केले आहे. विचारधन हे एक उपनिषदच आहे. त्याला प्रश्नोपनिषद असे म्हणता येईल. उपनिषद या शब्दात 'उप', 'नि', 'सद्' अशी तीन पदे आहेत. 'उप' म्हणजे जवळ, 'सद्' म्हणजे बसणे आणि 'नि' म्हणजे भक्तीभावाने व नम्रपणाने गुरूच्या जवळ जाणे. आत्मज्ञानाची पूर्ण अनुभूती घेऊन व ते आत्मज्ञान स्वतःच्या आचरणांत पूर्णतया आणून जेव्हा श्रीदत्तमहाराजांसारखा ब्रह्मज्ञानी पुरुष शब्दांच्या माध्यमातून अध्यात्मविद्या सांगतो, तेव्हाच त्या शब्दांना उपनिषदाचे स्वरूप प्राप्त होते. अध्यात्मविद्या आत्मसात करायची असेल तर श्रीदत्तमहाराजांसाख्या सद्गुरूंच्या मुखातूनच

श्रवण घडावे लागते. असे खरे श्रवण घडते तेव्हाच साधकाच्या हृदयांतील अंतरात्मा जागा होतो. हे खरे श्रवण घडवणारे कान म्हणजे आपले बाह्यकान नव्हेत. ते कान आपल्या अंतरंगातच असतात. अंतरंगातील ते कान उघडे ठेवून श्रीज्ञानेश्वरी वाचणे हे जसे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मुखातून घडणारे खरे श्रवण असते तसेच अंतरंगातील ते कान उघडे ठेवून श्रीदत्तमहाराजांचे विचारधन वाचणे हेही श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून घडणारे खरे श्रवण असते.

श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'मध्ये अलौकिक प्रतिभा व अंतःस्फूर्तीचा विलोभनीय आविष्कार आहे आणि आत्मानुभवाची प्रभाही आहे. तत्त्वज्ञानातील मुलभूत प्रश्नांवर श्रीदत्तमहाराजांनी व्यक्त केलेले विचार मूलगामी आहेत, विविधांगी आहेत आणि पूर्णतया वास्तवानुगामी आहेत. आपल्या अलौकिक प्रतिभेच्या सामर्थ्याने श्रीदत्तमहाराजांनी ब्रह्मज्ञानाला व त्यातील आत्मसाक्षात्कार विद्येला सुंदर भरजरी पोषाख चढवला आहे आणि अध्यात्मविद्येचे रहस्य सामान्य माणसाच्या अंगणात आणून ठेवले आहे. श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' म्हणजे सर्वसामान्य लोकांसाठी तयार केलेली प्राचीन उपनिषदांची एक लहानशी आवृत्तीच आहे.

ईश्वर, जग आणि माणूस या तिघांचे मूलस्वरूप व एकमेकांशी असलेला संबंध समजून घेत असताना साधकांच्या मनात जे जे प्रश्न उभे रहातात त्या सर्व प्रश्नांची उत्तरे श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'मध्ये आहेत. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' वाचले म्हणजे साधकांच्या जिज्ञासेचे पूर्ण समाधान होते आणि परमार्थ मार्गावर वाटचाल करण्यासाठी लागणारे बळही श्रीदत्तमहाराजांच्या कृपेनेच साधकाला मिळू शकते.

आधुनिक काळातील जीवन जगत असतांना सर्वसामान्य माणसाला अध्यात्मविद्येतील प्रमुख तत्त्वांचे आचरण कसे करता येईल याचा विचार करूनच श्रीदत्तमहाराजांनी जे विवेचन केले आहे तेच विवेचन 'विचारधन'मध्ये समाविष्ट केले आहे. म्हणून श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' अमुक एका पंथाचे, संप्रदायाचे किंवा धर्माचे असे नाही. त्याचे स्वरूप सनातन आहे. म्हणूनच 'विचारधन'च्या अभ्यासाने कोणताही मनुष्य

चिंतनशील बनत जातो, विवेकसंपन्न होत जातो, त्याचे विकार क्षीण होत जातात आणि त्या माणसाच्या जीवनांत शांती व समाधान प्रकट होत जाते.

प्रत्येक माणसाच्या अंतरंगात चैतन्य असते असे अध्यात्मशास्त्र सांगते. आत्मरूपाने स्फुरणाऱ्या स्वयंप्रकाशी चैतन्याचा साक्षात्कार साधकाला होऊ शकतो असे सर्वच संतमहात्मे सांगत आले आहेत. याच चैतन्याने सर्व विश्वाला व्यापलेले आहे. अंतर्यामीपणाने सर्व विश्वाला व्यापून टाकणाऱ्या या चैतन्यालाच ब्रह्म असे म्हणतात. 'मी ब्रह्म आहे' ही अनुभूती साधकाने घेतली की त्याचे जीवन आनंदमय होते. साधकाला शुद्ध निखळ आनंद अनुभवता येता. हाच ब्रह्मानंद किंवा सद्‌चिदानंद.

शरीराच्या माध्यमातून इच्छा तृप्त करून जो आनंद मिळतो तो क्षणिक असतो. तो काही काळाने नाहीसा होतो. परंतु 'मी ब्रह्म आहे' ही अनुभूती घेतल्यामुळे जो आनंद मिळतो तो टिकाऊ असतो, अमर्याद असतो, शाश्वत असतो. तो आनंद मिळाला म्हणजे साधकाला पूर्ण तृप्ती आणि पूर्ण समाधान असलेली अवस्था प्राप्त होते. या अवस्थेलाच परमोच्च आत्मानंद किंवा ब्रह्मानंद देणारी अवस्था असे म्हणतात. सद्‌गुरूंच्या कृपेनेच ती अवस्था मिळू शकते. सद्‌गुरूंच्या सान्निध्यात राहिले म्हणजे सद्‌गुरूंची कृपा होते आणि ही अवस्था प्राप्त होते. सान्निध्य म्हणजे नुसते देहाचे सान्निध्य नाही. देहाच्या सान्निध्यापेक्षा सद्‌गुरूंच्या विचारांचे सान्निध्य जास्त महत्त्वाचे आहे.

'सोहम् अस्मि' म्हणजे 'मी ते ब्रह्म आहे' हा अनुभव आला म्हणजे माणसाच्या मनात कोणतीही इच्छा, कामना किंवा वासना शिल्लक रहात नाही. त्याची सर्व दुःखे नाहीशी होतात. त्याच्या जीवनात भय व चिंता असे काहीच उरत नाही. पाप व पुण्य यांच्या तो पलीकडे जातो. शोक व मोह यांच्याही तो पलीकडे जातो. तो कर्म करीत राहिला तरीही त्याने केलेल्या कर्माचा लेप त्या माणसाला चिकटत नाही. इतरांनी त्रास दिला किंवा निंदा केली तरीही त्यांच्या मनातील संतुष्टतेची भावना व समाधान कमी होत नाही. त्याचे मन अकाम म्हणजे वासनाशून्य बनते. तो सदैव तृप्त व संतुष्ट रहातो, आत्मस्वरूपातच रंगलेला रहातो. याच अवस्थेला जीवनमुक्तीची

अवस्था म्हणतात असे श्रीदत्तमहाराज सांगतात. 'विचारधन'च्या अभ्यासाने या अवस्थेपर्यंत जाता येते असा अनेक साधकांचा अनुभव आहे.

या दृश्य विश्वाच्या मागे असणारे ब्रह्म म्हणजे अतींद्रिय सौंदर्य जे अरूप आहे, दिव्य आहे, आनंदमय आहे व स्वयंप्रकाशीही आहे. त्या अतींद्रिय सौंदर्याच्या अनुभूतीत तल्लीन होऊन श्रीदत्तमहाराजांनी जे विवेचन केले आहे ते विवेचन 'विचारधन'च्या रूपाने आज आपल्यासमोर आहे. त्यामुळेच 'विचारधन'च्या अभ्यासांत मनुष्य रंगून जाऊ शकतो आणि त्या अतींद्रिय आत्मरूपाची अनुभूती घेऊ शकतो. 'विचारधन'चा पुरेसा अभ्यास झाला म्हणजे वाचक त्या अरूप अतींद्रिय सौंदर्याशी तदाकार होऊ शकतो आणि परमानंद व शाश्वत समाधान मिळवू शकतो असा अनेक साधकांचा अनुभव आहे. तो अनुभव घेतलेले साधक असे सांगतात की या विश्वातील कोणत्याही रूपाच्या सौंदर्यापेक्षा त्या अरूपाचे दिव्य सौंदर्य अधिक उत्कटतेने भावते व त्या सौंदर्याच्या अनुभूतीने जे समाधान व जे महासुख मिळते ते महासुख शब्दांतून वर्णन करता येत नाही. ते महासुख फक्त अनुभवायचे असते. ते महासुख श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'च्या अभ्यासांतून अनेक साधकांनी मिळवले आहे. आधुनिक काळात बहुसंख्य लोकांना असमाधान व अस्वस्थता जाणवत आहे. आपले जीवन आनंदमय व्हावे असे सर्वांनाच वाटते आहे. वैज्ञानिकांनी कितीही शोध लावले आणि नव्यानव्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या तरी मानवी जीवनांतील असमाधान व अस्वस्थता दूर होऊ शकणार नाही. सामाजिक जीवनरचना बदलली किंवा राजकीय साचा बदलला तरीही हे साधणार नाही.

वस्तुतः समाधान, आनंद, शांती व प्रेम हे मानवी मनाचे नैसर्गिक गुणधर्म आहेत. आत्मा आनंदरूप असतो असे शास्त्रे सांगतात. जीवन आनंदरूप करायचे असेल तर अध्यात्मविद्येची उपासना करणे हा एकमेव मार्ग आहे. श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतल्याने अशी अध्यात्मविद्येची फलदायी उपासना घडत रहाते असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. परंतु 'विचारधन'चा अभ्यास आणि चिंतनमनन हेच श्रीदत्तमहाराजांचे खरे दर्शन आहे. हे दर्शन सातत्याने घेत राहिले तर परमार्थमार्गावर साधकाची वाटचाल झपाट्याने

होत रहाते व त्याला आत्मसाक्षात्काराच्या परमोच्च ध्येयापर्यंत पोचता येते. श्रीदत्तमहाराजांच्या 'विचारधन'चा अभ्यास व चिंतनमनन ही आत्मसाक्षात्कारापर्यंत नेणारी परिपूर्ण साधना आहे असा अनेक साधकांचा अनुभव आहे. त्यामुळेच श्रीदत्तमहाराजांकडे मार्गदर्शनासाठी येणाऱ्या लोकांची विशेषतः तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

"श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन" या पुस्तकाचे साधकांनी चांगले स्वागत केले यावरून श्रीदत्तमहाराजांच्या लोकोद्धाराच्या कार्याला मिळालेले व्यापक स्वरूपच सूचित होत आहे. कोणत्याही अध्यात्मप्रेमीला आनंद वाटेल अशीच ही घटना आहे.

डॉ.शरद्‌चंद्र कोपर्डेकर

५ एप्रिल, १९९८

***

* मनोगत (चौथ्या मुद्रणाच्या निमित्ताने)

- डॉ.शरद्‌चंद्र कोपर्डेकर

भरतभूमीमध्ये अध्यात्मविद्या वेदकाळात प्रकटली. वेद म्हणजेच आत्मज्ञान किंवा अध्यात्मविद्या अशी भारतीयांची पूर्ण श्रद्धा आहे. सुरुवातीपासूनच येथील लोकांनी अध्यात्मविद्या पूजनीय मानली आहे. अध्यात्मविद्या येथील मातीत चांगली रुजली, उगवली, फोफावली आणि बहरली आहे. तिचा "वेलू गगनावरी गेला'' आहे. येथील मातीत, हवेत व वातावरणात धर्मभावना ओतप्रोत भरून राहिलेली आहे. म्हणूनच हजारो वर्षे भारतीयांची मने सतत आस्तिक्य भावनेने आणि भक्तीभावाने भारलेली राहिली आहेत. ज्ञानसंपन्न व वैराग्यशील ऋषी व संत यांचा भारतीय समाजावर मोठाच प्रभाव राहिला आहे. साधुसंतांची ज्ञानसाधना, ज्ञानसंवर्धन व त्यांचे ज्ञानवितरण यांतूनच भारतीय संस्कृतीचे भावपोषण होत आले आहे.

अध्यात्मविद्येवर बोलू शकणाऱ्या प्रवचनकार व कीर्तनकारांनाही इथे पूजनीय स्थान मिळते. अभंग व भजने म्हणणाऱ्या गायकांनाही इथे मानाचे

स्थान प्राप्त होते. आध्यात्मिक लिखाण करणाऱ्या कवी व लेखकांनाही येथे मोठी प्रतिष्ठा प्राप्त होते. मग ईश्वरभक्तीत रंगलेले संतमहात्मे हे भारतीयांचे श्रद्धास्थान बनले नसते तरच नवल. पारमार्थिक मार्गदर्शन करू शकणाऱ्या साधु-संत-महात्म्यांभोवती इथे अनेक अनुयायी मोठ्या संख्येने गोळा होत आले आहेत. शतकानुशतके हे असेच सातत्याने घडत राहिले आहे.

अध्यात्ममार्गावरील प्रवास अनेक अवस्थांमधून अनेक जन्म सतत होत रहातो असे भारतीय अध्यात्मशास्त्र सांगते. अध्यात्मविद्येचे शब्दज्ञान प्राप्त होणे ही पहिली अवस्था. ते ज्ञान शब्दांतून लोकांपुढे प्रभावीपणे मांडण्याची क्षमता मिळणे ही पुढची अवस्था. त्या ज्ञानामागील अनुभूती स्वतः घेतलेली असणे ही त्याच्यापुढची अवस्था. त्या अनुभूती व ते ज्ञान स्वतःच्या आचरणांत आणून तसे जीवन स्वतः जगणे ही उच्च अवस्था. त्या आध्यात्मिक अनुभूती साधकांना देण्याचे सामर्थ्य प्राप्त असणे ही त्याहून उच्च अवस्था. अनेक संतमहात्मे ईश्वरभक्ती करता करता स्वतःच ईश्वररूप होऊन जातात ही अंतिम अवस्था. पण काही पुरुष जन्मापासूनच ईश्वररूप असतात. हेच अवतारी पुरुष. धर्माची पुन्हा संस्थापना करण्यासाठी, धर्मजागरण करण्यासाठीच आलेले. या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये असणाऱ्या सर्व संतमहात्म्यांची भारतीय लोक श्रद्धेने पूजाच करीत आले आहेत.

श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे अध्यात्मज्ञान केवळ शब्दांत मांडणारे नाहीत. त्या ज्ञानामागील अनुभूती त्यांनी स्वतः घेतल्या आहेत, त्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वात मुरल्या आहेत. त्यांच्या आचरणात सातत्याने पूर्णतया प्रकटलेल्या आहेत आणि समोरच्या साधकांना त्या अनुभूती देण्याचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ आहे. जन्मापासूनच ईश्वरी शक्तीच्या परिपूर्ण रूपात त्यांचे दर्शन होत आले आहे. त्यांचे धर्मजागरण व लोकोद्धाराचे कार्यही ''संभवामि युगेयुगे'' या भगवंताच्या वचनाचीच पूर्तता आहे.

श्रीदत्तमहाराजांचे जीवन व कार्य पाहून श्रीशंकराचार्य व श्रीज्ञानदेव यांची आठवण होते. दैवी संपत्तीचे भांडार पुरेपूर भरलेले आहे. ज्ञान, भक्ती व कर्म यांची सर्वोच्च पातळीवरील एकात्मता तशीच आहे. ज्या अनुभूती श्रीशंकराचार्यमहाराजांनी आपल्या वाङ्मयात गुंफल्या, श्रीज्ञानदेवांनी

अभंगातून आणि ज्ञानेश्वरीतून सांगितल्या, त्याच अनुभूती श्रीदत्तमहाराजांनी 'विचारधन'मध्ये गुंफलेल्या आहेत.

भारतीय संस्कृतीने हजारो वर्षे काही चिरंतन मूल्ये सातत्याने जोपासली आहेत. या मूल्यातूनच भारतीय समाजाची जडणघडण होत आली आहे. या मूल्यांप्रमाणे वागणाऱ्या व्यक्तिरेखा भारतीयांनी सदैव आदर्श मानल्या आहेत आणि घराघरांत, मनामनांत त्या श्रद्धास्थान बनल्या आहेत. भारतीय साहित्यातील या आदर्श व्यक्तिरेखांबद्दल बोलताना श्रीदत्तमहाराज भावविभोर होतात. श्रीदत्तमहाराजांच्या आचरणांतून त्या आदर्श व्यक्तिरेखा सतत प्रकट होतात. भारतीय संस्कृतीतील आदर्श मूल्यांचे व तत्त्वांचे जिवंत चित्रण वाटावे असे आचरण श्रीदत्तमहाराजांकडून सतत होत राहिले आहे. श्रेष्ठ संस्कृतीमूल्ये, परमोच्च जीवनमूल्ये व आदर्श तत्त्वे यांनीच श्रीदत्तमहाराजांचे भावविश्व सजले आहे. श्रीदत्तमहाराज स्वतःच्या भावविश्वाबद्दल शब्दांत कधीच काही सांगत नाहीत. परंतु त्यांची 'विचारधन'मधील अनेक वाक्ये झरोक्यासारखी आहेत. या झरोक्यातून श्रीदत्तमहाराजांच्या भावविश्वाचे मनोरम दर्शन घडते.

सिंहासनावर रामरायांच्या पादुका ठेवून विरागी वृत्तीने राज्यकारभार करणाऱ्या भरताचे वर्णन करताना श्रीदत्तमहाराज गहिवरतात. म्हणूनच गुरुमहाराजांचे उत्तराधिकारी या नात्याने आश्रमांत वावरतांना त्यांचे आचरण भरतासारखेच विरागी होत रहाते. अकाम प्रल्हादाच्या पराभक्तीचे वर्णन करताना त्यांचा कंठ दाटून येतो आणि क्षणभर त्यांची ओघवती वाणी मूक होते. म्हणूनच महाज्ञानी व प्रकांड पंडित असलेले श्रीदत्तमहाराज पराभक्तीने देहभान विसरलेल्या अकाम भक्तासारखेच सदैव वागतात. प्रचंड कार्य करूनही निरहंकाराने सारे श्रेय रामरायांना अर्पण करणाऱ्या हनुमंताचे वर्णन करतांना ते हळवे होतात. म्हणूनच अनेक लोकोत्तर कर्मे हातून घडूनही स्वकर्तृत्त्वाचा श्रीदत्तमहाराजांना पूर्णतया विसर पडतो आणि ते सदैव अमानित्त्वातून येणाऱ्या निरहंकारी वृत्तीने वागत रहातात.

रामरायांचे स्वागत करण्यासाठी उष्टी बोरे पुढे ठेवणाऱ्या शबरीची मनोवृत्ती उलगडतांना ते भावूक होतात. म्हणूनच श्रीवासुदेवनिवासमध्ये

श्रीशंकराचार्य स्वामीमहाराज आले की शबरीसारखी त्यांची अवस्था होते व आचायासमोर बसणे बोलणेही त्यांना टाळावेसे वाटते. धीरोदात्त भीष्माचार्यांचा इंद्रियनिग्रह, संयम, वचनपालन आणि श्रीकृष्णभक्ती यांचे वर्णन करतांना ते हरवून जातात. म्हणूनच जीवनांतील अनेक कठीण प्रसंगी त्यांचे आचरण भीष्माचार्यांची आठवण करून देणारे असते. काशी येथे वेदधर्मा ऋषींची प्राणपणाने सेवा करणाऱ्या दिपक या शिष्याची गुरुभक्ती पाहून भगवान विष्णु प्रसन्न झाले व वर मागायला सांगू लागले. तेव्हा ''माझी गुरुभक्ती वाढावी'' असा वर मागणाऱ्या दीपक याची हकीगत सांगताना श्रीदत्तमहाराज विलक्षण कातर होतात. म्हणूनच आपले गरू श्रीदीक्षितस्वामी व श्रीगुळवणीमहाराज यांची आठवण येताच भावभक्तीने त्यांची वाणी मूक होते. श्रीदत्तमहाराज स्वतः अवतारी पुरुष असल्याने धर्माचरणाची बंधने त्यांना बांधू शकत नाहीत. परंतु ईश्वराची आज्ञा म्हणून मी धर्माचरण करतो, राज्य मिळवण्यासाठी नव्हे असे स्थिरचित्ताने सांगणारे धर्मराज त्यांना फार आवडतात. त्यामुळे वर्षानुवर्षे श्रद्धापूर्वक श्रीदत्तमहाराज धर्माचरण काटेकोरपणे करीत रहातात.

भगवान श्रीकृष्णांकडे दुःख मागणाऱ्या कुंतीबद्दल त्यांना फारच आदर वाटतो. दुःखामुळे ईश्वराकडे लवकर जाता येते म्हणूनच दुःखे द्यायला कारणीभूत झालेल्या व्यक्तींबद्दल नितांत आदर ठेवावा असे त्यांना वाटते. रात्री झोपलेल्या पाच पुत्र व बंधू यांना कपटाने मारणाऱ्या अश्वत्थामाला पकडून समोर आणताच द्रौपदी रडायची थांबते व अश्वत्थामाला नमस्कार करून त्याला सोडून द्यायची आज्ञा करते. पुत्रवियोगाचे माझ्यासारखे दुःख अश्वत्थामाच्या आईला होऊ नये म्हणून अश्वत्थामाला सोडून द्यायला सांगणाऱ्या द्रौपदीची हकीगत सांगतांना ते कातर होतात व अशी दयाबुद्धी विकसित व्हायला किती जन्म घ्यावे लागतील असा प्रश्न भावविभोर स्वरांत श्रोत्यांना विचारतात. द्रोणाचार्यांचे अस्त्रविद्येतील नैपुण्य आणि नेतृत्वगुण श्रेष्ठच हे सांगतात आणि लगेच म्हणतात याहीपेक्षा श्रेष्ठ होता त्यांचा ध्यानाचा अभ्यास. रणांगणावर भोवती युद्धाची धुमश्चक्री चालू असतांनाही ते रथावर स्थिरचित्ताने मांडी घालून ध्यान लावू शकत होते हे कितीतरी अधिक श्रेष्ठ आहे असे ते सांगतात.

श्रीदत्तमहाराजांचे हे भावविश्व कोणालाही मोहून टाकेल असेच आहे. त्यांच्या या भावविश्वाचे संस्कार असलेले असंख्य लोक मराठी भूमीवर आहेत. भारतीय संस्कृतीने आदर्श मानलेल्या सर्वोच्च मूल्यांच व तत्त्वांचे श्रीदत्तमहाराज जिवंत प्रतीक आहेत. या मूल्यांचा व तत्त्वांचा परिपूर्ण आविष्कार त्यांच्या आचरणांत दिसून येतो. त्यांनी मुक्तहस्ताने वाटलेल्या विचारधनमध्ये जसा सनातन शास्त्रांचा गाभा विशुद्ध स्वरुपात आपल्या ओंजळीत अलगदपणे पडतो तसाच भारतीय संस्कृतीचा गाभा असलेली मूल्ये व तत्त्वे यांचा खोल संस्कार आपल्या व्यक्तिमत्वावर नकळत होतो. म्हणूनच 'विचारधन' वाचकांना ईश्वरप्रसाद म्हणून मस्तकी धारण करावासा वाटतो.

श्रीदत्तमहाराजांचे लखलखीत चारित्र्य आणि त्यांची निर्मळ विशुद्ध वृत्ती कोणालाही मोहून टाकील अशीच आहे. स्वतः पूर्ण वैराग्यशील असूनही आणि ईश्वरसान्निध्याचा नित्य अनुभव घेत असूनही श्रीदत्तमहाराज सर्वसामान्य लोकांच्यातीलच एक होऊन राहिले आहेत, समाजाभिमुख राहिले आहेत आणि सर्वसामान्य लोकांशी संवाद साधत ते धर्मतत्त्वांचा आशय सोप्या शब्दांत लोकांना समजावून सांगत आहेत. वैयक्तिक आणि सामाजिक सदाचाराचा ते सातत्याने जागर करीत आहेत. भक्तीसाधनेबद्दल ओढ आणि सर्वसामान्य लोकांबद्दल वाटणारा कळवळा यामुळे श्रीदत्तमहाराजांनी बंधुभाव, माणुसकी आणि करूणा यांना शिरोधार्य मानले आहे. त्यासाठी त्यांनी जात, पंथ, भाषा, प्रांत वगैरेतून निर्माण होणारे भेदही बाजूला सारले आहेत. म्हणूनच श्रीदत्तमहाराज हे शाश्वत श्रद्धास्थान आहेत. व्यक्तींच्या आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ते आयुष्यभर बोलत राहिले आहेत. त्यांच्या शब्दांना परतत्त्वाचा स्पर्श आहे. त्यांनी केलेली परमार्थाची सूत्रबांधणी विसाव्या शतकाच्या अखेरीलाही कालनुरूपच झाली आहे. साऱ्या प्राणीमात्रांना सामावून घेणाऱ्या विश्वात्मकतेचे ध्येय त्यांनी समाजापुढे ठेवले आहे आणि ते त्यांच्या आचरणातही प्रतिबिंबित झाल आहे.


प्रचाराची कोणतीही साधने नसतांना श्रीदत्तमहाराजांची वाणी मराठी प्रदेशात कानाकोपऱ्यात पोचली, तळागाळापर्यंत गेली आणि त्यामुळेच

आपले संस्कृतीधन सांभाळण्याची उत्कट जाणीव कळत नकळत समाजमनामध्ये बळकट होत गेली. अशा थोर संतांमुळेच ईश्वरीशक्तीचा प्रभाव समाजाच्या व्यावहारिक आणि पारमार्थिक जीवनावर पडत असतो ही वस्तुस्थिती आहे.

भारतीय संस्कृती व अध्यात्मविद्येवर आत्तापर्यंत अनेक आक्रमणे आली आहेत. इतर धर्म व संस्कृती यांचे आक्रमण, तथाकथित विज्ञानवाद्यांचे व निधर्मवाद्यांचे (सेक्युलर) आक्रमण, पाश्चात्य भौतिकतावादाचे आक्रमण, सुखलोलुप चंगळवादाचे व भोगवादाचे आक्रमण. परंतु अशी अनेक आक्रमणे येऊनसुद्धा संस्कृतीधन आणि अध्यात्मविद्या जी सांभाळून ठेवली गेली आहेत ती केवळ श्रीदत्तमहाराजांसारख्या संतांमुळेच. केवळ ईश्वरी इच्छा असल्यामुळेच हा चमत्कार घडला आहे. हे पाहिले म्हणजे शिवत्त्वावरील आपली श्रद्धा बळकट होत जाते, भारतीय संस्कृती आणि परंपरेचा धागाही चिवट होत जातो, आपल्या सांस्कृतिक संचिताचा अभिमान मनात जागा होतो आणि शाश्वत मूल्यांचा शोध घेण्याची इच्छा मनात निर्माण होते. श्रीदत्तमहाराजांचे लखलखीत चारित्र्य अनेक शतके समाज जीवनावर प्रभाव टाकणार आहे आणि त्यांचे पारमार्थिक क्षेत्रातील कर्तृत्त्व अनेक शतके समाजाला नव्या प्रेरणा देत रहाणार आहे.

श्रीदत्तमहाराज सदैव आत्मानंदातच बुडालेले असल्याने वैयक्तिक स्वरूपाची कामना किंवा इच्छा त्यांच्या जवळपासही येऊ शकत नाही. भोवती काहीही घडले तरीही त्यांची साम्यावस्था ढळत नाही, सहजानंदाची अवस्था मोडत नाही, समाधान भंग पावत नाही आणि क्षोभाची किंचितशी लहरही त्यांच्याजवळ येऊ शकत नाही. परिपूर्ण शांती व संतोष हा त्यांचा स्थायीभाव आहे. ते सदैव शांत, तृप्त व प्रसन्न असेच असतात. त्यांचे तेज त्यांच्याजवळ जाणाऱ्याला सतत जाणवत रहाते.

समोर येणाऱ्या प्रत्येक भक्ताला ते मायेने जवळ करतात. पुण्यवंताला जवळ करतात तसे अनेक अपराध हातून घडलेल्यालाही तितकेच जवळ करतात. पवित्रही जितका जवळ जाऊ शकतो तितकाच पापीही जवळ जाऊ शकतो. पापी अपराध्याला आणि दुराचाऱ्याला जास्तीच माया मिळेल



श्रीगुळवणीमहाराज

पण कमी नाही. हेच या माऊलीच्या प्रेमाचे वैशिष्ठ्य आहे. करूणा, दया, क्षमा व शांती इथे कायमचे वास्तव्य करून आहेत. म्हणूनच "दया, क्षमा, शांती। तेथे देवाची वसती।" या वचनांत श्रीतुकाराममहाराजांना काय सांगायचे आहे हे इथे चांगले उमगते. सौजन्य, नम्रता, ऋजुता व अमानित्त्व या गुणांचा इथे परमोत्कर्ष पहायला मिळतो. ईश्वरीशक्तीच्या परिपूर्ण रूपातच असे दैवी संपत्तीचे अमाप भांडार आढळते असे शास्त्रकार सांगतात.

संतमहात्मे जेथे वास्तव्य करतात ते स्थान पवित्र होते, तीर्थक्षेत्र बनते असे आध्यात्मिक इतिहास सांगतो. श्रीदत्तमहाराजांचे कर्मक्षेत्र "श्रीवासुदेवनिवास" आणि तपोभूमी "श्रीरेणुकानिवास" या स्थानांनाही पवित्र तीर्थक्षेत्राचे स्वरूप आले आहे.

पुण्यातील "रेणुकानिवास" मध्ये श्रीदत्तमहाराजांचे वास्तव्य दीर्घकाळ झाले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या विरागी आलोचनातून निर्माण झालेले दिव्य स्पंदन व पवित्र लहरी यांनी "रेणुकानिवास"चा परिसर भरून गेला आहे. म्हणूनच "रेणुकानिवास"ला पावित्र्य, शुचिता व मांगल्य प्राप्त झाले आहे. साधकांना "रेणुकानिवास" हे काशीक्षेत्रासारखे पवित्र तीर्थक्षेत्र वाटते. हा अनुभव घेतलेले भक्त सांगतात,"रेणुकानिवास"च्या प्रांगणात प्रवेश करताक्षणीच जाणीव होत की शुचित्त्वाने भरलेल्या, मांगल्याने बहरलेल्या अतिपवित्र भूमीवर आपण पाय ठेवीत आहोत. असे वाटते की आपण पृथ्वीवर नाहीच. पृथ्वीपासून आपण खूप दूर आलो आहोत. दिव्य आनंदलोकात आपण प्रवेश केला आहे. तिथे मांडी घालून बसले की डोळे आपोआप मिटतात. जीवनांतील कोलाहलाचा विसर पडतो. तेथील पवित्र स्पंदनानी मन भरून जाते. दिव्य शांतीच्या लाटा आपल्याभोवती फेर धरून नाचू लागतात. अथांग आनंद सागरांत मन खोलवर बुडी घेते. आनंद, आनंद केवळ आनंद. अनेक प्रगत साधकांना येथे कल्पनातीत दिव्य अनुभूती प्राप्त होतात.

श्रीदत्तमहाराजांचे इथे दर्शन घेणे हा एक वेगळाच अनुभव असतो. जीवनाचे अधिष्ठान असलेले अरूप परब्रह्म इथे सगुणसाकार रूपात स्थित आहे आणि ते परब्रह्माचे सगुण रूपडे आपण प्रत्यक्ष डोळ्यांनी पहात आहोत

याची जाणीव होताच मन थरारून जाते, डोळे ओलावतात आणि अंतरंगात पालट होत असल्याचे जाणवते. श्रीदत्तमहाराज एखादेच वाक्य बोलतात. एखादाच दृष्टीक्षेप टाकतात. पण त्यातूनच त्यांच्या अहेतूक, अनपेक्ष, अपार आणि विशुद्ध प्रेमाच्या वर्षावात चिंब भिजून जायला होते. जाणवते की फार मोठे पूर्वसुकृत होते म्हणूनच हे असे माऊलीचे प्रेम प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले. अनेक जन्मे पुण्यकर्मे हातून घडल्यावर त्या पुण्यकर्मांचे फळ म्हणून सद्गुरू माऊलींचे असे दर्शन घेण्याचे भाग्य वाट्याला येते.

सद्गुरूमाऊली म्हणून श्रीदत्तमहाराजांच्याकडे असंख्य भक्त व साधक वर्षानुवर्षे येत राहिले आहेत. असंख्य लोकांपर्यंत त्यांचे विचारधन पोचले आहे. अध्यात्मज्ञान मिळविण्यासाठी उत्सुक असलेले लोकही मराठी भूमीत खूप आहेत. या सर्वांचा उदंड प्रतिसाद मिळाला म्हणूनच "श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन" या ग्रंथाची चौथी आवृत्ती चार महिन्यात प्रकाशित करण्याचा योग येत आहे. पहिल्या मुद्रणाच्यावेळी तयार केलेल्या शब्दसांच्यावरूनच चौथे मुद्रण केले आहे. वास्तविक या शब्दसाच्यांमध्ये शुद्धलेखनाच्या काही चुका राहून गेल्या आहेत. तिसऱ्या मुद्रणाच्या सर्व प्रती संपल्या असल्याने चौथे मुद्रण तातडीने करणे आवश्यक होते. म्हणून त्या शब्दसाच्यांवरूनच मुद्रण केले आहे. चुका व उणीवांबद्दल वाचकांनी क्षमा करावी अशी प्रार्थना आहे.

या ग्रंथाला नृसिंहवाडी, माणगांव, कारंजा, गरुडेश्वर, नारेश्वर, बालाजी संस्थान (देऊळगावराजा) व श्रीदत्त आश्रम (जालना) या देवस्थानांचे आशीर्वाद लाभले आहेत.

फार मोठ्या समाधानाची गोष्ट म्हणजे या पुस्तकाला करवीर पीठाचे श्रीस्वामी-जगद्गुरू- शंकराचार्य-विद्याशंकरभारती यांचे आशीर्वाद लाभले आहेत. आपल्या प्रसादपत्रात आचार्यमहाराज लिहितात, "आपले पुस्तक अभ्यासपूर्ण आहे एवढेच नव्हे तर ते प्रसाद, ओज व माधुर्य या गुणांनी युक्त आहे. श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे भूषण असलेले अखिल भारतीय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची आंतरिक ओळख

या पुस्तकाद्वारे आपण करून दिल्याबद्दल वैयक्तिक आमचे व शंकराचार्य करवीर पीठाचे शुभाशीर्वाद."

ज्यांना भक्त प्रति "वासुदेवानंद सरस्वती" असे संबोधतात ते यतिमहाराज (प.प.यति नारायणानंद-सरस्वती-स्वामीमहाराज) हा ग्रंथ पाहून अतीव प्रसन्न झाले. त्यांनी कृपाप्रसाद दिला तोही "शब्देवीण संवादिजे" या श्रीज्ञानदेवांच्या उक्तीनुसार. वास्तविक यतिमहाराज गृहस्थाच्या घराला पदस्पर्शही करीत नाहीत. पण या नियमाला अपवाद करून यतिमहाराज वाडीहून काशीला जातांना मुंबईला मुद्दाम माझ्या घरी आले व त्यांनी मला कृपाप्रसाद दिला. मुलगा व पत्नी यांनाही त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले हे मोठेच भाग्य. या चरित्रलेखनाचे फळ अनपेक्षितरित्या सद्गुरूनीच असे माझ्या ओंजळीत टाकले आहे.

आपल्या प्रतिक्रिया आवर्जून कळविणाऱ्या सर्व वाचकांना माझे मनापासून धन्यवाद. परंतु मला मनापासून सांगावेसे वाटत की या पुस्तकाचे सर्व श्रेय संपूर्णपणे सद्गुरूंचेच आहे. श्रीज्ञानदेवांनी एका सामान्य रेड्याच्या मस्तकावर हात ठेवला आणि आयुष्यभर पाण्याच्या पखाली वाहणारा तो रेडा वेदवाणी उच्चारू लागला. त्याचप्रमाणे या सामान्य जीवाला सद्गुरुंनी जवळ केले आणि "श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन" असा ग्रंथ लिहून घेतला. सर्व ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती सद्गुरूंचीच आहे. म्हणूनच या ग्रंथाचे सर्व कर्तृत्त्व सद्गरूचे आहे. त्यामुळे या ग्रंथाचा गौरव आणि सन्मान सद्गुरूंच्या चरणी रूजू झालेला आहे.

वेदवाणीचा उच्चार मुखातून झाल्यावर त्या रेड्याची बुद्धी शुद्ध झाली आणि पखाली वहाण्याचे काम सोडून देऊन तो ज्ञानदेवांच्या पाठोपाठ चालू लागला. श्रीज्ञानदेवांनीही त्याला सतत वात्सल्याने बरोबरच ठेवले. श्रीज्ञानदेवांच्या वात्सल्याचा वर्षाव अनुभवत असतांनाच आळे येथे ज्ञानदेवांसमोर देह ठेवण्याचे भाग्य त्या रेड्याला लाभले.

माझेही आयुष्य आत्तापर्यंत पाण्याच्या पखाली वहाण्यातच गेले आहे. पण आता श्रीदत्तमहाराजांनी आपला वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवला

आहे. तेव्हा श्रीचरणी मी प्रार्थना करतो की आता सद्‌गुरूंचे वात्सल्य अनुभवत सद्‌गुरूंच्याबरोबर चालत चालत पुढील जीवन व्यतीत व्हावे. त्या रेड्याप्रमाणेच सद्‌गरूच्या डोळ्यासमोरच देह ठेवण्याचे भाग्य मलाही प्राप्त व्हावे. सद्‌गुरूंच्याचरणी एवढीच प्रार्थना आहे.

डॉ.शरद्‌चंद्र कोपर्डेकर

६०१, मेरीलॅन्ड कॉर्नर,
डॉ.आंबेडकर रोड, सायन सर्कलजवळ,
सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.
दूरध्वनी : ४०७ २३६८/४०७ २९१५

* मनोगत (सातव्या आवृत्तीच्या निमित्ताने)[१]

डॉ.शरद्‌चंद्र कोपर्डेकर

श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या चरित्राची ही सातवी आवृत्ती सादर करतांना मनांत भावनांचा संमिश्र कल्लोळ आहे. फेब्रुवारी १९९८ या महिन्यात श्रीदत्तमहाराजांच्या वर्धापनदिनी प्रस्तुत चरित्राची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. श्रीदत्तमहाराजांचे आशीर्वाद या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मलाही लाभले आणि या पुस्तकालाही लाभले हे माझेही भाग्य आणि या पुस्तकाचेही भाग्य.

श्रीदत्तमहाराजांचे विभूतीमत्त्व हा अतीव श्रद्धेचा विषय असल्यामुळे या पुस्तकाला वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. केवळ दीड वर्षाच्या अवधीतच या पुस्तकाच्या सहा आवृत्त्या निघाल्या. ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचले आणि जेथे जेथे मराठी भाषा बोलली जाते अशा ठिकाणी महाराष्ट्राबाहेरही ते अनेक ठिकाणी पोचले. त्यामुळे या थोर अवतारी पुरुषाचे दर्शन घेण्याची इच्छा अनेक लोकांच्या मनात निर्माण झाली. त्यांतले काहीजण दर्शनासाठी आले, दर्शन घेऊन कृतार्थ झाले आणि दर्शनासाठी पुनःपुन्हा यायचे असे मनाशी ठरवून परतले. इतर अनेक लोकांचा दर्शनासाठी येण्याचा बेत सिद्धीस जाण्यापूर्वीच श्रीदत्तमहाराजांनी १ मार्च, १९९९ रोजी स्थूल देहाचा त्याग केला. या सर्व लोकांच्या मनाला किती हुरहूर लागली असेल याची कल्पनाच करता येणार नाही. श्रीदत्तमहाराजांनी स्थूल देहाचा त्याग केला आहे हे खरेच आहे. पण ते सूक्ष्म रूपात आहेतच. त्या रूपातून त्यांची कृपा होतच रहाणार आहे. विचारधनमध्ये त्यांचे दर्शन होत रहाणारच आहे. विचारधनमधून त्यांचे मार्गदर्शनही होत रहाणार आहे.

सातव्या आवृत्तीत अनेक नवी परिशिष्टे घातली आहेत. श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब यांचे अलौकिक सहजीवन, श्रीदत्तमहाराजांच्या जीवनपर्वाचा अखेरचा कालखंड आणि अवतार समाप्ती हा भाग त्यात आहे.

---

[१] - *हे लिखाण श्रीदत्त आश्रम, सद्‌गुरू नगर, नाव्हा रोड, जालना येथे सौ.ताईमहाराजांच्या उपस्थितीत झालेले आहे.*

वासुदेवनिवास व शक्तिपातविद्या यासंबंधी श्रीगुळवणीमहाराज व त्यांचे उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती समाविष्ट केली आहे. अनेक वाचकांच्या आग्रहावरून श्रीदत्तमहाराजांच्या कुटुंबातील व्यक्तींची माहितीही एका परिशिष्टात दिली आहे. पूर्वीच्या आवृत्तीत डॉ.अशोकमहाराज कवीश्वर यांच्याबद्दल जी माहिती दिली होती, त्यात भर टाकली आहे. साधकांचे काही नवे अनुभव व आठवणीही समाविष्ट केले आहेत. शिवाय सुमारे साठ नव्या चित्रांचा समावेश केला आहे. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे चित्रमय दर्शन आता वाचकांना घडू शकणार आहे.

या चरित्राचे सर्व लेखन सौ.ताईमहाराजांचेच आहे. मी फक्त लिहून घेणारा आहे हे पहिल्या आवृत्तीच्या मनोगतातच स्पष्ट केले होते. हे नवीन लिखाण जालना येथील श्रीदत्त आश्रमात सौ.ताईमहाराजांच्या उपस्थितीत त्यांच्याच प्रेरणेने, त्यांच्याच शब्दात झालेले आहे हेही सांगावेसे वाटते. या चरित्रासाठी सौ.ताईमहाराजांन्नी मला निमित्त केले ते केवळ माझ्यावर कृपा व्हावी याच हेतूने.

या चरित्राच्या पहिल्या आवृत्तीत सौ.ताईमहाराजांची काही माहिती श्रीदत्तमहाराजांच्या अनुज्ञेने समाविष्ट करता आली याचा मोठाच आनंद वाटतो. सौ.ताईमहाराजांचे संपूर्ण चरित्र लिहावे, ते होईपर्यंत या चरित्रातच त्यांची आणखी माहिती घालावी असे अनेकजण आग्रहाने सांगत राहिले. मलाही तसेच वाटले. म्हणून मी सौ.ताईमहाराजांबद्दल काही लिखाण केले. या चरित्रांतच ते घालण्याची माझी इच्छा होती. पण सौ. ताईमहाराजांना ते कळताच त्यांनी ते लिखाण थांबवण्यासाठी स्पष्ट आज्ञा केली. त्यांची संमती असल्याशिवाय त्यांचे चरित्र लिहिता येणार नाही आणि या चरित्रातही त्यांची आणखी माहिती घालता येणार नाही. वाचकांनी मला क्षमा करावी अशी विनंती आहे.

सौ.ताईमहाराज या साक्षात भगवती आहेत, जगदंबा आहेत. सर्व कर्तृत्त्व, भोक्तृत्त्व आणि साक्षीभाव ही जगदंबेचीच रूपे आहेत. सर्वांचा अंतरात्मा आणि जीवनाधार जगदंबामाताच आहे. सामान्य माणसाप्रमाणे जन्म घेऊन ताईमहाराज या नावाने जगदंबेचीच लीला चालू आहे. कर्तृत्त्व, भोक्तृत्त्व आणि

साक्षीभाव यांच्या पलीकडे सौ.ताईमहाराज सदैव राहिलेल्या दिसतात हे त्यांच्या स्वतःच्या खऱ्या स्वरूपावर प्रकाश टाकणारे आहे. साहजिकच सौ.ताईमहाराजांचे स्वतंत्र चरित्र लवकरात लवकर प्रसिद्ध व्हावे असेच सर्वांना वाटते आहे.

श्रीदत्तमहाराज सनातन वैदिकधर्माचे स्वतंत्रप्रज्ञ आणि परिणतप्रज्ञ प्रवक्तेही आहेत आणि भाष्यकारही आहेत. ते अजातवादीही[१] आहेत आणि अद्वैत मतवादीही आहेत. याहूनही अधिक खूप काही आहेत. भारतीय वेदवाङ्मय, उपनिषदे आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान यांचा श्रीदत्तमहाराजांनी समन्वय करून दाखवला, त्या समन्वयाची स्वतः अनुभूती घेतली आणि आपल्या विचारधनमधून त्यांनी ती अनुभूती प्रगट केली. स्वतः तसे जीवन जगून ती अनुभूती समाजापुढे ठेवली. त्यांचे अमानित्त्व एवढे मोठे होते की स्वतःला झाकून घेऊनच ते धर्मजागरणाचे कार्य करीत राहिले. अद्वैत तत्त्वज्ञान आजही प्रत्यक्ष जगता येते हे त्यांच्या जीवनावरून दिसून येते. म्हणूनच म्हणावेसे वाटते श्रीदत्तमहाराज आत्मानुभवी संत होते.आत्मानुभव हाच त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. आत्मानुभव हाच त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

---

[१] तळटीप : 'अजातवाद' - श्रीशंकराचार्य स्वामीमहाराज यांचे परात्पर गुरू श्रीगौडपादाचार्य यांनी प्रथम अजातवाद मांडला आणि श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांनी मांडूक्य उपनिषदावरील भाष्यामध्ये या अजातवादाचे प्रदीर्घ विवरण केले आहे. हे जग केवळ भगवंताचेच रूप आहे. सर्व नामेरूपे भगवंतानेच धारण केलेली आहेत. त्यामुळे जग असे काही नाहीच. ते आलेच नाही त्यामुळे जग नाहीसा होण्याचा प्रश्नच येत नाही. ही अनुभूती म्हणजे अजातवाद असे थोडक्यात सांगता येईल. श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांप्रमाणेच श्रीज्ञानदेव आणि श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनी मांडलेल्या विचारधनाला अजातवादाचा मूलाधार आहे. या मूलाधारावरच अद्वैत तत्त्वज्ञान आधारलेले आहे.

सर्व विश्वामध्ये त्यांना भगवंतच दिसायचा. त्यांच्या विभूतीमत्त्वामध्ये अमाप सुख भरून राहिले आहे असे वाटायचे. ते अभेदबुद्धीने सर्वत्र पहायचे. चांगलेवाईट, जडचेतन, इष्ट अनिष्ट असे कोणतेच भेद त्यांच्या नजरेत नसायचे. या सर्व द्वद्वांच्या ते पलीकडे होते. त्यांचे सर्व व्यवहार - ब्रह्मरूप झालेले होते. सारे विश्व ते व्यापून आहेत असे जाणवत रहायचे. म्हणूनच देहात असले तरी देहाच्या पलीकडे आहेत असे वाटायचे. जागृती, स्वप्न आणि गाढ झोप या तीन अवस्थांच्या पलीकडे आहेत असे वाटायचे. आनंदाला गिळून ते स्वतःच आनंदमय झाले आहेत असे वाटायचे. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घ्यायची संधी आपल्याला मिळते आहे हे आपले मोठे भाग्य आहे असे वाटायचे.

श्रीदत्तमहाराज "ज्ञानाचा तळपता प्रखर सूर्य" म्हणावे असे होते. ज्ञानाचे तेज त्यांच्या डोळ्यात स्पष्टपणे चमकायचे. पण हृदयांत एवढा कळवळा आणि दयाबुद्धी होती की त्यांचे शब्द मधाळ वाटायचे, कोमल वाटायचे. त्यांचे शब्द ऐकतांना वाटायचे, आपल्यावर प्राजक्ताच्या फुलांचा वर्षाव होत आहे, मनावर कोणीतरी हलकेच मोरपीस फिरवित आहे. त्यांचे दर्शन घेतांना वाटायच पौर्णिमेच्या चांदण्यातच फिरायला आलो आहोत.

श्रीज्ञानदेव संतांचे वर्णन करतांना 'पसायदान'मध्ये म्हणतात -

"चला कल्पतरुंचे आरव। चेतनाचिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव। पीयूषाचे ॥
चंद्रमे जे अलांच्छन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन॥"

(भावार्थ :- चालणाऱ्या कल्पतरुंचे बगीचे, सजीव चिंतामणींचे गांव व अमृताचे बोलणारे सागर, कलंकरहित चंद्र, उष्णतारहित सूर्य आणि सर्वांशी नेहमी सज्जन असणारे.)

श्रीज्ञानदेवांनी वर्णन केलेल्या अशा उच्च कोटीतील संत म्हणून श्रीदत्तमहाराजांचे दर्शन विसाव्या शतकांत आम्हाला घडले हे सर्वांचे मोठेच भाग्य आहे.

श्रीदत्तमहाराज सामान्य लोकांमध्ये सामान्यांसारखेच वागायचे. पण त्यांच्या आचरणांतून त्यांचे ज्ञान व अनुभूती प्रगट व्हायचीच. दुधी काचेने दिवा झाकून ठेवला, तरीही त्या दिव्याचा प्रकाश दुधी काचेवर प्रतिबिंबित होत रहातो, तसे श्रीदत्तमहाराजांचे ज्ञान व अनुभूती त्यांच्या आचरणातून प्रतिबिंबित व्हायची. जाणीव व्हायची की ते महाज्ञानी आहेत, महायोगी आहेत, स्थितप्रज्ञ आहेत आणि गुणातीत आहेत. त्यांचे एखादे वाक्य ऐकायला मिळाले तरीही वाटायचे काही उदात्त, अलौकिक ऐकतो आहोत. त्यांचा एखादा शब्द कानावर पडला तरीसुद्धा शुचितेचा शिडकावा झाला असे वाटायचे. गंगेत स्नान करतांना पवित्र झाल्यासारखे वाटते तसे वाटायचे. तात्त्विक विचार त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाले म्हणजे वाटायचे गहनगंभीर, पवित्र उपनिषद वाक्यच ऐकायला मिळते आहे. श्रीदत्तमहाराजाचे विचार कळायला सोपे वाटतात. पण जितके चिंतन करावे तितके ते अर्थपूर्ण वाटतात, आशय अधिकच विशाल वाटतो, अधिकच समृद्ध वाटतो.

आध्यात्मिक अनुभूती नेहमीच शब्दातीत असतात, लौकिक जीवनाच्या पलीकडील असतात. या अलौकिक अनुभूती त्यांच्या वाक्यावाक्यात सामावलेल्या आहेत हा अनुभव अनेक वाचकांना आला आहे. याचे कारण त्या अनुभूती श्रीदत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वामध्ये मुरल्या आहेत आणि त्यांच्या विभूतीमत्त्वाचा अविभाज्य भाग झाल्या आहेत.

म्हणूनच त्यांचे शब्द आधी येतात आणि शास्त्रग्रंथातील अनुभूती त्यांच्या मागे धावत येऊन त्यात समाविष्ट होतात असे घडल्याचे दिसते. त्यांचे सहज साधे उद्‌गारही यामुळे थोर सारस्वताचे रूप धारण करतात. म्हणूनच त्यांचे विचारधन वाचतांना आपण शब्द वाचतो आहोत ही भावनाच नाहीशी होऊन जाते. आपण काहीतरी अनुभवतो आहोत असे वाटायला लागते. ते अनुभवणे शब्दांच्या पलीकडे असते. 'विचारधन' वाचायला घेतले की वाटते आपले अंतरंग निर्मळ होते आहे, आपल्या जीवनाला एक वेगळी उंची प्राप्त होत आहे. असे वाटते की शुचितेच्या लाटा अंगावर येताहेत, आपल्याला शुद्ध करताहेत. म्हणूनच विचारधन वाचतांना आपले मन ऐहिक जीवनांतून वर उचलले जाते, इंद्रियांचे जग मागे पडते, अध्यात्मिकतेच्या विश्वात प्रवेश करतो.

हे अध्यात्मिकतेचे विश्व शुद्ध आत्मरसाने भरलेले आहे, शुद्ध आत्मानंदाने भरलेले आहे. त्याची गोडी चाखली की मग ऐहिक जगांत परतयावे असे वाटतच नाही. सच्चिदानंदघन अद्वैत अनुभूतीपर्यंत नेण्याचे सामर्थ्य 'विचारधन'मध्ये आहे हा अनुभव अनेक साधकांना आला आहे.

वाटते मानवी शरीराच्या आश्रयाने प्रगट होणारे आत्मिक वैभव आणि ईश्वरीसौंदर्य यांचे साकार रूप म्हणजे श्रीदत्तमहाराज. आज देहाने ते आपल्यात नाहीत. पण जीवनचरित्राच्या आणि विचारधनच्या रूपाने आपल्यासमोर आहेतच. म्हणूनच वाटते की श्रीदत्तमहाराजांसारख्या अवतारी पुरुषाचे चरित्र आणि 'विचारधन' एखाद्या ललित साहित्यकृतीसारखे केवळ वाचण्यासाठी नसते. त्याचे पुनःपुन्हा अध्ययन करावे आणि चिंतन व मनन करून आपले लहानसे जीवन उजळून टाकावे यासाठी ते असते.

भारतीय संस्कृतीतील श्रेष्ठ जीवनमूल्ये आणि आदर्श श्रीदत्तमहाराजांनी स्वतःच्या आचरणातून आपल्यापुढे ठेवले. भारतीय संस्कृती, इतिहास आणि परंपरा त्यांच्या रूपाने विसाव्या शतकांत पुन्हा एकदा साकार झाली. भारत देशातील संस्कृती, विविध भाषा, वेगवेगळे भूप्रदेश, वंश आणि चालीरीती यातील भेद अगदी वरवरचे आहेत आणि या सर्वांमध्ये एकसंघ एकात्मता आहे हे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनावरून आणि त्यांनी प्रगट केलेल्या विचारधनमधून पुन्हा एकदा आपल्यासमोर मांडले गेले आहे.

आयुष्यभर श्रीदत्तमहाराज सर्वांचे कल्याण चिंतोत राहिले. सर्वांना शांती देत राहिले. आध्यात्मिक वाटचाल करणाऱ्यांना मार्गदर्शन करीत राहिले. त्यासाठीच ते अवतीर्ण झाले होते.

श्रीदत्तमहाराज ज्ञानीयांचे राजे आहेत. महायोगी आहेत. पंडितोत्तम विद्यावाचस्पती आहेत. "गुरुणां गुरु" म्हणावे असे सद्गुरू आहेत. भक्तांचे शिरोमणी आहेत. थोर कर्मयोगी आहेत. वैराग्याचा पुतळा आहेत. शुचितेची मूर्ती आहेत. तत्त्वज्ञाचे मुकूटमणी आहेत. स्वतःच्या आचरणातून शिकवणारे थोर आचार्य आहेत. वेदान्ताचे विसाव्या शतकातील थोर भाष्यकार आहेत. संतांचे आणि सत्पुरुषांचे सुहृद आहेत. भारतीय संस्कृतीचे सगुण साकार रूप आहेत.

ही सर्व विशेषणे श्रीदत्तमहाराजांना शोभतात. तरीही त्यातून श्रीदत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वाचे आणि जीवनकार्याचे संपूर्ण वर्णन होऊ शकत नाही. श्रीदत्तमहाराजांचे विभूतीमत्त्व दशांगुळे शिल्लक रहातेच. याचे कारण म्हणजे देहाने श्रीदत्तमहाराज आपल्यात वावरत असले तरीही त्यांचे मन आत्मरूपाशी एकरूपच असायचे. स्पष्ट शब्दात सांगायचे तर ज्या परमेश्वराची भक्ती करावी असे ते आयुष्यभर सांगत - तो परमेश्वर ते स्वतःच आहेत. परमेश्वर म्हणजेच आत्मस्वरूप. ते आत्मस्वरूप हेच श्रीदत्तमहाराजांचे खरे स्वरूप आहे.

जगाच्या इतिहासात अनेक देशात अनेक अवतारी पुरुष झाले. त्यांचे दिव्य अनुभव अनेक ग्रंथात वाचायला मिळतात. ते सर्व अनुभव श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात प्रत्यक्ष उतरलेले होते. जगातील सर्व धर्मात जेवढी उदात्त तत्त्वे आहेत, त्यांचा पूर्ण आविष्कार श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत प्रत्यक्ष पहायला मिळतो. म्हणूनच म्हणावेसे वाटते श्रीदत्तमहाराज हे पूर्णावतार आहेत, ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप आहेत.

श्रीदत्तमहाराजांच्या या अवतारी स्वरूपाला साजेसे एक भव्य मंदिर उभे राहिले पाहिजे. ते मंदिर श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे मूर्त प्रतीकही झाले पाहिजे. तसेच भारतीय संस्कृती, इतिहास आणि परंपरा यांतील एकसंघ एकात्मतेचे एकरूप वाटेल असे प्रतीकही झाले पाहिजे. सर्व धर्मातील उदात्त तत्त्वांचा आविष्कार श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात झाला आहे हे त्या मंदिरातून स्पष्टपणे दिसून आले पाहिजे. त्यांच्या जीवनकार्यासारखेच भव्य, कलात्मक आणि अभिजात सौंदर्याने नटलेले असे ते मंदिर झाले पाहिजे. जगातील सर्वोत्कृष्ट मंदिरापैकी एक असे ते मंदिर झाले पाहिजे.

श्रीदत्तमहाराजांसारखी अवतारी विभूती केव्हातरी भूतलावर येत असते. अशा थोर विभूतीजवळ मला जाता आले यातच माझे भाग्य साठवलेले आहे. त्यांनी मला आपला म्हटले यातच माझ्या जीवनाची सार्थकता झाली आहे.

अनेक लोक मला विचारतात श्रीदत्तमहाराजांकडून मला हवे असलेले सर्व काही मिळाले काय? या प्रश्नाचे उत्तर मी अगदी ठामपणे देऊ शकतो. श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती आल्यानंतर मला जे मिळाले, त्यापेक्षा वेगळे काही मिळावे असे मला कधीच वाटले नाही. मला हवे असलेले सर्व काही श्रीदत्तमहाराजांच्या चरणांतच एकवटलेले आहे अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे. त्यांची कृपा झाली की ते मला मिळेल असाही पूर्ण विश्वास वाटतो आहे. कितीही वेळा मला विचारले तरी माझे हेच एक उत्तर असेल.

या जन्मी श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती पोचेपर्यंत आयुष्याची पन्नास वर्षे उलटून गेली होती. ती पन्नास वर्षे फुकट गेली असे आता वाटते. मी श्रीदत्तमहाराजांच्या चरणाजवळ आलो, तेथे विसावलो, त्यांच्या तोंडून चार शब्द ऐकले. तोपर्यंत त्यांची अवतार समाप्तीची वेळ आली. ती वेळ आली म्हणून ते उठले आणि वेगाने क्षितिजाकडे चालायला लागले. मला वाटले ते मला खुणावत आहेत, त्यांच्यामागून मला यायला सांगताहेत. मी लगेच उठलो, त्यांच्या मागे चालायला लागलो. पण ते फारच वेगाने चालत होते. त्यामुळे मी मागे मागे पडू लागलो. आमच्या दोघांतले अंतर वाढू लागले. मी जीवाच्या आकांताने धावायला लागलो. पण कांही क्षणातच ते क्षितिजाच्या पलीकडे निघून गेले, दिसेनासे झाले.

त्यांच्या पावलांच्या खुणा मला त्या वाटेवर दिसताहेत. त्या खुणा पहात मी आता पुढे पुढे चालत रहाणार आहे. त्यांच्या आठवणींची सोबत मला सतत साथ करीत रहाणार आहे. या वाटेवरील श्रीदत्तमहाराजांच्या पावलांच्या स्पर्शाने पावन झालेल्या धुळीत लोळण घेत घेत मी पुढे चालत रहाणार आहे. तसे चालतांनाच एक दिवस माझा देह त्या पावन धुळीतच विसावणार आहे, त्या धुळीतच सामावून जाणार आहे. तसे झाले म्हणजे जीवन धन्य झाले, सार्थकी लागले असेच मला वाटेल.

पुन्हा मला जन्म येईल तेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती लवकरात लवकर यावे हीच माझी उत्कट इच्छा राहील. त्यासाठी कितीही आपत्ती सोसाव्या लागल्या तरी चालतील. लवकरात लवकर त्यांच्या चरणप्रांती रूजू व्हावे आणि दास म्हणून त्यांची सेवा करावी हेच एकमेव ध्येय माझ्या

पुढच्या सर्व जन्मांत असावे. कितीही जन्म येवोत. येणाऱ्या पुढच्या सर्व जन्मात देह, मन व वाणी श्रीदत्तमहाराजांच्या सेवेतच पूर्णतया रत असावेत ही एकच प्रार्थना त्यांच्या चरणी उत्कटतेने करावीशी वाटते.

डॉ.शरद्‌चंद्र कोपर्डेकर

६०१, मेरीलॅन्ड कॉर्नर,
डॉ.आंबेडकर रोड, सायन सर्कलजवळ,
सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.
दूरध्वनी-४०७ २३६८/४०७ २९१५

ऋणनिर्देश

डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर

माझ्या इतर पुस्तकांप्रमाणेच या चरित्रग्रंथाच्या लेखनकार्याचे सचिवपण माझ्या पत्नी सौ.पौर्णिमा कोपर्डेकर यांनीच सांभाळले. त्यामुळेच सर्व अडचणींवर मात होऊ शकली आणि लेखनकार्य पूर्णतेला जाऊ शकले याचा सर्वप्रथम येथे मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. डॉ. दि. ब. केरुर, डॉ. श्री. म. भातखंडे आणि श्री. शरच्चंद्र भालेराव यांनी हे संपूर्ण लेखन बारकाईने वाचले. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने आणि वाङ्मयीन निकषानुसार या लेखनात उणीवा राहू नयेत यासाठी या तिघांनीही प्रत्येक वाक्य चिकित्सक दृष्टीने पाहून अनेक उपयुक्त सुचना केल्या. सौ. सुलभाताई तांबोळी यांनीही सर्व लेखन बारकाईने वाचून त्यात कोणत्याही चुका वा उणीवा राहू नयेत यासाठी अनेक सूचना केल्या. श्री. भोपटकर, श्री. निजामपूरकर यांनी छायाचित्रे उपलब्ध करून दिली. श्री. भाऊसाहेब वाकडे यांनी चरित्रग्रंथाची ही आवृत्ती लवकर प्रकाशित व्हावी यासाठी सर्वतोपरी सहाय्य केले. श्री. प्रसाद पाटणकर आणि श्री. विद्याधर फडके यांनीही अनेक प्रकारे सहाय्य केले. श्री. सुनील महाशब्दे यांनी आत्मीयतेने सर्वांगसुंदर छपाई केली. श्री. श्यामराव कोपर्डेकर यांनी व्यावसायिक दृष्टीकोन बाजूला ठेवला आणि ईश्वरसेवा या भावनेने या पुस्तकासाठी सेवाभावी मूल्य ठेवून तो सर्वत्र पोचावा यासाठी खूपच मेहनत घेतली. श्री. महेश खाजगीवाले यांनी जाहिरातींची व्यवस्था चोख सांभाळली. श्री. रघुनाथ सुर्वे, कु. अपर्णा कवटकर, कु. रत्नमाला शेडगे आणि श्री. रविंद्र सुंभे यांनीही अनमोल सहाय्य केले. इतरही अनेक व्यक्तींनी हस्ते-परहस्ते सहाय्य केले. सर्वांची ज्याची माहितीही माझ्या जाणीवेपर्यंत पोचू शकली नाही. त्यामुळे सर्वांचा येथे उल्लेख करणे शक्य नाही.

सहाय्यभूत झालेल्या सर्वांचा मी ऋणी आहे असे म्हणण्याचा अधिकार मला नाही. कारण प्रस्तुत चरित्रग्रंथाचे लेखन व प्रकाशन हा ईश्वरी संकल्प आहे. त्या संकल्पाप्रमाणेच सर्व काही घडले आहे. मला निमित्त केले गेले हे माझे भाग्य. निमित्तमात्र होण्याच्या संबंधातून या कार्याला हस्ते-परहस्ते, कळत-नकळत सहाय्यभूत झालेल्या सर्वांची सेवा गुरूकृपेला पात्र आहे असे म्हणतो आणि सर्वांचे कल्याण व्हावे ही प्रार्थना सद्गुरूचरणी सादर करतो.

❊ प्रकाशकाचे मनोगत - (पहिल्या आवृत्तीच्या निमित्ताने)

- श्याम कोपर्डेकर

'श्रीदत्तहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन' हे पुस्तक वाचकांच्या हातात देताना आम्हास विशेष आनंद होत आहे.

प्रस्तुत पुस्तकाचे लेखक डॉ. शरद्चंद्र कोपर्डेकर हे आमचे सख्खे बंधू. मुंबईच्या वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या नामवंत संस्थेचे ते अनेक वर्षे संचालक आहेत. त्यांनी लिहिलेली ५५ पुस्तके आतापर्यंत प्रकाशित झालेली आहेत. त्यापैकी ३५ पुस्तके अर्थशास्त्र, व्यापारशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, वगैरे व्यावसायिक विषयांवर आहेत आणि त्यातली बरीचशी पुस्तके महाराष्ट्र सरकारने क्रमिक पाठ्यपुस्तके म्हणून मंजूर केल्यामुळे त्या पुस्तकांच्या अनेक आवृत्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

आध्यात्मिक वाङ्मयाची आवड असलेल्या वाचकांनाही डॉ.शरद्चंद्र कोपर्डेकर लेखक म्हणून परिचित आहेत. महर्षी पतंजली यांनी रचलेल्या योगसूत्रांचे सोप्या भाषेत विवरण करणारा त्यांचा 'पातंजल योगदर्शन' हा ग्रंथ आम्हीच प्रकाशित केला आहे आणि तो अनेक वाचकांना खूपच आवडला आहे. तसेच 'ज्ञानेश्वरीची शिकवण' हे त्यांचे पुस्तक ज्ञानेश्वरीप्रेमी रसिकांना विशेष आवडलेले आहे. मुंबईच्या धर्मभास्कर मासिकांत त्यांनी लिहिलेल्या आध्यात्मिक बोधकथा गेली अनेक वर्षे सातत्याने प्रसिद्ध होत आहेत. त्यांचे ज्ञानेश्वरीवरील अनेक लेखही नियतकालिकांत व वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेले आहेत. त्याशिवाय डॉ. कोपर्डेकर यांनी अनेक संतांची चरित्रे लिहिलेली आहेत. श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, श्रीगुलाबरावमहाराज, श्रीगाडगेमहाराज, श्रीरमणमहर्षी, साधु वास्वानी, स्वामी शिवानंद, श्रीरंग अवधूत व श्रीचैतन्य महाप्रभू यांची डॉ.कोपर्डेकर यांनी लिहिलेली चरित्रे प्रथम स्वामीमहाराज या आमच्या नियतकालीकांत प्रसिद्ध झाली आणि त्यापैकी बहुतेक चरित्रे आम्हीच पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली आहेत. संत श्रीगुलाबरावमहाराज यांचे चरित्र डॉ. कोपर्डेकर यांनी इंग्रजी भाषेतून लिहिले असून ते भारतीय विद्याभवन, मुंबई यांनी प्रकाशित केले आहे. महाराष्ट्रातील थोर संत श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्याशी

डॉ.कोपर्डेकर यांचा झालेला सुसंवादही 'विचारधन भाग - एक' या नावाने भगवती प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केला आहे. डॉ. कोपर्डेकर यांनीच लिहिलेले श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र आता आम्ही प्रकाशित करीत आहोत.

श्रीदत्तमहाराजांसारखे संत महात्मे पूर्ण विरक्त असतात. कोणताही सांसारिक विषय त्यांच्या मनात नसतो. ममत्त्व, अहंकार असे काहीही विकार त्यांच्या जवळपासही फिरकत नाहीत. अशा विरक्त संतमहात्म्यांचा शब्द व आचरण हे प्रमाण मानावे व त्याप्रमाणे आचरण करावे असे वल्लभाचार्य संप्रदायांत सांगितले आहे. संतांचे वागणे आणि संतांचे आचरण हे स्वतंत्र प्रमाण मानावे व त्याप्रमाणे आचरण करावे असे शास्त्रकार अनेक ठिकाणी सांगतात. संतांचे आचरण पाहून आपण कसे आचरण करायचे याचा बोध होतो आणि तसे आचरण करण्याची इच्छा वाचकांच्या मनांत निर्माण होते. हे लक्षात घेऊनच संतांची चरित्रे लिहिली जातात आणि वाचलीही जातात.

सामान्य माणसाचे मन शुद्ध व्हावे व त्याच्या बुद्धीची योग्यता वाढावी यासाठी शास्त्रात अनेक उपाय सांगितले आहेत. परंतु ते उपाय नुसते वाचून त्या उपायाप्रमाणे आचरण करणे सामान्य माणसाला कठीण जाते. शास्त्रे वाचून तसे आचरण करणे सहजगत्या जमत नाही. म्हणून संतांची चरित्रे वाचायची आणि अवतारांची चरित्रे वाचायची असे शास्त्रकार सांगतात.

"संत तेचि देव। देव तेचि संत।।" हे श्रीतुकारामहाराजांचे वचन पूर्णपणे सार्थ ठरेल असे संत श्रीदत्तमहाराज आहेत. श्रीदत्तमहाराजांच्या चरित्र लेखनात त्यांच्या जीवनातील घटनांपेक्षा त्यांच्या आंतरिक अनुभूतींना व आत्मस्थितीला अधिक महत्त्व आहे हे ओळखून प्रस्तुत चरित्रांत श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील प्रमुख घटना व प्रसंग कथन करतांना त्यांच्या आत्मस्थितीचा वेध घेण्याचा, त्यांच्या आंतरिक अनुभूतींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

अनेक लेखक संतांची चरित्रे लिहितांना चमत्कारांवर भर देतात. तथापि प्रस्तुत चरित्रांत चमत्कारांवर भर दिलेला नाही. धर्मजागरणाच्या आणि लोकोद्धाराच्या कार्यावरून संत ठरतो, त्याच्या जीवनातील चमत्कारांमुळे नव्हे अशी लेखकाची स्पष्ट भूमिका आहे. मात्र भक्ताच्या कल्याणासाठी



श्रीदत्तमहाराज कवीश्वर

श्रीदत्तमहाराज
एका भक्ताच्या घरी
ध्यानमग्न अवस्थेत





उद्यानप्रसाद येथे
श्रीदत्तमहाराजांचा
सत्कार
द्वारकापीठाचे
श्रीशंकराचार्य
यांच्या हस्ते

संत निश्चितपणे चमत्कार घडवून आणू शकतात यासंबंधी लेखकाने केलेले विवेचन या चरित्रग्रंथाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरेल असे आम्हाला वाटते.

अद्वैत तत्त्वज्ञानात अभिप्रेत असलेली सर्वोच्च सुखस्थिती माणसाच्या इंद्रियांच्या जाणीवेपलीकडेच असते हे खरे आहे. तथापि ती सुखस्थिती श्रीदत्तमहाराजांमध्ये मूर्तिमंत साकार झालेली दिसते. म्हणूनच शब्दांनी ज्या अनिर्वचनीय महासुखाचे वर्णनही करणे अवघड जाते, ते महासुख साधकाला प्राप्त करुन देण्याचे सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या वाणीत सामावलेले आहे. यादृष्टीने श्रीदत्तमहाराजांचे आंतरिक चरित्र असलेला विचारधन हा भाग परमार्थाची आवड असलेल्या अभ्यासू साधकांना विशेष मोलाचा वाटेल. इंद्रियांच्या पलिकडे असलेले ते आत्यंतिक सुख बुद्धीला कसे प्राप्त करून घेता येईल, याचे श्रीदत्तमहाराजांनी केलेले विवेचन निश्चितच या पुस्तकाचे वेगळे वैशिष्ट्य ठरेल असे आहे. 'आत्मस्वरुप मी आहे.', 'निजानंद मी आहे', 'सद्चिदानंद मी आहे', असा अनुभव घेण्याची ज्या साधकांची इच्छा आहे त्यांना तो अनुभव देण्याचे सामर्थ्य श्रीदत्तमहाराजांच्या उपदेशवाणीत आहे आणि ती उपदेशवाणी विचारधनमध्ये संकलित केलेली असल्यामुळे प्रस्तुत पुस्तकाला मराठी साहित्याच्या अध्यात्मदालनांत अत्यंत मोलाचे स्थान लाभेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

प्रकाशन हा आमचा व्यवसाय असला तरीही केवळ व्यावसायिक मिळकतीचे गणित हे आमच्या प्रकाशन संस्थेचे ध्येय कधीच नव्हते. ज्ञानप्रसार करून उद्बोधन करणारी व समाजाचे उन्नयन करणारी अनेक पुस्तके आम्ही प्रकाशित केली आहेत.

"म्हणुनि बहुती परीं पाहतां । पुढतपुढतीं निर्धारिता ।
हे ज्ञानची पवित्रता । ज्ञानीचीं आथि ।।"

ही ज्ञानेश्वरमहाराजांची ओवी हे इंद्रायणी साहित्य प्रकाशनने प्रकाशनासाठी पुस्तके निवडतांना सदैव आपले प्रेरणास्थान मानले आहे.

हे चरित्र लिहिण्यामागील आपली भूमिका लेखकाने 'श्रीगुरूःशरणम्' या आपल्या प्रास्ताविकांत सविस्तरपणे मांडली आहे. लेखकाचा या प्रास्ताविकांत प्रकट झालेला भाव ध्यानांत घेऊन व या पुस्तकाचे

अध्यात्मक्षेत्रातील अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन आम्हो 'श्रीदत्तमहाराज कवीश्वर - चरित्र आणि विचारधन' हे पुस्तक अल्प किंमत ठेवून सेवाभावी वत्तीनेच प्रकाशित आणि वितरित करीत आहोत.

प्रस्तुत पुस्तकाचे लेखक आणि प्रकाशक आम्हा दोघांनाही थोर संत श्रीकृष्णदयार्णव यांच्या वंशात जन्म घेण्याचे भाग्य लाभले. हे पुस्तक संत श्रीकृष्णदयार्णव यांच्या चरणी श्रद्धापूर्वक अर्पण केले आहे.

श्याम कोपर्डेकर

* प्रकाशकाचे मनोगत (सातव्या आवृत्तीच्या निमित्ताने)

श्याम कोपर्डेकर

आम्ही प्रकाशित केलेल्या प्रस्तुत पुस्तकाची ही सातवी आवृत्ती वाचकांना सादर करण्यात आम्हाला मोठाच आनंद वाटत आहे. संस्कृती संवर्धन आणि प्रसार हे ईश्वरी कार्य आहे. भारतीय संस्कृती काही उदात्त तत्त्वे आणि मूल्ये यांवर आधारीत असल्यामुळे त्या मूल्यांचा आणि तत्त्वांचा जगभर प्रसार व्हावा यासाठी अनेक संतमहात्मे प्रयत्न करीत आले आहेत. काही अवतारी पुरुषांनी आपले संपूर्ण जीवनच या कार्याला वाहून घेतलेले आहे. श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे विसाव्या शतकांतील असे थोर अवतारी पुरुष आहेत. त्यांचे 'चरित्र आणि विचारधन' यांना मराठी मुलुखात सर्वत्र उत्तम प्रतिसाद मिळतो आहे ही बाब त्यामुळेच आम्हाला अत्यंत उत्साहवर्धक वाटते आहे. श्रीदत्तमहाराजांनी संपूर्ण आयुष्य भारतीय संस्कृतीतील थोर मूल्ये आणि तत्त्वे यांचा प्रसार करण्यासाठी व्यतीत केले हे ईश्वरी योजनेप्रमाणेच घडत आहे असे आम्हास वाटते.

गेल्या काही वर्षात पाश्चात्य संस्कृतीतील चंगळवाद आणि भोगवादाचे भारतीय समाजावर विशेषतः तरुणांवर फार मोठे आक्रमण होत आहे. त्यामुळे ऐहिकातील इंद्रियभोगांबद्दल सर्वच भारतीयांना विशेषतः तरुणांना एक प्रकारचा मोह पडत आहे असे दिसते. या मोहापासून भारतीयांना वाचवायचे असेल तर श्रीदत्तमहाराजांचे 'विचारधन' भारतात सर्वत्र पोचले पाहिजे.

आजचे चित्रपट, दूरदर्शनवरील कार्यक्रम आणि पाश्चात्य पुस्तके यांच्या माध्यमातून तरुणांपुढे ऐहिक जीवनाचे जे चित्र पुढे ठेवले जात आहे. त्यामुळे तरुण पिढी ऐहिकदृष्ट्या संपन्न जीवन जगावे या ओढीने भौतिकतेच्या मागे लागली आहे. त्यातूनच सुख मिळू शकेल असे आजच्या तरुणांना वाटत आहे.

मनुष्य कितीही श्रीमंत झाला व कितीही सुखसाधने मिळाली तरीही माणसाला खरे समाधान मिळत नाही. जीवनात खरे सुख व समाधान मिळवायचे असेल तर अध्यात्म मार्गाचा आधार घेऊन प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा उचित संगम साधला पाहिजे आणि ऐहिक जीवनातील संपन्नतेची जोड दिली पाहिजे. त्यामुळेच प्रपंच व परमार्थ यांचा उचित संगम होईल आणि माणसाला खऱ्या अर्थाने सुख आणि समाधान मिळेल हाच भारतीय संस्कृतीचा संदेश आहे. भारतीय अध्यात्मधन हा खऱ्या सुखाचा मार्ग हजारो वर्षे जगाला दाखवत आला आहे. भारताचे हे अध्यात्मधन हीच आपली खरी संपत्ती आहे. ही संपत्ती आपण कधीही गमावता कामा नये. उलट तिचा जगभर सर्वत्र प्रसार करीत राहिले पाहिजे.

मानवी जीवनात दुःखे येतच रहाणार. ते कोणालाही टाळता येणार नाही. अशा दुःखाच्या प्रसंगी माणसाच्या मनाला दिलासा देणे, शांती देणे हे केवळ अध्यात्मामुळेच घडू शकते. खूप धन व सुखसाधने मिळवून आणि संपन्नता मिळवूनही माणसाला जी पोकळी जाणवते, जो रीतेपणाचा अनुभव येतो, जी विमनस्कता सोसावी लागते ती दूर करण्याचा केवळ एकमेव मार्ग म्हणजे अध्यात्म होय. निराशा, अपयश आणि प्रिय व्यक्तींचा विरह निर्माण करणाऱ्या प्रसंगातही मनुष्य खंबीरपणे उभा राहू शकतो ते केवळ आध्यात्मामुळेच.

श्रीदत्तमहाराजांचे चरित्र आणि विचारधन जनमाणसापर्यंत सर्वत्र पोहोचले तर त्यामुळे भारतातील धार्मिक जीवनाला काही निराळी दिशा मिळेल आणि या समाजाचे पुनरुत्थान अल्पकाळात घडून येईल असे वाटते. श्रीदत्तमहाराजांचा संदेश जगात सर्वत्र परिणामकारक पोचवायचा असेल तर वैराग्य आणि अध्यात्मशीलता असलेल्या आणि बौद्धिक आणि आत्मिक

असा दुहेरी विकास झालेल्या शिष्यांनी पुढे आले पाहिजे आणि श्रीदत्तमहाराजांच्या आध्यात्मिक कार्याचे क्षेत्र भारताच्या सर्व भागात आणि जगातही अनेक ठिकाणी पोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहिले पाहिज. त्यामुळेच असंख्य लोकांना मनःशांतीचा लाभ होऊ शकेल.

हजारो वर्षे अनेक आक्रमणे आणि आघात होत राहिले तरीही भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक विचारधारा टिकून राहिली आहे. जगात सर्वत्र भारतीय अध्यात्मधारा बुद्धिवाद्यांच्याही आकर्षणाचा विषय होत राहिली आहे. विज्ञानयुगाने प्रभावित झालेली तरुण पिढीही जगात सर्वत्र भौतिकतेचा हव्यास सोडून देऊन मनःशांतीसाठी भारतीय अध्यात्माकडेच आशेने पहात आहे.

श्रीदत्तमहाराज अवतीर्ण झाल्यामुळे भारतीय आध्यात्मिक विचारधारा नव्या तेजाने उजळून निघाली आहे. श्रीदत्तमहाराजांनी सनातन विचारधारा आणि आधुनिक जीवन यांची योग्य सांगड घातली आहे आणि आध्यात्मिक जीवनाचे ऐहिक जीवनाशी असलेले अविभाज्य नाते समाजापुढे श्रीदत्तमहाराजांनी आधुनिक तरुणांच्या मनावर उचित शब्दात योग्यप्रकारे ठसविले आहे. नीतिमूल्ये, जीवनमूल्ये, सांस्कृतिकमूल्ये आणि आध्यात्मिकमूल्ये यांचा योग्य प्रकारे, योग्य प्रमाणात एकात्मस्वरूपात स्वीकार केला पाहिजे हे त्यांनी लोकांपुढे योग्य शब्दांत प्रभावीपणे मांडले आहे. नीतितत्त्वांचे अनुकरण करणे, मन विशाल आणि उन्नत बनविण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करीत रहाणे, दुःखितांबद्दल करुणा बाळगणे आणि सर्व चर आणि अचर सर्वांबद्दलच प्रेमभाव बाळगणे किती आवश्यक आहे हे सांगून श्रीदत्तमहाराज थांबत नाहीत, ते कसे करावे म्हणजे आध्यात्मिक अनुभूती येतात आणि आत्मज्ञान प्राप्त होऊन पूर्णावस्थेकडे माणसाचा प्रवास सुरू होतो हे श्रीदत्तमहाराजांनी सोप्या शब्दात आपल्यापुढे मांडले आहे. जीवनाची वाटचाल करताना भौतिक उन्नती साधत असली तरीही आध्यात्मिक उन्नतीही कशी साधावी हे श्रीदत्तमहाराजांनी अगदी सोप्या शब्दांत आपल्यापुढे मांडले आहे. म्हणूनच त्यांचे जीवन आणि कार्य साऱ्या मानवजातीसाठी आहे.

विज्ञानयुगाच्या आहारी जाऊन भारताने आपले अध्यात्मधन गमावता कामा नये. जगाला देण्यासारखे असे भारताजवळ केवळ अध्यात्मधनच आहे. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांच्या प्रबोधनाचा प्रकाश भारतभर पसरला आणि भारताच्या सीमा ओलांडून जगातील अनेक देशात गेला तर मानवी समाज जीवनाला एक वेगळी उंची प्राप्त होऊ शकेल आणि सात्त्विकतेची जोपासना होऊन विज्ञान युगातही श्रीदत्तमहाराजांची वाणी सर्वत्र शांतीचा शिडकावा करीत राहील. त्यामुळे माणसाच्या मनातील मालीन्य कमी होत जाईल आणि मानवी जीवनाला एक वेगळीच उंची प्राप्त होईल.

म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की श्रीदत्तमहाराजांचे चरित्र आणि श्रीदत्तमहाराजांशी झालेल्या संभाषणांचे व प्रश्नोत्तरांचे 'विचारधन' या नावाने संकलीत केलेले तीन भाग या चारही पुस्तकांना खूपच मोठे महत्त्व आहे. मराठी वाचकांनी या चारही पुस्तकांचे उत्तम स्वागत केले याचा प्रकाशक म्हणून आणि एक संस्कृतीप्रेमी जागरूक भारतीय नागरीक म्हणून आम्हाला फारच मोठा आनंद वाटतो. भारतीय संस्कृतीचे जतन करणे आणि या संस्कृतीत सांगितलेली जीवन संस्कृती-विचारधन सर्वत्र पसरविणे हे एक प्रकारचे ईश्वरी कार्य आहे. या ईश्वरी कार्यात आमचाही खारीसारखा वाटा आम्ही देऊ शकलो यामुळे आमच्या मनांत एक आगळेच समाधान दाटून आले आहे. भारतीय संस्कृतीचा जास्तीत जास्त प्रसार होवो आणि त्यामुळे सर्व मानवी समाजाचे कल्याण होवो हीच आमची परमेश्वरचरणी प्रार्थना आहे.

श्याम कोपर्डेकर

इंद्रायणी साहित्य प्रकाशन
ओंकारेश्वर मंदिरासमोर,
२७३, शनिवार पेठ, पुणे ३०.
दूरध्वनी : ४४५८५९८/४४८ १८६७

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

श्रीदत्तमहाराज कवीश्वर

यांचे चरित्र

॥ कुलवृतांत :

योगी किंवा अवतारी पुरुष ज्या कुळांत जन्म घेतात त्या कुळाचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'ज्ञानेश्वरी'च्या सहाव्या अध्यायांत केलेले आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात "हे कुळ म्हणजे धर्माचे माहेरघरच असते. आध्यात्मिक संपत्तीचे कोठार या कुळांत तुडुंब भरलेले असते. आत्मज्ञानाचे अमाप ऐश्वर्य या कुळांत सतत नांदत असते. या कुळांतील स्त्रीपुरुष नीतीच्या मार्गानेच चालत असतात. सत्याने शुचिर्भूत केलेले बोलच या कुळांत बोलले जातात. या कुळांत सर्वकाही शास्त्रदृष्टीनच पाहिले जाते. वेद हेच या कुळाचे जागृत दैवत असते."

"विहित आचरण हाच या कुटुंबाचा व्यवसाय असतो. विवेक हाच या कुळाचा सल्ला देणारा मंत्री असतो. पतिव्रता ज्याप्रमाणे सदैव पतीचीच चिंता वहाते त्याचप्रमाणे या कुळांत सतत ईश्वरप्राप्तीचीच चिंता वाहिली जाते. या कुळांत ऋद्धी हीच गृहदेवता असते. पुण्याची कमाई व्हावी यासाठीच या कुळांत सर्वसुखांचा व्यापार चाललेला असतो. या कुळांतील पुरुष ब्रह्मनिष्ठ व वेदविद्यासंपन्न असतात. मोक्षरुपी फळांनी लगडलेल्या आत्मानात्मविवेकरुपी वृक्षाच्या पायथ्याशी ते वास्तव्य करतात आणि अद्वैत ब्रह्मसिद्धांताच्या सिंहासनावर बसून ते त्रैलोक्याचे राज्य करतात."

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेले हे वर्णन कवीश्वर कुळाला तंतोतंत लागू पडते. अनेक पिढ्या या कुळांत वैदिक प्राच्यविद्येची साधना चालू आहे. योगानुष्ठान सातत्याने होत आले आहे. रामायण, महाभारत, भागवत या ग्रंथांवर प्रभुत्त्व असलेले अनेक थोर सत्पुरुष या कुळांत अवतीर्ण झालेले आहेत. एकप्रकारे कवीश्वर कुळ म्हणजे ईश्वरकृपेच्या पुण्याईचे भांडारच आहे. अशा गंगेसारख्या पवित्र व शुचित्त्वाने ओतप्रोत भरलेल्या या घराण्यांत श्रीदत्तमहाराज कवीश्वर अवतीर्ण झाले आहेत. श्रीदत्तमहाराज यांचे मूळ घराणे नगरजवळच्या मांडवगडचे. मांडवगड ही मांडव्य ऋषींची तपोभूमी. तेथे

भगवान श्रीशंकरांचे स्वयंभू स्थान आहे. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या घराण्याचे मूळ आडनांव 'सप्तर्षी' असे होते. आजही नगरच्या दत्तमंदिराचे पुजारी 'सप्तर्षी' या नावाने ओळखले जातात आणि ते श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्याच कुळातील आहेत.

श्रीदत्तमहाराजांचे घराणे उपमन्यू गोत्राचे. 'शुल्क यजूशाखीय' माध्यंदिन ब्राह्मण घराणे. पुढे मुसलमान राजांच्या जाचाला कंटाळून या घराण्याने ठिकठिकाणी स्थलांतर केले. यापैकी श्रीदत्तमहाराजांची शाखा वैराटक्षेत्री म्हणजे हल्लीच्या वाई गावी गेली. वाई येथे अद्यापही या घराण्यातील काही भाऊबंद आहेत.

श्रीदत्तमहाराजांचे पणजोबा भालचंद्र शास्त्री सप्तर्षी यांना 'दाजीदीक्षित' असे म्हणत असत. ते रामायण, महाभारत आणि भागवत या ग्रंथावर प्रवचने करीत असत. मंत्रशास्त्रात ते निष्णात होते. त्यांना यज्ञकर्मे उत्तमरितीने करता येत असत. धर्मशास्त्रातही 'तत्त्वज्ञ पंडित' म्हणून त्यांचा लौकीक होता. ते प्रतिभासंपन्न कवी होते. संस्कृत आणि मराठी भाषेत त्यांनी आख्याने रचली आहेत.

श्रीदाजीदीक्षित वाई येथे दीर्घकाळ वास्तव्य करून होते. सातारच्या दरबारात धर्मशास्त्राच्या प्रश्नावर निर्णय घेतांना वाईच्या पंडितांना मद्दाम निमंत्रण दिले जात असे. श्रीदाजीदीक्षित हे धर्मशास्त्रात पारंगत असल्यामुळे त्यानाही सातारा येथील दरबाराचे निमंत्रण अनेकवेळा येत असे. एकदा सातारा दरबारात एक ग्रामीण वाद निर्माण झाला. या वादाचा निर्णय करण्यासाठी श्रीदाजीदीक्षित यांना निमंत्रण दिले. श्रीदाजीदीक्षित यांनी या निर्णयासंबंधीची सर्व माहिती घेतली, तेव्हा त्यांना असे दिसून आले की, राजेसाहेबांना हवा तो निर्णय देण्याचा प्रसंग श्रीदाजीदीक्षित यांच्यावर येण्याचा संभव आहे. हा निर्णय न्यायाला धरून होईल असे त्यांना वाटले नाही. न्यायाला धरून निर्णय द्यावा तर राजदरबाराचा रोष ओढवून घ्यावा लागतो. राजदरबाराला रूचणारा निर्णय द्यावा तर तो न्यायाला धरून होत नाही. हे संकट टाळण्यासाठी श्रीदाजीदीक्षित यांनी वाई सोडण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी नरसोबाच्या वाडीला जाऊन तेथेच ते कायम राहिले.

त्यांची धर्मनिष्ठा इतकी जागृत होती, सत्यावर त्यांची एवढी श्रद्धा होती की असत्य वागणे नको म्हणून त्यांनी वाई येथे चांगला चाललेला संसार मोडून नरसोबाची वाडी या ठिकाणी स्थलांतर केले.

नरसोबाच्या वाडीला श्रीदाजीदीक्षित नेहमी गुरुचरित्राची पारायणे करीत असत. श्रीदत्तात्रेयांची उपासना त्यांनी अखंड चालू ठेवली होती. रोज पाच श्लोक रचून श्रीदत्तप्रभूंच्या चरणी अर्पण करण्याचा त्यांचा नेम होता. त्यांच्या काव्यप्रतिभेची कीर्ती लवकरच सर्वत्र पसरली आणि त्यामुळे लोक त्यांना 'कवीश्वर' असे म्हणू लागले. पुढे हेच नांव प्रचलित झाले. गुरुचरित्रातील नंदीमामा कवीश्वरांचे कार्य श्रीदाजीदीक्षित यांच्याकडून होत होते हाही एक पूर्व ऋणानुबंध मानला पाहिजे. कवीश्वर हे नाव धारण करणारे श्रीदाजीदीक्षित यांच्यापासून 'सप्तर्षी' हे आडनांव विसरले गेले आणि सर्वत्र 'कवीश्वर' हे उपनाम प्रसिद्ध झाले.

संसारात काही अडचणी आल्या तेव्हा वाडीलाच रहावे का कोठे रहावे यासंबंधी कौल मागितला. तेव्हा त्यांना स्वप्नात श्रीनृसिंह-सरस्वती - स्वामीमहाराजांनी दर्शन दिले. स्वामींनी त्यांना आशीर्वाद दिला आणि असे सांगितले "येथेच रहा. तुला भाजी भाकरी नक्कीच मिळेल." हा आशीर्वाद लवकरच सुफल झाला. पंधरा दिवसांतच कागवाडच्या श्री.फणसळकरांनी त्यांना रहाण्यासाठी नरसोबाची वाडी येथे एक तीन मजली वाडा दान म्हणून दिला. तसेच कुरुंदवाडच्या संस्थानिकांनी त्यांना अनगोळ माधवपूर (वडगांव) व तिकोरा येथील जमिनी इनाम म्हणून दिल्या. या जमिनी अद्यापही कवीश्वर घराण्याकडेच आहेत. कुरुंदवाडच्या राजेसाहेब पटवर्धनांची त्यांच्यावर चांगलीच श्रद्धा होती. त्यांच्या आश्रयामुळे श्रीदाजीदीक्षितांचे पुढील जीवन अत्यंत सुखा-समाधानात गेले. श्रीदाजीदीक्षित यांनी रचलेले 'हरिश्चंद्र आख्यान', 'गालव चरित्र', 'सती चरित्र' प्रसिद्ध आहे. त्यांनी काही नाटकेही रचलेली आहेत आणि त्या नाटकांचे प्रयोगही त्या काळात झालले होते.

श्रीदाजीदीक्षित यांच्या घराण्याची कुलस्वामिनी माहूरची श्रीरेणुकामाता आहे. या कुळात श्रीगणपतीची उपासना आहे. श्रीदाजीदीक्षित श्रीदत्तात्रेय

आणि श्रीगणेश या दोन्ही दैवतांची उपासना अत्यंत निष्ठेने करीत असत. श्रीगणेश व श्रीदत्त एकच आहेत अशी त्यांची श्रद्धा होती. ब्रह्मेंद्रस्वामींचा सहवास व कृपाही श्रीदाजीदीक्षित यांना लाभली होती.

त्यांच्या पत्नी सौ. सगुणाबाई या धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. रोज श्रीदत्ताला१०८ प्रदक्षिणा घालून त्या माळ जपत असत. गरोदरपणीही या नियमात खंड पडू नये म्हणून त्या दक्ष असत. इ.स. १८३९ मध्ये म्हणजे शके १७६१ मध्ये अश्विन वद्य चतुर्थीला म्हणजे संकष्टी चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर सौ. सगुणाबाई प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला. या मुलाचे नांव 'वक्रतुंड' असे ठेवण्यात आले.

❊ श्रीवक्रतुंडमहाराज

श्रीवक्रतुंडमहाराजांचे चरित्र पाहिले तर असे दिसते की त्यांना लहानपासून देवाधर्माची आवड होती. बालवयातच ते देव मांडत, त्याला फुले वहात, त्याला नमस्कार करीत टाळ्या वाजवीत आणि आरतीसारखी काही काव्येही म्हणत असत. याच त्यांच्या 'बाललीला' होत्या. आठव्या वर्षी त्याची मुंज झाली. त्यानंतर त्यांनी संकष्टी चतुर्थीचे व्रत सुरु केले. तसेच वेद संहितेचे अध्ययन त्यांनी केले. त्यांची स्मरणशक्ती फारच चांगली होती. महाभारत व भागवत त्यांनी अनेक वेळा वाचलेले असल्यामुळे ते संदर्भादाखल सहजपणे त्यातली उदाहरणे सांगत. धर्मशास्त्राचा त्यांचा चांगलाच अभ्यास होता. अनेक धर्मग्रंथाचे त्यांनी अध्ययन केले होते. अल्पवयातच ते भागवताचे सप्ताह करू लागले. त्यांची अनेक प्रवचने होत असत. मोठेपणी ते संदर्भ सांगतांना चटकन सांगत 'धर्मसिंधुच्या पोथीतील तिसऱ्या परिच्छेदात चौथ्या पानावर हा विषय आला आहे.'

श्रीवक्रतुंडमहाराजांना वक्तृत्वाची ईश्वरदत्त देणगी होती. त्यांची प्रवचने अत्यंत लोकप्रिय झालेली होती. चातुर्मासात त्यांच्या प्रवचनाला चार-चार हजार श्रोते जमत आणि मंत्रमुग्ध अवस्थेत प्रवचने ऐकत रहात. त्यांच्या डोक्यात विषय नेहमी तयार असत. जीभेवर जणू सरस्वतीच होती. त्यामुळे प्रवचनाची तयारी करण्याची गरज त्यांना कधीच पडली नाही. अनेक वेळा प्रवचनांच्या वेळी ते श्रोत्यांना हसून प्रश्न करीत "सज्जनहो, आज कोणता

विषय श्रवण करण्याची आपली इच्छा आहे?'' यावर कोणी विषय सांगितला तर त्या विषयावर दोन-तीन तासापर्यंत उद्‌बोधक आणि रसाळ प्रवचन ते करु शकत असत. श्रीवक्रतुंडमहाराज पुराणेही वाचत असत. श्रीस्वामींच्या सायंकाळच्या प्रदोषाच्या पूजेच्यावेळी स्नानापासून पोषाख करेपर्यंत स्वारी पालखीत बसण्यास निघेपर्यंत श्रीवक्रतुंडमहाराज नित्यनियमाने पुराण वाचत असत.

श्रीवक्रतुंडमहाराज श्रीदत्तात्रेयांच्या भोगमूर्तीजवळ ध्यान-धारणा करीत असत आणि अनेक धर्मग्रंथही वाचत असत. त्यावेळी वाडीला 'गोविंदस्वामी' नावाचे अधिकारी संत होते. त्यांनी श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांना मंत्रदीक्षा दिली होती. या गोविंदस्वामींची सेवा श्रीवक्रतुंडमहाराज अत्यंत निष्ठेने करत असत.

श्रीवक्रतुंडमहाराजांना संसारात एक मोठे शल्य होते. त्यांना होणारी मुले जगत नव्हती. त्यांना अनेक अपत्ये झाली. पण दोन मुलींशिवाय कोणीही जगले नाही. त्यामुळे विरक्त होऊन ते श्रीगोविंदस्वामींच्याकडे गेले आणि त्यांनी कळकळीने प्रार्थना केली, 'आता संसार पुरे झाला. मला संसाराचा वीट आला आहे. मला संन्यास दीक्षा द्या.'

शिष्याचे निर्धाराचे शब्द ऐकून स्वामींनी डोळे मोठे केले आणि समजूत घालण्याच्या स्वरात म्हणाले, "अरे, तुझा संसार अजून व्हायचा आहे. मी सांगतो, तुझी संतती यापुढे वाचेल. तुला अलौकिक पुत्र होणार आहे. तुझा विश्वास बसावा म्हणून हे घे, मी तुला आत्ताच बाळ देतो." असे म्हणून स्वामींनी स्वतःजवळची श्रीदत्तमूर्ती श्रीवक्रतुंडमहाराजांच्या हातात दिली.

श्रीवक्रतुंडमहाराजांना ही ईश्वरी देणगीच वाटली. त्यांनी त्या बाळ दत्तमूर्तीला बालक समजून त्याचे बारसे केले व 'दत्तूबाळ' असे नांव ठेवले. या बालकासाठी कडी-तोडी, अलंकार, पाळणा, छत्रचामर हे सर्व सोपस्कार त्यांनी केले. तसेच या दत्तूबाळाचा व्रतबंधही मोठ्या थाटाने साजरा केला. ते जेव्हा परगांवी जात असत, तेव्हा बरोबर दत्तूबाळाला घेऊन जात असत. कुणाकडे जेवायला गेल्यानंतर 'किती पाने मांडायची' असे विचारले तर श्रीवक्रतुंडमहाराज दत्तूबाळाला धरून आकडा सांगत. भोजनासाठी पाने

मांडल्यावर एक पान रिकामे राहिले म्हणजे यजमानांना उलगडा होई की पाहुणे मंडळीत दत्तूबाळाचाही समावेश केला आहे.

श्रीवक्रतुंडमहाराज श्रीदत्तूबाळाला आपला चालता बोलता जिवंत मुलगाच समजत असत. ही आत्मौपम्य बुद्धी खरोखरीच अलौकीक होती.

श्रीवक्रतुंडमहाराजांचे बंधू श्रीरामशास्त्री वेगळे रहात असत. त्यांनी एकदा वाडीला एक मोठा यज्ञ केला. परंतु या यज्ञासाठी त्यांना जवळजवळ वीस हजार रुपये कर्ज झाले. हे कर्ज फेडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु हे कर्ज न फिटताच श्रीरामशास्त्री निधन पावले. त्यांचे चिरंजीव श्रीगणेशशास्त्री यांच्या एकट्याच्या हातून हे कर्ज फिटणे शक्य नव्हते. वास्तविक, श्रीवक्रतुंडमहाराजांवर या कर्जाची कोणतीही जबाबदारी नव्हती. परंतु आपल्या पुतण्याला सावकार त्रास देत आहेत असे पाहून त्यांनी आपणहून या प्रकारात लक्ष घातले. ते स्वतः सावकारांच्या घरी गेले आणि त्यांनी सांगितले की 'माझ्या पुतण्याला त्रास देऊ नका. मी स्वतः या कर्जाची जबाबदारी घेतो. मी त्याला जामीन रहातो. मी हे कर्ज लवकरच फेडतो.

त्यानंतर श्रीवक्रतुंडमहाराज वेगवेगळ्या गावांना प्रवचने करत तीन वर्षे फिरत होते. या तीन वर्षात त्यांनी हे सर्व कर्ज पूर्णपणे फेडून टाकले. अशा पद्धतीने त्यांनी थोरल्या भावाचे ऋण आणि कुलाचे ऋण मोठ्या निर्धाराने फेडले. ही गोष्ट खरोखरीच अलौकीकच मानली पाहिजे.

एकदा प्रवचनानिमित्त बैलगाडीतून जात असतांना जंगलामध्ये काही लमाण त्यांच्या अंगावर धावून आले. लाठ्या काठ्या घेऊन लुटण्याच्या उद्देशाने ते धावत आले होते. परंतु श्रीवक्रतुंडमहाराजांच्या तेजस्वी व दिव्य मूर्तीचे दर्शन होताच त्यांची दृष्टबुद्धी नाहीशी झाली. त्यांनी श्रीवक्रतुंडमहाराजांना लवून नमस्कार केला आणि त्यांना सुरक्षितपणे पुढच्या प्रवासाला अनुज्ञा दिली.

श्रीवक्रतुंडमहाराजांना वाडीला ज्या थोर संताचे मार्गदर्शन व कृपाप्रसाद मिळाला त्यात श्रीमौनीस्वामी प्रमुख होते. श्रीवक्रतुंडमहाराज श्रीमौनीस्वामींची शिष्याप्रमाणे सेवा करीत. श्रीमौनीस्वामींना महाभारत

आवडे म्हणून मद्दाम श्रीमौनीस्वामींच्या मठात जाऊन त्यांच्यापुढे श्रीवक्रतुंडमहाराज महाभारत वाचत असत. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज श्रीमौनीस्वामींना गुरुस्थानी मानत असत.

श्रीमौनीस्वामी यांची बालवृत्ती होती. त्यांना लहान मुलांचा अत्यंत लळा असे. श्रीटेंबेस्वामींवर आणि श्रीकवीश्वर घराण्यावर श्रीमौनीस्वामींचे विशेष प्रेम असे.

या श्रीमौनीस्वामींच्या आशीर्वादानेच श्रीवक्रतुंड-महाराजांचे वडीलबंधू श्रीरामशास्त्री यांनी इ.स. १८९१ मध्ये साग्निचित ज्योतिष्होम यागाचा महायज्ञ केला. हा यज्ञ अत्यंत थाटामध्ये आणि मोठा प्रमाणावर साजरा करण्यात आला होता. श्रीवासुदेवानंद-सरस्वती- स्वामीमहाराज या यज्ञाला उपस्थित होते. श्रीमौनीस्वामी आणि श्रीगोविंदस्वामी हे दोघेही या यज्ञाला उपस्थित होते. योगायोग असा की या यज्ञाच्या ब्रह्मवृंदामध्ये कुडुत्रीचे श्रीशंकरशास्त्री गुळवणी उपस्थित होते. त्यांच्यामुळे मातोश्री उमाबाई व बालश्री वामन (श्रीगुळवणीमहाराज या नावाने प्रसिद्ध असलेले गुरूमहाराज) हा सोहळा पहाण्यास येऊन राहिले होते. कवीश्वर घराण्याचा व गुळवणी घराण्याचा संबंध तेव्हापासूनच आलेला आहे. या यज्ञाच्यावेळी श्रीवक्रतुंड-महाराजांचे चिरंजीव श्रीधुंडिराज यांचे पाच-सहा वर्षाचे वय होते. ते एका शिष्याच्या कडेवर बसून हा यज्ञ सोहळा पहात होते.

श्रीमौनीस्वामी मार्गशीर्ष शुद्ध नवमीला वाडीला समाधीस्थ झाले. त्यावेळी श्रीवक्रतुंडमहाराज परगावी गेलेले होते. परंतु त्यांना अंतर्ज्ञानाने ही वार्ता तेथेच ज्ञात झाली. त्यांनी अत्यंत दुःखी अंतःकरणाने आपल्या जवळच्या सर्व मंडळींना जवळ बोलावले आणि ते दुःखी अंतःकरणाने म्हणाले, "माझ्याप्रमाणे वाडीकडे तोंड करुन नमस्कार करा व देवाचे नाव घ्या. आपले मौनीस्वामी शांत झाले आहेत."

श्रीवक्रतुंडमहाराज पुराण उत्तम सांगत व रसाळ प्रवचने करीत. महाभारताचा त्यांचा सखोल अभ्यास असल्यामुळे त्यांना 'भारती अण्णा' असेही म्हणत असत. देऊळगावराजा येथे अनेकवेळा ते प्रवचनास जात असत. त्या भागातील अनेक लोक श्रीवक्रतुंड-महाराजांना खूपच मानीत

असत. पुढे शिष्याच्या आणि स्नेह्यांच्या आग्रहावरुन ते देऊळगावराजा येथे वर्षातून काही दिवस येऊन राहू लागले. श्रीवक्रतुंडमहाराज यांच्या कनिष्ठ भक्त श्रीमती कुसाताई सावजी यांनी त्यांना शेती व घर दान दिले.

श्रीवक्रतुंड-महाराजांना देऊळगांवराजा येथे खूपच मान होता. नरसोबाच्या वाडीचे म्हणून त्यांना वाडीकर कवीश्वर असेही म्हणत असत. इ.स. १९०७ मध्ये श्रीवक्रतुंड-महाराजांचे प्लेगमुळे निधन झाले. आपला आजार वाढतो आहे हे पाहून गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी त्यांनी पत्नीला सांगितले, "उद्या चतुर्थी आहे. श्रीगणेशाची मूर्ती माझ्या बिछान्यापाशी आणून ठेवा." त्याप्रमाणे त्या माऊलीने केले. तेव्हापासून श्रीवक्रतुंडमहाराजांनी अखंड नामस्मरण सुरू केले ते शेवटपर्यंत. दुसऱ्या दिवशी श्रीगणेशचतुर्थीच्या शुभमुहूर्तावर सकाळी आठच्या सुमाराला श्रीवक्रतुंडमहाराज श्रीगणेशचरणी लीन झाले. त्यावेळी त्यांचे वय ६८ होते.

श्रीवक्रतुंड-महाराजांच्या अनेक अपत्यांपैकी दोनच मुली जीवंत राहिल्या हे मागेच सांगितले आहे. त्यांच्या जीवनात प्रापंचिक स्वास्थ्य आणि सौख्य अभावानेच दिसते. त्यांनी स्वतः कर्ज केले नाही, तरी बंधूचे कर्ज शिरावर घेतल्यामुळे अनेक वर्षे त्यांना कर्जफेडीसाठी खूपच कष्ट करावे लागले याचा विचार करता श्रीवक्रतुंड-महाराजांचे जीवन खरोखरीच अलौकीक आहे असे दिसते. मोठ्या पारमार्थिक अधिकाराचे ते थोर सत्पुरुष होते.

* श्रीधुंडिराजमहाराज

श्रीधुंडिराजमहाराज हे गोविंदस्वामींसारख्या सत्पुरुषांच्या आशीर्वादाने आणि श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने प्राप्त झालेले पुत्ररत्न. श्रीवक्रतुंडमहाराज यांची श्रीगणेश उपासना या पुत्र प्रसादाने फळाला आली. या मुलाचे नांव त्यांनी 'धुंडिराज' असे ठेवले. श्रीगोविंदस्वामींनी प्रसाद म्हणून दिलेली श्रीदत्तमूर्ती या पुत्र प्रसादाने घरात प्रत्यक्ष वावरू लागली अशीच श्रीवक्रतुंडमहाराज यांची श्रद्धा होती. त्यामुळे मुलाचे नांव 'धुंडिराज' असूनही ते 'दत्तूबाळ' म्हणूनच हाक मारीत.

श्रीवक्रतुंड-महाराजांच्या धर्मपत्नी सौ. सावित्रीबाई याही मोठ्या धर्मनिष्ठ होत्या. श्रीदत्ताला प्रदक्षिणा घालण्याचा नियम त्यांनी आयुष्यभर पाळला. श्रीधुंडिराज-महाराजांची मुंज ८ व्या वर्षी देवासमोरच झाली.

श्रीधुंडिराज-महाराजांनी प्राथमिक शिक्षण आपल्या वडिलांकडून घेतले. त्यांचे शालेय शिक्षण वाडीचे श्री.दामोदरपंत गोखले यांच्या वडिलांकडे झाले. पुढे वाडीलाच श्री.कृष्णशास्त्री वष्ट या विद्वान गुरुजींच्या संस्कृत पाठशाळेत त्यांनी वैदिक संहितेचे १४ अध्याय, षोडश संस्कार, काव्य अलंकार, छंद इत्यादींचा अभ्यास केला. इंदूर येथेही त्यांनी काही काळ अभ्यास केला. इंदूरला भारतीय तत्त्वज्ञानाचा त्यांचा विशेष अभ्यास झाला. न्यायशास्त्राचाही त्यांनी इंदूरला अभ्यास केला. श्रीनारायण शास्त्री जेरे हे इंदूरला त्यांचे सहाध्यायी होते. श्रीधुंडिराजमहाराज यांनी सांगली येथेही न्याय व व्याकरण यांचा अभ्यास केला. तसेच श्री.व्यंकटरमणाचार्य यांच्यासारख्या विद्वान व अधिकारी प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सिद्धांत कौमुदी, मनोरमा, मुक्तावली, व्याकरण व न्यायशास्त्र यांवरील अनेक ग्रंथांचा अभ्यास पूर्ण केला.

पुढे श्रीवक्रतुंडमहाराज यांनी आज्ञा केल्यामुळे श्रीधुंडिराजमहाराजांनी पुराण सांगण्यास प्रारंभ केला.

श्रीधुंडिराज-महाराजांनी अथर्वशीर्षाची व गुरूचरित्राची अनेक पारायणे केलो. त्यांच्या पत्नी सौ.सरस्वतीबाई यांनीही देवीची खूप उपासना केलो. श्रीधुंडिराज-महाराजांना स्वप्नात इष्ट देवतेचे अनेक वेळा दर्शन होत असे आणि त्यांना मार्गदर्शन मिळत असे. ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर-महाराज व श्रीरंगनाथमहाराज यांच्या दर्शनाचा लाभही त्यांना झाला होता. श्रीटेंबेस्वामींचा तर श्रीवक्रतुंड-महाराजांवर विशेष लोभ होता. श्रीटेंबेस्वामींचा मुक्काम वर्षातून तीन-चार महिने वाडीला असे. या काळात श्रीधुंडिराजमहाराज त्यांच्या सान्निध्यात जास्तीत जास्त राहण्याचा प्रयत्न करीत असत. श्रीटेंबेस्वामी यांच्या आज्ञेनुसार श्रीधुंडिराज-महाराजांनी काही काळ एक संस्कृत पाठशाळाही चालविली होती. श्रीटेंबेस्वामी यांच्या आज्ञेनुसार त्यांनी पुरःश्चरणयुक्त जपही केला होता.

श्रीधुंडिराजमहाराजांचा विवाह इ.स. १९०४ मध्ये शिरहट्टी येथील श्री.गोपाळराव हणमरकर यांची कन्या गंगू यांच्याशी झाला. त्यांचेच नांव सरस्वती ठेवण्यात आले. या सौ.सरस्वतीबाई आपल्या उदार चरित्रामुळे

सौ. आईसाहेब म्हणून नावलौकिकाला आल्या. त्या मोठा देवभक्त होत्या, पतीनिष्ठ होत्या आणि थोर अंतःकरणाच्या होत्या. कवीश्वर घराण्याच्या नावलौकीकात त्यांनी भरच घातली होती.

श्रीधुंडिराज-महाराजांचा विवाह होऊन पुष्कळ वर्षे संतती होत नव्हती. त्यामुळे त्यांच्या पत्नी कष्टी असत. या संदर्भात त्यांनी श्रीटेंबेस्वामी यांना पत्र लिहिले. त्याला स्वामींचे सविस्तर उत्तर आले. त्यात धर्मसिंधूत दिलेल्या मंत्राचा जप, विधी विधान व होम हवन करण्यास त्यांनी सांगितले. हे सर्व यथास्थित केल्यावर श्रीधुंडिराजमहाराज यांना संतती लाभली. श्रीधुंडिराज-महाराजांची श्रीटेंबेस्वामीवर खूपच श्रद्धा होती.

इ.स. १९१० मध्ये श्रीटेंबेस्वामींनी वाडीहून कोणालाही न सांगता श्रींचे दर्शन घेऊन दुसरीकडे जाण्याचा निर्णय घेतला. श्रीस्वामीमहाराज कोणाला न सांगता निघून गेल्यामुळे वाडीकर मंडळींना फार वाईट वाटले. श्रीधुंडिराज-महाराजांना तर फारच वाईट वाटले. स्वामींच्या दर्शनाची तळमळ त्यांना लागली होती. स्वामी दक्षिणेकडे प्रवास करतील या अपेक्षेने ते वाडीवरुन एकटेच निघाले आणि शोध घेत घेत धारवाडला आले. योगायोग असा की श्रीधुंडिराजमहाराज मुक्कामाला श्रीदत्तमंदिरात आले आणि त्याच मंदिरात श्रीटेंबेस्वामींचा मुक्काम होता. इतक्या सहजपणे भेट झाल्यामुळे श्रीधुंडिराज-महाराजांना खूपच आनंद झाला. यावेळी श्रीधुंडिराजमहाराज यांच्या मनात आले की उद्या आपण आपल्या हातांनी स्वयंपाक करून श्रीस्वामींना भिक्षा घालावी. हा विचार ते स्वामींच्या पुढे मांडणार, इतक्यात स्वामी म्हणाले, 'शास्त्रीबुवा येथे आलाच आहात तर उद्या तुमच्या हातची भिक्षा आम्हा वाढा.' स्वामींनी आपल्या मनांतील बोलून दाखविल्यामुळे श्रीधुंडिराज-महाराजांना खूपच आनंद झाला. दुसऱ्या दिवशी श्रीधुंडिराज-महाराजांनी स्वहस्ते स्वयंपाक करून त्यांना भिक्षा घातली आणि आपणही त्या भिक्षेचा प्रसाद घेतला.येथून स्वामी पुढे दक्षिणेकडे निघून गेले.

इ.स. १९१० हे श्रीधुंडिराजमहाराजांच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचे वर्ष मानावे लागेल. श्रीटेंबेस्वामींच्या आज्ञेने त्यांनी पुत्र प्राप्तीसाठी विधी विधानपूर्वक होम हवन व जपाचे अनुष्ठान केले. त्याशिवाय धारवाड

येथे श्रीटेंबेस्वामींची भेटही झाली आणि भिक्षेचा अपूर्व प्रसंग घडला. श्रीदत्त अवतार जन्माच्या कथेमध्येही भिक्षेचा आणि प्रत्यक्ष पुत्र प्राप्त झाले अशी कथा आहे. येथेही भिक्षेचा अपूर्व प्रकार घडला. ज्याच्या घरात जन्माला यायचे त्या पित्याकडून भिक्षा मागून घेऊन श्रीदत्तप्रभू श्रीस्वामींच्या रूपाने तृप्त झाले व मनोकामना तृप्त करणारा प्रसाद (पुत्र)त्यांनी दिला. माघ वद्य षष्ठीला श्रीधुंडिराज-महाजांना मुलगा झाला. दत्तकृपेने मुलगा झाला म्हणून श्रीधुंडिराज-महाराजांनी 'दत्तात्रय' असे नाव ठेवले.

श्रीधुंडिराज-महाराजांच्या पत्नी सौ.सरस्वतीबाई या पतीकार्यामध्ये पूर्ण समरस झालेल्या होत्या. सर्व लोक त्यांना सौ.आईसाहेब म्हणून ओळखत व तसा मान देत. त्यांचे धार्मिक आचरण व पूर्जाअर्चा अखंड चालू असे. वाडीला समाधीला प्रदक्षिणा घालण्याचा आपल्या सासूबाईंचा नियम त्यांनीही आयुष्यभर अखंड चालू ठेवला. सूर्योदयापूर्वी स्नान करून १०८ वेळा प्रदक्षिणा त्या घालत असत. मुले त्रास देऊ लागली तर मुलांना सौ.आईसाहेब श्रीदीक्षितस्वामींच्याकडे सोपवत आणि आपल्या प्रदक्षिणा पुऱ्या करत असत. शिवलीलामृत, व्यंकटेश स्तोत्र व अनेक पोथ्यांचे पारायण सौ. आईसाहेब नियमितपणे करत असत. त्यांनी तुलसी विवाहाचा सोहळा सोळा दिवस यथाशास्त्र, यथाविधी समारंभपूर्वक केला होता.

त्या अत्यंत साध्या स्वभावाच्या होत्या. आतिथ्यसेवा त्यांनी फार महत्त्वाची मानली होती. कोणीही भक्त सहकुटुंब आला तरी त्या स्वतः स्वयंपाक करून अतिथीला वाढत असत. पुढे वय झाले तरीही त्यांनी आपला नियम सोडला नाही.भक्ताच्या स्त्रियांनाही त्या काम करू देत नसत. अनेक नियम व व्रते त्यांनी आयुष्यभर पाळली. त्यांच्या नित्याच्या नियमामध्ये श्रीगुरूचरित्र व श्रीगणेशमर्ती मांडून त्याला प्रदक्षिणा घालणे हा एक नेम होता. प्रवासातसुद्धा त्या श्रीगरूरुचरित्र व श्रीगणेशमूर्ती मांडून प्रदक्षिणा घालत असत. पहाटे स्नान करणे, दर शनिवारी न्हाणे, पौर्णिमेला मंगलस्नान करणे असे कितीतरी नियम त्यांनी आयुष्यभर निष्ठेने पाळले. कोणाही भक्ताची अडचण, आजारपण किंवा दुर्घटना कळली तर त्या भक्ताच्या घरी जाऊन भेटून येत आणि मायेने, प्रेमाने त्याचा समाचार घेत. वयोमानाने पुढे

त्यांचे सांधे व पाय दुखू लागले. परंतु त्यांनी हा नियम सोडला नाही. अनेक वेळा कशाबशा चालत जाऊन जिना चढून त्या भक्ताना भेटून आल्या असेही अनेक वेळा घडले आहे. अशा समाचाराला त्या मुद्दाम परगावीही जात असत. भक्तांवर ईश्वर जसे प्रेम करतो, तसेच प्रेम त्या भक्तांवर करत होत्या असे दिसते. श्रीधुंडिराज-महाराजांप्रमाणे त्यांच्यावरही ईश्वरी अनुग्रह झाला होता आणि त्यांच्यामध्येही दैवीशक्ती जागृत झालेली होती.

श्रीधुंडिराज-महाराजांच्या ८० व्या वर्षीच्या सहस्त्रचंद्र दर्शन शांतीच्यावेळी त्यांनी १०८ लुगडी व खण सुहासिनी व कुमारीका यांना पूजा करून अर्पण केले. अन्नदानही खूप झाले. अन्नदानाच्या सोहळ्यात अन्न कसे पुरेल ही व्यवस्थापकांना चिंता होती. तसे बोलणे ऐकताच सौ.आईसाहेब श्रीदत्तमहाराजांना म्हणाल्या,'दत्ता, भंडारच्या प्रत्येक पातेल्यात या अक्षता टाक बरं. कसं पुरत नाही अन्न ते मी पहाते !'आश्चर्य असे की पंचवीस-पंचवीस हजाराच्या अनेक पंक्ती झाल्या तरीही अन्नाचा तुटवडा पडला नाही. ईश्वराच्या शक्तीचे हे दर्शनच आहे असे म्हणावेसे वाटते. देऊळगावराजामध्ये असे अनेक महोत्सव त्यांनी साजरे केले. त्यांच्या प्रेरणेने महोत्सवाच्या वेळी सर्व रस्ते झाडले जात आणि त्यावर सडासंमार्जन होत असे. पंक्तीच्या पंक्ती उठत असत. देवाचे उत्सव इतरत्र अशा ऐश्वर्याने क्वचितच साजरे होत असतात.

श्रीधुंडिराजमहाराज हे आत्मज्ञानी होते आणि साक्षात्कारीही होते. त्यांच्याजवळ पांडित्य असूनही ते साधेपणाने रहात. भक्तांवर त्यांचे खूपच प्रेम होते. प्रसन्न चित्ताने ते भक्तांचा समाचार घेत, उपाय सांगत व मार्गदर्शन करीत. त्रागा, चिडणे, रागावणे हे कधीही त्यांच्या वागण्यात आढळले नाही. गर्व, ताठा यांचा स्पर्शही त्यांना कधी झाला नाही. अनेक नियम त्यांनी आयुष्यभर पाळले. स्वावलंबनाच्या बाबतीत त्यांचा विशेष कटाक्ष होता. आपली सर्व कामे ते स्वतःच करण्याचा प्रयत्न करीत. दिलेला शब्द पाळण्याबद्दलही ते अतिशय दक्ष होते. विनम्रपणा आणि लीनता हा त्यांचा सहज गुण होता. त्यांच्या कृपाप्रसादाने काम झाले म्हणजे भक्त कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येत असत. त्यावेळी श्रीधुंडिराजमहाराज मनापासून म्हणायचे,

'अहो, मी काय केले. मी तुमच्यासारखाच आहे. ही ईश्वराची कृपा आहे.' त्यांच्या विद्वतेची कोणी प्रशंसा करु लागले की श्रीधुंडिराजमहाराज चटकन म्हणत, 'अहो, मला काय येतंय? मी कोण? आमचा दत्तू खरा पंडित आहे.'

श्रीधुंडिराज-महाराजांनी प्रपंच अनासक्त वृत्तीने परंतु चोख सांभाळला. श्रीधुंडिराजमहाराज आणि थोरल्या आईसाहेब या दांपत्याच्या सहजीवनांत एकंदर सहा अपत्यांचे पदार्पण झाले. त्यांना पाच पुत्र व एक कन्या झाली. प्रपंच व परमार्थ यांची उत्तम सांगड त्यांच्या जीवनांत दिसून येते. त्यांना श्रीशंकराचार्यांनी 'भक्तरत्न' ही पदवी दिली होती. त्यांच्या सहस्त्रचंद्र शांतीच्यावेळी गणेश शतचंडी, श्रीदत्तयाग, श्रीभागवत स्वाहाकार, दिगंबर नामसप्ताह असे अनेक विधी झाले. त्याप्रसंगी श्रीशृंगेरी मठाचे श्रीशंकराचार्य, योगीराज श्रीगुळवणीमहाराज, श्री.आत्मारामशास्त्री जेरे वगैरे अनेक संत मंडळी आली होती. त्यांची रौद्रीशांती त्यांच्या वयाच्या ८५ व्या वर्षी भक्तांनी थाटाने साजरी केली. वयाच्या ९० व्या वर्षीही त्यांची सौरशांती भक्तांनी उत्तमरितीने केली. त्यांचे शिष्य मराठवाड्यात अनेक ठिकाणी पसरलेले आहेत.

वयाच्या ९२ व्या वर्षी इ.स. १९७८ मध्ये श्रीधुंडिराजमहाराज दत्तचरणी लीन झाले. त्यांचे एक मोठे मंदिर देऊळगांवराजा येथे त्यांच्या शिष्याने बांधलेले आहे. तळघरात श्रीधुंडिराजमहाराज यांचा सुंदर संगमरवरी पुतळा आहे आणि ३००-४०० मंडळी बसतील असे दालन तळघरात आहे. वर सभा मंडपात श्रीदत्तमूर्ती आहे आणि एक हजार माणसे बसू शकतील असा सभामंडप आहे. भोवतालचा परिसरही खूप मोठा आहे. या मंदिरात श्रीधुंडिराज-महाराजांच्या पुण्यतिथीला ४० ते ५० हजार लोकांना अन्नदान केले जाते. ही प्रथा अद्यापही तशीच चालू आहे.

❊ श्रीदत्तमहाराज

श्रीटेंबेस्वामींनी श्रीधुंडिराज महाराज यांच्याकडून धर्मसिंधूत दिलेल्या मंत्रांचा जपविधी विधानपूर्वक आणि होम-हवनानी युक्त यथासांग करुन घेतला आहे.आणि त्याच वर्षी केवळ इश्वरकृपेचा प्रसाद म्हणून श्रीदत्तमहाराज अवतीर्ण झाल आहेत. श्रीटेंबेस्वामींच्या संकल्प शक्तीचेच

फळ म्हणून श्रीदत्तमहाराजांच्या अवतीण होण्याच्या घटनेकडे पहायला पाहिजे. श्रीदत्तमहाराज वाडीला बुधवार दिनांक २ मार्च, १९१० म्हणजे माघ वद्य षष्ठी शके १८३१ या दिवशी सूर्योदय समयी सकाळी ६ वाजून २० मिनिटांनी अवतीर्ण झाले. ईश्वरकृपेने प्राप्त झालेला मुलगा म्हणून वडिलांनी 'दत्तात्रय' असे नांव ठेवले.

श्रीदत्तमहाराज अवतीर्ण झाल्यावर थोड्याच दिवसांनी श्रीटेंबेस्वामी वाडीला आले. श्रीधुंडिराजमहाराज यांचेकडेस्वामी आले असता त्यांच्या मांडीवर या दत्तबाळाला ठेवले, तेव्हा श्रीटेंबेस्वामी बाळाकडे पहात म्हणाले, 'काय बुबा, राहिलेले कार्य पुरे करण्यासाठी नातू म्हणून आलात नां? आपण पांढऱ्या वेषात आणि आम्ही भगव्या वेषात एवढाच वरवरचा फरक आहे. बाकी काय?' असे म्हणून श्रीस्वामी महाराज प्रसन्नपणे हसले. बाळाला प्रेमाने कुरवाळले, सर्व अंगावरून हात फिरवला, गालावर टिचक्या मारून गंभीर असलेल्या बाळाला हसते केले. एकाग्रतेने त्या दत्तबाळाशी समरस होऊन स्वामींचे एवढे बोलणे झाल्यावर, स्वामींनी मान वर केली. त्याचवेळी आतून येणाऱ्या बाळाच्या मात्या-पित्याकडे पाहून स्वामी म्हणाले,' हे आजोबा आले आहेत हं ! यांचे पुन्हा नांव वक्रतुंड म्हणून ठेवा.' मग दोघांनी स्वामींना नमस्कार केला, आईने बाळाला घेतले आणि श्रीस्वामीमहाराज निघून गेले.

श्रीस्वामींच्या इच्छेप्रमाणे या दत्तात्रेयाचा पुन्हा नामकरण विधी झाला आणि 'वक्रतुंड' हे नाव ठेवले. हे वक्रतुंड नाव मौंजीबंधनाच्या प्रसंगी आणि विवाहप्रसंगी निमंत्रण पत्रिकांमध्ये छापलेले दिसते.

*** विद्ययाऽमृतमश्नुते:**

श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्री - सौ.सरस्वती आईसाहेब यांनी सांगितलेली एक बोलकी आठवण - सर्वांच्याच हृदयात सात्त्विक आनंदाचे निधानस्वरूप अशी.

सौ.सरस्वती आईसाहेब यांचे पहिले अपत्य श्रीदत्तमहाराज या रांगत्या बाळाचा पहिला वाढदिवस मोठ्या प्रमाणात नरसोबावाडी येथे साजरा झाला. गावातील अनेक सुवासिनी, प्रतिष्ठित पुरुष व बाल-बालिका या पहिल्या

वाढदिवसास हजर होत्या. सुंदर आरास तयार करण्यात आली होती. करंज्या, लाडू, अनारसे असे घरी केलेले फराळाचे पदार्थ, रंगीबेरंगी खेळणी, अनेक फळे, वाडीचे खास पेढे, कवठाची बर्फी, साखर फुटाणे वगैरे आणि ..... एका काहीशा अवघड जागी 'गीतेचे छोटे पुस्तक' ..... अशी ती मनमोहक आरास होती. श्रीदत्तमहाराजांना पहिल्या वाढदिवसासाठी मुद्दाम शिवलेले रंगीत कपडे घातले होते. सोन्याचे डूल, साखळी, वाळे वगैरे अलंकारही सौ.आईसाहेबांनी हौसेने त्यांच्या अंगावर घातले होते. दृष्ट लागू नये म्हणून काजळाची तीटही लावली होती. श्रीदत्तमहाराज नेहमीच हसतमुख असत. आज तर ती बालमूर्ती विशेष आनंदात होती. कारण ही सर्व मंडळी आपले कौतुक करण्यासाठी येथे जमली आहेत हे त्यांना क्षणोक्षणी जाणवत होते.

सौ.सरस्वती आईसाहेबांनी आपल्या हसतमुखत रांगत्या बाळाला त्या सुंदर आराशीपुढे ठेवले. श्रीदत्तमहाराजांची ती एक वर्षाची बालमूर्ती हसत हसत, रांगत रांगत त्या आराशीकडे बघू लागली. मधुर आवाज करीत ती त्या दिवशीची उत्सवमूर्ती आराशीकडे पुढेपुढे रांगत सरकू लागली. सर्वांच्या नजरा कुतूहलाने त्या रांगत्या बाळावर खिळून राहिल्या.

..... ''ते बघा आता ते बाळ पेढा घेणार'' .... ''नाही हो, ते केळं घेणार बघा'' ... ''ते खेळणीच घेणार'' .... ''ते बर्फीचा तुकडा घेणार'' अशी सुवासिनींमध्ये कुजबूज सुरू होती. अशी सर्वांची उत्सुकता वाढीस लागलेली असतानाच कवीश्वर-घराण्यातील ती मनमोहक बालमूर्ती आराशीपर्यंत पोचली. आपल्या चिमुकल्या हातांनी आरास विस्कटली. फराळाचे पदार्थ उडवून लावले, मिठाई पालथी घातली, रंगीबेरंगी खेळणी इकडे तिकडे चिमुकल्या हातांनी सरकवून दिली. ''हे काय? विचित्रच दिसतेय हे बाळ ! खाऊ नको, रंगीबेरंगी खेळणी नको, फराळाचे पदार्थ नकोत, पेढे बर्फीही नको. मग या बाळाला हवे तरी काय? '' ''रडत तर मुळीच नाही, उलट श्रीकृष्णाच्या बालमूर्तीसारखं मधुर हासतंय.

अशी सर्वांची उत्सुकता वाढीस लागलेली असतानाच, कवीश्वर-घराण्यातील त्या मनमोहक रांगत्या बाळाने आपल्या चिमुकल्या सुंदर हातात काय पकडले? तर त्या आराशीत एका अवघड जागी ठेवलेले, फारसे कोणाच्या

लक्षातही न येईल अशा जागी ठेवलेले गीतेचे छोटे पुस्तक ! एकदम सर्वांनी आनंदाने जल्लोष केला. सौ.आईसाहेबांना तर आपल्या बाळाला कोठे ठेवू वा कोठे ठेवू नको असे झाले.

एक शास्त्रीबुवा म्हणाले, 'भगवान श्रीकृष्णांनी तेव्हा गीता सांगितली. आता आमच्या कवीश्वर घराण्यातील हा बाल श्रीकृष्णही पुन्हा ती गीता सर्वांना सांगणार आहे का? त्यासाठी ते अवतीर्ण झाले आहेत का? नाहीतरी कवीश्वर घराण्याची अशीही अध्यात्मविद्या मुक्तहस्ताने सर्वांना वाटण्याची परंपरा चालत आलीच आहे. ही बालमूर्तीही ती परंपरा पुढे चालवणार अगदी उज्ज्वल करणार असे दिसते.

हे उद्‌गार ऐकून जमलेल्या सर्व सुवासिनींची सौ.आईसाहेबांच्या कडेवर असलेल्या त्या बालमूर्तीचे कौतुक करण्यासाठी झुंबड उडाली. काही स्त्रियांनी दत्तमहाराजांकडे ते गीतेचे पुस्तक मागितले. पण दत्तमहाराज हसतच राहिले. आपल्या हातातील गीतेचे पुस्तक काही त्यांनी सोडले नाही.

रात्री श्रीदत्तमहाराजांची दृष्ट काढून टाकतांना सौ.आईसाहेबांचे हृदय आनंदाने किती भरून आले असेल याची कोणालाही कल्पना करता येणार नाही.

* बालपण

सौ.आईसाहेबांचा प्रातःकालीच स्नान करण्याचा आणि श्रीदत्ताला प्रदक्षिणा करण्याचा नियम होता. त्यावेळी मुले त्रास देऊ लागली म्हणजे त्या मुलांना श्रीदीक्षितस्वामी-महाराजांकडे सोपवत असत. यातून सौ.आईसाहेबांचा अधिकार व श्रीदीक्षितस्वामींचे या घराण्यातील प्रेम दिसून येते आणि मुलांच्या परमभाग्याचेही लक्षण दिसते. ज्या श्रीदत्तमहाराजांचे पुढे हे श्रीदीक्षितस्वामी सद्‌गुरू झाले, त्यांच्या अंगा-खांद्यावर खेळण्याचे भाग्य सर्व भावंडांना लहानपणीच लाभावे ही पुण्याई फारच मोठी आहे असे म्हटले पाहिजे.


श्रीदीक्षितस्वामी-महाराजांसारख्या पवित्र सद्‌गुरूचा पवित्र स्पर्श आणि मंगल दृष्टी ज्यांच्यावर पडली त्यांचे जीवन कृतार्थच होते. मग या मुलांना श्रीदीक्षितस्वामी-महाराजांचा भरपूर सहवास घडला. त्यांच्या स्पर्शातील

व दृष्टीतील ईश्वरीशक्तीने या मुलांचे व्यक्तीमत्त्व घडवले असे म्हणता येईल. या श्रीदत्तमहाराजांसंबंधी श्रीटेंबेस्वामींचे उद्‌गार श्रीदीक्षितस्वामी-महाराजांना माहितच होते. या श्रीदत्तमहाराजांचे बालपणांतील गुणही श्रीस्वामींच्या प्रेमाला बहर आणीत होते.


बालपणापासून श्रीदत्तमहाराज अनेक वेळा देवापुढे उभे राहून स्तोत्रे व आरत्या म्हणत. आईवडिलांच्या शिकवणुकीप्रमाणे त्यांनी अनेक स्तोत्रे, आरत्या व श्लोक पाठ केले होते. कृष्णेचे स्नानही ते अत्यंत प्रेमाने करीत. पोहण्याची आवड व ओढ लहापणापासूनच होती. मनसोक्तपणे ते कृष्णेच्या पाण्यात पोहत असत. देवाला पाणी घालणे त्यांना अत्यंत आवडत असे.

वाडीलाच देवापुढे ८ व्या वर्षी श्रीदत्तमहाराजांची मुंज झाली. उपासना आणि वेदाध्ययन यांचा अधिकार यामुळे प्राप्त झाला. मौंजीबंधनापासून श्रीदत्तमहाराज संध्या करू लागले आणि गायत्रीची उपासनाही सुरू झाली. तसेच श्रीगुरूचरित्र नियमितपणे वाचण्याचा नेमही तेव्हापासूनच त्यांनी सुरू केला. मुंजीनंतर श्रीदत्तमहाराज श्रीदीक्षितस्वामींच्याकडे विशेष जाऊ-येऊ लागले.

वाडीतील मंडळी श्रीदीक्षितस्वामींना श्रीटेंबेस्वामीइतकाच मान देत. श्रीटेंबेस्वामी शके १८३६ म्हणजे इ.स. १९१५ साली समाधिस्त झाल्यावर श्रीदीक्षितस्वामींनी श्रीटेंबेस्वामींचा म्हणजे त्यांच्या गुरुंचा पुण्यतिथीचा उत्सव सुरू केला. हा उत्सव सहा दिवस चालत असे. या उत्सवात बालपणापासून श्रीदत्तमहाराज मोठ्या उत्साहाने भाग घेत असत. गावचे आणि परगावचे अनेक भक्त या महोत्सवाला श्रद्धेने येत असत. श्रीदत्तमहाराज वयाच्या १५-१६ वर्षापर्यंत वाडीतच होते. गुरूद्वादशीचा उत्सव श्रीनृसिंह-सरस्वतींचा उत्सव, श्रीपादवल्लभ यांच्या जन्माचा उत्सव श्रीदत्तजयंतीचा उत्सव, श्रीनारायण स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव, श्रीवासुदेवानंद स्वामी महाराजांचा जयंती उत्सव, श्रीकृष्णामाईचा उत्सव, श्रीमौनीस्वामींचा उत्सव, श्रीगोपाळस्वामींचा उत्सव असे उत्सव वाडीला नियमितपणे होत असत. या उत्सवाच्या निमित्ताने महापूजा व अन्नदान होई. अनेक थोर संत महात्मे तेथे येत. या अशा मंगल आणि पवित्र वातावरणाचे संस्कार बालवयातच



श्रीदत्तमहाराज कवीश्वर



श्रीदत्तमहाराज कवीश्वर

श्रीदत्तमहाराजांवर होत गेले. स्वभावतःच दत्तभक्तीची ओढ होती. श्रीदत्तमहाराज यांचे बालपण या अशा संस्कारामुळेच घडत गेले. एका अर्थाने श्रीदीक्षितस्वामींनी श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला बालपणी चांगला आकार दिला.

श्रीदीक्षितस्वामींना लहान मुलांवर अतोनात प्रेम करावेसे वाटे. ते लहान मुलांना आपला लळा लावीत. रोज रात्री ते मुलांना बोलावीत आणि भजन करून घेत. मुलांनी संध्या करावी व आरतीला उपस्थित रहावे म्हणून ते मुलांना झांजा देत किंवा निरांजन ओवाळायला देत. यामुळे मुलेही मोठ्या ओढीने आरतीला येत असत. तसेच स्वामी लाडू-चिवडाही प्रसाद म्हणून देत असत. स्वामींच्याकडे कोणत्याही वेळी एखादा मुलगा गेला तरी स्वामी त्या मुलाला खारीक, बेदाणे, जरदाळू, संत्री, केळे, खडीसाखर असा हाताला येईल तो प्रसाद देत. ते मुलांना भजने, स्तोत्रे व आरत्या शिकवत आणि सन्मार्गाला लावण्याचा प्रयत्न करीत. श्रीदत्तमहाराजांबरोबर अनेक लहान बालभक्त श्रीदीक्षितस्वामी-महाराजांच्या सेवेला रहात होते. दिगंबर हवळे, बापू कोडणीकर, श्रीपाद उपाध्ये, बाळू पुजारी अशी अनेक नावे सांगता येतील.

वाडीला अनेक लोकांना श्रीदीक्षितस्वामींनी मंत्रोपदेशही दिला. श्रीदत्तमहाराजांनाही बालवयांतच श्रीदीक्षितस्वामींनी मंत्रोपदेश दिला.

* शिक्षण

वाडीला श्रीमद् जगत्गुरू शंकराचार्यमहाराज यांची संस्कृत पाठशाळा आहे. त्या पाठशाळेत श्रीदत्तमहाराज जाऊ लागले. तेथे काव्य व व्याकरण यांचा त्यांनी अभ्यास केला. बालपणापासून श्रीदत्तमहाराजांची बुद्धी असाधारण होती. ते एकपाठी होते. विषयाचे आकलनही तो विषय ऐकताक्षणी त्यांना होत होते. जरी देऊळगांवला श्रीधुंडिराजमहाराज आणि सौ.आईसाहेब यांचे वास्तव्य होते, तरीही वाडीला नियमितपणे त्याचा मुक्काम असे. या मुक्कामात श्रीधुंडिराजमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांवर चांगले संस्कार केले. श्रीधुंडिराज-महाराजांसारख्या अधिकारी पुरुषाच्या सहवासाचा बालपणापासून श्रीदत्तमहाराजांच्या मनावर चांगला परिणाम

झाला आणि त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. वाडीला सौ.आईसाहेबांच्या मातोश्री म्हणजे तुंगभद्रा आजी रहात होत्या. पुढे सांगलीच्या संस्कृत पाठशाळेत वेदशास्त्र संपन्न श्री. व्यंकटेशशास्त्री अभ्यंकर यांचेकडे श्रीदत्तमहाराजांनी व्याकरणशास्त्राचा अभ्यास पूर्ण केला. सांगली व वाडी यांत फारसे अंतर नव्हते. त्यामुळे वाडीला श्रीदत्तमहाराजांचे येणे वारंवार होत असे. आपल्या सद्गुरुंच्या भेटीची सांगलीला असतांना खूप ओढ वाटायची आणि वाडीला येऊन सद्गरुंना भेटण्याचे निमित्तच श्रीदत्तमहाराज पहात असत.

पुढे श्रीदीक्षितस्वामी अमरापुरला म्हणजे औरवाडला निवासासाठी गेले. तेथे त्यांनी आपल्या सद्गुरुंच्या नांवे मठाची स्थापना केली आणि अनेक नित्यक्रम सुरू केले. तेव्हापासून श्रीदत्तमहाराज आणि इतर लहान मुले यांना घेऊन श्रीदीक्षितस्वामी-महाराजांनी त्रिस्थळी यात्रा करण्याचे ठरविले. त्याबरोबर अमरापुरातीलअनेक भजनीगडी पुढे आले आणि गुरूमहाराजांना मिरजेपर्यंत नौकेतून पोचवायचे त्यांनी ठरविले. भक्तांनी मोठी नौका आणली. श्रीदीक्षितस्वामी-महाराज आणि त्यांच्याबरोबर असलेली भक्त मंडळी यांना निरोप देण्यासाठी अनेक भक्त आले होते. भक्तांनी नौका भरून गेली होती. अशी मोठी दिंडी त्रिस्थळीला निघाली. दत्तनामाचा जयजयकार सतत चालला होता. भजने म्हटली जात होती. दिगंबराची धून्ही म्हणत होते. सद्गुरुंच्या समवेत हास्य विनोदही होत होता. नाव प्रथम शेडवाळ कवठ या गांवी पोचली. तेथून कनवाड येथे नाव गेली. तेथील गावकऱ्यांनी श्रीदीक्षितस्वामी-महाराजांचा सत्कार व पूजा केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंडळी मिरजेला पोचली. मिरजेहून मंडळी रेल्वेने कोल्हापूरला आली. तेथून सांगलीला व हरिपूरला गेली. या सर्वांचे अखंड भजन चालू होते. नामस्मरणाचा गजर होत होता. कोल्हापूरला सर्वजण आल्यावर श्री. हरिभाऊ कडेकरांच्याकडे सर्वजण उतरले होते. श्री.हरिभाऊ कडेकरांनी भक्तांचे आदरातिथ्य केले. कोल्हापूरला बरेच दिवस यांचा मुक्काम झाला.

इकडे बालगोपाळांचे आईवडील मुलांची शाळा बुडते म्हणून अस्वस्थ झाले. काही पालक कोल्हापूरला आले आणि मुलांना घेऊन जाण्याची

त्यांनी स्वामींना परवानगी मागितली. स्वामींना बालगोपाळांना 'जा' म्हणवत नव्हते. परंतु स्वामीमहाराजांनी जाऊ नका असेही सांगितले नाही. श्रीधुंडिराजमहाराज श्रीदत्तमहाराजांना नेण्यासाठी आलेले होते. अनेक मुलांनी रडून, दःखी होऊन किंवा खट्टू होऊन न जाण्याचा खूप प्रयत्न केला. मुलांची ही भक्ती आणि प्रेम पाहून श्रीदीक्षितस्वामींना वाईट वाटले. पण व्यवहाराच्या दृष्टीने पाहता त्यांना पालकांना नाही म्हणणे शक्य नव्हते. इतर मुलांच्या बरोबर श्रीधुंडिराज-महाराजांनी श्रीदत्तमहाराजांनाही वाडीला परत आणले. घरी बालवयांतील श्रीदत्तमहाराजांनी रडून रडून नकोसे केले. या प्रसंगाची माहिती सांगताना श्रीधुंडिराजमहाराज म्हणाले, "कोल्हापूरहून दत्ताला घरी आणल्यावर तो रडू लागला आणि म्हणू लागला, आम्हाला स्वामीमहाराजांकडे पोचवा नाहीतर आम्ही जेवतच नाही." त्यांनी परत जाण्याचा हट्ट धरला. दत्ताची समजूत घालता घालता आमच्या नाकी नऊ आले. श्रीदीक्षितस्वामी-महाराजांनी सर्व बाळांना खूप लळा लावला होता आणि अनेक मुलांना त्यांनी चाक्षूषी दीक्षाही दिली होती. म्हणूनच बालगोपाळांना त्यांच्याबरोबर रहाण्यात एवढा आनंद वाटत होता. आम्ही आता पोते मोकळे केले आहे असे श्रीदीक्षितस्वामीच स्वतः म्हणत होते. श्रीदीक्षितस्वामींच्या कासवी दृष्टीने अनेक भक्तांवर कृपेचा वर्षाव चालला होतो.

श्रीदीक्षितस्वामींच्या संकल्पाप्रमाणे अमरापुरात सद्गुरुंचे स्थान निर्माण झाले. श्रीअमरश्वर या नावाने हे स्थान प्रसिद्ध आहे. श्रीदत्तप्रभूंची येथे स्थापना करण्यात आली. सद्गुरू श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या खडावा व पादुका येथे पजनासाठी ठेवण्यात आल्या. त्यांची येथे नित्यपूजा सुरू झाली.

* पहिला भागवत सप्ताह

चातुर्मास संपण्यापूर्वी भाद्रपदी पौर्णिमेला भागवतसप्ताह श्रीधुंडिराजमहाराज दरवर्षी वाडीला करत असत. हा सप्ताह श्रीदीक्षितस्वामींच्या प्रेरणेने होत असे. अमरापुरात देखील श्रीदीक्षितस्वामींनी श्रीधुंडिराजमहाराजांचे चिरंजीव श्रीदत्तमहाराज यांच्याकरवी करविला. यावेळी श्रीदत्तमहाराज पाठशाळेत संस्कृत शिकायला नुकतेच जाऊ लागले

होते. भागवतसप्ताह करण्याची त्यांची तयारी आहे असे त्यांना वाटत नव्हते. तथापि श्रीदीक्षितमहाराजांनी आज्ञा केली की नुसता मूळ ग्रंथ वाचावा म्हणजे झाले. श्रीदत्तमहाराजांनी सद्गुरुंची ही आज्ञा मान्य केली. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे वय अवघे १६ वर्षांचे होते.

या सप्ताहात श्रीमद् भागवताची संहिता श्रीदत्तमहाराजांनी वाचली. सात दिवसात शुद्ध आणि स्पष्ट उच्चारात हे वाचन त्यांनी केले. स्वतः श्रीदीक्षितस्वामी सातही दिवस श्रीदत्तमहाराजांजवळ बसून त्यांचे वाचन ऐकत होते. श्रीदीक्षितस्वामींना खूपच समाधान झाले. प्रसन्नपणे त्यांनी आशीर्वाद दिला. 'दत्ता, तू पूर्ण ज्ञानी होशील. आता भागवतसप्ताह सुरू कर. या भागवतसप्ताहामुळे तुझ्याकडून फार मोठा धर्मप्रचार होईल. तुझ्यावर ईश्वराची मोठी कृपा आहे.' असे म्हणून श्रीदीक्षितस्वामींनी श्रीदत्तमहाराजांच्या अंगावर स्वतःच्या हातांनी एक उंची शाल पांघरली व चांदीचे संध्यापात्र आशीर्वाद म्हणून भेट दिले. सद्गुरूंचा हा कृपाप्रसाद प्राप्त झाल्यामुळे श्रीदत्तमहाराजांची वृत्ती भावभक्तीने भारावून गेली. श्रीदीक्षितस्वामींना श्रीदत्तमहाराजांच्या अंतःस्थ सद्गुणांची जाणीव होती. म्हणून त्यांनी श्रीदत्तमहाराजांकडून हा भागवतसप्ताह करून घेतला. पुढे भागवतसप्ताहांची एक मालिका सुरू झाली आणि सुमारे एक हजार भागवतसप्ताह संपन्न करण्याचे फार मोठे ईश्वरी कार्य श्रीदत्तमहाराजांच्या हातून घडले. या कार्याची काही स्पष्ट अस्पष्ट जाणीव श्रीदत्तमहाराजांना आपल्या पहिल्याच भागवतसप्ताहाच्या वेळी झाली आणि म्हणूनच त्यांची श्रीदीक्षितस्वामींवर असलेली श्रद्धा अनेक पटींनी वाढली. त्यांच्या उत्साहाला शक्ती मिळाली. त्यांच्या विद्येला आदर्श मिळाला. त्यांच्या जीवनाला सद्गुरूंचा आधार होताच. परंतु वेद परंपरेने जे ज्ञान त्यांच्याकडे आले होते, ते ज्ञान सद्गुरू कृपेने उजळले.

श्रीदीक्षितस्वामी केवळ शब्दांत कौतुक करून थांबले नाहीत. त्यांनी एक नौका पताकांनी आणि फुलांनी सजविली. त्या नौकेमध्ये श्रीमद् भागवत ठेवले. तुळशी आणि फुले यांचे हार घालून त्यांनी भागवताची पूजा केली. त्या भागवताजवळच १६ वर्षांच्या श्रीदत्तमहाराजांना श्रीदीक्षितस्वामींनी

बसविले. प्रसाद म्हणून जी उंची शाल त्यांनी श्रीदत्तमहाराजांना दिली होती, ती शाल त्यांनी श्रीदत्तमहाराजांच्या अंगावर पांघरली. चंदन आणि कुंकू यांचा टिळा श्रीदत्तमहाराजांच्या कपाळी लावला व फुलांचे हार श्रीदत्तमहाराजांच्या गळ्यात घातले. स्वतः शेजारी ते बसले. जणू वैराग्याच्या कुशीत ज्ञान आणि भक्ती यांचे ऐश्वर्यच बसले होते. नावेमध्ये अनेक भक्त येऊन बसले. 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव।' या महामंत्राचेही भजन झाले.

या गौरवामुळे श्रीदत्तमहाराज संकोचून गेले होते. आपण तर नुसते भागवत वाचले तरी सुद्धा हे कौतुक ! नाही ! हे कौतुक माझे नाही ! श्रीमद् भागवताचे हे सामर्थ्य आहे. श्रीमद्भागवताचा हा गौरव आहे, असे विचार श्रीदत्तमहाराजांच्या मनात आले. ते पूर्णपणे अंतर्मुख झाले. "सद्गुरूंनीच जवळ केले आणि सर्व करून घेतले. नाही कशालाच म्हणता आले नाही. केवळ सद्गुरू प्रसन्न झाले व म्हणूनच हे घडले. आपण त्यात काहीच नाही." हे विचार श्रीदत्तमहाराजांच्या मनात आले. म्हणून ते गप्प राहिले. त्यांच्या मनांत प्रसन्नतेचे मळे बहरून आले होते.

ही नाव संथपणे श्रीकृष्णामाईच्या प्रवाहावरून पुढे पुढे जात होती. समोर मनोहर पादुका दिसत होत्या. मंदिराचे दर्शन होत होते. आनंदाची लयलूट करीत ही नाव भागवत आणि श्रीदत्तमहाराज यांना घेऊन पुढे पुढे जात होती. सर्वजण भक्तांच्या आनंदामध्ये दंग झालेले होते. बाहेरच्या संसाराची सर्वांनाच विस्मृती झाली होती. नावेने सीमेचे उल्लंघन केले आणि ही नाव कुरुंदवाडपर्यंत गेली. कुरुंदवाडवरून ही नांव परतली आणि अमरेश्वरला आली.

आपल्या शिष्याचे आंतरिक जीवन कसे आहे, त्यात काय वंदनीय आहे हे सद्गुरूंना ताबडतोब कळते आणि ते जगाला शिष्याचे सामर्थ्य आणि आंतरिक वैभव दाखवून देतात. श्रीज्ञानदेवांना सद्गुरू श्रीनिवृत्तीनाथांनीच आज्ञा केली आणि त्यांच्याकडून श्रीज्ञानेश्वरी लिहून घेतली. त्याचप्रमाणे श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज यांनीच

श्रीदीक्षितस्वामींचे आंतरिक वैभव जगाच्या पुढे आणले. श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज यांनी अनेक वेळेस श्रीदीक्षितस्वामींचा मोठेपणा, त्यांचे वैराग्य, त्यांची भक्ती आणि त्यांचे ज्ञान पुनःपुन्हा लोकांच्या समोर गौरवलेले आहे. याच परंपरेला अनुसरून सद्गुरू श्रीदीक्षितस्वामींनी १६ वर्षांच्या श्रीदत्तमहाराजांना भागवतसप्ताहाला बसविले आणि त्यांचा मोठेपणा, त्यांचे आंतरिक वैभव, त्यांचे ज्ञान आणि त्यांची भक्ती ही जगापुढे गौरवाने मांडली. सद्गुरू त्रिकालज्ञ असतात, अंतर्ज्ञानी असतात असे नेहमीच म्हटले जाते. त्यामुळे सद्गुरू जेव्हा एखादी आज्ञा करतात, तेव्हा त्या आज्ञेचे पालन करण्यामध्ये भविष्यकाळाच्या अनेक घटना त्यात सूचित केलेल्या असतात. या सप्ताहात श्रीदत्तमहाराजांच्या मस्तकावर श्रीदीक्षितस्वामींनी हात ठेवला आणि श्रीदत्तमहाराजांच्या चरणांवर सर्व भक्तांनी मस्तक ठेवले. हे विलोभनीय दृष्य मोठ्या संतोषाने सद्गुरूस्वामी पहात होते. श्रीदत्तमहाराजांच्या मनांत खूप संकोच होता. परंतु हा संकोच हळूहळू सद्गुरू आपल्या कृपेने नाहीसा करीत होते.

पुढील जीवनात श्रीदत्तमहाराजांचा श्रीगुळवणीमहाराजांशी घनिष्ट संबंध आला. त्यांचा संबंध आल्यापासून आपल्या व्यक्त जीवनसूर्याचा अस्त होईपर्यंत श्रीगुळवणीमहाराज त्यांना "श्रीदत्तमहाराज" असे स्वतः म्हणत असत आणि इतरांनाही तसा उल्लेख करत जा असे सांगत असत. आपल्या सान्निध्यात कुठेही श्रीदत्तमहाराज असले तरीही श्रीगुळवणीमहाराज नमस्कार करणाऱ्या प्रत्येकाला सांगायचे 'श्रीदत्तमहाराजांना नमस्कार करा'. श्रीदत्तमहाराजांचे वंदनीयत्त्व आणि पूजनीयत्त्व श्रीगुळवणीमहाराजांनी प्रत्येकाला शब्दाने आणि कृतीने वारंवार जाणवून दिले होते.

श्रीदीक्षितस्वामींनी अशी आज्ञा केली की यापुढे हा सप्ताह दरवर्षी चालू ठेवावा. शके १८४७ (इ.स.१९२५) मध्ये हा सप्ताह सुरू झाला. दरवर्षी श्रीदत्तमहाराज कोठेही असले तरीही भाद्रपदातील या सप्ताहासाठी येऊ लागले. शके १८४८ च्या सप्ताहात श्रीदीक्षितस्वामी अमरापूरला नव्हते. ते काशीयात्रेला गेले होते. वाडी सोडण्यापूर्वी श्रीदीक्षितस्वामींनी श्रीदत्तमहाराजांना भागवतसप्ताह करण्याची आठवण केली होती.

आदल्यावर्षीप्रमाणेच दुसऱ्या वर्षीही भागवतसप्ताह झाला. सद्गुरूस्वामी काशीयात्रेला गेले होते. तरीसुद्धा सप्ताह अतिशय चांगला झाला आणि या सप्ताहामध्ये श्रीदत्तमहाराजांचे ज्ञान आणि त्यांची भक्ती यांचा सर्व श्रोत्यांवर उत्तम प्रभाव पडला.

पुढे अश्विन वद्य सप्तमीला अयोध्येला श्रीदीक्षितस्वामींचे महानिर्वाण झाले. यामुळे भक्तांना अतिशय दुःख झाले. श्रीदत्तमहाराजांना तर किती दुःख झाले असेल याची कल्पना करवत नाही.

यानंतर श्रीदत्तमहाराज श्रद्धेने भागवतसप्ताहाला दरवर्षी अमरापूरला जाऊ लागले. यात कधीही खंड पडला नाही. हा नियम शके १८८७ म्हणजे इ.स.१९६५ पर्यंत ४० वर्षे सतत नियमाने चालू होता. इ.स. १९६५ या वर्षी पुण्यात श्रीवासुदेव निवास सुरू झाला, तेव्हा सद्गुरू श्रीगुळवणीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना आश्रमात श्रीभागवतसप्ताह करण्यास सांगितले. वासुदेवनिवासमध्ये दरवर्षी होणाऱ्या या भागवतसप्ताहात कधीच खंड पडला नाही. तो अद्यापही चालू आहे. श्रीदत्तमंदिरात अमरेश्वरला जो भागवतसप्ताह होत असे तो आता वासुदेव निवासमध्ये सुरू झाला आणि या परंपरेचा प्रवाह अधिक प्रकर्षाने पुढे वाहू लागला.

❊ श्रीदत्तप्रभूंचे दर्शन

सांगलीच्या पाठशाळेत अध्ययन चालू असतांना मधूनमधून वाडीला येणे होत असे. वाडीला आल्यावर श्रीदत्तमहाराज अमरापूरला जाऊन श्रीदीक्षितस्वामींचे दर्शन घेत असत. घरी आजी म्हणजे आईची आई असे. तिला ते सांगून जायचे. एका अधिक महिन्यातील ही घटना आहे. पावसाळ्याचे दिवस. श्रीदत्तमहाराज सांगलीहून वाडीला आले. सकाळची वेळ होती. ते घरी गेले. आजीची भेट घेतली. त्यावेळी अधिक मासानिमित्त तीन ब्राह्मणांना आजींनी जेवायला बोलावले होते. आजींची स्वयंपाकाची तयारी चालू होती. तेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या मनांत विचार आला, थोडा वेळ आहे. तेव्हा अमरापूरला जाऊन श्रीदीक्षितस्वामींचे दर्शन घ्यावे म्हणून श्रीदत्तमहाराज आपल्या आजीला म्हणाले, 'आजी मी अमरापूरला जाऊन येतो.'

आजी म्हणाली, "अरे, आपल्याकडे आज ब्राह्मण जेवायला येणार आहेत. तुला जायलाच पाहिजे का? आता गेलास तर परत येशील का?"

त्यावर श्रीदत्तमहाराज म्हणाले, "आजी सांगलीला गेल्यापासून स्वामीमहाराजांचे रोज दर्शन होत नाही. बरं, आज संध्याकाळी मला सांगलीला परत जायचे आहे. आताच जाऊन येतो. अकरा वाजेपर्यंत येतो.

तेव्हा आजीने अनुज्ञा दिली. "बरं, पण नीट जपून जा. पावसाळ्याचे दिवस आहेत."

श्रीदत्तमहाराज सद्गुरुंच्या भेटीला निघाले. त्यांनी आपले धोतर आवरले, उपरणे डोक्याला बांधले आणि प्रवाहामध्ये उडी घेतली. पोहत पोहत ते अमरापूरला गेले, अमरापूरला त्यांनी पैलतीर गाठला. डोक्यावरचे उपरणे पिळले आणि नेसलेले धोतर पिळून घेऊन ते मठाच्या मंदिरात गेले. स्वामी पूजेत तल्लीन झाले होते. पण हा लाडका शिष्य आल्याचे कळताच त्यांनी त्याला जवळ बोलावले. श्रीसद्गरूना श्रीदत्तमहाराजांनी साष्टांग नमस्कार घातला आणि संकोचाने श्रीसद्गुरूमहाराजांच्या प्रश्नांना उत्तरे देत ते जवळ उभे राहिले. श्रीदीक्षितस्वामी पूजेतून उठले. त्यांनी कोरडे धोतर श्रीदत्तमहाराजांना नेसायला दिले, कोरडे उपरणे पांघरायला दिले. 'आज भोजन प्रसादाला येथेच थांबावे, असे ते म्हणाले. परंतु श्रीदत्तमहाराजांनी सांगितले. "आजीला घरी जेवायला येतो म्हणून सांगितले आहे, आज अधिकाचे तीन ब्राह्मण जेवायला यायचे आहेत." तेव्हा स्वामींनी प्रसाद दिला. पुन्हा नमस्कार करून श्रीदत्तमहाराज परतले. ही सद्गरूची आणि एका अलौकीक असामान्य शिष्याची भेट म्हणजे पारमार्थिक सुखाची दुथडी भरून आलेली गंगाच होती. थांबायला मिळाले नाही म्हणून श्रीदत्तमहाराजांच्या मनांत थोडी रूखरूख होती. पण दर्शन झाले याचाही आनंद होता.

ते लगबगीने कृष्णेच्या काठावर आले. पूरात उडी मारली आणि त्यांनी हात मारायला सुरूवात केली. पैलतीराच्या जवळ आले आणि अचानक एका भोवऱ्यात सापडले. भोवऱ्यातून निघणे फार कठीण असते. पोहणारा भोवऱ्यात खालीखाली खोल खोल खेचला जातो, स्वतःभोवती गरगर

फिरायला लागतो. श्रीदत्तमहाराज भोवऱ्यात सापडताच क्षणभर त्यांच्या मनाला कसेसे वाटले. पण त्यांनी श्रीदत्तप्रभूंचे स्मरण कले. एवढ्यात त्यांना श्रीदत्तप्रभूंचे दर्शन झाले. श्रीदत्तप्रभूंनी श्रीदत्तमहाराजांना भोवऱ्यातून ओढून काढले आणि ते तेथेच अदृश्य झाले.

* श्रीदत्तमहाराजांचा विवाह

श्रीदत्तमहाराजांचे अध्ययन सांगलीच्या पाठशाळेत सुरू झाले. त्यांचे वडील श्रीधुंडिराजमहाराज आणि सौ.आईसाहेब देऊळगावराजाला रहात असत. श्रीधुंडिराजशास्त्री प्रवचन आणि पारायणांसाठी गावोगाव जात असत. अनेकवेळा ते वाडीलाही येऊन रहात असत. असे धर्मप्रचाराचे अखंड कार्य सुरू झाले होते. बार्शीलाही श्रीधुंडिराजमहाराज अनेक वेळा जात असत. तेथेही त्यांचा मोठा शिष्यपरिवार होता. बार्शीला एका भक्ताने श्रीधुंडिराजमहाराजांना घर गुरुदक्षिणा म्हणून दिले होते. त्यामुळे श्रीधुंडिराजमहाराज बार्शीला असतांना या घरातच रहात असत.

बार्शीला महाराजांच्या शिष्य परिवारात श्री.भगवंतराव पाठक म्हणून एक भक्त होते. श्री.भगवंतराव पाठकांनी श्रीधंडिराजमहाराजांकडून मंत्रोपदेश घेतला होता. त्यांचे नाते गुरू-शिष्यांचे होते. साधे बाळबोध घराणे होते. ते बार्शी गावातच घर असल्यामुळे सौ.सरस्वतीबाई आईसाहेबांच्या नजरेत भगवंतरावांची सुकन्या भरली. सुंदर मुलगी पाहून सौ.आईसाहेबांनी त्या मुलीबद्दल आपलेपणा उत्पन्न झाला. त्या मुलीचे नावही 'सुंदर' हेच होते. सौ.आईसाहेबांनी ती मुलगी पाहिली आणि त्यांच्या मनामध्ये ती मुलगी आपल्या चिरंजीवांना करून घ्यावी असा विचार आला. त्यांनी मुलगी पसंत केल्यावर सुंदरचे वडील आणि काका यांनी विचारविनिमय केला. मुलाच्या पसंतीचा प्रश्नच नव्हता. कारण असा मुलगा मिळणे दैवदुर्लभच होते. रूप, प्रकृती, कुळ, घराणे, सर्वकाही मोठे होते. 'शुचिनाम् श्रीमताम् गेहे' अशाप्रकारचे घर आपल्या मुलीला मिळावे यासाठी मुलीचे वडील नेहमीच प्रयत्न करीत असत.

त्यादिवशी श्रीधुंडिराजमहाराज देऊळगांवहून येणार होते. टांगा घेऊन स्टेशनला जावे, त्यांना तेथून आपल्या घरी घेऊन यावे आणि हा विषय

काढून त्यांच्याशी बोलणी करावी असे श्री. भगवंतराव पाठक यांनी ठरविले. ते टांगा घेऊन स्टेशनवर गेले. आश्चर्य म्हणजे त्याच दिवशी चार वधूपिते असाच विचार करून स्टेशनवर आले होते. गाडी आली आणि हे वधूपिते लगबगीने पुढे झाले. पण योग असा की श्रीधुंडिराजमहाराजांनी श्री.भगवंतराव पाठक यांच्याच टांग्यात बसण्याचे ठरविले. श्री.भगवंतराव पाठक श्रीधुंडिराजमहाराजांना आपल्या घरी घेऊन आले. मुलगी पाहण्यातलीच होती. पत्रिकाही पाहिली होती. तेव्हा सुंदरचे वडील म्हणाले,"आज बैठक होऊन निर्णय घेऊन बाहेर पडायचे." धुंडिराजमहाराज म्हणाले, "ठीक आहे. आमच्या अटी काही नाहीत. मानपान वगैरेही काही अपेक्षा नाहीत. परंतु वाडीला येऊन लग्न करून द्या, म्हणजे झाले." श्री.भगवंतरावांनी ते मान्य केले. लग्न ठरले. बैठक झाली. पाठक घराण्यात सगळ्यांनाच आनंद झाला. मुलीचे भाग्य फार मोठे आहे असे सर्वांना वाटले. सौ.आईसाहेबांना सुंदरचे वडील म्हणाले, "मुलीला आई नाही. आपण तिला आई मिळालात, भाग्य आहे तिचे. आपल्यासारखे ईश्वरी कृपाप्रसाद असलेले कुळ तिला मिळाले ही आमच्यावर केवढी मोठी गुरूकृपा आहे."

मोठ्या थाटामाटात विवाह वाडीला साजरा झाला. कवीश्वर घराण्यात श्रीगणेशाची उपासना असल्याने विवाहतिथी संकष्टी चतुर्थी निवडली होती. लग्नसोहळा पाच दिवस मोठ्या थाटामाटाने साजरा झाला. आता श्री.भगवंतराव पाठक यांच्या कन्येने सौ.लक्ष्मीबाई या नावाने कवीश्वर घराण्यामध्ये प्रवेश केला.

विवाहाच्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे वय वीस वर्षांचे होते. तर सौ.लक्ष्मीबाई यांचे वय बारा वर्षांचे होते. सौ. लक्ष्मीबाईंनी सासूबाईंच्या बरोबर रोज १०८ प्रदक्षिणा घालण्याचा नेम धरला. वाडीला मुक्काम असेपर्यंत हा प्रदक्षिणेचा नेम सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांनी अखंडपणे चालविला. तसेच श्रीदत्तमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे रोज दत्तमहात्म्याचा एक अध्याय वाचणे आणि श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या पादुकांचे जे देवालय आहे त्या देवळाच्या ओवरीत संध्याकाळी थोडावेळ दिगंबरांची धून सांगणे हे दोन नेम त्यांनी पहिल्यापासून चालविले. संस्कार कसे घडत जातात

यावरून लक्षात येते कवीश्वर घराण्यामध्ये ईश्वराच्या उपासनेचे बाळकडू प्रत्येकाला मिळत गेल्यामुळे प्रत्येक व्यक्ती ईश्वराची उपासक होत गेली. वयाच्या १२ व्या वर्षी देवाला रोज १०८ प्रदक्षिणा घालणे, दत्तमहात्म्याचा एक अध्याय वाचणे आणि दिगंबराची धून नियमित सांगणे हे नियम सुरू झालेले पाहिले म्हणजे खरोखरीच सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांच्या भाग्याची धन्यता वाटते. वाडीच्या घरात अग्निहोत्र चालू होते.

श्रीधुंडिराजमहाराजांची सर्वांच्या भावनेशी समरस होण्याची क्षमता फार मोठी म्हणून ते जसे बालगोपाळांच्यामध्ये रमून जात तसे शास्त्रीपंडित यांच्या सहवासांतही रमून जात. त्यांनी सूनेला अत्यंत कौतुकाने आणि प्रेमाने वाढविले. सूनबाईचे वय लहान आहे. तिच्या मनांत आवडी निवडी असतील, याचा ते नेहमी विचार करत. एकदा वाडीला सिनेमा आलेला असतांना श्रीधुंडिराजमहाराजांना असे वाटले की सूनबाईला सिनेमा नेऊन दाखवावा. आपला मुलगा नाहीतरी तिला सिनेमा दाखवायला नेणार नाही. म्हणून ते सौ. आईसाहेबांना म्हणाले, 'आपण सिनेमाला जाऊया का? ' सौ.आईसाहेब म्हणाल्या, 'मला काही सिनेमा आवडत नाही. तुम्ही आपल्या सुनेला घेऊन जा.' तेव्हा श्रीधुंडिराजमहाराज आपल्या सुनेला मुद्दाम सिनेमा दाखवायला घेऊन गेले होते.

सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांच्या माहेरी धार्मिक उपासनेचे वातावरण कवीश्वरांच्या घरासारखे नव्हते. त्यामुळे काही वेळा सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांचे मन गोंधळून जाई. घरात अनेक लोक पाहुणे म्हणून येत असत. धार्मिक चर्चा सतत चालू असत. अनेक व्रतांचे पालन नियमाने केले जात होते. अनेक नित्यक्रम ठरलेले होते. सर्वांचे आचरण शास्त्रनिष्ठ होते. हे सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांना नव्या घरामध्ये पहिल्यांदाच पहायला मिळत होते. त्यांच्या पतीची म्हणजे श्रीदत्तमहाराजांची मानसिक बैठक तर फारच वरच्या दर्जाची अशी होती. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव पहिल्यापासून काहीसा अबोल असा होता. ते नेहमी वाचनात मग्न झालेले असत. अत्यंत साध्या पद्धतीने ते रहात असत. वृत्तीने ते गंभीर होते. या गोष्टींचा सुरूवातीच्या काळात सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांना काही प्रमाणात त्रास

झाला असेलही परंतु सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब यांनी सर्व जुळवून घेतले. त्यांनी त्या घरामध्ये स्वतःला घराण्याची परंपरा आणि श्रद्धा यांच्या चौकटीत बसवून घेतले. वातावरणाने आणि संस्काराने त्या घडत गेल्या आणि पतीवर अत्यंत निष्ठेने श्रद्धेने प्रेम करत गेल्या. आपल्या घरातील सर्वांचे व्यवस्थित करणे आणि पतीची जास्तीत जास्त सेवा करणे या वृत्तीने त्यांनी गृहिणी म्हणून या काळात स्वतःचे व्यक्तीमत्त्व परिपूर्ण बनवलेले होते असे दिसून येते.

* माहुरची ओहर यात्रा

श्रीगुळवणीमहाराज आणि श्रीधुंडिराजमहाराज यांचे आध्यात्मिक संबंध अत्यंत उच्च स्तरावरचे होते. त्याचबरोबर दोघांचे कौटुंबिक पातळीवरील स्नेहसंबंधही आगळ्या प्रकारचे होते. दोघांचा गुरू परंपरा एकच आहे. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्रनृसिंहवाडी हे दोघांचेही श्रद्धास्थान आहे. याशिवाय श्रीगुळवणीमहाराजांचा श्रीधुंडिराजमहाराजांशी आणखी एका वेगळ्या प्रकारे संबंध आलेला आहे. श्रीगुळवणी-महाराजांचे थोरले बंधू श्रीशंकरशास्त्री यांनी संन्यास घेतला होता. त्यांचे संन्यासानंतरचे नाव "स्वामी शंकरानंद भारती कौलवकर" असे होते. श्रीगुळवणीमहाराजांचे हे थोरले बंधू आणि श्रीधुंडिराजमहाराज यांचा स्नेहसंबंध प्रथमपासून होता आणि त्याला आध्यात्मिक पातळीवरील संबंधाची विशेष किनार होती. श्रीगुळवणीमहाराजांचा ज्या दत्तसंप्रदायी व नृसिंहवाडीकर कुटुंबाशी संबंध आला, त्या कुटुंबामध्ये श्रीधुंडिराजमहाराज यांचे कुटुंब सर्वात महत्त्वाचे होते असे म्हटले तरी चालेल. अधिकारी गुरूबंधूचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असतात. ते आध्यात्मिक पातळीवरही असतात आणि कौटुंबिक पाळीवरही असतात. अशा प्रकारचे संबंध श्रीगुळवणीमहाराज आणि श्रीधुंडिराजमहाराज यांचे होते. हे संबंध किती जिव्हाळ्याचे होते, हे अनेक लौकिक पातळीवरील प्रसंगातूनही दिसून येते.

कवीश्वर कुटुंबियांची कुलस्वामिनी माहुरची रेणुकामाता आहे. ज्या वेळेला कवीश्वर घराण्यामध्ये विवाह होता, त्या वेळेला नूतन वधूवरांना कुलस्वामीनीच्या दर्शनाला घेऊन जाण्याची प्रथा आहे. याला 'ओहर यात्रा'

असे म्हणतात. ह्या परंपरेप्रमाणे श्रीदत्तमहाराजांचा विवाह झाल्यानंतर त्यांना देवीच्या दर्शनाला घेऊन जायचे होते. हा योग १९३२-३३ साली जमून आला. ज्यावेळेला श्रीगुळवणीमहाराज वाडीला आले, त्यावेळी त्यांची आणि श्रीधुंडिराजमहाराजांची भेट झाली असतांना श्रीधुंडिराजमहाराजांनी हा विषय काढला. तेव्हा श्रीगुळवणीमहाराज म्हणाले, 'हे घरचं कार्य आहे. मलाही आले पाहिजे. मीही आपल्याबरोबर येतो.'

या यात्रेला श्रीधुंडिराजमहाराज, सौ.सरस्वतीबाई आईसाहेब, श्रीदत्तमहाराज, सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब आणि श्रीगुळवणीमहाराज मिळून गेले होते. माहूरला या मंडळींनी एक आठवडाभर वास्तव्य केले. सर्व कुळाचार आणि कुळधर्म विधीप्रमाणे शास्त्रोक्त पद्धतीने पार पाडले. माहुरला या मंडळींचा विष्णुदासबुवांच्या मठात मुक्काम होता. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब सांगतात, खऱ्या अर्थाने ही सर्व परमार्थी मंडळी! या परमार्थ मंडळींना परमार्थाशिवाय दुसरा कोणताही विषय या काळामध्ये रूचत नसे. सतत परमार्थाचीच चर्चा चालत असे. अर्थातच अत्यंत आनंदाचे असे वातावरण होते. ही यात्रा अत्यंत शास्त्रशुद्ध आणि आचारसंपन्न परिस्थितीत झाली. माहुरहून आम्ही सर्वजण वडनेऱ्याला गेलो आणि तेथे श्रीसिताराम-महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. नंतर कारंजाला जाऊन श्रीनृसिंहसरस्वती-स्वामीमहाराजांचे जन्मस्थान आम्ही पाहिले. श्रीस्वामीमहाराजांच्या जन्मस्थानाचे दर्शन घेताना आमचे सर्वांचेच मन अत्यंत भक्तीभावाने भरून आले होते. मूर्तिजापूर आणि वाशिम येथेही आम्ही गेलो होतो आणि तेथील देवळांचे व साधुपुरूषांचे दर्शन घेतले. ही ओहर यात्रा एक प्रकारे परमार्थ यात्राच झाली असे म्हणता येईल. श्रीगुळवणीमहाराजांचे वात्सल्य या ओहर यात्रेत मला खूपच अनुभवायला मिळाले. श्रीधुंडिराज-महाराजांइतकेच श्रीगुळवणीमहाराजही आम्हा दोघांवर खूप प्रेम करीत. त्याचा अनुभव सतत आयुष्यभर आम्हाला येत राहिला.

* अध्ययन

रूढ अर्थाने पाहिले तर श्रीदत्तमहाराजांच्या अध्ययनाला श्रीधुंडिराज-महाराजांच्यापासूनच प्रारंभ झाला. प्रथम श्रीधुंडिराजमहाराज,

श्रीदत्तमहाराजांना शिकवीत असत. त्यानंतर वाडी येथे निवास करून असलेले पूर्वाश्रमीचे अहिताग्नी वेदशास्त्रसंपन्न श्रीशंकरशास्त्री जेरे यांचेकडे श्रीदत्तमहाराजांनी साहित्य आणि व्याकरण यांचा अभ्यास केला. पुढे हेच श्रीशंकरशास्त्री जेरे संकेश्वर पीठाचे शंकराचार्य झाले. सांगलीला वेदशास्त्रसंपन्न श्री.व्यंकटशास्त्री अभ्यंकर यांचेकडे श्रीदत्तमहाराजांनी व्याकरणाचे अध्ययन पूर्ण केले. त्यानंतर श्रीदत्तमहाराज पुढील शिक्षणासाठी धारवाडला गेले. धारवाडला श्री.नागेश्वर शास्त्री उप्पिनबेट्टागिरी यांच्याकडे सर्वशास्त्रांचे अध्ययन त्यांनी पूर्ण केले. श्री.नागेश्वरशास्त्री उप्पिनबेट्टागिरी हे फार मोठे पंडित होते. त्यांना 'विद्वत कुलशेखर' असे संबोधित असत. हे अत्यंत विनयशील असल्यामुळे त्यांना 'विनयमूर्ती' ही म्हणत असत. अनेक संस्थानिकांनी आणि राजघराण्यांनी श्री.नागेश्वरशास्त्री उप्पिनबेट्टागिरी यांचे स्थान आणि अधिकार ओळखून त्यांना मान्यता दिली होती. अशा एका थोर सदाचारी विद्वान अधिकारी सत्पुरुषाकडे लौकीक शिक्षण पूर्ण करण्याची संधी श्रीदत्तमहाराजांना मिळाली हे जसे त्यांचे भाग्य, तसेच असा आगळा वेगळा शिष्य मिळाला हे श्री.नागेश्वरशास्त्री उप्पिनबेट्टागिरी यांचेही भाग्य असे म्हटले पाहिजे. श्रीदत्तमहाराजांचे लौकीक अर्थाने जे अध्ययन झाले त्या काळात त्यांच्या गुरूनी व काही गुरुबंधूंनी हे जाणले होते की श्रीदत्तमहाराज सिद्धप्रज्ञा किंवा ऋतंभराप्रज्ञा घेऊन आलेले अवतारी पुरुष आहेत.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सिद्धप्रज्ञा सांगितली आहे. शुद्ध स्वच्छ काचेतून पाहिले तर पदार्थाचे यथार्थ ज्ञान होते. त्याप्रमाणे बुद्धीवरील आवरणे व दोष दूर झाले तर बुद्धी शुद्ध होते व त्यामुळे ज्ञान यथार्थ होते. आपल्या बुद्धीवर आवरणे असतात. धर्माचरण करीत राहिले की तो दूर होतात व बुद्धी शुद्ध होते. पण अवतारी पुरुष अशी शुद्ध बुद्धी घेऊनच या जगात अवतीर्ण होतो. बुद्धीचे शुद्ध पूर्वरूप हेच तिचे सिद्धस्वरूप आहे. अशा शुद्ध बुद्धीलाच 'ऋतंभराप्रज्ञा' असे म्हणतात. याच ऋतंभरा प्रज्ञेच्या सहाय्याने अध्यात्मप्रसाद किंवा आत्मज्ञान होत असते.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात की योग्याच्या पूर्वदेहातील सात्त्विक शुद्ध बुद्धी जेव्हा योगी नवा जन्म घेतो तेव्हा तीसुद्धा शुद्ध व सात्त्विक स्वरूपांतच तशीच त्या योग्याला प्राप्त होते. त्यामुळे योगी सिद्धप्रज्ञा घेऊनच जन्माला येतो आणि त्याला बालपणीच आत्मज्ञान होते.

मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहाट फुटे ।
सूर्यापुढा प्रगटे । प्रकाश जैसा ॥४५२॥
तैसी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गावा न जाता ।
बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ॥४५३॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मनचि सारस्वते दुभे ।
मग सकळ शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ॥४५४॥

(भावार्थ : सूर्य उगवण्यापूर्वीच प्रकाश पडतो. त्याप्रमाणे जेव्हा योगी नवा जन्म घेतो तेव्हा जन्मल्याबरोबर जे बाळशरीर त्याला प्राप्त होते त्या बाळशरीरातच आत्मज्ञानाचा उजेड होतो. प्रौढदशा प्राप्त होण्याची वाट न पहाता किंवा वयस्कपणाच्या गावाला येण्यापूर्वीच सर्वज्ञता त्या योग्याला बाळपणीच माळ घालते. तो योगी सिद्धप्रज्ञा घेऊन जन्माला आलेला असल्यामुळेच त्या योग्याचे मन बाळपणातच सर्वविद्यासंपन्न होते आणि अध्ययन केल्यावाचून आपोआप सर्व शास्त्रे त्याच्या मुखातून प्रकट होतात.)

श्रीदत्तमहाराजांचे बालपण या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओवीप्रमाणेच संपन्न झालेले दिसते. ते मुळातच सिद्धप्रज्ञा म्हणजे शुद्ध व सात्त्विक बुद्धी घेऊन आलेले असल्यामुळे बालवयातच त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले व अध्ययनावाचूनच सर्व शास्त्रे आपोआप त्यांच्या मुखातून प्रकट होऊ लागली. जणू ते विद्यासंपन्न मन व बुद्धी घेऊन जन्माला आले होते.

सिद्धप्रज्ञा घेऊन जन्माला आलेले योग्याचे वर्णन करतांना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'अशा प्रकारचा जन्म प्राप्त व्हावा अशी देवांनासुद्धा इच्छा रहाते व म्हणून स्वर्गामध्ये ते देव अशा जन्माच्या प्राप्तीकरता जप व होम यासारखी कर्मे करीत असतात. मृत्युलोकी जसा जन्म यावा अशी इच्छा देवही करतात, तसा जन्म त्या योग्याला प्राप्त होतो.'

श्रीदत्तमहाराजांचा जन्म याच प्रकारचा आहे असे दिसून येते. सिद्धप्रज्ञा घेऊनच ते अवतीर्ण झालेले असल्यामुळें बालपणापासूनच बुद्धी एवढी सूक्ष्म व शुद्ध झाली होती की साधारण बुद्धीला जी रहस्ये अगम्य असतात किंवा जे गुरूवाचून कळूच शकत नाही तेथे त्यांची बुद्धी बालपणापासूनच न चाचपडता अचूक प्रवेश करत आली आहे. इंद्रिये बलवान आहेत असा सामान्य माणसाला अनुभव येतो आणि त्यामुळे इंद्रिये स्वाधीन करून घेण्यासाठी सामान्य माणसाला खूपच प्रयत्न करावे लागतात. परंतु श्रीदत्तमहाराजांसारख्या सिद्धप्रज्ञा घेऊन अवतीर्ण झालेल्या सत्पुरूषांना असा अनुभव येतो की ही इतरांना बलवान वाटणारी इंद्रिये त्यांच्या मनाच्या आपोआप स्वाधीन होतात आणि अध्यात्मविद्येचा अभ्यास आपणहून त्यांच्या अंगी बाणत जातो. जणू समाधी त्यांच्या मनाच्या घराचा शोध घेत येते.

जाणिजे योगपिठीचा भैरव । काय हा आरंभरंभेचा गौरव ।
की वैराग्यसिद्धीचा अनुभव । रूपा आला ॥४६२॥
हा संसार उमाणिते माप । कां अष्टांग सामग्रीचे द्वीप ।
जैसे परिमळेचि धरीजे रूप । चंदनाचे ॥४६३॥
तैसा संतोषाचा काय घडिला । की सिद्धभांडाराहुनि काढिला ।
दिसे तेणे माने रुढला । साधकदशे ॥४६४॥

(भावार्थ : हा पुरुष योगरूपी आसनावरील जणूं काय भैरवदेवच, अथवा योगारंभरूपी केळीची शोभाच किंवा जणूं काय वैराग्याच्या पूर्णतेचा मूर्तिमंत अनुभवच आकाराला आलेला आहे ! हा पुरुष म्हणजे संसार मोजण्याचे मापच किंवा अष्टांगयोगाची सामग्री दाखविणारा जणूं दिवाच होय! ज्याप्रमाणे सुवासाने चंदनाचे रूप धरावे, त्याप्रमाणे हा पुरुष जसा कांही संतोषाचाच बनविलेला अथवा सिद्धांताच्या समुदायांतून काढलेला असावा, इतक्या योग्यतेचा साधकदशेतच तयार झालेला दिसतो.)

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अशा योगी सत्पुरुषाचे बालपण व योगाभ्यास याचे वर्णन वरीलप्रमाणे जे केले आहे, ते श्रीदत्तमहाराजांना पूर्णपणे लागू पडते. श्रीदत्तमहाराजांच्या विद्यार्थीदशेत सर्वसामान्य लोकांना ते उत्तम दर्जाचे

साधक आहेत असे दिसत होते. परंतु 'योगस्थानावरील अधिदेवता' असेच या साधकाचे रूप आहे हे जाणकारांच्या ध्यानात आलेले होते. पूर्ण वैराग्याने साध्य होणारा अनुभवच रूपाला आला आहे अशी साधकदशा श्रीदत्तमहाराजांच्या ठायी बालपणापासूनच जाणकारांना दिसली होती. योगाच्या अष्टांग साधनसामग्रीचे बेटच किंवा सुगंधाने चंदनाचे रूप घ्यावे त्याप्रमाणे श्रीदत्तमहाराज बालपणापासूनच अध्यात्मविद्येची त्यांना जणू काय घडलेली मूर्तीच असावी असे दिसतात. ज्या वयाला साधकदशा मानतात त्या वयापासूनच त्यांना ज्ञान व भक्तीचे भांडार प्राप्त झालेले आहे असे दिसते. योगाभ्यासाची सर्व साधने स्वभावतःच त्यांच्या ठिकाणी प्रकटलेली दिसतात. चित्त स्फटिकासारखे शुद्ध असल्यामुळे मन सहज एकाग्र होऊन बालपणीच ब्रह्मैक्याचा अनुभव त्यांना प्राप्त झाला होता असे दिसून येते.

धारवाडच्या शंकराचार्य पाठशाळेत श्रीदत्तमहाराज इ.स. १९३३ ते १९३७ या काळात सुमारे चार वर्ष अध्ययन करीत होते. श्री.नागेश्वरशास्त्री उप्पिनबेट्टागिरी हे विरुपाक्षशास्त्रीचरण यांचे पट्टशिष्य होते. या पाठशाळेत श्री. नागेश्वरशास्त्री यांचे सुपुत्र श्री. भालचंद्रशास्त्री हेही त्याच वेळेला शिक्षण घेत होते. एकप्रकारे श्रीदत्तमहाराजांचे ते सहाध्यायी गुरूबंधूच होते असे म्हटले तरी चालेल. सध्या हे नागेश्वरशास्त्री या पाठशाळेमध्ये प्रध्यानाध्यापक म्हणून काम करीत आहेत. हे नागेश्वरशास्त्री असे सांगतात की आमचे परमगुरुजी श्रृंगेरीजगत्गुरू-श्रीविद्याधिनव-वाळुकेश्वरभारती-स्वामीमहाराज यांनी श्रीदत्तमहाराजांची प्रतिभा, विद्वत्ता, गांभीर्य, सात्त्विकता आणि सदाचार संपन्न स्वभाव पाहून असे उद्गार काढले होते की, 'आपल्या विद्यावंशामध्ये श्रीदत्तमहाराज हे प्रक्षिपक शिष्यरत्न आहे' हे वाळुकेश्वर-भारती-स्वामीमहाराज हे पूर्वाश्रमीचे पंडितप्रवर श्री.विरुपाक्षस्वामी 'हनगळ'या नावाने प्रसिद्ध होते. एका प्रकांड पंडिताने असे उद्गार काढलेले असल्यामुळे या उद्गारांना खूपच महत्त्व आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या सहवासात सुमारे चार वर्षे श्री.भालचंद्रशास्त्री होते. त्यावेळी श्री.भालचंद्रशास्त्रींना काय वाटले हे ते सांगतात,"भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी संपत्तीचे वर्णन केलेले आहे. या दैवी संपत्तीच्या

गुणात दैवीसंपत्तीचे गुण ज्यांच्याजवळ सर्वार्थाने परिपूर्ण रूपात आहेत असे सात्त्विक महात्मे जगात फारच दुर्मिळ असतात. सध्याच्या युगात तर असे महात्मे जगात फारच दुर्मिळ आहेत. परंतु आमच्या भाग्याने या सर्व दवी गुणांनी संपन्न आणि परिपूर्ण अशी महाविभूती आज डोळ्यासमोर आढळते हे विशेष अभिमानास्पद होय. ती थोर व्यक्ती म्हणजे ब्रह्मश्री पूज्य विद्यावाचस्पती श्रीदत्तमहाराज हे आहेत."

पुढे श्री. भालचंद्रशास्त्री असे सांगतात की,"धारवाड येथे पाठशाळेत श्रीदत्तमहाराज सर्वच विद्यार्थ्यांचे आवडते उपदेशगुरू झाले होते. इतर विद्यार्थी त्यांना सहाध्यायी मानत नसत. सर्वच विद्यार्थ्यांना श्रीदत्तमहाराजांबद्दल गुरूबद्दल जो आदर वाटतो, तसा आदर वाटत असे. इतरांच्या बद्दल द्वेषभावना दाखवणारा शब्दही आम्ही कधी त्यांच्याकडून ऐकला नाही. त्यांच्या तोंडून कधी कुणाची निंदा झालेली आम्ही ऐकली नाही. केवळ विद्याभ्यासातच ते रमलेले आहेत असे नेहमीच आम्हाला जाणवत असे."

श्री. भालचंद्रशास्त्री असे सांगतात की आमचे वडील श्री. नागेश्वरशास्त्री नेहमी म्हणत,"श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे जेष्ठाप्रमाणे सर्व गुणांनी अनुरूप असे आहेत.' श्रीदत्तमहाराजांची गुरूभक्ती आणि विद्यानिष्ठा पाहिली म्हणजे आपोआपच सर्व विद्यार्थी नतमस्तक होत असत. 'सद्गुरूःस्वीयशिष्ये स्वीयं साम्यं विधत्ते' या न्यायाला श्रीदत्तमहाराज क्रमेण प्राप्त झाले असे म्हणणे अत्यंत योग्य ठरेल."

बालवयातच श्रीदत्तमहाराजांनी वेदांचा अभ्यास सुरू केला होता. तपस्या, ज्ञान आणि शुचित्त्व या गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व शोभून दिसत असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये पावित्र्य हा महत्त्वाचा गुण होता. 'वेदाभ्यास तपोज्ञानमं' या उक्तीप्रमाणे सात्त्विक गुणांची लक्षणे नेहमीच त्यांच्या ठिकाणी दिसत होती. धारवाड येथे शास्त्रांचे अध्ययन करत असतांना विद्वत सभांमध्ये शास्त्रचर्चा करण्याची संधी श्रीदत्तमहाराजांना अनेक वेळा मिळाली. त्यांनी न्याय आणि वेदान्त या दोन शास्त्रांचे संपूर्ण अध्ययन धारवाडलाच पुरे केलेले होते आणि शिवाय त्यांनी पुढे मीमांसाशास्त्रही अवगत करून घेतलेले होते.

व्याकरणशास्त्र व वेद यांचे ज्ञान तर त्यांना पूर्वीच झालेले होते. यापैकी प्रत्येक शास्त्राच्या अध्ययनाकरिता एक जन्म घालविला तरी ते अध्ययन पूर्ण होणार नाही अशी वस्तुस्थिती असतांना एकाच व्यक्तीने ही सर्व शास्त्रे पूर्णपणे अवगत करून त्यावर प्रभुत्त्व मिळवावे ही गोष्ट खरोखरीच अत्यंत वेगळी अशी म्हटली पाहिजे. श्रीदत्तमहाराज सिद्धप्रज्ञा घेऊनच अवतीर्ण झाले होते. म्हणूनच त्यांना सर्व शास्त्रे अवगत झाली. म्हैसूरच्या विद्वत परिषदेत श्रीदत्तमहाराजांनी जेव्हा भाग घेतला तेव्हा त्यांची बुद्धीमत्ता पाहून मोठमाठ्या विद्वानांनाही खूपच आश्चर्य वाटले असे सांगतात.

पुढे धारवाडहून पुण्याला गेल्यावर तेथील संकेश्वर मठात श्रीशिरोळकर-शंकराचार्य-महाराजांनी श्रीदत्तमहाराजांना अध्यापक म्हणून रहाण्याची विनंती केली. या काळात त्यांच्या बुद्धीमत्तेचा प्रभाव सर्वांनाच जाणवत राहिला. सर्व शास्त्रे व अध्यात्मविद्या त्यांना ऋतंभराप्रज्ञेच्या सहाय्यानेच आत्मसात झाली आहे हे सर्वांनाच जाणवत असे. त्यामुळेच कांचीकामकोटी, श्रृंगेरी, मद्रास, बंगलोर, हैदराबाद, वाराणसी इत्यादी अनेक ठिकाणी झालेल्या विद्वत् सभांमध्ये त्यांना फार मोठी मान्यता मिळाली.

अनेक सद्गुण अंगात असून सुद्धा श्रीदत्तमहाराजांना वैयक्तिक कामना, इच्छा आणि अहंकार या अवगुणांचा कधीही स्पर्श झाला नाही. इतके दैवी संपत्तीचे गुण एकाच व्यक्तीमध्ये असलेले फारच क्वचित दिसून येतात.

श्रीदत्तमहाराज यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते दोषांकडे दुर्लक्ष करून त्या व्यक्तीचे गुणच पहात असत. 'ब्रह्मदृष्टिः उत्कर्षात ।' या व्याससूत्रांच्या शांकरभाष्यात ज्या उपासना पद्धती सांगितल्या आहेत, त्यापैकी एका उपासनेत दोषातही गुणदृष्टीने पहाण्याचा उल्लेख आहे. या उक्तीप्रमाणे श्रीदत्तमहाराजांचे आचरण नेहमीच होते असे दिसते. याबाबतीत एक आठवण श्री.भालचंद्रशास्त्री सांगतात, एकदा एका माणसाने चूक केली. त्या चुकीबद्दल आम्ही त्या माणसावर रागवत होतो. श्रीदत्तमहाराज जवळच होते. ते शांतपणे आम्हाला म्हणाले, "अहो, तुमची सहनशक्ती कितपत आहे हे पहाण्यासाठी त्या मनुष्याने चूक केली असा विचार करा म्हणजे प्रश्न मिटेल." हे त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आमची चूक आम्हाला कळली आणि

आम्हा सर्वांनाच क्षणभर स्वतःची लाज वाटली. दोषातही गुणदृष्टीने पहाणे ही वृत्ती श्रीदत्तमहाराज यांच्यात जितकी विकसित झाली होती, तितकी इतर कोणत्याही व्यक्तीत विकसित झालेली आम्हाला दिसून आलेली नाही.

श्रीमहाराजांच्या वक्तृत्वाबद्दल श्री.भालचंद्रशास्त्री सांगतात, श्रीदत्तमहाराजांच्या वक्तृत्वाला अगदी अध्ययन काळापासूनच बहर आलेला दिसतो. ते मराठीत किंवा कानडीत जितक्या अस्खलितपणे बोलत तेवढ्याच अस्खलीतपणे संस्कृतमध्येही बोलतात. त्याच्या भाषणांचा श्रोत्यांवर अत्यंत प्रभाव पडतो. त्यांना जी वेळमर्यादा दिलेली आहे ती वेळ पाळणे हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा विशेष दिसतो. पाच मिनिटापासून तीन तासापर्यंत जेवढा वेळ त्यांना दिलेला असेल त्या वेळामध्येच त्यांची वक्तृत्वगंगा अत्यंत प्रवाहीपणे वाहत रहाते. दिलेल्या वेळेची मर्यादा ते तंतोतंत पाळत आलेले दिसतात. विषयांची मांडणी अत्यंत तर्कशुद्ध,आखीव व मुद्देसूद करतात. तसे फारच थोड्या विद्वानांना जमते. आपल्या भाषणामध्ये विषयांतर होऊ नये, शिथिलता येऊ नये किंवा असंबद्धता येऊ नये याबद्दल ते पहिल्यापासूनच दक्ष रहात आले आहेत. त्याचप्रमाणे कोणाचेही मन दुखावणारा एक शब्दही त्यांनी कुठल्याही भाषणामध्ये कधीही वापरलेला नाही असे दिसून येते. ते अत्यंत सोपे बोलतात. अगदी सामान्य श्रोत्यालाही विषय कळावा अशारितीने ते बोलतात. आणि तरीही विषयांतर होऊ देत नाहीत किंवा विषयाची प्रगल्भता ढळू देत नाहीत. त्यांच्या भाषणातील प्रत्येक विचाराला वेदान्ताची बैठक असते आणि शास्त्रांच्या सखोल अध्ययनाची परिपूर्ण पार्श्वभूमी असते. शास्त्रे प्रमाण मानून त्यांच्या विचारधारेशी विसंगत एकही वाक्य ते आपल्या भाषणात उच्चारत नाहीत. असा वक्ता दहा लाखात एक असतो. म्हणूनच श्रीदत्तमहाराज अनुपमेय व असामान्य वक्ते आहेत असे म्हणावेसे वाटते.

पुणे येथे श्रीदत्तमहाराजांनी मीमांसा विद्यालयात मीमांसाशास्त्राचे अध्ययन पूर्ण केले. मीमांसा कंठीरव वैद्यनाथ शास्त्रीवर्याचे पट्टशिष्य परमविद्वान सुब्बाशास्त्रीवर्य यांच्याकडे श्रीदत्तमहाराजांनी अध्ययन पूर्ण केले आणि मीमांसाशास्त्रावर प्रभुत्त्व संपादन केले. अशाप्रकारे वेद, व्याकरण,

मीमांसा, न्याय आणि धर्मशास्त्र या अनेक विषयांचा इतका परिपूर्ण अभ्यास असलेले विद्वान आज भारतात एखाद् दुसरेच असतील.

धारवाडच्या पाठशाळेत १९३७ पर्यंत श्रीदत्तमहाराज होते. धारवाडहून घरी वडीलांना पत्र पाठवितांना त्यांनी कित्येक पत्रे संस्कृतमधूनच पाठविलेली आहेत. श्रीधुंडिराजमहाराज हे स्वतःच मोठे व्युत्पन्न पंडित होते. त्यांना संस्कृत भाषा अत्यंत चांगल्या प्रकारे अवगत होती. त्यामुळे आपल्या मुलाची उत्तम संस्कृत पत्रे वाचून त्यांना खूपच आनंद होत असे.

* पुण्याला बिऱ्हाड केले

१९३७ साली श्रीदत्तमहाराज पुण्याला आले. विवाह होऊन सहा सात वर्षे झाली तरी त्यांचे अध्ययन चालूच होते. आता ते अध्ययन पूर्ण झाल्यावर पुण्याला आले. पुण्याला शांकरविद्यापिठात श्रीमद् जगतगुरू- शंकराचार्य, विद्यानृसिंहभारती-शिरोळकरस्वामीमहाराज यांनी श्रीदत्तमहाराजांवर अध्ययनाचे कार्य सोपविले. येथे श्रीदत्तमहाराज न्याय आणि वेदान्त हे विषय शिकवत असत. या विद्यापीठात अध्यापनाची जबाबदारी स्वीकारल्यावर श्रीदत्तमहाराजांनी पुण्यात बिऱ्हाड करायचे ठरविले.

पुण्यात सरदार नातू यांचा कवीश्वर घराण्याशी चांगलाच परिचय होता. सरदार नातूंना श्रीदत्तमहाराजांविषयी अत्यंत जिव्हाळा आणि प्रेम होते. कवीश्वर घराण्याबद्दलच त्यांना अत्यंत आपुलकी होती. त्यामुळे त्यांनी श्रीदत्तमहाराजांना जागा दिली. श्रीदत्तमहाराजांनी भाडे किती द्यावयाचे असे विचारल्यावर सरदार नातू म्हणाले, 'ते पुढे पाहू, आपण येऊन निश्चिंत रहा.' श्रीदत्तमहाराजांनी नातूंच्या घरात बिऱ्हाड केले. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब आणि श्रीदत्तमहाराजांच्या आजी त्या घरात रहावयास आल्या. ही मंडळी आतापर्यंत मोठ्या जागेत रहात असत. वाडीचे घरही मोठे होते आणि धारवाडच्या पाठशाळेचा वाडाही प्रशस्त होता. त्यामानाने पुण्यातील ही जागा लहान होती. एका मोठ्या घराचे एक दालन त्यात काही खोल्या. परंतु ज्या सहजपणे श्रीदत्तमहाराज आणि सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब वाडीला मोठ्या घरात वावरत होते, तसेच लहान घरातही त्यांनी तितक्याच सहजतेने वावर सुरू केला. पुण्यात आल्यानंतर श्रीदत्तमहाराज श्रीगुळवणी-महाराजांना

भेटायला गेले. त्यांनी श्रीगुळवणीमहाराजांचे दर्शन घेतले आणि पुण्याला आल्याचे सांगितले. श्रीशिरोळकर-स्वामींचा आणि श्रीगुळवणी-महाराजांचाही संबंध होताच. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांच्या माध्यमातून परस्परांच्या भेटीचा आणि सहवासाचा योग वारंवार येऊ लागला. श्रीशिरोळकरस्वामी हे मोठे अधिकारी शंकराचार्य होते.

सरदार नातूंच्या वाड्यात पांडुरंग आणि रूक्मिणीच्या सुंदर मूर्ती होत्या. सकाळी काकड आरती होत असे. सायंकाळी आरती आणि शेजारतीही शास्त्रशुद्ध पद्धतीने केली जात असे. यामुळे श्रीदत्तमहाराजांना या घरात रहावयास खूपच समाधान वाटले. पुण्यात श्रीदत्तमहाराज आल्यानंतर काही विद्यार्थी गुरूकुल पद्धतीने शिकायला राहण्यासाठी श्रीदत्तमहाराजांकडे आले. घरी श्रीदत्तमहाराज या विद्यार्थ्यांना शिकवत असत आणि आचार्यांच्या विद्यापीठातही ज्ञानदान करीत असत. त्याशिवाय श्रीदत्तमहाराजांचे अनेक वार्षिक कार्यक्रमही चालूच होते. अमरापूरच्या मठात ते नियमितपणे वर्षातून एकदा भागवतसप्ताह करीत असत. देऊळगावराजालाही ते माता-पित्यास भेटण्यास जात असत, आणि तेथेही त्यांचा भागवतसप्ताह होत असे. वाडीला गुरूद्वादशीला ते जात असत. श्रीमौनीस्वामींच्या उत्सवालाही ते वाडीला जात असत.

श्रीदत्तमहाराज यांचा स्वभाव पहिल्यापासून स्वावलंबी आहे. अनपेक्ष वृत्ती त्यांच्या ठिकाणी पहिल्यापासूनच पूर्णपणे विकसित झालेली दिसून येते. कोणाकडून कसलीही अपेक्षा किंवा तशी इच्छा न करणे हा त्यांचा पहिल्यापासून स्वभाव आहे. आपली कामे स्वतःच करण्याबद्दल ते नेहमी दक्ष असतात. स्वतःला कितीही त्रास पडला तरी चालेल, पण स्वतःच्या कामाचे ओझे दुसऱ्यावर टाकावयाचे नाही ही त्यांची वृत्ती पहिल्यापासूनच दिसून येते. त्यामुळे त्यांच्या गरजा या अत्यंत कमी आहेत असे दिसून येते. परमार्थमार्गामध्ये या अनपेक्ष वृत्तीला खूपच महत्त्व दिलेले आहे. दुसऱ्यांना सेवेची संधी न दिल्यामुळे आपली पुण्यसंपदा सुरक्षित रहाते असे सांगतात. शिवाय अंतर्बाह्य संयम आणि शुचिता राखण्यासाठी हे स्वावलंबन अत्यंत उपयोगी पडते. इतर कोणी काही पाहिजे का असे विचारल्यानंतर नको म्हणणे हा श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव पहिल्यापासून दिसून येतो.

आपल्या कॉफीत साखर घातलेली नाही हेही श्रीदत्तमहाराजांनी कधी इतरांच्या नजरेला आणलेले दिसत नाही. जर एखाद्यावेळी कॉफीत साखर घालायची राहिली तर ती कॉफी ते तसेच पीत असत. जर इतरांनी म्हटले की कॉफीत साखर घातलेली दिसत नाही तर ते म्हणायचे, 'रहाते, एखादेवेळी, त्यात काय सांगायचे?'

श्रीदत्तमहाराजांच्या साधेपणाबद्दल अनेक आठवणी सांगितल्या जातात. एकदा नातूंच्या वाड्यात रहात असतांना सौ.लक्ष्मीबाई एका लग्नाला श्रीदत्तमहाराजांबरोबर गेलेल्या होत्या. श्रीदत्तमहाराज लग्न झाल्यावर परत आले. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब मात्र लग्नघरीच थांबल्या होत्या. विद्यार्थ्यांना शिकवणे, त्यांची व्यवस्था पहाणे हे काम असल्यामुळे श्रीदत्तमहाराज लग्नघरी जास्त वेळ थांबले नाहीत. लग्न लागताच ते घरी परतले. लग्न झाल्यावर इतर विधी व कार्यक्रमांना उपस्थित राहून परत यायला श्री.लक्ष्मीबाई आईसाहेबांना रात्र झाली. श्रीदत्तमहाराज व गुरूकुल पद्धतीने घरी रहाणारे विद्यार्थी यांचा दोन्ही वेळचा स्वयंपाक सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबच करीत असत. त्या दिवशीही संध्याकाळचा सर्वांचा स्वयंपाक घरी जाऊन आपल्याला करायचा आहे हाच विचार सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांच्या मनात होता. सौ.आईसाहेब जेव्हा घरी आल्या तेव्हा जवळ जवळ रात्रीचे नऊ वाजले होते. लग्नघरी कार्याला जमलेल्या मंडळींच्या आग्रहामुळे सौ.आईसाहेबांना लग्नघरातून अगोदर निघता आले नव्हते. आपल्याला फार उशीर झाला याची टोचणी त्यांच्या मनाला लागली होती. गडबडीने भरभर चालत त्या घरी आल्या. परंतु त्या घरी येऊन पहातात, तो काय? विद्यार्थी आणि श्रीदत्तमहाराज यांनी मिळून पिठलं-भात केला होता आणि जेवण करुन, सर्व आवरून विद्यार्थी झोपी गेले होते. श्रीदत्तमहाराज वाचत बसले होते.

*** अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतंव्यथः**

सरदार नातूंच्या वाड्यात रहातांना जागेचा संकोच श्रीदत्तमहाराजांना होऊ लागला. जागा तशी लहान नव्हती. गैरसोयीही नव्हत्या. मालक आणि भाडेकरू यांचे संबंधही अत्यंत जिव्हाळ्याचे होते. परंतु सरदार नातू

श्रीदत्तमहाराजांकडून भाडेच घेईनात. यामुळे जागा सोडून जाण्याचे विचार एकसारखे श्रीदत्तमहाराजांच्या मनात येऊ लागले. श्रीदत्तमहाराजांनी नातूंना विचारले, 'आपण काहीतरी भाडे सांगावे म्हणजे बरे होईल. परंतु सरदार नातूंना कवीश्वर घराण्याबद्दल गुरूतुल्य आदर असल्यामुळे त्यांना काहीही भाडे सांगणे सरदार नातूंच्या जीवावर येत असे. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब श्रीदत्तमहाराजांना म्हणाल्या, 'आपण त्यांना या ना त्या स्वरूपात भेट म्हणून काहीतरी देत जाऊ. जागा चांगली आहे आणि शेजारही चांगला आहे.'

परंतु हा घरातला सल्लाही श्रीदत्तमहाराजांना रुचला नाही. म्हणून कोणालाही न सांगता सदाशिव पेठेतील आगाशे यांच्या वाड्यातील जागा श्रीदत्तमहाराजांनी ठरवून टाकली आणि एके दिवशी सरदार नातूचा निरोप घेऊन ते नव्या जागेत रहायला गेले. 'अनपेक्षः शुचिर्दक्षः' या दैवी गुणांचे दर्शन या घटनेतून होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज अशा सत्पुरुषाचे वर्णन पुढील ओवीत करतात -

आत बाहेरी चोखाळ । सूर्य जैसा उजाळ ।
आणि तत्त्वार्थाचा पायाळ । देखणा जो ॥१२.१७९॥

(भावार्थ : ज्याप्रमाणे सूर्य आतबाहेर निर्मळ असतो, त्याप्रमाणे तो पुरुष आत म्हणजे अंतःकरणात शुचिर्भूत असतो. त्यांच्या मनात मनोमळ म्हणजे रजोगुण किंवा तमोगुण यांतून निर्माण होणारे अनेक दोष आवरण, विक्षेप, असत्प्रवृत्ती, सदेहविपरित भावना असे काही दोष नसतात. ज्ञानभक्तीच्या योगाने असे संत पूर्णपणे रजोगुणरहित आणि तमोगुणरहित होऊन शुद्ध सात्त्विक होतात. बाहेर म्हणजे शरीराच्या ठिकाणीही ते अत्यंत शुचिर्भूत असतात आणि पायाळू माणसाप्रमाणे ते सर्वत्र ब्रह्मतत्त्वरूपी अर्थच पहात असतात.)

ज्ञानभक्तीने सदेह सच्चिदानंद झालेल्या श्रीदत्तमहाराजांसारख्या संतपुरुषाचे निर्मलत्त्व व पवित्रपणा पूर्ण परब्रह्मासारखाच असीम असतो.

श्रीदत्तमहाराजांना पहिला मुलगा झाला. कोडकौतुक झाले. या मुलाचे अत्यंत प्रेमाने आणि लाडाने श्रीदत्तमहाराज आणि सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब

यांनी लालन पालन केले. गुरूकुल पद्धतीने रहाणाऱ्या मुलांचाही हा मुलगा अत्यंत लाडका झाला होता. परंतु दैवाचा घाला पडला आणि चौथ्या वर्षाचा हा मुलगा देवाघरी निघून गेला. या दुःखाची ऊर्मी निर्माण झालीच नसेल असे म्हणता येणार नाही. परंतु हा पुत्रनिधनाचा प्रसंग वैवाहिक जीवनानंतर प्रथमच सहन करण्याचे श्रीदत्तमहाराज आणि सौ. लक्ष्मीबाई आईसाहेब यांच्या नशिबी आले. अनेक मंडळी समाचाराला येत. सौ.आईसाहेबांना दुःख आवरत नसे. पण श्रीदत्तमहाराज सागराप्रमाणे गंभीर असेच दिसत असत.

पुढे श्रीदत्तमहाराजांना कन्या झाली. तिचे सुमन हे नाव ठेवले. पहिला मुलगा झाला तो गेला होता परंतु आता मुलगी झाली. मुलगी झाली म्हणून घरातील सारेजण आनंदित झाले. श्रीधुंडिराजमहाराज व सौ. सरस्वती आईसाहेब यांच्या दुःखावरही या आनंदाने फुंकर घातली. पण श्रीदत्तमहाराज शांतचित्त व गंभीर होते. पहिला मुलगा गेला म्हणून श्रीदत्तमहाराज दुःखाने गलबलून गेलेले दिसले नाहीत. तसेच आता मुलगी झाली म्हणून श्रीदत्तमहाराज हर्षभरीत झाले असेही दिसले नाहीत. 'अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतंव्यथः' या भगवद्गीतेतील बाराव्या अध्यायात वर्णन केलेल्या भक्ताप्रमाणे त्यांचे वर्तन दिसत असे. त्यांचे वागणे पाहून श्रीज्ञानेश्वर-महाराजांच्या पुढील ओव्यांची आठवण येते.

व्यापक आणि उदास । जैसे कां आकाश ।
तैसे जयाचे मानस । सर्वत्र गा ॥१२.१८०॥
संसारव्यथे फिटला । जो वैराग्ये विनटला ।
व्याधाहातोनि सुटला । विहंगम जैसा ॥१८१॥
तैसा सतत जो सुखे । कोणीही टवंच न देखे ।
नेणिजे गतायुषे । लज्जा केवि ॥१८२॥

(भावार्थ : ज्याप्रमाणे आकाश सर्वत्र व्यापक असून सर्वांपासून अलिप्त असते, त्याप्रमाणे त्यांचे मन सर्वांत असूनही सर्वांपासून अलिप्त असते. वस्तू जितकी सूक्ष्म होते, तितकी ती व्यापक होते आणि तितकीच ती अलिप्तही असते. परब्रह्मवस्तू सर्वापेक्षा सूक्ष्म असल्यामुळे ती सर्व व्यापक

असूनही सर्वांपासून अलिप्त ठरली आहे. अशा सर्वव्यापक व उदास परब्रह्माशी ज्ञानवृत्तीने ऐक्य पावलेल्या सत्पुरुषांचे मनही सर्वव्यापक व अलिप्त असते. त्यांच्या मनाची कोठेच आसक्ती नसते. पारध्याच्या हातून सुटलेल्या पक्षांची जशी दुःखातून सुटका होते, त्याप्रमाणे अंतःकरणात विषयवैराग्य बाणल्यामुळे अशा सत्पुरुषांच्या मनांत विषयसुखाची यत्किंचितही आशा नसते. त्यामुळे तो संसाराच्या दुःखातून पूर्णपणे मुक्त झालेला असतो. अशा सत्पुरुषाला आत्म्याचे सतत सुख प्राप्त झाल्यामुळे संसारातील कोणत्याही सुखदुःखाची बाधा होत नाही.)

श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्रींनी कुलस्वामिनीला नवस केला, 'आई रेणुके, वंशाला दिवा हवा. तुझ्या कृपेने काय शक्य नाही? आता जर नातू दिलास तर तुझ्या दारी येईन. नातवाचे जावळ काढून तुझ्या चरणी वाहीन आणि तुझी पूजा बांधीन. खण लुगड्याने ओटी भरेन, आणि पुरणा-वरणाचा स्वयंपाक करून तुला नैवेद्य दाखवीन. आई कृपा कर.' सौ. सरस्वती आईसाहेबांची कुलस्वामिनीवर फार मोठी श्रद्धा होती. या प्रार्थनेला प्रतिसाद म्हणून की काय आजीला नातू झाला. श्रीदत्तमहाराजांना मुलगा झाला. एका शोकातून पार पडावे लागले होते. म्हणूनच सौ. सरस्वती आईसाहेबांनी नातवाचे नाव 'अशोक' असे ठेवले.

हा देवीचा नवस फेडण्यासाठी संधी १९४४ साली आली. अशोक चार वर्षांचे झाले होते. डोक्यावर जावळ वाढलेले होते. यावर्षी श्रीक्षेत्र माहूरला जायचे ठरविले. आपल्या घरातील प्रत्येक गोष्ट श्रीगुळवणीमहाराजांच्या चरणी सादर करण्याची श्रीदत्तमहाराजांची नेहमीची सवय होती. त्यामुळे जावळ काढण्यासाठी श्रीक्षेत्र माहूरला जाणार आहोत असे श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुळवणीमहाराजांना सांगितले, तेव्हा श्रीगुळवणीमहाराज म्हणाले, 'मी आपल्या बरोबर येतो. वडिलांना कळवा.' श्रीदत्तमहाराजांनी वडिलांना पत्र पाठविले. श्रीगुळवणीमहाराज स्वतः बरोबर येणार ही वार्ता ऐकून श्रीधुंडिराजमहाराजांना खूपच समाधान वाटले. त्यांनी गुळवणीमहाराजांना पत्र पाठविले. श्रीधुंडिराजमहाराज या पत्रात लिहितात, 'आपण आमच्याबरोबर स्वतःहून येण्याची इच्छा असल्याची व्यक्त केली म्हणजे

आपण आम्हास आपलेच आप्त समजत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. आपल्या सहवासाने आम्हास संतोष व धन्यता वाटत आहे. आपण अवश्य यावे.'

कवीश्वरांच्या कुळातील नवस फेडण्यासाठी श्रीधुंडिराज-महाराजांबरोबरच श्रीगुळवणीमहाराजही स्वतः आपणहून आले. श्रीगुळवणीमहाराज श्रीदत्तमहाराजांवर मुलाप्रमाणे प्रेम करत होते हेच यातून दिसून येते. श्रीगुळवणीमहाराजांचे श्रीदत्तमहाराज व त्यांच्या कुटुंबीयांवरील प्रेम व वात्सल्य पाहून श्रीधुंडिराजमहाराज व सौ.सरस्वती आईसाहेब कृतार्थ होत होते. श्रीगुळवणी-महाराजांसारख्या थोर सत्पुरुषांच्या प्रेमाच्या छायेमध्ये आपल्याला व आपल्या कुटुंबीयांना आश्रय मिळालेला आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख श्रीधुंडिराजमहाराजांनी अनेक प्रसंगी अनेकवेळा अनेकांच्याजवळ केला आहे. त्यात त्याची धन्यतेची, कृतार्थतेची, समाधानाची भावनाच ओतप्रोत भरून राहिलेली दिसते.

या माहूरच्या यात्रेत श्रीधुंडिराज महाराज, सौ.सरस्वती आईसाहेब, श्रीदत्तमहाराज, चि.सुमन, चि.अशोक आणि श्रीगुळवणीमहाराज होते. विष्णुदासबुवांच्या आश्रमात मक्काम झाला. सर्व नवस यथासांग फेडला. दर्शनही शास्त्रविधीने घेतले. एक प्रकारे ही पवित्र तीर्थयात्राच झाली.

* श्रीशंकराचार्यांच्या सहवासांत

पुण्यातील नारायण पेठेत मुंजाबाचा बोळ आहे. तेथे श्रीशंकराचार्यांचा मठ आहे. श्रीशिरोळकरस्वामी या पीठाचे आचार्य होते. कोल्हापूर, सातारा इत्यादी ठिकाणीही या पीठाचे मठ आहेत. श्रीदत्तमहाराज या मठात अध्यापनाचे कार्य करीत होते. यावेळी दक्षिण भारतातील अनेक विद्वत् संस्थांमधून श्रीदत्तमहाराजांना निमंत्रणे येत असत आणि तेही त्या त्या ठिकाणी जाऊन विद्वत्सभेत भाग घेत असत, विचार मांडत असत. त्यांची विद्वत्ता, अगाध ज्ञान, शास्त्रांवरील प्रभुत्त्व, तेजस्वी व्यक्तिमत्त्व, शास्त्रशुद्ध आचरण आणि नम्रता यांचा सर्व सभांतून प्रभाव पडलेला दिसतो. त्यांचा सर्वत्र गौरवच होत गेला आहे.

श्रीदत्तमहाराजांनी काही काळ काशीला श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रविड यांच्याकडेही अध्ययन केलेले होते. श्रीदत्तमहाराजांबद्दल श्रीराजराजेश्वरशास्त्री

द्रविड यांना विशेष जिव्हाळा आणि प्रेम होते. श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रविड पुण्यात आले म्हणजे श्रीदत्तमहाराजांची आवर्जून भेट घेत असत. तासन्‌तास शास्त्रचर्चा चाले. अशावेळी मोठे आनंदाचे वातावरण निर्माण होत असे. अनेक विद्वानही अशावेळी आवर्जून उपस्थित रहात व या ज्ञानसत्रातील ज्ञानकण वेचत. अनेक विद्वानांनी अशा ज्ञानसत्रातील आनंद सोहळ्याचे वर्णन केले आहे. श्रीगुळवणीमहाराजांचे ज्ञान, भक्ती, शास्त्रशुद्ध आचरण व अध्यात्मक्षेत्रातील अधिकार पाहून श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रविड प्रभावित झाले होते. पंडित श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रविड पुण्यात आले म्हणजे शंकराचार्यांच्या मठातही जात असत आणि आचार्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चाही करीत असत. एकदा आचार्य बोलता बोलता पंडित श्रीराजराजेश्वरशास्त्रींना म्हणाले, आपल्याला वामनरावांच्या योगाच्या अधिकाराबद्दल काय वाटते?

त्यावर क्षणाचाही विलंब न लावता पंडित श्रीराजराजेश्वरशास्त्री म्हणाले, 'वामनराव फार मोठे योगी आहेत. त्यांचा अधिकार फार मोठा असला तरी ओळखता येणे फार कठीण आहे. त्यांनी स्वतःला फार झाकून घेतले आहे. त्यांचा शब्दही व्यर्थ नसतो आणि त्यांची कृती व दृष्टी फार अर्थपूर्ण असते. जो कोणी त्यांच्याकडे शिष्याची भूमिका घेऊन जाईल, त्याचे पूर्ण कल्याण होईल.

यानंतर आचार्यांना अशी इच्छा झाली की श्रीगुळवणीमहाराजांसारखा अधिकारी आपल्या पीठाला उत्तराधिकारी म्हणून प्राप्त व्हावा. म्हणून आचार्यांनी श्रीदत्तमहाराजांतर्फे श्रीगुळवणीमहाराजांना बोलावून घेतले. पीठाचे उत्तराधिकारी होण्याची विनंती मान्य करावी असा आग्रह धरला. वस्तुतः हा मोठाच सन्मान होता. परंतु ही विनंती ऐकून श्रीगुळवणीमहाराज गंभीर झाले. ते नम्रपणे म्हणाले, 'माझ्या गुरूची आज्ञा झाली तरच आपली इच्छा आज्ञा म्हणून मी स्वीकारीन. माझी योग्यता माझ्या गुरूंनाच माहिती आहे. माझ्या सद्‌गुरूंच्या स्मरणातच माझे हे साधे जीवन शेवटपर्यंत राहो, हीच माझी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.'

आचार्यांना श्रीगुळवणी महाराजांचा भाव समजला. श्रीगुळवणी-महाराजांनी आपली इच्छा मानली नाही म्हणून ते नाराज झाले नाहीत.

उलट त्यांचा श्रीगुळवणीमहाराजांबद्दलचा आदर अधिकच वाढला. श्रीदत्तमहाराजांनी हा प्रसंग प्रत्यक्ष पाहिलेला असल्याने त्यांच्या चित्तात श्रीगुळवणी महाराजांच्या संबंधी जो श्रद्धाभाव होता तो अधिकच वाढला.

श्रीदत्तमहाराजांनी श्रीशिरोळकर स्वामीशंकराचार्यांबद्दल एक आठवण सांगितली आहे. काही विद्वानांनी जाणून न घेता श्रीशंकराचार्यांवर काही आरोप केले. या मंडळींनी आरोपाची चर्चा करण्यासाठी एक सभा बोलावली. सभेचा वृत्तांत वृत्तपत्रांत छापून यावा म्हणून त्यांनी या सभेचे अध्यक्ष म्हणून केसरीचे संपादक श्री. ज. स. करंदीकर यांना बोलावले. हे आरोप वस्तुस्थितीला धरून नसल्याने सभा भरवली जाणार असल्याचे वृत्त ऐकून श्रीदत्तमहाराज अत्यंत व्यथित झाले.

श्रीदत्तमहाराजांनी सर्व माहिती घेतली. सभेत कोण कोण येणार आहेत याची माहिती गोळा करुन श्रीदत्तमहाराज आचार्यांच्या मठात आले. त्यांनी अत्यंत मर्यादेने हा सर्व होणारा प्रकार आचार्यांच्या पुढे नम्रतेने मांडला. श्रीदत्तमहाराज आचार्यांना म्हणाले, 'ही सभा श्री.ज. स. करंदीकरांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. मी करंदीकरांची भेट घेता आणि त्यांना सर्व वस्तुस्थिती निवेदन करून या नियोजित अपप्रचार सभेला आपण जाऊ नये अशी विनंती करतो. श्रीदत्तमहाराजांची तळमळ आचार्यांच्या लक्षात आली. पण ते शंकराचार्य होते. परमार्थ मार्गाचे अधिकारी होते. त्यांनी शांतपणे श्रीदत्तमहाराजांना समजावून सांगितले. 'शास्त्रीबुवा आपण म्हणता ते सर्व बरोबर आहे. आपण प्रयत्न केलात तर कदाचित श्री.ज. स. करंदीकर या सभेला जाणारही नाहीत. पण शेवटी जगात निंदक हे रहाणारच.निंदा, द्वेष व मत्सर हे मनोमालिन्याचे गुणधर्म आहेत. पण आपण त्यामुळे चिंतेमध्ये का पडावे? विरोध हा कसोटी आहे. कसोटीचे दुःख कोणाला? स्वतःबद्दल जो साशंक असतो त्याला. ज्याला स्वतःचा विश्वास नाही, त्यालाच विरोधाचे दुःख होते. ज्याप्रमाणे कोणी स्तुती केली म्हणून आपण हुरळून जाणे सिद्धांतात बसत नाही, त्याचप्रमाणे कोणी निंदा केली म्हणून आपण होरपळून जाणे आपल्या तत्त्वाशी विसंगत आहे. आपण माझ्यासाठी अस्वस्थ झालात. यातील आपला भाव मी जाणतो. पण यातही एक रहस्य आहे. आपली

जन्मजन्मांतरीची पापे असतात. या पापांचे क्षालन होण्यासाठीच ईश्वराची योजना असते. जे कोणी आपली निंदा करतात, ते आपली पापे घेतात आणि आपले पापक्षालन होत असते. त्यामुळे खऱ्या मुमुक्षला हा लाभच वाटतो. निंदा सहन करणे हे अग्निदिव्य आहे. त्यामुळे शुद्ध सुवर्णाचे तेजच वाढते. उथळ पाण्यालाच खळखळाट फार असतो. ही सभा झाली काय किंवा न झाली काय? आपल्याला त्याचे काहीही वाटण्याचे कारण नाही.' शंकराचार्यांचे हे विचार ऐकून श्रीदत्तमहाराजांचे मन शांत झाले. त्यांनी नम्रपणे, आचार्यांना वंदन केले आणि ते निघून गेले.

आचार्यांच्या ओळखीने श्रीदत्तमहाराजांना शनिवार पेठेत कन्या शाळेजवळ वर्तकांच्या वाड्यात तिसऱ्या मजल्यावर तीन खोल्यांची जागा भाड्याने मिळाली. या जागेत पुढे श्रीदत्तमहाराज पंचवीस ते तीस वर्षे राहिले. ही जागा श्रीगुळवणीमहाराजांच्या नारायण पेठेतील निवासस्थानापासून पाच सात मिनिटांच्या अंतरावर होती. त्यामुळे जाणे येणे अधिक सुकर झाले आणि दोघांच्यामधील संबंध अधिक घनिष्ठ होत गेले.

इ.स.१९२५ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत विभागात न्यायशास्त्र व मीमांसा या विषयांचे अध्यापन करण्याची नोकरी श्रीदत्तमहाराजांना मिळाली. महिन्याला १६० रुपये पगार ठरला. विद्यापीठाची वेळ सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी चार ते सात असे. शनिवारातील वर्तकांच्या वाड्यापासून विद्यापीठ वाड्यापर्यंत जायला आठ ते दहा मिनिटे लागत असत. वेळ आणि काम याबाबतीत श्रीदत्तमहाराज अत्यंत चोख असत. त्याशिवाय अध्यापनाप्रमाणेच इतरही लेखनाची कामे श्रीदत्तमहाराजांवर विद्यापीठातील अधिकारी सोपवत असत. या कामाबद्दल श्रीदत्तमहाराजांनी कधीही वेगळ्या मानधनाची अपेक्षा ठेवलेली दिसत नाही.

* वासुदेवानंदसरस्वती वाङ्मय प्रकाशन

श्रीटेंबेस्वामींचे वाङ्मय प्रकाशन करावे अशी इच्छा श्रीगुळवणी-महाराजांच्या मनामध्ये निर्माण झाली. त्यांनी हे कार्य श्रीदत्तमहाराजांकडून करून घेतले. याबाबतीत श्रीगुळवणीमहाराज म्हणत, 'श्रीदत्तमहाराजांनी मनावर घेतले म्हणूनच हे विराट कार्य पार पडले. त्यांच्यासारखे तळमळीचे

विद्वान शास्त्री-पंडित होते म्हणूनच बारा खंडांचे पाच हजार पृष्ठांचे हे वाङ्मय प्रकाशित होऊ शकले. आमचे त्यात काय आहे? परंतु श्रीदत्तमहाराज नेहमीच म्हणत असत, 'श्रीगुरूमहाराजांमुळेच हे कार्य घडून आले. त्यांच्या संकल्पाची शक्ती पाठीशी होती म्हणूनच शक्य झाले. तितके हे सोपे कार्य नव्हते. आमचे निमित्त झाले. पण कारण श्रीगुरूमहाराज होते.'

मराठी आणि संस्कृत वाङ्मयात श्रीटेंबेस्वामींच्या साहित्याला असाधारण महत्त्व आहे. श्रीदत्तअवताराच्या उद्दिष्टांवर व कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी श्रीटेंबेस्वामींनी हे लिखाण केले. श्रीदत्तअवताराची वैशिष्ठ्य या वाङ्मयात त्यांनी उत्तमरितीने दाखवली आहेत. श्रीदत्तात्रेय या देवतेचे स्वरूप व कार्य त्यांनी विस्ताराने स्पष्ट केले आहे. या परंपरेची सविस्तर माहिती या वाङ्मयात आहे. लेखन करतांना श्रीटेंबेस्वामींनी वेद आणि पुराणे यातील अनेक कथा व आख्याने सुबोध भाषेत निवेदन केलेली आहेत. आपल्या विचारांच्या मांडणीला पोषक ठरतील असे वेद व पुराण वाङ्मयातील संदर्भ त्यांनी वाचकांपुढे ठेवले आहेत. ज्ञान, भक्ती व कर्म यांच्या समन्वयाची दृष्टी न सोडता आणि योगमार्गाचा वेगळेपणा लक्षात ठेवून त्या संदर्भात श्रीदत्तोपासना त्यांनी साधकांपुढे विशद करून सांगितली आहे. कोठेही अद्वैत अनुभूती व ज्ञानाची बैठक त्यांनी सोडलेली नाही. त्यांनी केलेली अद्वैत वेदान्ताची सुसूत्र मांडणी श्रीआद्यशंकराचार्यांच्या वाङ्मयाची तुलना करावी इतक्या उच्च प्रकारची झाली आहे.

हे सर्व वाङ्मय श्रीस्वामी महाराजांनी सिद्धकोटीतील भावावस्थेत असतांना लिहिले आहे. त्यामुळे साधकांना या वाङ्मयातून चांगले मार्गदर्शन मिळते. हे सर्व लक्षात घेतले म्हणजे या टेंबेस्वामींच्या वाङ्मयाचे प्रकाशन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे असेच म्हणावेसे वाटते. श्रीदत्तमहाराज स्वतः आध्यात्मिक क्षेत्रातील थोर अधिकारी आहेत. अध्यात्मक्षेत्रात सर्वोच्च मानली जाणारी अद्वैत अनुभूती त्यांनी स्वतः घेतलेली आहे. शास्त्रांचा त्यांनी पूर्ण अभ्यास केलेला आहे. संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्त्व आहे. या प्रकाशनाला त्यामुळे एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले आहे.

या प्रकाशन कार्याला इ.स. १९४९ मध्ये प्रारंभ झाला. श्रीगुरूमहाराजांनी मूळ हस्तलिखितांच्या प्रती स्वतःच्या उत्तम हस्ताक्षरात लिहून काढल्या आणि या सर्व साहित्याची योग्य अशी विभागणी केली. मंत्रगर्भस्तोत्रे वेगळी केली. त्यांच्या वैशिष्ठ्यांवर त्यांनी टिपणे तयार करून घेतली. त्यानंतर या मूळ साहित्याच्या प्रती त्यांनी भारतभर अनेक नामवंत पंडितांकडे अभ्यासासाठी पाठवून दिल्या. या पंडितांशी श्रीदत्तमहाराजांनी पत्राद्वारे वा भेटीद्वारे संपर्क साधला आणि या प्रकाशन कार्याची भूमिका त्यांच्यासमोर मांडली. या शास्त्री, पंडितांची या वाङ्मयाच्या प्रकाशनासंबंधी मते, विचार व सूचना श्रीदत्तमहाराजांनी जाणून घेतल्या. अनेक नामवंत शास्त्रीपंडितांनी या वाङ्मयाच्या बारा खंडांना प्रस्तावनाही लिहून दिल्या.

बारा खंडातून पाच हजार पानांचे वाङ्मय फक्त ५१ रुपयात देण्याचा निर्णय श्रीगुरूमहाराजांनी घेतलेला होता. त्याप्रमाणे आगाऊ पैसे भरून नोंदणी करण्याचे आवाहन भारतभर करण्यात आले. श्रीटेंबेस्वामींच्या भक्तशिष्या इंदूरच्या राणीसाहेबांनी काही आर्थिक मदत केली. बाराही खंडांचे प्रकाशक श्रीगुरूमहाराज होते. प्रकाशन समितीचे अध्यक्षही तेच होते. प्रत्येक खंडातून प्रकाशकाचे निवेदनही विस्तृतपणे आलेले आहे. या निवेदनात प्रकाशन कार्याचा हेतू, अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थितीची कल्पना, कार्याची विविध माहिती आणि त्या खंडात असलेली ही प्रकाशकांची विस्तृत व अभ्यासपूर्ण निवेदने वैशिष्ठ्यपूर्ण आहेत. श्रीगुळवणी महाराजांनी श्रीदत्तमहाराजांकडून संपादनाचे, प्रकाशनाचे व वितरणाचे सर्व कार्य पूर्ण करून घेतले. ज्ञानाच्या सर्व बिंदूंना स्पर्श करणारे आणि वेदान्त सूत्रांतील अनुभूतींना स्पर्श करणारे हे वाङ्मय मार्मिक स्पष्टीकरणांसह संपादित करणे, प्रकाशित करणे व त्याच्या वितरणाची सर्व व्यवस्था पाहणे हे कार्य खरोखरच विराट स्वरूपाचे आहे.

या ग्रंथात प्रकाशित झालेली श्रीटेंबेस्वामी रचित स्तोत्रे सिद्ध स्वरूपाची आहेत. या स्तोत्रांचे नित्यपठण करून आपल्या लौकिक आणि पारलौकिक अडचणींवर मात करता येते. अनेक स्तोत्रे मंत्रगभ आहेत. त्यामुळे त्या

स्तोत्रांच्या पठणातून त्या त्या मंत्रांचेही लाभ मिळतात. त्याशिवाय काही मराठी स्तोत्रे, मराठी पदे, आरत्या, भजने आणि अभंगही यामध्ये आहेत.

या बारा खंडामध्ये जी काव्यरचना प्रसिद्ध झाली आहे, त्यामध्ये अनेक बौद्धिक चमत्कारही अनुभवास येतात. 'हारगर्भ मंत्रात्मक श्लोक' या वाङ्मयात अनेक ठिकाणी आहेत. तसेच एकच ओळ उलट सुलट वाचल्यास तसेच शब्द येणारे अनेक श्लोक या वाङ्मयात आहेत. जर प्रत्येक ओवीतील ठराविक अक्षर एकापुढे एक वाचत गेले तर भगवद्गीतेचा संपूर्ण पंधरावा अध्याय वाचावयास मिळतो अशी काव्यरचनाही श्रीवासुदेवानंद सरस्वती-स्वामीमहाराजांनी केलेली आहे आणि ती या खंडामध्ये प्रकाशित झालेली आहे. स्तोत्रातून गुंफलेले आणि ठराविक क्रमांकाच्या अक्षरांनी तयार होणारे अनेक मंत्रही या वाङ्मयात आहेत. या सर्वांचा विचार केला म्हणजे श्रीस्वामीमहाराजांच्या अलौकिक प्रज्ञेचा आणि सिद्धस्थितीचा प्रत्यय देणारे हे वाङ्मय आहे असे म्हणावेसे वाटते.

मंत्रगर्भ रचना हा श्रीस्वामींचा आवडीचा विषय आहे. वेदवाङ्मय हे आपले महत्त्वाचे मंत्रवाङ्मय श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी मंत्रविद्येचे माहेर म्हणून या वेदराशीला संबोधले आहे. उपनिषद पुराणे व इतिहास ग्रंथातही मंत्र आहेत. शिवाय लहानमोठे अनेक मंत्र त्या ठिकाणी धार्मिक व्यवहारात उपयोगात आणले जातात. तंत्रशास्त्र हाही वैदिक संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पूर्वापार चालत आलेली ही सारी वैदिक, पौराणिक व तांत्रिक मंत्रसामग्री श्रीस्वामींना अवगत होती. त्यांचा स्वतःचा अधिकार मंत्रद्रष्ट्या ऋषींचा असल्याने काही नवे मंत्रदेखील त्यांच्या स्मृति-कोशात होते. या सर्व जुन्या व नव्या सामग्रीचा उपयोग करून स्वामींनी ग्रंथरचना किंवा स्तोत्ररचना केली आहे. श्रीस्वामींचा अधिकार व मंत्रगर्भ रचनेची त्यांची प्रवृत्ती लक्षात घेता त्यांच्या शब्दांना वेदतुल्य मंत्रमयता लाभली आहे असेच दिसते. अनेक ठिकाणी सुस्पष्टपणे मंत्रगर्भता आढळते. आपल्या वाङ्मयात श्रीस्वामींनी विपुल प्रमाणात मंत्र-विनियोगही साधला आहे.

अनेक साहित्य कृतींमध्ये श्रीस्वामीमहाराज संकल्पित मंत्राचे एकेक अक्षर संकलित कृतीमध्ये विशिष्ठ स्थानी ठेवून पुढे जातात. वेदपादस्तुती

या रचनेत एक, दोन पदे किंवा पूर्णचरण घेऊनच त्यांनी साहित्यकृती निर्माण केली आहे. वेदांमध्ये देवतांच्या प्रार्थनेसाठी वा आवाहनासाठी असलेल्या स्तुति-रचना श्रीस्वामीमहाराजांनी श्रीदत्ताच्या स्तुतीसाठी उपयोगात आणल्या आहेत. अद्वैतवादानुसार एक परमात्माच सत्य असतो. दुसरी वस्तूच नसते. नावे अनेक असतात. पण ती त्या एका परमात्म्याची वेगवेगळी नावे असतात. श्रीस्वामींची ही शास्त्रीय भूमिका असल्याने ऋग्वेदातील काही निवडक मंत्र घेऊन श्रीस्वामींनी त्यांचा एकान्वय (श्रीदत्तान्वय) करून दाखविला. यारितीने रचनातंत्र पूर्व कोणी हाताळले नव्हते. शब्द वैदिक व अर्थ मात्र पौराणिक हे नवे तंत्र श्रीस्वामींनी आपल्या अनेक साहित्य रचनांमध्ये वापरले आहे. त्यामुळे ते वाङ्मय मंत्रमय बनले आहे. शिवाय वैदिक वाङ्मय व पौराणिक वाङ्मय यांचा समन्वयही घडून आला आहे. वैदिक शब्द घेऊनही विशेषतः ऋग्वेदातील काही प्रतिकात्मक शब्द घेऊन श्रीदत्तात्रेय या अवताराचे वर्णन कसे होऊ शकते हे समर्थपणे श्रीस्वामींनी दाखवून दिले आहे.

वेदांमध्ये कर्म व उपनिषदांमध्ये निर्गुण-निराकार तत्त्व या दोहाचे प्रतिपादन होऊन गेल्यावर पुराणांनी भाविक लोकांसाठी सगुण-साकार भगवंताचा महिमा गायन केला आहे. उपनिषदांचा सगुण-साकार परमात्म तत्त्वाशी साक्षात् काही संबंध असेल असे लक्षात येत नाही. हीच अडचण श्रीस्वामीमहाराजांना दूर करायची होती. त्यासाठी अनेक तंत्रांचा त्यांनी वापर केला. उपनिषदातील केनोपनिषद् उमाख्यान व शिरोळचे भोजन-पात्राख्यान एकाच कुमारशिक्षेत त्यांनी गोवले. उमाख्यानात इंद्रापुढे प्रगट झालेले परब्रह्म शिरोळच्या ब्राह्मणस्त्रीच्या एकान्तप्रेमाने श्रीदत्तरूपात प्रगट झाले असा एकान्वय श्रीस्वामींनी माठ्या कौशल्याने कुमार-शिक्षेत साधून ठेवला. उपनिषदातील निर्गुण निराकार वादाला श्रीस्वामींनी किती कौशल्याने सगुण-साकारतेकडे वळविले आहे. त्यांनी उपनिषदातील माण्डूक्य व ईश ही दशोपनिषदातील दोन लहान उपनिषदे व "अतोदेवा" हा मंत्र निवडला. त्यातील प्रत्येक अक्षर श्रीदत्तमहात्म्याच्या शेवटच्या बारा अध्यायातून (अध्याय ३९ ते ५१) शेवटपर्यंत तिसऱ्या क्रमाने ठेवले. श्रीदत्तमहात्म्याच्या

काही जुन्या मुद्रित प्रतीत ते ठळकपणे छापले आहे. त्यामुळे उपनिषदातील सलग मंत्र वाचता येत असे.

मंत्रगर्भ रचनेचे हे तंत्र किती अवघड आहे व अधिकारी महात्म्यांना ते किती सहजपणे हाताळता येते ते श्रीदत्तमहात्म्यात बघायला मिळते. एकीकडे श्रीदत्तमहात्म्यात येणाऱ्या विविध कथा, त्यांचे संविधानक त्यातील पात्रातील स्वभाववैशिष्ट्ये, कथेचा ओघ या सर्वांचा तोल सांभाळला आहे आणि त्याचबरोबर उपनिषदातील एकेक अक्षर वेचून प्रत्येक ओवीत तिसऱ्या क्रमांकावर ठेवण्याची कामगिरी केली आहे. वेदपादस्तुतीत एक सलग शब्द किंवा एक सलग चरण उचलून ठेवावयाचे होते. त्यापेक्षा ही कामगिरी निश्चित अवघड आहे. हे करत असतांना कथा-वर्णनाचा सारा डोलारा मोडून जाण्याचा संभव होता. श्रीस्वामींच्या आर्षप्रतिभेने हे आव्हान अतिसमर्थपणे पेलले व मराठी सारस्वतात एक नवा वाङ्मयबंध निर्माण करून ठेवला. उपनिषदातील वेचलेली अक्षरे इतर अक्षरांसारखेच समजून वाचतानाही कोणताही विरस तर होत नाहीच. उलट इथे दोन उपनिषदे गुंफली गेली आहेत, हे मुद्दाम दाखविल्यावाचून लक्षात येत नाही. हेच श्रीस्वामींच्या रचनातंत्राचे अपूर्वत्व होय.

वैदिक काळातील मंत्रद्रष्ट्या ऋषींजवळ जी ऋतंभरा प्रज्ञा होती, प्रतिभा होती आणि दिव्यदृष्टी होती तीच प्रज्ञा, प्रतिभा व दिव्य दृष्टी श्रीस्वामींनाही आहे असेच यावरून दिसून येते.

संस्कृत भाषेत त्यातही वैदिक भाषेत, अनुस्वार-विसर्गांची होणारी निरंतर आवृत्ती, काही जोडाक्षरे यांचे प्राकृत रचनेत अवधान ठेवून गुंफ साधणे सोपे नसते. हा विषयच गूढ असल्याने त्यासाठी वापरले जाणारे शब्दही साध्या व्यवहारातील नसतात. अशा अप्रचलित व अप्रसिद्ध शब्दातील घटक अक्षरांना घेऊन प्राकृत रचना उभी करणे हे खरोखरच केवढे दिव्य आहे.

श्रीदत्तमहात्म्यातील एकोणचाळीसाव्या अध्यायातील प्रारंभीच्या सात ओव्या पाहिल्या तरी त्यातून झालेली उपनिषदातील अक्षरांची गुंफण आपले लक्ष वेधून घेईल. हे श्रीदत्तचरित्र मूर्तिमंत परब्रह्म आहे, असे सांगून लगेच श्रीस्वामीमहाराज म्हणतात, ब्रह्म अरूप आहे व कोणाला ते दिसून यत

नाही. परंतु उपनिषदांचे श्रवण, मनन निदिध्यासन केल्यानंतर मात्र ते कळते. हे कळणे सगुण-साकार रूपाचे असते हा श्रीस्वामींचा प्रत्यय असल्यानेच श्रीदत्तचरित्र मूर्तिमंत परब्रह्म आहे असे श्रीस्वामी सांगतात.

उपनिषदांत प्रतिपादन केलेले आत्मतत्त्व निर्गुण-निराकार म्हणजेच काहीतरी शून्याकार तत्त्वासारखे नसून मूर्तिरूपात प्रगटणारे ते तत्त्व आहे असे स्वामी सांगतात. निर्गुण-निराकारवाद व सगुण साकारवाद यांचा अपूर्व समन्वय स्वामींनी घडवला आहे.

भाविकांना मोहरे लावावे, त्यांना भक्ति-प्रेमात न्हाऊन टाकत असतांना वेदोपनिषदातील स्वयंभू मनाक्षरांचाही त्यांना संस्कार घडवावा यासाठी अशा गूढलेखनाची पद्धती श्रीस्वामींनी अंगीकारली.

सप्तशती गुरूचरित्रात मराठीतील गुरूचरित्र ग्रंथाचे सार सातशे ओव्यात सांगितले असल्याने सप्तशती हे अन्वर्थक नाव श्रीस्वामींनी दिले. श्रीमद् भगवद्गीतासुद्धा सातशे श्लोकांची आहे. तिला सुद्धा सप्तशती म्हणतात. सप्तशती गुरुचरित्र व श्रीमद्भगवद्गीता यांचा असा संबंध श्रीस्वामींनी या नामकरणाने आठवून दिला आहे. गीतेप्रमाणे गुरुचरित्र हे त्रिकांडात्मक आहे हे त्यांनी दाखविले आहे. एवढेच करून न थांबता श्रीस्वामींनी सप्तशतीतील प्रत्येक ओवीतील तिसरे अक्षर श्रीमद् भगवद्गीतेच्या पंधराव्या अध्यायातून घेतले आहे व त्याची सुरूवात 'श्रीभगवानुवाच' या वाक्यापासून केली आहे. पंधराव्या अध्यायाचे महत्त्व लक्षात घेऊनच श्रीस्वामींनी श्रीगुरूचरित्रवर्णनात त्याचा गूढ अक्षरसंचार करून ठेवला आहे. गीतोक्त पुरूषोत्तम म्हणजेच श्रीगुरू होत असा भाव पंधराव्या अध्यायाची गुंफण साधून श्रीस्वामींना व्यक्त करायचा आहे.

पार्श्वभूमीत सिंहाचे चित्र रेखाटून एखादी पुरुषाकृती काढली म्हणजे न सांगता पुरुषसिंहाची प्रतिमा मनात साकारते तसे श्रीगुरूचरित्र वर्णन करीत असता पुरुषोत्तमयोगाचा पंधरावा अध्यायदेखील या शैलीने आठवत राहिला म्हणजे दोहोंचा एकभाव मनात जाणवत रहातो.

दोन प्रवाह एकमेकांत खेळवितांना श्रीस्वामींच्या अलौकीक प्रतिभेने दाखविलेली अपूर्वता मनात अधिक भरते. अक्षर गुंफण करीत असता

श्रीस्वामी किती साक्षेपाने अवधान ठेवीत हे सप्तशतीगुरूचरित्राच्या शेवटच्या ओळीवरून लक्षात येईल. इथे गुरूचरित्राला आरती जोडून ग्रंथाचा शेवट केला आहे. शेवट असा -

तारतत्सद्ब्रह्मार्पण। असो संपूर्णाचरण।
दृढ धरुं तव चरण। न मला त्वदन्य शरण॥

गीतेच्या पंधराव्या अध्यायात येणारा शेवटचा चरण आहे - "कृतकृत्यश्च भारत।"

परंतु गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी "ॐ तत्सदिति" असे म्हणून त्या त्या अध्यायाचा नाव वगैरेचा तपशील येतो. श्रीस्वामींची सूक्ष्मदृष्टी ही की 'भारत' या पदातील 'त' हे अक्षर अंतिम मानून चालणार नाही. "ॐ तत्सत्" हाच खरा पंधराव्या अध्यायाचा अंतिम घटक मानायला हवा. म्हणून श्रीमहाराजांनी "तार तत्सद्" असा शेवट केला. यातील तिसरे 'त' अक्षर तत्सद्मधील तकाराचे देखील प्रतिनिधीत्त्व करते. अर्थात ते तिसरे येण्यासाठी 'ॐ' चा पर्यायवाचक तार शब्द श्रीस्वामींनी ठेवला. श्रीस्वामींची अशी ही अद्भुत मंत्र-प्रतिभा त्यांच्या वाङ्मयात ठायी ठायी प्रगट झाली आहे.

एक महत्त्वाचा मंत्रगर्भ म्हणजे 'माघमास महात्म्य' होय. याच्या एकूण तीनशे त्रेचाळीस ओव्या आहेत. यात प्रत्येक ओवीतील पहिले अक्षर वाचले तर श्रीदत्तमाला मंत्र वाचून होतो. श्रीदत्तमहात्म्य व सप्तशती गुरूचरित्र या ग्रंथात मंत्राक्षर तिसऱ्या क्रमांकावर येते, तेथे मात्र पहिल्या क्रमांकावर.

"श्रीदत्तलीलामृताब्धिसार" या ग्रंथांत शेवटच्या लहरीत एकाहत्तर ओवीपासून पुढे पहिल्या ओवीतील पहिले अक्षर घेता - "वासुदेवानंदसरस्वती मुखे मालवदेशी हा निजलीला सिंधु गुरू वदले" हे वाक्य सिद्ध होते तर तिसऱ्या ओवीतील पहिले अक्षर घेता - "श्रीक्षेत्रामध्ये गोविंद यतीश्वर प्रसादाने अवधूतपदी ज्यांचे मन रमले" हे वाक्य सिद्ध होते. पुढे फलश्रुतीच्या ओव्यांतही ओळीचे पहिले अक्षर म्हणजे 'अठराशे एकोणवीस शकि' हे वाक्य तिसऱ्या ओवीतील पहिले अक्षर म्हणजे 'दुष्काल दवतापशान्तये' हे वाक्य होते. चौथ्या ओवीतील पहिले अक्षर म्हणजे 'हा लीलामृतासिंधू निबंध' हे वाक्य होते. चौथ्या ओवीतील शेवटचे अक्षर

घेतले म्हणजे 'शुचीमासी शीत (सित) पक्षि हाय' हे वाक्य होते. याशिवाय या वाङ्मयात श्रीदत्तात्रेयांच्या सोळा अवतारांच्या कथा आणि अनेक आख्याने आहेत. तसेच अनेक स्तोत्रांमध्ये श्रीदत्तात्रेयांबद्दलची श्रीटेंबेस्वामींची भक्तीभावना उत्तमरित्या व्यक्त झाली आहे. श्रीदत्तमालामंत्र, सत्यदत्तकथा, दत्तभावसुधारसस्तोत्र दत्तनामावली, अष्टोत्तर शत दत्तनामे, दत्तसहस्त्र नामावली इत्यादी वाङ्मयाचा समावेश या खंडांमध्ये आहे. तसेच दत्तकवच, दत्तप्रातःस्मरण, पंचपदी, दत्तषोडशोपचार पूजा इत्यादी अनेक रचना या साहित्यामध्ये आहेत. अशारितीने श्रीदत्तात्रेय या देवतेच्या अवताराचे कारण आणि कार्य अत्यंत चांगल्यारितीने या वाङ्मयात विशद करून दाखविले आहेत.

तसेच ही परंपरा प्राचीन काळापासून कशी विकसित होत गेली आहे हेही या ग्रंथात दिसून येते. साधकांना या वाङ्मयामध्ये साधनेसाठी उत्तम प्रकारचे मार्गदर्शन मिळते. जर या वाङ्मयात सांगितलेली उपासना केली तर साधकाला अध्यात्म मार्गावर झपाटाने वाटचाल करणे शक्य होत आणि तो परमार्थात सांगितलेली सर्वोच्च स्थिती गाठू शकतो. पारमार्थिक साधना करणाऱ्या साधकांच्या वाटचालीतील वेगवेगळ्या अवस्थांवर विशेष लक्ष केंद्रीत करून श्रीस्वामीमहाराजांनी हे वाङ्मय लिहिले आहे. त्यामुळे परमार्थात प्रगती करू इच्छिणाऱ्या सर्वांनाच हे ग्रंथ अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व सहाय्य करतात.

श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांचा सर्व मराठी व संस्कृत वाङ्मयाचे प्रकाशन करण्याच्या कार्याला इ.स. १९४९ मध्ये प्रारंभ झाला. इ.स. १९५१ मध्ये विजयादशमीला पहिला खंड प्रकाशित झाला. त्यानंतर जून १९५२ मध्ये दुसरा खंड प्रकाशित झाला आणि क्रमाक्रमाने १९५४ च्या ऑगस्टमध्ये बारावा खंड प्रकाशित झाला. श्रीगुरूदेवांचे चरित्रही श्रीदत्तमहाराजांनी लिहून या बाराव्या खंडाबरोबर प्रकाशित केले. या सर्व ग्रंथाची एकूण पृष्ठसंख्या ५०६० एवढी झाली.

टीपा लिहिणे, प्रेसकॉपी तयार करणे, प्रुफे तपासणे, छापखान्यात हेलपाटे घालणे, झालेले काम गुरूमहाराजांना दाखविणे वगैरे सर्व कामे

श्रीदत्तमहाराजच करीत होते. प्रत्येक खंडाला प्रकाशकांचे निवेदन आहे. निवेदनाखाली श्रीगुरूमहाराजांची सही आहे. पण विशेष असे की, श्रीदत्तमहाराजांनी महाराजांकडे निवेदन मागितले की, श्रीगुरूमहाराज म्हणत, 'तुम्हीच लिहा. आम्हाला लिहिता येत नाही. खाली आमचे नाव घाला म्हणजे झाले.'

श्रीदत्तमहाराजांनी निवेदन लिहून श्रीगुरूमहाराजांना दाखवले म्हणजे त्यातील अक्षरही न बदलता श्रीगुरूमहाराज अत्यंत प्रसन्नतेने त्याला मान्यता देत. अशी सर्व निवेदने लिहून झाली. वाचकांना निवेदन वाचताना श्रीगुरूमहाराजांचे शब्द आपण वाचीत आहोत याचा प्रत्यय येऊन अत्यंत संतोष होतो. ही निवेदन म्हणजे श्रीगुरूमहाराजांचे हृद्‌गत. हे हृद्‌गत लिहिणारे श्रीदत्तमहाराजच आहेत. परस्परांच्या एकरूपतेचा हा आविष्कार आहे.

तीन वर्षात बारा खंड म्हणजे साधारणपणे एका वर्षात चार खंड झाले. याचा अर्थ प्रत्येक तीन महिन्यात एक खंड छापून पूर्ण झाला आहे. तेराव्या खंडात श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज तथा टेंबेस्वामी यांचे चरित्र छापावयाचे ठरले. श्रीदत्तमहाराजांनी हे लेखन अवघ्या एका महिन्यात केले. रात्री ते चरित्राचे लेखन करून ठेवीत. सकाळी ती पाने छापखान्यात पाठवीत व त्या पानातील मजकूर कंपोजला जाई. संध्याकाळी प्रुफे येत. ती तपासून झाली की रात्री श्रीदत्तमहाराज चरित्राचा पुढील मजकूर लिहून ठेवत. सकाळी तो छापखान्यात छपाईला जाई. त्याबरोबर आदल्या रात्री तपासलेली प्रुफेही ते छापखान्यात पाठवत. चरित्राचे सारे लेखन असे एकटाकी झाले आहे. हे पाहिले म्हणजे खरोखरच आश्चर्य वाटते.

एवढे मोठे कार्य करून श्रीदत्तमहाराजांनी या कार्याचा कधीही उल्लेख केलेला दिसत नाही. जणू काही त्यांनी केलेल्या कामाचे स्मरणही नाही असेच ते या संदर्भात वावरत असतात. परंतु या साहित्यातील कोणतेही वाक्य, श्लोक किंवा संदर्भ हा त्यांच्या जीभेवर सतत असतो असे दिसते. हे सर्व वाङ्मय केवळ प्रकाशित झाले असे नाही तर श्रीदत्तमहाराजांच्या स्मृतीमध्ये पूर्णपणे नोंदलेले आहे.

या ग्रंथाच्या विक्रीसाठी आणि प्रचारासाठी श्रीदत्तमहाराज भारतभर खूपच हिंडले. त्या संदर्भातला सर्व पत्रव्यवहारही श्रीदत्तमहाराजांनी सांभाळला. विशेषतः मराठवाड्यामध्ये त्यांनी खूप प्रचार करून या वाङ्मयाची विक्री अनेक ठिकाणी केली. त्यांच्या मातोश्री सौ.सरस्वतीबाई आईसाहेब यांनीही मराठवाड्यामध्ये या वाङ्मयाचा प्रसार करण्यासाठी खूपच परिश्रम घेतले. बारा खंडांचे पाच हजाराहून अधिक पृष्ठसंख्या असलेले छापील वाङ्मय केवळ ५१ रूपयांत दिले गेले. शिवाय श्रीवासुदेवानंद-सरस्वती- महाराजांचे चरित्र हे १३ व्या खंडात प्रसिद्ध झाले आणि वाचकांना मिळाले. हे खरोखरीच अलौकिक कार्य आहे हे मान्य केले पाहिजे. वाङ्मय क्षेत्रातच नव्हे तर परमार्थ क्षेत्रातही हे कार्य फारच मोलाचे आहे. या कार्याबद्दल साधकांच्या मनांत कितीही कृतज्ञता निर्माण झाली तरीही ती कमीच पडेल इतके हे कार्य मोठे आहे. हे विराट कार्य श्रीगुळवणीमहाराजांच्या मार्गदर्शनाखाली श्रीदत्तमहाराजांनी केले. पण या कार्याचा कुठेही व कधीही त्यांनी उल्लेख केलेला दिसत नाही. हे त्यांचे अमानित्त्व विशेष आहे. केवळ अवतारी पुरुष अशा प्रकारचे अमानित्त्व स्वतःच्या अंगी बाणवू शकतो हे येथे नमूद केले पाहिजे.

* अमानित्त्व

श्रीदत्तमहाराजांचे अमानित्त्व या काळातील अनेक घटनांतून उठून दिसते. त्याचा नित्यक्रमही अमानित्त्व व्यक्त करणाराच असे. सकाळी स्नान, संध्या, देवपूजा, जप, श्रीगुरुचरित्राचे सप्ताहवाचन इत्यादी आन्हिक झाल्यावर विद्यापीठात जात असत, विद्यापीठाच्या वेळेपूर्वी सर्व आन्हिके पूर्ण करण्यासाठी पहाटे उठावे लागे. विद्यापीठातून आल्यावर भोजन, विश्रांती, वाचन, लेखन, सायंकाळी पुन्हा विद्यापीठात जाणे. सायंकाळी सातला सायं-संध्या, फराळ, वाचन, लेखन. रात्री १०/११ ला झोप. या स्थूल नित्यक्रमात शेकडो प्रासंगिक कार्यक्रमांची भर असे. भागवताचा सप्ताह असेल, श्रीटेंबेस्वामींची जयंती-पुण्यतिथी असेल, दत्तजयंती असेल, नवरात्र-गणेशोत्सव असेल, प्रपंचातील एखादी अडचण, आजार असेल, श्रीगुरूमहाराजांच्याकडे काही कार्यक्रम असेल, कुठे शास्त्रचर्चा असेल,

कुठे प्रवचन असेल, कोणा साधू-संन्यासी-विद्वानाचा आदर सत्कार असेल, काही कारणपरत्वे परगांवी जाणे असेल, यासारखा कोणता ना कोणता कार्यक्रम ४/२ दिवसांनी श्रीदत्तमहाराजांच्या वाटेला येतच असे.

श्रीदत्तमहाराजांची राहणी अत्यंत साधी असे. पोशाख ठरलेला - धोतर, उपरणे, पायात पादत्राणे नाहीत. चालतांना खाली मान घालून चालणार. हातातील पिशवी पोतडीसारखी भरलेली. कधी कोणाकडे लक्ष नाही. सतत अंतर्मुख वृत्ती. पोतडीत चालू वाचनातील ग्रंथ. आलेली पत्रे, पेन, उत्तरे पाठविण्यासाठी कागद वगैरे. कुठल्याशा लेखासाठी लिहिलेली व लिहावयाची पाने. कधी स्वतःबद्दल बोलणे नाही. संदर्भापुरते बोलणे असे. आवाज कधीही चढलेला नाही. आल्या परिस्थितीला धरून जाणारे, स्वतःच्या जपतप-अनुष्ठानाचा उल्लेख नाही.

ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात अमानित्त्व या गुणाचे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे. या वर्णनातील दोन ओव्या व त्यांचा अर्थ पुढे दिला आहे.

पूज्यता डोळां न देखावी। स्वकीर्ति कानी नायकावी।
हा अमुका ऐसी नोहावी। सेचि लोकां ॥१३.१८८॥
वाचस्पतीचेनि पाडें। सर्वज्ञता तरी जोडे।
परि वेडिबेमाजीं दडे। महिमे भेणें ॥१३.१९०॥

(भावार्थ : आपली पूज्यता आपल्या डोळ्यांनी पाहू नये, आपली कीर्ति आपल्या कानी पडू नये आणि हा अमका अशी लोकांना आठवणही होऊ नये, अशी ज्ञानी पुरुष इच्छा करतो. त्याचे ठिकाणी बृहस्पतीसारखी सर्वज्ञता असते. पण आपली सर्वज्ञता लोकांना कळून आपली महती वाढू नये, असाच तो बाहेर लोकांमध्ये वागतो.)

हे अमानित्त्व कसे असेल हे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात प्रत्यक्ष पहायला मिळते. किंबहुना त्यांचे जीवन श्रीज्ञानेश्वर महाराजांनी वर्णन केलेल्या अमानित्त्व या गुणाचे अतिशय उत्तम उदाहरण आहे.

प्रकांड पांडित्य व विद्वत्ता असूनही त्यांनी कधीही अमानित्त्वाचा गुण सोडला नाही. पुढे उत्तराधिकारी या नात्याने गुरूपदावर आरूढ झाल्याने

श्रेष्ठ व मोठेपणा प्राप्त झालेला असूनही त्यांनी हा अमानित्त्वाचा गुण कायमच राखला व जोपासला असे दिसते.

मी अमका आहे याची इतरांना कल्पनाही येऊ नये असेच ते वागतात. आपले नाव, रूप, मोठेपणा, श्रेष्ठपद, विद्वत्ता लोकांसमोर येऊ नये अशा पद्धतीने वागणेच ते पसंत करतात.

ज्ञान आणि विद्या या क्षेत्रात श्रीदत्तमहाराज सदैव अग्रेसर राहिले. धर्मपरिषद विद्वत्परिषदा, शास्त्रचर्चा यासारख्या अखिल भारतीय पातळीच्या कार्यक्रमांना श्रीदत्तमहाराजांना आवर्जून निमंत्रण असे. या सर्व विद्वत्सभांमध्ये श्रीदत्तमहाराज सर्व विद्वानांचे आदरस्थान असत.

कामकोटीच्या श्रीमद्शंकराचार्यांनी आपल्या मठात भारतातील सर्व विद्वानांना पाचारण करून एक शास्त्रचर्चा आयोजित केली होती. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे आगळे ज्ञानवैभव पाहून आचार्यसहित सर्वच विद्वान स्तिमित झाले. याबद्दल आचार्यांनी श्रीदत्तमहाराजांचा गौरवपूर्वक सत्कार करून त्यांना 'सन्मानपत्र' दिले, हातात सुवर्णकंकण घातले, श्रीफळ, हार व वस्त्रे दिले. इतकेच नव्हे तर आयुष्यभर रूपये पाचशेचे वर्षासनही सुरू केले. त्या सन्मानपत्रात गौरवपूर्व उल्लेख करतांना आचार्यांनी असा विशेष उल्लेख केला की, 'श्रीदत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांचा हा सन्मान केवळ त्यांच्या विद्वत्तेचा नाही. आम्ही विद्वानांचा सन्मान नेहमीच करतो. परंतु कवीश्वर शास्त्रीजींच्या असामान्य विनयवृत्तीचा सन्मान आम्ही करीत आहोत. ज्ञानाची शोभा विनयामध्ये असते. आज या दोन अपूर्व गुणांचा संगम येथे पहावयास मिळाला, याबद्दल आम्ही संतुष्ट आहोत.'

एवढा सन्मान स्वीकारून श्रीदत्तमहाराज पुण्यास आले. श्रीगुरूमहाराजांच्याकडे गेले. नमस्कार केला व शांत उभे राहिले. श्रीगुरूमहाराजांनी विचारले, 'कसा काय झाला कार्यक्रम?' श्रीदत्तमहाराजांनी फक्त ठीक झाला. बरीच मंडळी आली होती. व्यवस्था चांगली होती. अशाप्रकारे माहिती दिली. आपल्या सत्कारासंबंधी एक अक्षरही सांगितले नाही. श्रीगुरूमहाराजांना काहीच कल्पना नसल्याने त्यांनी फक्त ऐकून घेतले. पुढे ७/८ दिवसांनी श्रीदत्तमहाराजांच्या अपूर्व सत्कारासंबंधीची वर्णनपर



श्रीदत्तमहाराज कवीश्वर



श्रीदत्तमहाराज कवीश्वर

पत्रे अन्य विद्वानांकडून श्रीगुरूमहाराजांकडे आली, तेव्हा श्रीगुरूमहाराजांना आश्चर्याचा धक्का बसला. आनंद तर एवढा झाली की, दुसऱ्या दिवशी श्रीदत्तमहाराजांना सपरिवार आपल्याकडे भोजनास निमंत्रण दिले. स्वतः श्रीदत्तमहाराजांचा पुन्हा उत्कृष्ट सत्कार करून हार, श्रीफल, शाल, धोतरजोडी, उपरणे, दक्षिणा आणि सुवर्ण दिले. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेबांची खण-नारळ व शालू देऊन ओटी भरविली. हा कार्यक्रम वैयक्तिक, खाजगी समारंभाने केला. परस्परांच्या हृदय संबंधाची जाणीव देणारा हा प्रसंग होता.

पुढेही भारत सरकारने श्रीदत्तमहाराजांना 'विद्यावाचस्पती' पदवी देऊन राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार केला. त्यावेळी श्रीदत्तमहाराज दिल्लीला जाण्यास तयार नव्हते; पण श्रीगुरूमहाराजांनी आग्रह धरला. श्री. वसंतराव गाडगीळ त्या कार्यक्रमास पुण्याहून जाणार होते हे समजल्यावर त्यांना बोलावून घेतले आणि श्रीदत्तमहाराजांना बरोबर घेऊन जाण्यास सांगितले. त्या ठिकाणी गेल्यावरसुद्धा श्रीदत्तमहाराज अत्यंत साधेपणेच राहिले. त्यांचा हा सामान्य साधेपणा श्री.वसंतरावांनी पुण्यास आल्यावर श्रीगुरुमहाराजांना विदित केला.

* मद्रासमध्ये झालेला गौरव

ज्योतिषपीठावर श्रीरामचंद्र तीर्थस्वामी (भडीगडीमाठ) यांनी मद्रासमध्ये विद्वत् सभा बोलाविली होती. या सभेसाठी चारही पीठातील विद्वान मंडळी आली होती. या सभेत नवीन व्यंकटेशशास्त्री आले होते. कर्नाटकचे नवीन व्यंकटेशशास्त्री हे न्याय, मीमांसा, वेदान्त, व्याकरण या चारही शास्त्रांत प्रकांड विद्वान पंडित होते. त्याच्यापुढे कोणीही शास्त्रचर्चा करण्यास धजत नसत. त्यांच्यापुढे कोणीही टिकाव धरणारे नव्हते. या विद्वत् सभेला जाण्यापूर्वी श्रीदत्तमहाराजांनी अद्वैत सिद्धांतावरील महाक्लिष्ट अशा खडणखडखाद्य ग्रंथाचा अभ्यास केला आणि त्यातील विषय सभेत नवीन व्यंकटेशशास्त्री याच्यापुढे मांडला. श्रीदत्तमहाराजांची ही अपूर्व तयारी महाक्लिष्ट ग्रंथाचेही अध्ययन-क्लिष्ट विषय निवडीचे धारिष्ट्य, विषय प्रतिपादनानेचे मुग्ध करणारे प्रतिपादन इत्यादी गुण पाहून नवीन व्यंकटेशशास्त्री श्रीदत्तमहाराजांच्यावर अतीव प्रसन्न झाले आणि भरसभेत

त्यांनी स्वतः श्रीदत्तमहाराजांची स्तुती आणि प्रशंसाही केली आणि उचित शब्दात श्रीदत्तमहाराजांचा गौरव केला.

❊ श्रीधुंडिराजमहाराज यांची भैमरथ शांती व अमृत महोत्सव

विदर्भ आणि मराठवाड्यात श्रीधुंडिराजमहाराजांचा मोठा शिष्य परिवार आहे. या शिष्य मंडळीनीं श्रीधुंडिराजमहाराजांची इ.स. १९४६ मध्ये षष्ठ्यब्दो शांती नाशिक येथे संपन्न केली. श्रीदत्तमहाराजांनी या कार्याचे सूत्र संचालन केले. इ.स. १९५६ मध्ये श्रीधुंडिराजमहाराजांची भैमरथ शांती देऊळगावराजा येथे करण्यात आली. श्रीदत्तमहाराजांच्या मार्गदर्शनाखालीच विदर्भ आणि मराठवाडा भागातील श्रीधुंडिराजमहाराज यांना स्वामी शंकराचार्य-श्रीशिरोळकर-महाराज यांनी भक्तरत्न ही पदवी दिली. अनेक धार्मिक अनुष्ठाने झाली. विपुल प्रमाणात अन्न संतर्पणही झाले. श्रीधुंडिराजमहाराजांच्या अमृत महोत्सवाचा सोहळाही देऊळगावराजा येथे मोठ्या प्रमाणावर संपन्न झाला.

❊ श्रीगुळवणीमहाराज यांची भैमरथ शांती व अमृतमहोत्सव

श्रीगुळवणीमहाराजांची भैमरथ शांती व अमृत महोत्सव इ.स. १९५७ मध्ये श्रीदत्तमहाराजांनी पुढाकार घेऊन माठ्या प्रमाणावर साजरा केला. श्रीगुळवणीमहाराज या महोत्सवाला संमती देत नव्हते. परंतु श्रीदत्तमहाराजांनीच श्रीगुरूमहाराजांचे मन वळवून त्यांची संमती घेतली. या निमित्ताने श्रीगुरूमहाराजांचे चरित्र प्रसिद्ध करण्यात आले. तसेच शक्तीपात योगाच्या मार्गाचेही उत्तम विवेचन या प्रसंगाच्या अनुरोधाने प्रकाशित झाले. वाडीला या महोत्सवाचा एक भाग झाला. पुण्यालाही हा महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा झाला. अनेक धार्मिक अनुष्ठाने झाली. अनेक विद्वान पंडितांनी या उत्सवात भाग घेतला. पंडितजी सातवळेकर, श्री. कुवलयानंदजी, श्री. लोकनायक आणे, श्री. सोनोपंत दांडेकर, श्री.बाळशास्त्रीहरदास, श्री. दत्तोवामन पोतदार -असे अनेक थोर पुरूष आणि विद्वान या समारंभाला उपस्थित राहिले. श्रीगुरूदत्तयोग या ग्रंथाचे प्रकाशनही या समारंभात झाले. हा सर्व सोहळा श्रीदत्तमहाराजांच्या नियोजनाप्रमाणे आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा होत होता. परंतु

हा सोहळा साजरा होत असतांना श्रीदत्तमहाराज शांतपणे, नम्रपणे व अलिप्तपणे या समारंभामध्ये वावरतांना लोकांना दिसत होते. सर्व मार्गदर्शन व नियोजन श्रीदत्तमहाराजांचे असूनही अमानित्त्वाची भावना पूर्णपणे जपून श्रीदत्तमहाराजांनी ही कार्ये पार पाडली हे सर्वांनाच जाणवत राहिले.

* सुख - दुःखे समेकृत्वा

सुख-दुःख, हर्ष-खेद, आनंद-निरानंद अशा द्वंद्वांच्या पलीकडे जाणे हा परमार्थाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. वेदान्ताचे हे एक महत्त्वाचे सूत्र आहे. श्रीदत्तमहाराजांनी अगदी लहानपणापासून द्वंद्वांच्या पलीकडे असलेली मनोवृत्ती आणि समत्त्वभाव प्रगट केलेला आहे असे दिसून येते. जीवनात जरी दुःखाचे प्रसंग आले तरी दुःखी न होणे आणि सुखाचे प्रसंग जरी आले तरी त्या सुखात व आनंदात न बुडून जाणे हे स्थितप्रज्ञ स्वभावाचे महत्त्वाचे लक्षण आहे. श्रीदत्तमहाराजांसारख्या अवतारी पुरुषाच्या जीवनात असे अनेक प्रसंग दिसून येतात. यापैकी दोन प्रसंग मुद्दाम सांगावेसे वाटतात.

इ.स. १९५७ च्या जून आणि जुलैमधील एक अत्यंत दुःखद घटना आहे आणि एक अत्यंत सुखद घटना आहे. या दोन्ही घटनांच्या प्रसंगी श्रीदत्तमहाराजांनी अत्यंत अलिप्तपणे, शांतपणे आपली मनोवृत्ती स्थितप्रज्ञ रूपातच प्रगट केलेली दिसते.

श्रीदत्तमहाराज वाडीला भागवतसप्ताह करण्यासाठी गेलेले होते. इकडे पुण्यात फ्ल्यूची साथ सुरू झाली. या साथीमध्ये श्रीदत्तमहाराजांच्या घरचे सर्वजण आजारी पडले. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब आणि मुले सर्वच तापाने अंथरूणाला खिळले. जेव्हा श्रीगुरूमहाराजांना ही वार्ता समजली, तेव्हा ते स्वतः श्रीदत्तमहाराजांच्या घरी रोज जाऊ लागले. त्यांनी औषधपाण्याची सर्व व्यवस्था केली. सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब या आकस्मिक आजारपणामुळे खचून गेल्यासारख्या झाल्या. परंतु श्रीगुरुमहाराज त्यांना रोज भेटून धीर देऊ लागले.

मुलांमध्ये चि. शोभाचा ताप विशेष वाढत चालला. डॉक्टर रोज येऊन तपासणी करून उपचार करतच होते. परंतु जेव्हा चि. शोभाचा ताप बराच वाढला, तेव्हा डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे चि.शोभाला हॉस्पिटलमध्ये दाखल

करावे लागले. पुणे स्टेशनच्या पलीकडे संसर्गजन्य रोगाचे एक हॉस्पिटल आहे. तेथे चि. शोभाला ठेवले होते. श्रीगुरूमहाराजांनीच ही सर्व व्यवस्था केली होती. ते रोज या पुणे स्टेशनच्या पलीकडे असलेल्या संसर्गजन्य रोगाच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन येत होते आणि घरी येऊन सौ.आईसाहेबांना धीर देत होते. वाडीला श्रीदत्तमहाराजांना ही वार्ता कळवलेली नव्हती. कारण श्रीदत्तमहाराज भागवतसप्ताहाच्या पारायणामध्ये होते. सप्ताह अर्धवट सोडून येता आले नसते. त्यामुळे त्यांना ती वार्ता कळूनही उपयोग झाला नसता आणि श्रीदत्तमहाराज जरी इथे नसले तरी श्रीगुरूमहाराज आवश्यक ती सर्व व्यवस्था स्वतः करीत होते.

सौ.आईसाहेबांना काही सुचत नव्हते. या फ्ल्यूच्या तापामुळे सर्वांनाच खूपच थकवा आला होता. सर्वांचेच हात पाय दुखत होते. सौ.आईसाहेबांना तर दोन पाऊले पुढे टाकण्याचीही शक्ती वाटत नव्हती. त्यामुळे त्या चि.शोभाला हॉस्पिटलमध्ये भेटायला जाऊ शकत नव्हत्या. त्यांच्या मनाचा अतिशय कोंडमारा होत होता. घरातील मुलांच्या आजारपणामुळे आणि चि. शोभाच्या हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याच्या वार्तेमुळे त्या खूपच खचून गेल्या होत्या. रोज त्या श्रीगुरूमहाराजांची वाट पहात. श्रीगुरूमहाराज आले आणि चार धीराचे शब्द सांगितले की सौ.आईसाहेबांना तेवढेच हलके वाटे. श्रीगुरूमहाराज हॉस्पिटलमध्ये गेल्यावर चि.शोभाशी बोलत. ती सुद्धा आईची आणि भावंडांची चौकशी करत असे. श्रीगुरूमहाराज तिलाही तेथे धीर देत होते.

शेवटी चि. शोभावर काळाने घाला घातला. चि.शोभा मृत्यूमुखी पडली. फारच गंभीर प्रसंग होता. श्रीगुरूमहाराज प्रथम घरी गेले आणि सौ.आईसाहेबांना म्हणाले, 'आज आपण शोभाला भेटून येऊया.' मनाचा धीर करून सौ.आईसाहेब तीन मजले खाली आल्या. श्रीगुरूमहाराजांच्या बरोबर शोभाला भेटायला निघाल्या. तोपर्यंत श्रीगुरुमहाराजांनी ही दुःखद वार्ता सांगितलेली नव्हती. परंतु आता सांगणे आवश्यक होते. श्रीगुरूमहाराजांनी हलक्या शब्दात सौ.आईसाहेबांना असे सांगितले की शोभाची प्रकृती फारच बिघडली आहे. म्हणून मी तुम्हाला तेथे नेत आहे.

सौ.आईसाहेबांना शंका आली. त्यांनी ती बोलून दाखविली. पण श्रीगुरूमहाराज स्वस्थ बसले. सौ.आईसाहेबांना सर्व परिस्थितीची कल्पना आली. त्यांना रडू आवरेना.

हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर सौ.आईसाहेबांनी आपल्या मुलीचा मृतदेह पाहिला. त्यांना दुःख आवरेना. त्यांनी शोभाला कुरवाळले. मिठी मारली आणि त्या मोठमोठ्याने रडू लागल्या. श्रीगुरूमहाराज त्यांना आवरत होते. त्यांच्या पाठीवरून हात फिरवत होते. श्रीगुरूमहाराजांच्या डोळ्यांतूनही अश्रुधारा वाहत होत्या. हा दुःखाचा आवेग कमी होणारा नव्हता. म्हणून थोड्या वेळाने श्रीगुरूमहाराजांनी सौ.आईसाहेबांना बाजूला घेतले आणि ते म्हणाले, आपण आता घरी जाऊया. मी परत येतो. अशा स्थितीत शोभाला तिकडे आणणे बरे नाही. लहान मुलांना ते पाहवणार नाही. इकडेच अंत्यसंस्कार करून मी घरी येतो. जड अंतःकरणाने सौ.आईसाहेब श्रीगुरूमहाराजांच्या बरोबर घरी आल्या. श्रीगुरूमहाराजांनी चार मंडळी बरोबर घेतली आणि चि. शोभाचे अंत्यसंस्कार पूर्ण करून ते घरी आले.

याचवेळी वाडीला श्रीदत्तमहाराजांना एक स्वप्न पडले. त्यांनी असे पाहिले की काही काळी सावल्यांसारखी दिसणारी माणसे घरात शिरली आणि त्यांनी देवघरात जाऊन देवांना स्पर्श केला. तेव्हा पुण्याला काहीतरी अशुभ घडलेले आहे हे श्रीदत्तमहाराजांच्या लक्षात आले.

वाडीचा सप्ताह संपला त्याचदिवशी श्रीदत्तमहाराजांच्या हातात श्रीगुरूमहाराजांचे पत्र पडले. श्रीदत्तमहाराज पुण्याला आले. घरी गेल्यानंतर हा दुर्धर प्रसंग त्यांच्यासमोर उभा राहिला. पुण्याहून जाताना असे काही घडेल अशी काही कल्पना कुणालाही नव्हती. श्रीदत्तमहाराजांना तर नव्हतीच नव्हती. अवघ्या एका आठड्याच्या काळात होत्याचे नव्हते झाले होते. श्रीदत्तमहाराजांना किती दुःख झाले असेल हे सांगणे खूपच अवघड आहे. परंतु हे दुःख त्यांनी बाहेर व्यक्त केले नाही. त्यांनी सर्व परिस्थितीला गंभीरपणे तोंड दिले. श्रीज्ञानेश्वरीमध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी असे म्हटले आहे की आकाश गंभीर असते आणि म्हणूनच वायू आणि मेघ ते सहन करते. सागर गंभीर असतो म्हणूनच सारे जलचर व लाटा तो सहन करतो. पृथ्वी गंभीर

आहे म्हणूनच ती सारे सहन करते. ही तितिक्षा अवतारी पुरुषाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग दिसते. अशा कठीण प्रसंगी तर ही तितिक्षा विशेष डोळ्यात भरते. श्रीदत्तमहाराजांच्या समाचाराला अनेक व्यक्ती येत होत्या. श्रीदत्तमहाराज म्हणत,"एवढाच ऋणानुबंध आहे म्हणून असे घडले." मृत्यू मानवी प्रयत्नाने कां थांबविता येणार आहे? घरच्या कोणालाच तिचे काही करता आले नाही पण श्रीगुरूमहाराजांनी तिचे सर्व काही केले आणि ते तिच्या भाग्यानेच घडले. "तिच्या आईच्या दुःखापुढे आमचे दुःख काय?" जाताना तिने काही आणायला सांगितले होते. घाईने येण्याच्या गडबडीत आणता आले नाही. तिने सांगितलेल्या वस्तू आणल्या असत्या तर त्या वस्तुंकडे पाहूनही फार दुःख झाले असते. म्हणून देवाने त्या वस्तू आणू दिल्या नाहीत असे श्रीदत्तमहाराज बोलले. त्यातून त्यांची मनःस्थिती, त्यांचा विवेक आणि संयम दिसून येतो. आपल्या सुखाच्या किंवा सत्काराच्या घटनाही त्यांनी कुणाला सांगितल्या नाहीत, त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील दुःखाचे किंवा आघाताचे प्रसंगही त्यांनी कुणालाही कधी सांगितले नाहीत. काही सांगणे अत्यंत अनिवार्य होते, अशाच प्रसंगी ते बोलत. पण ते सांगण्यात संयम असे.

या दुःखद घटनेनंतर एक महिन्याच्या आतच एक दुसरी विशेष घटना घडली. ही घटना अत्यंत सुखाची होती, सन्मान आणि सत्काराची होती. कांचीकामकोटीच्या श्रीजगद्गुरू शंकराचार्यांकडून पुण्याच्या पत्त्यावर सुवर्णकटकाचे पार्सल व श्रीजगद्गुरूचे श्रीमठ निर्वाहकांतर्फे पत्र आल. विद्वतसभेत न्यायवेदान्त शास्त्रावर झालेल्या चर्चेत श्रीदत्तमहाराजांनी भाग घेऊन अशा पद्धतीने आपले मुद्दे मांडले होते की त्यांचे स्वतःचे अलौकिकत्त्व सिद्धच झाले होते, ऐकणारे अनेक मोठेमोठे विद्वान मंत्रमुग्ध झाले होते. एवढे असूनही श्रीदत्तमहाराज अत्यंत विनयशील राहिले होते. आपल्या विनयशील आचरणाने सर्वांच्या हृदयात त्यांच्याबद्दल आदर आणि श्रद्धा निर्माण झाली होती. त्यामुळे प्रसन्न होऊन श्रीजगद्गुरूंनी श्रीदत्तमहाराजांचा मोठा सन्मान केला होता. ही वार्ता सुखद होती. श्रीसद्गुरु कृपेचे फळ आहे ही त्यांची श्रद्धा होती आणि ती श्रद्धा त्यांनी श्रीगुरूमहाराजांना ही वार्ता कळवण्यासाठी लिहिलेल्या पत्रातून स्पष्ट झालेली दिसते.

दुःखद प्रसंगात जी गंभीरता त्यांच्या चित्तात आढळून येते, तीच गंभीरता अशा सुखद प्रसंगातही दिसून येते. सर्वकाही जे घडते, ते ईश्वराच्या सत्तेनेच घडत असते. यामुळे या दोन्ही अवस्थांमध्ये ईश्वरी न्याय आणि ईश्वराचे दयाळुत्त्व, ममत्त्व या ईश्वरी गुणांचेच दर्शन घडले असे ते सांगतात.

श्रीजगद्गुरूंचे पत्र व 'सुवर्णकटक' जेव्हा पुण्यात आले, तेव्हा श्रीगुरूमहाराज सोलापूरला होते. ते वृत्त श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरूमहाराजांना कळविले. पहिले दुःख असतांनाच ते सुवर्णकटक आले. त्यामुळेच श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून शब्द निघाले,"ईश्वराजवळ जसा न्याय आहे, तशी दयाही आहे. त्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी ह दिले. त्याच्या सत्तेने सर्वकाही घडत असते."

श्रीदत्तमहाराज शंकराचार्यांच्या पत्राचे उत्तर लिहितांना म्हणतात, "हा प्रसाद भावी सौभाग्य फलाचे चिन्ह आहे. आपला श्रीप्रसाद म्हणजे अहंकाराचा नाश करणारे वज्रच आहे. आचार्यांनी सांगितल्याप्रमाणे दोष निवृत्ती करून गुणांचे तेज वाढविणारे संस्कार माझ्या मनावर निरंतर होत राहोत, क्रमाक्रमाने अज्ञानाने झाकलेले डोळे उघडोत, श्रेष्ठ बुद्धी प्राप्त होवो, त्यामुळे पुढील कुठल्यातरी जन्मात चिदानंदरूपी शिवपदाचा साक्षात्कार होण्याची योग्यता प्राप्त होवो ही स्वामीचरणी पदर पसरून प्रार्थना करीत आहे.''

श्रीदत्तमहाराजांनी शंकराचार्यांना जे पत्र लिहिले त्या पत्रातील ही शेवटची वाक्ये आहेत. श्रीदत्तमहाराजांसारख्या अवतारी पुरुषाने स्वतःच्या अंगी श्रीआद्यशंकराचार्यांसारखीच ज्ञान, कर्म व भक्ती यांची सर्वोच्च पातळीवरील एकात्मता लाभली असतांनाही इतकी लीनता, नम्रता व अहंकारहीनता मनांत बाळगावी आणि ती आद्यशंकराचार्यांच्या पीठावर असलेल्या जगत्गुरूंच्या चरणी कृतज्ञतापूर्वक व्यक्त करावी हे खरोखरच अपूर्व आहे.

* शक्तिपात दीक्षा

श्रीदत्तमहाराजांचे मोठेपण श्रीगुळवणीमहाराजांनी कधीच ओळखले होते. म्हणून त्यांनी आपल्या जीवनात श्रीदत्तमहाराजांना वगळून कधीही काही केले नाही. स्वतः श्रीगुळवणीमहाराजांनी सदैव श्रीदत्तमहाराजांना अत्यंत मानाने आणि आत्मियतेने वागवले होते आणि आपले सर्वस्वच

दिले होते. श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना उत्तराधिकारी नेमले यात ही दृष्टी स्पष्ट होते.

श्रीगुरूमहाराजांना एकदा सोलापूरचे श्री. वैद्यमास्तर म्हणाले होते, 'आपल्या या शक्तीपात विद्येला आपल्यानंतर श्रीदत्तमहाराजच योग्य अधिकारी दिसतात.' त्यानंतर काही दिवसांनी इ.स. १९५७ मध्ये श्रीदत्तमहाराजांना श्रीगुरुमहाराजांनी शक्तीपात दीक्षा दिली. ही हकीकत अशी आहे. सज्जनगडावर श्रीधरस्वामींचा मुक्काम होता. श्रीधरस्वामींचे आणि श्रीदत्तमहाराजांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. गडावर दासनवमीचा उत्सव चालू होता. श्रीधरस्वामींनी श्रीदत्तमहाराजांना गडावर येण्याचे निमंत्रण पाठविले. श्रीदत्तमहाराजांची प्रकृती तितकीशी चांगली नव्हती. परंतु स्वामींचा निरोप आला म्हणून ते श्रीगुरूमहाराजांना भेटले आणि काय करावे म्हणून त्यांनी आज्ञा मागितली. श्रीगुरूमहाराजांनी सांगितले, 'स्वामींचा निरोप आला आहे तर आपण अवश्य जावे. गडावर श्रीसमर्थांच्या समाधीजवळ पहाटे आपण बसलात की बरे वाटेल.' त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे आईवडील पुण्यातच होते. तेही म्हणाले, 'संतांचे बोलावणे आहे तेव्हा जरुर जावे.'

आपली प्रकृती ठीक नसतांनाही श्रीदत्तमहाराज केवळ श्रीगुरूमहाराजांची आणि मातापित्यांची आज्ञा म्हणून सज्जनगडावर निघाले. सज्जनगडावर पायथ्याशी आल्यावर त्यांना गड चढणे अवघड वाटू लागले म्हणून त्यांनी श्रीधरस्वामींना निरोप पाठविला,'आपल्या आज्ञेप्रमाणे पायथ्यापर्यंत आलो आहे. प्रकृती ठीक नाही, तेव्हा काय करू?' स्वामींचा निरोप आला, 'डोली करून वर यावे.' इतका आग्रहाचा निरोप ऐकल्यावर श्रीदत्तमहाराजांनी गडावर जाण्याचे ठरवले, त्यांच्या स्वभावाला अनुसरून डोली न करता श्रीदत्तमहाराज हळूहळू पायीच चढून गडावर गेले. रात्री विश्रांती झाली. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांना आठवले की श्रीगुरूमहाराज म्हणाले होते, पहाटे समर्थांच्या समाधीजवळ बसावे म्हणजे बरे वाटेल. सद्गुरूचा शब्द होता, त्याप्रमाणे पहाटे श्रीदत्तमहाराज तशाही स्थितीत स्नान करून श्रीसमर्थरामदासांच्या समाधीजवळ बसले. श्रीगुरूमहाराजांनी

आपल्याला पहाटे बसायला सांगितले होते, यामध्ये श्रीगुरूमहाराजांचा काहीतरी हेतू असेल हे श्रीदत्तमहाराजांच्या लक्षात आले.

त्याच रात्री पहाटे उठण्यापूर्वी श्रीदत्तमहाराजांना एक स्वप्न पडले. या स्वप्नांत श्रीदत्तमहाराजांना श्रीगुरूमहाराजांचे दर्शन झाले. श्रीगुरूमहाराज म्हणाले, बसा. श्रीदत्तमहाराज त्यांना नमस्कार करून बसले. महाराज त्यांच्याजवळ आले व त्यांनी श्रीदत्तमहाराजांच्या भ्रूमध्याला स्पर्श केला आणि श्रीगुरूमहाराज अदृश्य झाले. स्वप्नातच क्रिया सुरू झाली. तेव्हा श्रीदत्तमहाराज जागे झाले. या स्वप्नावरून ईश्वरइच्छा काय आहे हे श्रीदत्तमहाराजांच्या ध्यानी आले.

पहाटेच्या स्वप्नाने ही दीक्षा आहे हे निश्चित केले होते. श्रीगुरूमहाराजांचा सहवास अनेक वर्षे त्यांना मिळाला होता. शक्तीपात योग मार्गाची त्यांना चांगली माहिती होती. त्यामुळे दीक्षा घेण्याची संधी आलेली आहे हे त्यांनी ओळखले. सज्जनगडावरील समर्थांच्या समाधीजवळ पहाटे दीक्षा अनुग्रहासाठी श्रीगुरूमहाराजांचा आदेश व दृष्टांत म्हणून श्रीदत्तमहाराज बसले. त्यांना शक्तीसंचाराचा अनुभव पहिल्याच दिवशीच्या बैठकीत आला. ते बैठकीला बसल्यावर मांडी आवळली जाऊन रुंद झाली. पाठीचा कणा ताठ झाला. शरीरात कंप निर्माण झाला. पूरक व रेचक जोरात होऊ लागले. नंतर कुंभकही होऊ लागला. कुंभक होताना व त्याच स्थितीत राहिल्यावर अत्यंत सुखद स्थिती आली. प्राणायामांच्या आठ प्रकारांपैकी 'उज्जायी' हा प्राणायामाचा प्रकार आपोआप घडला. प्राणायामामुळे प्रकृती चैतन्यमय झाली. अशक्तपणा नाहीसा झाला. ताप पुन्हा आलाच नाही. त्यामुळे बैठकीनंतर उत्सवाच्या कार्यक्रमात श्रीदत्तमहाराजांना उत्साहाने भाग घेता आला. शक्तिपात साधनेने मनाला शांतता व स्थिरता येते आणि शरीरातील दोष निघून जातात. शरीर उत्साही आणि हलके बनते असा अनेकांचा अनुभव आहे. हाच अनुभव श्रीदत्तमहाराजांना आला.

श्रीदत्तमहाराजांनी या अनुभवाचे कथन करणारे पत्र गडावरून श्रीगुरूमहाराजांना पुण्यात पाठविले. त्यांचेही उत्तर आहे की स्वामी महाराजांची आपल्यावर कृपा झाली आहे. जे काही होत ते ईश्वरइच्छेनेच

होते असे पूर्वीही वाटत होतेच. यासंदर्भात ते एकदा म्हणाले होते. आम्ही सर्व देवावर सोपवून देतो. आमच्याकडून काय किंवा कोणाकडून काय, परमेश्वराला जसे हवे असेल तसे तो घडवून घेता आणि ते तो परमेश्वर बघत राहतो.

* श्रीवासुदेवनिवास आश्रम

श्रीगुळवणीमहाराज नारायण पेठेतील गोवईकर चाळीतील दोन खोल्यात रहात होते. अनेक शिष्य आता झाले होते. श्रीगुरूमहाराजांनी स्वतःची जागा असावी आणि ती मोठी असावी असे अनेकांना वाटे. परंतु श्रीगुरूमहाराजांनी याला कधीही संमती दिली नव्हती. पुढे इ.स. १९६१ मध्ये पानशेतचे धरण फुटले आणि पुणे शहरात महापूर आला. गोवईकर चाळीतही पुराचे पाणी शिरले आणि श्रीगुरूमहाराजांच्या जागेचे बरेच मोठे नुकसान झाले. त्यामुळे नवीन जागा आता आवश्यकच झाली. श्रीदत्तमहाराजांनी पुढाकार घेतला आणि श्रीगुरुमहाराजांची संमती मिळवून आश्रम बांधण्यात सुरुवात केली. एक समिती नेमली गेली. त्या समितीचे सूत्रधार श्रीदत्तमहाराजच होते. अनेकांनी निधी गोळा केला. कर्वे रोडवरील जागा ठरली. खरेदी केली आणि भूमीपूजन झाले. बांधकाम सुरू झाले. १९६५ मध्ये वास्तू तयार झाली. वास्तशांतीचा मोठा कार्यक्रम आखण्यात आला. अनेक धार्मिक अनुष्ठाने झाली. ह्या सर्व कार्याचे श्रेय श्रीदत्तमहाराजांचेच होते.

वासुदेव निवास आश्रम निर्माण करण्यासाठी, 'श्रीदत्तमहाराजांच्या शब्दासाठी मी तयार झालो. मला दोन खोल्या पुरेत. त्यांच्यासाठी याला संमती दिली.' या शब्दात आपले स्पष्ट विचार श्रीगुरूमहाराजांनी अनेकदा बोलून दाखविले. वयाच्या ७८ व्या वर्षापर्यंत अनेकांनी स्वतंत्र जागा घेऊन निवासस्थान करण्याबद्दल श्रीगुरूमहाराजांना विनंती, आग्रह केलेला होता. तो व्याप नको, म्हणून श्रीगुरूमहाराज ते टाळत आले होते. पण श्रीदत्तमहाराजांनी हा विषय काढल्यावर श्रीगुरूमहाराजांनी आपली भूमिका समजावून सांगितली. त्यावर श्रीदत्तमहाराजांनी असे उत्तर दिले की, गुरूंचा आश्रम करणे ही फार मोठी गुरूसेवा असते. आपल्या गुरूंचे स्मारक करणे हे आपले कर्तव्य आहे. यासाठी शास्त्रवचने दाखवली. प.पू.श्रीलोकनाथतीर्थ-

स्वामीमहाराजांचे या आशयाचे एक पत्रही दाखविले. इतके झाल्यावर श्रीदत्तमहाराजांची इच्छा म्हणून श्रीगुरूमहाराजांनी संमती दिली.

झालेली वास्तूशांती फार मोठ्या प्रमाणात झाली. यावेळी आणि पुढे झालेल्या शांती समारोहाच्या धार्मिक कार्याचे नेतृत्त्व व आलेल्या सर्व विद्वानांचे आतिथ्य स्वतः श्रीदत्तमहाराज करीत. यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप आगळे वेगळे होऊन जाई. अखिल भारतातून शास्त्री, पंडित, विद्वान यांना निमंत्रण देण्यापासून कार्यक्रम संपन्न होईपर्यंत सर्व बाबींकडे श्रीदत्तमहाराज स्वतः जातीने लक्ष देत असत. या शांतिसमारोहामधून विशेष कार्यक्रमाचे आयोजन श्रीदत्तमहाराजांचे असे. त्यासाठी गुरूमहाराजांना तयार करण्याचे कामही श्रीदत्तमहाराजांनाच करावे लागे. सहस्त्रचंद्रदर्शनशांती समारोहातील महाराजांचे हत्तीवरून देवदर्शन, रौद्र-शांतीमधील रौप्यतुला असे अनेक धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व श्रद्धापूर्वक संपन्न केले. हे कार्यक्रम पहाणाऱ्यांचे अंतःकरण हेलावून गेले. आपल्या गुरूची इच्छा नाही हे पाहून श्रीदत्तमहाराजांनीच शास्त्राधार दाखवले व श्रीगुरूमहाराजांची संमती मिळवून ते कार्यक्रम मोठा प्रमाणात घडवून आणले यावरून श्रीदत्तमहाराजांच्या हृदयात श्रीगुरूमहाराजांबद्दल केवढी श्रद्धा, निष्ठा, भक्ती, प्रेम असेल याची कल्पना येते. या घटना उत्तरोत्तर चढत्या वाढत्या क्रमाने घडतांना परस्परांचे अंतरंग भारावून जात होत, हृदयातले प्रेम कृतीच्या माध्यमातून चिरंतन ठेवले. श्रीगुरूमहाराजांच्या मनात 'मोक्षमार्गाचे उत्तराधिकारी' एकमेव श्रीदत्तमहाराज हेच होते. तेही त्यांनी शब्दाने व्यक्त करतांना एवढी काळजी घेतली की, चिरंतन वास्तूच्या 'ट्रस्टडीड' मध्ये तसे स्पष्ट शब्दात लिहून स्वतःबरोबर अन्य चारही विश्वस्तांच्या स्वाक्षरीने ते कायम केले.

श्रीवासुदेव निवासाचे बांधकाम जेव्हा पूर्ण झाले तेव्हा या वास्तूला काय नाव द्यावयाचे यासंबंधी अनेकांनी आपले विचार व्यक्त केले. त्यावेळी श्रीदत्तमहाराज परगावी गेलेले होते. श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना पत्र पाठवून या वास्तूचे नाव काय ठेवावे अशी विचारणा केली. श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरूमहाराजांना पत्र कळविले की या वास्तूचे नांव "श्रीवासुदेव निवास" असे ठेवावे. काही लोकांना "श्रीवासुदेव निवास" या

नावापेक्षा वेगळे नाव ठेवावे असे वाटले. काही लोकांनी प.प.लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज यांचे नाव वास्तूला द्यावे असे सुचविले. श्रीदत्तमहाराजांनी यावेळी "वासुदेव निवास" नाव कसे समर्पक ठरेल हे पटवून दिले. श्रीदत्तमहाराज म्हणाले, " वासुदेव हे प.प. श्रीवासुदेवानंद-सरस्वती-टेंबेस्वामीमहाराज यांचे तर नाव आहेच परंतु वासुदेव या शब्दाचा अर्थ अत्यंत व्यापक असा आहे." वासुदेव म्हणजे ईश्वराचे स्वरूपच आहे. वासुदेव या शब्दाच्या गुढार्थावर प्रकाश टाकतांना श्रीभीष्माचार्य सांगतात -

द्यौः सचन्द्रार्कनक्षत्रा खां दिशो भूर्महोदधिः ।
वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः ॥

(भावार्थ : हे संपूर्ण आकाश मंडल जे आहे चंद्र, अर्क, नक्षत्र हा सर्व जो खगोल आहे हे 'द्यौ' आहे. 'खां' म्हणजे संपूर्ण आकाश मंडल, सर्व दिशा, सर्व महोदधि ही त्याच्या प्रभावाने राहिलेली आहेत, मर्यादित राहिलेले आहेत. आपले स्थान सोडून पडत नाहीत. सर्व नक्षत्र मंडल वर फिरतंय पण खाली पडत नाही. याला धारण करणारा कोण आहे? कोणी धरलेलं आहे? कोणाच्या शक्तिने हे राहिलेले आहेत? तर "वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मनः" तो जो भगवान वासुदेव सर्वेश्वर, विश्वरूपी झालेल्या त्याच्या वीर्यानी हे सगळे धारण केलेले आहे. ईश्वराचे अनुमान करणारी श्रुती म्हणून जी आहे त्यात त्यांनी दिलेले आहे इतके वर असलेले सगळे पदार्थ, भूलोक जसा आहे तसे हे निरनिराळे पदार्थ म्हणजे लोकच आहेत. पण सूर्यमंडल, नक्षत्रे खाली पडत नाही यावरून त्यांना धारण करणारी कोणीतरी शक्ती असली पाहिजे ही कल्पना अनुमानानं येऊ शकते. म्हणून "वासुदेव म्हणजे ईश्वरस्वरुप. श्रीवासुदेव निवास हे नाव दिल्यामुळे श्रीगुरुमहाराजांचे कार्य ईश्वराचे आहे, व्यापक आहे आणि सर्वांच्या कल्याणाकरता आहे हे सूचित होते.)

श्रीदत्तमहाराजांचे हे विचार सर्वांनाच पटले आणि म्हणूनच या वास्तूला "श्रीवासुदेव निवास" हे समर्पक नाव दिले गेले.

श्रीगुरूमहाराजांचे श्रीदत्तमहाराजांच्यावर अतोनात प्रेम होते. श्रीगुरूमहाराजांनीच श्रीदत्तमहाराज हे समर्पक नाव रूढ केले. गुरूमहाराजांच्या ठिकाणी दत्तचित्त आहेत म्हणून दत्तमहाराज किंवा प्रभू

दत्तात्रेय आणि श्रीगुरूमहाराज यांच्या एकरूपतेचा समन्वय म्हणून श्रीदत्तमहाराज. श्रीगुरूमहाराज आपल्या समोरच्या शिष्य-साधकाला अमक्याला नमस्कार करा, तमक्याला नमस्कार करा असे कधीच सांगत नसत. परंतु श्रीगुरूमहाराजांच्याकडे कोणी महापुरुष, संतश्रेष्ठ विभूती आली म्हणजेच 'यांना नमस्कार करा' असे आवर्जून सांगत. अशा व्यक्तींमध्ये नारेश्वरचे श्रीरंगावधूतमहाराज, इंदोरचे नानामहाराज तराणेकर, कणकवलीचे भालचंद्रमहाराज हे मान्यवर होते हे प्रासंगिक झाले. ही मंडळी येतील तेव्हाची ही गोष्ट. परंतु श्रीदत्तमहाराज कधीही आले तरी श्रीगुरूमहाराज समोरच्या व्यक्तीला सांगत 'श्रीदत्तमहाराजांना नमस्कार करा!' ही गोष्ट नाराणपेठेतील श्रीगुरूमहाराजांच्या निवासस्थानी आणि आश्रमात सर्वांनी नित्य अनुभवलेली आहे.

श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांकडून आग्रहाने उपनिषदे ऐकली आहेत. यासाठी रोज सकाळच्या आन्हिकानंतर एक तास ठरवून ठेवलेला होता. श्रीदत्तमहाराजांचे भागवतसप्ताह तर दरवर्षीचे ठरवून ठेवले होते.

* वेदान्त पारिजात सौरभ

श्रीभगवान निंबार्क यांनी वेदान्त पारिजात सौरभ नावाचा एक ग्रंथ संस्कृत भाषेत रचला आहे. ब्रह्मसूत्रांवर श्रीभगवान निंबार्क यांनी जे भाष्य केले, ते या ग्रंथात समाविष्ट झालेले आहे. या ग्रंथाचा श्रीदत्तमहाराजांनी मराठी अनुवाद केला. सूत्रांचा अनुवाद, त्यावर सविस्तर विवरण आणि सूची मिळून सुमारे १००० पानांचा ग्रंथ निर्माण झाला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे हा ग्रंथ जून १९६५ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथात ब्रह्मसूत्रांची मूळ संहिता दिली आहे. त्याचप्रमाणे श्रीभगवान निंबार्काचे संस्कृत भाषेतील भाष्य दिले आहे आणि त्या भाष्याचा श्रीदत्तमहाराजांनी केलेला मराठी अनुवाद व विवरणही त्यात समाविष्ट केलेले आहे. अनेक शास्त्रीपंडित आणि विद्वानांनी या ग्रंथाचे खूपच कौतुक केले आहे.

या ग्रंथाला सविस्तर प्रस्तावना श्रीदत्तमहाराजांनी लिहिली आहे. ही भूमिका म्हणजे श्रीदत्तमहाराजांची विद्वत्ता, त्यांचा अभ्यास, त्यांचे ज्ञान आणि त्यांची भक्ती यांचे उत्कृष्ट दर्शन घडवणारा एक स्वतंत्र ग्रंथच आहे

असे म्हटले तरी चालेल. या प्रस्तावनेत श्रीदत्तमहाराजांनी सर्व दर्शनांचे सामान्यरूप स्पष्ट केले आहे. चार्वाक दर्शन, बौद्ध दर्शन, जैन दर्शन, वैशेषिक दर्शन, न्याय दर्शन, मीमांसा दर्शन,सांख्य दर्शन आणि योग दर्शन यांचा त्यांनी परामर्श घेतला आहे आणि शेवटी वेदान्तदर्शनावर येऊन श्रीदत्तमहाराजांनी वेदान्त भूमिका सविस्तरपणे मांडली आहे. तसेच 'वैष्णव मत आणि ख्रिस्ती मत' हा विषय घेऊन भक्तीचा प्रभाव अन्य धर्मांवर कसा पडला आहे, हेही त्यांनी दाखविले आहे.

* श्रीदत्तमहाराजांचा षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ

श्रीगुळवणीमहाराजांनी अत्यंत प्रेमाने आणि आदराने श्रीदत्तमहाराजांचा षष्ठ्यब्दी समारंभ घडवून आणण्याचे ठरविले.

श्रीदत्तमहाराजांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभाचे सर्व आयोजन व व्यवस्था स्वतः गुरूमहाराजांनी पाहिली. श्रीदत्तमहाराजांची एकसष्ठी आश्रमामध्ये स्वतः प्रेरणा देऊन, समारंभाचे अध्यक्ष राहून आपल्या सर्व शिष्यभक्तांची यंत्रणा राबवून मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरी केली. श्रीदत्तमहाराजांचा हा समारंभ आपला आहे ही गुरूमहाराजांची आस्था होती. यासाठी होमहवन, अन्नसंतर्पणही मोठ्या प्रमाणावर झाले. भारतातील अनेक शास्त्रीपंडितांना पाचारण केले. आचार्यपीठांचे आशीर्वाद आले.

पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या सभागृहात हा समारंभ संपन्न झाला. एका बाजूला योगीराज श्रीगुळवणीमहाराज बसले होते. अनेक मोठ्या विद्वानांनी श्रीदत्तमहाराजांचा गौरव करण्यासाठी भाषणे केली. श्रीगुरूमहाराजांनी आशीर्वाद दिलाच आणि आश्रमाची संपूर्ण जबाबदारी श्रीदत्तमहाराजांवर आहे आणि श्रीदत्तमहाराजांनी आश्रमाची धुरा हाती घेऊन ती शेवटपर्यंत सांभाळायची आहे असे उद्‌गार काढले. एक प्रकारे ही देववाणीच होती. आश्रमाची सर्व सूत्रे श्रीदत्तमहाराजांवर सोपवल्याचे श्रीगुरूमहाराजांनी जाहीर केले. समारंभ झाल्यावर सायंकाळी सौ. गोदूताई भालेराव, सौ. माई क्षीरसागर यांना श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांची दृष्ट काढायला सांगितली. मुंबईच्या दीपलक्ष्मी या मासिकाने श्रीदत्तमहाराजांचा गौरव करणारा विशेषांक काढला. त्यात

श्रीआत्मारामशास्त्री जेरे, श्री. रघुनाथशास्त्री जोशी, भालचंद्रशास्त्री बेट्टीगिरी वगैरे अनेक विद्वानांनी श्रीदत्तमहाराजांवर गौरवपूर्ण लेख लिहिले.

श्रीगुरूमहाराजांच्या हृदयात श्रीदत्तमहाराजांच्याबद्दल असलेले पुत्रवत प्रेम आणि नितांत आदर या सर्वांतून व्यक्त होतो. या समारंभास श्रीदत्तमहाजांचे वडील श्रीधुंडिराजमहाराज व त्यांचा सर्व परिवार आला होता. आपल्या सुपुत्राचा हा समारंभ पाहून त्यांना धन्यता वाटली. श्रीधुंडिराजमहाराज यांना समारंभ पाहून फार संतोष झाला. आपल्यासारख्या महायोगी आणि थोर सत्पुरुषाच्या कृपेने आमचे कुळ धन्य झाले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

* पिताजींकडून मंत्रोपदेशाचा अधिकार

पुण्यातील श्रीवासुदेव निवासचे श्रीदत्तमहाराज हे प्रधान विश्वस्त आहेत. त्याचप्रमाणे देऊळगावराजा येथील त्यांच्या वडीलांच्या परंपरेचे उत्तराधिकारी व प्रमुख विश्वस्त श्रीदत्तमहाराजच आहेत. १९७२ साली श्रीधुंडिराजमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना मंत्रोपदेश देण्याचा अधिकार दिला. वंश परंपरेने श्रीदत्तमहाराज गुरुपदी विराजमान झाले. देऊळगावराजा येथे श्रीदत्तमहाराजांचे आजोबा श्रीवक्रतुंडमहाराज रहात असत. त्यांनी तेथे एक मोठी संस्था निर्माण केली आहे. या घराण्यापासून मंत्रोपदेश घेणारे अनेक लोक, अनेक कुटुंबे मराठवाड्यात आहेत. या सर्वांचे गुरू श्रीदत्तमहाराजच आहेत.

श्रीगुरूमहाराजांनी आपल्या संकल्प दीक्षेचा अधिकार श्रीदत्तमहाराजांना दिला आणि त्यांना उत्तराधिकारी नेमले. श्रीदत्तमहाराज हे ब्रह्म साम्राज्याचे चक्रवर्ती झाल्याचे पाहून श्रीधुंडिराजमहाराजांना खूप समाधान झाले. श्रीधुंडिराज-महाराजांनीही देऊळगावराजा येथील परंपरेचा दीक्षा देण्याचा अधिकार श्रीदत्तमहाराजांना दिलाच होता. सन १९७८ मध्ये तृप्त मनाने श्रीदत्तमहाराजांना आशीर्वाद देऊनच त्यांनी आपला देह ठेवला. श्रीधुंडिराज-महाराजांची समाधी देऊळगावराजाला आहे. गावाबाहेर मोठी भव्य वास्तू आहे, वर श्रीदत्तात्रेयाचे मंदिर आहे. हे स्थानही मोठे जागृत आहे, चैतन्याने भरलेले आहे. श्रीदत्तमहाराज वर्षातून एक भागवतसप्ताह येथे अनेक वर्षे

करीत आले आहेत. गेली काही वर्षे श्रीदत्तमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ.अशोकमहाराज तेथे हा भागवतसप्ताह करतात.

* तत्त्वज्ञान विद्यापीठातील जागा नाकारली

श्रीगुरूमहाराजांच्या महानिर्वाणापूर्वीच्या वर्षातील म्हणजे इ.स. १९७३ मधील एक प्रसंग आहे. पंडित आत्मारामशास्त्री जेरे हे ठाणे येथील तत्त्वज्ञान विद्यापीठातील अध्यापन कार्यातून निवृत्त झाले होते. ती अध्यापकाची जागा रिकामी होती. त्या ठिकाणी श्रीदत्तमहाराजांची नियुक्ती करण्याची इच्छा श्रीआत्माराम शास्त्रीजींच्या मनात आली, कारण येथील टिळक विद्यापीठातून श्रीदत्तमहाराज निवृत्त झाले होते. नंतर काही व्यवसाय असावा अशी प्रापंचिक स्थिती असल्याने श्रीदत्तमहाराजांनी श्रीआत्माराम शास्त्रीजींच्या जवळ व्यवसायासंबंधी बोलून ठेवले होते. श्रीआत्माराम शास्त्रींनी तत्त्वज्ञान विद्यापीठाचे प्रमुख श्रीपांडुरंगशास्त्री आठवले यांच्याजवळ आपल्या निवृत्तीनंतर श्रीदत्तमहाराजांसारख्या विद्वान, आचारसंपन्न, षड्दर्शनशास्त्रनिपुण, विद्यावाचस्पती, राष्ट्रीय पंडित, न्याय, मीमांसा, वेदान्त शिरोमणी विनोत व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत बोलून ठेवले. श्रीपांडुरंगशास्त्रींना श्रीदत्तमहाराजांच्या गुणवत्तेची चांगलीच माहिती होती. त्यांनी हे नाव सुचविल्याबद्दल श्रीआत्मारामशास्त्रीबुवांचे खूप आभार मानले. श्रीदत्तमहाराजांचा अर्ज नसतानाच श्रीपांडुरंग शास्त्रीजींनी श्रीदत्तमहाराजांना पत्र पाठवून नियुक्तीची तयारीही दर्शविली आणि एकदा या संदर्भात ठाण्यास विद्यापीठात येऊन भेटावे म्हणूनही कळविले.

ही सर्व हकीगत श्रीगुरूमहाराजांना माहित होती. श्रीदत्तमहाराजानी श्रीपांडुरंगशास्त्रीजींचे पत्र आल्यावर श्रीगुरूमहाराजांकडे सर्व निवेदनासहीत निर्णयाची प्रार्थना केली. श्रीगुरूमहाराज गंभीर झाले आणि म्हणाले, "वासुदेवनिवासातच असावे."

श्रीदत्तमहाराज श्रीगुरूमहाराजांना नमस्कार करून ठाण्यास गेले. श्रीआत्माराम शास्त्रीजींची भेट घेतली व श्रीगुरूमहाराजांची इच्छा सांगून नमपणे विद्यापीठातील स्थान नाकारले.

* श्रीगुरूमहाराजांचे महानिर्वाण

इ.स. १९७४ सालातील जानेवारी महिना सुरू झाला. श्रीगुरूमहाराजांची प्रकृती ठीक नव्हती. श्रीदत्तमहाराजही पुण्यात होते. नित्य अनुष्ठानासाठी व श्रीगुरूमहाराजांच्या दर्शनासाठी श्रीवासुदेव निवासात रोज येऊन जात होते. श्रीगुरूमहाराजांचे लक्ष तशाही स्थितीत सर्वत्र होते.

श्रीदत्तमहाराजांच्या सर्वात कनिष्ठ कन्या कु.शैला यांच्या वर-संशोधनासाठी नागपूरला बोलावले असल्याची वार्ता श्रीगुरूमहाराजांच्या कानावर होती. तेव्हा स्वतः श्रीगुरूमहाराज श्रीदत्तमहाराजांना म्हणाले की, "आपल्याला नागपूरला जायचं आहे ना? मग अजून पुण्यात कसे?" श्रीदत्तमहाराज म्हणाले, "आपल्या प्रकृतीला बरे वाटल्यावर जाईन. तशी घाई नाही." यावर श्रीगुरूमहाराज म्हणाले, "छे, छे, माझी प्रकृती पाहू नका. माझ्या प्रकृतीची काळजी करू नका. श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना लगेच निघायला सांगितले.

श्रीगुरूमहाराजांची प्रकृती बरी नसल्याने श्रीदत्तमहाराजांना पुणे सोडून जाण्याची मुळीच इच्छा नव्हती. परंतु श्रीगुरूमहाराजांचा शब्द ते वेदवाक्यासारखा मानत. श्रीगुरूमहाराज सांगतील ते करायचे हे त्यांचे व्रतच होते. केवळ गुरूवचन पाळण्यासाठीच ते नागपूरला गेले.

श्रीदत्तमहाराज मंगळवार दि. ८ जानेवारी, १९७४ ला नागपूरास गेले आणि मंगळवार दि. १५ जानेवारी, १९७४ ला श्रीगुरूमहाराजांचे महानिर्वाण झाले. अवघ्या आठ दिवसात ही अती दुःखद घटना घडली.

श्रीगुरूमहाराजांचे महानिर्वाण झाले त्यावेळी श्रीदत्तमहाराज नागपूरास श्रीतेलंगशास्त्रींच्याकडे सीताबर्डीमधील श्रीदत्तमंदिरात होते. तेथे त्यांना पुण्याहून आलेल्या दूरध्वनीने श्रीगुरूमहाराजांच्या निर्वाणाची दुःखद वार्ता सांगितली. ती वार्ता ऐकून श्रीदत्तमहाराजांना काही सुचेनासे झाले. मातेच्या निर्वाणप्रसंगी झालेल्या दुःख वेदनाप्रमाणे तीव्र वेदना निर्माण होऊ लागल्या. हळूहळू ज्वराचा जोर वाढत गेला, सारे शरीर तापाने फणफणू लागले. मस्तकही वेदनांनी ठणठणू लागले. ते एका जागेवर स्वस्थ बसही शकले नाहीत.

मंगळवारी दुपारी दोन-अडीचला वार्ता समजली. ताबडतोब जरी नागपूर सोडून यायचे म्हटले तरी पुण्याला पोहचायला कमीत कमी २० तास लागणार होते. ज्यांनी स्वतः इतक्या दूर पाठविले त्यात त्यांचा काही हेतू असेल तर आपण कसे जावे? ही स्थिती माझी मलाच समजून घेऊन स्वस्थ राहिले पाहिजे, असे विचार श्रीदत्तमहाराजांच्या मनात घोंघावत होते.

दोन दिवसांनी श्रीदत्तमहाराज पुण्यास आले. शोकाकुल उदास वासुदेव निवासात पाऊल ठेवणे अवघड होऊन गेले. भाव एवढे घनीभूत झाले होते की आश्रमातील वस्तू नि व्यक्ती यांचेकडे दृष्टी जाताच नेत्रातून जलधारांचा प्रवाह सुरू होई. श्रीगुरूमहाराज गेले याशिवाय कोणालाही बोलवत नव्हते. श्रीगुरूमहाराजांना नमस्कार करा. श्रीगुरूमहाराज वर माडीवर खोलीत आहेत असे म्हणून श्रीदत्तमहाराज सर्वांना तशाही परिस्थितीत धीर देत राहिले.

* श्रीवामन निवास

श्रीदत्तमहाराजांना श्रीगुरूमहाराजांच्या जन्मशताब्दीचा ध्यास लागला. अनेक संकल्प त्यांच्या मनात जागे झाले. ज्याप्रमाणे श्रीस्वामीमहाराजांच्या नावाने श्रीवासुदेवनिवास ही वास्तू निर्माण झाली त्याचप्रमाणे श्रीगुरूमहाराजांच्या नावानेही एक वास्तू निर्माण व्हावी असे श्रीदत्तमहाराजांना वाटले. श्रीगुरूमहाराजांचे स्मृती मंदिर असावे या विचाराने त्यांनी श्रीवामन निवासची कल्पना मांडली. कर्वे रोडला जागा घेण्यात आली. बांधकामासाठी पैसे जमवणे हे मोठेच कार्य होते. त्यासाठी श्रीदत्तमहाराजांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक दौरे काढले. निधी गोळा करून तो श्रीवामन निवासच्या गंगाजळीत जमा केला. महाराजांना अनेक लोक श्रीवामन-निवाससाठी एक व वैयक्तिक एक अशा दोन देणग्या किंवा दक्षिणा देत. परंतु श्रीदत्तमहाराज या दोन्ही देणग्या वामननिवास निधीतच जमा करत. श्रीवामन निवासच्या उभारणीमध्ये श्री.शशिकांत नागले यांचा फार मोठा वाटा आहे. श्री. भाऊसाहेब वाकडे आणि श्री.मोरेश्वर घैसास यांनी सिमेंट, स्टील व इतर सर्व खरेदी चोखपणे आणि वाजवी दराने केली. श्री. शशिकांत नागले यांनी सर्व बांधकामावर देखरेख ठेवली आणि उत्कृष्ट पद्धतीचे बांधकाम कमी खर्चात करून घेतले. वास्तविक श्री. नागले हे मुंबईला

रहाणारे. परंतु या काळात ते नियमितपणे पुण्याला येत आणि वामन-निवासच्या उभारणीकडे जास्तीत जास्त लक्ष देत. यामुळे अल्प काळात आणि कमी खर्चात वामन-निवाससारखी भव्य वास्तू उभी राहू शकली. १९८६ सालच्या जानेवारीमध्ये वामन-निवासचे बांधकाम पूर्ण झाले. याच वर्षी श्रीगुरूमहाराजांचा जन्मशताब्दी महात्सव साजरा करण्यात आला.

श्रीवामननिवास हे श्रीगुरूमहाराजांचे स्मारक व्हावे असा श्रीदत्तमहाराजांचा संकल्प होता. श्रीदत्तमहाराजांचा संकल्प हा नेहमीच सत्यसंकल्प असतो आणि तो पूर्णच होतो असे श्रीगुरूमहाराज अनेक वेळा म्हणालेले आहेत. त्यामुळे श्रीवामन-निवासचे बांधकाम जेव्हा सुरू करायचे ठरले तेव्हा सर्व संबंधित व्यक्तींना हे बांधकाम वेळेवर पूर्ण होईल याबद्दल पूर्ण विश्वास होता.

जेव्हा बांधकाम सुरू करावयाचे ठरले तेव्हा प्रत्यक्षात फक्त रुपये ८५,०००/- जमलेले होते. सुरूवातीचा केवळ लोखंडी सामानाचाच खर्च सुमारे रु. ६०,०००/- येत होता. इतर सामानाचा आणि मजूरांचा खर्च वेगळाच होता. त्यामुळे व्यावहारिक दृष्टीने पहाता पुरेसे पैसे गोळा झाल्याशिवाय बांधकामाला प्रारंभ करणे योग्य नव्हते. परंतु श्री.नागलेंची श्रीदत्तमहाराजांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळे त्यांनी या बांधकामासाठी प्रत्यक्षात किती पैसे गोळा झाले आहेत याचा विचारही केला नाही. श्रीदत्तमहाराजांवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्यांनी बांधकामाच्या जागेवर खड्डे घेतले आणि काम सुरू केले. ज्या दिवशी लेबर कॉन्ट्रॅक्टरला पैसे द्यायचे होते त्याच्या बरोबर आदल्या दिवशी आश्रमात त्या कामासाठी पैसे देण्यास पुरे पडतील अशा रकमेच्या मनिऑर्डर आल्या आणि लेबर कॉन्टक्टरचे पैसे ठरल्या दिवशी वेळेवर दिले गेले. संपूर्ण बांधकामाचा खर्च सुमारे अकरा लाख रुपये आला. यापैकी बरीचशी रक्कम श्रीदत्तमहाराजांनी स्वतःच अनेक ठिकाणी भागवत सप्ताह करून गोळा केलेली आहे. भागवत सप्ताहाने जमलेले सर्व पैसे तर श्रीदत्तमहाराजांनी श्रीवामन-निवासच्या बांधकामाला दिलेच परंतु त्यांनो स्वतःला म्हणून जी जी दक्षिणा मिळाली ती सर्व रक्कमही त्यांनी श्रीवामन निवासच्या बांधकामासाठी दिली.

* श्रीदत्तअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार

वाडीजवळ श्रीअमरेश्वर नावाचे स्थान आहे. या ठिकाणी एक प्राचीन जागृत देवस्थान आहे. सातशे वर्षांपूर्वी श्रीनृसिंह-सरस्वतीस्वामी-महाराज कृष्णाकाठी भिलवडी औदुंबर येथे आले होते. तेथून ते कृष्णा व पंचगंगा या दोन नद्यांच्या संगमावर काही काळ राहिले होते. सुमारे १२ वर्षे त्यांनी तेथे तपश्चर्या केली. पैलतीरावरील अमरेश्वराचे प्राचीन जागृत देवस्थान त्यांना खूपच आवडत असे. ते रोज तेथे दर्शनाला जात. तेथून निघण्यापूर्वी श्रीनृसिंह-सरस्वती- स्वामीमहाराजांनी श्रीअमरेश्वर येथे श्रीदत्तप्रभूंच्या निर्गुण पादुकांची स्थापना केली.

एकोणिसाव्या शतकात श्रीदत्तावतारी श्रीवासुदेवानंद-सरस्वती टेंबेस्वामीमहाराज श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला आले. वाडीला मुक्काम असला की श्रीटेंबेस्वामी श्रीअमरेश्वरच्या दर्शनाला नेहमीच येत असत. त्यांच्या शिष्य मंडळींमध्ये श्रीनृसिंहसरस्वती-दीक्षितस्वामीमहाराज हेही होते. श्रीदीक्षितस्वामी-महाराजांनी श्रीअमरेश्वरभोवती एक सुरेख मंदिर बांधले आणि त्यात श्रीदत्तप्रभूंची व्याघ्रांबरधारी बैठी मूर्ती बसविली. या मूर्तीजवळ त्यांनी पादुकांची स्थापना केली आणि मागच्या बाजूला योगिनींची प्रतिष्ठापना केली. मंदिराच्या दर्शनद्वारात त्यांनी श्रीगणेशाची स्थापना केली.

या मंदिराच्या शेजारी त्यांनी एक छोटीशी वास्तू बांधली आणि तेथे गुरूपीठ स्थापन केले. गुरूपीठाच्या गर्भागारात व्यास यंत्र आहे. तेथे त्यांचे सद्गुरू श्रीटेंबेस्वामी यांच्या खडावा त्यांनी ठेवल्या आहेत. तसेच श्रीटेंबेस्वामींच्या नित्य पूजेतील काही मूर्तीही त्यांनी तेथे ठेवल्या आहेत. या गर्भागाराला श्रीदीक्षितस्वामींनी एक सुंदर झरोका बांधून घेतला आहे. या झरोक्यातून कृष्णानदीच्या पैलतीरावर असलेल्या श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील मनोहर पादुकांचे दर्शन घेता येते. या वास्तूला 'वासुदेवपीठ' हे नाव देऊन आपल्या सद्गुरूंचे श्रीदीक्षितस्वामींनी स्मारक केले आहे.

याच ठिकाणी श्रीदीक्षित स्वामीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांकडून सोळाव्या वर्षी भागवतसप्ताह करून घेतला. बालवयातील श्रीदत्तमहाराजांची विद्वत्ता, त्यांचे ज्ञान, भक्ती आणि वैराग्य पाहून श्रीदीक्षितस्वामी भारावून

गेले होते. श्रीदत्तमहाराजांनी पुढे नृसिंहवाडी सोडली तरी दरवर्षी ते अमरेश्वराच्या दर्शनाला जात असत. अनेक वर्षे ते नियमितपणे अमरेश्वराला भागवतसप्ताह करीत होते.

श्रीदत्तमहाराजांचा सहस्त्रचंद्रदर्शन शांतीचा सोहळा पुण्यात झाला, तेव्हा त्यांनी श्रीदत्तअमरेश्वरला भागवतसप्ताह करावयाचे ठरविले. त्यावेळी त्यांच्या वयाचा विचार करून काही भक्त मंडळींनी तेथील गैरसोयी त्यांना सांगितल्या. त्या ऐकताच श्रीदत्तमहाराज पटकन म्हणाले, 'तेथील सेवकरी कसे रहातात, आम्हीही एक सेवेकरी म्हणून तेथे राहू.' त्यावेळी ही वास्तू जीर्ण झालेली आहे हे श्रीदत्तमहाराजांच्या लक्षात आले आणि त्या वास्तूचा जीर्णोद्धार करण्याचा त्यांनी मनोमन संकल्प केला. या संकल्पाचा त्यांनी आपल्या सहस्त्रचंद्रदर्शन शांतीच्या सोहळ्यात स्पष्टपणे उल्लेख केला होता. श्रीदत्तमहाराजांच्या सांगण्याप्रमाणे जीर्णोद्धाराची योजना आखतांना मूळ मंदिर तसेच कायम ठेवले आणि भोवतालच्या परिसरात योग्य त्या सुधारणा करून मंदिराचा आराखडा तयार करण्यात आला. त्यावेळी या संपूर्ण जीर्णोद्धाराला सुमारे चाळीस लाख रुपये खर्च येईल असा अंदाज होता.

श्रीदत्तमहाराजांचे एक निष्ठावंत भक्त श्री. तुलसीदास श्रीकृष्ण लाटे हा सर्व खर्च वैयक्तिकरित्या करण्यासाठी पुढे आले आणि त्यांनी आपला मनोदय श्रीदत्तमहाराजांपुढे प्रकट केला. तेव्हा श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'घाई करू नका, यथावकाश ते पूर्ण होईलच.' मंदिराच्या निर्मितीत समाजाचा सहभाग असावा यासाठी श्रीदत्तमहाराजांनी लोकांच्या आर्थिक सेवेतूनच मंदिर बांधण्याचे ठरविले. श्री. लाटे यांची निष्ठा, भक्ती आणि सेवेची तळमळ पाहून योजनेची सर्व जबाबदारी श्रीदत्तमहाराजांनी श्री.लाटे यांचेवरच सोपविली. निधी उभा करण्यासाठी अनेकांनी परिश्रम घेतले. यात श्री. लाटे यांचा मोठा सहभाग आहे. त्यांचे अथक परिश्रम म्हणजे प्रयत्नवादाचा एक आदर्श पाठच आहे.

श्री. लाटे यांनी बांधकामावर जातीने लक्ष ठेवले. त्यासाठी औरवाडला वारंवार त्यांनी खेपा केल्या. लोणावळ्याच्या एक भक्ताने आपल्या घरासाठी घेतलेले घडीव चिरे देवस्थानला देऊन टाकले. त्यामुळे बांधकाम सहजगत्या पूर्ण झाले.

श्रीदत्तमहाराजांच्या प्रेरणेमुळे अनेक भक्तांनी सेवा केली. परदेशातील अनेक भक्तांनीही या कार्यासाठी निधी पाठविला. श्रीदत्तमहाराजांनीही स्वतः वय व प्रकृती साथ देत नसतांनाही अनेक ठिकाणी दौरे काढले. भक्त मंडळींनी चिंता व्यक्त केली, तर श्रीदत्तमहाराज म्हणत,'प्रकृती साथ देत नसतांना देखील आम्ही बाहेरगावी कशाकरता जातो तर आमच्या जाण्याने श्रीदत्तअमरेश्वरच्या जीर्णोद्धाराला आमचाही थोडाफार हातभार लागेल म्हणून. वेळोवेळी जमलेले सर्व पैसे त्यांनी सेवासमितीच्या स्वाधीन केले. त्यांच्या चरणी कुणी सेवा अर्पण केल्यास ते स्पष्ट सांगत, 'यापेक्षा श्रीदत्तअमरेश्वराची सेवा फार मोठी आहे. तिकडे अर्पण करा.' नाहीच ऐकले तर त्याच्या नावे स्वतः पावती फाडावयास लावत असत. यामुळे सर्व योजना पूर्ण झाली. निवासस्थान आणि श्रीवास्तपीठ यांचे बांधकाम आता पूर्ण झाले आहे. मुख्य मंदिराचेही बांधकाम पूर्ण झालेले आहे.

श्रीदत्तअमरेश्वरच्या मागील खोलीची भिंत पाडताना झाकणाने बंद असलेल्या बरणीच्या आकाराची दोन मातीची भांडी सापडली. त्यामध्ये राणी छापाचे चांदीचे काही रुपये होते. कामावर देखरेख करणाऱ्यांनी ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांच्या कानावर घातली. हे ऐकताच श्रीदत्तमहाराजांनी सर्व नाणी सरकारजमा करण्यास सांगितली. त्यांचे हे मत ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले. पण श्रीदत्तमहाराज म्हणाले, सरकारने आपल्या हिताकरताच कायदे केलेले असल्यामुळे त्यांचा भंग होता कामा नये.

श्रीदीक्षितस्वामींनी बांधलेल्या मूळ छोट्या मंदिराचाही जीर्णोद्धार करण्याची काही भक्त मंडळींची इच्छा होती. श्रीदत्तमहाराजांनी बांधकाम करतांना बाह्यांगात काही थोडे फेरफार केले. परंतु मूळ मंदिरात मात्र कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे मंदिराचे प्राचीनत्त्व आणि पावित्र्य तसेच राहिले आहे. अशा तऱ्हेने हे श्रीअमरेश्वरचे जीर्णोद्धाराचे एक मोठे कार्य श्रीदत्तमहाराजांच्या प्रेरणेने घडले आहे.

* आगळेवेगळे उत्तराधिकारी

आश्रमात श्रीदत्तमहाराज आज उत्तराधिकारी आहेत. प्रमुख विश्वस्त श्रीदत्तमहाराजांच्या मार्गदर्शनाप्रमाणेच सर्व कार्यक्रम ठरवत असतात व



श्रीदत्तमहाराजांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्यानिमित्त व्यासपीठावर
श्रीशंकराचार्य (कुडली मठ, शंकराचार्य करवीर मठ), सौ.ताईमहाराज



श्रीवासुदेवनिवासमध्ये द्वारकापीठाचे
शंकराचार्य आले असतांना श्रीदत्तमहाराज प्रवचन करीत आहेत



वासुदेवनिवासमध्ये श्रीयतिमहाराजांनी
श्रीदत्तमहाराजांना श्रीफळ प्रसाद म्हणून दिले

आश्रमाचे व्यवस्थापन करीत असतात. आश्रमातील सर्वजण श्रीदत्तमहाराजांची आज्ञा पालन करण्यात धन्यताच मानत असतात. आश्रमात येणारे हजारो भक्त व अनुयायी श्रीदत्तमहाराजांचा शब्द वेदवचनाप्रमाणे शिरोधार्य मानून त्याप्रमाणे वागण्यासाठी सदैव तत्पर असतात.

असे असूनही श्रीदत्तमहाराज आश्रमात कसे वावरतात ते पहाण्यासारखे आहे. श्रीगुरूमहाराज आश्रमात आजही अव्यक्त स्वरूपात विद्यमान आहेत अशी त्यांची पूर्ण श्रद्धा आहे आणि त्यामुळे श्रीगुरूमहाराजांचा एक सेवक या भूमिकेतूनच ते आश्रमात वावरतात. केवळ एक सेवक म्हणूनच श्रीगुरूमहाराजांच्या वतीने श्रीगुरूमहाराजांची आज्ञा म्हणून दीक्षा देण्याची श्रीदत्तमहाराजांची भूमिका असते.

आश्रमात जेव्हा एखादा संन्यासी येतो, तेव्हा श्रीदत्तमहाराज आश्रमाचे प्रमुख विश्वस्त हे आपले स्थान विसरून जाऊन त्या संन्याशाला साष्टांग नमस्कार घालतात. जेव्हा कोणत्याही पीठाचे शंकराचार्य आश्रमात येतात, तेव्हा आश्रमाचे प्रमुख विश्वस्त या नात्याने शंकराचार्यांसमोर श्रीदत्तमहाराज कधीही वागत नाहीत. जास्तीत जास्त वेळ ते शंकराचार्यांसमोर उभेच रहातात. प्रकृती अस्वास्थामुळे किंवा अन्य कारणाने बसण्याची वेळ आली तर श्रीदत्तमहाराजांना अत्यंत संकोच होतो. ते अत्यंत लीनतेने, नम्रतेने जमिनीवर बसतात. श्रीशंकराचार्यांसमोर श्रीदत्तमहाराजांना बसण्यासाठी आसन ठेवले तर त्या आसनावर बसण्याचे ते टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतात. बसणे अगदीच अपरिहार्य असल्यास श्रीशंकराचार्यांच्या स्थानापासून दूर काही अंतरावर श्रीदत्तमहाराज बसतात. जणू काही शंकराचार्यांसमोर बसलो तरी आपल्या हातून काही अपराध होत आहे असे श्रीदत्तमहाजांना वाटते.

श्रीशंकराचार्य भिक्षेसाठी जेव्हा आश्रमाच्या सभागृहात बसतात, तेव्हा श्रीदत्तमहाराज त्यांच्यासमोर पाटावरही भोजनास बसत नाहीत. श्रीशंकराचार्यांचा प्रसाद घेत आहोत या वृत्तीने श्रीदत्तमहाराज आतल्या खोलीत भोजन घेतात. शंकराचायासमोर बोलण्याचेही श्रीदत्तमहाराज

टाळतात. बोलण्याचा प्रसंग टाळणे अशक्य असेल तर अत्यंत श्रद्धेने, नम्रतेने, लीनतेने हलक्या स्वरात ते बोलतात.

करवीरच्या श्रीशंकराचार्यांनी श्रीदत्तमहाराजांना पुरस्कार जाहीर केला व ता देण्यासाठी कोल्हापूरला सत्कार समारंभ आयोजित केला. श्रीदत्तमहाराज त्यावेळी आजारी होते. डॉक्टरांच्या बंधनामुळे श्रीदत्तमहाराज कोल्हापूरला जाऊ शकले नाहीत. म्हणून श्रीशंकराचार्य पुण्याला स्वतः आले आणि त्यांनी आश्रमात सत्कार समारंभ आयोजित केला. या समारंभाचा उल्लेख श्रीदत्तमहाराजांनी 'प्रसादसमारंभ' असा केला. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'आमच्या हातून फार मोठा अपराध झाला आहे. आचार्यांनी कोल्हापूर येथे येण्याची आज्ञा केली पण आम्ही गेलो नाही. या अपराधाची कबुली देण्यासाठी आम्ही येथे उभे आहोत. आचार्यांची आम्ही क्षमा मागतो. त्यांनी अपराध पोटात घालावा व आम्हाला क्षमा करावी अशी आम्ही त्यांच्या चरणी प्रार्थना करतो.' हे शब्द बोलताना श्रीदत्तमहाराजांचा कंठ दाटून आला होता. आश्रमाचे प्रमुख विश्वस्त, दीक्षा देण्याचे अधिकार असलेले व गुरूपदी आरुढ झालेल्या, उत्तराधिकारी असलेल्या व्यक्तीच्या तोंडून हे नम्र शब्द असे भावनेत भिजून येत आहेत, कंठ दाटलेल्या अवस्थेत येत आहेत यावर समोर बसलेल्या श्रोत्यांचा खरोखरीच विश्वास बसत नव्हता.

आश्रमात श्रीगुरूमहाराज ज्या खोलीत रहात असत तेथे श्रीगुरूमहाराजांचा फोटो लावला आहे. श्रीगुरूमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीवासुदेव निवासच्या विश्वस्तांनी श्रीदत्तमहाराजांचा फोटोही त्या खोलीत लावलेला आहे. तेव्हापासून श्रीदत्तमहाराज त्या खोलीत जाण्याचे टाळतात. श्रीगुरूमहाराजांच्या खोलीत आपला फोटो विश्वस्तांनी लावलेला आहे तो स्वतःच्या डोळ्यांनी पाहू नये ही त्यांची भावना त्या खोलीत न जाण्यामागे असते.

श्रीदत्तमहाराज आश्रमात कसे अमानित्त्वाच्या वृत्तीने वागतात याच्या अनेक आठवणी आश्रमातील रहिवासी सांगतात.

एकदा एका समारंभानंतर वापरलेली चांदीची भांडी श्री.दाते एकटेच धुवत होते, भांडी धुण्यासाठी ते हातपंपाने पाणी हापसत होते. श्री. दाते

यांच्या मदतीला दुसरे कोणी नव्हते. श्रीदत्तमहाराजांनी ते दृश्य बघितले. त्यावेळी आश्रमात अनेक माणसे होती. श्रीदत्तमहाराज कोणालाही श्री.दाते याना मदत करायला सांगू शकले असते. पण तसे त्यांनी केले नाही. काहीही न बोलता ते शांतपणे तेथे गेले आणि त्यांनी स्वतः हातपंपाने पाणी उपसून दिले. नंतर त्यांनी भांडी धुवायला मदत केली. भांडी धुवून झाल्यावर श्री.दाते फडक्याने भांडी पुसू लागले. श्रीदत्तमहाराजांनी आपले उपरणे काढले व त्या उपरण्यानेच ते भांडी पुसू लागले. भांडी पुसून झाल्यावर श्री.दाते यांनी काही भांडी कपाटात ठेवण्यासाठी उचलली. श्रीदत्तमहाराजांनी उरलेली भांडी उचलली व ते श्री. दाते यांच्या मागोमाग ती भांडी घेऊन कपाटापर्यंत गेले.

एकदा श्री.दाते आश्रमाच्या कार्यालयात बसून छापील निवेदनाचे पत्र भरण्याचे व त्यावर साधकाचा पत्ता चिकटवण्याचे काम करीत होते. शेकडो निवेदनपत्रे भरावयाची होती व पत्ता पाकिटावर चिकटवायचा होता. त्या दिवशी कार्यालयांत ते एकटेच असल्याने त्यांना या कामात सहाय्य करायला कोणीच नव्हते. एकटेच ते काम करीत होते. श्रीदत्तमहाराज मंदिरात गादीवर बसले होते. दर्शनार्थी येत होते. दर्शन घेऊन जात होते. कोणी दर्शनार्थी श्रीदत्तमहाराजांना काही प्रश्नही विचारीत होते. दर्शन घेऊन जात होते. श्रीदत्तमहाराज समयोचित उत्तरे देत होते. परंतु त्यांचे लक्ष श्री. दाते एकट्यानेच कार्यालयात निवेदनपत्रे पाठविण्याचे काम करीत आहेत याकडेच होते. श्री. दाते यांना पुरेशी मदत मिळाल्याशिवाय निवदनपत्रे पाठविण्याचे काम त्या दिवशी पूर्ण होणे अशक्य आहे याची जाणीव श्रीदत्तमहाराजांना होती. दुसरा कोणी साधक श्री. दाते यांच्या मदतीला पुढे येत नाही हे पहाताच श्रीदत्तमहाराज गादीवरून एकदम उठले, कार्यालयात गेले आणि एक शब्दही न बोलता स्वतःच निवेदनपत्रे पाकिटात भरण्याचे काम सुरू करून श्री. दाते यांच्या कामाला सहाय्य करू लागले. हे पहाताच आश्रमातील सर्व साधक व दर्शनार्थी कार्यालयाकडे धावतच आले. सर्वांनीच निवेदनपत्रे पाकिटात भरण्याच्या कामाला सहाय्य करायला सुरूवात केली. थोड्याच वेळात काम पूर्ण झाले व सर्व पाकिटे त्यामुळे त्याच दिवशी पोस्टाकडे पाठविणे शक्य झाले.

कधी श्रीदत्तमहाराजांच्या घरची मंडळी गावाला गेली असली आणि श्रीदत्तमहाराजांना भोजनाला आश्रमात यायचे असेल तर ते आधी आश्रमाच्या व्यवस्थापकांना विचारतात, 'आम्ही अमुक दिवशी आश्रमात प्रसादाला आलो तर चालेल काय?' ही आश्रमाच्या प्रमुख विश्वस्तांनी आश्रमाच्या व्यवस्थापकांना केलेली आज्ञा नसते, विनंती असते. आश्रमात आलेल्या एखाद्या साधकाला तेथे भोजन करण्याची इच्छा झाली तर तो साधक व्यवस्थापकांना तेथे भोजन घेण्याची परवांनगी जशी विचारतो तसा हा प्रश्न असतो. आश्रमाचे प्रमुख असलेले गुरूपदावरील उत्तराधिकारी जेव्हा आश्रमाच्या व्यवस्थापकांना परवानगी मागणारा प्रश्न करतात तेव्हा त्यांत असलेली विनयतेची व अमानित्त्वाची भावना कोणालाही थक्क करणारीच वाटेल.

श्री. गोपाळराव गोडसे सांगतात, इ.स. १९८० सालापासून मी आश्रमात येऊ लागलो. प्रारंभीच्या काळात मी स्वतः असे अनेक वेळा पाहिले आहे की एखाद्या रविवारी दुपारी श्रीदत्तमहाराज एकाला एक असे तीन चार पाट लावत आणि त्यावर झोपत. अंगावर स्वतःचेच उपरणे पांघरायला घेत. त्यांनी गादी किंवा पांघरूण मागितलेले आम्ही कधी पाहिले नाही. ते स्वतः आश्रमात दुपारी दूध किंवा चहा घेत नसत. पण परगावाहून आलेल्या सर्वांना ते 'दूध घेतले का?', 'चहा घेतला का?' असे आवर्जून विचारीत. ती आश्रमाच्या प्रमुख विश्वस्तांनी केलेली चौकशी नसे; तर आश्रमाच्या एखाद्या सेवकाने आलेल्या अतिथीची चौकशी करावी तसे त्या विचारणेचे स्वरूप असे.

एखाद्या कीर्तनकाराचे कीर्तन किंवा प्रवचनकाराचे प्रवचन उत्सवात आश्रमात ठेवावे असे श्रीदत्तमहाराजांना वाटले तर ते इतर विश्वस्तांपुढे ठरलेल्या कार्यक्रमाबद्दल विचारणा करतात व सौम्य शब्दात असे मांडतात. आश्रमात जेव्हा विश्वस्तांची बैठक होते तेव्हा श्रीदत्तमहाराज प्रमुख विश्वस्त या नात्याने सभेच्या अध्यक्षस्थानी असतात. पण बैठकीतही श्रीदत्तमहाराजांच्या सूचना वा मते ते नेहमीच अनाग्रही शब्दात सौम्यपणे मांडतात. त्यांनी ऋजुता कधीच सोडलेली कोणी पाहिलेली नाही.

श्रीदत्तमहाराजांचा आवाज चढला आहे, ते उंच पट्टीत बोलत आहेत, आग्रही स्वरात बोलत आहेत, कुणाला कठोर शब्दात आज्ञा करीत आहेत

असे आजपर्यंत आश्रमात कोणी पाहिलेले नाही. स्वतःची कितीही गैरसोय झाली तरी त्याबद्दल ते कधी बोलत नाहीत किंवा कृतीतूनही आपली प्रतिक्रिया व्यक्त करीत नाहीत. ऋजुता, सौम्यपणा, मार्दव, कोमलता त्यांचे स्थायीविशेष आहेत. शब्दाने वा कृतीने कोणाचेही मन दुखवायचे नाही हा श्रीदत्तमहाराजांचा स्थायी स्वभाव आहे. हे पाहिले म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पुढील ओव्यांची आठवण होते.

स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार। मुख मोहाचें माहेर।
माधुर्या जाहाले अंकुर। दर्शन तैसे ॥ १३.२६२ ॥
पुढां स्नेह पाझरे। माघां चालती अक्षरें।
शब्द पाठीं अवतरे। कृपा आधी ॥२६३॥
मग प्रार्थिला विपायें। जरि लोभें बोलों जाये।
तरि परिसतया होये। मायबाप ॥२६८॥
का नादब्रह्मखि मुसे आलें। की गंगापय असळले।
पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें ॥२६९॥
तैसे साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥२७० ॥
विरोध वाद बळू। प्राणुपापढाळू ।
उपहास चाळू। वर्मस्पर्श ॥२७१ ॥

(भावार्थ : तो स्वतः श्वासोच्छ्वास नाजूक रीतीने करतो. त्याचे मुख प्रीतीचे माहेर असते व त्याचे दांत हे जणू काय मधुरपणाला अंकुरच फुटले आहेत असेच असतात. तो कोणाशी बोलत असता पुढे प्रेम पाझरते व मागून अक्षरे चालतात. कृपा आधी प्रकट होते व शब्द मागून प्रकट होतात. तो प्रेमाने बोलावयास लागला म्हणजे आपले आईबापच प्रेमाने बोलत आहेत असे वाटते. त्यांचे बोलणे म्हणजे जणू काय नादब्रह्मच आकार धरून आले असे मधुर असते. गंगेच्या पाण्यात स्नान केल्याने जसे पवित्र वाटते तसे त्यांचे शब्द ऐकतांना वाटते. वृद्ध पतिव्रतेचे शब्द ऐकतांना जसा आदर मनात निर्माण होतो तसे त्यांचे बोलणे ऐकताना आदरभाव मनात जागा होतो. खरे आणि कोणास न खुपणारे मोजके परंतु सरळ असे त्यांचे बोलणे असते.

म्हणून त्यांचे शब्द म्हणजे अमृताच्या लाटाच असे वाटते. उपरोधिक बोलणे, तंट्यास उत्तेजन देणे, प्राण्यात पाप उत्पन्न करण्यास उद्यक्त करणे, टर उडविणे, टाकून बोलणे, वर्मास झोंबणारे शब्द बोलणे, हट्ट, आवेश, कपट आशा लावणे, संशयांत पाडणे असे काहीही त्यांच्या बोलण्यात नसते.)

श्रीज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातील या ओव्या श्रीदत्तमहाराजांना यथार्थाने लागू पडतात. त्यांचे बोलणे इतके कोमल असते की त्यांचे श्वासोच्छ्वास देखील अत्यंत सुकुमार वाटतात. एखाद्या स्त्रीला माहेरी जसा प्रेमाचा अनुभव येतो तसाच अनुभव त्यांचे प्रेमाने भरलेले शब्द ऐकताना भक्तांना येतो. म्हणून त्यांच्या बोलण्याला प्रेमाच्या माहेराची उपमा द्यावीशी वाटते. एखादा भक्त समार आला म्हणजे प्रथम त्यांच्या हृदयात वात्सल्याचा पाझर फुटतो आणि मगच त्यांच्या मुखातून प्रेमाने भरलेले शब्द बाहेर येतात. त्यांच्यासमोर येणाऱ्या भक्ताला त्यांची कृपा प्रथम प्राप्त होते आणि मगच त्यांच्या मुखातून शब्द बाहेर येतात. आपला एकही शब्द कोणालाही खुपू नये याबद्दल ते सदव दक्ष असतात. ते जेव्हा प्रेमाने बोलू लागतात तेव्हा आपण प्रत्यक्ष श्रीगुरूमाऊलीच्या मधुर वात्सल्याचा अनुभव घेत आहोत असे प्रत्येक भक्ताला जाणवते. जन्मदाते आईवडीलसुद्धा इतक्या गोड शब्दात तिला उपदेश करणार नाहीत अशी जाणीव भक्तांना आपोआपच होत असते. त्यांच्या वाणीतून निघालेल्या शब्दात विरोध करणे, वाद उत्पन्न करणे, स्वतःचा मोठेपणा दाखविणे, इतरांना दुःख देणे, उपहास करणे, आवेश, कपट असे काहीही नसते. उलट शब्दाशब्दात अहेतूक दयासिंधू असलेल्या श्रीगुरूमाऊलीचे वात्सल्य, दया आणि करुणा ओतप्रोत भरलेली असते. गोपाळकृष्णाच्या वेणूचा नाद यमुनेच्या तीरावर जेव्हा उठत असे, तेव्हा सर्व वातावरण नादमय होऊन जात असे. तो वेणूचा नाद म्हणजे ब्रह्मदर्शनच असल्यामुळे त्या वेणूच्या नादाला नादब्रह्म असे म्हणतात. भागवतात असे सांगितले आहे की, गोपाळकृष्णांच्या वेणूचा नाद ईश्वरानुग्रहरूप असल्यामुळे अवीट व अत्यंत सुखकारक कसा वाटत असे. श्रीदत्तमहाराजांचे उपदेशाचे शब्द या नादब्रह्माप्रमाणेच असतात. त्यामुळे भक्तांना त्यांचे शब्द आनंद व चैतन्याचा अनुभव देतात. गंगाजळ थंड आणि पवित्र असते. गंगेत स्नान केल्याने पाप आणि ताप नाहीसे होतात. श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेताना

आणि त्यांचे शब्द ऐकताना काशी क्षेत्रात गंगेच्या तीरावर बसून स्नान केल्यासारखे अनेक भक्तांना वाटते.

अनेक भक्त असे सांगतात की, श्रीदत्तमहाराजांचे शब्द म्हणजे सळसळणाऱ्या चैतन्यमयतेचा जाज्वल्य आविष्कार वाटतो. दर्शन घेताना आणि श्रीदत्तमहाराजांचे शब्द ऐकताना आध्यात्मिक स्पंदनांचा अनुभव येतो ही प्रत्यक्ष अनुभूती घेतली म्हणजे सनातन संस्कृतिनिष्ठ साधकांनाही श्रीदत्तमहाराज जितके वंदनीय वाटतात तितकेच उच्च सुशिक्षित बुद्धीवादी तरुणांना आणि पाश्चात्य संस्कृती व मूल्ये यांचा प्रभाव असलेल्या तरुणांनाही वंदनीय वाटतात.

काही भक्त आपला अनुभव सांगताना असे म्हणतात की आम्हाला श्रीदत्तमहाराजांकडून जितके अहेतुक प्रेम व वात्सल्य मिळाले तितके अहेतुक प्रेम अनेक लोकांना आपल्या सख्या आईकडूनही मिळत नसेल. म्हणून तर अनेक भक्तांना सद्गुरू माऊली म्हणजे आपली जन्मजन्मांतरीची आई आहे, कायमची आई आहे असे वाटते आणि या अहेतुक प्रेमाचा सागर असलेल्या माऊलींना भेटायला ते भक्त त्याच ओढीने येतात.

ज्या भाग्यवंत साधकांवर श्रीदत्तमहाराजांची पूर्ण कृपा होते त्या साधकांना श्रुती, स्मृती व पुराणांतून सांगितलेल्या अनेक दिव्य अनुभूतींचा प्रत्यक्ष प्रत्यय घेता येतो.

श्रीदत्तमहाराजांच्या सहवासात असले की हळूहळू मन शांत होत जाते, विकार नाहीसे होत जातात आणि ईशावास्योपनिषदात सांगितलेल्या सत्यावरील हिरण्यमय पात्राचे आवरण हळूहळू दूर होऊ लागत आहे असे वाटते असाही अनुभव एका भक्ताने सांगितला आहे.

* मूर्तिमंत ऋजुता

महाभारतात 'आर्जवं ब्रह्म उच्यते' असे म्हटलेले आहे. आर्जव म्हणजे ऋजुता. ऋजुतेलाच ब्रह्म असे म्हणतात. हेच ब्रह्म जेव्हा जगाच्या कल्याणासाठी नरदेह धारण करून या अवनीतलावर प्रगट होते तेव्हा त्याच्या रूपाने जणू काही ऋजुताच स्थूलरूप धारण करीत असते असे शास्त्रात सांगितले आहे. ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीत पूर्णतया पहायला मिळते. श्रीदत्तमहाराज हे ऋजुतेची मूर्तीच आहेत असे जाणवत राहते. ऋजता

म्हणजे सरळपणा, निष्कपट, निरागसपणा, लीनता. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सोळाव्या अध्यायात ऋजुता किंवा आर्जव म्हणजे सर्व प्राणिमात्रांशी सौजन्याने वागणे असे सांगितले आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात ही ऋजुता, हा सरळपणा आपल्याला ठायी ठायी पहायला मिळतो. ते नेहमीच ब्रह्म बोधात असतात. तरीही सदोदित सौजन्यशील, सरळ आणि निष्कपट असेच वागतात. गुरूभावाने प्रेरित होऊन भक्तगणांना उपदेश करत असतांना सुद्धा त्यांचा सौजन्यशील, आर्जवी, सरळ स्वभाव क्षणोक्षणी पहायला मिळतो. त्यांचा स्वभाव असा सरळ आणि मोकळा असल्यामुळे त्यांच मन आणि त्यांचे बोलणे नेहमी एकच असते असे अनुभवायला येते. त्यांच्या आत बाहेर सगळीकडे एकच असते.

सरळ स्वभावाच्या लोकांनाच भगवंताच दर्शन होत असते. याविषयी श्रीशंकराचार्य आपल्या गीताभाष्यात म्हणतात -

'सर्वत्र अव हि अध्यात्मशास्त्रे कृतार्थलक्षणानि यानि तानि एव साधनानि उपदिश्यन्ते यत्नसाध्यत्वात् । यानि यत्नसाध्यानि साधनानि लक्षणानि च भवन्ति तानि।'

अध्यात्मशास्त्रामध्ये सर्व ठिकाणी कृतार्थ पुरुषाची जी लक्षणं सांगितली आहेत, ती प्रयत्नाने साध्य होणारी असल्याने त्यांचा इतरांसाठी साधनरूप म्हणून उपदेश केला जातो. अर्थात जी यत्नसाध्य साधने असतात तीच अवतारी पुरुषांची स्वाभाविक लक्षण असतात. म्हणूनच ही जी सरळता व ऋजुता श्रीदत्तमहाराजांच्या ठायी स्वभाव बनलेली आहेत तीच आपल्याला मात्र प्रयत्नांनी आपल्यामध्ये आणावी लागतात.

❊ श्रीमहाराजांची प्रवचने

श्रीदत्तमहाराज आयुष्यभर आत्मज्ञानाचा प्रसाद वाटण्याचेच कार्य करीत आलेले आहेत. त्यांनी एक हजाराहून अधिक भागवत सप्ताह ठिकठिकाणी केले आहेत. भागवताची कथा सांगतानाच वेदान्तातील तत्त्वे, आचार व अनुभूती सोप्या भाषेत श्रोत्यांपुढे मांडत असतात. सुमारे पंधरा हजाराहून अधिक प्रवचने करुन त्यांनी साधकांना उचित मार्गदर्शन केले आहे आणि

परमार्थमार्गावर वाटचाल करायला सहाय्य केले आहे. त्यांची काही प्रवचने भक्तांनी ध्वनिमुद्रित करून घेतली आहेत. अशा भक्तांमध्ये श्री.गोपाळराव गोडसे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्यांनी प्रवचने ध्वनिमुद्रित करून घेतली, लिहून काढली व चक्रमुद्रित करून त्या प्रती ते साधकांना स्वखर्चाने वाटत राहिले. ही त्यांची सेवा सद्गुरूचरणी निश्चितच रूजू झाली आहे.

भगवती प्रकाशन या संस्थेने काही प्रवचने पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करून वाचकांना उपलब्ध करून दिली आहेत. श्री.गोपाळराव गोडसे यांनी संकलन केलेल्या या प्रवचनांचे संपादन थोर विदुषी व साधक डॉ. माधुरी पणशीकर यांनी केले आहे. भगवती प्रकाशनने पुढील पुस्तके प्रकाशित केली आहेत.

१) चांदणे कैवल्याचे
२) सत्कर्मी रति वाढो
३) दैवी संपदा
४) द्विसाहस्त्री - भाग १ - ज्ञानकांड (गुरूचरित्रावरील प्रवचने)
५) द्विसाहस्त्री - भाग २ - कर्मकांड व भक्तीकांड (गुरूचरित्रावरील प्रवचने)
६) नारायणी नमोस्तुते - (देवी भगवतीच्या अनुषंगाने प्रवचने)
७) संत संग
८) विवेकचुडामणी - भाग १ (शंकराचार्यांच्या विवेकचुडामणी या ग्रंथावरील भाषण)
९) श्रीमद्भागवत - भाग १ (भागवतावरील प्रवचने)

या पुस्तकांना डॉ. सौ. माधुरीताई पणशीकर यांनी ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्यातून श्रीदत्तमहाराजांचे ज्ञान, अनुभूती आणि अंतरंग व्यक्त होते. श्रीदत्तमहाराजांची जीवन वैशिष्ट्य व तत्त्वज्ञान त्यांनी उत्तमरितीने या प्रस्तावनांतून मांडले आहे. श्री. गोपाळराव गोडसे व डॉ.सौ. पणशीकर यांच्याकडून ही सेवा घडली त्यात त्यांच्यावर झालेली सद्गुरूंची कृपाच स्पष्ट होते.

या पुस्तकांशिवाय श्री.अ. सि. पोटभरे यांच्या श्रीदत्तवाक्सुधा या पुस्तकातही प्रवचने वाचायला मिळतात. तसेच डॉ.सौ. माधुरी पणशीकर यांनी प्रस्तुत लेखकाच्या सहाय्याने संपादन केलेल्या "गुण गाईन आवडी" या पुस्तकातही श्रीदत्तमहाराजांची प्रवचने प्रसिद्ध झालेली आहेत. ही दोन्ही पुस्तके वासुदेवनिवास प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेली आहेत. ज्या भक्तिभावनेतून श्री. गोपाळराव गोडसे, डॉ. माधुरी पणशीकर आणि श्री.अच्युतराव पोटभरे यांनी ही अमोल सेवा गुरूचरणी सादर केली त्याचे फळ त्यांना देण्यास श्रीदत्तमहाराज समर्थ आहेत.

श्रीदत्तमहाराजांनी डिसेंबर १९८१ मध्ये स.प. महाविद्यालयात कौशिक व्याख्यानमालेत तीन व्याख्याने दिली होती. ही तीन व्याख्याने "श्रीज्ञानदेव आणि दत्तसंप्रदाय" या नावाने पुस्तिकेच्या रूपात शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे यांनी प्रकाशित केली आहेत.

* साधकांच्या प्रश्नांना उत्तरे

श्रीदत्तमहाराजांना अनेक साधक शंका विचारीत असतात. काही साधक ही उत्तरे ध्वनिमुद्रितही करून घेतात. भगवती प्रकाशनने यापैकी काही प्रश्नोत्तरे "विचारधन भाग - एक" या नावाने प्रकाशित केली आहेत. एकाच प्रश्नकर्त्याचे सर्व प्रश्न यात समाविष्ट केलेले असल्याने प्रश्नांमध्ये एकच भूमिका आहे. श्रीदत्तमहाराजांनी दिलेल्या उत्तरातून भारतीय तत्त्वज्ञानाचे सारच प्रकट होते. वेद, उपनिषदे व पुराणे यांच्या शिकवणुकीत परमार्थमार्गावर वाटचाल करणाऱ्या साधकांना जे मार्गदर्शन केलेले आहे, तेच श्रीदत्तमहाराजांनी विसाव्या शतकात केले आहे. या शतकातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन आणि वैज्ञानिक शोध व सुधारणा श्रीदत्तमहाराजांना अवगत असल्याने त्यांनी एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरील उच्चशिक्षित साधकांना व भक्तांना पुढे ठेवून ही उत्तरे दिली असावीत. त्यामुळे भावी काळातील साधकांनाही ती विशेष उपयुक्त ठरतील अशी झाली आहेत. पाश्चिमात्य जीवन व संस्कृती यांचाही महाराजांना परिचय असल्याने विचारधन या पुस्तकांतील पारमार्थिक मार्गदर्शन सर्व देशांतील साधकांना पटेल, रुचेल व कळेल आणि आचरणात आणणे शक्य होईल असे झाले आहे.

पूर्वेकडील संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांचा पाश्चिमात्य विचारपद्धती आणि दृष्टिकोन यांच्याशी झालेला संगमच विचारधन या पुस्तकात दिसून येतो. पूर्व आणि पश्चिम यांचा हा संगम एकविसाव्या शतकातील उच्चशिक्षित साधकांना कळेल, रुचेल, पटेल आणि आचरणात आणावासा वाटेल असाच आहे. म्हणून या पुस्तकाचा विविध भाषांत अनुवाद झाला तर आध्यात्मिक वाङ्मयात मोलाची भर पडेल.

'विचारधन भाग-एक' या पुस्तकात समावेश न झालेली काही पश्नोत्तरे या चरित्रांत दिलेली आहेत.

* महाराजांची पत्रे

आलेल्या पत्रांना उत्तरे लिहिणे हा श्रीमहाराजांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यांना पत्र लिहिणाऱ्या भक्तांबद्दल आणि साधकांबद्दल खूप आत्मीयता वाटत असल्याने ते सर्व पत्रांना समयोचीत उत्तरे पाठवीत. त्यांना आजवर हजारो पत्रे आली असतील. या पत्रात साधक आपल्या अडचणी लिहीत, शंका विचारीत, घरातील महत्त्वाच्या घटना कळवित आणि त्यांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून प्रार्थनाही करीत. महाराज कळवळ्याच्या भावनेने तत्परतेने उत्तरे पाठवीत असतात. प्रकृती अस्वास्थामुळे अलीकडे त्यांनी पत्रांना उत्तरे पाठवायचे काम डॉ.अशोकराव महाराजांवर सोपवले आहे. तरी सुद्धा अजूनही एखाद्या भक्ताला आपल्या थरथरत्या हाताने ते उत्तर पाठवतातच. त्यांची सर्व पत्रे स्वतःच्या हस्ताक्षरात असतात. पत्रातील अक्षरांना सद्गुरूचा हस्तस्पर्श झालेला असतो, पत्रातील शब्द त्यांच्या हृदयातून उमललेले असतात आणि शिष्याचे कल्याण व्हावे या संकल्पातून लिहिलेले असतात. त्यामुळे महाराजांचे शब्द, त्यांची ईश्वरी दृष्टी, स्पर्श आणि संकल्प या चारही प्रवाहांचे येथे केंद्रीकरण झालेले असते. महाराजांचे प्रत्येक पत्र भक्तांच्या जीवनात असा ईश्वरी शक्तीपुंज घेऊनच प्रवेश करते आणि त्या भक्ताच्या हृदयात आणि जीवनात त्या ईश्वरीशक्तीचे संक्रमण घडते.

त्यांच्या अनेक पत्रांतून भक्तांना मार्गदर्शन होते. वेद, पुराणे, उपनिषदे आणि शास्त्रग्रंथ यांचे सारच या उपदेशात प्रकट झालेले दिसते. वेदान्त ज्ञानाचा भरभक्कम पाया या उपदेशाला असतो. साधकाने साधना अखंडपणे

व श्रद्धेने चालू ठेवावी आणि आपला अधिकार वाढवोत रहावे यासाठी उत्तेजन देण्याच्या हेतूनेही अनेक वाक्ये लिहिलेली दिसतात, श्रद्धा वाढेल, ज्ञानप्राप्तीची तळमळ वाढेल, चित्तशुद्धी होईल आणि शांती प्राप्त होईल या उद्दिष्टाने समयोचीत उपदेश देणारी वाक्ये महाराजांनी लिहिलेली दिसतात. अनेक पत्रात स्वतःची प्रकृती, प्रवास, संबंधित साधकांची नावानिशी चौकशी, त्यांना आशीर्वाद असेही उल्लेख आहेत. श्रीदत्तमहाराजांची विद्वत्ता, ज्ञान, भक्ती आणि वैराग्य यांचे दर्शनही या पत्रांतून होते. एकप्रकारे महाराजांचे अंतरंगच या पत्रात प्रकट झालेले आहे. श्रीदत्तमहाराजांची पत्रे योजनाबद्ध असतात, नेमकेपणा, रेखीवपणा ही या पत्रांची वैशिष्ट्ये आहेत. अनेक वाक्ये सूत्रांसारखी उतरलेली दिसतात. सद्गुरूंचे शब्द किती समर्थ असतात याची श्रीदत्तमहाराजांची पत्रे प्रचिती देतात.

श्रीदत्तमहाराजांना आलेली व श्रीदत्तमहाराजांनी पाठविलेली उत्तरे तर त्यांच्या लक्षात असतातच परंतु ज्या पत्त्यावर पत्र पाठवले तो पत्ताही त्यांच्या स्मरणात असतो. एखादा साधक आला व म्हणाला की महाराज आपल्याला पत्र पंधरा दिवसांपूर्वी पाठवले होते, उत्तराची प्रतिक्षा करीत आहे. लगच महाराज विचारतात, "काय नांव आपले?" नाव ऐकताच सांगतात, 'हं, तीन दिवसांपूर्वीच पत्राचे उत्तर पाठवले आहे, त्या त्या पत्त्यावर पाठवले आहे.' पत्ता सांगतात ते घरक्रमांक, रस्ता, पेठ हा पत्त्यातील तपशीलही अगदी अचूकपणे लगच सांगतात. पत्राचे उत्तर पाठवले नसले तर लगेच सांगतात, 'हं पत्र आलंय चार दिवसांपूर्वी, उत्तर पाठवायचे आहे, दोन तीन दिवसांनी पाठवतो.' ही पत्रे म्हणजे श्रीदत्तमहाराजांचा प्रपंचच आहे असे म्हणावेसे वाटते, कारण 'हे विश्वची माझे घर' अशा स्थिर मतीने आणि 'किंबहुना चराचर आपण होऊन' ही पत्रे लिहिली आहेत आणि म्हणूनच महाराजांची 'वसुधैव कुटुंबकम्' ही मनोवृत्ती या पत्रांतून प्रकटली आहे. महाराजांची पत्रे म्हणजे त्यांच्या हृदयांतील 'विचारधन' आहे. परमसंतोष देणारा 'अक्षयनिधी' आहे. महाराजांनी लिहिलेला निवडक पत्रांचा संग्रह प्रकाशित होणे साधकांना खूपच उपयुक्त ठरेल असे म्हणावेसे वाटते.

श्रीदत्तमहाराजांचे दर्शन

श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला जे लोक येतात त्यापैकी काही लोकांना पारमार्थिक मार्गदर्शन हवे असते, हे खरे आहे. तथापि सर्वच लोकांना केवळ पारमार्थिक मार्गदर्शन हवे असते असे म्हणता येणार नाही. अनेक लोकांना संसारातील दुःखे दूर व्हावी अशी इच्छा असते. तशी कामना मनात धरून ते दर्शनाला येतात. अनेक लोकांना भुक्तीची, संसारातील भोगांची कामना असते. कोणाला संतती हवी असते, कोणाला नोकरी हवी असते, कोणाला घर हवे असते, कोणाला बढती हवी असते, कोणाला न्यायालयीन खटल्यात यश मिळावे अशी इच्छा असते, कोणाला व्यवसायात यश मिळावे अशी इच्छा असते अशा कामना मनात ठेवून दर्शनाला येणाऱ्या लोकांची संख्या कमी नसते. उत्कटतेने प्रार्थना केली तर श्रीदत्तमहाराजांच्या कृपेने या अशा मनात बाळगलेल्या कामनाही पूर्ण होतात असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. परंतु अशा कामना पूर्ण करतानाही श्रीदत्तमहाराज भक्तांच्या हृदयात योग्य तो बदल घडवून आणतात, आध्यात्मिक प्रगतीची इच्छा त्यांच्या मनात हळूहळू जागृत होईल असे करून देतात. म्हणजे मनात काही कामना धरून जो भक्त श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला येतो त्याच्या मनातही श्रीदत्तमहाराज आंतरिक बदल घडवून आणतात आणि आध्यात्मिक प्रगतीची ओढ निर्माण करतात.

म्हणूनच सनातन संस्कृतीवर प्रेम करणाऱ्या साधकांना ते जितके जवळचे वाटतात तितकेच पाश्चात्य संस्कृती आणि मूल्यांनी प्रभावित झालेल्या आधुनिक सुशिक्षित तरुणांनाही ते तितकेच वंदनीय वाटतात. दर्शनाला येणाऱ्या अनेक शिष्यांना आणि साधकांना श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेताना तीव्र आध्यात्मिक स्पंदनांचा अनुभव येतो आणि त्यांच्या अंतरंगात खोलवर बदल घडून आलेला आहे असे त्यांच्या लक्षात येते. श्रीदत्तमहाराज म्हणजे मूर्तिमंत प्रेम आहे असा अनुभव आल्यामुळे अनेक उच्चविद्याविभूषीत आणि जगभर प्रवास केलेल्या आधुनिक तरुणांनाही त्यांनी आपल्या दैवी अमृतमय प्रेमाच्या सुवर्णपाशात अडकवून ठेवलेले आहे.

श्रीदत्तमहाराज जेव्हा एखाद्या शिष्याला दीक्षा देतात तेव्हा त्या शिष्याच्या हृदयामध्ये ते शक्तीसंचार करीत असतात. त्यांच्या ठिकाणी

असलेल्या सिद्ध शक्तींमुळे ते आपल्या शिष्यांच्या मनावर संस्कार करून त्याच्या मनात बदल घडवून आणू शकतात आणि फारच अल्पकाळात ते आपल्या शिष्यांच्या जीवनाची गती अध्यात्माकडे वळवू शकतात. शास्त्र असे सांगते की सिद्ध मंत्रांची शक्ती अमोघ असते. विशेष करून ती सिद्ध मंत्रशक्ती श्रीदत्तमहाराजांसारख्या आत्मज्ञ अशा सद्गुरूच्या माध्यमातून जेव्हा संक्रमित होत असते ती अधिकच फलदायी ठरते.श्रीदत्तमहाराजांची कृपा झाल्यामुळे अनेक शिष्यांना असा अनुभव आला आहे की अहंकार अल्पकाळात नाहीस झाला आणि संसारबंधन दूर होऊन ईश्वराचा लाभ करून घेता आला. काही निवडक अधिकारी शिष्यांना श्रीदत्तमहाराजांनी अद्वैत अनुभूतीची अवस्थाही प्राप्त करून दिली आहे. अद्वैत अनुभूती प्राप्त झाल्यावरसुद्धा जर शिष्याची इच्छा भक्तीभाव कायम ठेवून द्वैतावस्थेत रहावयाची असेल तर श्रीदत्तमहाराजांनी तसेही घडवून आणलेले आहे. अशा अद्वैत भक्तीची उदाहरणेही आहेत.

* काही चमत्कार

श्रीदत्तमहाराजांनी आपल्या दैवी शक्तीचे किंवा अतींद्रिय शक्तीचे कधीही प्रदर्शन केलेले नाही. असे असले तरीही त्यांच्याकडे अनेक भक्त आणि अनुयायी यांचा पत्रे नियमितपणे येत असतात. त्यांत श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या चमत्कारांचा उल्लेख असतो. श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या चमत्कारांच्या तपशीलवार हकीकती या पत्रांतूनही असतात आणि अशा प्रसंगाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले अनेक भक्त त्या हकीकती ठासून सांगत असतात. त्यात अनेक डॉक्टर, प्राध्यापक, प्राचार्य, चार्टर्ड अकाउंटन्टस्, इंजिनीयर आणि उच्च अधिकारी अशा उच्चविद्याविभूषित व्यक्तीही आहेत. श्रीदत्तमहाराजांनी रोग कसे बरे केले, अपघातापासून भक्तांना कसे वाचवले, परीक्षेत यश मिळविण्यासाठी कशी मदत केली, दूर ठिकाणी प्रत्यक्ष दर्शन देऊन मार्गदर्शन कसे केले अशा अनेक हकीकती ऐकायला मिळतात. त्या हकीकती सांगणारे जबाबदार व उच्चविद्याविभूषित असल्याने या हकीकती केवळ अंधश्रद्धा म्हणून दूर सारता येणार नाहीत. काही भक्तांना श्रीदत्तमहाराजांचे स्वप्नात दर्शन झाले. परंतु त्या स्वप्नात श्रीदत्तमहाराजांनी

कपाळावर भ्रुकुटीमध्याला बोटाने केलेला स्पर्श अनेक महिने जाणवत राहिला. स्वप्नात श्रीदत्तमहाराजांचे दर्शन झाले व त्यावेळी झालेला चरणस्पर्श कपाळावर अनेक आठवडे जाणवत राहिला असे काही भक्त सांगतात. काही भक्तांना श्रीदत्तमहाराजांचे किंवा ताईमहाराजांचे दिवसाउजेडी प्रत्यक्ष दर्शन झाले आणि त्यामुळे शांती मिळाली किंवा अडचणीच्या वेळी मदत मिळाली असे काहीजण सांगतात. काही भक्तांना अडचणीच्या वेळी श्रीदत्तमहाराज किंवा सौ.ताईमहाराज यांनी दर्शन देऊन मदत केली किंवा मार्गदर्शन केले आणि अडचणीच्या प्रसंगातून सुखरूप बाहेर काढले असेही काहीजण सांगतात. अनेक भक्तांनी परगांवी असतांना प्रार्थना करून मदत मागितली आणि श्रीदत्तमहाराज देहाने पुण्यातच असले तरी त्या भक्तांना परगावी आश्चर्यकारकरित्या मदत मिळाली असेही अनेक भक्त सांगतात. या चमत्कारांचा स्पष्ट व तपशीलवार उल्लेख अनेक पत्रांतून आहे.

ही अंधश्रद्धा आहे, हा भास आहे किंवा खोटेपणा आहे असे म्हणून या हकीकती बाजूला सारता येणार नाहीत. कारण असे चमत्कार सातत्याने सांगितले जातात आणि सांगणारे भक्त सुशिक्षित व जबाबदारीच्या जागांवर काम करणारे असतात.

श्रीदत्तमहाराजांनी हे चमत्कार जाणीवपूर्वक केले काय? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी स्वतः कधीच दिलेले नाही. कोणी उल्लेख केला तर श्रीदत्तमहाराज त्याकडे दुर्लक्ष करतात, स्पष्टपणे ते उत्तरही देत नाहीत. श्रीदत्तमहाराज ज्या वैश्विक पातळीवर किंवा ईश्वरी पातळीवर वावरत असतात त्या पातळीवर असे चमत्कार म्हणजे सहज घडलेल्या घटना आहेत.

इतर संदर्भात बोलतांना श्रीदत्तमहाराज म्हणाले होते सद्गुरूच्या स्पर्शाने अनेक असाध्य रोग बरे होतात हे खरे आहे. मृत व्यक्ती जिवंत होणे, पंगू माणसाला चालायचे सामर्थ्य प्राप्त होणे, वगैरे वरवर चमत्कार वाटणाऱ्या घटना संतांच्या बाबतीत असाध्य नाहीत. सद्गुरूजवळ अनेक सिद्धी व अतींद्रिय शक्ती असतात.त्या सद्गुरू जाणीवपूर्वक वापरत नाहीत. पण भक्ताने श्रद्धेने प्रार्थना केली तर सद्गुरूच्या दैवी शक्तीचा त्याला फायदा मिळू शकतो. रोग बरे होऊ शकतात व अडचणींचे निवारण होऊ शकते.

सद्गुरूंची जाणीव इतकी विशुद्ध असते की उत्कटतेने प्रार्थना करणाऱ्या भक्ताला सद्गुरूंच्या आशीर्वादातून प्रेरणा मिळते, मनोधैर्य मिळते व भौतिक पातळीवरही मदत मिळून अडचण दूर होते. श्रद्धा वाढावी म्हणून प्रत्यक्ष परमेश्वरच सद्गुरूंच्या माध्यमातून असे चमत्कार घडवून आणत असतो काय या प्रश्नाचे उत्तर श्रीदत्तमहाराज स्वतःच यथार्थपणे देऊ शकतील.

सर्वसामान्य माणसाला अतींद्रिय शक्तीचे ज्ञान नसते. म्हणून सामान्य माणसाला अशा शक्तींचा अनुभव येतो तेव्हा तो त्या घटनांना चमत्कार म्हणतो. परंतु शास्त्रकार सांगतात की संतपुरुषांना त्यांच्या अतींद्रिय शक्तीमुळे अनेक गोष्टी समजतात. अवतारी पुरुष तर त्रिकालज्ञ असतात, सर्वज्ञ असतात. त्यांना भूतकाळातील घटना प्रत्यक्षात पहाता येतात आणि भविष्यकाळात काय घडणार आहे याचे ज्ञान त्यांना होऊ शकते. दूर अंतरावर घडणाऱ्या घटना ते जागेवर बसूनच पाहू शकतात. भक्तांच्या मानसिक पातळीवर, शारीरिक पातळीवर आणि आध्यात्मिक पातळीवर सतत मदत होत रहाते असे शास्त्रकार सांगतात.

शास्त्रात सांगितलेल्या या अशा अनेक गूढ वाटणाऱ्या घटना प्रत्यक्षात का,केव्हा व कशा घडतात याबद्दल अधिक स्पष्टीकरण विचारले तर श्रीदत्तमहाराज फारसे काही बोलायला उत्सुक नसतात. एखाद्या साधकाची भूतकाळातील पुण्यकर्मे किंवा साधना यांचे फळ म्हणून हे चमत्कार त्या साधकाच्या जीवनात घडून येत असण्याचीही शक्यता आहे. सद्गुरूंना परमेश्वरी शक्ती प्राप्त झालेल्या असतात. त्यांचे सत्यसंकल्प असतात. ते बोलतात ते खरे होते. परंतु सद्गुरूंना स्वतःची अशी वैयक्तिक कोणतीही इच्छा नसते. सद्गुरूंचे वैश्विक शक्तीवर पूर्ण प्रभुत्त्व असते. त्यामुळे ते भक्तांना आनंद व शांती तर देतातच परंतु संकल्पाने भक्ताची शक्ती जागृत करू शकतात, समाधी देऊ शकतात, निव्वळ दृष्टीने साधकाचे उन्नयन करू शकतात. त्यांच्या दर्शनाने आध्यात्मिक प्रगतीला गती मिळते. हाही एक चमत्कारच आहे.

श्रीदत्तमहाराजांनी कृपा केल्यामुळे अनेक साधकांना अनुभूती मिळाल्या आहेत आणि गूढ अनुभवही आलेले आहेत. सामान्य माणसांना त्यांनी आध्यात्मिक अधिकार प्राप्त करून दिला आहे. अनेक साधक त्यांनी घडवले

आहेत आणि काही साधकांना संतमहात्मा म्हणावे अशी उंची प्राप्त करून दिली आहे. हेही एक प्रकारे चमत्कारच आहेत.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केलेल्या चमत्कारांमुळे आपण त्यांना अवतारी पुरुष मानत नाही. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व अभंग यातून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी जे धर्मजागरणाचे उत्तुंग कार्य केले त्यामुळे त्यांना आपण अवतारी पुरुष म्हणून ओळखतो. त्याचप्रमाणे श्रीदत्तमहाराजांनी चमत्कार केले म्हणून श्रीदत्तमहाराजांना अवतारी पुरुष म्हणावे असे नाही. ते चमत्कार बाजूला ठेवले तरीही त्यांनी केलेले धर्मजागरणाचे कार्य आणि साधकांचे आध्यात्मिक उन्नयन करण्याचे कार्य श्रीदत्तमहाराज अवतारी पुरुष आहेत हेच स्पष्टपणे सांगते.

✻ संतांच्या जीवनातील चमत्कारांची मीमांसा

पातंजल योग शास्त्रात आणि इतर अनेक प्राचीन ग्रंथांत अशा चमत्कारसदृश सिद्धींची माहिती दिलेली आहे व या सिद्धी म्हणजे आजच्या विज्ञानशास्त्राला माहिती नसणाऱ्या वैश्विक नियमाप्रमाणे घडणाऱ्या घटना आहेत, म्हणजे एका अर्थाने चमत्कार आहेत असे निश्चितपणे म्हणता येते. भारतीय योगशास्त्र असे मानते की संत काही वैश्विक नियम आंतरिक शक्तीच्या जोरावर जाणून घेऊन त्याप्रमाणे घटना घडवून आणू शकतात. अशा घटना घडल्या की आम्ही संतांचे चमत्कार असे नाव त्या घटनांना देतो.

जगाच्या इतिहासात अनेक संतांनी चमत्कार केले असे सांगितले जाते. जवळ जवळ सर्व देशांत अशा चमत्कार वाटणाऱ्या घटना सातत्याने संतांच्याकडून घडल्या असे हजारो वर्षांचा इतिहास सांगतो. काही घटना अतिशयोक्तीच्या स्वरूपातील असू शकतात. परंतु चमत्कार वाटणाऱ्या सर्वच घटनांबद्दल तसे म्हणता येणार नाही. श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर, श्रीएकनाथ या व अशा अनेक संतांनी चमत्कार केले असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा निश्चितच त्या घटना घडल्या असल्या पाहिजेत हे मान्य करावे लागते. कारण हे संत पूर्णपणे अनपेक्ष होते, अविकारी होते. या संतांना समाजाकडून काहीही मिळवायचे नव्हते. लोकोद्धाराच्या कार्यातच त्यांनी आपले जीवन व्यतीत केलेले आहे.

अधिक खोलवर विचार केला तर असे म्हणावेसे वाटते की, विश्वाच्या यंत्रणेचे कार्य काही विशिष्ठ नियमानुसारच घडत असते. विश्वाच्या यंत्रणेचे कार्य ज्या नियमांप्रमाणे चालते ते नियम शोधून काढण्याचा विज्ञान शास्त्रशुद्ध प्रयत्न करीत आहे. काही नियम विज्ञानाने शोधूनही काढले आहेत व ते नियम समाजाला माहिती करुन दिलेले आहेत. जे वैश्विक नियम आपल्याला माहिती आहेत, त्या नियमाप्रमाणे घडणारी घटना आपल्याला चमत्कार वाटत नाही आणि जे नियम आपल्याला माहिती नाहीत, त्या नियमाप्रमाणे घडलेली घटना आपल्याला चमत्कार वाटते. एका ठिकाणी बोललेले दुसऱ्या ठिकाणी ऐकू येणे हा काही शतकांपूर्वी चमत्कारच मानला जात होता. परंतु वैज्ञानिकांनी संशोधन करून जेव्हा संबंधित नियम शोधून काढले व रेडिओ किंवा टेलिव्हिजन उपलब्ध करून दिला तेव्हा ही घटना घरोघरी घडू लागली व ती घटना चमत्कार न वाटता दैनंदिन जीवनाचा एक भाग बनली.

वैदिककाळात भारतभूमीवर अनेक थोर ऋषीमुनींनी अंतिम सत्याचा (The Ultimate Reality) शोध घेण्यासाठी सखोल चिंतन केले. ऋतंभरा प्रज्ञा व कुशाग्र बुद्धीमत्ता असल्याने त्यांच्या चिंतनपद्धतीला स्वानुभवनिष्ठ आणि प्रयोगनिष्ठ संशोधनाचे स्वरूप प्राप्त झाले. विश्वाच्या निर्मितीचे आणि कार्यप्रणालीचे रहस्य त्यांनी या चिंतननिष्ठ संशोधन पद्धतीने जाणून घेतले आणि आपले अनुभव सांगण्यासाठी काही स्फुरलेले मंत्र व सूत्रे सांगितली. त्यांनाच प्राचीन भारतीय अध्यात्मशास्त्र असे म्हणतात. वेद व उपनिषदात विश्वाचे रहस्य पूर्णपणे उलगडून दाखवलेले आहे व विश्वाच्या कार्यप्रणालीचे अनेक नियम सांगितलेले आहेत. यापैकी काही नियम विज्ञानाने शोधून काढले आहेत. परंतु विश्वाच्या कार्यप्रणालीचे असे अनेक नियम आहेत, जे विज्ञानाला अद्यापि माहिती करून घेता आलेले नाहीत. साधू किंवा संत हे वैश्विक नियम आंतरिक शक्तीच्या जोरावर जाणून घेऊन त्या नियमाप्रमाणे विशिष्ट घटना घडवून आणू शकतात. विज्ञानाला हे नियम माहीत नसल्यामुळे आम्हाला तो चमत्कार वाटतो. परंतु वस्तुतः काही आम्हाला अज्ञात असलेल्या वैश्विक नियमाप्रमाणे त्या घटना घडलेल्या असतात.

भविष्यकाळात विज्ञानशास्त्र हे वैश्विक नियम शोधून काढू शकेल मग आम्ही त्या घटनांना संतांचे चमत्कार असे म्हणणार नाही व त्या घटना आमच्या जीवनाचा भाग ठरतील.

गेल्या काही शतकात अनेक क्षेत्रांत जे मूलगामी व शास्त्रशुद्ध संशोधन झाले आहे त्यावरून ऋषीमुनींनी सांगितलेले विश्वाच्या कार्यप्रणालीचे काही नियम बरोबर आहेत असेच दिसून येते. एक प्रकारे वैदिकऋषींच्या चिंतन पद्धतीत जे स्वानुभवनिष्ठ व प्रयोगनिष्ठ संशोधनाचे स्वरूप प्राप्त झाले होते त्यालाच विज्ञानाने अप्रत्यक्षरीत्या मान्यता दिली आहे. भविष्यकाळात विज्ञान संशोधन परिणत अवस्थेला पोहोचेल आणि वैदिकऋषींनी सांगितलेले विश्वाचे रहस्य व विश्वाच्या कार्यप्रणालीचे सर्व नियम बरोबर आहेत असेच या विज्ञान संशोधनावरून दिसून येईल असे निश्चितपणे म्हणावेसे वाटते.

जे ज्ञानगंगे नाहाले ।। ते पूर्णता होऊनी धाले ।।

श्रीदत्तमहाराज सदैव ज्ञानगंगेत डुंबतच आले आहेत. या ज्ञानाचा प्रसाद लोकांना वाटण्यातच ते आपले जीवन क्षणाक्षणाने आणि कणाकणाने खर्च करीत राहिले आहेत. त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात एक हजाराहून अधिक भागवतसप्ताह केले आहेत. भागवतातील कथा सांगण्याच्या निमित्ताने भारतीय तत्त्वज्ञानाचे सारच पुनःपुन्हा लोकांपुढे मांडले आहे. केवळ कथा सांगून लोकरंजनावर भर न देता ते पारमार्थिक विचारधन लोककल्याणासाठी श्रोत्यांना सतत वाटत राहिले आहेत म्हणूनच त्यांचा भागवतसप्ताह म्हणजे श्रोत्यांना आनंदाची दिवाळीच वाटते. प्रवचने व व्याख्याने यांतून ते पारमार्थिक ज्ञानाचा प्रसारच करीत राहिले आहेत. वेदान्ताचे सारच श्रोत्यांपुढे ठेवत आले. पुराणे, प्रस्थानत्रयी, शंकरभाष्य आणि योगवासिष्ठ यातील शिकवण विसाव्या शतकांत सोप्या शब्दात सांगत आले आहेत आणि ज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथी भागवत, तुकारामगाथा वगैरे संतवाङ्मयाच्या अभ्यासाकडे वळवण्याचा प्रयत्न करीत राहिले आहेत. साधकांच्या वैयक्तिक प्रश्नांना उत्तरे देऊन परमार्थ मार्गावरील वाटचालीत येणारे अडथळे व अडचणी दूर करीत राहिले आहेत. आलेल्या प्रश्नांना स्वतःच्या हस्ताक्षरात उत्तरे पाठवून ज्ञान व अनुभूती यांचे तेजःकण साधकाच्या हृदयांत संक्रमित राहिले आहेत.

अशा तऱ्हेने श्रीदत्तमहाराज स्वतः सदैव ज्ञानगंगेत विहार करीत राहिले आहेत आणि साधकांनाही ज्ञानगंगेत डुंबायला उद्युक्त करीत राहिले आहेत. अशा ज्ञानगंगेत सदैव विहार करणाऱ्या संतांचे वर्णन करतांना श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

जे ज्ञानगंगे न्हाले । पूर्णता होऊनी धाले ।
जे शांतीसी झाले । पल्लव नवे ॥९.१९०॥

(भावार्थ : संत अखंड ज्ञानगंगेत डुंबत असतात. पूर्ण ब्रह्मस्थितीचे भोजन करून ते तृप्त झालेले असतात. असे संत म्हणजे ब्रह्मशांतीला किंवा अत्यंत निर्वासन स्थितीला फुटलेली कोवळी पालवीच होय.)

हे वर्णन श्रीदत्तमहाराजांना पूर्णपणे लागू पडते. सतत आत्मज्ञानरुपी गंगेत ते डुंबतच असतात.

"यथैव मृण्मयः कुंभस्त हद्देहोऽपी चिन्मयः" (आद्य) शंकराचार्य

या वचनाप्रमाणे श्रीदत्तमहाराजांचा देहही आता पूर्ण ज्ञानगंगास्वरूपच होऊन गेला आहे आणि त्या देहाला चिन्मय रूप प्राप्त झाले आहे. परब्रह्माच्या सगुण व निर्गुण अशा दोन्ही स्वरूपाशी त्यांचे ऐक्य झालेले असल्याने त्यांना पूर्णता प्राप्त झाली आहे. स्वतःसाठी काहीच प्राप्त करून घ्यायचे नसल्याने श्रीदत्तमहाराज पूर्ण सुखरूप, शांतीरूप, आनंदरूप झालेले आहेत.

तरी गिळोनी ज्ञेयाते । ज्ञाता ज्ञानही माघोते ।
हारपे निरूते । ते शांती पै गा ॥ १६.१३७॥

(भावार्थ : ज्ञाता म्हणजे विषयाला जाणणारा, ज्ञेय म्हणजे विषय व ज्ञान म्हणजे विषयांचे ज्ञान ही त्रिपुटीच श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी एकवटलेली आहे. त्यामुळे ते शांतीचे परमरूप झाले आहेत. चित्त परब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी अखंड स्थिरावलेले असल्याने श्रीदत्तमहाराज सदैव ब्रह्मानंदच भोगत असतात. ब्रह्मानंदाने रसभरीत झालेल्या श्रीदत्तमहाराजांसारखे संतांचेच वर्णन श्रीज्ञानेश्वर माऊलींनी चित्ताच्या निर्वासनरूप शांत स्थितीला निघालेले कोवळे पल्लव असे केले आहे.)

* श्रीदत्तमहाराजांची दैवी संपत्ती

श्रीदत्तमहाराज स्वतःबद्दल कधीही बोलत नाहीत. स्वतःबद्दल कधीही काही सांगत नाहीत. आपल्या आवडीनिवडीबद्दल ते कधीही कुणाशी बोललेले आढळून येत नाही. आपली पसंती किंवा नापसंती याबद्दलही त्यांच्या तोंडातून कधी शब्द निघत नाही. मान, सन्मान किंवा निंदा, टीका याबद्दलही ते कधी कुणाशी काही बोलत नाहीत. कोणी अनुकूल किंवा प्रतिकूल बोलले तरीही ते कधी उत्तर देताना दिसत नाहीत. श्रीदत्तमहाराजांना श्रीधुंडिराज-महाराजांच्या परंपरेत दीक्षा किंवा अनुग्रह देण्याचा अधिकार मिळालेला आहे. परंतु त्यांनी त्याचा कधीही उच्चार केला नाही. त्यांचा फार मोठा शिष्यवर्ग विदर्भ आणि मराठवाडा येथे आहे आणि तिकडे खूप मोठे कार्यक्रम होतात. परंतु याचा उच्चारही ते इतरत्र करताना दिसत नाहीत. त्यांच्या मातापित्यांना देव मानणारे हजारो भक्त त्या भागात आहेत आणि श्रीदत्तमहाराजही परमेश्वर आहेत अशी लोकांची त्या भागात श्रद्धा आहे.

अत्यंत साधेपणाने प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा श्रीदत्तमहाराजांचा स्वभावधर्म आहे. श्रीधुंडिराज-महाराजांचे उत्तराधिकारी आणि श्रीगुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी स्वतः असले तरी त्यांच्या हातून घडलेले धर्मकार्य शब्दांतून व्यक्त करीत नाहीत. श्रीज्ञानेश्वर-महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहिली त्या लिखाणाचे श्रेय व कर्तृत्त्व त्यांनी सद्गुरूना दिले. अकर्तृत्त्वच होते. श्रीदत्तमहाराजही अशाच भूमिकेत सतत जगात वावरतांना दिसतात. तरीही त्यांच्या परिसरात वावरणाऱ्या जाणकारांना त्यांची अनेक गुणवैशिष्ट्ये दिसून येतात. ही गुणवैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

* कर्मयोगी पण अकर्ता

श्रीज्ञानेश्वर-महाराजांनी असे सांगितले आहे की ज्ञानी पुरुषाचे मन आत्मस्वरूपाच्या ठायी स्थिर झालेले असते. रूढ अर्थाने त्याचे शरीर कर्मे करतांना दिसते. तो बोलतांना, ऐकताना, वावरताना दिसतो, पण जे कर्म होताना दिसते त्यात तो कर्ता नसतो, तो अकर्ताच असतो.

ही स्थिती कशी असेल याचे उदारहरण पहायचे असेल तर श्रीदत्तमहाराजांचे जीवन व कार्य पहावे. रूढ अर्थाने त्यांचे शरीर लोकात वावरताना दिसते. ते आपल्याशी बोलतात. आपले म्हणणे ऐकून घेतात, त्यांची इंद्रिये कार्य करीत आहेत असे दिसते, परंतु जाणकारांना ओळखता येते की कोणत्याही प्रकारच्या कर्माची आसक्ती त्यांच्या ठिकाणी नाही. कर्तृत्व भावनेचा पूर्णपणे त्याग करून, मी काही कर्म करतो आहे या भावनेचा पूर्ण त्याग करूनच त्यांच्या ठिकाणी कर्म घडताना दिसते. देहबुद्धीच्या पलीकडे ते गेलेले आहेत. श्रीदत्तमहाराज आत्मस्वरूप झालेले पुरुष असल्यामुळे कर्म व कर्ता या त्यांच्या भावनाच नाहीशा झालेल्या आहेत असे जाणकारांना जाणवते.

तो कर्मे करी सकळे । परी कर्मबंधा नाकळे ।
जैसे न सिपे जळी जळे । पद्मपत्र ॥५.५०

ज्ञानेश्वरीतील या ओवीप्रमाणे त्यांचे शरीर कर्मे करतांना दिसते. पण ज्याप्रमाणे पाण्यातच असलेल्या कमळाच्या पानाला पाणी चिकटत नाही, त्याप्रमाणे श्रीदत्तमहाराजांना कर्माचा लेप स्पर्श करीत नाही. देहावर अहंभाव किंवा मीपणा या भावना श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी नाहीत.

* ब्रह्मविदुत्तम

ज्या सद्गुरुच्या उपदेशाने ब्रह्मज्ञान होऊन मोक्ष मिळतो त्या सद्गुरूचे वर्णन आद्यशंकराचार्यांनी केले आहे.

श्रोत्रियोऽ वृणिनो ऽ काहमतो यो ब्रह्मविदुत्तमः
ब्रह्मणयुपरतः शान्तो निरिधन इवानलः ।

श्रीदत्तमहाराज वेदान्त कोणालाही समजेल अशा सोप्या शब्दात सहजगत्या मांडतात. जाणकारही त्या बुद्धीप्रभावाने व परिपूर्ण ज्ञानाने दिपून जातो, स्तिमित होतो. वेदान्तातील सिद्धांत घनगंभीर आवाजात ते जेव्हा बारकाव्यांसह शिष्यांपुढे मांडतात तेव्हा मनाची पूर्ण एकाग्रता करून त्यांचे ब्रोलणे ऐकणाऱ्या शिष्यांना आद्य शंकराचार्यांच्या प्रखर ज्ञानाचीच आठवण होते. ज्ञानाचा सागर असलेले शंकराचार्य गंगेच्या तीरावर नीरव शांततेत आद्य शंकराभाष्य कसे उलगडून सांगत असतील याची कल्पना यावी, असेच वेदान्तातील सिद्धांताचे घनगंभीर निरूपण श्रीदत्तमहाराजांच्या तोंडून ऐकायला मिळते.

श्रीदत्तमहाराज ब्रह्मविदुत्तम आहेत. ब्रह्माचा त्यांना साक्षात्कार आहे, प्रत्यक्ष अनुभव पूर्णतया त्यांनी घेतलेला आहे, ते प्राज्ञ आहेत. त्यांच्याभोवती वावरणाऱ्या जाणकार शिष्यांच्या असे लक्षात येते की श्रीदत्तमहाराजांचे मन सदैव ब्रह्मानंदातच मग्न असते. शब्दज्ञान आणि अनुभव हे दोन्ही परिपूर्ण रूपाने त्यांच्या ठिकाणी व्यक्त होतात. ते पूर्णपणे अनासक्त आहेत. लहान बालकाचे मन जसे निरागस असते, निष्पाप असते, मन सदैव शुद्ध असते तसे त्यांचे मन आहे. पूर्ण आत्मानंद त्यांनी प्राप्त करून घेतलेला असल्यामुळे कोणतीही व्यक्तिगत अभिलाषा किंवा इच्छा त्यांच्या मनात कधीही प्रवेशच करत नाही. म्हणूनच श्रीआचार्यमहाराजांनी वापरलेल्या ब्रह्मविदुत्तम या शब्दानेच त्याचे वर्णन करता येईल.

"स गरूरुमेवाभिगच्छेत् समित्यानिश्रोत्रिय ब्रह्मनिष्ठमयम् ।" अशी श्रुती आहे. या श्रुतीत असे सांगितले आहे की ज्या श्रीगुरूला शरण जायचे तो श्रीगुरू श्रोत्रिय असावा. निरनिराळ्या वचनांमध्ये जो वरवर विरोध भासतो त्यामुळे शिष्यांच्या मनात ज्या शंका उत्पन्न होतात त्या शंकाचे पूर्ण समाधान श्रोत्रिय श्रीगुरूच करू शकतात. त्याचप्रमाणे स्वतः ब्रह्मानुभवात पारंगत असलेला म्हणजे ब्रह्मनिष्ठ पुरुषच शिष्याला अनुभव देऊ शकतो. म्हणून ब्रह्मनिष्ठ पुरुषच श्रीगुरू या संज्ञेला पात्र ठरतात. 'जो शब्दज्ञाने पारंगत। ब्रह्मानंदे सदा डुल्लत।' असे श्रीगुरूचे वर्णन श्रीएकनाथमहाराजांनीही एकनाथी भागवतात केलेले आहे. असे श्रीगुरू श्रीदत्तमहाराज आहेत. ते श्रोत्रिय आहेत आणि ब्रह्मनिष्ठही आहेत, म्हणूनच ते आपल्या शिष्यांच्या सर्व आध्यात्मिक शंकाचे पूर्ण समाधान सहजगत्या करताना दिसतात आणि योग्य अधिकारी शिष्यांना त्या शिष्याच्या पात्रतेप्रमाणे आध्यात्मिक अनुभव प्राप्त करून देताना दिसतात.

सर्व सुखाचा अंतर्भाव एका ब्रह्मसुखातच होत असल्यामुळे ब्रह्मसुख हे संपूर्ण सद्भाग्याची साठवण आहे. हे ब्रह्मसुख अशा श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ श्रीगुरूच्या सेवेनेच प्राप्त होते म्हणून सद्गुरूसेवा सर्व भाग्याची जन्मभूमी आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. ज्यांच्या सेवेने हे ब्रह्मसुख प्राप्त होऊ शकते असे सद्गुरू म्हणजे श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ श्रीगुरू परिपूर्ण रूपात

श्रीदत्तमहाराजांच्या रूपात पहायला मिळतात. ब्रह्मैव गुरूरूपेणावतिष्ठते या श्रुतीवचनाप्रमाणे जीवाचा उद्धार करण्यासाठी परब्रह्मच श्रीदत्तमहाराजांच्या रुपाने अवतीर्ण झाले आहे.

* त्रिकालज्ञ आणि क्रांतदर्शी

त्रिकालज्ञ आणि क्रांतदर्शी ही विशेषणे पुराण वाङ्मयात देवर्षी नारद, ब्रह्मर्षी वसिष्ठ आणि महर्षी व्यास या श्रेष्ठ महात्म्यांना अनुलक्षून अनेक ठिकाणी वापरण्यात आली आहेत. आधुनिक काळात त्रिकालज्ञ व क्रांतदर्शी ही विशेषणे श्रीदत्तमहाराज यांना सर्वार्थाने शोभून दिसतील. मानवी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीची तळमळ त्यांना आहे. जनताजनार्दनाची निष्काम सेवात्मक भक्ती कशी करावी याचा आदर्श त्यांच्या जीवनाच्या रूपाने पहायला मिळतो. साधुसंत लोकोद्धाराचे कार्य भारतात शतकानुशतके करीत आले आहेत. या परंपरेला शोभेल असे आध्यात्मिक कार्य श्रीदत्तमहाराज करीत आहेत.

* वैदिक तत्त्वज्ञानाचे महनीय प्रवक्ते

वेदान्त शास्त्रातील चार महावाक्यांतून धर्माचे मूलभूत सिद्धांत सामावलेले आहेत. वेद उपनिषदे, पुराणे, भागवत, महाभारत आणि रामायण या ग्रंथातून जे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे ते या महावाक्यांचेच स्पष्टीकरण आहे. गेल्या काही शतकात सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थिती खूपच बदलली आहे. अनेक भौतिक शोध लागले असून काही भौतिक सुधारणा झालेल्या आहेत. एका अर्थाने भौतिक विज्ञानाच्या प्रगतीमुळे जग संकुचित झाले आहे. परंतु शांतीचा शोध घेणाऱ्या नवीन युगाचा विश्वकल्याणकारी धर्म वेदान्त तत्त्वज्ञानावरच आधारित असू शकतो. संप्रदाय, पंथ, प्रदेश, भाषा वगैरे चौकटी, सीमा व बंधन ओलांडून आधुनिक काळाच्या भाषेत आधुनिक लोकांना समजेल अशा भाषेत विश्वधर्म सांगावयाची आवश्यकता आहे हे ओळखून श्रीदत्तमहाराजांनी वेदान्त धर्म आजच्या परिभाषेत सांगितला आहे, सर्वसामान्य माणसालाही कळेल अशा सोप्या शब्दात सांगितला आहे.

पूर्वी पंडितशास्त्री शास्त्रार्थाच्या सभा जिंकण्यात धन्यता मानीत. वेदान्त कंठीरव (कंठीरव म्हणजे सिंह) वादीभसिंह (वादीरूपी हत्तींना सिंहाप्रमाणे परास्त करणारे) असा नावलौकिक संपादन करण्यात अनेक शास्त्रीपंडितांना धन्यता वाटे. या शास्त्रीपंडितांहून अधिक ज्ञान असूनही श्रीदत्तमहाराजांनी शास्त्रार्थ चर्चेत किंवा वादविवादात कधीच रस घेतलेला नाही.

ऋतंभरा प्रज्ञेच्या प्रकाशातून त्यांनी वेदान्ताच्या विविध महावाक्यातील सिद्धांताचे दर्शन घेतले, त्यातील अनुभव घेतला आणि आधुनिक युगाला समजेल, रुचेल व कळेल अशा भाषेत धर्माचे मूलभूत सिद्धांत पुन्हा मांडले. विज्ञाननिष्ठ सुशिक्षित मनुष्यही आचरणात आणू शकेल अशा पद्धतीने त्यांनी वेदान्त पुन्हा सांगितला आहे. पंथ, संप्रदाय, भाषा, देश या सर्व संकुचित कुंपणाना ओलांडून विश्वधर्म म्हणून मान्यता पावेल असे वेदान्ताचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

* परिपूर्ण शुचिता

श्रीदत्तमहाराजांच्या ठायी पराकोटीची शुचिता व्यक्त होते. कापूर जसा आतून आणि बाहेरुन निर्मळच असतो तशी अंतर्बाह्य शुचिता श्रीदत्तमहाराजांच्या ठायी पहायला मिळते.

तेथ अंतर्बाह्य गेले । निर्मळत्त्व एक जहाले ।
किंबहुना उरले । शुचित्वचि ॥१३.४७५॥

(भावार्थ : ज्याप्रमाणे स्फटिकाच्या घरात असलेल्या दिव्याचा प्रकाश बाहेर दिसतो, त्याप्रमाणे अंतःकरणात प्राप्त झालेले शुचित्त्व किंवा निर्मलत्व बाहेर आचरणात सतत दिसत राहते. अशा शुद्ध मनाला कोणतेही विकल्प किंवा विकार स्पर्शही करीत नाहीत.)

अशी परिपूर्ण पराकोटीची शुद्धता, शुचित्त्व श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी आहे. साक्षात शुचित्वच श्रीदत्तमहाराजांच रूप घेऊन आले आहे. शुचित्त्वासंबंधी लिहितांना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

तरी जयाचे चोखटे मानसी । मी होऊन असे क्षेत्रसंन्यासी ।
जया निजेल्याते उपासी । वैराग्य गा ॥९.१८८॥

(भावार्थ : असे चोखटे म्हणजे शुद्ध मन असलेल्या संतपुरुषाच्या निर्मळ अंतःकरणात मी क्षेत्रसंन्यासी होऊन राहतो. ते संतपुरुष निजले असले, अगदी गाढ झोपले असले तरी वैराग्य त्यांची उपासनाच करीत रहाते. त्यांना विषयांचा विसर पडतो, आत आणि बाहेर परमात्माच दिसतो. देहभाव व मीपण नाहीसे होते आणि फक्त भगवंतच उरतो.)

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितलेली ही स्थिती कशी असेल हे पहायचे असले तर श्रीदत्तमहाराजांकडे पहावे.

* श्रीदत्तमहाराजांची गुरूभक्ती

श्रीदत्तमहाराजांच्या ठायी पराकोटीची गुरूभक्ती आहे. श्रीगुरूमहाराजांची श्रीदत्तमहाराजांनी जी सेवा केली तशी गुरूसेवा अगदी क्वचितच पहायला मिळते. श्रीज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात ओवी क्रमांक ३७३ पासून ४५७ क्रमांकाच्या ओवीपर्यंत श्रीज्ञानेश्वर-महाराजांनी गुरूसेवेचे जे वर्णन केले आहे ते फारच बहारीचे आहे. श्रीज्ञानेश्वरीतील हे वर्णन म्हणजे गुरूसेवेचा आदर्शच मानला जातो. अगदी त्याच कोटीची तशीच गुरूसेवा श्रीदत्तमहाराजांनी आपल्या सद्गुरूंची केलेली आहे. जणू काही श्रीदत्तमहाराजांनी गुरूमहाराजांची केलेली सेवा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी प्रत्यक्ष पाहिली आणि ती गुरूसेवा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पसंतीला उतरल्यामुळे त्या पाहिलेल्या सद्गुरूसेवेचेच वर्णन ज्ञानेश्वरीत केले असे वाटावे इतके ज्ञानेश्वरीतील गुरूसेवेचे वर्णन श्रीदत्तमहाराजांच्या गुरूसेवेत स्पष्ट व्यक्त होते. श्रीगुरूमहाराज म्हणजेच भगवंत या श्रद्धेने गुरूभक्तीकरता श्रीदत्तमहाराज त्यांच्याशी एकरूप होऊन भक्ती करीत राहिले.

अद्वैतानंतरही अद्वैत न मोडता भक्ती कशी होत रहाते याचे वर्णन करताना ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणत -

भक्ती सुखा लागी । आपणजेंचि दोही भागी ।
वाटुनिया आंगी । सेवकै बाणे ॥१२.१८६॥

(भावार्थ : भक्तीसुख भोगण्यासाठी मीच स्वतःला दोन भागात वाटून घेतो आणि एका अंगाने (भागाने) भक्त होतो आणि मग मीच भक्तीसुख

भोगत रहातो. अद्वैतानंतरही, अद्वैत न सोडता सद्गुरुंची परमेश्वररूपाने भक्ती होऊ शकते. एकनाथमहाराज म्हणतात,"वामसव्य दोन्ही भाग । परि दो नामी एकचि अंग । तैसे देवभक्त विभाग देवपणी सांग आमासे ।" (एकनाथी भागवत) "द्वैत दशेचे आंगण । अद्वैत ओळगे आपण । भेद तंव तंव दूण । अभेदासी ।' असे ज्ञानदेवांनी अमृतानुभवात जे म्हटले आहे ते याच गुरू व शिष्य यांच्या अद्वैत भक्तीच्या अवस्थेचे वर्णन आहे.

ही अवस्था कशी असेल हे पहायचे असेल तर श्रीत्तमहाराजांकडे पहावे इतके हे अद्वैत भक्तीचे वर्णन श्रीदत्तमहाराजांना लागू पडते.

* अहैतुक दयासिंधू

बाहेरच्या जगात अनुकूल प्रतिकूल काहीही घडले तरी श्रीदत्तमहाराज नेहमी अविचल किंवा शांतच असतात. ते शांतीचा सागरच आहेत असे दिसते. परंतु इतरांचे दुःख पाहिले तर मात्र त्यांचे हृदय द्रवून जाते आणि समोरचा दुःखी जीव दुःखमुक्त व्हावा अशी दया त्यांच्या मनात निर्माण होते. श्रीदत्तमहाराज अत्यंत उचित असा उपदेश देऊन शिष्यांचे दुःख नाहीसे करतात. ही खरी दया आहे. अशा परिपूर्ण दयेचे ते सागरच आहेत.

श्रीदत्तमहाराजांची दया ही निर्हेतूक असते. शिष्यांनी मानसन्मान द्यावा, गौरव करावा किंवा प्रत्युपकार करावा असा विचार किंवा भावना कधीही त्यांच्या मनात निर्माण होत नाही. विनीत शिष्याचे दुःख दूर केले की मग तो विषय त्यांच्या दृष्टीने संपलेला असतो. श्रीदत्तमहाराजांची पवित्र दृष्टी शिष्यांवर पडली की तो दुःखमुक्त होऊन जातो आणि त्याला शांतीचा लाभ होतो. त्यांचा एक नेत्रकटाक्ष पूर्ण शांती द्यायला समर्थ असतो, हे त्यांच्या दृष्टीपाताचे महात्म्य अनेक शिष्यांनी अनुभवले आहे. म्हणूनच अहैतुक दयासिंधू हे वर्णन त्यांना पूर्णपणे लागू पडते.

* ऐहिक व पारमार्थिक उन्नतीचा समन्वय करण्याची शिकवण

श्रीदत्तमहाराज आयुष्यभर लोकोद्धाराचेच कार्य सतत करीत आलेले आहेत. संसाराच्या पीडांनी श्रांत झालेल्या असंख्य लोकांना त्यांनी एखाद्या विशाल वटवृक्षाप्रमाणे सावली दिली आहे. लोकांनी ऐहिक जीवन सुधारण्याचा प्रयत्न


करावा, सर्व सांसारिक सुखे मिळवावी, परंतु ती सुखे देणाऱ्या परमेश्वराला विसरू नये,ऐहिक जीवनाबरोबरच पारमार्थिक जीवनही उन्नत करण्याचा प्रयत्न करावा ही त्यांची शिकवण आहे. ईश्वराच्या सतत अनुसंधानाने आंतरिक जीवन समृद्ध होईल व प्रपंच आणि परमार्थ दोन्ही साधेल अशीच त्यांची शिकवण आहे.

मंदिराच्या आणि प्रतिमेच्या (मूर्तीच्या) सीमेतून परमेश्वराला बाहेर आणून 'यत्र जीव तत्र शिव' या मंत्राने त्यांनी सर्वत्र परमेश्वर पहायला शिका असे सांगितले आहे. जो भगवान समाधीत लाभतो तोच मंदिरातील मूर्तीत आहे आणि तोच परत अखिल जगतात प्रत्येक जीवात आहे, प्रत्येक कणात आहे असे ते आग्रहाने प्रतिपादन करतात. निर्वैर होणे, निर्त्मसर होणे, कोणाबद्दलही वैरभावना न ठेवणे हीच भगवंताची खरी पूजा आहे, अशी त्यांची शिकवण आहे. प्रारंभाला मूर्तीपूजा आहे, परंतु पुढे त्यातून बाहेर पडून विराटाची पूजा, अंतःपूजा म्हणजे विश्वात सर्वत्र परमेश्वर पहायला शिकणे या पुढच्या पायरीकडे ते साधकाला नेण्याचा प्रयत्न करतात.

केवळ स्वतःच्या उद्धारासाठी साधना करणारा, इतरांच्या ऐहिक व पारमार्थिक जीवनाकडे पूर्ण पाठ फिरवणारा, जुन्या परंपरेतील संन्यास श्रीदत्तमहाराजांना अभिप्रेत नाही. ध्यान व तपस्या इत्यादी साधनांनी मुक्तीलाभाचा प्रयत्न करणारा संन्यास जीवनाचा आदर्श म्हणून त्यांनी कधीच सांगितला नाही. बाह्य त्यागापेक्षा आंतरिक त्याग अधिक महत्त्वाचा आहे असे ते सांगतात. अनासक्त मनाने प्रपंच करीत रहाणे हाच परमार्थ ही त्यांची शिकवण आहे.

* भगवत्स्वरूप झालेले भक्त


स्वतः श्रीदत्तमहाराज यांचे जीवन म्हणजे निष्काम परमभक्तीचे परिपूर्ण रूप आहे. "यद्धमार्थसुद्धप्रियात्मतनम प्राणाशयासवकृते।" असे भागवतात केलेले भक्तीचे वर्णन त्यांना पूर्णपणे लागू पडते. भगवंताला सर्व समर्पण केल्यामुळे शेवटी भक्ताचे मीपणही माझेपणाबरोबरच भगवंताला अर्पण होते आणि त्या भक्ताचे भगवंताशी जाणीवरहित ऐक्य होत व मग स्वतःच्या देहाचा विसर पडून तो भक्त भगवत्स्वरूप होऊन जातो असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. सर्वभाव भगवंताला अर्पण केलेला भक्त




गंगा कावड करून वासुदेवनिवासमध्ये आणली तेव्हा



एका भक्ताच्या घरी स्वागत



श्रीदत्तमहाराज
(अंतर्मुख ध्यानावस्था)



श्रीदत्तमहाराज
सायंसंध्या
करतेवेळी

भगवद्रूप होतो याचे प्रत्यक्ष उदाहरण श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने आपल्याला प्रत्यक्षात पहायला मिळते.

* अधिकार तैसा करू उपदेश

समोर आलेल्या साधकांची आध्यात्मिक तयारी त्यांच्या ध्यानात येते व त्याप्रमाणे ते उपदेश करतात. परमार्थमार्गावर बरीच वाटचाल करून पुढे गेलेल्या अनेक साधकांना असा अनुभव येतो की शब्दांत काही सांगावे लागत नाही. श्रीदत्तमहाराजही शब्दांत काहीच सांगत नाहीत. मनातल्या मनांत साधकाने केलेल्या प्रार्थनेला आपोआप मनांत उत्तर मिळते. "शब्देवीण संवादिजे" या श्रीज्ञानेश्वर-महाराजांच्या उक्तीप्रमाणे शब्दावाचून हा संवाद घडतो.

मातीच्या एखाद्या ओल्या गोळ्याला जसा आकार द्यावा त्याप्रमाणे श्रीदत्तमहाराज प्रगत साधकांचे मन घडवत जातात. त्यांची बुद्धी शुद्ध करत जातात. जसा ज्याचा अधिकार जशी ज्यांची श्रद्धा तसे फळ त्याला मिळते.

परगावी असलेल्या अनेक भक्तांचा व साधकांचा असा अनुभव आहे की श्रीदत्तमहाराजांना मनापासून केलेली प्रार्थना त्यांना पोचली व श्रीदत्तमहाराजांची मदत व मार्गदर्शन तेथेच मिळाले. पत्र लिहावे लागले नाही, फोन करावा लागला नाही किंवा तारही करावी लागली नाही. पत्र, फोन, तार या माध्यमावाचूनच मानसिक पातळीवर श्रीदत्तमहाराजांशी संपर्क साधता येतो असा अनुभव अनेक प्रगत साधकांनी घेतलेला आहे.

श्रद्धेने लीन होऊन येणाऱ्या भक्तांचा प्रपंच व परमार्थ दोन्हीही श्रीदत्तमहाराज करुन घेतात आणि हळूहळू प्रपंचात लागलेले लक्ष कमी कमी होत जाऊन परमार्थाची ओढ वाटत गेल्याचा अनुभव अनेक साधकांना येतो.

* पूर्वग्ररहित कृपादृष्टी

भक्तांच्या प्रापंचिक तपशीलाचे स्मरण त्यांना असले तरी कोणतेही पूर्वग्रह मनात न आणता श्रीमहाराज अत्यंत प्रेमाने विचारपूस करतात आणि साधकांच्या प्रापंचिक तपशीलाची चौकशी करतात. पण त्यांचा प्रयत्न साधकांच्या पारमार्थिक भूमिकेला सहाय्य करण्याचाच असतो. साधकांच्या

चुका, उणीवा, दोष, पूर्वग्रह यांच्याकडे दुर्लक्ष करुन ते पूर्वग्रहरहित दृष्टीने कृपेचा वर्षाव करतात. साधकांचे गुण पहायचे, त्याची श्रद्धा पहायची, त्याची पारमार्थिक तयारी व अधिकार पहायचा आणि त्याप्रमाणे मार्गदर्शन करायचे हीच त्यांच्या कृपादृष्टीची वैशिष्ट्ये आहेत.

* प्रतिएकनाथ

कर्ता, क्रिया व कर्म ही त्रिपुटी चित्तातून नाहीशी झालेली असल्याने श्रीदत्तमहाराज सदैव शांतमूर्ती असतात.

श्रीएकनाथमहाराजही असेच शांतीचे परिपूर्ण रूप होते. यवनाने १०८ वेळा अंगावर थुंकल्यावरही न रागावता श्रीएकनाथमहाराज प्रत्येक वेळी पुन्हा स्नान करून आले ही हकीकत प्रसिद्धच आहे. ब्राह्मणाने मुलाच्या मुंजीसाठी पैसे मिळावे म्हणून एकनाथमहाराजांना राग आणण्यासाठी काय काय केले व शेवटी तो कसा हरला ही हकीकतही प्रसिद्धच आहे. अशा अनेक कथा श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातही घडलेल्या आहेत. अनेक प्रतिकूल प्रसंग घडूनही त्यांच्या मनाची शांती कधीही ढळलेली दिसत नाही.

एकनाथी भागवताप्रमाणेच श्रीदत्तमहाराजांनीही निरूपण केलेले भागवत अनेक शतके जनमानसात राहणार आहे. एकनाथी भागवताप्रमाणेच ते अमर राहणार आहे. श्रीएकनाथ-महाराजांप्रमाणेच श्रीदत्तमहाराजांनीही प्रपंच व परमार्थ तितक्याच समर्थपणे केला. "संसार मनात नसला म्हणजे झाले. शरीराने संसारात असले काय आणि नसले काय याला महत्त्व नाही. अनासक्तपणे प्रपंच करीत रहाणे हाच परमाथ" असे श्रीदत्तमहाराज आग्रहाने सांगतात. श्रीएकनाथ-महाराजांप्रमाणेच प्रपंच व परमार्थ यांच्या समन्वयाचा आदर्श श्रीदत्तमहाराजांनी समाजापुढे ठेवला आहे.

* लोकोद्धारासाठी झालेला पूर्णावतार

श्रीदत्तमहाराजांच्या जीवनकार्याचे वर्णन यथार्थ रितीने करताना श्रीज्ञानेश्वर-महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायात लिहिलेल्या काही ओव्यांमधून यथार्थ स्मरण होते. श्रीज्ञानेश्वर-महाराजांच्या या ओव्या अशा आहेत.

आता निर्वाळुनी कनके । भरला गांगे पीयुखे ।।
तया कलशाचियासारिखे शौच असे ।।१६.१९७।।
का फेडीत पापताप । पोखील तीरीचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ।।१९९।।
तैसी बांधली सोडीत । बूडाली काढीत ।
सांकडी फेडीत । आर्ताचिया ।।२०१।।
किंबहुना दिवसराती । पुढीलांचे सुख उन्नती ।
आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ।।२०२।।

(भावार्थ : शुद्ध बावनकशी सुवर्णाचा कलश असावा आणि त्यात अमृतरुपी गंगाजल भरावे, त्याप्रमाणे त्यांचे ठायी शुचित्व किंवा शुद्धता आहे. ज्याप्रमाणे गंगा नदी जगातील पाप व ताप नाहीसे करीत व तीरांवरील वृक्षांचे पोषण करीत समुद्राला जाऊन मिळते त्याप्रमाणे अविद्येने बांधलेल्यांना मुक्त करीत, संसार सागरात बुडालेल्यांना सागरातून बाहेर काढीत आणि दुःखितांची संकटे दूर करीत करीत समोर दिसेल त्याला सुख व समाधान देत देत परब्रह्मात मिळून जातात.)

हे वर्णन श्रीदत्तमहाराजांच्या जीवनकार्याचे यथार्थ वर्णन करते. शुद्ध बावनकशी सोन्याचा कलश घ्यावा आणि त्यात अमृतरुपी गंगाजल भरावे तसे त्यांचे व्यक्तिमत्त्व विशुद्ध आहे, शुचितापूर्ण आहे. जीवनभर ते सतत अविद्येने बांधलेल्या लोकांना अविद्येतून, अज्ञानातून सोडवण्यासाठी ज्ञान वाटत राहिले आहेत. संसार सागरात बुडालेल्या लोकांना त्यातून बाहेर काढण्यासाठी सहाय्य करीत आले आहेत, त्यांचेकडे जे दुःखी आणि पीडित लोक शरण येतात, त्यांची प्रापंचिक दुःखे दूर करीत, त्यांच्या आपत्तींचे निवारण करीत, त्यांना परमार्थाकडे वळविण्यासाठी त्यांच्यात श्रीदत्तमहाराज आंतरिक बदल घडवून आणत आले आहेत. रात्रंदिवस समोर दिसेल त्याला सुख व समाधान वाटत असलेले, परब्रह्मात मिळून गेलेले भगवंत आहेत. यापेक्षा अधिक चांगल्या शब्दात त्यांच्या जीवनकार्याचे वर्णन करताच येणार नाही.

* "सर्व पुण्यकर्मे ऋणमुक्त झाली"

श्रीदत्तमहाराजांची पावले ज्या मार्गावर उमटतात त्या मार्गावरील धुळीचा कण होण्याचीही माझी पात्रता नाही. पण श्रीदत्तमहाराज म्हणजे दयेचे सागर, वात्सल्याचे सिंधू. या सामान्य जीवाची त्यांना कणव आली म्हणून त्यांनी मला जवळे केले, चरणप्रांती आसरा दिला आणि माझ्यावर मायेची छाया धरली. माझी तशी पात्रता नसतांनाही त्यांनी मला जवळ केले म्हणूनच मी श्रीदत्तमहाराजांना माझे सद्गुरू असे संबोधत आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या चरणप्रांती विसावल्यावर हळूहळू माझ्या प्रत्ययाला येऊ लागले की श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्या अनुभूती ज्ञानेश्वरीतील ओव्यांमधून गुंफल्या आहेत, त्या अनुभूती श्रीदत्तमहाराजांच्या - माझ्या सद्गुरूच्या - ठायी मूर्तिमंत साकार झाल्या आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीत वर्णन केलेल्या दैवी संपत्तीचे भांडार माझ्या सद्गुरूंच्या ठायी भरपूर भरलेले आहे. माझ्या सद्गुरूच्या गुणवैभवाचे वर्णन करावे अशी इच्छा माझ्या मनांत दाटून आली आणि या चरित्रलेखनाच्या निमित्ताने सद्गुरूचे गुणवर्णन करण्याची माझी हौस पूरेपूर फिटेपर्यंत मी माझ्या सद्गुरूंचे गुणवर्णन येथे केले आहे.

सद्गुरूचे गुणवर्णन करण्यासाठी फार मोठे भाग्य लागते. अनेक जन्मे जेव्हा हातून लोकोत्तर पुण्यकर्मे घडतात तेव्हाच हे भाग्य लाभते. माझ्या हातूनही अशी पुण्यकर्मे निश्चितच अनेक जन्मे घडली असली पाहिजेत. नाहीतर हे भाग्य माझ्या वाट्याला आलेच नसते. सद्गुरूचे स्तवन करण्याच्या बाबतीत मी आता तृप्त झालो आहे.

पुण्यें पोशिली असाधारणें । तिये तुझे गुण वानणें ।
देऊन मज उत्तीर्णे । जाली आजी ॥१६.३३॥

ही ओवी वाचून मला खूपच आनंद वाटत आहे. अनेक जन्मे हातून घडलेल्या पुण्यकर्मांमुळेच मला माझ्या सद्गुरूचे स्तवन करण्याची संधी मिळाली आणि ते गुणवर्णन करतांना मला अपार सुख व आनंद भोगायला मिळाला. याचाच अर्थ असा की अनेक जन्मे हातून घडलेल्या पुण्यकर्मांचे फळ मला पूर्णपणे भोगायला मिळाले आणि ते फळ भोगून पूर्ण झाले.

शास्त्रकार सांगतात की जीवाच्या हातून घडलेल्या पापकर्माचे फळ म्हणून दुःख प्राप्त होते आणि पुण्यकर्माचे फळ म्हणून त्या जीवाला सुख प्राप्त होते. पापकर्माचे फळ म्हणून प्राप्त होणारे दुःख भोगूनच संपवावे लागते. पुण्यकर्माचे फळ म्हणून प्राप्त होणारी सुखेही भोगूनच संपवावी लागतात. ते सुख भोगेपर्यंत पुण्यकर्माचे ऋण बाकी रहात असते. सुख भोगून झाल्यानंतरच पुण्यकर्मे ऋणमुक्त होतात व जीवाची संसारातून सुटका होऊन तो मुक्त होतो.

चरित्रलेखनाच्या निमित्ताने माझ्या सद्गुरूचे वर्णन करताना मला एवढे मोठेसुख भोगायला मिळाले आहे की अनेक जन्मे माझ्या हातून घडलेली सर्व पुण्यकर्मे ऋणमुक्त झाली आहेत. हा विचार मनात आल्याने खूप समाधान वाटत आहे.

❊ "सद्गुरू, मला क्षमा करा"

मनातील हौस पूर्ण फिटेपर्यंत माझ्या सद्गुरूंचे गुणवर्णन केल्यावर आता जाणीव होत आहे की माझ्या अप्रतिम परमवीर्य सद्गुरूंचे मी काहीच वर्णन करू शकलेलो नाही. सगुण साकार व निर्गुण निराकार सद्गुरूंमध्ये एकत्त्व पावले आहेत. त्यामुळे सद्गुरूचे यथार्थ वर्णन वैखरी वाणीने करणे कोणालाच शक्य होणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सद्गरूचे स्तवन करताना श्रीज्ञानेश्वरीमध्ये सांगतात

जो सर्व नेणिवा जाणिणे । मौनाचिया मिठीया वाणिजे ।
कांहीच नहोनि आणिजे । आपणपयां जो ॥१६॥
जया तुझिया उद्देशासाठी । पश्यंती मध्यमा पोटी ।
सूनी परेसीही पाठी । वैखरी विरे ॥२०॥
तया तूंते मी सेवकपणे । लेववी बोलकेया स्तोत्राचे लेणे ।
हे उपसाहावेही म्हणता उणे । अद्वयानंदा ॥२१॥

(भावार्थ : "काहीही जाणले नाही तरच सद्गुरूंना जाणता येते. मौनाला मिठी घातली तरच सद्गुरूंचे योग्य गुणवर्णन करणे शक्य होते. मीपण लयाला गेले आणि अहंकार पूर्णपणे नाहीसा झाला की शिष्याच्या ठिकाणी वास्तव्य करण्यासाठी सद्गुरू आपणहून येतात. सद्गुरूंचे महात्म्य एवढे मोठे आहे

की सद्गुरूंचे स्तवन करण्याच्या हेतूने जरी मध्यमा वाणी आणि पश्यंती वाणी या दोघी वैखरी वाणीत मिसळल्या आणि परा वाणी पाठीशी उभी राहिली तरीही या चारी वाणींना मिळूनही सद्गुरूंचे यथार्थ स्तवन करणे शक्य होत नाही. सद्गुरूंचे स्तवन करता करता त्या चारही वाणी थकून जातात. आपले स्तवन किती तोकडे आहे याची जाणीव झाल्यावर या चारही वाणी लज्जित होतात आणि अंतर्धान पावतात. सद्गुरूंचे महात्म्य एवढे मोठे आहे. असे महात्म्य असलेल्या सद्गुरूंना मी सेवकपणाच्या नात्याने शब्दांतील स्तवनाचे अलंकार लेववतो आहे. ही माझी कृती आपण सहन करावी अशी प्रार्थना करणेही, हे अद्वयानंद सद्गुरो, आपल्याला कमीपणा आणणारी आहे.")

आपल्या सद्गुरूचे महात्म्य वर्णन करतांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांना जो अनुभव आला तोच येथे समर्थ शब्दांत त्यांनी सांगितला आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांचा तो अनुभव लक्षात घेतला तर सद्गुरूचे गुणवर्णन करण्याचा मी येथे जो प्रयत्न केला आहे, त्या प्रयत्नांचा व्यर्थपणा चांगलाच उघड होत आहे. जागृतमन, अंतर्मन व त्याखाली असलेली नेणीव या माझ्या मनाच्या तीनही भागांचे स्वामी माझे सद्गुरूच आहेत. माझ्या जागृतावस्थेतील मनाचे सर्व कोपरे तर सद्गुरू जाणतातच. परंतु माझ्या अंतर्मनाची सर्व अंगे आणि त्याखालील नेणीवेत अनेक जन्म साचलेले संस्काराचे थरही सद्गुरूना पूर्णपणे माहिती आहेत. मग वैखरी वाणीने शब्दांत सद्गरूचे गुणवर्णन करण्याने मी काय साधणार आहे? मी मौन धारण केले तरीही माझ्या सद्गरूना माझ्या मनातील भावना पूर्णपणे ज्ञात आहेतच.

चरित्र लेखनाच्या निमित्तान मी माझ्या अद्वयानंद सद्गुरूचे गुणवर्णन कशासाठी करतो आहे? सद्गुरूनी माझ्या ठायी वास्तव्य करण्यास यावे या हेतूनेच ना? पण श्रीज्ञानेश्वरमहाराज आपला अनुभव सांगताहेत की मीपणा लयाला गेला, अहंकार पूर्णपणे नाहीसा झाला की सद्गुरू आपल्या ठायी वास्तव्य करण्यास येतात. मग सद्गुरूचे गुणवर्णन शब्दाने करायचे कारणच उरत नाही. शिवाय आतापर्यंत मी येथे सद्गुरूचे जे शब्दांत गुणवर्णन केले ते अगदीच तोकडे झाले आहे, अपुरे झाले आहे हे आता माझ्या चांगलेच

ध्यानात आले आहे. एक प्रकारे बराच्या गच्चीवर चढून मी आकाशाला कवळायचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न किती निरर्थक आहे याची आता मला जाणीव झाली आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगताहेत की चारही वाणींनी मिळून सद्गुरूचे गुणवर्णन करण्याचा प्रयत्न केला तरी सद्गुरूचे यथार्थ वर्णन होऊ शकत नाही. त्या पराभूत होऊन, लज्जित होऊन अंतर्धान पावतात. वस्तुस्थिती अशी असताना मी तर येथे केवळ वैखरी वाणीनेच सद्गुरूचे गुणवर्णन करण्याचा प्रयत्न करीत आहे. मध्यमा वाणी, पश्यंती वाणी आणि परा वाणी हे फक्त शब्दच मला माहिती आहेत. त्यामुळे सद्गुरूचे गुवर्णन करायला या तीन वाणींचे सहाय्य मला मिळालेले नाही. वैखरी वाणीने काही सांगायला जी प्रतिभा व भाषाप्रभुत्त्व लागते तेही माझ्याजवळ नाही. माझ्यासारख्या सामान्य मतिहीन जीवाने केवळ वैखरी वाणीने सद्गुरू स्तवन करणे हे केवढे मोठे धाडस आहे ! हा केवढा मोठा अपराध आहे ! ही अपराध एवढा मोठा आहे की या अपराधाबद्दल मला क्षमा करा अशी प्रार्थना मी सद्गुरूचरणी करणेही सद्गुरूना कमीपणा आणणारे आहे.

सद्गुरूचे स्तवन चांगले केव्हा होते हेही श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगून ठेवले आहे.

श्रीगुरूचे महिमान पाहोनिया । स्तुति तरी येईजे चांगावया ।
जरी स्तव्यबुद्धीसी लया । जाईजे कां ॥

(भावार्थ : सद्गुरूंचे स्तवन करणारा स्तविता, त्याची स्तव्यबुद्धी व स्तवन जेव्हा सद्गुरूंच्या स्वरूपांत लयाला जाते तेव्हाच सद्गुरूंचे गुणवर्णन चांगले होते.)

स्तव्य, स्तविता व स्तवन ही त्रिपुटी सद्गुरूच्या लयाला जाणे हे सद्गुरूच्या कृपेनेच घडू शकते, सद्गुरूच्या इच्छेनेच होऊ शकते. सद्गुरूची कृपा व्हायला जी पात्रता व योग्यता अंगी असावी लागते ती मजजवळ निश्चितपणे नाही हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. परंतु ती पात्रता सद्गुरू कोणालाही सहजपणे देऊ शकतात हेही सूर्यप्रकाशाइतकेच सत्य आहे. म्हणून धीर करून सद्गुरूचरणी प्रार्थना करीत आहे की ती पात्रता सद्गुरूनी

मला द्यावी. ती पात्रता म्हणून मिळाली की सद्गुरूचरणी पुढील प्रार्थना मी करेन, "स्तविता, स्तव्यबुद्धी व स्तवन त्रिपुटी सद्गुरुंच्या स्वरूपात लयाला जाईल अशी कृपा हे अद्वयानंद सद्गुरो, आपण मजवर करावी."

ॐ पूर्णमदः पूर्णमदं पूर्णात्पुर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।
ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।

***

परिशिष्ट क्रमांक - १

अलौकिक सहजीवन

श्रीदत्तमहाराज म्हणजे ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप. धर्मजागरणासाठी अवतीर्ण झालेले. एक परिमळप्रज्ञ व प्रतिभाशाली तत्त्वज्ञ म्हणून त्यांनी उपनिषदांत ठिकठिकाणी विखुरलेल्या अनुभूती प्रत्यक्षात स्वतः घेतल्या. वेदकाळातील ऋषीमनींपासून आजपर्यंत झालेल्या थोर संतमहात्म्यांच्या शिकवणुकीतील सारही त्यांनी आत्मसात केले आणि कालबाह्य भाग वगळून एक सुसंगत, सर्वसमावेशक सर्वस्पर्शी तत्त्वज्ञान जगापुढे ठेवले. अखिल मानवजातीला विश्वधर्म म्हणून स्वीकारार्ह वाटेल असेच हे विचारधन आहे.

जे सांगितले तसे ते स्वतः जगले. आपले विचारधन त्यांनी स्वतः प्रत्यक्षात आचरणांत आणले आणि एक प्रज्ञावंत आचार्य म्हणून वेदान्त आचरणांत कसा आणावा याचे प्रात्यक्षिक जगापुढे ठेवले.

ज्ञान, भक्ती व कर्म यांच्या सर्वोच्च एकात्मिक पातळीवर ते आयुष्यभर वावरत राहिले. मोक्षविद्येचे प्रबोधन करीत राहिले. साधकांना मार्गदर्शन करून पुढे नेत राहिले. दुःखीतांना शांती वितरीत करून भक्तीमार्गाकडे वळवीत राहिले. भारतीय संस्कृतीतील उच्च मूल्ये व तत्त्वे स्वतःच्या आचरणांतून लोकांच्या मनावर बिंबवत राहिले आणि समाजाचे उन्नयन करीत राहिले.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी ज्या धर्मजागरणाचा उल्लेख संभवामी युगे युगे या श्लोकांत केला आहे ते धर्मजागरण श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत पूर्णरूपाने पहायला मिळते. महर्षि व्यास, आद्य शंकराचार्य आणि ज्ञानदेव यांची आठवण करून देणारे हे कार्य आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या या धर्मजागरणाच्या कार्यात त्यांच्या धर्मपत्नी सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब यांचा फार मोठा सहभाग आहे. आईसाहेबांचा अधिकार मोठा; म्हणूनच श्रीदत्तमहाराजांनी त्यांना सहधर्मचारिणी म्हणून स्वीकारले आणि आपल्या कार्यात पूर्णपणे सहभागी करून घेतले. दोघेही एकाच जीवित साफल्याच्या भावनेने भारलेले आणि एकाच दिशेने बरोबर पावले टाकणारे, आंतरिक प्रवृत्तीच्या दृष्टीने इतक्या उदात्त पातळीवरून

असे उदात्त जीवन जगणारी, विचार व आचार यांची एकरूपता साधलेली दांपत्ये जगात फार थोडी आढळतील.

भारतीय धर्म आणि संस्कृतीमधील उदात्त तत्त्वे आणि मूल्ये यांचे सगुण साकार रूप श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब यांच्या विभूतीमत्त्वांत प्रत्यक्ष पहायला मिळते. इ.स. १९३० साली श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब यांचा विवाह झाला. त्यावेळी श्रीदत्तमहाराज २० वर्षाचे होते तर आईसाहेब केवळ १२ वर्षाच्या होत्या. बार्शी या छोट्या गावात आईसाहेबांचे बालपण गेले होते. त्या काळाप्रमाणे आईसाहेबांचे फारसे शालेय शिक्षणही झालेले नव्हते आणि रूढार्थाने त्यांना धर्मशिक्षणही मिळालेले नव्हते. किंबहुना त्यांच्या माहेरी कवीश्वर घराण्याइतके परंपराधिष्ठीत धार्मिक वातावरणही त्यांनी अनुभवलेले नव्हते. तथापि आईसाहेबांची बुद्धिमत्ता अत्यंत श्रेष्ठ दर्जाची होती. जन्माला येतानांच त्या मोठा आध्यात्मिक वारसा बरोबर घेऊन आल्या होत्या. म्हणूनच कवीश्वर घराण्यात पदार्पण केल्यावर अल्पकाळात त्यांनी कवीश्वर घराण्याचे संस्कार आत्मसात केले आणि सासरच्या धर्मनिष्ठ परंपरेत त्या पूर्णतया सामावून गेल्या, कवीश्वर घराण्यातील धर्मजागरणाच्या जीवनधारेत सहजपणे मिसळून गेल्या, एकरुप झाल्या.

श्रीदत्तमहाराज बालवयापासूनच वैराग्यशील होते, अंतर्लीन स्वभावाचे होते, अंतर्मुख प्रवृत्तीचे होते. वैदिक ऋषींप्रमाणेच ते नेहमी आत्मचिंतनात रंगलेले असत. त्यांचे मन ऋषीरसाच्या अनुभूतीत रमलेले असायचे, उच्च आध्यात्मिक जाणीवांच्या विश्वात विहार करीत असायचे. तथापि त्यांचे सौ.आईसाहेबांवरील प्रेम कधीही उणावले नाही. दोघांचेही दांपत्यजीवन तृप्त, समृद्ध व समाधानाने भरलेले असेच होते.

सामान्य प्रापंचिकांच्या दांपत्य जीवनापेक्षा श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांचे दांपत्य जीवन खूपच वेगळे होते. दोघांमधील भावबंध कोमल होता, उत्कट होता तथापि तो सदैव उच्च पातळीवरच राहिला. सामान्य प्रापंचिकांच्या इच्छा, ऐहिक अपेक्षा व वासना यांच्या अतीतच सदैव तो भावबंध राहिला. दोघांमधील प्रेम ईश्वरी प्रेम म्हणावे इतके उच्च दर्जाचे

होते, अलौकिक पातळीवरचे होते. आरंभापासून अखेरपर्यंत श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेबांचे सहजीवन लौकीक पातळीच्या अतीत राहिले.

श्रीदत्तमहाराज सिद्धप्रज्ञा घेऊनच अवतीर्ण झाले आहेत, अध्यात्मविद्या त्यांना पूर्णतया अवगत आहे आणि धर्मजागरणाचे ईश्वरी कार्य नियतीने त्यांच्यावर सोपविले आहे हे आईसाहेबांनी अल्पावधीतच जाणले. श्रीदत्तमहाराजांचे अवतारी स्वरूप त्यांच्या लक्षात आले. म्हणूनच त्या श्रीदत्तमहाराजांकडे सद्गुरू म्हणूनच पाहू लागल्या. त्यांनी श्रीदत्तमहाराजांना संसाराच्या पाशात ओढण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. उलट ईश्वर भावाशी सतत संलग्न असलेल्या श्रीदत्तमहाराजांचे मन कोणत्या वासनातीत आणि इंद्रियातीत पातळीवर सदैव विवरत असते हे त्यांनी जाणले आणि श्रीदत्तमहाराजांच्या आध्यात्मिक पातळीवरील जीवनाचे आंतरिक दर्शन त्यांनी श्रद्धेने आणि विलक्षण आनंदाने घेतले. म्हणूनच या दोघांमधील पती पत्नीचे नाते प्रथम गुरू आणि शिष्य या अपार्थिव नात्यात परावर्तित झाले. श्रीदत्तमहाराजांच्या त्या पहिल्या अनुग्रहित असामान्य परिपक्व शिष्या असाव्यात. सौ.आईसाहेबांचा अधिकारही मोठा होता आणि आध्यात्मिक तयारीही त्याच तोलामोलाची होती. शुद्ध व सात्त्विक बुद्धी घेऊनच त्या जन्माला आल्या होत्या. त्यामुळे अल्पकाळात त्यांच्यावर पूर्ण गुरूकृपा झाली आणि अध्यात्मविद्या आत्मसात होऊन त्या अध्यात्मक्षेत्रांत अंतिम अनुभूतीपर्यंत पोचल्या. गुरूकृपेने त्यांचे विभूतीमत्त्व पूर्णतया उमलून आले आणि खऱ्या अर्थाने आईसाहेब श्रीदत्तमहाराजांच्या सहधर्मचारीणी झाल्या, त्यांच्या धर्मजागरणाच्या कार्यातील सर्वात महत्त्वाच्या सहकारी झाल्या. नियतीने त्यांच्यावर सोपवलेले हे कार्य आईसाहेबांनी सर्वार्थाने पूर्ण केले असेच म्हणावे लागेल.

श्रीदत्तमहाराज व आईसाहेब दोघांची विभुतीमत्त्वे एकमेकाला पूरक होती म्हणूनच ती पूर्णतया एकमेकाला अनुरुप झाली. श्रीदत्तमहाराज अबोल व वैराग्यशील वृत्तीचे होते. पूर्ण तितिक्षा अंगी बाणलेली असल्यामुळे ते सर्व काही न बोलता सहन करत असत. म्हणूनच आईसाहेब स्पष्टपणे बोलणाऱ्या होत्या. कुटुंबातील व्यक्तींसमोर किंवा शिष्यपरिवारांत त्या

मोजकेच बोलत. पण आपला अभिप्राय त्या परखड शब्दांत व्यक्त करायच्या. मात्र त्यात स्पष्ट बोलणाऱ्या प्रेमळ आईची भूमिकाच असायची. एखाद्याची चूक त्या स्पष्टपणे परखड शब्दांत दाखवायच्या. काही वेळा आवाज चढला आहे असे वाटायचे, त्या रागावलेल्या आहेत असे दिसायचे. पण पुढच्या काही क्षणात प्रेमभरल्या नजरेने त्याच व्यक्तीकडे पहायच्या आणि गोडभरल्या हसायच्या. मग लक्षात यायचे की तो रागाचा आविर्भाव वरवरचा होता, ऐकणाऱ्याच्या कल्याणासाठी होता. चेहऱ्यावर रागाचा आविर्भाव दिसला तरी आईसाहेबांचे वात्सल्याने भरलेले मातृहृदय आत तसेच प्रशांतच राहिलेले होते.

श्रीदत्तमहाराज स्वतःच्या प्रपंचाबद्दल पूर्णतया उदासीन होते. स्वतःच्या देहाकडेही त्यांचे लक्ष नसायचे. काहीशा विदेही अवस्थेत अंतर्मुख वृत्तीने ते वावरत असत. म्हणूनच आईसाहेब साक्षेपी वृत्तीच्या बारकाईने सगळीकडे लक्ष ठेवणाऱ्या, टापटीप व स्वच्छतेबद्दल दक्ष असलेल्या अशा होत्या. सर्व काही सुव्यवस्थितपणे व सुरळीतपणे होत आहे याकडे त्यांचे लक्ष असायचे. श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब त्यामुळे प्रपंचात आणि आध्यात्मिक क्षेत्रात दोघेही एकरूपतेने कार्य करू शकले. त्या दोघांमध्येही एक समान धागा होता. दोघांनीही ऐहिक कल्याणाऐवजी पारमार्थिक कल्याणच श्रेष्ठ मानले. दोघांनीही शिष्य परिवारावर पोटच्या अपत्याइतकेच प्रेम केले. दोघांनाही दुःखी आणि आर्त लोकांबद्दल कळवळा होता आणि दया बुद्धीने दोघांचेही व्यवहार होत राहिले. समोरच्या माणसाची पारमार्थिक तयारी, मनोभूमिका व मनोव्यापार दोघांनाही चटकन उमगत. समोरच्या माणसाचे अंतरंग दोघांनाही काचेच्या पेटीतील वस्तूप्रमाणे स्पष्टपणे दिसायचे. स्वतःच्या वैयक्तिक प्रपंचापेक्षा दोघांनाही धर्मजागरणाचे कार्य जास्त महत्त्वाचे वाटायचे. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांनी आईसाहेबांकडे खऱ्या अर्थाने सहधर्मचारीणी म्हणूनच पाहिले आणि आपल्या आध्यात्मिक जीवन कार्यात त्यांना पूर्णतया सहभागी करून घेतले.

दोघांमध्ये आंतरिक पातळीवर अतिंद्रिय संपर्क होता. दोघेजण एकाच घरातील दोन खोल्यात वावरत असोत किंवा अनेक मैलांवरील दोन वेगळ्या

गावात असोत, त्यांच्या दोघांमध्येही अतींद्रिय संपर्क होतच रहायचा. बिनतारी यंत्राप्रमाणे संदेशांची देवाण घेवाण व्हायची. एकाचे मनोव्यापार, अगदी दुसऱ्याला या अतींद्रिय माध्यमातून लगेच कळत आणि त्याप्रमाणे तत्परतेने दुसऱ्याच्या हातून तशी अनुरूप कृती ताबडतोब घडून येई. हे प्रापंचिक जीवनांत जितके खरे होते त्यापेक्षाही आध्यात्मिक जीवनांतील धर्मजागरणाच्या कार्यात अधिकच खरे होते. सातत्याने असे घडत राहिले आणि पहाणाऱ्यांना आश्चर्य वाटत राहिले.

सौ.आईसाहेब कवीश्वर कुटुंबोयातील सर्वांच्या जशा माता होत्या तशाच सर्व शिष्य परिवाराच्याही माता होत्या. किंबहुना त्यांनी सर्व जगाकडे मातृत्त्व भावनेतूनच पाहिले. सर्व शिष्य परिवार ज्यांची परमेश्वर रूपाने पूजा करतो त्या श्रीदत्तमहाराजांचीही आईसाहेबांनी सदैव मातेसारखीच काळजी घेतली. आईसाहेबांचे हे मातृपद आध्यात्मिक क्षेत्रातील आहे, अलौकिकाच्या राज्यातील आहे, निखळ मातृत्त्वाचे परिपूर्ण रूप आहे. श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांचे सहजीवन असे सदैव लौकिकाच्या अतीत असलेल्या उच्च पातळीवरच प्रारंभापासून राहिलेले आहे.

श्रीदत्तमहाराज ऐहिक प्रपंचाबद्दल तसे उदासीन वृत्तीचे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत व तत्त्वज्ञान शिकवायचे. तशी मिळकत बेताचीच. भागवतसप्ताहाचे पैसे प्रपंचासाठी वापरायचे नाहीत, हे श्रीदत्तमहाराजांचे तत्त्व. कोणाकडून काही स्वीकारणे ही वृत्तीच त्यांच्या विभूतीमत्त्वात नव्हती. पूर्णतया अनपेक्षवृत्तीने रहायचे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठांतून मिळणाऱ्या मिळकतीच्या मानाने प्रपंच मोठा, अतिथी-पाहुणे खूप असायचे. साधुसंन्यासी, साधुपुरुष, प्रवचनकारही यायचे. श्रीदत्तमहाराज त्यांना आग्रहाने भोजनाला ठेवून घ्यायचे. अशा प्रपंचात सामान्य स्त्री कातावून गेली असती. पण सौ.आईसाहेब सारे काही शांतपणे हसतमुखाने सांभाळत. सौ.सरस्वती आईसाहेबांचे श्रीधुंडिराज-महाराजांचे सूनबाईवर अपार प्रेम असल्याने तेही लक्ष ठेवून असायचे. शिवाय श्रीगुळवणीमहाराजही जवळजवळ रोज सकाळी येऊन वर्तकवाड्यांतील आईसाहेबांच्या बिऱ्हाडात येऊन जात व प्रपंचात काय हवे याची आस्थेने आवर्जून चौकशी

करीत. गुरूमहाराजांचा जिव्हाळा जसा श्रीदत्तमहाराजांबद्दल होता तसाच तो तितकाच सौ.आईसाहेबांबद्दलही होता. त्यांनी आईसाहेबांची थोरवी व अधिकार पूरेपूर जाणला होता असेच दिसून येते.

महाराष्ट्र विद्यापीठांतून निवृत्त झाल्यावर श्रीदत्तमहाराज भागवतसप्ताह व प्रवचने करण्याच्या निमित्ताने गावोगाव हिंडत राहिले, त्या त्या भागांतील शिष्यांना पारमार्थिक मार्गदर्शन करत राहिले. आईसाहेब मात्र बहुधा पुण्यालाच रहायच्या. प्रापंचिक जबाबदाऱ्या त्या समर्थपणे सांभाळत होत्याच. शिवाय श्रीदत्तमहाराज परगांवी गेलेले असतांना भेटायला येणाऱ्या शिष्यांची व साधकांची आस्थेने त्या विचारपूस करायच्या. त्यांना प्रापंचिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी मार्गदर्शन करायच्या. श्रीदत्तमहाराज प्रामुख्याने शिष्याच्या पारमार्थिक विकासाकडे लक्ष द्यायचे. त्याच्या साधकावस्थेतील अडचणी दूर करण्यासाठी सहाय्य करायचे. सौ.आईसाहेब समोर आलेल्या शिष्याच्या प्रापंचिक अडचणी कशा दूर कराव्या यासाठीही सूचना करायच्या, प्रापंचिक मार्गदर्शनही करायच्या. त्या मोजकेच बोलत, पण ते मार्मिक असायचे. अनेक वेळा त्यांच्या सहज घरगुती वाटणाऱ्या वाक्यातही फार मोठा पारमार्थिक आशय असायचा, एखाद्या साध्या वाक्यातच त्या साधकाला सूचकपणे पारमार्थिक मार्गदर्शनही करायच्या.

भक्ताचे पूर्वायुष्य आणि भविष्यकाळात होऊ घातलेल्या घटना हे जाणूनच आईसाहेब अशा सूचना करत असत असे नंतर भक्तांच्या लक्षात यायचे. त्या त्रिकालज्ञ होत्या, त्यांचा पारमार्थिक अधिकार फारच मोठा होता हे सचित करणारे अनेक अनुभव भक्त सांगतात. त्यांच्या सूचनांचे पालन केल्यामुळे मोठ्या कौटुंबिक आपत्त्या टळल्याचे अनुभवही अनेकांना आले. त्या त्या भक्तांच्या पूर्वकर्माप्रमाणे आणि मनोभूमिकेप्रमाणे एखाद्या सूचक वाक्यांतच सौ.आईसाहेबांनी पारमार्थिक विकासाची दिशा दाखवून दिल्याचे अनुभवही अनेक भक्तांना आले.

आईसाहेबांनी अनेक आध्यात्मिक अनुभूती स्वतः घेतलेल्या होत्या. अध्यात्म क्षेत्रांतील सर्वोच्च मानली जाणारी अद्वैत अनुभूतीही त्यांनी स्वतः घेतली होती आणि त्या उच्च अधिकारातूनच त्यांचे श्रीदत्तमहाराजांच्या शिष्यांशी

सहजसाधे बोलणे असायचे असे अनेक भक्तांच्या लक्षात येत राहिले.

सौ.आईसाहेबांचा अधिकार स्वयंसिद्ध होता. तथापि त्यांनी सदैव अमानित्त्वाची भूमिका स्वीकारली होती. श्रीदत्तमहाराज जसे अमानित्त्वाच्या भूमिकेत वावरत राहिले तशाच आईसाहेबही सदैव अमानित्त्वाच्या भूमिकेतून शिष्यांशी वागत राहिल्या, आपला अधिकार त्यांनी नेहमीच झाकून ठेवला. स्वतःचे अनुभव, स्वतःच्या अनुभूती याबद्दल त्या कधीच बोलत नसत. स्वतःला त्यांनी पूर्णपणे झाकूनच घेतले होते.

कोणी आध्यात्मिक क्षेत्रांतील काही विचारू लागला की त्या तत्परतेने सामान्य स्त्रीचे रूप धारण करायच्या. मला अध्यात्मातलं काय कळतं? ते महाराजांना विचारा असे म्हणायच्या. स्वतःला झाकून घेऊन सदैव उंबऱ्याआडच उभे राहून, दारामागे उभ्या राहूनच आईसाहेबांनी श्रीदत्तमहाराजांच्या धर्मजागरणाच्या कार्यात भाग घेतला. श्रीदत्तमहाराजांच्या कार्याला पूरक ठरेल अशीच त्यांची भूमिका असायची. याच भूमिकेतून त्या शिष्यपरिवाराच्या प्रपंचाची व परमार्थाची सूत्रे सांभाळत राहिल्या. सर्व श्रेय श्रीदत्तमहाराजांनाच मिळेल याची त्या सतत काळजी घेत राहिल्या.

कोणत्याही धर्मसंस्थेत, आश्रमात किंवा धर्ममहोत्सवांत त्यांनी कोठेही स्वतंत्रपणे अधिकारपद स्वीकारले नाही. पूजा, मानसन्मान, हारतुरे, गौरवपुरस्कार असे काही स्वतंत्रपणे त्यांनी कधीच स्वीकारले नाही. श्रीदत्तमहाराजांच्या धर्मपत्नी म्हणूनच त्या वावरल्या व त्याच भूमिकेतून त्यांनी पुढे आलेले सर्वकाही स्वीकारले.

सौ.आईसाहेबांचे दैनंदिन लौकीक व्यवहारही सदैव मातृत्त्वाच्या भूमिकेतून व्हायचे. त्यांच्या सहवासात येणाऱ्या सर्वांनाच त्यांचे वात्सल्य सतत जाणवत रहायचे. त्या केवळ कवीश्वर कुटुंबीयांच्याच आईसाहेब नव्हत्या, सर्व शिष्यपरिवाराच्याही त्या खऱ्या अर्थाने आईसाहेब होत्या. आपल्या मुलाबाळांप्रमाणेच सारा शिष्यपरिवारही त्यांनी मातृभावनेतूनच पाहिला. व्यापक अर्थाने त्या सर्वांच्या आईसारखीच काळजी घेत राहिल्या. म्हणूनच एखादी सासरवाशीण आईला भेटायला माहेरी यावी तशा ओढीने अनेक शिष्य आईसाहेबांकडे येत राहिले, त्यांना भेटत राहिले, जन्मदात्या

आईशी बोलावे तसे सुखदु:खाच्या गोष्टी बोलत राहिले. प्रापंचिक दु:खे व अडचणींनी त्रासलेल्या लोकांना आईसाहेबांच्या पायाशी बसल्यावर दिलासा मिळायचा. उन्हांतून खूप चालल्यावर डेरेदार झाडाच्या दाट सावलीत बसावे तसे वाटायचे. पण भक्त प्रापंचिक बाबींबद्दल बोलत असले तरी आईसाहेबांची दृष्टी मात्र भक्तांच्या पारमार्थिक कल्याणाकडेच असायची. सर्वसामान्य प्रपंचातल्या आईसारखी त्यांची भूमिका कधीच नव्हती. त्या सहजपणें बोलल्या तरी वरवर साध्या घरगुती वाटणाऱ्या त्यांच्या बोलण्यातून त्या पारमार्थिक मार्गदर्शनच करायच्या. त्यांची अनेक वाक्ये सूत्रांसारखी अर्थगर्भ असायची. साखरेत घालून औषध द्यावे तसेच हे असायचे. सौ.आईसाहेबांचे मातृपद निश्चितपणे आध्यात्मिक क्षेत्रांतीलच होते. ईश्वरीय पातळीवरील निखळ मातृत्त्वाचेच ते परिपूर्ण रूप होते याची जाणीव कळत नकळत साऱ्या शिष्यपरिवाराला हळूहळू होत गेली आणि म्हणूनच साऱ्या शिष्यपरिवाराला श्रीदत्तमहाराज जसे पूजनीय वाटत, तशाच सौ.आईसाहेबही पूजनीयच वाटल्या, वंदनीय वाटल्या. सौ.आईसाहेब श्रीदत्तमहाराजांची आंतरिक शक्ती होत्या. सौ.ताईमहाराजांसारख्या भगवती शक्तीदेवताही सौ.आईसाहेबांचा प्रत्येक शब्द वेदवचनाप्रमाणे पाळत राहिल्या. वास्तविक सौ.ताईमहाराज, श्रीधुंडिराजमहाराज व सरस्वती आईसाहेबांना आईवडीलांसारखे मानत आणि श्रीदत्तमहाराजांना आपले बंध् मानत; म्हणून सौ.आईसाहेब सौ.ताईमहाराजांच्या पतिराजांच्या भगिनी म्हणजे नणंद असाच उल्लेख करीत. कवीश्वर घराण्यातील सर्वजण सौ.ताईमहाराजांचा तसाच मान ठेवीत. पण सौ.ताईमहाराजांनी मात्र सौ.आईसाहेबांकडे भावजय या नात्याने पाहिले नाही. आईसाहेबांचा एखादा सहज उद्गारदेखील वेदमंत्रासारखा पूजनीय मानून त्याचे कटाक्षाने त्या पालन करीत.

सौ.आईसाहेबांचे सर्व लौकिक व्यवहार वात्सल्याचे मूर्तीमंत रूप असलेल्या मातृत्त्वाच्या भूमिकेतून होत राहिले. म्हणूनच सर्व शिष्यपरिवारही त्यांना श्रीदत्तमहाराजांप्रमाणेच पूजनीय मानत राहिला. सौ.ताईमहाराजांसारख्या अधिकारी शक्तिदेवताही सौ.आईसाहेबांचा प्रत्येक

शब्द वेदवाक्याप्रमाणे पाळत राहिल्या. आईसाहेबांच्या मुखातून निघालेला एखादा सहज उद्‌गार, एवढेच नव्हे तर एखाद्या गोष्टीबद्दल शब्दांत व्यक्त न झालेला आईसाहेबांचा अनुकूल वा प्रतिकूल भावही सौ.ताईमहाराजांनी वेदाज्ञेसारखा मानला यांतील रहस्य हेच आहे.

सौ.आईसाहेबांनी कोणालाही औपचारिकरित्या दीक्षा दिली नाही. परंतु श्रद्धावान निर्मळ शिष्यांना त्यांचा पदस्पर्श घेण्याचे भाग्य लाभत असे. तशीच श्रद्ध असलेल्या शिष्यांच्या मस्तकावर त्या दोन्ही हातही ठेवत असत. या अनौपचारिक दीक्षाच होत्या असे वाटते. कारण सौ.आईसाहेबांच्या पदस्पर्शाने आध्यात्मिक साधनेला वेग आल्याचा अनुभव अनेक साधक घेत राहिले. सौ.आईसाहेबांच्या कृपाकटाक्षानेही अनेक दिव्य अनुभूती प्राप्त झाल्याचे काही साधक सांगतात. यातून आईसाहेबांचा पारमार्थिक अधिकार स्पष्टपणे दिसून येतो. जगदंबामातेचे दैवी गुण, अधिकार व थोरवी सौ.आईसाहेबांमध्ये सामावलेली होती. म्हणूनच सौ.ताईमहाराज सांगतात, "आईसाहेब म्हणजे जगदंबेचे परिपूर्ण रूप आहे. कोल्हापूरच्या श्रीअंबाबाईचे दर्शन घेणे आणि आईसाहेबांचे दर्शन घेणे दोन्ही फळ एकच. श्रीदत्तमहाराज ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप तर आईसाहेब साक्षात जगदंबेचे पूर्णरूप."

भगवान शंकर व देवी पार्वतीमाता यांचे सहजीवन जसे अलौकिक पातळीवरचे होते, वैयक्तिक प्रपंचापेक्षा जगाच्या कल्याणासाठी होते. तसेच श्रीदत्तमहाराज व आईसाहेब यांचे ६८ वर्षांचे सहजीवन जगाच्या कल्याणासाठीच होते आणि प्रारंभापासून सातत्याने ते जगाच्या कल्याणासाठीच व्यतीत होत राहिले.

***

परिशिष्ट क्रमांक - २

* अवतार समाप्ती

आईसाहेब आणि श्रीदत्तमहाराज दोघांचीही प्रकृती गेली काही वर्षे क्षीण होत गेली, तरीही त्यांचे लोकोद्धाराचे कार्य तितक्या जोमाने चालू होते. शरीर क्षीण झाल्यामुळे हळूहळू त्यांनी आपली कामे डॉ.अशोकमहाराज व सौ.ताईमहाराज यांच्याद्वारे करण्यास प्रारंभ केला. कवीश्वर घराण्याचा आध्यात्मिक वारसा डॉ.अशोकमहाराजांकडे आलाच होता. त्यांचे मन आध्यात्माकडे ओढ घेत असल्यामुळे आपला डॉक्टरकीचा व्यवसाय सोडून त्यांनी उच्च साधनेत स्वतःला झोकून दिले होते.

इ.स. १९८९ मध्ये श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांना "हे सर्व सांभाळावे" अशी स्पष्ट आज्ञा केली. श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे इ.स.१९९१ पासून डॉ.अशोकमहाराज कवीश्वर घराण्याची मंत्रदीक्षा देऊ लागले. इ.स.१९९५ पासून वासुदेव निवास पीठाच्या दीक्षाही श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांकडे सोपवल्या. 'वासुदेव निवास' या पीठाची दीक्षा देतांना प्रारंभाला डॉ.अशोकमहाराज श्रीदत्तमहाराजांना दिवस व वेळ विचारून घेत व त्याप्रमाणे वासुदेवनिवास पीठाची दीक्षा होई. असे ७/८ महिने गेल्यावर एक दिवस श्रीदत्तमहाराजांनी सौ.ताईमहाराज व डॉ.अशोकमहाराज यांना बोलावले आणि सौ.ताईमहाराजांच्या उपस्थितीत ते डॉ.अशोकमहाराजांना म्हणाले, "आपण सर्व जाणताच. आम्हाला विचारण्याचे कारण नाही. आपणच सर्व कांही पाहून दीक्षेचे पत्र लिहीत जावे." तेव्हापासून डॉ.अशोकमहाराज वासुदेवनिवास पीठाची दीक्षा तशी देऊ लागले.

इ.स. १९९६ साली मोठे आजारपण आल्यावर श्रीदत्तमहाराजांनी सर्व पत्रव्यवहार डॉ.अशोकमहाराजांवर सोपवला. आलेली पत्रे डॉ.अशोकमहाराज प्रारंभीच्या काळात श्रीदत्तमहाराजांना दाखवीत व त्यांच्या सुचनेप्रमाणे उत्तरे लिहीत. इ.स. १९९७ पासून पत्रे स्वतः पहाणेही श्रीदत्तमहाराजांनी थांबवले. आपणच पत्रे पाहून यथोचित उत्तरे लिहावीत

अशी आंज्ञा त्यांनी डॉ.अशोकमहाराजांना केली. साधकांना ज्या सूचना द्यायच्या त्याही ते डॉ. अशोकमहाराज व सौ.ताईमहाराज याच्यांद्वारेच ते देऊ लागले. जे सांगायचे तेही या दोघांमार्फत सांगत. पण कासवीच्या डोळ्यांतून जसे पिलांना खूप काही मिळते तसे श्रीदत्तमहाराजांच्या व आईसाहेबांच्या डोळ्यांतून भक्तांना खूप काही मिळतच राहिले. शब्द न वापरता आंतरिक पातळीवरच भक्तांना श्रीदत्तमहाराज खूप काही देत राहिले. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांचे शरीर क्षीण झाले, उठून बसायची व बोलायची शक्ती त्यांच्या देहात नव्हती तरीही दर्शनाला असंख्य लोक येतच राहिले आणि त्यांना खूप काही मिळतच राहिले.

वयानुरूप सौ.आईसाहेबांचा देहही क्षीण झाला होता. त्यांची इच्छा अहेवपण शेवटपर्यंत असावे आणि सौभाग्य असतांनाच देह ठेवण्याचे भाग्य लाभावे अशी होती. श्रीदत्तमहाराजांच्या चरणी तशी त्यांची प्रार्थना आंतरिक पातळीवर होत राहिली. सौ.आईसाहेबांच्या या आंतरिक प्रार्थनेला प्रतिसाद देणे श्रीदत्तमहाराजांना अशक्यच होते.

श्रीदत्तमहाराजांनी अवतारसमाप्तीसंबंधी काही निश्चित योजना आखली होती, हे सूचित करणाऱ्या काही घटना अंतिम काळात घडलेल्या दिसतात. डिसेंबर १९९८ मध्ये काही भक्त वासुदेवनिवासच्या विश्वस्तांकडे गेले आणि २ मार्च, १९९९ रोजी येणाऱ्या श्रीदत्तमहाराजांच्या ९० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रवचने, भजने, गुरूचरित्र पारायण असे अनेक कार्यक्रम मराठी भूमीत सर्वत्र साजरे करण्याची योजना त्यांनी विश्वस्तांपुढे ठेवली. हे कार्यक्रम नंतर काही ठिकाणी वर्षभर चालू ठेवावेत असेही विचार त्यांनी मांडले. या योजनेला विश्वस्तांकडून हवा तसा प्रतिसाद येईना. तेव्हा ते भक्त आपली योजना आग्रहाने विश्वस्तारपुढे पुनःपुन्हा मांडू लागले. शेवटी श्रीभाऊसाहेब वाकडे यांनी गंभीरपणे त्यांना सांगितले, "महाराजांनी २ मार्च, १९९९ रोजी काहीही कार्यक्रम आखू नये अशी आज्ञा केली आहे." तरीही ते भक्त आपली योजना पुढे रेटू लागले, तेव्हा श्री.भाऊसाहेब वाकडे अधिकच गंभीर झाले आणि म्हणाले, "श्रीदत्तमहाराजांनी अवतारसमाप्तीची घोषणा आमच्यापुढे केली आहे. २ मार्च, १९९९ रोजी आम्ही देहाने असू किंवा नसूही असेही ते आमच्याजवळ बोलले आहेत."

श्री. भाऊसाहेब वाकडे यांचे ते शब्द ऐकून त्या भक्तांना काही क्षण सून्न झाल्यासारखे वाटले. पण श्री. कोडणीकरगुरूजी व प्रल्हादजीमहाराज यांनी श्रीदत्तमहाराजांची पत्रिका पाहिली होती आणि पत्रिकेतील ग्रहमानाप्रमाणे श्रीदत्तमहाराजांचे आयुष्य ९२ वर्षे आहे असे सांगितले होते. शिवाय नोव्हेंबर १९९९ मध्ये श्रीदत्तमहाराजांनी दत्तआश्रम जालना येथे मंदिराच्या उद्घाटनास यावे अशी सौ.ताईमहाराजांची प्रार्थना होती. सौ.ताईमहाराजांची प्रार्थना सफल होणारच. तेव्हा काळजीचे कारण नाही असे भक्तांना वाटत राहिले. श्रीदत्तमहाराजांना शतायुष्य लाभावे म्हणून असंख्य भक्त प्रार्थना करीतच होते. जप, नामस्मरण, गुरूचरित्र पारायण असेही कार्यक्रम त्यासाठी अनेक ठिकाणी होत होते.

परंतु ग्रहमान, भक्तांची प्रार्थना, जप, नामस्मरण, हे सर्व ईश्वरी इच्छेला बांधू शकत नाही हेच खरे. भगवंताची इच्छा या सगळ्याच्या पलीकडे असते. जे व्हायचे ते भगवंतांच्या इच्छेप्रमाणेच होते याचा प्रत्यय सर्वांना पुन्हा एकदा यायचा होता.

१० जानेवारी, १९९९ रोजी आईसाहेबांनी देह ठेवला. लोकांना ही वार्ता अनपेक्षित होती. घरातील बरीचशी मंडळी व सेवेला येणारे साधक बाहेर कोठे कोठे गेले होते. गेले होते म्हणण्यापेक्षा श्रीदत्तमहाराजांनीच त्यांना बाहेर पाठवले होते हेच खरे. १० जानेवारी, १९९९ रोजी संध्याकाळी आईसाहेबांना घास भरवले. एरवी अन्न स्वीकारायला नाखूष असलेल्या आईसाहेबांनी त्या दिवशी भरपूर अन्न स्वीकारले. सौ.आईसाहेबांनी अन्न स्वीकारलेले पाहून उपस्थितांना बरे वाटले. पण .... ईश्वरी इच्छा वेगळीच होती. सायंकाळी सहा वाजता आईसाहेबांनी अचानकपणे मान टाकली. त्यावेळी केवळ डॉ.अशोकमहाराज त्यांच्याजवळ होते.

दूरध्वनीवरून निरोप जाताच डॉ.अरुंधती मानवी धावत आल्या. नाडी लागत नव्हती. त्या घाबरल्या. श्रीदत्तमहाराजांना त्यांनी बोलावून आणले. श्रीदत्तमहाराज शांतपणे न बोलता सर्व काही स्थिरचित्ताने पहात होते. सर्व काही ज्ञात असूनही चेहऱ्यावर काहीही न दाखवता, श्रीदत्तमहाराज समोरच्या खुर्चीवर स्थिरचित्ताने बसून राहिले. डॉ.तळवलकर आले. त्यांनी तपासले

आणि गंभीरपणे जाहीर केले, "आईसाहेब आपल्याला सोडून गेल्या आहेत."

श्रीदत्तमहाराज उठले, आईसाहेबांच्या कपाळावर त्यांनी हात ठेवला आणि निष्कंप आवाजात ते गंभीरपणे म्हणाले, "६८ वर्षांचा सहवास संपला." एवढे बोलून श्रीदत्तमहाराज शांतपणे परत आपल्या खोलीत जाऊन बसले. शोक नाही, मोह नाही, काही नाही. जणू काही घडलेलेच नाही अशा स्थिरचित्ताने, समचित्ताने, साक्षीभावाने श्रीदत्तमहाराज सर्व काही पहात राहिले.

अत्ययात्रेची तयारी झाली. आईसाहेबांचा देह महायात्रेला निघाला. अनेक भक्त व साधक त्या महायात्रेत सामील झाले. श्रीदत्तमहाराजांचा देह क्षीण झालेला असल्याने चालणे अवघड होत होते. म्हणून खुर्ची आणली होती. श्रीदत्तमहाराजांनी ती नाकारली. आईसाहेबांना अखेरची सोबत करण्यासाठी श्रीदत्तमहाराज धीरोदात्तपणे स्थिरचित्ताने पावले टाकत रेणुकानिवासच्या प्रांगणातील बाहेरच्या सीमेपर्यंत आले. महायात्रा पुढे निघाली. श्रीदत्तमहाराजांची पावले स्थिरचित्ताने आपल्या खोलीकडे वळली आणि शांतपणे ते आपल्या खोलीत जागेवर परत जाऊन बसून राहिले.

अंत्ययात्रा वैकुंठ या स्मशानभूमीमध्ये नेण्यात आली. सर्व विधी डॉ.अशोकमहाराजांनी शास्त्राप्रमाणे केले. त्यानंतर अनेक दिवस म्हणा, सांत्वनासाठी म्हणा, भेटण्यासाठी म्हणा, परिचित, नातलग, भक्त, शिष्य, हजारोंच्या संख्येने रेणुकानिवासमध्ये येत राहिले. पण सर्वांना श्रीदत्तमहाराजांचे दर्शन व्हायचे ते शांत, स्थिरचित्त, गंभीर असेच.

यादव कुळातील शेवटच्या संहाराच्या प्रसंगी भगवान श्रीकृष्ण कसे वागले ते श्रीदत्तमहाराज भागवतसप्ताह संपन्न होताना नेहमी सांगत असत. श्रीदत्तमहाराज सांगायचे, "जे जे काहीं घडले ते घटना ठरल्या आहेत त्याप्रमाणे झाले. श्रीकृष्णाचे कुळ एका प्रहरांत संपले. पण भगवान श्रीकृष्णांचा शोक, मोह काही नाही. श्रीकृष्ण असंग होते. तशी त्यांच्या मनाची ठेवण होती. ब्रह्मज्ञानीच असंग असू शकतो." श्रीदत्तमहाराज पुढे सांगायचे, "परमेश्वर असंग आहे. आम्ही सर्व ठिकाणी संग ठेवून आहोत. पत्नी, मुले, नातलग, मित्र यांच्याबद्दल आम्हाला ममत्त्व वाटते. परमेश्वराला

तसे काहीही नसते. अहंता नाही, ममत्व नाही, काही नाही, असंग आहेत." सौ.आईसाहेबांनी देह ठेवल्यावर श्रीदत्तमहाराजांचे वागणे भगवान श्रीकृष्णांच्या त्या असंग वृत्तीची आठवण करून देणारे होते.

अहेवपणी देह ठेवण्याची आईसाहेबांची इच्छा पूर्ण झाली. आता श्रीदत्तमहाराज मोकळे झाले होते. सर्व कार्य व जबाबदाऱ्या डॉ.अशोकमहाराज आणि सौ.ताईमहाराजांवर सोपवल्याच होत्या. केवळ कौटुंबिक नव्हे तर शिष्य व साधक यांचा परिवारही त्यांनी डॉ.अशोकमहाराज आणि सौ.ताईमहाराज यांच्यावर सोपवला होता. डॉ.अशोकमहाराज व सौ.ताईमहाराज समर्थपणे साधकपरिवाराला मार्गदर्शन करीत आहेत, शिष्यांच्या परमार्थाचा प्रपंच सांभाळत आहेत, हे पाहून श्रीदत्तमहाराज निश्चिंत झालेले होते.

१० जानेवारीपासून श्रीदत्तमहाराजांनी बोलणे कमी कमी केले. ते अंतर्मुख झाल्याचे दिसू लागले. अन्नग्रहणही कमी कमी होत गेले. डॉ.तळवळकर आणि डॉ. मानवी रोज रेणुकानिवासमध्ये येत राहिले आणि श्रीदत्तमहाराजांना डॉक्टरांच्या दृष्टीकोनातून तपासत राहिले, औषधी उपाययोजना करीत राहिले. "शरीरात काहीही दोष नाही" असे ते घरच्यांना सांगत होते. पण श्रीदत्तमहाराजांची अंतर्मुख अवस्था वाढतच गेली. ते अधिकाधिक अंतर्लीन होत गेले. पुरेसे अन्नग्रहण होत नसल्याने शरीर क्षीण होत गेले.

३१ जानेवारी, १९९९ या दिवशी श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्रींचे वार्षिक श्राद्ध होते. विधीयुक्त शास्त्रविधी संपन्न झाला आणि थोडा प्रसाद श्रीदत्तमहाराजांनी स्वीकारला. ४ फेब्रुवारीला गुरुप्रतिपदेच्या दिवशी कुळधर्म होता. तो श्रीदत्तमहाराजांनी शास्त्रविधीनुसार स्वतः संपन्न केला.

६ फेब्रुवारी, १९९९ रोजी माघ षष्ठी या तिथीप्रमाणे श्रीदत्तमहाराजांचा वाढदिवस होता. त्या दिवशी त्यांनी नव्वदाव्या वर्षात पदार्पण केले. अनेक भक्त पुण्यांत आले होते. वासुदेवनिवासमध्ये सकाळी -दिगंबरा दिगंबरा... ही धून झाली, काही व्याख्यानेही झाली. सायंकाळी सर्वांना दर्शन देण्यासाठी श्रीदत्तमहाराज उठून बसले होते. सकाळी त्यांनी थोडा घन आहार घेतला.

त्या दिवशी सायंकाळी ते संध्येसाठी पाटावर येऊन बसले. पण अशक्तपणाने संध्या नीट करता येईना. तेव्हापासून अशक्तपणामुळे स्नानसंध्या करता येत नाही या कारणामुळे श्रीदत्तमहाराजांनी घन आहार घेणे थांबवले. घरच्यांचा फार आग्रह झाला म्हणजे त्यांचे मन मोडू नये यासाठी थोडी पेज, चहा किंवा कॉफीचा एखादा घोट घ्यायचे. आहार नसल्यामुळे देह क्षीण होत गेला, पण अंतर्लीन वृत्तीने पडून रहायचे. बोलत नव्हते, पण भोवती काय चालले आहे याची पूर्ण जाण त्यांना होती. कोणी काही बोलले तर ऐकून घ्यायचे, स्थिरदृष्टीने पहायचे. श्रीदत्तमहाराजांना सर्व काही कळत होते पण शब्दातून ते काहीच व्यक्त करीत नव्हते. ब्रह्मसूत्रांत सांगितल्याप्रमाणे त्यांनी आपली वाणी मनांत लीन केली होती.

२८ फेब्रुवारी, १९९९ ची रात्र गंभीर वाटू लागली. सतत ऑक्सिजनचा सिलींडर लावून रात्रभर ऑक्सिजन दिला जात होता. हळूहळू नाडी मंद होऊ लागली पण श्वासाची गती मात्र तीव्र होती. रात्र वाढत गेली तसे हातपाय गार पडत गेले. शरीराची ऊब कमीकमी होत गेली. पहाटे अंगाला गार घाम सुटू लागला. १ मार्च, १९९९ या दिवशीचा उषःकाल झाला. सूर्यनारायण वरवर येऊ लागले. दाही दिशांमध्ये प्रकाश भरत होता. पण रेणुकानिवासमध्ये सर्वांच्या मनांत काळोखच भरला होता. भिती आणि आशंका यांचा अंधार दूर होत नव्हता. श्रीदत्तमहाराजांच्या देहांतील शरीराची ऊब आणखी कमी कमी होत गेली. सकाळी ८ वाजता कॉफी आणली गेली. आग्रहाने ती कॉफी पुढे केली. श्रीदत्तमहाराजांनी कपातील सर्व कॉफी घेतली. ८.१० वाजले होते. श्रीदत्तमहाराजांनी कपभर कॉफी स्वीकारली, कॉफी घेतांना एकदाही ठसका लागला नाही हे पाहून सगळ्यांनाच बरे वाटले. आणखी थोडी कॉफी आणली. ती पुढे केली. श्रीदत्तमहाराजांनी एकच घोट घेतला. ८ वाजून २५ मिनिटे झाली होती. श्रीदत्तमहाराजांचे डोळे अर्धोन्मिलीत होते. त्यांनी डोळे पूर्ण उघडले. स्थिरचित्ताने शांतपणे तेजस्वी डोळ्यांतून एकवार सर्वांकडे पाहिले, एक श्वास थोड्या अधिक वेगाने आंत ओढून घेतला आणि डोळे मिटले, श्वास पूर्णपणे थांबला. प्राणज्योत मावळली. अवतारसमाप्ती झाली. सौ.ताईमहाराज पायाशी उभ्या होत्या.

घरांतील सर्वजण भोवती उभे होते. सर्वांना वाटले वज्राघात झाला. आकाश धरणीवर कोसळून पडले. सगळे काही मोडून पडले की काय अशीच काहीशी भावना सर्वांच्या मनात होती. श्रीदत्तमहाराजांच्या मुखांत तुळशीदल ठेवले गेले. नंतर सौ.ताईमहाराजांनी जड अंतःकरणाने तुळशीपत्र वाहिले, पाठोपाठ घरातील सर्वांनी तुळशीपत्रे वाहिली आणि श्रीदत्तमहाराजांना बाहेरच्या खोलीत अंत्यदर्शनासाठी आणून ठेवले.

अवतार समाप्तीची ती वार्ता दाही दिशांना वेगाने वहात गेली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी दर्शनासाठी येत राहिल्या. लोक रांगेने येऊन दर्शन घेत होते. तो दिवस व रात्रभर दर्शनासाठी अनेक दिशांनी अनेक गावांतून असंख्य लोक येतच राहिले. रांग संपतच नव्हती. "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या महामंत्राचा घोष सतत चालूच होता.

शरीरशास्त्र नव्हे तर मेडिकल सायन्सला कळू शकणार नाही असे काही त्या दिवशी पहायला मिळत होते. श्रीदत्तमहाराजांचा चिन्मय देह जवळजवळ २४ तास ठेवला असूनही शरीरांत कोणतीही विनाशाची प्रक्रिया सुरू झाली नाही. दुर्गंधी नाही, पेशीविघटन नाही, विकृती नाही, विपरीत बदल नाही. असे काहीही देहांत घडले नाही. उलट तो देह अधिकाधिक तेजस्वी होत गेला. त्या चिन्मय देहाला सुवर्णकांती प्राप्त होऊन ती वाढतच राहिली. शेवटी शेवटी सोन्याचा पुतळा असावा तसा तो देह सुवर्णकांतीने झळाळू लागला, लांब-रुंद-उंच असा भासत गेला. परब्रह्म स्वयंप्रकाशी असते याचे प्रतीक असणारी ती घटना होती.

२ मार्च, १९९९ रोजी सकाळी आठ वाजता अंत्ययात्रा निघाली. सजवलेल्या गाडीत श्रीदत्तमहाराजांचा चिन्मय देह ठेवला गेला. अनेक दिशांतून, अनेक गावांतून आलेले हजारो लोक त्या अंत्ययात्रेत सामील झाले. गेल्या पन्नास वर्षात पुण्यात एवढी मोठी अत्ययात्रा झाली नसावी असे म्हणावे एवढी गर्दी झाली होती. लोकांना अश्रू आवरत नव्हते. दाही दिशा शोकभावनेने भरून गेल्या आहेत असेच भक्तांना वाटत होते. धरणाचा बांध फुटून पाणी दाही दिशांना पसरावे तसे दुःख, हुंदके, अश्रू, शोक यांच्या लाटा पसरल्या आहेत असेच अत्ययात्रेतील लोकांना वाटत होते. सद्गुरूंची

लौकीक व अलौकिक सोबत आता संपली, आता जगण्यासारखे काही उरले नाही या भावनेने अनेक श्रद्धावंत भक्त अतिशय व्याकुळ झाले होते. दुःखातिरेकाने काही भक्त बेभानही झाले होते. अंतःकरण पिळवटून टाकणारे ते दृष्य होते.

अंत्ययात्रा वासुदेवनिवास व वामननिवास येथे गेली आणि कर्वेरोडमार्गे कॉजवेवर झालेल्या नव्या पुलावरून वैकुंठ स्मशानभूमीत पोचली. शास्त्रविधीपूर्वक चंदनाची चिता रचली गेली. तो सुवर्णकांतीमय देह चितेवर ठेवला गेला. डॉ.अशोकमहाराजांनी चितेला अग्नी दिला. श्रीदत्तमहाराजांचा तो चिन्मय देह तेजोमयाच्या स्वाधीन करण्यात आला. भगवंताने लीलेसाठी धारण केलेले ते शरीर, 'श्रीदत्तमहाराज' या नावाने ओळखला जाणारा तो 'लीलाविग्रह' तेजात मिळून गेला, तेजाशी एकरूप झाला. भक्तांच्या ध्यानामध्ये, मनामध्ये आपली चिद्घन मूर्ती ठेवून श्रीदत्तमहाराजांचे ते सगुण साकार रूप अदृश्य झाले. परंतु प्रज्ञा आणि प्रतिभा, ज्ञान, भक्ती आणि महायोग यांचे ते सगुण साकार रूप अजूनही भक्ताच्या मनांत आहे आणि ध्यानातही आहेच. दशदिशात भरलेलेच आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाला पार्थिवतेतील मृत्तिकेचा कधीच स्पर्श झाला नाही. ईश्वरी शक्तीचे परिपूर्ण रूप श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने पहायला मिळायचे. श्रीदत्तमहाराज म्हणजेच भगवंताच्या लीलेसाठी धारण केलेला देह. त्यांच्या लीलांचे स्मरण करायचे, मनन करायचे आणि चिंतन करायचे. श्रीदत्तमहाराजांचे जीवन म्हणजे अमृतमय लीलांची कथा, गंगानदीप्रमाणे पाप व ताप हरण करणारी, मन शुद्ध करणारी, मनाचे उन्नयन करणारी. त्या जीवनगाथेचे स्मरण, मनन व चिंतन साधकांचे सदैव उन्नयनच करीत राहील, मोक्ष मार्गावर पुढे पुढे नेत राहील.श्रीदत्तमहाराज म्हणजेच 'भगवंत' असे म्हणणे ही केवळ श्रद्धा नाही. ती वस्तुस्थिती आहे.

भगवंत सर्वव्यापी आहे असे वेदान्त सांगतो. तो सर्वव्यापी आहे म्हटल्यावर तो अमुक ठिकाणी आहे किंवा अमुक ठिकाणी नाही असे म्हणता येत नाही. तो अमुक काळात होता, अमुक काळापूर्वी होता किंवा अमुक काळानंतर तो नसेल असेही म्हणता येत नाही. भगवंत अजन्मा आहे. त्यामुळे

तो जन्माला आला असेही म्हणता येत नाही. भगवंत चिरंतन व अविनाशी असल्यामुळे 'निर्वाण', 'महानिर्वाण' असे शब्दही भगवंताच्या बाबतीत वापरता येत नाहीत. भगवंत सर्वव्यापी होता, सर्वव्यापी आहे व सर्वव्यापीच रहाणार आहे. 'आहे', 'होता', 'झाला' असे शब्दप्रयोग भगवंताच्या बाबतीत करणेही निरर्थक आहे.

श्रीदत्तमहाराज साक्षात परमेश्वर आहेत. ते कुठे नाहीत असे होऊच शकत नाही. श्रीदत्तमहाराज पुण्याला आले म्हणजे ते पूर्वी पुण्याला नव्हते असे म्हणण्यासारखे झाले. वाडीहून ते पुण्याला आले असे म्हणायचे म्हणजे ते वाडीत नाहीत असा अर्थ होईल. श्रीदत्तमहाराजांचे महानिर्वाण असे शब्द वापरले म्हणजे ते आता नाहीत असे होईल. पण परमात्मस्वरूपाला कोणतीच क्रिया नाही, गती नाही, अमुक ठिकाणी स्थिर असणे नाही. अमुक ठिकाणी असणे-नसणे असे शब्दप्रयोग भगवंताच्या बाबतीत करणे चुकीचे आहे. भगवंताला कुठे रहाणे, कुठे बसणे, कुठे जाणे, महानिर्वाण असे काही नाही.

श्रीदत्तमहाराज वाडीला जन्माला आले म्हणजे मनुष्यरूप धारण करून भगवान आले. श्रीदत्तमहाराज या सगुण रूपात वाडीला आले. ते वाडीहून पुण्याला आले म्हणजे फक्त लीला दाखवली त्यांनी. बाहेर जे स्वरूप दाखवले ते एका ठिकाणी अदृश्य झाले आणि दुसरीकडे प्रकट झाले. श्रीदत्तमहाराज गावोगावो धर्मजागरणासाठी जात राहिले म्हणजे बाहेर दाखविलेले स्वरूप एका गावी अदृश्य होऊन दुसऱ्या गावांत प्रकट होत राहिले. तेथे भगवंताची लीला होत राहोलो. श्रीदत्तमहाराजांचे ते सगुण साकार रूप आता अदृश्य झालेले आहे. पण मूळ आत्मरूपाने त्यांचे वास्तव्य सर्वत्र आहे. विश्वाच्या कणाकणांत ते सर्वत्र भरलेले आहे. श्रीदत्तमहाराज आहेतच. ते अदृश्यरूपाने आहेत म्हणजे ते नाहीत असा अर्थ होत नाही. जशी आपण भावना करावी तसे वाटते. 'वासुदेवनिवास', 'रेणुकानिवास', 'वामननिवास' आणि 'श्रीदत्त आश्रम' या ठिकाणी श्रीदत्तमहाराज आहेत असे जर आपण म्हटले तर ते तेथे आहेत. श्रीदत्तमहाराज तेथे आहेत म्हटल्यावर त्यांनी सांगितलेला साधनामार्ग आहे, त्याप्रमाणे आचरण करणे आहे, त्यांची कृपा प्राप्त होणे आहे आणि फलप्राप्तीही आहे. श्रीदत्तमहाराज सांगायचे, 'मुख्य

अंतरंगसाधन श्रद्धा आहे.' श्रद्धा असलेल्या लोकांना श्रीदत्तमहाराजांचे दर्शन होतच रहाणार आहे, त्यांची कृपा प्राप्त करून घेता येणार आहे, त्यांची भक्ती करता येणार आहे आणि शेवटी त्या भक्तीच्या सहाय्याने भक्तांना श्रीदत्तमहाराजांच्या मूळरूपांत विलीन होता येणार आहे. ते भक्त ईश्वररूप होणार आहेत. ईश्वररूप म्हणजे मूळ निरूपाधिक परब्रह्मरूप. परब्रह्म म्हणजेच आत्मस्वरूप. ते आत्मस्वरूप हेच श्रीदत्तमहाराजांचे खरे स्वरूप आहे. ते सर्वव्यापी आहे. चिद्घन आहे, तेजस्वरूप आहे, स्वयंप्रकाशी आहे, चिरंतन आहे. सद्चिदानंद आहे. श्रीदत्तमहाराजांची कृपा झाली तरच त्या स्वरूपाचे आकलन होणार आहे. श्रीदत्तमहाराजांची कृपा सर्व साधकांवर होवो हीच श्रीदत्तमहाराजांच्या चरणी प्रार्थना.

* तयाचा वेलु गेला गगनावेरी

धर्मजागरणाच्या कार्यासाठी भगवंत संतांच्या रूपाने वारंवार पृथ्वीतलावर अवतीर्ण होतच राहिले आहेत. वेदकाळांपासून असे अनेक संत अवतीर्ण झाले आणि धर्मप्रकाश प्रसृत करीत राहिले, शांतीचा वर्षाव करीत राहिले. त्यांनी स्थूल देहाचा त्याग केला तरी त्यांच्या उपदेशवाणीच्या रूपाने त्यांचे अस्तित्त्व रहातेच आणि त्यांचे धर्मजागरणाचे कार्य पुढे चालूच रहाते. भगवान श्रीकृष्ण, शंकराचार्य, कबीर, नानक, ज्ञानदेव, एकनाथ अशा अनेक संतांचे आपण आज प्रत्यक्ष स्थूल देहातील दर्शन घेऊ शकत नाही. परंतु त्यांच्या छायाचित्राचे वा मूर्तीचे दर्शन घेणे आणि त्यांच्या उपदेशवाणीचे श्रवण, मनन व चिंतन करणे यामुळे शांतीचा लाभ होतो आणि परमार्थमार्गावर वाटचाल करण्याची प्रेरणा मिळत रहातेच. त्यांतूनच त्यांचा कृपाप्रसाद प्राप्त झाला की आध्यात्मिक विकासांतील प्रतिबंध दूर होतात आणि साधकाचा आंतरिक विकास होत रहातोच.

श्रीदत्तमहाराजांनी अवतार समाप्ती केली खरी तरीही त्यांचे कार्य तसेच पुढे चालू रहाणार आहे. अधिकच व्यापक होऊन मोठ्या प्रमाणावर रहाणार आहे. श्रीदत्तमहाराज हे ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप आहेत, असा अनुभव असंख्य साधकांना आला आहे. त्यांनी स्थूल देहाचा त्याग केला हे खरे आहे. तथापि

सूक्ष्म रूपात ते आहेतच. संतांनी स्थूल देह ठेवल्यावर सुद्धा श्रद्धावंतांना त्यांचे अस्तित्व जाणवत रहाते. त्यांच्या कृपेचा अनुभव येत रहातोच. म्हणूनच श्रद्धावंत भक्त पुनःपुन्हा वाडीला, गाणगापूरला, कुरवपूरला आणि गरूडेश्वरला दर्शनासाठी जात रहातात. असे दर्शन घेतल्यामुळे आपल्या व्यावहारिक अडचणी सुटतात आणि परमार्थ मार्गावरील प्रतिबंधही दूर होतात असा अनुभव बहुतेक भक्तांना येतो. स्थूल देह ठेवल्यानंतर संतांचे कार्य अधिकच व्यापक होत जाते असे इतिहास सांगतो.

श्रीदत्तमहाराजांचे कार्यही असेच व्यापक होत जाणार आहे. अनेक शतके ते आपल्या कृपेच्या वर्षावाने भक्तांचा प्रपंच आणि परमार्थ सांभाळत रहाणार आहेत आणि तशी उत्कट इच्छा असलेल्या भक्तांना परमार्थ मार्गावर पुढे पुढे नेत अद्वैत अनुभूतीपर्यंत वाटचाल करायला सहाय्य करीत रहाणार आहेत.

श्रीदत्तमहाराजांचा उपदेश म्हणजे सनातन चैतन्यमयतेचा जाज्वल्य आविष्कार आहे. श्रीदत्तमहाराजांच्या उपदेशवाणीचे मनन व चिंतन केल्यावर अनेक साधकांना आजही दिव्य अनुभूती येत आहेत. त्यांच्या पुण्य प्रभावामुळे साधकांच्या आध्यात्मिक मार्गावरील अडचणी आजही आपोआप दूर होत आहेत. त्यांच्या वाणीचा एक अपूर्व असा प्रभाव असल्यामुळे त्यांच्या श्रीमुखातून उमटणारा प्रत्येक शब्द साधकांच्या अंतरंगात आजही खोलवर जाऊन रुजत आहेत. मानसपटलावर आनंदलहरी निर्माण होत आहेत.

श्रीदत्तमहाराजांच्या उपदेशवाणीचे अमृतपान करून ज्यांनी शांती मिळवली आणि ऐहिक व पारलौकिक जीवनांत समाधानाचा लाभ करून घेतला असे लोक असंख्य आहेत. ते देशभर सर्वत्र पसरले आहेत. परदेशांतही अनेक ठिकाणी श्रीदत्तमहाराजांचे विचारधन आता पोचले आहे आणि जेथे जेथे ते गेले तेथे शांतीचा वर्षात होत असल्याचा अनुभव लोकांना येत आहे. एका दिव्याने दुसरा दिवा लागतो, दुसऱ्या दिव्याने तिसरा, तिसऱ्या दिव्याने चौथा ... असे असंख्य दिवे लागतात. श्रीदत्तमहाराजांची उपदेशवाणी आता दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात देशविदेशांत दूरवर, अतिदूरवर सर्वत्र प्रसृत होत रहाणार आहे आणि जगावर शांतीचा वर्षाव करीत रहाणार आहे.

श्रीदत्तमहाराजांनी वाढवलेला वेलु फोफावून गगनावेरी आता उंच गेला आहे आणि अवघे आकाश व्यापून राहिला आहे. मोगऱ्याची फुले फुलून आली आहेत आणि त्यांचा दाट सडा सगळीकडे पडू लागला आहे. कितीही फुले वेचली तरी वरून इतकी फुले पडत आहेत की तो सडा तसाच गच्च दाट रहाणार आहे.

***

परिशिष्ट क्रमांक - ३

✻ वासुदेवनिवास शक्तिपीठ

(अनेक वाचकांनी विनंती केल्यावरून या परिशिष्टात वासुदेवनिवास या शक्तिपीठाची आणि या शक्तिपीठातर्फे प्रणित केल्या जाणाऱ्या शक्तिपात-योगसाधनेची माहिती दिली आहे. शक्तिपात -योगसाधनेची येथे दिलेली माहिती योगीराज श्रीगुळवणीमहाराज व त्यांचे उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचेकडून प्राप्त झालेली आहे.)

✻ प्रास्ताविक

अध्यात्मक्षेत्रांत **'कुंडलिनी योग'** हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. कुंडलिनी योगालाच **'शक्तिपातविद्या'** असेही म्हणतात. काही जाणकारांनी कुंडलिनी योगाला **'महायोग'** असेही नांव दिले आहे.

'वासुदेव निवास' हे भारतीय अध्यात्मक्षेत्रातील एक नामवंत ज्ञानपीठ आहे. अध्यात्मविद्येला - विशेषतः कुंडलिनी योग या क्षेत्राला वाहून घेतलेले हे शक्तिपीठ आहे. शक्तिपातविद्येच्या क्षेत्रात या शक्तिपीठाद्वारे दीर्घकाळ फार मोठे कार्य घडून येत आहे. या शक्तिपीठाच्या कार्यातून भारतीय अध्यात्मक्षेत्राला मोठे योगदान प्राप्त झालेले असल्यामुळे जगातील एक अग्रगण्य शक्तिपीठ असा लौकिक या ज्ञानपीठांतून प्राप्त झालेला आहे.

योगीराज श्रीगुळवणीमहाराज हे वासुदेव निवास या ज्ञानपीठाचे संस्थापक. योगक्षेत्रातील विविध अंगांवर श्रीगुळवणीमहाराजांचे अलौकिक प्रभुत्त्व होते. राजयोग, लययोग, मंत्रयोग, हठयोग, प्राणायाम व कुंडलिनी योग या ज्ञानशाखांतील श्रीगुळवणीमहाराजांचा अधिकार फारच मोठा होता. कुंडलिनी योग म्हणजेच शक्तिपात विद्या हा तर त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. ते अद्वैत वेदान्ताचे थोर अधिकारीही होते. महायोगक्षेत्रातील श्रीगुळवणीमहाराजांचा अधिकार जगात सर्वत्र मानला जातो. म्हणूनच श्रीगुळवणीमहाराजांचा 'महायोगी' असा गौरवपूर्ण उल्लेख सर्वत्र केला जातो. संप्रदायातील लोक श्रीगुळवणीमहाराजांचा 'गुरूमहाराज' असा आदराने उल्लेख करतात.

अगदी लहान वयापासूनच श्रीगुळवणीमहाराजांनी योगसाधनेला प्रारंभ केला. श्रीगुळवणीमहाराजांना अध्यात्मविद्या दोन गुरूंकडून मिळाली. श्रीगुळवणीमहाराजांचे पहिले गुरू श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज (टेंबेस्वामी) आणि दुसरे गुरू श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज. हे दोन्ही गुरू महायोगशास्त्रातील पूर्णत्त्व पावलेले सद्गुरू म्हणून जगाला माहीत आहेत.

श्रीगुळवणीमहाराजांनी आपले सर्व आयुष्य योगसाधना विशेषतः शक्तिपातसाधना या मार्गाचा प्रसार करण्यात व्यतीत केले. श्रीगुळवणीमहाराजांची दीक्षा घेतलेले हजारो लोक जगभर पसरलेले आहेत.

योगसाधनेच्या क्षेत्रांत श्रीगुळवणीमहाराजांनी सुमारे पाऊण शतकाचा काळ फार मोठे कार्य केले. तथापि, वासुदेव निवास या शक्तिपीठाची स्थापना मात्र त्यांनी जीवनाच्या अखेरच्या कालखंडात इ.स.१९६५ मध्ये केली. तेव्हापासून श्रीगुळवणीमहाराजांचे वास्तव्य आणि त्यांचे या क्षेत्रातील कार्य वासुदेव निवास या शक्तिपीठातर्फेच होत आले आहे. इ.स.१९७४ साली श्रीगुळवणीमहाराजांचे निर्वाण झाले. तेव्हापासून त्यांचे उत्तराधिकारी म्हणून श्रीदत्तमहाराज या शक्तिपीठाचे कार्य पहात आले आहेत.

श्रीदत्तमहाराज अगदी तरुण वयातच श्रीगुळवणीमहाराजांच्या कृपाछायेत आले. वेद, न्याय, व्याकरण, मीमांसा, वेदान्त, राजनीति, मंत्रशास्त्र, धर्मशास्त्र वगैरे अनेक क्षेत्रात श्रीदत्तमहाराजांनी फार मोठे प्रभुत्त्व मिळवलेले होते. यापैकी कोणतेही एक शास्त्र आत्मसात करण्यासाठी संपूर्ण आयुष्य पुरत नाही. आयुष्यभर एकाच शास्त्राचे सखोल अध्ययन केल्यावरही बहुतेक पंडितांना त्या शास्त्रात पूर्णत्त्व मिळाल्यासारखे वाटत नाही. परंतु श्रीदत्तमहाराजांना मात्र या सर्व शास्त्रांमध्ये पूर्णत्त्व प्राप्त होऊ शकले कारण श्रीदत्तमहाराज ही सिद्धप्रज्ञा घेऊन आलेली अलौकिक विभूती होती.

श्रीगुरूमहाराज अचूक रत्नपारखी होते. श्रीदत्तमहाराजांचे विविधांगी सखोल ज्ञान पाहून ते प्रभावित झालेच. शिवाय श्रीदत्तमहाराजांचा त्याग, वैराग्य व असामान्य विनम्रता यामुळे ते विशेष प्रसन्न झाले. म्हणूनच त्यांनी श्रीदत्तमहाराजांना जवळ केले, शक्तिपात दीक्षा दिली, आपल्यासारखेच केले आणि पीठाच्या वतीने दीक्षा देण्याचा अधिकार दिला, उत्तराधिकारी नेमून या शक्तिपीठाची सूत्रे त्यांच्यावर सोपवली.

श्रीगुळवणीमहाराजांच्या निर्वाणानंतर पीठाधीश्वर म्हणून श्रीदत्तमहाराज शक्तिपीठाचे काम पहात आहेत. अनेक ज्ञानशाखांवर त्यांचे सखोल प्रभुत्त्व असल्यामुळे आणि विसाव्या शतकांतील 'थोर वेदान्ती, संत व योगी' असा त्यांचा यथार्थ लौकिक असल्यामुळे वासुदेव निवास या शक्तिपीठाच्या कार्याला आता मोठेच व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे.

* शक्तिपात योगसाधना - एक प्राचीन उपासनामार्ग

'वासुदेव निवास' हे शक्तिपीठ श्रीगुरूदेव दत्तात्रेय यांच्या गुरूपरंपरेच्या संप्रदायातील आहे. प. प. श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज यांच्या अद्वैतवेदान्ताच्या आचार्यतुल्य अधिकाराचे अधिष्ठान आणि प. प.श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांच्या महायोग साधनाची परंपरा या शक्तिपीठाला लाभली आहे. त्यामुळेच हे शक्तिपीठ योगसाधनेचे समर्थ ज्ञानपीठ झाले आहे.

कुंडलिनी योग किंवा शक्तिपात योगसाधना हा अत्यंत प्राचीन उपासना मार्ग आहे. वेद आणि उपनिषदांमध्ये प्राणशक्तीचे जे अनेक उल्लेख आहेत, त्या उल्लेखात कुंडलिनीशक्तीच अभिप्रेत आहे असे जाणकार सांगतात. ही प्राणशक्ती ब्रह्मांडशक्ती आहे असे उपनिषदकारांनी म्हटले आहे व तिला अनेक नावेही दिलेली आहेत. कुंडलिनी योग या साधनमार्गाचे अनेक सूचक उल्लेख केनोपनिषद, कठोपनिषद, छांदोग्यउपनिषद, प्रश्नोपनिषद वगैरे उपनिषदांमध्ये आहेत. तसेच अनेक तंत्र ग्रंथातही या उपासनेची माहिती दिलेली आहे. अशा रीतीने कुंडलिनी महायोग आणि शक्तिपात साधना यांना वेदान्त परंपरेचे भक्कम अधिष्ठान आहे असे दिसून येते.

कुंडलिनी योग किंवा शक्तिपात साधना या मार्गात साधकाच्या मूलाधार चक्रात असलेली कुंडलिनी शक्ती सद्गुरूकृपेने जागृत होते आणि सुषुम्ना नाडीमधून वरवर जात रहाते. साधना योग्य मार्गाने चालत राहिली म्हणजे गुरूकृपेने ती सहस्त्रार चक्रात पोचते. ती तेथे पोचली म्हणजे जीव व शिव यांचे मीलन होते यालाच आत्मसाक्षात्कार असेही म्हणतात.

साधकाची शक्ती सद्गुरूकृपेनेच जागृत होते आणि साधकाची पुढे सद्गुरूकृपेनेच साधकाची आंतरिक प्रगति होत रहाते हे या मार्गाचे प्रमुख

वैशिष्ट्य आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर या साधनामार्गात सद्गुरू आपली शक्ती शिष्यांमध्ये संक्रमित करतात. यालाच शक्तिपात असे म्हणतात. सद्गुरू संकल्प करतात आणि आपले सामर्थ्य वापरून शिष्याची शक्तिजागृती करतात त्यानंतर त्याच्याकडून योगसाधना करून घेऊन त्याला पूर्णत्त्वाला नेतात.

शक्तिपात उपासना वेदकाळांपासून जाणकारांना माहिती आहे. तथापि ही उपासना गुह्य मार्गातील मानली गेल्यामुळे या उपासनेचे स्पष्ट उल्लेख व प्रक्रिया वेद व उपनिषदांमध्ये सांगितलेली नाही. केवळ सूचक उल्लेखच आढळतात. पुराण काळापासून मात्र या उपासनेचे स्पष्ट उल्लेख व प्रक्रिया अनेक ठिकाणी दिसून येते.

भगवान दत्तात्रेय हे शक्तिपात विद्येचे आद्यगुरू मानले जातात. 'गुरुणां गुरू' असे भगवान दत्तात्रेयांचे स्थान आहे, म्हणूनच 'जगद्गुरू' असे श्रीदत्तात्रेयांचे यथार्थ वर्णन केले जाते. श्रीदत्तात्रेयांनी शक्तिपात करूनच आपल्या शिष्यांची शक्तिजागृती केली असे अनेक उल्लेख आढळतात. अलर्क, यदू वगैरे अनेक शिष्यांना भगवान दत्तात्रेयांनी शक्तिपात दीक्षा दिली होती आणि त्यांचे अध्यात्मजीवन उजळून टाकले होते. भगवान दत्तात्रेयांच्या अशा अनेक कथा पुराणांमध्ये सांगितलेल्या आहेत.

वसिष्ठमुनींनी शक्तिपात करूनच भगवान रामचंद्रांची शक्तिजागृती केली होती. भगवान श्रीकृष्णांनीही शक्तिपातमार्गानेच अर्जुनाची शक्तिजागृती केली होती. गुरूने शिष्याची शक्तिजागृती केल्याचे असे अनेक उल्लेख पुराण काळापासून होत आलेल्या वाङ्मयात ठिकठिकाणी दिसतात. अगदी अर्वाचीन काळातील वाङ्मयातही श्रीगुरूंनी शक्तिपात मार्गाने शक्तिजागृती केल्याचे अनेक उल्लेख आहेत.

शक्तिपात विद्या एक शास्त्र म्हणून विस्तारीत स्वरूपात एकत्र म्हणून मांडण्याचे श्रेय श्रीगौडपादाचार्य यांच्याकडे जाते. श्रीगौडपादाचार्यांनीच कुंडलिनी महायोग ही साधना शास्त्रीय स्वरूपांत सुसूत्रपणे एकत्र मांडली. वेद आणि उपनिषदांतील ब्रह्मविद्येशी गौडपादाचार्यांनीच या विद्येचा समन्वय केला. तोच थोर वारसा पुढे त्यांचे शिष्य श्रीगोविंदपादाचार्य आणि श्रीशंकराचार्य यांनी चालवला. श्रीशंकराचार्यांनी सौंदर्यलहरी, योगतारावली वगैरे अनेक स्तोत्रांमध्ये ही उपासना विस्ताराने सांगितली आहे.

* कुंडलिनी शक्तीचे स्वरूप

कुंडलिनी हे एक आपल्या शरीरातील मोठे गूढ तत्त्व आहे. अनेक ऋषीमुनी, तत्त्ववेत्ते आणि साधुसंतांनी कुंडलिनीचे वर्णन केले आहे. या वर्णनाचे स्वरूप भिन्न भिन्न आहे. तथापि कुंडलिनी शक्तीच हे सर्व विश्व चालवते असे सर्वजण सांगतात. तसेच माणसाच्या शरीरातील कुंडलिनी ही एक अनिर्वचनीय शक्ती आहे याबद्दलही सर्वांचे एकमत आहे. कुंडलिनी शक्ती अनिर्वचनीय आहे असे म्हणतात कारण कोणत्याही साधकाला **कुंडलिनी शक्तीचा प्रत्यय स्वतःच्या इच्छेने किंवा प्रयत्नाने घेता येत नाही.** कुंडलिनी शक्ती नाही असेही म्हणता येत नाही कारण तिचा प्रत्यय अनेक साधुसंतांनी स्वतः घेतला आहे आणि सांगितले आहे की **केवळ गुरूकृपेनेच कुंडलिनी शक्तीचा प्रत्यय येऊ शकतो.**

योगकुंडलिनी उपनिषदांत असे म्हटले आहे की कुंडलिनी ही एक शक्ती असून ती कमळांतील तंतूप्रमाणे अत्यंत सूक्ष्म व नाजूक आहे. (शक्तिः कुंडलिनी नाम बिसतन्तुनिभा शुभा).

योगशिखोपनिषदांत असे म्हटले आहे की मूलाधारचक्रात रहाणारी कुंडलिनी जीवतत्त्वाचा आधार असलेली शक्ती आहे. (''मूलाधारगता शक्तिः स्वाधारा बिन्दुरूपिणी । तस्यामुत्पद्यते नादः सूक्ष्मबीजादिवाङ्कुर ः ॥'')

श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराज ललितासहस्त्रनाम या स्तोत्रात सांगतात- मूलाधार कन्दामध्ये कुंडलिनीशक्ती झोपलेली असते आणि योगाभ्यासाने तिला जागृत केले म्हणजे ती साधकाला मोक्षापर्यंत घेऊन जाते. (''कन्दोर्ध्वे कुण्डली शक्तिः सुप्ता मोक्षाय योगिनाम्'')

श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांनी त्रिपुरसुन्दरीवेदपादस्तोत्रम् या स्तोत्रांत कुंडलिनी शक्तीचे स्वरूप 'प्रत्यगद्वैतलक्षणम्', 'चिदानन्दघनादन्यन्नेह' या शब्दांत सांगितले आहे. आचार्य सांगतात - कुंडलिनी शक्ती 'एकमेव अद्वितीय' आहे. ती शक्ती सर्वांच्या अंतर्यामी आहे. 'सत्घन', 'चित्घन' व 'आनंदघन' असे या शक्तीचे स्वरूप आहे. सत्घन म्हणजे अविनाशी. चित्घन म्हणजे स्वयंप्रकाशी. आनंदघन म्हणजे पूर्ण आनंद स्वरूप असलली. तसेच कुंडलिनी

शक्ती सर्वत्र भरून राहिलेली आहे, ती भेदशुन्य व भेदातीत आहे आणि एकरस आहे असेही श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांनी या स्तोत्रांत सांगितले आहे.

'सौन्दर्यलहरीस्तोत्रम्' या स्तोत्रात श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांनी कुंडलिनी शक्तीचे वर्णन ''अधिष्टात्रीदेवता'', ''मातृका'', ''त्रिपुराम्बिका'' असे केले आहे. आचार्य सांगतात कुंडलिनी शक्तीमुळेच हे विश्व निर्माण झाले आहे. कुंडलिनी शक्तीच या विश्वाचे अधिष्ठान आहे. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीनही अवस्थांचे कुंडलिनी शक्ती हेच अधिष्ठान आहे. माणसाची 'इच्छाशक्ती', 'ज्ञानशक्ती' आणि 'क्रियाशक्ती' यांचे अधिष्ठान कुंडलिनीच आहे, कुंडलिनी शक्तीच सर्व सजीव वस्तुंना प्राण देते आणि त्यांचे जीवन चालवते. म्हणूनच कुंडलिनी शक्तीचे वर्णन श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांनी 'जीवनाचे जीवन' आणि 'प्राणांचा प्राण' असे केले आहे.

श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांनी योगतारावली या स्तोत्रामध्ये कुंडलिनी शक्तीचे वर्णन 'तडिल्लेखासमरूचिः', 'विद्युल्लेखेव भास्करा' आणि 'तडिल्लेखातन्वी तपन-शशि-वैश्वानरमयी' असे केले आहे. उदयाला येणाऱ्या सूर्यमंडलाप्रमाणे अथवा अग्निज्वालेप्रमाणे कुंडलिनी अत्यंत दैदीप्यमान दिसते असे आचार्य सांगतात. तथापि कुंडलिनी शक्ती सूर्याप्रमाणे दाहक नाही, ती शक्ती चंद्रबिंबाप्रमाणे शीतल आहे असा प्रत्यय येतो. तसेच कुंडलिनी शक्ती अशुभाचा निरास करणारी आहे. कुंडलिनी शक्ती मातेप्रमाणेच अत्यंत दयाळु, वात्सल्यामूर्ती आणि स्नेहाळू आहे. ती कृपामयी आहे, ती करुणामयीही आहे आणि शरणागतांचा शोकताप व रोग यांचे निवारण करणारी आहे. परमप्रेम आणि पूर्ण आनंद हेच कुंडलिनीशक्तीचे स्वरूप आहे. तथापि गुरूकृपेने कुंडलिनीशक्ती जागृत झाल्यावरच तिच्या या समाधीचा प्रत्यय येतो असेही आचार्य सांगतात. आचार्यांनी केलेल्या या वर्णनाला खूपच महत्त्व दिले जाते, कारण आचार्यांचे परात्पर गुरू श्रीगौडापादाचार्य यांनीच कुंडलिनीयोग शास्त्रीय स्वरूपांत एकत्रित मांडला आहे व तोच वारसा आचार्यांनी पुढे चालवला असे मानले जाते. अनेक ग्रंथात कुंडलिनी शक्तीच्या स्वरूपाचे व सामर्थ्याचे वर्णन केलेले आढळते. या सर्व वर्णनांत आचार्यमहाराजांनी विशद केलेले स्वरूपच विस्ताराने सांगितले आहे.

* कुंडलिनी शक्ती - संचालक शक्ती

या विश्वाची रचना व कार्यपद्धती मानवी मनाला थक्क करणारी आहे. कुंडलिनी शक्तीनेच हे विश्व निर्माण केले आहे आणि ती शक्तीच हे सर्व विश्व चालवते आहे. गुरूत्वाकर्षणाच्या रूपाने कुंडलिनी शक्तीचा प्रत्यय सतत येत असतो. तथापि कुंडलिनी शक्तीचे सामर्थ्य व स्वरूप अनेकविध अंगांनी कार्यरत असते. सूर्य, चंद्र, ग्रहगोल, तारे व ही पृथ्वी लाखो वर्षे विशिष्ट क्रमाने व गतीने सतत फिरत आहेत. त्यांच्या गतीत कधीही लेशमात्रही फरक होत नाही. तसेच त्यांच्या मार्गात तसूभरही फरक झालेला दिसत नाही. लाखो वर्षे हे असेच चालले आहे. यावरून कुंडलिनी शक्तीचे सामर्थ्य व स्वरूप यांची काहीशी कल्पना येऊ शकेल. म्हणूनच कुंडलिनी शक्ती ही विश्वचालक शक्ती आहे असे म्हणतात.

अनेक ऋषीमुनींनी व साधुसंतांनी कुंडलिनी शक्तीचा असा अनुभव स्वतः घेतला आहे व त्या अनुभवाचे वर्णनही आपल्या वाङ्मयात करून ठेवले आहे.

जी कुंडलिनीशक्ती संपूर्ण विश्व चालवते तीच शक्ती प्रत्येक जीवामध्ये अंशरूपाने आहे. प्रत्येक जीवाचे कार्य ही कुंडलिनी शक्तीच चालवते. म्हणूनच कुंडलिनी शक्तीला जीवशक्ती (जीवाची शक्ती) असे म्हणतात.

''परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च'' (श्वेताश्वरत्तर उ.६-८).

ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती अशा दोन रूपाने कुंडलिनी शक्ती माणसाच्या देहामध्ये आपल्या अनुभवाला येते. भोवतीच्या विश्वाचे ज्ञान ही कुंडलिनी शक्तीच आपल्या मनांत करून देते म्हणून ती ज्ञानशक्ती आहे. तसेच देहाने व मनाने आपण जे कार्य करतो, त्याची क्रिया शक्ती ही कुंडलिनी शक्तीच आहे म्हणून तिला क्रियाशक्ती म्हटले आहे.

विश्व चालवणारी शक्ती आणि जीवाचे शरीर चालवणारी शक्ती दोन्ही एकच आहेत. पण दोन्ही एक असल्याचा अनुभव आपण घेऊ शकत नाही. कारण आपण आपल्या देहालाच 'मी' समजतो. 'मी' म्हणजे देह ही आपली

कल्पना चुकीची आहे. जर देह म्हणजे 'मी' आहे ही कल्पना काढून टाकली आणि सर्व विश्व म्हणजेच मी आहे असा आपल्याला अनुभव घेता येतो या अनुभवाला जीव आणि शिव एक झाल्याचा अनुभव म्हणतात. या अनुभवालाच श्रीशंकराचार्य अद्वैत अनुभूती असे म्हणतात. ''अहं ब्रह्मास्मि'' हे महावाक्यही तीच अनुभूती दाखवते. संतमहात्मे यालाच ईश्वर साक्षात्कार म्हणतात.

ईश्वर साक्षात्कार करून घेण्यासाठी ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग व कर्ममार्ग हे मार्ग जसे आहेत, तसाच कुंडलिनी योगमार्गही आहे. ज्ञानेदवांनी याच कुंडलिनी योगाचे सविस्तर वर्णन ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत केले आहे.

* भगवंत व कुंडलिनीशक्ती

ज्ञानदेव सांगतात, आपण गावाला जातांना एका करंडीत पूजेच्या मूर्ती ठेवतो. त्या करंडीत देवमूर्तीशिवाय दुसरे काहीही नसते. त्याचप्रमाणे कुंडलिनी शक्ती ही एक करंडीच आहे. त्या करंडीत ब्रह्माशिवाय (म्हणजेच भगवंताशिवाय) दुसरे काहीच नाही. कुंडलिनीशक्तिरूपी करंडीत देखील एका परमात्म्याशिवाय दुसरे काहीच नसते. शक्ती म्हटली तरी शक्तीत शक्तच असतो, दुसरे काहीच नसते. या कुंडलिनी शक्तीतूनच अव्यक्त असलेला ब्रह्मच प्रगट होत असतो असे सांगण्याकरिता ज्ञानदेवांनी हे उदाहरण दिले आहे.

भगवंत हा सर्वसामर्थ्यवान आहे तो केवळ कुंडलिनी शक्तीमुळेच. कुंडलिनीशक्ती या शब्दांत 'शक्त' हा शब्द आहे. 'शक्त' म्हणजे सामर्थ्य. म्हणून **भगवंताचे सामर्थ्य म्हणजेच कुंडलिनीशक्ती.**

श्रीज्ञानदेव म्हणतात -

ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ॥
जया विश्वबीजाचिया कोंभा । साऊली केली ॥६.२७२॥

(भावार्थ : कुंडलिनी ही जगदंबा परमेश्वराची शक्ती होय. ती जगताला जन्म देते. चक्रवर्तीराजा जसा सर्व पृथ्वीचे राज्य करतो, त्याप्रमाणे चैतन्यरूप परमात्मा अनंत ब्रह्मांडाचा शास्ता आहे. कुंडलिनी त्या चैतन्यरूप परमेश्वराचे सर्व सौंदर्य आहे व सर्व वैभव आहे.)

कुंडलिनी शक्तीच्या योगानेच परमेश्वराचे परमेश्वरत्त्व आहे असे अमृतानुभव ग्रंथांतही ''ऐश्वर्येसि ईश्वरा । जियेचे अंग संसारा'' या ओवीने श्रीज्ञानदेवांनी सांगितले आहे.

ब्रह्म हे बीज आहे. ते बीजच विस्तारले आहे आणि आपल्याला विश्वाच्या रूपाने दिसते आहे. म्हणूनच ब्रह्म हेच विश्वबीज आहे असे ज्ञानदेव सांगतात. आपल्याला भोवतीचे विश्व दिसते. पण त्या विश्वाचे बीज म्हणजे ब्रह्म दिसत नाही. याचे कारण ते बीज कुंडलिनी शक्तीने झाकले आहे.

* शक्तिजागृती म्हणजे काय?

योगशास्त्रकार सांगतात की मानवी देहात कुंडलिनी शक्ती काहीशी निद्रिस्त स्वरूपात असते, ती शक्ती जागृत करावी लागते, सद्गुरूंनी ती शक्ती जागृत केली म्हणजे साधकाचा आंतरिक विकास वेगाने सुरू होतो. शक्तिजागृती नंतरच साधकाची आध्यात्मिक वाटचाल खऱ्याअर्थाने सुरू होते. शक्तिजागृती नंतरच साधकाचा जीवभाव हळूहळू कमीकमी होत जातो. पुढे गुरूकृपेने तो साधक आत्मसाक्षात्कारापर्यंत पोचतो आणि शेवटी परमेश्वरीशक्तीशी एकरूप होतो.

शक्तिजागृती म्हणजे साधकाच्या देहातील कुंडलिनी शक्ती जागृत करणे. साधकाच्या देहांत निद्रिस्त असलेली कुंडलिनी शक्ती जागृत झाली म्हणजे त्या साधकाची शक्तिजागृती झाली असे म्हणतात.

वास्तविक कुंडलिनी शक्ती सदैव क्रियारत असते. कुंडलिनी शक्ती जशी विश्वाचे संचालन करते त्याचप्रमाणे मानवी देहाचेही संचालन करीत असते. मग ती शक्ती मानवी देहांत निद्रिस्त अवस्थेत असते आणि तिला जागृत करावी लागते असे का म्हणतात? शक्तिजागृती या शब्दाचा नेमका अर्थ काय? हे प्रश्न साधकाच्या मनांत येणे स्वाभाविक आह. मनुष्य झोपतो आणि नंतर जागा होतो तसे हे शक्तिजागृतीचे स्वरूप नाही. हे समजून घेतले पाहिजे.

* देहांत कुंडलिनी शक्ती कोठे असते?

जाणकार असे सांगतात, 'कुंडलिनी शक्ती मानवी शरीरांत सर्वत्र संचार करीत असते. तथापि मानवी शरीरांतील दोन ठिकाणी या शक्तीचे विशेषरूपाने वास्तव्य आहे असा अनुभव योगशास्त्रकार सांगतात. ही दोन ठिकाणे म्हणजे

'हृदय' आणि 'मूलाधारचक्र'. या दोन्ही ठिकाणी शक्तीचे विशिष्ट रूपातील अस्तित्त्व प्रकर्षाने प्रत्ययाला येते.

मूलाधारचक्रांत शक्ती सर्पिणीसारखी साडेतीन वेटोळी घालून निद्रिस्त असत असे जाणकार सांगतात. हे मूलाधारचक्र शरीरांत गुदद्वाराच्या वर मेरुदंड जेथे सुरू होतो तेथे असते.

आपल्या हृदयात ही शक्ती आत्मरूपाने असते. या शक्तीमुळे आपले अंतःकरण पाचही इंद्रियातून बाहेर धावत असते व बाहेरील विश्वाचे ज्ञान करून घेत असते. हा या शक्तीचा ज्ञानरुपाने येणारा अनुभव होय. तसेच हीच शक्ती शरीरातील सर्व इंद्रियांच्या क्रिया चालवते. हा या शक्तीचा क्रियारूपाने येणारा अनुभव होय.

येथे 'हृदय' असा जो उल्लेख केला आहे, ते 'हृदय' शरीरशास्त्राने दाखवलेले माणसाच्या छातीतील डाव्या बाजूचे 'हृदय' नव्हे. योगशास्त्रांत सांगितलेले हे 'हृदय' छातीमध्ये उजव्या बाजूला असते. त्याला **'हृदयकुहर' किंवा 'हृदयग्रंथी'** अशी नांवे योगशास्त्रकार देतात. या हृदयग्रंथीमध्ये कुंडलिनी शक्तीचे आत्मरूपाने वास्तव्य असते.

मानवी देहांत **कुंडलिनी शक्ती निद्रिस्त अवस्थेत** असते असे योगशास्त्रकार सांगतात याची चार कारणे आहेत. ही कारणे पुढे दिली आहेत.

१. बहिर्मुख अवस्था - शक्ती निद्रिस्त अवस्थेत असते असे म्हणण्याचे पहिले कारण म्हणजे सामान्य मनुष्य बहिर्मुख अवस्थेत असतो. त्याचे अंतःकरण देहाच्या इंद्रियातून सतत बाहेर धावत असते व बाहेरच्या विश्वाचे ज्ञान करून घेण्यांत गुंतलेले असते. यालाच बहिर्मुख अवस्था असे म्हणतात. मनुष्य बहिर्मुख अवस्थेत असला म्हणजे त्याला असे वाटते की 'मी म्हणजे देह आहे.'

वास्तविक अध्यात्मशास्त्र सांगते की 'मी म्हणजे आत्मा' (सोहम्।). परंतु हा अनुभव बहिर्मुख अवस्थेतील मनुष्य घेऊ शकत नाही. 'मी म्हणजे आत्मा' हा अनुभव घेण्यासाठी साधकाला अंतर्मुख अवस्था प्राप्त करून घ्यावी लागते. अंतर्मुख अवस्था म्हणजे इंद्रियाद्वारे बाहेर धावणारे अंतःकरण देहामध्येच आत वळवणे.

२. सुषुम्ना नाडीचे द्वार बंद असते - शक्ती निद्रिस्त अवस्थेत असते असे म्हणण्याचे दुसरे कारण म्हणजे मनुष्य जेव्हा बहिर्मुख अवस्थेत असतो तेव्हा त्याच्या मूलाधार चक्राशी असलेल्या सुषुम्ना नाडीचे द्वार बंद असते. त्यामुळे मूलाधार चक्रांतील कुंडलिनी शक्ती सुषुम्ना नाडीत प्रवेश करू शकत नाही आणि तेथून वर जाऊन हृदयातील आत्मरूपाने असलेल्या शक्तीचा प्रत्यय घेऊ शकत नाही.

३. अतींद्रिय शक्ती - शक्ती निद्रिस्त अवस्थेत असते असे म्हणण्याचे तिसरे कारण म्हणजे बहिर्मुख माणसाला स्वतःच्या अतींद्रिय शक्तींचे अस्तित्त्व जाणवत नाही व त्यांचा वापरही करता येत नाही. वास्तविक माणसाला अनेक अतींद्रिय शक्ती प्राप्त आहेत. परंतु बहिर्मुख अवस्थेतील मनुष्य अतींद्रिय शक्तीचा अनुभव घेऊ शकत नाही, कारण त्या अतींद्रिय शक्ती काहीशा सुप्त वा निद्रिस्त अवस्थेत असतात.

४. ग्रहणशक्ती व धारणाशक्ती - चौथे कारण म्हणजे ज्ञान - विशेषतः अध्यात्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी माणसाला केवळ स्वतःचा तर्क व बुध्दी पुरेशी नसते. त्यासाठी गुरूकृपा व्हावी लागते आणि विशिष्ट ग्रहणशक्ती किंवा धारणाशक्ती जागृत व्हावी लागते. बहिर्मुख माणसाची ग्रहणशक्ती व धारणाशक्ती सुप्त अवस्थेत असते.

* शक्तिजागृती झाल्यावर येणारे अनुभव

गुरूकृपेने साधकाची शक्तिजागृती झाली म्हणजे त्या साधकाला जागृत झालेल्या शक्तीचा चार प्रकारे अनुभव येतो. हे अनुभव पुढे दिले आहेत.

१. अंतर्मुख अवस्था - माणसाची बहिर्मुख अवस्था कमीकमी होत जाते आणि त्याला अधिकाधिक अंतर्मुख अवस्था प्राप्त होते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर माणसाच्या अंतःकरणाचे इंद्रियांद्वारातून बाहेर धावणे कमीकमी होत जाते. माणसाची बाहेरच्या विश्वाबद्दलची उत्सुकता कमीकमी होत जाते व त्याला आंतरिक अनुभव घ्यावेसे वाटू लागतात. माणसाला आत्मरूपाचा अनुभव घ्यावासा वाटू लागतो. गुरुकृपा जशी वाढत जाते तसे साधकाला आंतरिक अनुभव येऊ लागतात आणि शेवटी आत्मदर्शन होते.

२. सुषुम्ना नाडीचे द्वार उघडते - शक्तिजागृती झाल्यावर आपल्या देहातील मूलाधारचक्रांत असलेली कुंडलीनी शक्ती धक्का देऊन सुषुम्ना नाडीचे द्वार उघडते आणि सुषुम्ना नाडीत प्रवेश करून ती शक्ती वरवर जाऊ लागते. या मार्गात असलेली सहा चक्रे भेदून ती वर जात असतांना अनेक आंतरिक अनुभव साधकाला येतात. अंतिम अनुभव म्हणजे आत्मसाक्षात्कार होय.

३. अतींद्रिय शक्तीचा अनुभव - गुरूकृपेने शक्तिजागृती झाल्यावर साधकाला स्वतःमधील अनेक अतींद्रिय शक्तींची जाणीव होते व त्यांचा अनुभव येऊ लागतो. त्याला अनेक सिद्धी प्राप्त होतात. अतींद्रिय शक्तींमुळे अनेक आंतरिक अनुभूतीही येतात.

४. धारणाशक्ती, मेधाशक्ती व प्रतिभाशक्ती - गुरूकृपा झाल्यावरच धारणाशक्ती, मेधाशक्ती आणि प्रतिभाशक्ती यांचा खरा विकास सुरू होतो. त्यामुळेच अध्यात्मज्ञान ग्रहण करण्याची क्षमता खऱ्या अर्थाने साधकात निर्माण होते.

गुरूकृपा झाल्याशिवाय साधकाला परोक्ष ज्ञान प्राप्त होत नाही आणि अपरोक्ष ज्ञान तर नाहीच नाही असा अनुभव आल्याचे सर्व संतांनी एकमुखाने सांगितला आहे. अध्यात्मज्ञानाची प्रक्रिया तीन अवस्थेत सांगितली जाते. शास्त्रप्रतीती, गुरूप्रतीती आणि आत्मप्रतीती. गुरूकृपेने शक्तिजागृती झाल्यावरच या अवस्था साधकाला प्रात होऊ शकतात.

शक्ती निद्रिस्त असली म्हणजे मनुष्य जीवभावात असतो. साधकाची शक्तिजागृती झाली म्हणजे हळूहळू त्याचे चित्त शुद्ध होत जाते, त्याच्यातील सत्त्वगुण वाढत जातात आणि त्याच्या चित्ताला स्थिरता प्राप्त होते.त्यामुळे साधकाचा इंद्रियनिग्रह वाढू लागतो, विषयांची ओढ कमी कमी होत जाते.साधकाचा अहंभाव व कर्तृत्त्वभावना कमी कमी होत जाते व त्याला साक्षीभावाचा अनुभव घेता येतो.

शक्तिजागृती झाल्यावर येणारे हे अनुभव अनेक साधुसंतांनी स्वतः घेतले आहेत आणि तसे उल्लेखही आपल्या वाङ्मयांत केले आहेत. म्हणूनच शक्ती जागृत झाल्याची ही लक्षणे आहेत असेही काही जाणकार सांगतात.

* शक्तिजागृती करण्याचे मार्ग

शक्तिजागृती करण्याचे प्रमुख मार्ग पुढे दिले आहेत.

१. **योगाभ्यास** - योगाभ्यासाने आणि तीव्र वैराग्याने शक्तिजागृती होऊ शकते.

२. **भक्ती** - भक्तीनेही शक्तिजागृती होऊ शकते. ज्ञानाचे खरे फळ म्हणजे अंतःकरणांत भक्ती निर्माण होणे. ज्ञानाचे फळ म्हणून जी भक्ती विकसित होते त्या भक्तीमुळे साधकाची शक्तिजागृती लवकर होते असा अनुभव संत सांगतात.

तसेच ज्ञान नसले तरीही पूर्वसुकृतामुळे जर साधकामध्ये भक्ती विकसित झाली तरीही त्या भक्तीमुळेही साधकाची शक्तिजागृती होते. श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज सांगत असत की श्रीतुकाराम-महाराजांची शक्तिजागृती अशा भक्तीमुळेच झाली होती. चोखामेळा, संत सखू, सोयराबाई, बहिणाबाई अशा अनेक संतांचीही शक्तिजागृती भक्तीमुळेच झाली होती.

३. **त्रिबंध** - वज्रासन घालून जर साधकाने जालंदरबंध, मूलबंध व उड्डियानबंध हे तीन बंध एकदम लावले तर त्यामुळे शक्तिजागृती करता येते असे श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराज आणि श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी सांगितले आहे.

४. **प्राणायाम** - विशिष्ट प्रकारच्या प्राणायामानेही शक्तिजागृती करता येते. श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी शक्तिजागृती करणाऱ्या प्राणायामांचे अनेक प्रकार आपल्या वाङ्मयांत सांगितले आहेत.

५. **शक्तिपात** - सद्गुरूंनी साधकावर कृपा केल्यामुळे साधकाची शक्तिजागृती होते. यालाच शक्तिपात असे म्हणतात.

६. **तंत्रसाधना** - तांत्रिक वामाचार व तंत्रसाधना यानेही शक्तिजागृती करता येते असे तंत्रशास्त्रातील अनेक ग्रंथांत उल्लेख आहेत.

कोणत्याही प्रकाराने शक्तिजागृती झाली तरीही त्या शक्तीचा प्रत्यय खऱ्या अर्थाने गुरूकृपेमुळेच येतो. तसेच त्या जागृत झालेल्या शक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्या शक्तीचा प्रवाह योग्य दिशेने वर जात आहे याची दक्षता घेण्यासाठी समर्थ आणि शक्तिसंपन्न सद्गुरूंचे मार्गदर्शन घेण्याची नितांत आवश्यकता असते.शक्तिजागृती झाल्यावर

साधकाला सद्‌गुरूंचे योग्य मार्गदर्शन मिळाले नाहीतर साधकाचा अधःपात होतो असे योगशास्त्रकार सांगतात. साधकांच्या अधःपाताची अशी अनेक उदाहरणे सांगितली जातात.

* सद्‌गुरूंची आवश्यकता

योग, भक्ती, कर्म, ज्ञान, मंत्र, तंत्र वगैरे अध्यात्मसाधनेचे अनेक मार्ग आहेत. मार्ग कोणताही असला तरीही प्रत्येक मार्गात सद्‌गुरूंची आवश्यकता असतेच. शिष्याची त्या मार्गातील प्रगती केवळ सद्‌गुरूकृपेनेच होत असते. प्रत्येक उपासनामार्गात सद्‌गुरू आपल्या शिष्याचा अधिकार, पूर्वसुकृत वगैरे जाणून घेऊन त्या शिष्याला उचित उपासना (साधन) सांगतात.

सद्‌गुरूंच्या ठिकाणी श्रद्धा ठेवून शिष्य साधन करीत राहिला म्हणजे गुरूकृपेनेच तो पूर्णत्त्वाला जाऊ शकतो. सद्‌गुरूकृपा झाल्यामुळेच अध्यात्मसाधना होते हाच संपूर्ण अध्यात्मशास्त्राचा मुख्य गाभा आहे. म्हणूनच सर्व संप्रदाय, उपासनामार्ग व पंथांमध्ये सद्‌गुरूकृपेचा महिमा सांगितला आहे.

सद्‌गुरूकृपा म्हणजेच शक्तिपात होय. सद्‌गुरूंनीच कृपावंत होऊन दीक्षा द्यायची व साधन करून घ्यायचे हा शक्तिपात मार्गच सर्व संप्रदायात मान्य केलेला आहे. त्यासाठीच सद्‌गुरूंना शरण जावे, सद्‌गुरूंवर निष्ठा व भक्ती दिलेले साधन श्रद्धेने करावे अशी शिकवण सर्व संप्रदायात सांगितली जाते. हीच शिकवण शक्तिपात योगसाधनेचाही गाभा आहे.

* दत्तसंप्रदायी शक्तिपीठ

वासुदेवनिवास हे शक्तिपीठ दत्तसंप्रदायी आहे. श्रीदत्तसंप्रदाय हा गुरूपरंपरेचा संप्रदाय आहे. या संप्रदायाचा एक मोठा विशेष म्हणजे ज्ञान, कर्म, भक्ती, योग, मंत्र आणि तंत्र या सर्व उपासनापद्धतींचा समन्वय श्रीदत्त उपासनेत प्रकर्षाने केलेला आहे.

श्रीगुळवणीमहाराजांचे पहिले गुरू श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज हे दत्तावतार मानले जातात. ज्ञान, कर्म, भक्ती, योग, मंत्रशास्त्र व तंत्रशास्त्र या सर्वांमध्ये ते पूर्णत्त्वाला पोचलेले होते. श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांशी तुलना करावी इतका थोर अधिकार त्यांनी या सर्व

शास्त्रांमध्ये प्राप्त करून घेतला होता. श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराजांनी आपले सर्व जीवन श्रीदत्तउपासना आणि दत्तपरंपरेचा प्रसार करण्यातच व्यतीत केले.

श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी वेदान्त तत्त्वज्ञानाच्या भूमिकेतून श्रीदत्तप्रभुंचे चरित्र लिहिले व दत्तसंप्रदायासंबंधी विपुल वाङ्मय निर्माण केले. ज्ञान, कर्म, भक्ती, योग व मंत्रशास्त्र या सर्व शास्त्रांचा सर्वसमन्वयात्मक असा विस्तृत परामर्श श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराज यांनी आपल्या सर्व वाङ्मयातून घेतला आहे.

श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांचे अवतार कार्य हे श्रीगुरूदेव दत्तात्रेयांचेच कार्य आहे असे मानले जाते. शक्तिपात योगसाधना वेदान्तप्रणित कसा आहे आणि गुरूपरंपरा पुराण काळापासून कशी चालत आली आहे यावर त्यांनी आपल्या वाङ्मयातून प्रकाश टाकला आहे. श्रीदत्तप्रभूंनी, श्रीनृसिंहसरस्वती-स्वामीमहाराजांनी आणि श्रीपाद श्रीवल्लभांनी केलेले सर्व चमत्कार शक्तिपात योगविद्येनेच केलेले आहेत असे श्रीस्वामीमहाराज सांगत असत. श्रीगुरूचरित्रातील सर्व कथा म्हणजे शक्तिपात योगविद्येचेच अनुभव आहेत असे श्रीस्वामीमहाराजांनी दाखवून दिले आहे.

श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी श्रीगुळवणीमहाराजांना विधिवत दीक्षा दिली होती आणि आपले ज्ञान शक्तिपात मार्गाने प्रदान केले होते. श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज हेही शक्तिपात योगसाधनेतील एक पूर्णत्त्व पावलेले विभूतीमत्त्व आहे. त्यांनीही दीक्षा देऊन श्रीगुळवणीमहाराजांना शक्तिपातमार्गाचे आपले ज्ञान प्रदान केले होते.

इ.स. १९०७ ते इ.स. १९१४ हा आठ वर्षांचा कालखंड म्हणजे श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज यांच्या निकट सहवासाचा काळ. या काळात स्वामीमहाराजांनी श्रीगुळवणीमहाराजांना दत्तोपासना दिली. गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे यांचे पाठ स्वमुखाने दिले. श्रीदत्तमाला मंत्राची अत्यंत दुर्मिळ असलेली मंत्रसाधना प्रदान केली. काही योगासनांचे मार्गदर्शनही केले. अशा प्रकारे या आठ वर्षांच्या कालखंडात स्वामीमहाराजांनी श्रीगुळवणीमहाराज या आपल्या अत्यंत आवडत्या शिष्याच्या अध्यात्मजीवनाचा पाया घातला.

इ.स. १९१४ मध्ये स्वामीमहाराज गरुडेश्वरला समाधीस्थ झाल्यावर श्रीगुळवणीमहाराजांनी प्राणायम, योगासने, हठयोग, त्राटक, खेचरीमुद्रा यांची जोड देऊन योगमार्गात परिपूर्णत्त्व संपादन केले.

इ.स. १९२२ साली श्रीगुळवणीमहाराजांनी थेट स्वामीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांशी नर्मदेच्या तीरावरच दोरांगाबाद येथे झाली. त्या रात्री स्वप्नांत श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी श्रीगुळवणीमहाराजांना दर्शन दिले आणि सांगितले, ''आम्ही दोघेही एकच आहोत. श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांची विद्या दत्तसंप्रदायाचीच आहे. तुझ्याकडून बरेच मोठे व्हायचे आहे त्यासाठीच मी लोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांच्या रूपाने तुला मार्गदर्शन करण्यासाठी आलो आहे.'' असे सांगून श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांची शक्तिपातदीक्षा घेण्याची श्रीगुळवणीमहाराजांना आज्ञा केली. त्याप्रमाणे श्रीगुळवणीमहाराजांनी श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांची विधिवत दीक्षा घेतली.

लोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांनी जे शक्तिपातसाधन श्रीगुळवणी-महाराजांना दिले त्याला बंगालमध्ये 'ज्ञानसाधनमार्ग' किंवा 'महायोगसिद्धसाधनमार्ग' असे म्हणतात. बंगाली परंपरा असे मानते की भगवान शंकरांपासून या शक्तिपातविद्येचा प्रारंभ झाला आणि श्रीदत्तप्रभूंनी या विद्येचा भारतभर प्रसार केल. म्हणून श्रीदत्तप्रभू शक्तिपातविद्येचे संवर्धक, निमंत्रक व प्रसारक मानले जातात. शक्तिपातपरंपरेत ज्ञान, भक्ती, कर्म आणि योग यांचा समन्वय असून या चारही अंगाचा पूर्ण विकास शक्तिपात साधनमार्गात होतो असे बंगाली परंपरा मानते. भगवान श्रीदत्तात्रेयांची ही विद्या त्या भागात अर्वाचीन काळात श्रीगंगाधरतीर्थ-स्वामीमहाराज यांनी प्रगट केली आणि श्रीनारायणतीर्थदेव-स्वामीमहाराज व श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-स्वामीमहाराज यांच्याद्वारा ती श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांकडे आली. विसाव्या शतकांत श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांनी ही शक्तिपातदीक्षा श्रीगुळवणीमहाराजांना दिली आणि आशीर्वाद देऊन सांगितले, ''तुझ्यामार्फत या दिव्य विद्येचा प्रसार भारताच्या कानाकोपऱ्यात होईल. त्यासाठीच या दिव्य विद्यादानाचे अग्निकंकण तुझ्या हातात बांधले आहे.''

विशेष म्हणजे श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज आणि श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज या दोन्ही गुरूंनी श्रीगुळवणीमहाराजांना दीक्षा दिली ती नर्मदामातेच्या तीरावर मातोश्री उमाबाईंच्या पवित्रपावन उपस्थितीमध्ये. गुरू आणि शक्ती मातृस्वरूपी असते हेच यांतून सूचित होते.

श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज मोठे वेदान्ती होते, वेदान्तसूत्रे त्यांच्या जीभेवर असत. शास्त्रनिष्ठ विशुद्ध आचरण, तीव्र वैराग्य, निस्संग वृत्ती व आचारधर्माचे काटेकोरपणे पालन ही त्याच्या जीवनाची वैशिष्ट्ये होती. त्यामुळे त्यांच्या जीवनकार्याला वेदान्त तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले होते.

शक्तिपातदीक्षेनंतर श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज व श्रीगुळवणीमहाराज यांच्या निकट सहवासाचा ३२ वर्षांचा कालखंड म्हणजे शक्तिपात विद्येच्या माध्यमांतून भारतभर झालेल्या ईश्वरशक्तीच्या दिव्य कार्याची तेजस्वी गाथा आहे. श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज ९ फेब्रुवारी, १९५५ रोजी वाराणसी येथे शिवस्वरूपी लीन झाले. श्रीगुळवणीमहाराजांचा अपूर्व अधिकार जाणून श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांनी शक्तिपातदीक्षा प्रदानाकरिता श्रीगुळवणीमहाराजांची उत्तराधिकारी म्हणून नेमणुक केली होती याची आवर्जून नोंद घेतली पाहिजे. (श्रीगुळवणीमहाराजांच्या रौद्रीशांतीमहोत्सवाच्या निमित्ताने श्रीवासुदेवनिवास प्रकाशनने १ जून, १९७१ रोजी प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेत ही माहिती दिलेली आहे.)

पुढे इ.स. १९६५ मध्ये वासुदेवनिवास या शक्तिपीठाची औपचारीकरित्या स्थापना झाली. तथापि या शक्तिपीठातर्फे होणाऱ्या कार्याला तोपर्यंतच्या सुमारे ६० वर्षांचा दिव्य इतिहास आहे याची नोंद घ्यावीच लागेल.

वासुदेवनिवास या शक्तिपीठाची स्थापना

वासुदेवनिवास या शक्तिपीठाच्या स्थापनेसंबंधीची माहिती श्री. अच्युत सिद्धनाथ पोटभरे यांनी जीवन गंगा अंतिम कलशमध्ये दिली आहे. ही माहिती त्यांच्या शब्दात पुढे उधृत करीत आहोत. ''वासुदेव निवासची निर्मिती श्रीदत्तमहाराजांच्या इच्छेमुळे झाली. अनेकजण आश्रमाची कल्पना सुचवीत होते. पण काही तरी कारण पुढे करून 'नको तसले काही' म्हणून

श्रीगुळवणीमहाराज टाळीत होते. यामुळे वयाच्या ७७-७८ नंतर वासुदेवनिवास या आश्रमाची स्थापना झाली. तत्पूर्वी होणे अशक्य नव्हते. परंतु श्रीगुळवणीमहाराजांची संमती मिळू शकली नव्हती.इ.स. १९६१ मध्ये १२ जुलै रोजी पानशेत धरण फुटले आणि पुण्यातील बराचसा भाग वाहून गेला. त्यातच श्रीगुळवणीमहाराजांचे गोवईकर चाळीतील घरही वाहून गेले. त्यामुळे आश्रमाची स्थापना करण्याच्या प्रश्नाला पुन्हा एकदा चालना मिळाली. याहीवेळी श्रीगुळवणीमहाराज आश्रमाची स्थापना करण्यास संमती देत नव्हते. तेव्हा श्रीदत्तमहाराजांनी श्रीलोकनाथतीर्थ-महाराजांचे एक पत्र श्रीगुळवणीमहाराजांना दाखवले. त्यात ''श्रीगुरूंचा आश्रम बांधणे' ही शिष्यांची मोठी सेवा आहे असे श्रीलोकनाथतीर्थ-महाराजांनी लिहिले होते. श्रीलोकनाथतीर्थमहाराजांचे हे वाक्य श्रीदत्तमहाराजांनी दाखवले आणि श्रीगुळवणीमहाराजांची संमती घेतली.

वासुदेवनिवास या वास्तूचा अपूर्व, अलौकिक आणि उदात्त संकल्प श्रीगुरूमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांकडूनच लिहून घेतला आणि त्याप्रमाणे वास्तू निक्षेप केला.

श्रीवासुदेवनिवासचा ट्रस्ट होऊन जेव्हा ट्रस्ट डीड झाले त्यावेळी आपल्या हाताने त्यामध्ये लिहून ठेवले की, ''श्रीदत्तमहाराज आमच्यानंतर मुमुक्षुंना मार्गदर्शन करतील.'' हीच इच्छा १० वर्षापूर्वी वै.श्री.यशवंतराव वैद्यमास्तर यांनी बोलून दाखविली होती. असे करावे हे श्रीमहाराजांच्या मनांत निश्चित होते, तशी व्यवस्थाही त्यांनी करून ठेवली. पण वाच्यता करण्याचा स्वभाव नसल्याने बोलत नव्हते इतकेच.

परंतु ही गोष्ट श्रीगुरूमहाराज सूचकतेने वारंवार सुचवीत होते. वासुदेवनिवास या आश्रमाच्या स्थापनेच्या निमित्ताने समारंभ जो आयोजित केला तो आपल्या शान्तिसमारंभासारखा आयोजित केला होता. अगदी तीच पद्धती नि स्वरूप याही समारंभाचे ठेवले होते. तसेच यज्ञयाग, तसेच कार्यक्रम, तसाच समारंभ केला. सप्ताहभर कार्यक्रम करून शेवटी सत्कार समारंभ ठेवला होता. पत्रके काढली, पदाधिकारी नेमले, समिती स्थापन केली. इतकेच नव्हे तर अध्यक्षही म.म.दत्तो वामन पोतदारच होते.''

श्रीगुळवणीमहाराजांनी हजारो लोकांना शक्तिपातदीक्षा दिली. केवळ भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशात श्रीगुळवणीमहाराजांचे शिष्य आहेत. बहुतेक शिष्यांना या साधनेमुळे स्वतःचा आंतरिक विकास करून घेता आला आहे.

आपल्या निर्वाणसमयी श्रीगुळवणीमहाराजांनी या शक्तिपीठातर्फे दीक्षा देण्याचा अधिकार श्रीदत्तमहाराजांना दिला. श्रीदत्तमहाराजांनी पंचवीस वर्षांहून अधिक काळ या शक्तिपीठातर्फे असंख्य लोकांना शक्तिपात दीक्षा दिली आणि त्याप्रमाणे साधन करवून घेतले. स्वतः श्रीदत्तमहाराज हे मोठे वेदान्ती. न्याय, मीमांसा, महायोग, व्याकरणशास्त्र, साहित्य वगैरे शास्त्रांमध्येही त्यांनी पूर्णत्त्व प्राप्त करून घेतलेले होते. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांनी या शक्तिपीठाचे पीठाधीश्वर म्हणून केलेल्या कार्याला एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले. श्रीदत्तमहाराजांकडून वासुदेव निवास या शक्तिपीठाची दीक्षा घेतल्यामुळे आणि श्रीदत्तमहाराजांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे प्रकर्षाने स्वतःचा आंतरिक विकास करून घेता आला असे अनेक साधक सांगतात.

वासुदेवनिवास या पीठातर्फे दीक्षा देण्याचा अधिकार श्रीदत्तमहाराजांनी आपले अंतरंग शिष्य व ज्येष्ठ पुत्र डॉ.अशोकमहाराज कवीश्वर यांना दिलेला आहे व त्याप्रमाणे इ.स. १९९५ पासून या पीठातर्फे डॉ. अशोकमहाराज शक्तिपात दीक्षा विधिवत देत आले आहेत.

* शक्तिपात दीक्षा

वासुदेव निवास या शक्तिपीठातर्फे सद्गुरू जेव्हा शिष्याला दीक्षा देतात, तेव्हा शक्तिपात-योगसाधनेतील मार्गाप्रमाणे ते शिष्याच्या ठिकाणी शक्तिपात करतात. शक्तिपात याचा अर्थ सद्गुरूंनी शिष्याच्या ठिकाणी आपली शक्ती संक्रमित करणे आणि शिष्यामध्ये त्या शक्तीचा संचार करणे याचा उल्लेख वर आला आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर सद्गुरू शक्तिपात करतांना स्वतःची शक्ती वापरून शिष्यातील शक्तीजागृती करतात. त्यामुळे शिष्याला आध्यात्मिक विकास करून घेण्याची दिव्यप्रक्रिया प्राप्त होते. सद्गुरूंच्या सामर्थ्यामुळे शिष्यांच्या पापांचा मळ नाहीसा होतो आणि शिष्याचा आंतरिक विकास होऊन त्याला योग्य वेळी अनुभूती प्राप्त होतात.

श्रीदत्तमहाराज असे सांगतात की, ''श्रीकुंडलिनी विद्या म्हणजे शक्तिजागृती विद्या. ही विद्या केवळ गुरूकृपेनेच प्राप्त होणारी आहे. 'सा विद्या या विमुक्तये' असे शास्त्रकार सांगतात. या शास्त्रवचनेला अनुसरून श्रीकुंडलिनी विद्या मानवाला मुक्त करणारी विद्या आहे असे योगशास्त्र सांगते. भगवान दत्तात्रेय यांच्यापासून ही ज्ञानपरंपरा सुरू झाली. भगवान दत्तात्रेय हे 'गुरुणां गुरू' आहेत, 'जगद्गुरू' आहेत. तेच या विद्येची दीक्षा देतात. ही श्रीकुंडलिनी विद्या अद्वैत वेदान्ताची साक्षात्कार साधना आहे.''

श्रीदत्तमहाराज पुढे असे सांगतात की, ''ईश्वरार्पण बुध्दीने रहाणे, सदाचाराने वागणे आणि स्वधर्माचे आचरण निष्ठेने करणे हा या कुंडलिनी विद्येचा पाया आहे. जो साधक असे वागतो, त्याचे चित्त शुध्द होत जाते आणि या विद्येच्या ज्ञानाचा तो अधिकारी होतो. अशा साधकावर ईश्वरकृपा होते. ही कृपा म्हणजेच सद्गुरूंचा शक्तिपात अनुग्रह होय. सद्गुरूंचा शक्तिपात अनुग्रह झाला म्हणजे साधकाची अंतस्थ शक्ती जागृत होते. त्या जागृत झालेल्या शक्तीच्या प्रेरणेने साधकाचे साधन घडत जाते व साधकाची साधना सहजयोगाच्या स्वरूपांत होत जाते. सद्गुरूंच्या अनुग्रहामुळेच साधनेतील प्रतिबंध दूर होतात. साधकाचा देहभाव हळूहळू कमी कमी होत जातो. शेवटी साधकाचा देहात्मभाव नाहीसा होऊन साधकाला गुरूकृपेने 'अहं ब्रह्मास्मि' ही अवस्था प्राप्त होते. अशा प्रकारे कुंडलिनी विद्येमुळे साधकाला मोक्षप्राप्ती होते.

* सद्गुरूंचे सामर्थ्य आणि अधिकार

शक्तिपात योगमार्गातील तज्ज्ञ असे सांगतात की शक्तिपात मार्गाने साधकाचा जो आंतरिक विकास होतो त्याचे रहस्य म्हणजे सद्गुरूंचे सामर्थ्य व अधिकार आणि सद्गुरूंनी कृपावंत होऊन शिष्यावर केलेला अनुग्रह. दीक्षा देण्यासाठी पीठाधिष्ठीत गुरूंकडे स्वतःच्या साधनेने व तपाने तेवढ सामर्थ्य प्राप्त झालेले असावे लागते. तसेच दीक्षा देण्याचा अधिकार स्वतःच्या गुरूंकडून विधिवत मार्गाने मिळालेला असावा लागतो. दीक्षा देण्याचा अधिकार सद्गुरूंनी विधिवत प्रदान केलेला असेल तरच पीठाधिष्ठीत गुरूंनी दिलेली दीक्षा फलदायी ठरते आणि त्यांनी सांगितलेले साधन करून शिष्याला योग्य अनुभूती प्राप्त होऊ शकतात.

शक्तिपात दीक्षा देण्याचा अधिकार गुरूंकडून विधिवत मिळालेला नसेल तर दीक्षा फलदायी होत नाही आणि शिष्याला या दीक्षा विधीचा फारसा उपयोग होत नाही असा अनुभव इतरत्र आल्याचे अनेक साधक सांगतात. म्हणूनच वासुदेव निवास या शक्तिपीठाकडे पुन्हा दीक्षेसाठी आल्याचा किंवा शक्तिपात साधनेबाबत मार्गदर्शनासाठी आल्याचा आवर्जून उल्लेखही अनेक साधक करीत असतात.

श्रीलोकनाथतीर्थ-महाराज याबाबत म्हणतात, ''शक्तिपात दीक्षा हा ज्ञान सांगण्याचा विषय नाही तर शक्ती देण्याची ही बाब आहे. म्हणूनच सांगण्याने भागत नाही. ही सांगण्याची किंवा ऐकण्याची गोष्ट नसून ही देण्याची व घेण्याची गोष्ट आहे. म्हणूनच ज्याला प्राप्त झाले तोच देऊ शकतो हे उघड आहे.''

या बाबतीत सद्गुरू श्रीगुळवणीमहाराजांनी एका पत्रात आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत. ''परमार्थ मार्गात प्रगती होण्याकरता शक्तिसंचाराचा लाभ गुरूपरंपरेनेच होतो. गुरूपरंपरेची शक्तीच हे कार्य करते. माझ्या आत्तापर्यंतच्या अनुभवावरून हे सामर्थ्य व्यक्तीचे नसून संप्रदायाचे आहे. साधकाच्या पूर्व संस्कारानुसार शक्ती कमीअधिक प्रमाणात कार्यशील होऊन पुढील प्रगती होत असते. अर्थात् यामध्ये गुरूला अभिमान वाटण्यासारखी कोणती गोष्ट आहे ते समजत नाही. ही संप्रदायशक्ती ज्या शरीराच्या द्वारा आपणांस मिळते त्याची निष्कपट भावाने परिचर्या करणे हे शिष्याचे कर्तव्य आहे.''

* साधनेतील प्रतिबंध

साधकाच्या साधनेत अनेक प्रतिबंध निर्माण होत असतात. प्रतिबंध म्हणजे अडचणी, विरोध, असहकार्य वगैरे. शारीरिक प्रतिबंध म्हणजे झोप, आजारपण, सत्त्वगुणाची कमतरता, रजोगुण व तमोगुणांचा अडथळा वगैरे. अंतःकरणांतील प्रतिबंध म्हणजे मनांत अस्थिरता व चंचलता निर्माण होणे, बुद्धीमध्ये संशय येणे, संसारसुखाच्या वासना वाढणे, बुद्धीला जडत्व येणे, गुरूभक्ती न वाढणे वगैरे. इतर प्रतिबंध म्हणजे कुटुंबीय व संबंधितांनी साधनेला विरोध होणे किंवा साधनेला त्यांचे सहकार्य न मिळणे. अनपेक्षित घटना वा अपघात घडून साधनेत विक्षेप येणे आणि साधना नियमित व सातत्याने न घडणे हेही साधनेतील प्रतिबंधच आहेत.

श्रीदत्तमहाराज सांगत असत की, गुरूकृपेनेच साधनेतील हे प्रतिबंध दूर होतात. हे प्रतिबंध केवळ आपल्या प्रयत्नाने दूर होऊ शकत नाहीत. समर्थ सद्गुरूकडून विधिवत दीक्षा घेतली असेल व सद्गुरूंचे मार्गदर्शन असेल तरच हे प्रतिबंध दूर होऊ शकतात.

म्हणूनच जाणकार असे सांगतात की दीक्षा देण्याचा अधिकार ज्यांना विधिवत प्राप्त असेल अशी सद्गुरूंकडूनच दीक्षा घ्यावी आणि त्या सद्गुरूंचे सतत मार्गदर्शन घेत रहावे. तसेच सद्गुरूंची परिचर्या वा सेवा करून त्यांची कृपा संपादन करावी. गुरूभक्ती प्रयत्नपूर्वक सतत वाढवीत रहावे. तरच शक्तिपातदीक्षा फलदायी होते.

* शक्तिपात दीक्षेचे चार प्रकार

दीक्षा या शब्दांत दोन अक्षरे आहेत, 'दी' आणि 'क्षा'. ज्या क्रियेच्या योगाने शिष्याला सद्गुरूंकडून दिव्यज्ञान होते आणि त्याच्या पापाचा क्षय होतो. त्या क्रियेला दीक्षा असे म्हणतात असे आगमशास्त्रांत व मंत्रशास्त्रांत सांगितले आहे.

श्रीगुरूंपासून दीक्षा प्राप्त झाली की त्या दीक्षेच्या योगाने कुंडलिनी शक्ती जागृत होते आणि ती शक्तीच सर्व साधन आपोआप करून घेते असे कुलार्णव-तंत्र तथा वायवीय-संहिता यामध्ये सांगितले आहे.

अध्यात्मशास्त्र जाणणारे विद्वान दीक्षेचे अनेक प्रकार सांगतात. तथापि ब्रह्मदेवाने दीक्षेचे जे चार प्रकार सांगितले आहेत, ते प्रकारच प्रमुख शास्त्रकारांनी मान्य केले आहेत. हेच चार मार्ग शक्तिपात-योगमार्गात दीक्षा देण्यासाठी योजले जातात.

हे चार मार्ग म्हणजे सद्गुरूंनी संकल्पाने, वाणीने, दृष्टीने आणि स्पर्शाने शक्तिपात दीक्षा देऊन शिष्याची शक्तिजागृती करणे. त्याप्रमाणे दीक्षाविधीला संकल्प दीक्षा (मानसिक दीक्षा), वाचिक दीक्षा (मंत्रदीक्षा), चाक्षुषी दीक्षा आणि स्पर्शदीक्षा अशी नांवे मिळालेली आहेत.

वास्तविकरीत्या या चारही दीक्षा प्रकारात शिष्याची शक्तीजागृती सद्गुरू आपल्या संकल्पानेच करीत असतात. सद्गुरूंची इच्छा असते, तेव्हाच ते शिष्याची शक्तिजागृती व्हावी असा संकल्प करतात आणि शिष्यामध्ये शक्तीचा

संचार करतात. म्हणून हे चारही प्रकार संकल्प दीक्षा किंवा मानसिक दीक्षाच आहेत असे म्हणता येईल. असे असले तरीही दीक्षा देण्याचे स्थान व दीक्षा देण्याची विधिक्रिया काहीशी वेगवेगळी असते म्हणून हे चार प्रकार वेगळे सांगितले जातात. या चार प्रकारांची माहिती थोडक्यात पुढे दिली आहे.

१. संकल्प दीक्षा (मानसिक दीक्षा)

जेव्हा सद्गुरूंकडून दीक्षा घ्यावी व शक्तिजागृती व्हावी अशी शिष्याची इच्छा असते तेव्हा तो सद्गुरूंना तशी प्रार्थना करतो. सद्गुरूंची इच्छा झाली की ते शिष्याची शक्तिजागृती करण्याचा संकल्प करतात आणि मनाने शिष्याची शक्तिजागृती होते. सद्गुरूंना प्राप्त झालेल्या सामर्थ्यामुळेच व विधिवत तो अधिकार प्रदान झालेला असल्यामुळेच ही दीक्षा संपन्न होते आणि शिष्याची शक्तिजागृती प्रत्यक्षात होऊ शकते.

संकल्प दीक्षेसाठी सद्गुरू आणि शिष्य या दोघांचे एकत्र येणे आवश्यक असते. दोघेही वेगवेगळ्या ठिकाणी असले तरी सद्गुरूंचा संकल्प झाला की संकल्पदीक्षा मनानेच संपन्न होते.

२. वाचिक दीक्षा (मंत्रदीक्षा)

वाचिक दीक्षा (मंत्रदीक्षा)या दुसऱ्या प्रकारात दीक्षा देतांना सद्गुरू मंत्राचे वाणीने उच्चारण करतात व त्या उच्चारणामुळे शिष्याची शक्तिजागृती होते. सद्गुरूंना मंत्रप्राप्ती असली म्हणजे ते स्वतः मंत्रमूर्ती होतात आणि शिष्यावर कृपा करून त्याच्या ठिकाणी मंत्रशक्तीचे संक्रमण करू शकतात. त्यामुळे मंत्रप्रतिपाद्य कुंडलिनीशक्ती जागृत होते. त्यासाठी सद्गुरू वाणीच्या योगाने मंत्र, उपदेश वा उच्चारण करतात आणि सद्गुरूंच्या आत्मबलाने मंत्रदीक्षा संपन्न होते.

या ठिकाणी सद्गुरू मंत्राचे उच्चारण मौखिकवाणीने (तोंडाने स्पष्ट शब्दांत) करतात असे नाही. सद्गुरू मंत्राचा उच्चार मध्यमा वाणीने किंवा परा व पश्यन्ती वाणीने करू शकतात व त्यामुळे मंत्रदीक्षा संपन्न होऊ शकते.

ज्या अनुष्ठानामुळे मंत्रशक्तीचे संक्रमण करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते त्या अनुष्ठानाचा विधी महर्षी व्यासांनी एका पुराणात विशद केला आहे. या

अनुष्ठानामुळे मंत्रप्रतिपाद्य कुंडलिनीशक्ती जागृत करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाल्याचा अनेक साधकांना अनुभवही आला आहे.

अनेकजणांना अनुभव येतो की सद्गुरूंनी मंत्राचे उच्चारण करताच शिष्याचा मनोमळ नाहीसा होतो, पापे नाहीशी होतात आणि मंत्रप्रतिपाद्य कुंडलिनी शक्ती शिष्याला व्यापून टाकते.

मंत्रदीक्षेच्या वेळेला शिष्याची गात्रे कंप पावू लागतात किंवा त्या शिष्याचे शरीर, मन व प्राण प्रभावित होऊन तो शिष्य भावसमाधीत जाऊ शकतो.

मंत्रदीक्षेचे फळ संसारातील भोग प्राप्त होणे हेही आहे आणि मोक्ष प्राप्त होणे हेही आहे. म्हणूनच संसारातील सुखे हवी असणाऱ्या साधकांना या मंत्रदीक्षेचे फळ म्हणून संसारातील भोग प्राप्त होतात आणि निष्काम बुद्धीने परमार्थ करू इच्छिणाऱ्या साधकांना मोक्षही मिळू शकतो. म्हणूनच मंत्रदीक्षा ही संसारसुख व पारमार्थिक मोक्ष दोन्हीही देऊ शकते असे शास्त्रकार सांगतात.

श्रीदत्तमहाराजांकडे बहुसंख्य लोक मनांत संसारातील कामना ठेवूनच येत असत. श्रीदत्तमहाराजांनी मंत्रदीक्षा देऊन अशा साधकांच्या सांसारीक अडचणींचे निवारणही केले आहे आणि त्यांना संसार सुखेही प्राप्त करून दिलेली आहेत. त्याचप्रमाणे निष्काम परमार्थ करू पहाणाऱ्या साधकांना श्रीदत्तमहाराजांनी मंत्रदीक्षा देऊन उच्च आध्यात्मिक अनुभूती दिल्या आहेत हे सर्वांना माहिती आहेच.

३. चाक्षुषी दीक्षा

चाक्षुषी दीक्षा हा दीक्षेचा तिसरा प्रकार आहे. चाक्षुषी दीक्षा शक्तिजागृतीचा अत्यंत प्रभावी प्रकार आहे असा सर्वच साधकांचा अनुभव आहे.

चाक्षुषी दीक्षा देतांना सद्गुरू आपल्या शिष्याकडे कृपाकटाक्ष टाकतात आणि त्यामुळे शिष्याची शक्तिजागृती होते. सामर्थ्यवान सद्गुरूंनी शिष्याकडे दिव्य दृष्टीकटाक्ष टाकला की संपन्न होणारी ही दीक्षा आहे. या दीक्षेचे वैशिष्ट्य असे की सद्गुरूंचा कृपाकटाक्ष शिष्यावर पडताच त्याची शक्तिजागृती होऊन क्रिया सुरू होऊ लागतात.

अनेक वेळा सद्गुरू कृपावंत होऊन अधिकारी शिष्यांना आपणहून चाक्षुषी दीक्षा देतात. शिष्याने चाक्षुषी दीक्षेची इच्छा केलेली नसते. किंबहुना त्या

शिष्याला चाक्षुषी दीक्षा म्हणजे काय हेही माहिती नसते. असे असले तरीही सद्गुरू कृपावंत झाले की आपणहून अधिकारी शिष्याला अशी चाक्षुषी दीक्षा देतात आणि शिष्याची शक्तिजागृती होऊन क्रिया सुरू होतात. अनेक जाणकार असे सांगतात की अधिकारी शिष्य भेटावेत असे सद्गुरूंना नेहमीच वाटत असते. ते स्वतःच अधिकारी शिष्यांचा शोध घेत असतात. पूर्वसुकृत असलेला आणि शुद्ध अंतःकरण असलेला योग्य शिष्य सापडला की त्यांना आनंद होतो. प्रसन्न होऊन ते त्या शिष्यावर कृपा करतात व चाक्षुषी दीक्षा देऊन त्याचे अध्यात्मजीवन उजळून टाकतात.

४. स्पर्शदीक्षा

स्पर्शदीक्षा या चौथ्या प्रकारात सामर्थ्यवान सद्गुरू आपल्या शिष्याच्या देहाला स्पर्श करतात आणि दीक्षाविधी संपन्न होतो. शिष्याची शक्तिजागृती होते व क्रियाही सुरू होतात.

शिष्याच्या जीभेवर गुरूने स्पर्श करून अक्षरे लिहिणे, शिष्याच्या मस्तकावर सद्गुरूने दोन्ही हात ठेवणे किंवा शिष्याच्या देहाला बोटाने ओझरता स्पर्श करणे अशा वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्शांनीही स्पर्शदीक्षा संपन्न होते.

अनेक संतमहात्म्यांनी या मार्गाने शिष्याची शक्तिजागृती केल्याची उदाहरणे आहेत. श्रीरामकृष्ण परमहंसांनी अनेक अंतरंग शिष्यांना स्पर्श करून स्पर्शदीक्षा दिली व शक्तिजागृती केली असे त्यांच्या चरित्रात लिहिलेले आहे.

ब्रह्मदेवाने कथन केलेले दीक्षेचे हे चार प्रमुख प्रकार सर्व मार्गातच योजले जातात. वेदान्त, मंत्र, तंत्र आणि भक्तीमार्ग अशा विविध मार्गात जे वेगवेगळे संप्रदाय आहेत, त्या सर्व संप्रदायात सद्गुरू शिष्याला यापैकीच एखाद्या मार्गाने दीक्षा देतात आणि शिष्याची शक्तिजागृती करतात. वेगवेगळ्या उपासनामार्गात दीक्षेचे स्थान, दीक्षेची वेळ व शिष्याचा अधिकार आणि उपासना प्रकार वेगवेगळे असतात. त्यामुळे शिष्याची शक्तिजागृती करण्याची क्रिया व दीक्षाविधी वेगवेगळा असतो. त्याप्रमाणे या दीक्षांना शास्त्रकारांनी वेगवेगळी नांवे दिलेली आहेत. त्याप्रमाणे स्मार्ती दीक्षा, होत्री दीक्षा, अभिषेकी दीक्षा, क्रियावती दीक्षा, कलावती दीक्षा, वेधमयी दीक्षा, ज्ञानवती दीक्षा, वर्णमयी दीक्षा, कलात्मा दीक्षा, आणवी दीक्षा, शांभवी दीक्षा, योगदीक्षा वगैरे अनेक

नावे सांगितली जातात.

वेदान्तमार्ग, भक्तीमार्ग, योगमार्ग, मंत्र व तंत्र मार्ग वगैरे सर्व मार्गात सद्गुरू शिष्याची शक्तिजागृती करतात. पण प्रत्येक मार्गात त्या शक्तीला वेगवेगळी नांवे दिलेली आहेत. योगमार्गात त्या शक्तीला 'कुंडलिनी शक्ती' म्हणतात. भक्तीमार्गात 'आल्हादिनी शक्ती' असे म्हणतात. वेदान्त मार्गात या शक्तीला 'चितिशक्ती' किंवा 'आत्मसत्ता' असे नांव आहे. तंत्र व मंत्र मार्गात या शक्तीला 'महामाया आद्यशक्ती' किंवा 'कुलकुंडलिनी शक्ती' अशी नांवे दिलेली आहेत.

* शक्तिपात दीक्षा कोणी घ्यावी

शक्तिपात दीक्षा कोणालाही घेता येते. जात, लिंग, वय, अवस्था, वर्ण, आश्रम वगैरेबाबत कोणतीही बंधने नाहीत. कोणत्याही जातीमधील स्त्री किंवा पुरुष दीक्षा घेऊ शकतात. बाल, तरुण, वृद्ध कोणत्याही वयांतील व्यक्ती दीक्षा घेऊ शकतात. आरोग्यसंपन्न व्यक्ती किंवा रोगग्रस्त व्यक्तीने दीक्षा घेतली तरी फायदाच होतो. चारवर्णांपैकी कोणत्याही वर्णाचा शिष्य शक्तिपात दीक्षा घेऊ शकतो. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम किंवा संन्यासाश्रम या चारपैकी कोणत्याही आश्रमातील व्यक्ती शक्तिपात दीक्षा घेऊ शकते. एवढेच नव्हे तर चार वर्ण व चार आश्रम यांच्या अतीत असलेले संतमहात्मेही शक्तिपातदीक्षा घेऊ शकतात. अशा महात्म्यांना 'अतिवर्णाश्रमी' असे नाव शास्त्रकारांनी दिलेले आहे. 'अतिवर्णाश्रमी' म्हणजे वर्ण व आश्रम यांच्या अतीत असलेले महात्मे. अशा महात्म्यांनीही शक्तिपात दीक्षा घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत.

या बाबतीत श्रीदत्तमहाराजांनी पुढील उद्गार काढले आहेत. ''या संप्रदायात चारही वर्णांचे व चारही आश्रमांचे भक्त आहेत, इतरही अनेक प्रकारचे भक्त आहेत. अनेक जीवन्मुक्त पुरुष आहेत. कार्तवीर्य, आयु यांच्यासारखे क्षत्रिय कुळातलेही आहेत. परशुराम- वसिष्ठ यांच्यासारखे ब्राह्मतेजाने चमकणारे गगगगगआहेत. श्रीएकनाथ श्रीजनार्दन यांच्यासारखे अकर्तात्मबोध संपादन केलेले कर्मयोगी गृहस्थ यात आहेत. श्रीमहाराजांसारखे सर्व संकल्प संन्यासी, योगारूढ संन्यासी पुरुषही यात आहेत. योगमार्गातील महत्त्वाचा समजला जाणारा नाथपंथ या संप्रदायाशी संलग्न आहे. चौसष्ट

योगिनींचा संबंधही या संप्रदायाशी आहे. किंबहुना शष्यामध्ये शक्तिजागृती झाली म्हणजे शिष्याचे शरीर, प्राण व मन या सर्वांमध्ये परिवर्तन होते. शिष्य वेदान्ती असो, भक्त असो, योगी असो, मंत्रमार्गी असो किंवा तंत्रमार्गी असो किंवा यापैकी काहीही न करणारा असो. शक्तिजागृती झाल्यावर शिष्याच्या देहामध्ये, मनामध्ये व प्राणामध्ये परिवर्तन होते आणि काही क्रिया सुरू होतात. त्यांना शक्तिजागृतीची लक्षणे असे म्हणतात.

अनेक साधकांमध्ये देह, प्राण आणि मन या तिन्ही पातळींवर शक्तिजागृतीच्या क्रिया किंवा लक्षणे दिसतात. परंतु काही साधकांमध्ये देहाच्या पातळीवर शक्तिजागृतीची कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. त्या साधकांच्या केवळ मनाच्या व प्राणाच्या पातळीवरच क्रिया होऊन केवळ त्या पातळीवरच शक्तिजागृतीची लक्षणे प्रगट होतात.

देहाच्या पातळीवर शक्तिजागृतीची लक्षणे प्रगट झालीच पाहिजेत असे म्हणणे योग्य ठरणार नाही. कारण अध्यात्ममार्गात देहाच्या पातळीवर होणाऱ्या क्रियांपेक्षा तितक्या महत्त्वाच्या मानल्या जात नाहीत. शारीरिक क्रियांपेक्षाही जास्त महत्त्व मानसिक पातळीवर व प्राणांच्या पातळीवर होणाऱ्या क्रियांना जास्त असते. साधकाच्या मानसिक पातळीवर ज्या क्रिया होतात त्या क्रियांमुळेच साधकामध्ये खरे परिवर्तन होत असते. अध्यात्ममार्गात शारीरिक परिवर्तनापेक्षा मानसिक परिवर्तन जास्त महत्त्वाचे असते हे उघडच आहे. अध्यात्मसाधन हा मानसिक प्रवास आहे. त्यामुळे आध्यात्मिक विकासाचा निकष म्हणून साधकाचा आंतरिक विकास किती झाला आहे हेच पाहिले जाते.

श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराज व श्रीज्ञानदेव आंतरिक संन्यास जास्त महत्त्वाचा मानतात आणि केवळ बाह्यसंन्यास हे अवडंबर आहे असे सांगतात यांतील रहस्य हेच आहे. भगवान व्यास यांनीही बाह्यपूजेपेक्षा अंतःपूजा जास्त महत्त्वाची आहे असे याच भूमिकेतून सांगितले आहे. अंतःपूजा म्हणजेच आंतरिक पूजा - म्हणजेच साधकामध्ये मानसिक पातळीवर दैवीगुण विकसित होणे.

म्हणूनच शक्तिजागृतीमुळे शरीरांत क्रिया होण्यापेक्षा मन व प्राण या पातळीवर होणाऱ्या क्रिया जास्त महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत असे श्रीदत्तमहाराज नेहमी सांगत असत. शरीरपातळीवर क्रिया न होता मानसिक

पातळीवर क्रिया होणे अधिक फलदायी व मोक्षाकडे लौकर नेणारे असते असा अनुभव अनेक जाणकार सांगतात.

परमार्थमार्गात आंतरिक विकास करून घ्यायचा असेल तर साधकाच्या शारीरिक क्रिया कमीकमी होत गेल्या पाहिजेत आणि मानसिक पातळीवरील क्रिया वाढत गेल्या पाहिजेत. तसे झाले तरच साधकाचा आंतरिक विकास होत आहे असे खऱ्या अर्थाने म्हणता येईल. केवळ शारीरिक क्रिया होत असतील आणि साधकांत दैवी गुण विकसित होत नसतील तर त्या साधकाला परमार्थमार्गात अजून बरेच पुढे जायचे आहे असेच म्हणावे लागेल.

❊ शारीरिक क्रिया

देहाच्या पातळीवर होणाऱ्या क्रिया सामान्यपणे पुढीलप्रमाणे दिसतात - शरीरात कंप निर्माण होणे, शरीर डोलणे, शरीर चक्राकार फिरणे, शरीराला आळोखेपिळोखे दिले जाणे, शरीर थरथरणे, शरीरावर रोमांच येणे, शरीराच्या काही भागात मुंग्या आल्यासारखे वाटणे, मेरूदंड ताठ होणे, खांदे आवळले जाणे, खांदे मागे जाणे वगैरे.

मानसिक पातळीवर होणारे बदल म्हणजे शिष्याच्या मनातील संकल्प व विकल्प कमी होतात. त्याच्या इच्छा कमी कमी होऊ लागतात. एक वेगळा उत्साह आणि स्फुर्ती प्राप्त होते. काही वेळा साधक मानसिक पातळीवर झालेल्या बदलांमुळे त्याचे शरीर योगक्रिया, योगासने करू लागते किंवा प्राणायाम करू लागते.

काही वेळा शिष्य विलक्षण आनंदाचा किंवा धुंदीचा अनुभव घेतो. त्याचे परिणाम देहाच्या पातळीवर झालेले दिसतात. तो गाऊ लागतो किंवा ओंकार म्हणू लागतो. आनंदाने बेभान होऊन काही वेळा तो साधक नाचू लागतो, बेडुक उड्या मारू लागतो. काही वेळा तो रडू लागतो. यापैकी कोणत्या क्रिया कोणाला होतील हे सांगणे अवघड असते.

❊ मानसिक पातळीवरील क्रिया

मनाच्या पातळीवर होणाऱ्या क्रिया म्हणजे मन सात्त्विक होत जाणे, धुंदी व आनंद निर्माण होणे, आत्मविश्वास निर्माण होणे वगैरे. काही साधकांचे मन

अंतर्मुख होते आणि विषयवासना कमी होत जातात. कामक्रोधाच्या भावना कमी होत जातात. तो साधक शांत होतो.

काही वेळा त्याच्या मनांत एकप्रकारचा शून्य अनुभव येतो. काही वेळा मन एकाग्र होते आणि बाहेरच्या जगाचे स्मरण अथवा जाणीव कमी होते. काही वेळा उलटही होते. शिष्याच्या मनांत खूप निराशा निर्माण होते. त्याला जीवन संपवावे असेही वाटू लागते. काही शिष्य आत्महत्या करण्याचा प्रयत्नही करतात. परंतु असे काही मनांत आले तरी साधकाने घाबरू नये. समर्थ सद्गुरूंचे मार्गदर्शन असले म्हणजे ही लक्षणे आपोआप कमी होत जातात व साधकामध्ये दैवी गुण विकसित होत जातात.

काही शिष्यांच्या शरीरावर काहीच क्रिया दिसत नाहीत. पण तो शिष्य ध्यानावस्थेत जातो. त्याचे शरीर स्तब्ध होते, निस्पंद होते, उत्तम ध्यान लागते आणि शिष्याला परम आनंदाचा अनुभव येतो.

काही वेळा ध्यानावस्थेत असतांना साधकाला अनेक देवदेवतांची दर्शने होतात. काही वेळा त्या देवतांचे बोलणेही तो ऐकू शकतो. बहुतेक सर्व साधकांना दिव्य सुगंध मिळतो आणि एक प्रकारची धुंदीची अवस्था येते.

काही शिष्य प्रगाढ ध्यानात जाऊन आत्मतत्त्वात बुडून जातात किंवा आत्मानुभव घेऊ शकतात. अशा ध्यानावस्थेमध्ये जे सुख मिळते त्याला महासुख म्हणतात. या सुखाची कल्पना मनाने करता येत नाही किंवा वाणीने त्या सुखाचे वर्णनही करता येत नाही. ते फक्त स्वतः अनुभवता येते.

ज्या साधकांना मानसिक क्रिया जास्त होतात त्यांच्या शरीरावर व वागण्यावर त्या क्रियांचा आपोआप परिणाम झालेला दिसतो. त्यांची वाणी कोमल होते, दृष्टी अंतर्मुख होते आणि अंतःकरण प्रेमाने भरून जाते, तो प्रेममूर्ती होतो. तो इतरांशी प्रेमळपणे वागायला लागतो. साधकाचे मन सात्त्विक होत जाते. ती मनाची सात्त्विकता त्याच्या वागण्यांतून इतरांना दिसून येते. त्याचे वागणे, बोलणे सात्त्विक होत जाते. सर्वांशी निरपेक्ष प्रेमाने वागू लागतात. ज्या शिष्यांना हे अनुभव येतात ते फारच मोठे भाग्यवान समजले पाहिजेत.

काही वेळा शिष्याच्या परावाणीत ओंकार स्फुरतो आणि पश्यन्ती व मध्यमा यांच्यातून जाऊन तो मुखाने व्यक्त होऊ लागतो. काही वेळा साधकाला

वेगवेगळे नाद ऐकू येतात. आकाशातून वेगवेगळे दिव्य मधुर स्वर ऐकू येतात. भजने किंवा आरत्या ऐकू येतात. पण त्यातील शब्द कळत नाहीत. केवळ स्वर ऐकू येतात. ते इतके मोहक असतात की त्याचे मन मुग्ध होऊन जाते आणि एक वेगळाच आनंद त्याच्या मनांत निर्माण होतो. श्रीकृष्णाच्या मुरलीचे सूर ऐकतांना जसा गोपींना आनंद झाला तसा आनंदही काही साधकांना हे दिव्य स्वर ऐकतांना होतो. म्हणूनच त्या स्वरांना नादब्रह्म असेही म्हटले जाते.

* प्राणपातळीवरील क्रिया

प्राणपातळीवर शक्तिजागृतीमुळे जे बदल होतात त्याचे तपशीलवार वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत केलेले आहे. वासुदेव निवास या शक्तिपीठाची विधिवत दीक्षा घेतलेल्या अनेक भक्तांना प्राणपातळीवर असेच अनुभव आल्याचे सांगितले जाते.

* साधन नियमितपणे करण्याचे महत्त्व

शक्तिजागृती झाली म्हणजे शिष्याचा आध्यात्मिक विकास पूर्ण झाला आणि मुक्त झाला असे नाही. शक्तिजागृती होणे ही सुरुवात आहे. गुरू शक्तिजागृती करतात आणि त्यानंतर शिष्याचे जसे संस्कार असतात त्याप्रमाणे गुरू वेदान्त, योगमार्ग, कर्ममार्ग किंवा भक्तीमार्ग यातील अनुरूप साधन शिष्याला देतात व ते साधन नियमितपणे करीत राहिले पाहिजे तरच शिष्य पूर्णत्त्वाला पोचू शकतो.

शक्तिजागृतीमुळे शिष्याचे शरीर, प्राण व मन यामध्ये परिवर्तन होते हे खरे आहे. परंतु तेवढ्याने भागत नाही. त्यानंतर गुरूने कृपावंत होऊन जे साधन दिले ते शिष्याने नियमितपणे दीर्घकाळ करावे लागते. तरच शिष्याचा विकास होत राहून तो शेवटी परमात्म्याशी ऐक्य पाहू शकतो असा शिष्यच जीवनमुक्तीची अवस्था अनुभवू शकतो.

शरीर, मन व प्राण या पातळ्यांवर वेगवेगळ्या क्रिया होतात हे खरेच आहे. परंतु कोणाला कोणत्या क्रिया होतील, किती काळ होतील आणि तो साधन नियमितपणे करून मुक्तीच्या अवस्थेला केव्हा पोचेल हे सांगणे अवघड असते. कारण ते अनेक घटकांवर अवलंबून असते. गुरूची कृपा, शिष्याच्या

गुरूभक्तीची उत्कटता, शिष्याचे पूर्वसंस्कार, शिष्याची पूर्वपुण्याई आणि पापे (दुष्कृते किंवा दुरिते), दीक्षेचा काळ, दीक्षेची जागा, शिष्याची आध्यात्मिक पात्रता वगैरे. त्याप्रमाणे साधन किती काळ करावे लागेल व साधकाचा आध्यात्मिक विकास किती काळात होईल हे ठरते.

गुरूभक्ती जेवढी उत्कट असेल, शिष्याची गुरूवर जितकी श्रद्धा असेल तितका शिष्याचा आंतरिक विकास लवकर होतो आणि त्याला दिव्य आंतरिक अनुभव येतात.

* प्रपंच व परमार्थ यांची सांगड

विशेष म्हणजे शक्तिजागृतीमुळे पुष्कळ वेळा शिष्याची सांसारिक कामेही त्याच्या मनाप्रमाणे होतात आणि त्याला व्यावहारिक जगात अनपेक्षित यशही मिळू शकते. गुरूकृपेनेच प्रपंच व परमार्थ यांची यशस्वी सांगड घालणे साधकाला शक्य होत असते. म्हणूनच जाणकार असे सांगतात की आर्त व अर्थार्थी शिष्य आहेत त्यांनी आपल्या व्यावहारिक अडचणी व प्रतिबंध सद्गुरूंना निवेदन कराव्यात व त्याचे सहाय्य मिळावे यासाठी प्रार्थना करावी.

श्रीदत्तमहाराज सांगत असत की सद्गुरूंच्या सामर्थ्यावर पूर्ण श्रद्धा असेल व गुरूभक्ती तेवढी उत्कट असेल तर विपरीत प्रारब्धाचाही परिहार होतो, असंभव देखील शक्य होते आणि प्रत्यक्षात तसे घडून येते. श्रीदत्तमहाराज सांगत असत की गुरूचरित्रांतील अनेक कथांतून भक्तीमुळे विपरीत प्रारब्धाचा कसा परिहार होतो हेच दाखवलेले आहे आणि भक्ती व श्रद्धा या अंतरंग साधनांचे महत्त्व विशद केलेले आहे.

श्रीदत्तमहाराज असेही सांगत असत की साधकाने सकाम भक्ती करणे ही भक्तीची सुरुवात आहे. सकाम भक्तीच्या अवस्थेतून साधकाने पुढे गेले पाहिजे आणि निष्काम भक्तीची अवस्था प्राप्त करून घेतली पाहिजे. सुदामा, प्रल्हादजी यांच्या निष्काम भक्ती जीवनमुक्त असलेला आदर्श श्रीदत्तमहाराज साधकांपुढे नेहमीच ठेवत असत हेही लक्षांत घेण्यासारखे आहे.

* श्रीगुळवणीमहाराजांचे मार्गदर्शन

साधकाने शक्तिपात मार्गात प्रगति कशी करून घ्यावी यासाठी श्रीगुळवणीमहाराजांनी केलेले मार्गदर्शन वासुदेव निवास या शक्तिपीठाने प्रसिद्ध



श्रीदत्तमहाराज - अभयदान



डॉ.अशोकमहाराज

वासुदेवनिवासमध्ये श्रीदेवीभागवताचे निरूपण करतांना



श्रीवासुदेवनिवासमध्ये

सौ.ताईमहाराज, सौ. आईसाहेब

केलेल्या अनेक पुस्तकांमध्ये आणि नियतकालिकांमध्ये ठिकठिकाणी प्रसिद्ध आहे. त्याचा सारांश येथे थोडक्यात दिला आहे.

श्रीगुळवणीमहाराज सांगत, ''शक्तिपात साधना केवळ गुरूकृपेने चालणारी साधना आहे. ही साधना मिळाली ही गुरूकृपा आहेच. परंतु साधकाची अवस्था आणि त्याने केलेली साधना याप्रमाणे गुरूकृपा वाढत जाणारी असते. म्हणून गुरूकृपा वाढीसाठी आपण स्वतः काय केले पाहिजे याचा साधकाने विचार करावा. वैदिकधर्माचे आचरण करणे आणि आचारधर्म पाळणे यामुळेच शुचिता निर्माण होते आणि शक्ती साधकाचा आंतरिक विकास घडवून आणू शकते. म्हणूनच वैदिकधर्माचे आचरण साधकाला कटाक्षाने पाळले पाहिजे. तसेच यमनियमरूपी धर्म आचरणांत आणल्याशिवाय साधकाला आंतरिक शुचिता राखता येणार नाही हेही साधकाने लक्षात ठेवले पाहिजे.''

श्रीगुळवणीमहाराजांना नुसती शक्तिपात दीक्षा मान्य नव्हती असे त्यांनी अनेक वेळा बोलून दाखविले आहे. साधकाने बैठक नियमितपणे केली पाहिजे हे श्रीगुरूमहाराज आवर्जून सांगत. ''बैठकीला बसल्यावर स्वतः काही करू नका शक्ती सर्व करेल'' असेही ते निक्षून सांगत. परंतु बैठकी व्यतिरिक्त उरलेल्या दिवसभराच्या व्यवहारात साधकाचे आचारविचार कसे असावेत व आहार विषयक कोणते निर्बंध त्याने पाळावेत याबद्दल श्रीगुळवणीमहाराजांनी विस्तृत मार्गदर्शन केले.

अद्वैतवेदान्ताची दृष्टी ठेवून आणि सदाचाराने वागून साधकाने श्रुति, स्मृति, पुराणोक्त आचारधर्म पूर्णतया पालन करावा आणि पारंपारिक नीतिमूल्ये शिरोधार्य मानावी असेच श्रीगुरूमहाराज सांगत. यामुळे येणारी आंतरिक शुचिता आणि गुरूभक्ती जितकी वरच्या पातळीवर जाईल तेवढा साधकाचा विकास होत जाईल असे श्रीगुरूमहाराज सतत सांगत असत.

एका साधकाने श्रीगुळवणीमहाराजांना असे म्हटले होते की गुरूचरित्रातील आचारधर्म आणि परंपरेने चालत आलेले आहारविषयक निर्बंध आजच्या काळाला तर्कसंगत वाटत नाहीत. तेव्हा श्रीगुरूमहाराजांनी स्पष्टपणे सांगितले

होते, **''प्रवाहाच्या विरूद्ध पोहणे हाच पुरुषार्थ आहे. प्रवाहाबरोबर वाहवत जाणे याला काही पुरुषार्थ म्हणत नाहीत.'' पुढे ते म्हणाले, ''नुसती शक्तिपातदीक्षा आपल्याकडे नाही. शक्तिपातदीक्षा तु वेदान्तवाक्यसहिता।''**

* आहारशुद्धी, विचारशुद्धी, तत्त्वशुद्धी, चित्तशुद्धी

हे सांगतांना श्रीगुळवणीमहाराजांना असे अभिप्रेत होते की शक्तिपातदीक्षा घेतलेल्या शिष्यांना वेदान्त ज्ञान असणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे स्वतःचे आचरण शुद्ध ठेवणे त्याहून अधिक आवश्यक आहे.

कुंडलिनी योगातील एक थोर अधिकारी श्रीपूर्णानंदतीर्थ 'ज्ञानसुधा' या ग्रंथात असे सांगतात की प्रत्येक साधकाला आहारशुद्धी, विचारशुद्धी, तत्त्वशुद्धी, चित्तशुद्धी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. आहारशुद्धी म्हणजे सात्त्विक आहार घेणे होय. विचारशुद्धी म्हणजे सदाचाराने वागणे आणि सत्संग नियमितपणे करणे. तत्त्वशुद्धी म्हणजे शारीरिक व मानसिक शुचितेचे कटाक्षाने पालन करणे. त्यासाठी स्तोत्रपठण, पूजा, जप, हवन वगैरे साधना नियमितपणे करणे. चित्तशुद्धी म्हणजे नियमितपणे ध्यान करणे व सद्गुरूंबद्दल असलेली भक्ती व श्रद्धा सतत वाढवीत रहाणे.

याच ग्रंथात श्रीपूर्णानंदतीर्थ म्हणतात जर यांसंबंधीचे नियम साधकाने पाळले नाहीत तर साधकाचा आंतरिक विकास होत नाही. उलट साधकाचा अधःपात होत जातो. ही गोष्ट स्पष्ट करतांना श्रीपूर्णानंदतीर्थ सांगतात मूलाधार चक्रात असलेली कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर सुषुम्ना नाडीतून मस्तकातील सहस्त्रारचक्रात हळूहळू वर गेली पाहिजे आणि नंतर हृदयात स्थिर झाली पाहिजे. या मार्गात कुंडलिनी शक्ती नेमकी कोठे आहे या प्रमाणे त्या शक्तीला 'पातळ कुंडलिनी', 'देहकुंडलिनी', 'देवकुंडलिनी' आणि 'ब्रह्माडकुंडलिनी' अशी नांवे शास्त्रकारांनी दिलेली आहेत.

कुंडलिनी शक्ती जेव्हा मूलाधार चक्र आणि मणिपूर चक्र यामध्ये असते, तेव्हा तिला **पाताळ कुंडलिनी** असे म्हणतात. या अवस्थेत जर साधकाने वर सांगितलेली चार प्रकारची शुद्धी पाळली नाही तर ती कुंडलिनी शक्ती सुषुम्ना नाडीचा मार्ग सोडून आजुबाजूच्या चुकीच्या नाड्यांमध्ये जाऊ शकते. काही

वेळा कुंडलिनी शक्ती सुषुम्ना नाडीतच राहिली तरीही आजुबाजूच्या अनावश्यक नाड्या अधिक कार्यशाली करू शकते. त्यामुळे साधकाच्या वासना व इच्छा प्रकर्षाने वाढतात आणि साधकाचा अधःपात होऊ शकतो. त्यामुळे साधकाची सत्तालालसा प्रचंड वाढू शकते. साधकांची कामवासना प्रचंड वाढल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. अशाप्रकारचा अधःपात झाल्याची अनेक उदाहरणे श्रीपूर्णानंदतीर्थ सांगत असत. म्हणूनच या अवस्थेत सद्गुरूंचे मार्गदर्शन विशेष महत्त्वाचे असते. खरे तर कुंडलिनी योगात सद्गुरूंचे मार्गदर्शन सर्वच अवस्थांमध्ये अत्यंत आवश्यक असते.

कुंडलिनी शक्ती जेव्हा मणिपूर चक्र आणि अनाहत चक्र या दोन चक्रांमधील सुषुम्ना नाडीत असते, तेव्हा तिला **देहकुंडलिनी** म्हणतात.

कुंडलिनी शक्ती अनाहत चक्राच्या वर गेली म्हणजे अनाहत चक्रापासून आज्ञाचक्रापर्यंतच्या मार्गात असतांना तिला **देवकुंडलिनी** म्हणतात. यामुळे साधकाला दिव्यदर्शने होतात, अनेक दिव्य अनुभूती येतात आणि ध्यानांत किंवा स्वप्नात देवदेवता व साधुसंत यांचे दर्शनही होते व त्यांच्याशी संभाषण करण्याची संधीही मिळते.

ब्रह्मांड कुंडलिनी म्हणजे हृदयांत स्थिर झालेली कुंडलिनी शक्ती. याठिकाणी साधकाचा आंतरिक विकास पूर्ण होतो. हेच जीव आणि शिव यांचे मीलन. हीच आत्मसाक्षात्काराची पूर्णावस्था.

श्रीपूर्णानंदतीर्थ असे सांगतात- आहारशुद्धी, विचारशुद्धी, तत्त्वशुद्धी, चित्तशुद्धी यांचे पालन न केल्यामुळे साधकांचाही अधःपात झालेला आहे आणि अनेक साधुमहात्म्यांचाही अधःपात झालेला आहे. एकेकाळी उच्च अवस्था प्राप्त झालेले महात्मे केवळ ही चार प्रकारच्या शुद्धीबाबतची दक्षता व पुरेशी काळजी न घेतल्यामुळे खाली आले, त्यांच्यात सत्तापिपासा आणि वासना अतोनात वाढली अशी उदाहरणे आहेत असे स्वामीजी सांगत असत. म्हणून साधकाने दीक्षा देणाऱ्या सद्गुरूंनी सांगितलेले सर्व नियम पाळावेत व सतत त्यांच्या संपर्कात राहून वेळोवेळी त्यांचे मार्गदर्शन घ्यावे म्हणजेच साधकाची प्रगती होते असा स्वामीजींचा उपदेश असे.

प्राणायामातही भक्तीचे महत्त्व खूपच आहे. प्राणायामाच्या क्रिया करतांना मन भक्तीने पूर्ण भरून गेले तरच प्राणायामाचे फळ खऱ्या अर्थाने प्राप्त होते

असे स्वामीजी 'प्रबोधसुधा' या ग्रंथात सांगतात. किंबहुना हठयोग, प्राणायाम, लययोग, कुंडलिनीयोग वगैरे कोणत्याही योगाभ्यासाच्या प्रकारात भक्तीची जोड अत्यंत आवश्यक आहे असे स्वामीजींचे मत आहे.

* विचारधन

'विचारधन भाग-तीन' या पुस्तकात साधकांनी शक्तिपात विद्येबद्दल विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देतांना श्रीदत्तमहाराजांनी पुढील उद्‌गार काढले आहेत-

* ''श्रीगुरूमहाराजांना प्राप्त झालेली शक्तिपात ही साधनप्रणाली योगविद्याच आहे. ही साधनप्रणाली सर्व साधनांचा समन्वय साधणारी साधनप्रणाली आहे असे साधकांच्या सर्व तऱ्हेच्या अनुभवांवरून दिसते.''

* ''शक्तिपात योगसाधनेत साधकाची साधना अन्तस्थ प्रेरणेने चालत असते. श्रीसद्‌गुरूकृपेने अन्तस्थ शक्ती जागृत होऊन कार्यरत होते. सद्‌गुरूंची कृपा झाल्यानेच साधकाचा साधनमार्ग मोकळा होतो. हा प्रारंभ असतो. पुढे समर्थ सद्‌गुरू शक्तिरूपाने अन्तस्थ होऊन मार्गदर्शन करीत रहातात.''

* ''शक्तिपात योग साधनेत साक्षीभावाचा जो अनुभव येतो ते ब्रह्मचिंतनच आहे. श्रीगुरूमहाराजांनी दिलेली साधना ही ब्रह्मचिंतनाचीच साधना आहे. या साधनेत चित्तस्थैर्याचा अभ्यास होत असतो. हे चित्ताचे स्थैर्य साक्षीभावाच्या अनुभवाने म्हणजे ब्रह्मचिंतनानेच येत असते. ब्रह्मचिंतनाने चित्ताचे स्थैर्य येत असते. म्हणून ब्रह्मचिंतनाचे महत्त्व सांगतांना आचार्यमहाराज सांगतात, 'मन क्षणभर जरी ब्रह्मचिंतनात तन्मय झाले तरी त्याने सर्व तीर्थात स्नान केल्यासारखे आहे, सर्व देवांची पूजा केल्यासारखे आहे, हजार यज्ञ केल्यासारखे आहे.''

* ''अशी दिव्य साधना ज्या साधकांना प्राप्त झाली त्यांचे मुख्य कर्तव्य हे आहे की त्यांनी साधनेला अनुकूल अशी अंतर्बाह्य दृष्टी ठेवावी आणि सत्कर्म व सदाचरण सदैव करीत रहावे. म्हणजेच त्यांच्यावर गुरूकृपा होऊ शकेल.''

* ''संप्रदाय शब्द परंपरावाचक आहे. त्यातील एक जलधारा घेऊन हे माझ्या पाटाचे पाणी म्हणणे हे त्या संप्रदायाला संकोचित - मर्यादित करण्यातला प्रकार आहे. या दिव्य संप्रदायातील साधकांनी दूरदृष्टी ठेवली पाहिजे आणि व्यापक दृष्टिकोन विकसित करून असा प्रकार टाळला पाहिजे.''

* अनुभव गुप्त ठेवण्याची गरज

शिष्याला जे आंतरिक दिव्य अनुभव येतात ते कोणालाही सांगू नयेत असे शास्त्रकार सांगतात. नाहीतर अनुभव येणे बंद होते. शिष्याने आपले मन शांत ठेवले आणि ते अनुभव प्रगट केले नाहीत तर शिष्याला संसारातील भोगही मिळतात आणि मुक्तीही मिळते. गुरूने प्रसन्न होऊन शिष्याला अनुभव प्रग ट करायला परवानगी देईपर्यंत शिष्याने अनुभव प्रगट करू नयेत. तोपर्यंत त्याने योगसाधन कोणाला सांगू नये आणि शिकवू नये असे श्रीदत्तमहाराजांनी मुद्दाम सांगितले आहे. नाहीतर साधकाचे सामर्थ्य नाहीसे होते आणि गुरूकृपेचे फळ नष्ट होते असे अनेक जाणकार सांगतात.

सद्गुरूंची आज्ञा नसतांना स्वतःचे अनुभव प्रकट केल्यामुळे किंवा योगसाधन इतरांना शिकवल्यामुळे साधकाला गुरूकृपेने प्राप्त झालेले सामर्थ्य नाहीसे होते.

गुरू आज्ञेचे पूर्ण श्रद्धेने सतत स्मरण ठेवणे आणि गुरूभक्ती वाढवत राहून नियमाने साधन करणे आवश्यक असते. म्हणूनच श्रीदत्तमहाराज असे सांगत. शक्तिपात साधनेला गुरूभक्तीची जोड द्यावी. सद्गुरू हे ईश्वराचेच रूप आहे ही श्रीदत्तसंप्रदायाची शिकवण ध्यानात ठेवून गुरूचे स्मरण सतत अखंड ठेवावे. त्यामुळे शक्तिपात योगसाधनेचे फळ जास्त मिळते आणि फळ अल्पकाळातही मिळते असे श्रीदत्तमहाराज याचमुळे आग्रहाने सांगत असत.

* उपासनेचा (साधनेचा) अहंकार टाळला पाहिजे.

साधन करणे म्हणजे उपासना. उपासना करतांना शिष्याने स्वतःमध्ये त्या उपासनेचा अहंकार निर्माण होणार नाही याची कमालीची दक्षता घ्यावी लागते.

श्रीदत्तमहाराज सांगत असत, ''मी साधन (उपासना) करतो आहे हा विचार किंवा भावना हा उपासनेचा अहंकारच आहे. साधन (उपासना) चांगले चालले असेल तर ते गुरूकृपेमुळेच घडते आहे याची जाणीव भक्ताने सदैव ठेवली पाहिजे. उपासना चांगली चालणे यांत भक्ताचे कर्तृत्व काहीच नसते. ते केवळ गुरूकृपेनेच घडत असते. मग साधन करण्याचा अहंकार येण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. पण काही वेळा हा अहंकार येतो. काही व्यक्ती सांगतात, 'मी

इतकी उपासना करतो. मी इतके साधन केले.' हा सगळा अहंकारच. 'मी इतकी वर्षे साधन केले पण काही झाले नाही' असे वाटणे हा अहंकारच. मी हे साधन करतो व मला हे फळ मिळाले किंवा मिळेल असे विचार मनांत येणे हाही अहंकारच. उपासना करण्याचा अहंकार शिष्याच्या मनांत उत्पन्न झाला म्हणजे तो उपासनेला बाधक ठरतो.''

म्हणून श्रीदत्तमहाराज नेहमी सांगत, ''अहंकार येऊ नये म्हणून शिष्याने उपासना (साधन) कोणालाही सांगू नये. उपासनेतील मीपणा गेला पाहिजे. यालाच निस्साधन होणे असे म्हणतात. 'मी' हा भाव घालवण्यासाठी उपासनेचा (साधन करण्याचा) कोठे उल्लेखही करू नये. साधन आपल्या कल्याणासाठी सद्गुरूंनी दिलेले असते. दुसऱ्याला त्याची माहिती सांगून थोडेच कल्याण साधणार आहे? उपासना सांगितली की अहंकार येतो. अहंकारातून लोभ येतो. लोभ सर्वात वाईट. म्हणून उपासनेचा तोंडाने कधीच उच्चार करायचा नाही.

* मोक्ष हे फळ

शक्तिजागृती झाल्यावर साधक जेव्हा साधना करीत असतो, त्या काळात आहार, झोप आणि श्रम हे मितप्रमाणात ठेवावे लागतात. प्रतिकूल लोकांची संगत टाळावी लागते आणि मन निश्चल ठेवून साधन करावे लागते. म्हणजेच योग्यवेळी दिव्य ब्रह्मज्ञान प्राप्त होते आणि जीवनमुक्त अवस्थेचा लाभ शिष्याला होतो. या जीवनमुक्त अवस्थेलाच मोक्ष असे म्हणतात. महायोगविज्ञान किंवा शक्तिपातसाधन योग या मार्गाने शक्तिपातदीक्षा घेऊन नियमितपणे साधन करीत राहिले की गुरूकृपेने तो साधक मोक्षापर्यंत पोचतो.

श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराज सांगतात की मोक्ष ही अवस्था शिष्याला प्राप्त झाल्यावर त्याची सर्व दुःखे नाहीशी होतात, जीवभावही नाहीसा होतो आणि तो ईश्वराशी ऐक्य अनुभवतो हीच अद्वैत अनुभूती. याच अवस्थेला ईश्वर साक्षात्कार असे म्हणतात. श्रीज्ञानदेवमहाराजांनीही कुंडलिनी योगांमध्ये सांगितलेल्या साधना करून मोक्ष हे फळ मिळते असे सांगितले आहे.

* शक्तिपात साधना - एक जीवनदृष्टी

मोक्ष हे ध्येय ठेवून साधना करावी हा विचार सर्वच साधकांच्या मनांत येणार नाही हे उघडच आहे. मोक्षाची इच्छा करणारे फार थोडे साधक असतात. बहुसंख्य साधकांना सांसारिक सुखे मिळावीत असेच वाटते आणि प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. तसे असणे साहजिकच आहे. अशा साधकांनाही शक्तिपात साधना खूप काही देऊ शकते. कारण शक्तिपात साधना ही एक परिपूर्ण जीवनदृष्टी आहे. या साधनेत ज्ञान, भक्ती आणि कर्म यांची उचित सांगड योगविद्येशी घातलेली आहे. म्हणूनच सांसारीक कामना असलेले साधकही शक्तिपात साधना करून उत्तम व्यावहारिक जीवन जगू शकतात आणि प्रापंचिक जीवनाला भक्कम आध्यात्मिक अधिष्ठानही देऊ शकतात असे श्रीदत्तमहाराज सांगत असत. मात्र त्यासाठी शक्तिपात साधनेतही तात्त्विक बैठक साधकाने लक्षात घेतली पाहिजे आणि सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे नियमितपणे साधना करून गुरूभक्ती वाढवीत राहिले पाहिजे.

शक्तिपात दीक्षा घेतल्यावरही जर साधकाने ही दृष्टी ठेवली नाही तर त्याला हव्या असलेल्या अनुभूती येऊ शकणार नाहीत. बऱ्याच मुमुक्षु साधकांना या साक्षात्कार मार्गाची ज्ञानदृष्टी नसते. शक्तिपात साधनेला जी अद्वैत वेदान्तात्मक आणि भक्तियोगात्मक बाजू आहे ती साधकाने जाणून घेतली पाहिजे आणि सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे डोळसपणे साधना केली पाहिजे, तर त्याचे फळ अधिक मिळते असे श्रीदत्तमहाराज सांगत असत.

शक्तिपात साधना ही केवळ यांत्रिक, तांत्रिक वा सांप्रदायिक साधना नाही. शक्तिपात या साधनेला फार मोठ्या व्यापक तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. शक्तिपाठ साधनाही एक परिपूर्ण जीवनदृष्टी आहे. ईश्वरार्पण बुद्धीने साधना करीत रहाणे आणि त्या साधनेला सदाचारयुक्त धर्माचरणाची जोड देणे हा या जीवनदृष्टीचा गाभा आहे. जो साधक दैनंदिन कर्मे करतांना मनांत समभाव ठेवतो आणि भक्तीच्या सहाय्याने चित्तशुद्धी करून घेतो त्याच साधकावर सद्गुरूंची पूर्ण कृपा होते. ही कृपा म्हणजेच सद्गुरूंचा शक्तिपात अनुग्रह असे श्रीदत्तमहाराज सांगत असत!

जर साधकाने सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे साधनेला असे व्यापक अधिष्ठान दिले तर त्याची साधना हा 'सहजयोग' होतो. जीवनांतील सर्व अडचणी तर दूर होतातच, परंतु अंतस्थ शक्तीच्या प्रेरणेने साधनेतील सर्वप्रकारचे प्रतिबंध दूर होत जातात आणि साधकाला अल्पकाळात मोक्षप्राप्ती होते.

म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की शक्तिपात साधना ही सर्वस्पर्शी आणि सर्वसमन्वयात्मक जीवनदृष्टी आहे. कर्म, ज्ञान, भक्ती, योग या सर्वांचा शक्तिपात साधनेत अंतर्भाव आहे. गुरूकृपा आणि गुरूभक्ती हा तिचा गाभा आहे. 'श्रीगुरु : सर्वसमष्टीभूता आद्या शक्तिः।' ही या साधनेची ज्ञानभूमिका आहे. [१]

श्रीशंकराचार्यप्रणित कुंडलिनीयोग

श्रीशंकराचार्यांचे परात्पर गुरू श्रीगौडपादाचार्य यांनी कुंडलिनी महायोग ही साधना विकसित केली आणि वेद व उपनिषदांतील ब्रह्मविद्येशी तिचा समन्वय घालून दिला. श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांनी हा वारसा पुढे चालवला. सौंदर्यलहरी, योगतारावली, ललितासहस्त्रनाम,

---

[१] *(टीप : वासुदेवनिवास प्रकाशनने ''महायोगविज्ञान'' नावाचे मराठी पुस्तक प्रकाशित केले आहे. श्रीयोगेंद्रविज्ञानीमहाराज यांनी वेद, उपनिषदे, पुराणे, भागवत, षड्दर्शने व मंत्रशास्त्रातील श्लोक व सूत्रे एकत्रित करून त्यांचा भावार्थ या मूळ पुस्तकांत हिंदी भाषेतून दिला आहे. या हिंदी पुस्तकातील काही महत्त्वाच्या प्रकरणांचे मराठी भाषांतर योगीराज श्रीगुळवणीमहाराजांनी ''महायोगविज्ञान'' या पुस्तकात दिले आहे. वासुदेव निवास प्रकाशनने ''योगवाणी अथवा सिद्धोपदेश'' या नावाचे एक पुस्तकही प्रकाशित केले आहे. स्वामी श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ-महाराज यांच्या मूळ बंगाली पुस्तकाचा हा मराठी अनुवाद आहे. योगीराज श्रीगुळवणीमहाराजांनीच स्वतः या पुस्तकाच्या हिंदी भाषेतील अनुवादावरून हा मराठी अनुवाद केला आहे. तसेच डॉ. ज. वा. जोशी यांची सूत संहिता रहस्य भाग - १ व २ ही पुस्तकेही प्रसिद्ध केलेली आहेत. या सर्व पुस्तकांना श्रीदत्तमहाराजांनी प्रस्तावना लिहून कुंडलिनी योगाचे रहस्य विशद केले आहे. जिज्ञासूंनी अधिक माहितीसाठी ही पुस्तके पहावीत.)*

त्रिपुरसुन्दरीवेदपादस्तोत्रम् वगैरे अनेक स्तोत्रात कुंडलिनी महायोगाची साधना आचार्य महाराजांनी सांगितलेली आहे. अष्टांग योगाच्या साधनेशी श्रीशंकराचार्यमहाराजांनी कुंडलिनी महायोगाची सांगड घालून एक वेगळेच अधिष्ठान या साधनेला दिले आहे. शंकराचार्य-स्वामीमहाराजांनी त्रिपुरसुंदरी वेदपाद स्तोत्रांत कुंडलिनीशक्तीचे जे विवेचन केले आहे ते पुढे दिले आहे.

शंकराचार्यस्वामीमहाराज आणि ज्ञानदेव दोघांनीही कुंडलिनी महायोगाचे केलेले विवरण एकाच स्वरूपाचे आहे. दोघांचीही अनुभूती एकच आहे आणि दोघांचाही या क्षेत्रांतील अधिकार त्याच उंचीचा आहे. असे असले तरीही श्रीज्ञानदेवांनी विनम्रभावाने ''भाष्यकारांते वाटपुसतु'' असा उल्लेख ज्ञानेश्वरीत केला आहे हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

* श्रीज्ञानदेवप्रणित कुंडलिनीयोग

शक्तिपात किंवा शक्तिजागृती यासंबंधी श्रीज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीमध्ये सविस्तर माहिती दिली आहे. कुंडलिनीयोग या मार्गाने योगाभ्यास केला तर शक्तीजागृती होऊन तो साधक योगमार्गाने पुढे पुढे जात रहातो व परमेश्वराशी ऐक्य अनुभवू शकतो. त्या अंतिम अवस्थेत बाह्य जगाची जाणीव नाहीशी झाल्याचा हा अनुभव येतो हे ज्ञानदेवांनी तपशीलासह सांगितले आहे.

कुंडलिनी शक्तीचे वर्णन करतांना ज्ञानदेव सांगतात-

नागाचें पिलें । कुंकुमें नाहलें ।
वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ॥
तैशी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी ।
अधोमुख सर्पिणी । निजैली असे ॥
विद्युल्लतेची कडी । वह्निज्वाळांची घडी ।
पंधरेयाची चोखडी । घोंटीव जैशी ॥

(भावार्थ : केशराने न्हालेले नागाचे पिलू वेढे घेऊन जसे निजावे, त्याप्रमाणे नेमकी साडेतीन वेढ्यांची ती कंडलिनीरूपी नागीण खाली तांड करून निजलेली असते. ती नागीण ज्याप्रमाणे मूर्तिमंत बनविलेली विजेची वाटोळी कडी किंवा प्रत्यक्ष अग्नीच्या ज्वालेची केलेली घडी अथवा जणू काय उत्तम सोन्याचे

चक्रचकीत वेढे. त्याप्रमाणे व्यवस्थितपणे आकुंचित असलेली व मूलाधारचक्राजवळच्या संकुचित जागेत ती असते.)

ज्ञानदेवांनी सांगितलेल्या कुंडलिनी योगाचा सारांश असा आहे. ''पवित्र ठिकाणी एकांतात योग्याने वज्रासनांत बसावे. जालंदरबंध, उड्डीयानबंध, मूलबंध हे तीन बंध साधावे. त्यामुळे प्राणवायू कोंडून शरीर ढवळून निघते, प्राण शुद्ध होऊन उष्णता वाढते व कुंडलिनी जागी होते. जागी झाल्यावर ती शरीरांतील पृथ्वीतत्त्व व जलतत्त्व यांचे भक्षण करते. नंतर ती तृप्त कुंडलिनी सुषुम्नानाडीतून वरवर जाते त्यावेळी मस्तकांतील चंद्रामृताचे तळे पाझरून ते अमृत कुंडलिनीच्या मुखांत पडू लागते आणि देह तेजःपुंज होऊ लागतो. (ज्ञानेश्वरी २११-२४८) मग योग्याचा देह तेजःपुंज होतो. त्याला सिद्धी प्राप्त होतात. पण योग्याला सिद्धींची किंमत नसते. सुषुप्तेतून सुषुम्ना नाडीमध्ये वर चढू लागते. हृदयाकाशांत कुंडलिनीशक्ती पोचल्यावर योग्याला अनाहत नाद ऐकू येतो. त्याचवेळी सहस्त्रार कमळ अधिक फुलू लागते. त्या कमळात शिवतत्त्व असते. हृदयांकाशांत आलेली कुंडलिनी आपले तेज त्या शिवतत्त्वाला नजराणा म्हणून अर्पण करते (ओवी क्र. २४९-२९२). पुढे कुंडलिनी सहस्त्रार चक्रांतील शिवतत्त्वाला आलिंगन देते. मग योग्याचे जीव शिवऐक्य साधते, तो परब्रह्ममय होतो. तो योगी भगवंताला येऊन मिळतो. (ओवी क्र.२९३-३२५) हाच आत्मसाक्षात्कार.

सगुण व निर्गुण यांचे ऐक्य

कुंडलिनी योग असा सविस्तर सांगून झाल्यावर ज्ञानदेव पुढे सांगतात-

जें विश्वाचें मूळ। जें योगद्रुमाचें फळ।
जें आनंदाचें केवळ। चैतन्य गां ॥
जें महाभूतांचें बीज। जें महातेजाचें तेज।
एवं पार्था जें निज। स्वरूप माझें ॥
ते हे चतुर्भुज कोंभेली। जयाची शोभा रूपा आली।
देखोनि नास्ति,कीं नोकिलीं। भक्तवृंदे ॥

ते अनिर्वाच्य महासुख । पै आपणचि जाहले ते पुरुष ।
जयांचे कां निष्कर्ष । प्राप्तिवेरीं ॥
आम्हीं साधन हें जें सांगितले । तेंचि शरीर जिहीं केलें ।
ते आमुचेनि पाडें आले । निर्वाळलेया ॥

या ओव्यांमध्ये ज्ञानदेवांना असे सांगावयाचे आहे की भक्त आपल्या भक्तीने भगवंताचे सगुण साकार रूप पाहून शेवटी आत्मस्वरूपाचाच अनुभव घेतो. तोच अनुभव योगीपुरुष योगाभ्यासाच्या शेवटी घेतो. म्हणजे सगुण साकार व निर्गुण निराकार यांचे ऐक्यही आहे आणि समत्वही आहे असा ज्ञानदेवांचा अनुभव आहे.

श्रीज्ञानदेवांचा योगाभ्यास विषयक उपदेश

ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, कर्ममार्ग व योगमार्ग या चारही मार्गात ज्ञानदेवांना पूर्णत्त्व प्राप्त झाले होते. या चारही मागाचा अनुभव त्यांनी ज्ञानेश्वरीत सांगितला आहे व एकप्रकारे त्यांची तुलना करून साधकांना बहुमोल उपदेश केला आहे. त्याचा सारांश थोडक्यात पुढे दिला आहे.

१. योगाभ्यास हा मार्ग खडतर आहे. पण अनेक योग्यांनी वाटचाल केलेली असल्याने आता सर्वांसाठी योगमार्गाची एक रूळलेली पाऊलवाट आपल्याला मिळालेली आहे आणि त्यावर वाटचाल करणे त्या मानाने सुलभ झाले आहे.

२. योगमार्गात वाटचाल करतांना अनेक सिद्धी मिळतात.पण त्या सिद्धींमुळे योगाभ्यासांत अडथळे येतात. म्हणून योग्याने त्या सिद्धींकडे दुर्लक्ष करून वाटचाल करीत राहिले पाहिजे.

३. योगाभ्यास न करताही केवळ ज्ञानमार्गाने जाऊन आत्मसाक्षात्कार करून घेणाऱ्यांना आत्मविद् म्हणतात. आत्मविद् पुरुषांची दुःखे नाहीशी होतात. पण त्यांना आनंद मिळतोच असे नाही. पण योगाभ्यास मार्गाने आत्मसाक्षात्कार करून घेतला तर बाह्य विषयांचा विसर पडतो व आत्मसाक्षात्काराचा अनुभव दृढ होतो. म्हणून ज्ञानापेक्षा योगाभ्यास करणारे श्रेष्ठ आहेत असे ज्ञानदेव सांगतात- ''क्रियावान् एष ब्रह्मविदां वरिष्ठः ।'' अशी मुंडकश्रुती आहे. अनेक श्रुती, स्मृती व पुराणवचने तेच सांगतात. श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराज यांचाही

अनुभव तसाच आहे. म्हणूनच बहुतेक सर्व ऋषींनी आधी योगाभ्यास केला आणि नंतर ज्ञानमार्गाने आत्मसाक्षात्कार करून घेतला हे लक्षात घेण्यासारखे आहे.

४. योगाभ्यास करतांना प्राणाचा निरोध होतो. म्हणून योगी त्या मार्गात तहानभूक विसरतो हे ज्ञानदेवांचे सांगणे त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित आहे. शंकराचार्य-स्वामीमहाराजांनी विवेकचुडामणीमध्ये तेच सांगितले आहे.

५. श्रीज्ञानदेवांनी कुंडलिनी योगांतील षटचक्रभेदनाचे पूर्वमार्ग व पश्चिममार्ग हे दोन्ही मार्ग सांगितले आहेत.

६. योगाभ्यास करणे हे कर्माचरण आहे. तथापि योगाभ्यास पूर्ण झाल्यावर जीव आणि ब्रह्म हे एक आहेत याचा अनुभव येतो. त्यावेळी कर्महीं रहात नाही आणि कर्माचे कर्तृत्वही रहात नाही. कर्म आणि कर्तृत्व यांची निवृत्ती होते. केवळ सत्‌चित् आनंदस्वरूप मी आहे हाच अनुभव येतो.

७. ज्ञानदेवांनी भगवंताचे सगुण रूप आणि निर्गुण रूप यांचे ऐक्य आहे हे आपल्या वाङ्मयातून सतत सांगितले आहे. सगुण निर्गुण यांच्या ऐक्याचा अनुभव घेण्यासाठी त्यांनी योगाभ्यासाचाच मार्ग स्वीकारलेला होता असे दिसते. तो अनुभव घेतल्यानंतर त्या सगुणस्वरूपाची अकृत्रिम भक्ती निर्माण होते असेच ज्ञानदेवांनी वारंवार सांगितलेले आहे. म्हणूनच कुंडलिनीयोग अथवा योगमार्ग हा पंथराज आहे असे ज्ञानदेव म्हणतात.

८. भगवत्‌भक्ताला योगाभ्यास सहज साधतो. कारण त्याच्या उत्कट भक्तीमुळे त्याला योगाभ्यासातील अनेक पायऱ्या ओलांडता येतात व तो एकदम वरच्या पायरीवर जातो. (योगसूत्र भाष्यातही हेच सांगितले आहे. ''जितोत्तरभूमिकस्य च नाधरभूमिषु । परचित्तज्ञानादिषु संयमो मुक्तः ।'' सूत्र-६ विभूती पाद)

९. कुंडलिनी योगात गुरूच्या सहाय्याशिवाय वाटचाल होत नाही असे ज्ञानदेवांनी स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणूनच कुंडलिनीयोग गुरूपासूनच शिकावा व गुरूंच्या मार्गदर्शनाखालीच या योगाचा अभ्यास करावा असे ते सांगतात.

१०. योगमार्गाने साधक निर्गुण निर्विकल्प परब्रह्माचा अनुभव घेतात. तेच निर्गुण निराकार परब्रह्म भक्तांसाठी सगुण साकार रूप घेऊन उभे राहिलेले आहे. भक्ताचे मनही भक्तीमुळे तेथेच पोचते. भक्तीमुळे शक्तीजागृती होते असा आपला अनुभव ज्ञानदेवांनी सांगितला आहे आणि योगाभ्यासाला भक्तीची जोड द्यावी म्हणजे योगाभ्यास लौकर व सहजतेने पूर्ण होतो असा उपदेश केला आहे.

११. संसारांत आपले मन विषयसुखाच्या ठिकाणी आसक्त होते. पण योगसुखाच्या गोडीचा अनुभव आपल्या मनाने घेतला म्हणजे विषयसुखाची आठवण विसरून जाते. योगसुख योगाचे सर्वस्व सार आहे, तेच समाधानाचे राज्य आहे असे ज्ञानदेव सांगतात.

१२. योगाभ्यास करतांना श्रीगुरूंच्या ठायी अत्यंत प्रेम पाहिजे. गुरूभक्ती असेल व गुरूंच्या वचनावर पूर्ण विश्वास असेल तरच या मार्गातील अनुभव येतात. गुरूप्रेमावाचून कुंडलिनी मार्ग असाध्य आहे. गुरूंच्या ठिकाणी अत्यंत प्रेम असणे हेच कुंडलिनीयोगाच्या अभ्यासातील यशाचे रहस्य आहे असे ज्ञानदेव स्पष्टपणे सांगतात.

वास्तविक भगवान श्रीकृष्णांनी कुंडलिनीयोग भगवद्गीतेत चार श्लोकांतच थोडक्यात सूचित केला आहे. परंतु ज्ञानदेवांनी १६४ ओव्या रचून कुंडलिनी योगाचे संपूर्ण विवेचन केले. याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे ते नाथपंथी असल्याने त्यांनी या योगाचा संपूर्ण अभ्यास केलेला होता व त्यात पूर्णत्व प्राप्त करून घेतलेले होते.

दुसरे कारण म्हणजे श्रीनिवृत्तिनाथांसारखे अधिकारी संत समोर श्रोते म्हणून बसले होते. म्हणूनच ज्ञानदेव सांगतात- ''चांगले गिऱ्हाईक आले म्हणजे दुकानदार वस्त्राची घडी उलगडतो आणि साफसूफ करून पसरून व्यवस्थित करून ते त्याला दाखवतो. मीही तुमच्यासारखे जाणकार श्रोते समोर बसलेले पाहिले. म्हणूनच कुंडलिनी योगातील गूढपणाच्या संकेताची बंधने सोडली आणि त्या योगातील गूढार्थाची घडी उलगडून साफ करून तो पसरून तुम्हापुढे ठेवला.''

ज्ञानदेवांना कुंडलिनी योगातील पूर्णत्त्व होते हे ज्ञानेश्वरीतील विवेचनावरून स्पष्टपणे दिसते. तथापि ज्ञानेश्वरीची शिकवण सामान्य माणसासाठी भक्तीपरच आहे. शिवाय ज्ञानदेवांनी सुमारे ११०० अभंग लिहिले असले तरी त्यापैकी योगाभ्यासातील अनुभूतींसंबंधीचे अभंग केवळ शंभरच आहेत. कुंडलिनी योगाचा उल्लेख काही थोड्या अभंगातच आलेला आहे. ज्ञानदेवांचे बहुतेक सर्व अभंग भक्तीपरच आहेत. वृत्तीने संत असल्यामुळे ज्ञानदेवांनी सामान्य लोकांची दुःखे दूर होण्यासाठी सुलभ सोपा उपाय म्हणून त्यांनी भक्तीचाच मार्ग सांगितला. मात्र योगाभ्यास करणाऱ्यांनी भक्तीची जोड योगाभ्यासाला द्यावी असेही आवर्जून सांगितले.

केवळ ज्ञानदेवांनी भक्तीचे हे महत्त्व प्रतिपादन केले आहे असे नाही. शंकराचार्य-स्वामीमहाराजांनीही व इतर सर्व संतांनी हेच सांगितले आहे. वेद व उपनिषदे आणि भागवत, महाभारत वगैरे सर्वधर्मग्रंथात ईश्वरभक्तीचे महत्त्व प्रकर्षाने सांगितलेले आहे. भक्तीची जोड दिल्याशिवाय कोणतीही आध्यात्मिक अनुभूती येत नाही हाच सर्व संताचा अनुभव आहे. म्हणूनच बहुतेक सर्व प्रमुख संप्रदायात ज्ञान, कर्म व भक्ती यांची कमीअधिक प्रमाणातील सांगड घालणारी उपासना सांगितली आहे.

वासुदेव निवास हे शक्तिपीठ दत्तसंप्रदायी आहे. भगवान दत्तात्रेय हे शक्तिपात विद्येचे आद्यप्रणेते आहेत. भगवान दत्तात्रेय हे ''गुरुणां गुरू'' असे जगद्गुरू आहेत. भगवान श्रीदत्तात्रेयांनी ज्ञान, भक्ती, कर्म, योग या सर्व उपासनापद्धतींच्या समन्वयाचा पुरस्कारच केला. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज हे दत्तात्रेयांचे अवतार. त्यांनीही ज्ञान, कर्म, भक्ती व योग यांच्या समन्वयाचा पुरस्कार दत्तउपासनेतून केला व दत्तउपासनेचा भारतभर प्रसार केला.

''श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज व श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज हे दोघेही एकच आहेत, दोघांचेही कार्य दत्तसंप्रदायाचेच आहे'' असे स्वतः श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराजांनी स्वप्नदृष्टांत देऊन श्रीगुळवणीमहाराजांना सांगितले होते आणि श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराजांची शक्तिपातविद्या भारतात सर्वत्र प्रसृत करण्याची आज्ञा केली

होती. म्हणूनच या दोन्ही स्वामीमहाराजांची शिकवण वासुदेवनिवास या शक्तिपीठाने अधिष्ठान म्हणून स्वीकारली आहे आणि त्या अधिष्ठानावरूनच कुंडलिनी योग म्हणजे शक्तिपात विद्येचा प्रसार केला जात आहे.

वासुदेव निवास शक्तिपीठातर्फे होणाऱ्या महायोग क्षेत्रातील कार्याला श्रीवासुदेवानंद सरस्वती-स्वामीमहाराज आणि श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज या दोघांनी पुरस्कृत केलेल्या आचारधर्माचे आणि वेदान्त तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. ते अधिष्ठान स्वतः श्रीगुळवणीमहाराजांनी दिले आहे आणि त्याला गुरूभक्तीची जोड दिली आहे. श्रीगुरूमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनीही हीच उज्ज्वल परंपरा पुढे चालू ठेवली आहे आणि शक्तिपीठाचे हेच कार्य व्यापक प्रमाणात पुढे नेले आहे.

***

परिशिष्ट क्रमांक -४

* वासुदेव निवास- व्यवस्थापन व कार्यप्रणाली

वासुदेवनिवास या शक्तिपीठाचे कार्य प. प. श्रीवासुदेवानंद-सरस्वती-टेंबे स्वामीमहाराज आणि प.प.श्रीलोकनाथतीर्थ-स्वामीमहाराज स्मारक ट्रस्टतर्फे पाहिले जाते. या ट्रस्टच्या विश्वस्त मंडळांतील विश्वस्तांची नांवे - १. श्री. रा. नारायणराव यशवंत ढेकणे (प्रधान विश्वस्त), २. श्री. रा. भाऊसाहेब तथा लक्ष्मण व्यंकटेश वाकडे, ३. श्री. रा. श्रीपाद पांडुरंग आघारकर, ४. श्री.रा. सुभाष अनंत दामले, ५. डॉ. अशोकमहाराज कवीश्वर.

व्यवस्थापक म्हणून श्री. बाळासाहेब तथा बी. आर्. कुलकर्णी आणि श्री. भास्करराव कुलकर्णी व धार्मिक व्यवस्थापक म्हणून वे.मू. श्री. भगवंत पाध्ये यांची नियुक्ती झालेली आहे. मंदिरातील पूजाअर्चा वगैरेसाठी वेदमूर्ती श्री. प्रभाकरशास्त्री तथा अप्पा कोडणीकर (कोडणीकरगुरूजी) यांची नियुक्ती झालेली आहे. नैवेद्य व भोजन प्रसादाची व्यवस्था श्री. करंबेळकर पहातात.

* ज्ञानपीठाची कार्यप्रणाली

या ज्ञानपीठाला वासुदेव निवास हे नांव श्रीदत्तमहाराजांच्या सुचनेवरूनच श्रीगुळवणीमहाराजांनी दिले आहे. वासुदेव या नावामुळे वासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज यांचेही स्मरण होते आणि परमेश्वरी शक्तीचे कार्य जसे व्यापक आहे तसेच वासुदेव निवास या ज्ञानपीठाचे कार्य व्यापक आहे हेही यांतून सूचित होते असा श्रीदत्तमहाराजांनी सांगितले होते. या संबंधीची सविस्तर हकीकत याच पुस्तकांत अन्यत्र दिलेली आहे. वासुदेव निवास या ज्ञानपीठातर्फे साधकांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले जाते. महायोगमार्गातील शक्तिपात साधनेसंबंधी येथे संशोधनही केले जाते व या मार्गाद्वारे साधकांचा आंतरिक विकासही घडवून आणला जातो.

वासुदेव निवास या वास्तूत तळमजल्यावर एक मंदिर आहे. तेथे प्रशस्त गाभाऱ्यात श्रीदत्तप्रभूंचे श्रीगुळवणीमहाराजांनी काढलेले चित्र आहे. विशेष म्हणजे या चित्रात तीन मुखे असलेले दत्तात्रेय दाखवलेले नाहीत. श्रीदत्तात्रेय या चित्रात एकमुखी आहेत. स्वयं श्रीदत्तप्रभूंनी चांदीच्या अष्टगंधयुक्त पादुका

श्रीगुळवणीमहाराजांच्या मातोश्रींना प्रसाद म्हणून दिल्या होत्या. त्या पादुका येथे मंदिरात ठेवल्या असून त्यांची रोज पूजा केली जाते. भगवती तुळजाभवानी देवीचीही मूर्ती पूजेत आहे. श्रीदत्तप्रभुंच्या या पादुका व श्रीतुळजाभवानी मातेची मूर्ती यांचे छायाचित्र 'विचारधन' या पुस्तकाच्या तीनही भागांमध्ये मुखपृष्ठावर छापले आहे.

भक्तांच्या विनंतीप्रमाणे येथे अनेक प्रकारची व्रते, सांगता समारंभ संपन्न करण्याची व्यवस्था केली जाते. दत्तप्रभुंच्या पादुकांची पूजा करण्याची संधी साधकांना देण्यात येते. साधकांच्या विनंतीप्रमाणे येथे एकादष्णी, रुद्रपठण, पाद्यपूजा व इतर अनेक उपासनाविधी वेदोक्तपद्धतीने पूर्णतया शास्त्रीय स्वरूपांत संपन्न केले जातात. रोज अग्निहोत्र व वैश्वदेवही पूर्णतया शास्त्रीय पद्धतीने संपन्न होतो व साधकांना प्रसाद वितरीत केला जातो. मंदिरात रोज सकाळी पूजा, आरती होते. सायंकाळी आरती व भजन होते. रोज सकाळी भजने म्हटली जातात. आठवड्यांतून दोनदा नियमितपणे दुपारी ४ ते ५ भजने म्हणण्याचे कार्य वासुदेवनिवास भजनमंडळी गेली अनेक वर्षे करीत आले आहे. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम वगैरे अनेक संतांची भजने सुश्राव्य चाली लावून गायली जातात. ती ऐकणे हा एक आगळाच आनंद असतो असे भक्त सांगतात.

या ज्ञानपीठात दुसऱ्या मजल्यावर एक साधनामंदिर आहे. तेथे नियमितपणे साधना चालते. तसेच उत्सवासाठी आणि आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी येणाऱ्या साधकांची येथे तात्पुरत्या निवासाची सोयही केली जाते. या वास्तूत एक ध्यानमंदिर आहे. तेथे रोज अनेक साधक ध्यानाला बसतात. श्रीगुळवणीमहाराज येथे अनेक वर्षे वास्तव्य करून होते. श्रीगुळवणीमहाराजांनी वापरलेली वस्त्रे व इतर अनेक वस्तू येथे जतन करून ठेवल्या आहेत. साहजिकच पावित्र्य व आध्यात्मिक तेज या वास्तुमध्ये घनीभूत होऊन साठलेले आहे असा प्रत्यय अनेक साधकांना येतो. त्यामुळे ध्यान प्रगाढ होते असे ते सांगतात. या ध्यान मंदिरात पुणे शहरातील अनेक साधक नियमितपणे ध्यानासाठी येऊन बसतात.

वासुदेव निवासाच्या आवारांत एक औदुंबर वृक्ष आहे. अनेक साधक रोज मंदिरात येऊन या औदुंबर वृक्षाला प्रदक्षिणा घालतात. अनेक साधकांना

येथे दिव्य अनुभूती येतात असे सांगितले जाते.

श्रीवासुदेव निवासमधील उत्सव

श्रीगुरुमहाराजांनी घालून दिलेल्या परंपरेप्रमाणे श्रीवासुदेव निवासमध्ये अनेक मोठे उत्सव दरवर्षी साजरे केले जातात. या उत्सवांची माहिती पुढे दिली आहे.

प.पू. स्वामीमहाराज पुण्यतिथी	आषाढ शुद्ध १
श्री गुरु पौर्णिमा	आषाढ शुद्ध १५
प.पू. स्वामीमहाराज जयंती	श्रावण वद्य ५
भागवत सप्ताह	भाद्रपद शुद्ध ९ ते १५
नवरात्र (देवी भागवत निरूपण अष्टमीपर्यंत आठ दिवस संपन्न होते)	अश्विन शुद्ध १
श्री दत्तजयंती	मार्गशीर्ष १५
प.पू. श्रीगुळवणीमहाराज जयंती	मार्गशीर्ष १३
प.पू. श्रीगुळवणीमहाराज पुण्यतिथी	पौष वद्य ८
प.पू. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराज पुण्यतिथी	माघ वद्य ३
प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर वर्धापन दिन	माघ वद्य ६
प.पू. नारायण स्वामीमहाराज पुण्यतिथी	चैत्र ३०

प्रत्येक उत्सवात प्रवचने, कीर्तने, भजने असे कार्यक्रम संपन्न होतात व अन्नदानही होते. स्थानिक साधक नियमितपणे या उत्सवात सहभागी होतातच शिवाय परगावातून शिष्य येतात आणि ज्ञानयज्ञाचा प्रसाद घेण्यात धन्यता मानतात. उत्सवात सहभागी झाल्याने स्वतःची उन्नती झाल्याचा अनुभव असंख्य साधकांनी घेतलेला आहे. म्हणूनच या उत्सवात नियमितपणे अनेक वर्षे सातत्याने सहभागी होत असलेल्या शिष्यांची संख्या खूपच मोठी आहे.

श्रीवासुदेव निवासमध्ये होणारे अन्य उत्सव


वासुदेव निवासमध्ये इतरही काही उत्सव संपन्न होतात. या उत्सवांची माहिती पुढे दिली आहे.



श्रीदत्तमहाराज
जालना येथील श्रीदत्त आश्रमात



श्रीवासुदेवनिवासमधील पादुका
श्रीदत्तमहाराज पाद्यपूजेसाठी या पादुका बरोबर नेत असत



श्रीदत्तमहाराज एका भक्ताच्या घरी प्रवेश करतांना



श्रीदत्तमहाराज - ध्यानमुद्रा

श्रीपाद वल्लभ जयंती	भाद्रपद ४
श्री. नरसिंह सरस्वती जयंती	पौष शुद्ध २
गोकुळ अष्टमी	श्रावण कृष्ण ८
रामनवमी	चैत्र शुद्ध ९
हनुमान जयंती	चैत्र शुद्ध १५
श्रीशंकराचार्य जयंती	वैशाख शुद्ध ५
महाशिवरात्र चारी यामांची महापूजा	माघ कृष्ण १३
श्रावणातील श्रावणी (२)	नागपंचमी/नारळी पौर्णिमा
श्रीतुळजाभवानीची महापूजा	श्रावण
गुरुद्वादशी महानैवेद्य	अश्विन वद्य १२

श्रीदत्तमहाराज वयाच्या सोळाव्या वर्षापासून औरवाडला अमरेश्वर मंदिरात नियमितपणे दरवर्षी प्रौष्ठपदीला भागवत सप्ताह करीत असत. इ.स.१९६५ साली वासुदेव निवासची स्थापना झाल्यावर श्रीगुरुमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीदत्तमहाराज प्रौष्ठपदीला वासुदेव निवासमध्येच भागवत सप्ताह करू लागले.

महर्षि व्यासांनी भागवत हे महापुराण रचले ते भक्तीचे गुणगान करण्यासाठी, भक्तीशास्त्राचे तंत्र व मंत्र विशद करण्यासाठी व परमार्थमार्गातील भक्तीचे अनन्य साधारण महात्म्य कथन करण्यासाठी. भागवतसप्ताहाची परंपरा वासुदेवनिवासमध्ये श्रीगुळवणीमहाराजांनी स्वतः सुरू केली ती शक्तिपात साधनेला भक्तीची जोड देण्यासाठी. इ.स. १९६५ सालापासून वासुदेवनिवासमध्ये दरवर्षी भागवतसप्ताहाचे आयोजन केले जात आहे. स्वतः श्रीदत्तमहाराजांनी अनेक वर्षे हा सप्ताह संपन्न केला. श्रीआत्मारामशास्त्री जेरे यांनीही काही वर्षे भागवतसप्ताह संपन्न केला. इ.स. १९९४ पासून वेदशास्त्रसंपन्न पंडीत आनंदशास्त्री पारखी भागवतसप्ताह संपन्न करीत आहेत. असंख्य लोक सप्ताहात श्रवणासाठी व प्रसादाचा लाभ घेण्यासाठी येतात.

त्याशिवाय इ.स. १९६५ सालापासून नवरात्रांत आठ दिवस देवीभागवत सांगितले हाते. महर्षि व्यासांनी जनभोजय राजाला देवीभागवत सांगितले.

त्यात देवीभक्तांच्या अनेक कथा आहेत. त्याशिवाय आदिमाया देवी भगवतीच्या लीलाही वर्णन केल्या आहेत. आदिमाया भगवतीच्या रूपांतून महासरस्वती, महालक्ष्मी व गौरी जन्म घेतात व ब्रह्मा, विष्णु व महेश यांचया जीवनांत प्रवेश करून त्यांना व्यापून टाकतात. सृष्टीची निर्मिती, संचालन व संहार ही तिन्ही कार्ये अशा प्रकारे आदिमाया भगवतीचीच कार्य आहेत हे यांतून सूचित होते. धी, धृति व बुद्धी ही आदिमायेचीच रूपे आहेत. मानवी जीवनही या तीन रूपांतून आदिमाया चालवते. आदिमाया भगवती ही कुंडलिनीशक्ती आहे. म्हणूनच कुंडलीनीयोगक्षेत्राला वाहून घेतलेल्या वासुदेवनिवास या शक्तिपीठामध्ये देवीभागवताचे निरूपण दर वर्षी करणे अत्यंत उचित ठरते. इ.स. १९६५ सालापासून इ.स. १९९४ पर्यंत श्रीदत्तमहाराज स्वतः देवीभागवतातील कथा सांगत व त्या अनुरोधाने तत्त्वज्ञानही विशद करीत असत. आता डॉ.अशोकमहाराज कवीश्वर यांनी देवीभागवताचे निरूपण त्याच शैलीने व त्याच अधिकारवाणीने करण्यास प्रारंभ केला आहे ही सर्वांनाच संतोष देणारी घटना आहे.

⌘⌘⌘

परिशिष्ट क्रमांक - ५

डॉ. अशोकमहाराज

(श्रीदत्तमहाराजांनी दीक्षा देण्याचा अधिकार डॉ. अशोकमहाराजांकडे सोपवला आहे. तो केवळ डॉ. अशोकमहाराज त्यांचे निकटचे अंतरंगशिष्य आहेत आणि परंपरा सांभाळण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झालेला आहे म्हणूनच. त्यामुळे अनेक वाचकांनी विनंती केली की प्रस्तुत चरित्रांत डॉ. अशोकमहाराजांची अधिक माहिती समाविष्ट करावी. त्याप्रमाणे डॉ. अशोकमहाराजांची माहिती पुढे देत आहोत.)

श्रीदत्तमहाराजांना तीन पुत्र आणि तीन कन्या आहेत. थोरले चिरंजीव अशोकराव, आता त्यांचा उल्लेख सर्वजण डॉ. अशोकमहाराज असाच करतात. मधले चिरंजीव अनिलराव आणि धाकटे चिरंजीव अजितराव. थोरल्या कन्या सौ. सुमनताई भातलवंडे या वैराग येथील डॉक्टर श्री. यशवंतराव भातलवंडे यांच्या पत्नी आहेत. मधल्या कन्या सौ. सुलभाताई तांबोळी या मुंबई येथील सरकारी अधिकारी श्री. माधवराव तांबोळी यांच्या पत्नी आहेत. धाकट्या कन्या सौ. शैलाताई आडकर या पुणे येथील सुप्रसिद्ध उद्योजक श्री. अरूणराव आडकर यांच्या पत्नी आहेत. घराण्याच्या परंपरेला शोभेल असा अधिकार सर्वच मुलामुलींना आहे. तथापि, या सर्वांमध्येही डॉ. अशोकमहाराजांचे भाग्य आणि अधिकार खूपच मोठा आहे असे दिसते. म्हणूनच डॉ. अशोकमहाराज यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याकडे श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेब दोघांनीही विशेष लक्ष दिलेले दिसते. भविष्यकाळात त्यांच्यावर परंपरा सोपवता यावी आणि त्यांच्याकडून आध्यात्मिक क्षेत्रात मोठे कार्य व्हावे या हेतूने जाणीवपूर्वक त्यांच्यावर आवश्यक ते संस्कार करून त्यांच्यात दैवीसंपत्ती निर्माण करण्यासाठी त्या दोघांनीही विशेष प्रयत्न केलेले दिसतात. त्याशिवाय डॉ. अशोकमहाराज यांचे भाग्य असे की श्रीधुंडिराजमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज यांनीही अशोकमहाराजांकडे बारकाईने लक्ष ठेवून त्यांच्यात गीतेत सांगितलेल्या दैवीसंपत्तीचा विकास व्हावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. यावर प्रकाश टाकणारे अनेक प्रसंग दिसून येतात.

अशोकमहाराजांच्या जीवनातील जवळ जवळ प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी श्रीधुंडिराजमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज आशीर्वाद द्यायला उपस्थित होते. अशोकमहाराजांचा जन्म झाल्यावर श्रीधुंडिराजमहाराज व श्रीगुळवणीमहाराज यांचे आशीर्वाद त्यांना लाभले. नामकरणाचा विधीही या दोघांच्या उपस्थितीतच संपन्न झाला. माहूर येथील जावळ काढण्याच्या समारंभालाही श्रीधुंडिराजमहाराज व श्रीगुळवणीमहाराज दोघेही उपस्थित होते. मौंजीबंधनाच्या वेळीही अशोकमहाराजांना श्रीधुंडिराजमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज यांचे आशीर्वाद लाभले. शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर अशोकमहाराज श्रीगुळवणीमहाराजांच्या दर्शनाला गेले असतांना श्रीगुळवणीमहाराजांनी त्यांना पाचशे रुपये प्रसाद म्हणून दिले आणि पुढील महाविद्यालयीन शिक्षणासाठी कृपाशीर्वादही दिले. डॉ.अशोकमहाराजांचा विवाह ठरवण्यासाठी श्रीगुळवणीमहाराज आपले सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करून वैरागला गेले होते. त्यांनी व श्रीधडिराजमहाराजांनी वधू पसंत केली आणि वाङ्निश्चय व विवाह प्रसंगी दोघांनीही उपस्थित राहून कार्यक्रम सुव्यवस्थितपणे संपन्न होत आहे हे स्वतः पाहिले. दांपत्य जीवनात पदार्पण करणाऱ्या वधुवरांना आशीर्वाद देतांना दोघेही भावविभोर झाले होते असे सांगतात. डॉ.अशोकमहाराजांना मुलगा झाला तेव्हा प्रपौत्र दर्शनाचा कार्यक्रम वासुदेवनिवासमध्ये आयोजित करण्यात आला होता. शास्त्रविधीप्रमाणे सोन्याची चोवीस फुले पणजोबांनी प्रपौत्रावर उधळायची असतात. आज ऐकून आश्चर्य वाटेल अशी घटना त्यावेळी घडली. सोन्याची बारा फुले श्रीधुंडिराजमहाराजांनी आणि बारा फुले श्रीगुळवणीमहाराजांनी प्रपौत्रावर उधळली.

या सर्व घटनांवरून असे दिसते की श्रीधुंडिराजमहाराज व श्रीगुळवणीमहाराज यांचे डॉ.अशोकमहाराजांवर अगदी पहिल्यापासून लक्ष होते. या दोघांच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आज्ञेप्रमाणे श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांनी डॉ.अशोकमहाराजांच्या बाबतीत सर्व महत्त्वाचे निर्णय घेतले आणि उचित संस्कार करून डॉ.अशोकमहाराजांचे व्यक्तिभाव गुरूत्त्वाच्या परंपरेचा सांभाळ करण्यासाठी घडवले असे आता निश्चितपणे

म्हणता येईल. यात डॉ.अशोकमहाराजांचे पूर्वसुकृत आणि मिळालेला वारसा व्यक्त होतो.

श्रीगुळवणीमहाराज, श्रीधुंडिराजमहाराज, श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब ही चारही विभूतीमत्त्वे एवढी उत्तुंग आहेत की यापैकी एका विभूतीच्या कृपाकटाक्षानेही साधकाचे जीवन घडू शकते. पण डॉ.अशोकमहाराज एवढे भाग्यवान की या चारही विभूतींनी जाणीवपूर्वक एकत्र येऊन एकचित्ताने डॉ.अशोकमहाराजांचे व्यक्तीमत्त्व घडवले. मूळातील सुवर्ण चोखच होते. या चार विभूतींच्या कृपाप्रसादाने ते अधिकच झळाळू लागले. ही घटना सामान्य नाही. भविष्यकाळात डॉ.अशोकमहाराजांकडून फार मोठे आध्यात्मिक कार्य घडणार आहे हेच यातून सूचित होत आहे.

❊ मोठा आध्यात्मिक वारसा

डॉ.अशोकमहाराज यांच्याकडे मोठा आध्यात्मिक वारसा आलेला आहे असे सूचक उद्‌गार श्रीधुंडिराजमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज यांनी अशोकमहाराज यांच्या बालपणीच वेळोवेळी काढलेले आहेत. नामकरणविधीच्या वेळेला, जावळ काढण्याच्या वेळी आणि मौंजीबंधनाच्या वेळी श्रीधुंडिराजमहाराजांनी असे उद्‌गार काढले होते आणि ते ऐकून श्रीगुळवणीमहाराजांनी संमतीदर्शक स्मित हास्य केले होते असे सौ.आईसाहेब मातृसुलभ अभिमानाने सांगायच्या.

डॉ.अशोकमहाराजांच्या लहानपणीची एक घटना फार महत्त्वाची आहे. एकदा श्रीगुळवणीमहाराज सौ.आईसाहेबांना म्हणाले,"आपले थोरले चिरंजीव अशोक आम्हाला देता का? आम्ही त्यांना तयार करू आणि ही परंपरा त्यांच्यावर सोपवू." श्रीगुळवणीमहाराजांचे हे बोलणे ऐकून सौ.आईसाहेब क्षणभर विचारात पडल्या. लौकिक जीवनांत ज्याला आपण सुख समजतो ते सुख गुरूपदी आरूढ असलेल्या श्रेष्ठ साधूंच्या जीवनात फार थोडे असते हे त्या पहात होत्या. विभूतींना कोणत्या त्रासातून जावे लागते, वैयक्तिक सोयी गैरसोयींकडे दुर्लक्ष करून किती तितिक्षा दाखवावी लागते हे त्या स्वतः अनुभवत होत्या. म्हणून आईच्या हृदयातील कळवळ्याने त्या श्रीगुळवणीमहाराजांना म्हणाल्या, "महाराज व्हायचे म्हणजे

फारच त्रास व गैरसोय सोसावी लागते. माझ्या मुलाने डॉक्टर किंवा इंजिनीयर व्हावे असे मला वाटते."

श्रीगुळवणीमहाराजांनी हे उत्तर ऐकून स्मित हास्य केले. पण ईश्वरी संकल्प झालेला होता. श्रीगुळवणीमहाराजांनी आणि श्रीदत्तमहाराजांनी अगदी लहान वयापासूनच डॉ.अशोकमहाराजांवर परंपरेची धुरा सोपवण्याच्या हेतूने तसे संस्कार केलेले स्पष्टपणे दिसतात.

* अनाथ विद्यार्थीगृहात शालेय शिक्षण

या संस्कारांची सुरुवात डॉ.अशोकमहाराजांच्या शालेय शिक्षणापासूनच सुरू झालेली दिसते. डॉ.अशोकमहाराजांचे चौथीपर्यंतचे शिक्षण बार्शीला झाले. पाचवी ते अकरावी असे सहा वर्षांचे शालेय शिक्षण त्यांना अनाथ विद्यार्थीगृहाच्या शाळेत मिळाले. आता ही संस्था पुणे विद्यार्थीगृह या नावाने प्रसिद्ध आहे.

त्या काळात या शाळेत बहुतेक अनाथ मुले व गरीब कुटुंबातील मुले शालय शिक्षण घेत असत. डॉ.अशोकमहाराज अनाथही नव्हते व गरीब कुटुंबातीलही नव्हते. महाराष्ट्रातील कोणत्याही विख्यात शाळेत ते शिक्षण घेऊ शकले असते. श्रीगुळवणीमहाराज नूतन मराठी विद्यालयात अनेक वर्षे शिक्षक होते. तेथे त्यांना सहजपणे प्रवेश आणि शिष्यवृत्ती मिळाली असती. तसेच श्रीधुंडिराजमहाराजांना परमेश्वरस्वरूप मानणारे अनेक शिष्य डॉ.अशोकमहाराजांच्या शिक्षणासाठी वाटेल तितके पैसे खर्च करायला तयार झाले असते. पण अनाथ विद्यार्थीगृह या शाळेतच इतर अनाथ व गरीब मुलांबरोबर त्यांना शिक्षण दिलेले दिसते. ते केवळ आध्यात्मिक बैठक तयार व्हावी याच दृष्टीने.

या शाळेतील विद्यार्थ्यांना अनेक कामे करावी लागत. वर्गातील केर काढणे, आवार झाडून काढणे, तासाची घंटा देणे, आश्रमशाळेतील मुलांसाठी होणाऱ्या स्वयंपाकात मदत करणे, भांडी घासणे, शाळेच्या कार्यालयातील सेवकाची काम इत्यादी कामे विद्यार्थीच करीत. शाळेच्या वर्गात लागणारे लाकडी फर्निचरही बहुशः मुलांकडूनच करून घेण्यात येई. किरकोळ दुरूस्त्याही

मुलेच करत. शाळेच्या कार्यालयातील सेवकांची कामेही विद्यार्थीच करत. या कामासाठी शाळेत गडी किंवा शिपाई नसायचे. शाळेच्या आवारात भाजीपाल्याची मोठी बाग होती. शाळेला मदत व्हावी यासाठी भाजीपाला विकला जाई. या बागेसाठी माळी वा नोकर नव्हते. शाळेतील विद्यार्थीच बागेतील कामे करत.

डॉ.अशोकमहाराजांनीही ही कामे इतर मुलांबरोबर नियमितपणे करावीत असा श्रीदत्तमहाराजांचा आग्रह असे. त्या कामातून कोणतीही सवलत वा सूट डॉ.अशोकमहाराजांना मिळू नये याची श्रीदत्तमहाराजांनी दक्षता घेतली.

अनाथ विद्यार्थीगृह या संस्थेची आर्थिक स्थिती त्या काळात हलाखीची होती. विद्याथ्यानाच पावती पुस्तके दिली जायची आणि घरोघर जाऊन एक एक दोन दोन रुपये अशी मदत गोळा करायला सांगितले जायचे. त्यासाठी अनेक ठिकाणी फिरावे लागायचे. अशोकमहाराजांनीही हे काम अनेक वेळा केले. अशी मदत मागण्यासाठी गेल्यावर अनेक घरांत भिक्षेकऱ्यांना द्यावी तशी वर्तणूक सोसावी लागते याचा अनुभव अशोकमहाराजांनीही अनेक वेळा घेतला. श्रीधुंडिराजमहाराजांचे नातू असलेल्या अशोकमहाराजांसाठी असे जीवन हे एक प्रकारचे दिव्यच होते. पण अशोकमहाराज या दिव्याला शांत मनाने सामोरे गेले. त्यातूनच स्वावलंबन काटकसरीने रहाणे, गरजा कमीतकमी ठेवणे, तितिक्षा व गरीब विद्यार्थ्यांपैकीच एक होऊन तसे सहजीवन जगणे हे संस्कार त्यांच्यावर होत राहिले. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी या तत्त्वाचे बाळकडू यांतून आपोआप मिळत गेले.

शाळेतील शिक्षणाचा दर्जा मात्र उत्तम होता. शाळेत अनेक थोर विद्वान अल्प मानधन घेऊन विद्यार्थ्यांना शिकवायचे. शाळेचे मुख्याध्यापक श्री.ग.श्री. खैर एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व. भगवद्गीतेचे गाढे अभ्यासक. मोठाच व्यासंग. गीतेचा उपदेश स्वतः आचरणांत आणणारे आणि स्वतःच्या आचरणांतून विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे थोर आचार्य असा खैरगुरूजींचा लौकिक होता. शाळेच्या आवारात एक रामरायांचे मंदिर आहे. या मंदिरांत दर शनिवारी सकाळी खैरगुरूजी सर्व विद्यार्थ्यांना एकत्र बोलावीत आणि त्यांच्यावर उत्तम संस्कार व्हावे म्हणून ते चिंतनपर खूप काही विद्यार्थ्यांना सांगत.

भक्तीगीते म्हणून घेत. त्याच चाळीत शेजारी रहाणाऱ्या एका सहाध्यायाची बासरी वापरून अशोकमहाराज बासरी वाजवायला शिकले होते. नागपूरच्या काही मित्रांना अशोकमहाराजांचे बासरी वादन खूप आवडायचे. रागदारीचे बासरीवरील पुढील शिक्षण घ्यावे हा मित्रांचा खूप आग्रह झाला म्हणून त्यांनी नागपूरला एका संगीत विद्यालयात नाव घातले. पण ही गोष्ट कानावर जाताच श्रीदत्तमहाराजांनी नाराजीच्या स्वरात अभ्यासावर सर्व लक्ष केंद्रीत करणे योग्य असे सुचविले.

बासरी शिकण्यासाठी संगीतवर्गात नाव घालणे पिताश्रींना आवडले नाही हे कळताच डॉ.अशोकमहाराजांनी संगीतवर्गातून नाव तर काढून टाकलेच पण आयुष्यात पुढे बासरीला स्पर्शही केला नाही. हे त्यांनी अगदी न बोलता केले. नाराजीही नाही आणि कुठे या घटनेचा उच्चारही नाही. जणू काही आपल्या जीवनात असे काही घडलेच नाही अशाच वृत्तीने ते पुढे वागत राहिलेले दिसतात. या एका घटनेतच वडिलांचा शब्द वेदाज्ञेप्रमाणे मानून डॉ.अशोकमहाराज आज्ञापालन कसे करीत याचे दर्शन होते.

नागपूरच्या महाविद्यालयातून डॉ.अशोकमहाराजांनी बी.ए.एम्.एस्. ही पदवी उत्तम गुण मिळवून संपादन केली आणि ते सोलापूरला दोन वर्षे इंटर्नशीप करण्यासाठी राहिले.

* आध्यात्मिक साधना

इ.स. १९६२ साली अशोकमहाराजांना श्रीधुंडिराजमहाराजांनी मंत्रदीक्षा दिली. तसेच श्रीगुळवणीमहाराजांनी अशोकमहाराजांकडून याच वर्षी काही अनुष्ठाने करून घेतली आणि द्विसाहस्त्रीची पारायणे नियमित करायला सांगितले. तेव्हापासून अशोकमहाराज रोज एक पारायण याप्रमाणे द्विसाहस्त्रीची पारायणे अखंडपणे करीत आले आहेत. आळंदी येथील श्रीनृसिंहस्वामीसरस्वती यांच्या मठातही डॉ.अशोकमहाराजांनी द्विसाहस्त्रीची काही पारायणे केली आहेत.

एकदा श्रीगुळवणीमहाराजांनी सांगितले की वाडीला जाऊन एक आठवडा द्विसाहस्त्रीची पारायणे करावीत. डॉ.अशोकमहाराज त्याच रात्री वाडीला निघाले. गाडीला गर्दी असल्यामुळे बहुतेक उभे राहून किंवा फारतर बसून



डॉ.अशोकमहाराज रेणुकानिवासमध्ये देवांची पूजा करतांना



डॉ.अशोकमहाराज

वासुदेवनिवासमध्ये श्रीदेवीभागवताचे निरूपण करतांना



एका भक्ताच्या निवासस्थानी श्रीदत्तमहाराजांचे स्वागत



श्रीदत्तमहाराज व श्रीयतिमहाराज यांची शास्त्रचर्चा

जावे लागणार अशा अपेक्षेने ते एका डब्यात शिरले. त्यांना पाहून बर्थवर झोपलेला एक प्रवासी एकदम उठला आणि आपले तिकीट त्यांना देऊन म्हणाला, ''मी वाडीला जायचे रद्द करीत आहे. आपण या बर्थवर झोपूनच प्रवास करावा. डॉ.अशोकमहाराजांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. जातानाच हा उत्साहवर्धक अनुभव अनुभवल्यामुळे त्यांनी द्विसाहस्त्रीची पारायणे मोठ्या श्रद्धेने केली. जणू काही बाहेरचे जग या पारायणाच्या काळांत त्यांच्यासाठी नाहीसे झाले होते.

श्रीगुळवणीमहाराजांचे डॉ.अशोकमहाराजांवर किती प्रेम होते हे सर्वांना माहितच आहे. त्यामुळे डॉ.अशोकमहाराजांना श्रीगुळवणी-महाराजांकडून शक्तिपातदीक्षा मिळावी असे वाटे. श्रीगुळवणी-महाराजांना डॉ.अशोकमहाराजांनी शक्तीपातदीक्षा देण्याची अनेक वेळा विनंती केली. तथापि श्रीगुळवणी-महाराजांनी त्यांना शक्तिपातदीक्षा दिली नाही. दीक्षेची विनंती केली की ते म्हणायचे, "स्वयं दत्तप्रभू आपले सद्गुरू आहेत. तेच आपणाला दीक्षा देतील. आमचे आशीर्वाद आहेत." डॉ.अशोकमहाराज या उद्गारांवर चिंतन करीत राहिले. पण तेव्हा त्याचा उलगडा झाला नाही. इ.स. १९८८ मध्ये डॉ.अशोकमहाराजांना श्रीदत्तमहाराजांनी शक्तिपातदीक्षा दिली तेव्हाच डॉ.अशोकमहाराजांना कळले की श्रीगुळवणीमहाराजांच्या मनांत काय अभिप्राय होता.

श्रीदत्तमहाराजांनी काही साधना आणि नित्यक्रम सांगितला होता. या सवाचे नियमित पालन होत असल्यामुळे डॉ.अशोकमहाराजांमध्ये दैवी तेज निर्माण होत गेले. तारुण्यातील रसरशीतपणाला साधनेची जोड मिळाल्यामुळे त्या काळातही डॉ.अशोकमहाराजांचे दर्शन प्रभावित करणारे असे.

या काळात डॉ.अशोकमहाराज व सौ.सुलभाताई गीतरामायणातील गीते आवडीने म्हणत असत. दोघांचेही आवाज गोड आणि तालासुरांचे उपजत ज्ञान यामुळे त्यांचे गाणे सुरेल व श्रवणीय व्हायचे. शिवाय त्यांनी अनेक भक्तांना विवाहसोहळ्याच्या वेळी गाण्यासाठी छंदोबद्ध मंगलाष्टके रचून दिलेली आहेत. या मंगलाष्टकांमध्ये व्यावहारिक शिकवण आणि आध्यात्मिक उपदेश यांची उचित सांगड आहे.

श्रीदत्तमहाराज निवडक साधकांना साधना तीव्र करण्याचा आदेश देत असत आणि आहारविहार, आचारविचार इत्यादीसंबंधी काही आज्ञावजा सूचना करीत असत. (या अशा सूचनांसंबंधी काही माहिती "विचारधन भाग-एक" या पुस्तकातील पृष्ठ क्र. २२६ ते २४३ येथे आहे.) या सर्व आज्ञावजा सूचना श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांना त्यांचे मौजीबंधन झाल्यापासूनच द्यायला प्रारंभ केला होता. वेळोवेळी दिलेल्या या सूचनांचे पालन डॉ.अशोकमहाराज तेव्हापासून सतत सातत्याने आणि निष्ठेने करीत आले आहेत. एक उदाहरण म्हणून एका बाबीचा येथे उल्लेख करता येईल. आहारविहार याबाबतीत प्रगत साधकांना दिलेली एक सूचना अशी आहे की विनाकारण कोणाच्याही घरी जाऊ नये. यामुळे जास्तीत जास्त वेळ वाचवता येतो आणि अंतर्मुख वृत्तीने नामस्मरण करीत रहाता येते. डॉ.अशोकमहाराज या सूचनेप्रमाणे इतके निष्ठेने वागत राहिले आहेत की सवितावहिनींशी विवाह झाल्यानंतर तेवीस वर्षाच्या कालखंडात ते सासुरवाडीला (स्वतःच्या) एकदाही गेले नाहीत. हे एकच उदाहरण त्यांच्या काटेकोर आज्ञापालनाचे दर्शन घडविते. विशेष म्हणजे सौ.सवितावहिनींनीही आपल्या पतीने आपल्या माहेरी यावे असा आग्रह धरला नाही किंवा ते तिथे आले नाहीत म्हणून कधी शब्दातून वा कृतीतून नाराजीही व्यक्त केली नाही. त्यांचा असा पाठींबा असल्यामुळेच डॉ.अशोकमहाराजांची साधना निर्वेध होऊन उच्च स्तरावर पोचू शकली हे उघड आहे.

❊ ग्रामीण भागात रूग्णसेवा

सोलापूरला डॉ.वळसंगकर हॉस्पिटल या नामांकित हॉस्पिटलमध्ये डॉ.अशोकमहाराजांनी दोन वर्षे (इ.स. १९६५ ते इ.स. १९६७) इंटर्नशीप केली. या काळातही त्यांच्या हाताला चांगला गुण आहे असे सांगून अनेक रूग्ण त्यांच्याचकडून उपचार घेण्याचा आग्रह धरीत. हॉस्पिटलमधील एक सर्जन डॉ. चितळे अनेक वेळा शस्त्रक्रियेच्या वेळी डॉ.अशोकमहाराजांना मदतीसाठी बोलवीत. त्यामुळे त्यांना सर्जरीचेही ज्ञान होत गेले. एकदा एक अपघातात सापडलेला रूग्ण हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाला होता. तातडीने शस्त्रक्रिया करणे जरूरीचे होते. डॉ. चितळे परगांवी गेले होते. तेव्हा

डॉ.अशोकमहाराज आपणहून पुढे आले आणि नर्सेसच्या मदतीने आवश्यक ती सर्जरी त्यांनी केली. हे काम इतके व्यवस्थित झाले होते की डॉ. चितळे परत आल्यावर ते काम पाहून आश्चर्यचकित झाले.

दोन वर्षांचा इन्टर्नशीपचा काळ पूर्ण झाल्यावर त्या हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनी असे सुचविले की डॉ.अशोकमहाराजांनी तेथेच हॉस्पिटलमध्ये रहावे. परंतु श्रीदत्तमहाराजांनी त्यांना एखाद्या खेड्यात राहून ग्रामीण भागातील जनतेची सेवा करावी असे सांगितले. खेड्यातच रहायचे तर मराठवाड्यातील अनेक गावात श्रीधुंडिराजमहाराजांचे शिष्य होते. महाराष्ट्रात ठिकठिकाणी श्रीगुळवणीमहाराजांचे शिष्य होते. परंतु श्रीधुंडिराजमहाराज किंवा श्रीगुळवणीमहाराज यांचा प्रभाव नसलेले पिंपळगाव हे खेडे निवडून डॉ.अशोकमहाराजांना दवाखाना काढायला सांगण्यात आले.

पुणे, मुंबई, सोलापूर अशा मोठ्या शहरात दवाखाना न काढता तो ग्रामीण भागात काढावा अशी आज्ञा करण्यामागे त्यांच्यावर वेगळे संस्कार करण्याचा दृष्टीकोन असावा असे वाटते. कारण पिंपळगावला दवाखाना काढायचे ठरल्यावर श्रीदत्तमहाराज त्यांना म्हणाले,"सेवा करा पण दयाबुद्धीने करू नका, उपकार म्हणून करू नका, सेवेचा अहंकार उत्पन्न होऊ देऊ नका. उलट ज्याची सेवा करता तोच आपल्याला उपकृत करीत आहे या भावनेने सेवा करा"

डॉ.अशोकमहाराज या आज्ञेचे निष्ठेने पालन करीत राहिले. त्यांच्या लक्षात आले की श्रीदत्तमहाराजांनी आपल्याला रूग्णांची निरपेक्ष सेवा करायला सांगितली आहे याचाच अर्थ असा की वेदान्तातील तत्त्वाप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष आचरण करावे अशी श्रीदत्तमहाराजांची इच्छा आहे. याची पूर्ण जाण ठेवूनच डॉ.अशोकमहाराज पिंपळगाव येथे रूग्णसेवा करत राहिले.

विवाह

इ.स.१९६९ साली डॉ.अशोकमहाराज यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नी सौ.सवितावहिनी या कळंब गांवातील डांगे घराण्यांतील. डॉ.अशोकमहाराजांसाठी वधू पसंत केली श्रीधुंडिराजमहाराज आणि

श्रीगुळवणीमहाराज यांनी. मुलगी पहाण्याचा कार्यक्रम वैराग येथे झाला. श्रीगुळवणीमहाराज आपले सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द करून मुद्दाम पुण्याहून वैरागला गेले होते. श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेबही त्यांच्याबरोबर वैरागला गेल्या.

वधू पहाण्याचा कार्यक्रम डॉ.भातलवंडे यांच्या घरी झाला. श्रीधुंडिराजमहाराज, श्रीगुळवणीमहाराज आणि श्रीदत्तमहाराज दिवाणखाण्यात ओळीने बसले होते. त्यांच्यापुढे पाठवितांना सवितावहिनींच्या आईने दहा रुपये हातात दिले व सांगितले की श्रीधुंडिराजमहाराजांच्यापुढे ते पैसे ठेवून त्यांना नमस्कार करावा. सवितावहिनींना वाटले की महाराज म्हणजे भगवे कपडे परिधान केलेले आणि दाढी वाढवलेले कोणीतरी जटाधारी असतील. समोर बसलेल्या मंडळीत त्यांना तसे कोणीच दिसले नाहीत. म्हणून सर्वांना नमस्कार करून त्या पैसे हातात ठेवून तशाच घरात परत गेल्या आणि आईला विचारू लागल्या की महाराज कुठे आहेत? मला तर कोणी महाराज दिसले नाही.

सवितावहिनींच्या मनातील हा गोंधळ लक्षात येताच सर्वजण हसू लागले. घरातील मंडळींनी श्रीधुंडिराजमहाराजांकडे बोट दाखवून त्यांना परत दिवाणखान्यात पाठविले. सवितावहिनींनी परत येऊन श्रीधुंडिराजमहाराजांपुढे पैसे ठेवून नमस्कार केला, तेव्हा त्यांच्या मनातील हा गोंधळ सर्वांच्याच लक्षात आला. श्रीधुंडिराजमहाराज व श्रीगुळवणीमहाराज तर खूपच हसू लागले. श्रीगुळवणीमहाराज कौतुकाने म्हणाले,"चांगली आहे बरं मुलगी."

दोघांनीही सौ.आईसाहेबांना विचारले, ''काय सूनबाई पसंत आहेत नां!'' त्यांच्या या प्रश्नातच त्यांची पसंती व्यक्त होत होती.

विवाह निश्चित झाला. विवाह समारंभाच्या तयारीच्या बाबतीत कोणीतरी बोलायला सुरुवात करताच श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''घरातले सगळे आम्ही आईसाहेबांकडे सोपवले आहे. आम्ही त्यात लक्ष घालत नाही. काय ते त्यांनाच विचारून घ्यावे.''

वाङ्निश्चय व विवाहाची सर्व तयारी आईसाहेबांनीच चोख केली होती. श्रीगुळवणीमहाराजांनी सुचवले की वाङ्निश्चय समारंभ वासुदेवनिवासमधील

मंदिरात व्हावा. त्याप्रमाणे हा समारंभ वासुदेवनिवासमध्येच संपन्न झाला. वास्तविक वासुदेवनिवासमध्ये वाङ्निश्चय, विवाह अशा समारंभांना परवानगी न देण्याचा संकेत आहे. सुरुवातीपासून हा संकेत कटाक्षाने पाळला गेला आहे. श्रीगुळवणीमहाराजांनी स्वतः हा अपवाद घडवून आणावा यात त्यांचे अशोकमहाराजांवरील प्रेमच व्यक्त होते.

विवाह समारंभ पुणे येथे झाला. पूर्वनियोजित भागवतसप्ताह व इतर कार्यक्रम यामुळे श्रीदत्तमहाराज केवळ दोन दिवस अगोदर पुण्याला आले. परंतु आईसाहेबांनी सर्व तयारी केलेली असल्यामुळे कार्यक्रम सुव्यवस्थितपणे पार पडला. आईसाहेबांचे पूर्वनियोजन किती रेखीव असते याचा या समारंभात सर्वांना विशेषत्त्वाने प्रत्यय आला. विवाह समारंभाला श्रीगुळवणीमहाराज व श्रीधुंडिमहाराज या दोघांनीही जातीने उपस्थित राहून वधुवरांना शुभाशीर्वाद दिले.

* श्रीगुळवणीमहाराजांचा सूचक प्रश्न

पिंपळगावला असतांना डॉ.अशोकमहाराजांना पुण्याची ओढ खूप वाटायची. आईवडीलांनाही भेटावेसे वाटे व श्रीगुळवणीमहाराज यांचेही दर्शन उत्कटतेने घ्यावेसे वाटे. महिन्यातून एकदातरी पुण्याला यायचे.

पिंपळगावपासून आळंदी पाच मैलांवर आहे. श्रीगुळवणीमहाराजांची अशी आज्ञा होती की डॉ.अशोकमहाराजांनी आधी आळंदीला जाऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन घ्यावे आणि मगच पुण्याला यावे. त्याप्रमाणे डॉ.अशोकमहाराज सायकलवरून आधी आळंदीला जात, श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन घेत आणि सायकल तेथेच एका घरात ठेवून तेथून बसने पुण्याला येत. क्वचित प्रसंगी सोयीची बस नसेल तर डॉ.अशोकमहाराज सायकलनेच पुण्याला आले असेही घडले आहे.

पुण्याला आल्यावर सौ.आईसाहेबांना भेटून लगेचच डॉ.अशोकमहाराज श्रीगुळवणीमहाराजांच्या दर्शनाला जायचे. दरवेळेला श्रीगुळवणीमहाराज त्यांना विचारायचे, "काय मोटार घ्यायची ठरली ना? केव्हा घेताय मोटार?"

सुरुवातीला डॉ.अशोकमहाराज या प्रश्नाचा अर्थ काय असेल यावर चिंतन करीत राहिले. साध्या रोजच्या गरजा नीट भागणेही अवघड जायचे. मग मोटार


कुठली घेणार हा विचार डॉ.अशोकमहाराजांच्या मनांत यायचा. परंतु प्रॅक्टीस सुरू केल्यावर काही सहाध्यायी डॉक्टरांनी भल्याबुऱ्या मार्गाने भरपूर पैसे मिळवून दोनतीन वर्षातच मोटारी घेतल्या तेव्हा श्रीगुळवणीमहाराजांच्या त्या प्रश्नातील अभिप्राय डॉ.अशोकमहाराजांच्या लक्षात आला. त्यांनी ओळखले की हा प्रश्न विचारून गुरूमहाराज सांगताहेत, रूग्णसेवा साधना म्हणून करावी. व्यवसायदृष्टी ठेवून पैसे मिळवण्याचे उद्दिष्ट असू नये.

श्रीगुरूमहाराजांच्या या इच्छेचे डॉ.अशोकमहाराजांना कधीही विस्मरण झाले नाही. गुरूमहाराजांची ही इच्छा शिराधार्य मानून पिंपळगाव येथील दवाखाना डॉ.अशोकमहाराजांनी पहिल्यापासून सेवाभावानेच चालवला. गरीबांना औषधेही मोफत मिळायची आणि अनेकवेळा अन्नाला मोताद असलेल्या रोग्यांना पेजेसाठी तांदुळही मिळायचे . चांगल्या घरातील रोग्यांनाही डॉ.अशोकमहाराज सांगायचे, तुम्हाला परवडतील तेवढेच पैसे द्यावेत. श्रीमंत रोगी आले तरीही डॉ.अशोकमहाराज निश्चित फी अशी सांगत नसत. काय द्यायचे ते द्या, असेच डॉ.अशोकमहाराज म्हणत. पिंपळगांवच्या परिसरात अनेक धनिक बागायतदार होते. त्यांच्या कुटुंबातील मंडळीही दवाखान्यात यायची. डॉ.अशोकमहाराजांनी पैसे मागितले नाहीत म्हणून काही बागायतदारांचे कुटुंबीय काहीच फी देत नसत. पण डॉ.अशोकमहाराज ते मनांतही ठेवत नसत. ही मंडळी पुन्हा औषधासाठी आली की औषध देतांना पूर्वीची फी राहिली आहे याचा विचारही त्यांच्या मनांत येत नसे.

ईश्वरी कृपेने हाताला उत्तम गुण होता. त्यामुळे अगदी अत्यवस्थ अवस्थेला गेलेला रोगी बरा झाल्याच्या घटना सातत्याने घडत राहिल्या. त्यामुळे दवाखान्यात रोग्यांची खूप गर्दी असायची. पण दिवसाच्या शेवटी मिळकत मात्र तुटपूंजीच असायची. कारण आपणहून पैसे देणारे फार थोडे रोगी असायचे.

* वेगळे डॉक्टर वेगळा दवाखाना


डॉ.अशोकमहाराजांच्या ठिकाणी असलेले सप्ततेज, दयार्द्रबुद्धी आणि योग्यता त्या काळातही पिंपळगांवमधील काही तरुणांच्या लक्षात आली होती. त्यामुळे तशी मनोधारणा असलेले एक छोटे वर्तुळच तेथे निर्माण झाले.



श्रीयतिमहाराज (श्रीनारायणानंद-सरस्वती)
यांची वासुदेवनिवासला भेट



डॉ.अशोकमहाराज व सौ.सवितावहिनी वासुदेवनिवासमध्ये



श्रीदत्तमहाराज यांचा वर्धापनदिन रेणुकानिवासमध्ये



एका भक्ताच्या घरी
श्रीदत्तमहाराजांचे
स्वागत

या मित्रवर्तुळातील एकाने डॉ.अशोकमहाराजांच्या दवाखान्यासंबंधी आपल्या आठवणी पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत, "डॉ.अशोकमहाराज साध्या लाकडी खुर्चीवर बसायचे. प्रत्येक रोग्याची शांतपणे व दयार्द्रभावनेने विचारपूस करायचे. सर्व रोग्यांची तपासणी योग्यप्रकारे व्हावी व सर्वांना उपचार व्यवस्थित मिळावेत म्हणून डॉक्टर अतिशय काळजी घेत. अनेक रोगी आले तरीही त्या व्यापातही बोलणे मृदु आणि गोडच असायचे. डॉक्टरांची शांत व सात्त्विक मुद्रा पाहूनच रोग्याचा निम्मा आजार बरा व्हायचा. अनेकवेळा अगदी स्पष्टपणे जाणवायचे की डॉ.अशोकमहाराज रूग्णसेवा साधना म्हणूनच करताहेत. कितीही कामात गढलेले असले तरी चेहऱ्यावरील सौम्य-शीतल भाव कमी व्हायचा नाही."

"डॉ.अशोकमहाराजांवर गुरूकृपा होती, म्हणूनच भरपूर पैसे मिळविण्याची व्यावसायिक वृत्ती त्यांच्या मनात कधीच निर्माण झाली नाही. त्यामुळे वाटायचे इतर दवाखान्यांपेक्षा हा दवाखाना वेगळा आहे. अनेकवेळा रात्री दूरच्या गावात सायकलवरून रोगी पहायला गेले असले तरी सकाळी पुन्हा वेळेवर हजर रहायचे आणि ताजेतवाने त्याच उत्साहाने कामाला लागायचे."

डॉ.अशोकमहाराजांच्या मित्राने केलेले एक वर्णन त्यांच्या पिंपळगांव येथील डॉक्टरकीच्या जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणारे आहे.

सौ.सवितावहिनीना पतीच्या अधिकाराची आणि सेवावृत्तीची त्यांना अल्पकाळातच जाणीव झाली. म्हणून त्यांनी पतीच्या सेवाव्रताला व साधनेला कधीही विरोध केला नाही. जी मिळकत हातात येई त्यातच त्या प्रसन्न मनाने संसार करत राहिल्या. ऐहिक संपत्ती व सुखसोयी मिळाव्या म्हणून पतीने अधिक पैसे मिळवावे असा आग्रह त्यांनी धरला नाही.

प्रारंभीच्या काळात दवाखान्यात कम्पाउन्डर वा नर्स नव्हती. सौ.सवितावहिनीच ती कामे करायच्या. पुढे नर्स नेमली तरीही त्या नर्सच्या मदतीला सौ.सवितावहिनीच आपणहून पुढे यायच्या.

डॉ.अशोकमहाराजांचे पुत्र चि.आमोद यांना शिशु शाळेपासूनच शिक्षणासाठी श्रीदत्तमहाराजांनी पुण्यात स्वतःजवळच ठेवून घेतले होते. त्यांना

भेटण्यासाठी म्हणून सौ.सवितावहिनींना आईसाहेब बोलावून घ्यायच्या. नित्यनैमित्तिक व्रते, अनुष्ठान, कुळधर्म, सणवार यासाठीही सौ.सवितावहिनींना बोलावून घेत. यामुळे सवितावहिनींना कुलपरंपरेची माहिती होत गेली. सौ.आईसाहेब सर्व काही सवितावहिनींकडून नीटपणे होत आहे याकडे काटेकोरपणे लक्ष द्यायच्या.

कवीश्वरांच्या घरात आल्यानंतर अल्पकाळातच सौ.सवितावहिनींना श्रीदत्तमहाराजांच्या थोरवीची जाणीव झाली आणि त्या श्रीदत्तमहाराजांकडे सद्गुरू म्हणून पाहू लागल्या. आपले सासरे व सासुबाई हे साक्षात पांडुरंग व रखुमाई यांचेच रूप आहे, या श्रद्धाभावनेने त्या त्यांची सेवा करीत राहिल्या. त्यांच्या आज्ञेत राहिल्या. अनेक धार्मिक व्रते व उपासना श्रद्धेने करीत राहिल्या. त्यामुळे सौ.सवितावहिनींवरही पूर्ण गुरूकृपा झाली.

* सेवाव्रताची एक प्रातिनिधीक घटना

दिवसभर दवाखान्यात रोग्यांची गर्दी असे. वेळीअवेळी अगदी रात्रीसुद्धा रोगी येऊन दार ठोठावत आणि जवळच्या खेड्यात रोग्याला पहाण्यासाठी येण्याची विनंती करीत. रोगी दूरच्या खेड्यांतला असला, अपरात्री कोणी बोलवायला आलेला असला तरी उपचारासाठी त्याच्याबरोबर जायला डॉ.अशोकमहाराज नेहमीच तत्पर असायचे. कुणालाही नकार द्यायचा नाही हा अलिखित नियम होता. दूरदूरच्या खेड्यातही सायकलवरूनच जायचे. उदाहरण म्हणून एक घटना सांगता येईल. असाच एक रोजच्यासारखा कामाच्या गर्दीचा दिवस. दवाखान्यातील काम संपवून डॉ.अशोकमहाराज नुकतेच घरात आले होते. रात्रीचे दहा वाजले होते. डॉ.अशोकमहाराज जेवायला म्हणून पाटावर येऊन बसले. सौ.सविता वहिनीनी ताट वाढले, जेवायला सुरुवात करणार एवढ्यात एक शेतकरी आला. सहा किलोमीटर अंतरावरील एका खेड्यातून तो आला होता. "मुलगा आजारी आहे. निपचित पडलाय. ताबडतोब माझ्याबरोबर चला" अशी त्याने विनंती केली. त्याने सांगितलेल्या लक्षणांवरून आजारपण गंभीर स्वरूपाचे वाटत होते. ताबडतोब निघायला हवे होते. वेळ दवडून चालणार नव्हते. डॉ.अशोकमहाराज आपोष्णी घेऊन तसेच उठले. सौ.सवितावहिनींनी दोन घास खाऊनच जावे

असा आग्रह धरला नाही. शांतपणे त्यांनी ताट उचलून झाकून ठेवले.

सायकल घेऊन डॉ.अशोकमहाराज त्या शेतकऱ्याबरोबर निघाले. पाऊस जोरात कोसळत होता, ढगांचा गडगडाट, वीजा चमकताहेत, रात्रीच्या अंधारात रस्ता दिसेना. चिखलातून सायकल पुढे जाईना. तेव्हा हातात सायकल धरून डॉ.अशोकमहाराज तसेच चालत त्या शेतकऱ्याच्या घरी गेले. निपचित पडलेल्या त्या मुलाला इंजेक्शन व औषधे देऊन डॉ.अशोकमहाराज म्हणाले, "काळजी करू नका. सकाळपर्यंत बरे वाटेल." ते परत जायला निघताच तो शेतकरी घरापर्यंत पोचवायला बरोबर येऊ लागला. पण डॉ.अशोकमहाराजांनी त्याला बरोबर येऊ दिले नाही. तुम्ही इथेच थांबण्याचीच जास्त गरज आहे असे सांगून ते एकटेच घरी परत गेले.

पहाटे मुलाला बरे वाटले. मला भूक लागली, जेवण द्या असे तो आईला म्हणू लागला. आईबाबांना आनंद झाला. पण जेवण द्यायचे की नाही हे कळेना. त्यांनी लगेच पिंपळगांवला डॉक्टरांकडे धाव घेतली. जेवण मागतो आहे, काय करावे असे विचारले. डॉक्टरांनी सांगितले हलके काहीतरी द्यावे. जेवण एकदम देऊ नये. त्याप्रमाणे त्या शेतकऱ्याने केले.

मुलगा बरा होताच तो शेतकरी व त्याची पत्नी डॉक्टरांकडे आले. मुलगा वाचवला म्हणून पाया पडू लागले. पैसे किती झाले असे त्यांनी विचारले. झोपडीतले दारिद्र्य पाहिलेले असल्यामुळे डॉ.अशोकमहाराज म्हणाले, "तुला पैसे देणे शक्य नाही. तू काही देऊ नकोस." अनेक वेळा विचारूनही डॉ.अशोकमहाराज ठामपणे तेच उत्तर देत राहिले. नाईलाजाने दोघेही तसेच घरी परत गेले.

परंतु त्या शेतकऱ्याच्या पत्नीला पैसे न देणे बरे वाटेना. तिने घरातील भांडी सावकाराकडे गहाण ठेवली, कर्ज काढून काही पैसे घेऊन ते दोघेजण डॉ.अशोकमहाराजांकडे आले. कर्ज काढून पैसे आणले आहेत हे कळताच डॉ.अशोकमहाराज रागावले. काहीशा निश्चयी आवाजात त्यांनी सांगितले, "आधी पैसे परत करून सावकाराकडून भांडी सोडवून आणा". शेतकरी व त्याची पत्नी पैसे घेण्यासाठी विनवणी करू लागले तेव्हा त्यांच्या भावना समजून घेऊन ते म्हणाले, "पैसे द्यायचीच तुमची इच्छा आहे ना! मग जसे

जसे पैसे जमतील तसे पैसे देत जा, मी ते घेईन." शेतकऱ्याने खरोखरीच पुढील दोन वर्षात दोनदोन रुपये असे पैसे आणून दिल.

ही एकच अशी घटना नव्हती. अशा घटना सातत्याने घडत राहिल्या त्यामुळे डॉ.अशोकमहाराजांची लोकप्रियता वाढतच चालली.

* असाधारण तितिक्षा

गावचा सरपंच औषध नेत असे. पण अनेक वर्षे त्याने फीच दिली नव्हती. डॉक्टरांनीही कधी थकलेल्या फीबद्दल तगादा लावला नाही. त्याच सरपंचाला डॉक्टरांची लोकप्रियता सहन होईना. डॉ.अशोकमहाराज उच्चवर्णीय होते हाच त्यांचा गुन्हा. त्या सरपंचाने आपल्या जातीतील डॉक्टर गावात आणला आणि त्याला दवाखाना उघडून देऊन डॉ.अशोकमहाराजांना स्पर्धा निर्माण केली. पण डॉ.अशोकमहाराजांकडील रोग्याची संख्या कमी झाली नाही. उलट सरपंचाच्या मुलीलाच त्या डॉक्टरने चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे ती मुलगी अत्यवस्थ झाली. नव्या डॉक्टरने हात टेकले. शेवटी सरपंच व त्याची आई डॉ.अशोकमहाराजांकडे आले, पाया पडू लागले, "चूक झाली क्षमा करा आणि ताबडतोब येऊन मुलीचे प्राण वाचवा" अशी विनंती करू लागले. डॉ.अशोकमहाराजही सर्व काही विसरून त्याच्या घरी गेले. मुलगी खरोखरीच गंभीर अवस्थेत होती. डॉ.अशोकमहाराज म्हणाले, "मुलगी वाचविणे कठीण आहे मी प्रयत्न करून बघतो." पण ईश्वराने ठरवले म्हणजे काहीही होऊ शकते असे म्हणतात. येथेही तसेच घडले. जवळजवळ हातातून गेलेली मुलगी डॉ.अशोकमहाराजांच्या औषधाने बरी झाली.

सरपंचाच्या आईला डॉक्टरना काहीतरी भेट द्यावी असे वाटले. पण डॉक्टर काही तसे घेण्याची शक्यता नव्हती. ती सोन्याच्या पाटल्या घेऊन डॉक्टरांच्या घरी आली आणि तिने त्या सौ.सवितावहिनींपुढे भेट म्हणून पुढे ठेवल्या. परंतु डॉक्टरांनी ती भेट घ्यायचे नाकारले. फक्त औषधाचे वाजवी पैसे घेतले आणि थकलेली फी स्वीकारली. ही हकीकत गावात सगळीकडे पसरताच लोकांच्या मनातील डॉक्टरांबद्दलचा आदर शतपटीने वाढला.

इ.स. १९६७ ते १९८६ अशी एकोणीस वर्षे डॉक्टरांनी अशी रूग्णसेवा केली. यापैकी पहिली सतरा वर्षे ते सायकलनेच रोग्यांना पहाण्यासाठी गावोगावी जात. शेवटच्या दोन वर्षात मात्र त्यांनी राजदूत घेतली होती.

* अनुष्ठाने व व्रते

इ.स. १९६२ पासून डॉ.अशोकमहाराज द्विसाहस्त्रीचे रोज एक पारायण करीत आले आहेत. त्याशिवाय नित्यनैमित्तिक व्रते व अनुष्ठाने ते नेहमीच करीत असतात. नामस्मरण तर सारखे चालू असायचे.

गुरूतत्त्वाच्या अनुसंधानात ते सतत असतात. त्यामुळे ऐहिक जीवनातील, सुखदुःखे, निंदास्तुती, मानअपमान या भावनांपासून ते अलिप्त राहिले आहेत आणि नेहमी संतुष्ट व समाधानी राहिले आहेत.

कोणाशी संघर्ष न करणे या नियमाचे डॉ.अशोकमहाराजांनी व्रत म्हणूनच पहिल्यापासून पालन करीत आले आहेत. आता तर तो त्यांचा स्वभावच बनला आहे. कोणी त्रास दिला, निंदा केली, उलटसुलट बोलले, तर गप्प बसणे आणि त्याची उपेक्षा न करणे हेही त्यांनी पहिल्यापासून स्वीकारले आहे. असे प्रसंग डॉ.अशोकमहाराज मनांतूनच काढून टाकतात. पुढे तो मनुष्य भेटला तर तसे काहीच झाले नाही अशा वृत्तीने त्याच्याशी प्रेमाने व जिव्हाळ्याने वागतात, प्रसन्नपणे त्याच्याशी बोलतात. "उपेक्षा करायची, ज्याचे कर्म त्याच्याबरोबर" हे तत्त्व त्यांच्या जीवनातील एक प्रधान सूत्र आहे.

. पिंपळगांव येथील वास्तव्यांतील आणखी एक सेवा म्हणजे गरीब कुटुंबातील मुलांना पुढील शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देणे व आर्थिक मदत करणे. अनेक गरीब कुटुंबात मुले हुशार असली तरी पुढे शिक्षण चालू ठेवणे परवडायचे नाही. पालकही शिक्षणाच्या खर्चाचा विचार करायचे आणि मुलांचा आत्मविश्वासही परिस्थितीमुळे गळून गेलेला असायचा. डॉ.अशोकमहाराज अशावेळी मुलांशी आपलेपणाने बोलून त्यांचा आत्मविश्वास जागृत करायचे आणि पालकांचीही समजूत काढून मुलांना शिक्षण दिल्यामुळे काही काळ थोडा त्रास झाला तरी पुढे संपूर्ण कुटुंबाची परिस्थिती कशी सुधारेल हे पटवून द्यायचे. प्रसंगी आर्थिक मदतही करायचे. तसेच पुस्तके, वह्या वगैरे शिक्षण साहित्यही त्यांनी कित्येक मुलांना दिले आहे.

डॉ.अशोकमहाराजांचे असे उत्तेजन व सक्रीय मदत असल्यामुळेच पिंपळगांव परिसरातील अनेक गरीब मुलांचे शिक्षण पूर्ण होऊ शकले. एक प्रातिनिधिक घटना पुढे दिली आहे. एक मुलगा शालांत परिक्षेत चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाला. आईवडिलांनी त्याचे शिक्षण थांबवून त्याला नोकरीला लावण्याचे ठरवले. पण डॉ.अशोकमहाराजांच्या मनाला ते पटेना. ते स्वतः त्या मुलाच्या घरी गेले आणि मुलाच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी मी घेतो असे सांगून ते त्याला पुण्याला घेऊन आले. बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये त्याला घेऊन गेले. फी भरून त्याचे नाव कॉलेजात घातले. वसतीगृहाची फी भरून त्याची तेथे रहाण्याची सोयही केली. याच्या शिक्षणाचा पुढील खर्चही त्यांनी केलाच त्यामुळे तो मुलगा चार्टर्ड अकाउन्टंट होऊ शकला.

अशी अनेक उदाहरणे पिंपळगांव परिसरात सांगितली जातात. डॉ.अशोकमहाराज मात्र या मदतीचा कधीच याचा उच्चार करीत नाहीत किंवा या विद्यार्थ्याने मदतीची जाण वा कृतज्ञता ठेवली नाही तरीही खेद वा खंत या भावनाही त्यांच्या मनांत कधीही येत नाहीत. मदत करायची निरपेक्ष भावनेने आणि मग ती मदत विसरून जायचे हा जात्याच स्वभाव झाला आहे.

डॉ.अशोकमहाराजांचे पिंपळगावमधील १९ वर्षांचे वास्तव्य ज्यांनी अगदी जवळून पाहिले ते एक परिचित सांगतात- मी माझ्या आयुष्यात ज्या थोर व्यक्ती पाहिल्या त्यातील सर्वात लक्षणीय व्यक्ती म्हणजे डॉ.अशोकमहाराज. प्रारंभीच्या परिचयातच मला वाटले की त्यांची वैराग्यशीलता जन्मापासूनच ते घेऊन आले आहेत. त्यामुळे पिंपळगाव येथील दवाखाना सुरू करतानाच ती त्यांची वैराग्याची उर्मी मनांतून वर उफाळून आली आणि त्या उर्मीने त्यांचे व्यक्तिमत्त्व पूर्णतया व्यापून टाकले. त्यांची साधना सातत्याने चालायची आणि सेवाकार्यही निरलसवृत्तीने चालायचे. त्यामुळे सर्वांच्या मनांत त्यांना पाहून आदराची भावना निर्माण व्हायची. सामान्य माणसाच्या मनांत ज्या प्रापंचिक कामना व इच्छा असतात त्या डॉ.अशोकमहाराजांच्या मनांत आलेल्या कधीच दिसल्या नाहीत.

"डॉ.अशोकमहाराजांची काम करण्याची वृत्ती सर्वेषाम्अविरोधेन या सूत्राला धरून असायची. ज्याचे कर्म त्याच्याबरोबर हे त्यांचे आवडते तत्त्व

होते. निंदा करण्याऱ्यांची उपेक्षा करायची नाही. त्यांचे विचार मनांतही आणायचे नाही असे त्यांचे वागणे असायचे." त्यांचे वागणे उदारपणाचे असायचे. गरीब लोकांबद्दल आणि दुःखी लोकांबद्दल मनांत कणव असायची आणि कर्तबगार डॉक्टर असूनही एक निर्मळवृत्ती आहे असे त्यांच्या वागण्या बोलण्यात जाणवत रहायचे. वृत्ती क्षमाशीलच असायची. कोणी चुकला तर हळूवार सौम्य शब्दांत मायेने समजावून सांगायचे. वागणे साधे असायचे, गरजेपेक्षा जास्त सुखसोयी वा वस्तु देऊ केल्या तर ते हळूवार शब्दांत सौम्यपणे नाकारायचे. वागणे विनयशील असायचे. ज्येष्ठ किंवा वयस्कर माणसांचा मान राखण्यात ते नेहमी तत्पर असायचे. वागण्या बोलण्यात निरहंकारिता जाणवायची.

"अडचणी व संकटाचे प्रसंग येऊनही ते स्थिरवृत्तीने तसेच ही तत्त्वे उराशी बाळगून वाटचाल करीत राहिले. गावातील लोकांसाठी शारीरिक श्रमाची कामे करायलाही ते आपलेपणाने पुढे व्हायचे. म्हणूनच असे वाटायचे की ते उच्च स्तरावरील जीवन जगणारे डॉक्टर आहेत."

* चिंतन व मनन

एकोणवीस वर्षाच्या या प्रदीर्घ कालखंडात डॉ. अशोकमहाराज विविध प्रकारचे अनुभव तटस्थ भावनेने घेत राहिले. त्याचवेळी समाजाचे सखोल निरीक्षण ते डोळसपणाने करीत राहिले. मनात अध्यात्मशास्त्राचे चिंतन व मनन चालूच होते. त्यामुळे त्यांची बुद्धी अधिकाधिक सूक्ष्म होत गेली, मूलगामी व समन्वयशील होत गेली. अध्यात्मसाधना नियमितपणे चालू होतीच. गुरूकृपेने अनेक आध्यात्मिक अनुभूती आत्मसात होत होत्या. ध्यानधारणेची बैठक अधिकाधिक विकसित होत गेली. समाधी अवस्थेतील आनंदाची अनुभूती अनेक वेळा प्राप्त झाली आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ती पूर्णतया मुरली. त्यामुळे डॉ. अशोकमहाराज सदैव प्रसन्न, तृप्त, संतुष्ट, शांत असेच दिसत.

* अंतिम सत्त्वपरीक्षा

श्रीगुळवणीमहाराजांनी पूर्वी उल्लेख केलेला अध्यात्मपरंपरा सांभाळण्याचा अधिकार त्यांना आता प्राप्त झालेला होता. म्हणूनच १९८६

साली श्रीदत्तमहाराज डॉ.अशोकमहाराजांना म्हणाले, "आपले मुख्य काम घरातील देव सांभाळणे हे आहे." बस एवढेच. पण डॉ. अशोकमहाराजांनी या वाक्यातील गर्भितार्थ जाणला. दोन वर्षात त्यांनी प्रॅक्टीस कमी कमी करत पिंपळगावचा पसारा आवरला आणि १९८८ साली दवाखाना पूर्णतया बंद करून ते पत्नीसह रेणुकानिवासमध्ये येऊन राहिले. वैद्यकीय प्रॅक्टीस हे आपले काम नव्हे हा महाराजांच्या वाक्यातील गर्भितार्थ त्यांनी अक्षरशः स्वीकारला आणि पुण्यात प्रॅक्टीस सुरू केली नाही आणि कोणालाही कधी औषध सुचवले नाही. जणू वैद्यकीय ज्ञानाचा कप्पाच त्यांनी बंद करून टाकला. साधनेला त्यांनी पूर्णपणे वाहून घेतले.

डॉ.अशोकमहाराज व सौ.सविता वहिनी रेणुकानिवासमध्ये येऊन राहिल्याबद्दल काही नातलग व परिचित त्यांना बरेच दिवस दूषणे देत असत. "प्रॅक्टीस चालत नसेल." "भानगड झाली असेल, म्हणून तोंड चुकवायला येऊन राहिले असतील." "बसून आयते खावेसे कसे काय वाटते कोण जाणे?" असे अनेक शेरे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या कानावर येत राहिले. परंतु डॉ.अशोकमहाराजांनी कधी उत्तरही दिले नाही. या सगळ्यांचीच त्यांनी उपेक्षा केली. आपला मार्ग बरोबर आहे याची त्यांना खात्री होती. एक प्रकारे ही त्यांची कठीण परिक्षाच घेतली जात होती. पण डॉ.अशोकमहाराज स्थिरचित्त राहिले. त्यांनी साधनेव्यतिरिक्त काहीही केले नाही. कोणतेही सामाजिक वा धार्मिक कार्यही त्यांनी स्वीकारले नाही. एक प्रकारे व्रतस्थ राहून तपसाधना करीत ते मनाने एकांतवासात रहात होते.

हा काळ सौ.सवितावहिनीसांठीही सत्वपरिक्षेचा ठरला. त्यांनाही पुष्कळांचे बोलणे ऐकावे लागले. काहीजण सुचवीत त्यांनीच पुढाकार घेऊन डॉ.अशोकमहाराजांना व्यवसाय-उद्योग करायला भाग पाडावे. पण त्या नेहमी मौन धारण करत. आपल्या पतीचा अधिकार जाणला असल्याने त्यांनी डॉ.अशोकमहाराजांच्या साधनेला कधीही विरोध केला नाही. त्यांच्या पाठीशी उभे राहून त्या उत्तेजन देत राहिल्या, त्यांचे मनोबळ वाढत राहील असेच वागत राहिल्या.

* परंपरा सांभाळण्याची आज्ञा

डॉ.अशोकमहाराज सत्वपरिक्षेला पूर्णतया उतरले. श्रीदत्तमहाराज संतुष्ट झाले आणि इ.स. १९८८ मध्ये श्रीदत्तमहाराजांनी वासुदेवनिवासपीठाची शक्तीपातदीक्षा डॉ.अशोकमहाराजांना दिली. त्यानंतर काही दिवसांतच श्रीदत्तमहाराजांनी "ही परंपरा आपण सांभाळावी" अशी स्पष्ट आज्ञा केली. काही कठोर साधनाही आखून त्यांनी दिली. डॉ.अशोकमहाराज ही साधना पूर्ण श्रद्धेने करीत राहिले.

इ.स. १९९१ पासून कवीश्वर घराण्याची मंत्रदीक्षा देण्याचा अधिकार श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराज यांच्यावर सोपवला. तेव्हापासून कवीश्वर घराण्याची मंत्रदीक्षा डॉ.अशोकमहाराजच देत आले आहेत. श्रीदत्तमहाराजांची चाक्षुषी दीक्षा इ.स. १९९२ साली अशोकमहाराजांना लाभली. "स्वयं श्रीदत्तप्रभू हे आपले सद्गुरू आहेत, तेच आपल्याला दीक्षा देतील" हे श्रीगुळवणीमहाराजांचे शब्द अशा रितीने अक्षरशः खरे झाले. श्रीदत्तमहाराज दीक्षागुरू व मंत्रगुरू म्हणून डॉ.अशोकमहाराजांना मार्गदर्शनासाठी लाभले यात त्यांचे पूर्वसुकृत व भाग्य दिसून येते.

इ.स. १९९५ सालापासून वासुदेवनिवास या शक्तीपीठाचीही दीक्षा देण्याचा अधिकार श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराज यांच्यावर सोपवला आहे. तेव्हापासून डॉ.अशोकमहाराज ही दीक्षाही साधकांना देत आले आहेत. तेव्हापासूनच स्वतःला शारीरिक श्रम होतात ही सबब सांगून साधकांना स्वतः सूचना देणेही श्रीदत्तमहाराजांनी बंद केले आणि ते डॉ.अशोकमहाराजांमार्फत आणि सौ.ताईमहाराजांमार्फतच बोलू लागले. पुढे सर्व पत्रव्यवहारही त्यांनी डॉ.अशोकमहाराजांवर सोपविला. अशा रितीने श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांवर परंपरा पूर्णतया सोपवली यात डॉ.अशोकमहाराजांचा अधिकारही दिसून येतो आणि त्यांच्यावर झालेली पूर्ण गुरूकृपाही दिसून येते.

श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांना अनेक मंत्र दिले. कोणा भक्ताला काही त्रास असला किंवा व्यावहारिक अडचण असली तर श्रीदत्तमहाराज डॉ.अशोकमहाराजांकडून विशिष्ट अनुष्ठाने करून घ्यायचे. त्यामुळे त्या

भक्ताच्या अडचणींचे निवारण व्हायचे. पण श्रीदत्तमहाराजांच्या सांगण्यावरून डॉ.अशोकमहाराजांनी अनुष्ठान केले व त्यामुळे अडचणीचे वा संकटाचे निवारण झाले हे त्या भक्तालाही कळायचे नाही. श्रीदत्तमहाराजही सांगायचे नाहीत व डॉ.अशोकमहाराजही त्याचा उल्लेख करायचे नाहीत. जी मदत करायची ती अनपेक्षवृत्तीने. नंतर सर्व काही विसरून जायचे हा श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव डॉ.अशोकमहाराजांनी आत्मसात केला आहे.

डॉ.अशोकमहाराज ही सर्व परंपरा उत्तमरितीने सांभाळत आहेत आणि साधकांना योग्यप्रकारे मार्गदर्शन करत आहेत हे आपणा सर्वांचेच भाग्य आहे.परंपरेची धूरा सांभाळण्यासाठी डॉ.अशोकमहाराजांसारखी अधिकारी व्यक्ती मिळणे हे केवळ ईश्वरी योजनेनेच घडत असते.

* अधिकारी भूमिकेतून साधकांना मार्गदर्शन

समोर आलेल्या माणसाचे मन कोणत्या प्रकारचे आहे व त्याच्या मनात कोणता हेतू किंवा अभिलाषा दडली आहे हे जाणायचे सामर्थ्य साधनेमुळे निर्माण झाले आहे. समोरच्या माणसाची मनोभूमिका, पूर्वसुकृत यांचे त्यांना चटकन ज्ञान होते. एक अनुगृहीत त्यांच्याकडे गेला व म्हणाला, "शक्तीपात दीक्षेनंतर होणाऱ्या क्रियांचे वर्णन योगवाणी पुस्तकांत आहे. अनेक साधक अनेक क्रिया घडल्याचे सांगतात. पण मला तर काहीच क्रिया होत नाहीत."

क्षणाचाही विलंब न लावता डॉ.अशोकमहाराज म्हणाले, "शक्तिजागृती भक्तीनेही होऊ शकते. पूर्वसुकृत असले तर अशा क्रिया होत नाहीत. ज्याचे प्रारब्धकर्म वाईट असेल त्यांनाच परिहारासाठी या क्रियांतून जावे लागते. तुम्हाला तशा क्रिया व्हायच्या नाहीत. बैठकीला बसल्यावर प्रगाढ ध्यानावस्थेत जाणे ही सुद्धा एक क्रियाच असते. फार तर भजन करण्याची क्रिया आपोआप घडेल." खरोखरच तसे घडल्याचा अनुभव त्या साधकाला आला.

एका भक्ताला व्यावसायिक जीवनात सहकाऱ्यांकडून फार त्रास होऊ लागला. तेव्हा डॉ.अशोकमहाराज त्याला म्हणाले, "उपेक्षा करावी", बस एकच वाक्य ! पण त्यात सर्व काही आले. तो भक्त श्रद्धेने तसे वागत राहिला आणि त्याच्या अडचणी दूर झाल्या.

दुसऱ्या एका भक्ताला अनेक त्रास व अडचणींना तोंड द्यावे लागत होते. डॉ.अशोकमहाराजांनी त्याला सांगितले, "सुखे व दुःखे दोन्हींची उपेक्षा करावी. आपल्या मनांत त्याबद्दल काही विचारही येऊ देऊ नये म्हणजे विकारांच्या पलीकडे जाता येते." या दोन वाक्यातच डॉ.अशोकमहाराजांनी त्या भक्ताला उपदेश केला आणि तो भक्त श्रद्धेने तसे वागत राहिल्यामुळे त्याच्या अडचणी दूर झाल्या.

वर सांगितलेल्या घटनांमध्ये डॉ.अशोकमहाराजांनी प्रसंगाला उचित उपदेश केला एवढेच महत्त्वाचे नाही. त्या भक्तांच्या मनात श्रद्धा निर्माण करून तसे वागण्याची मनोभूमिकाही त्यांनी तयार करून घेतली. म्हणूनच ते भक्त डॉ.अशोकमहाराजांच्या उपदेशाप्रमाणे वागून जीवनातील अडचणींना तोंड देऊ शकले व साधना योग्यप्रकारे करीत राहू शकले. अशा तऱ्हेचा उपदेश ते भक्तांना करत होते आणि भक्तांना अनुभवही येत होते.

जिज्ञासूने विचारलेल्या शंकांचे निराकरण ते साध्या, सोप्या शब्दांत करतात. त्यांनी केलेल्या उपदेशात विद्वज्जडतेचा भार नसतो आणि बोजड शब्दही नसतात. त्यांच्या अंतःकरणांतील भक्तीभाव वाक्यावाक्यांतून व्यक्त होत रहातो. मोजक्या शब्दांत नेमका आशय व्यक्त करणे हा त्यांचा विशेष आहे. बोलण्यात अचूकपणा आणि नेमकेपणा असतो. श्रीगुळवणीमहाराज, श्रीधुंडिराजमहाराज व श्रीदत्तमहाराज यांचे विचार आणि सहवास यांचा खोल प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उमटलेला दिसतो आणि तो त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत असतो. म्हणूनच त्यांच्या मुखांतून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द त्यांना मिळालेल्या पूर्व पुण्याईचे तेज घेऊनच प्रगट होतो.

त्यांच्या प्रवचनांत किंवा त्यांनी साधकांना केलेल्या उपदेशात अनाग्रही स्वभाव दिसतो. कशाचाच आविर्भाव नाही, अभिनिवेश नाही, अट्टाहास नाही. तरीही त्यांचा उपदेश आणि त्यांची प्रवचने प्रभावी आणि परिणामकारक असतात.

* नित्यसिद्ध


डॉ.अशोकमहाराज यांना पहाताच ते नित्यसिद्ध आहत असे उद्‌गार एका सत्पुरुषाने काढल्याचे सांगतात. नित्यसिद्ध म्हणजे ज्यांच्या मनाला

वासनेचा किंवा ऐहिक कामनेचा स्पर्शच झाला नाही असा. पूर्वपुण्याई असेल तरच असे मन जन्मतःच लाभते. डॉ.अशोकमहाराज लहान वयातच त्यांना निरहंकारिता प्राप्त झालेली दिसते. स्वतःबद्दल फारसे बोलायचे नाही, स्वतःच्या हातून घडलेल्या मोठ्या कामाबद्दल किंवा झालेल्या गौरवाबद्दल आपणहून कुठेही उल्लेख करावयाचा नाही. आपल्यावर अन्याय झाला तरीही आपली बाजू मांडण्यासाठी उत्सुकता दाखवायची नाही ह श्रीदत्तमहाराजांमध्ये पूर्ण विकास पावलेले गुण डॉ.अशोकमहाराजांमध्येही उतरलेले दिसतात.

सत्त्वपरीक्षेच्या काळातील डॉ.अशोकमहाराजांचे वागणे पहाण्यासारखे आहे. डॉक्टरकी सोडून रेणुकानिवासमध्ये ते येऊन राहिले तेव्हा इतरांनी कितीही दूषणे दिली आणि त्यांच्या वागण्याचा गैर अर्थ लावला तरीही ते मुकाट्याने सोशित राहिले. "मला माझ्या गुरूंची तशी आज्ञा आहे" असे शब्द त्यांच्या मुखातून कधीही बाहेर पडले नाहीत.

इ.स. १९९१ पासून कवीश्वर घराण्याची दीक्षा आणि इ.स. १९९५ पासून वासुदेव पीठाची दीक्षा ते देत होते. पण या दीक्षा देण्याचा अधिकार श्रीदत्तमहाराजांनी मला दिला आहे असे शब्द त्यांच्या तोंडून कधीही बाहेर पडले नाहीत. दीक्षा देणाऱ्या पत्रात "श्रीआज्ञेवरून" असा शब्द असायचा. साधकांना मार्गदर्शन करतांनाही त्यांच्या तोंडी असे शब्द यायचे "महाराजांनी असे... असे... सांगितले आहे." त्यामुळे दीक्षा देण्याचा अधिकार त्यांना मिळाला आहे हे फारसे कोणालाच माहिती नव्हते.

सद्गुरू देह सोडताना आपले तेज, शक्ती व ज्ञान आपल्या अंतरंग शिष्यामध्ये संक्रमित करतात असे भारतीय अध्यात्म परंपरा सांगते. महाभारतात आणि अनेक शास्त्रग्रंथात तसे उल्लेख आहेत व तसे करण्याची प्रक्रियाही वर्णन केलेली आहे. या प्रथेला अनुसरून श्रीदत्तमहाराजांनी १ मार्च, १९९९ रोजी देह ठेवतांना आपली सर्व शक्ती, तेज व ज्ञान डॉ.अशोकमहाराजांमध्ये संक्रमित केले. आपली परंपरा डॉ.अशोकमहाराज आणि ताईमहाराज समर्थपणे सांभाळीत आहेत हे समाधान श्रीदत्तमहाराजांच्या मनात निश्चितपणे देह सोडतांना असले पाहिजे. म्हणूनच एका समधात, शांत, स्थिर मनोवृत्तीतच श्रीदत्तमहाराजांनी स्थूल देहाचा त्याग करून सूक्ष्मात प्रवेश केला.




श्रीदत्तमहाराज - वासुदेवनिवासमध्ये आलेल्या संन्यासी वृंदाशी बोलतांना
(शब्देवीण संवादिजे)



श्रीवासुदेवनिवासमध्ये
सौ.ताईमहाराज, श्रीदत्तमहाराज, सौ.आईसाहेब



डॉ. अशोकमहाराज कवीश्वर आणि सौ. सवितावहिनी



श्रीवासुदेवनिवासमध्ये
सौ. ताईमहाराजांचा ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त याग झाला

दीक्षा देण्याचा अधिकार डॉ.अशोकमहाराजांना दिलेला आहे हे अनेकांना माहित नसल्यामुळे श्रीदत्तमहाराजांनी देह ठेवल्यावर काही काळ वासुदेवनिवास शक्तीपीठाची दीक्षा कोणी द्यायची याबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. परंतु या काळातही डॉ.अशोकमहाराजांनी आपल मौन सोडले नाही. डॉ.अशोकमहाराजांनी आपले ओठ मिटूनच घेतले होते. जाणकारांनी ठामपणे सर्वांना वस्तुस्थिती सांगितल्यामुळेच या संभ्रमावर पडदा पडला आणि दीक्षाविधीच काम सुरळीतपणे सुरू झाले.

या संदर्भात जालना येथील एका भक्तस्त्रीला झालेला दृष्टान्त उल्लेखनीय आहे. १ मार्च, १९९९ रोजी पहाटे या स्त्रीला स्वप्न पडले. श्रीदत्तमहाराज हातात तबक घेऊन रेणुकानिवासच्या द्वारी उभे आहेत. डॉ.अशोकमहाराज बाहेरून येताच श्रीदत्तमहाराजांनी त्यांना ओवाळले व त्यांचे स्वागत केले. या स्वप्नानंतर काही तासांतच त्यांना वार्ता कळली की सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी श्रीदत्तमहाराजांनी स्थूल देहाचा त्याग केला व सूक्ष्मांत प्रवेश केला. श्रीदत्तमहाराजांनी परंपरा डॉ.अशोकमहाराजांवर सोपवली आहे याचा निर्देश करणारा तो सूचक दृष्टान्त होता.

जालना येथील मंदिराचा वास्तुशांती सोहळा ऑक्टोबर १९९९ मध्ये व्हायचा आहे. अनेक भक्तांना वाटत होते, श्रीदत्तमहाराज स्वतः आले असते तर एका भक्तस्त्रीला दृष्टान्त झाला. श्रीदत्तमहाराज तिला म्हणाले, "आम्ही डॉ.अशोकमहाराजांच्या रूपात त्या सोहळ्याला येऊ. आपण चिंता करू नये." हा दृष्टान्तही पुरेसा बोलका आहे.

* परंपरा समर्थपणे सांभाळून आहेत

आता वासुदेव निवासचे विश्वस्त म्हणून डॉ.अशोकमहाराज या शक्तीपीठाच्या कार्यात लक्ष घालत आहेत व दीक्षाही देत आहेत ही भक्तांच्या दृष्टीने अत्यंत समाधानाची गोष्ट आहे.

श्रद्धा आणि भक्ती यांच्या बळावरच डॉ.अशोकमहाराज सद्गुरूंच्या कृपेने अतिशय अल्पकाळात अंतिम अनुभवाशी जाऊन पोचले आणि ती अनुभूती त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये पूर्णतया सामावून गेली. सद्गुरूंच्या कृपेनेच सर्व गाठी सुटलेल्या असल्यामुळे डॉ.अशोकमहाराज प्रपंचातील

गडबडीत वावरत असले तरीही त्यांचे मन कधीच विचलीत झालेले दिसत नाही. ते नेहमीच शांत, प्रसन्न, संतुष्ट आणि स्थिरचित्तानेच सर्वत्र वावरत असतात. सद्गुरूकृपेने डॉ.अशोकमहाराजांना ही अवस्था प्राप्त झालेली आहे हे त्यांच्या वागण्याचे व बोलण्याचे सूक्ष्म अवलोकन केल्यास स्पष्टपणे दिसून येते. अनेक पिढ्यांची गुरूपरंपरा डॉ.अशोकमहाराज समर्थपणे पुढे चालवित आहेत ही सवाच्याच दृष्टीने अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

डॉ.अशोकमहाराज स्वतःला नेहमी झाकूनच ठेवतात. त्यामुळे त्यांचा अधिकार लगेच ध्यानात येत नाही. परंतु साधकांनी प्रश्न विचारले की ते जी उत्तरे देतात त्यातून त्यांचे ज्ञान व अनुभूती व्यक्त होते. देऊळगावराजा, जालना, पुणे, मुंबई, बार्शी वगैरे अनेक ठिकाणी आता त्यांची प्रवचने सुरु झाली आहेत. या प्रवचनातून त्यांची अनुभूती व अधिकार दिसून येतो. रूढार्थाने डॉ.अशोकरावांनी शास्त्राभ्यास केलेला दिसत नाही. परंतु श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात की आत्मज्ञान साधकांच्या अंतरंगातच असते आणि त्या आत्मज्ञानापुढील अज्ञानाचा पातळ पडदा सद्गुरुंनी दूर केला की ते आत्मज्ञान प्रकट होते. आत्मज्ञान होण्यासाठी शास्त्राभ्यासापेक्षा सद्गुरूकृपेचीच अधिक आवश्यकता असते.

डॉ.अशोकमहाराजांच्या बाबतीत हे असे घडलेले दिसून येते. डॉ.अशोकमहाराजांच्या अंतरंगात आत्मज्ञान प्रकट झालेले दिसते. गुरूकृपेनेच ते ज्ञान व अनुभूती साधकांना प्रदान करण्याचे सामर्थ्यही डॉ.अशोकमहाराजांमध्ये सद्गुरुकृपेनेच विकसित झालेले प्रत्ययाला येते.

स्वतःचे मोठेपण अगदी सहजपणे विसरून सर्व साधकांमध्ये मोकळेपणाने वावरतात, बोलतात प्रसंगी हास्यविनोदही करतात. डॉ.अशोकमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वात अनेक गुण सामावलेले आहेत. वृत्तीने ते विरक्त आहेत, ऐहिक कामना त्यांच्या मनाला स्पर्श करत नाही. त्याच वेळी ते अबोध बालकासारखे निरागसवृत्तीचेही आहेत. आईसारखे प्रेमळ भाव आहेत आणि त्याचवेळी एखाद्या साधूप्रमाणे त्यांचे हृदय करूणेने व दयाभावनेने ओथंबलेले आहे. ज्ञान व भक्ती यांची इतकी उंच पातळी गाठली आहे, पण त्याच्या व्यक्तिमत्त्वातील ऋजुता व आपलेपणा तसाच कायम राहिला आहे.

त्यांच्या सहवासात येणाऱ्यांना जाणवत रहाते की डॉ.अशोकमहाराज म्हणजे आध्यात्मिक अनुभूतींच्या प्रकाशात न्हाऊन निघालेले एक आगळे व्यक्तिमत्त्व आहे.

* श्रीदत्तमहाराजांशी साम्य

डॉ.अशोकमहाराजांचे श्रीदत्तमहाराजांशी अनेक बाबतीत साम्य आहे. ते ज्याला मार्गदर्शन करतात त्याच्या मनात आपल्याला कोणी काही शिकवत आहे असे काही जाणवतही नाही. त्यांचे बोलणे थोडे पण नेमके असते. ते एखाद्या ठिकाणी केवळ देहाने उपस्थित असले, काहीही बोलले नाहीत तरीही त्यांची उपस्थिती आध्यात्मिक स्वरूपाचे वातावरण निर्माण करते. त्या वातावरणात आध्यात्मिक साधनेला प्रेरक अशी शक्ती आपोआप निर्माण होते त्यामुळे तेथे जे जे संभाषण आणि उपासना घडते, ते सर्व साधनेत परिवर्तित होते. असे व्यक्तिमत्त्व सिद्ध झाले ते केवळ श्रीदत्तमहाराजांच्या कृपेमुळे व त्यांनी आवश्यक ती साधना डॉ.अशोकमहाराजांकडून करून घेतली म्हणूनच.

श्रीदत्तमहाराजांच्या अंगी असलेली सात्त्विकता परिपूर्णता, निरहंकारी वृत्ती, ऋजुता, साधेपणा, नम्रता, दया आणि हृदयाची कोमलता हे गुण डॉ.अशोकमहाराजांच्या अंगी उतरले आहेत. मोठा अधिकार, ज्ञान आणि अनुभूती प्राप्त असूनही डॉ.अशोकमहाराज व्यावहारिक पातळीवरही सफल जीवन जगत आहेत. व्यवहारांतील कोणताही निर्णय घेतांना त्यांची आध्यात्मिक बैठक तर सुटत नाहीच परंतु हे त्यांच्याजवळील दैवी गुण सातत्याने प्रकट होतात. त्यांच्या मनाचा मोठेपणा जाणवत रहातो. त्यांचे एखादे वाक्यही त्यांची थोरवी दर्शवून जाते.

अनेक वेळा शब्दही श्रीदत्तमहाराजांसारखेच येतात. वाक्येही श्रीदत्तमहाराजांचीच येतात. बोलण्याची ढबही तशीच येते, सूरही तसाच असतो आणि अनेक प्रसंगी श्रीदत्तमहाराजांसारखी प्रतिक्रिया डॉ.अशोकमहाराजांकडून आपोआप येते.

श्रीदत्तमहाराजांची अलीकडे होणारी प्रवचने श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनांची आठवण करून देणारी असतात. एक भक्तसाधिका नुकत्याच

म्हणाल्या, ''डॉ.अशोकमहाराजांचे प्रवचन ऐकतांना डोळे मिटले तर वाटले मी श्रीदत्तमहाराजांचेच प्रवचन ऐकत आहे.''

जालन्याला श्रीदत्त आश्रमात श्रीदत्तमहाराजांचे आगमन झाल्यावर ताईमहाराज भक्तीपूर्वक करतात तसेच स्वागत ताईमहाराज डॉ.अशोकमहाराजांचेही करतात. सौ.ताईमहाराज डॉ.अशोकमहाराजांना साष्टांग नमस्कार घालतात आणि मिरवणूक काढून वाजत गाजत त्यांना श्रीदत्त आश्रमात नेतात. सौ.ताईमहाराजांच्या निवासस्थानी आणि श्रीदत्त आश्रमांतील मंदिरात डॉ.अशोकमहाराज ज्या गादीवर बसतात ती गादी तशीच रोज मांडली जाते आणि सौ.ताईमहाराज दिवसांतून अनेक वेळा त्या गादीचे दर्शन घेऊन जणू काही डॉ.अशोकमहाराज तेथे प्रत्यक्ष बसले आहेत असा नमस्कार करतात. सौ.ताईमहाराजांच्या या कृतीतून डॉ.अशोकमहाराजांचा अधिकार किती मोठा आहे हे दिसून येते आणि भविष्यकाळात त्यांच्या हातून मोठे आध्यात्मिक कार्य घडून येणार आहे हे सूचित होते.

***




श्रीदत्तमहाराज
वासुदेवनिवासमध्ये
श्रीगुरूमहाराजांचे
दर्शन घेतांना



श्रीदत्तमहाराज –
एक दर्शन



वासुदेवनिवासमध्ये प्रसाद घेतांना
सौ.आईसाहेब त्यांचे आवडते पद गात आहेत



सौ.आईसाहेब नातवंडांसमवेत

परिशिष्ट क्रमांक - ६

* श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या कुटुंबीयांसंबंधी माहिती

(श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र वाचून अनेक वाचकप्रभावित झाले. तथापि अनेक लोकांना श्रीदत्तमहाराजांच्या कुटुंबातील इतर व्यक्तींच्या जीवनपद्धतीबद्दल जिज्ञासा वाटत राहिली. श्रीदत्तमहाराजांबद्दल त्यांच्या भावना काय आहेत हे जाणून घेण्याची इच्छा अनेक वाचकांनी व्यक्त केली. कुटुंबीयांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि जीवनपद्धतीवर श्रीदत्तमहाराजांचा प्रभाव पडला काय, श्रीदत्तमहाराजांच्या वैराग्यशील जीवनाबद्दल त्यांची कोणती प्रतिक्रिया आहे, त्यांनी श्रीदत्तमहाराजांच्या धर्मजागरणाच्या कार्याला विरोध केला काय, श्रीदत्तमहाराजांच्या वैराग्यशील जीवनाबद्दल नाराजी व्यक्त केली काय याबद्दल अनेक वाचकांना मोठेच कुतुहल वाटत राहिले असे दिसते. काही वाचकांनी पत्रे लिहून आपली कुतुहलाची भावना मला कळवली आणि चरित्राच्या पुढील आवृत्तीत या माहितीचा समावेश करण्याची विनंतीही केली. वाचकांची ही जिज्ञासा लक्षात घेऊन श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या चरित्राच्या प्रस्तुत आवृत्तीमध्ये ही कुटुंबीयांसंबंधीची माहिती पुढे दिली आहे.)

श्रीदत्तमहाराजांना तीन पुत्र आणि तीन कन्या आहेत. थोरले चिरंजीव अशोकराव (आता त्यांना सर्वजण डॉ.अशोकमहाराज असे म्हणतात), मधले चिरंजीव अनिलराव आणि धाकटे चिरंजीव अजितराव. थोरल्या कन्या सौ.सुमनताई भातलवंडे (वैराग येथील डॉ.यशवंतराव भातलवंडे यांच्या पत्नी), मधल्या कन्या सौ. सुलभाताई तांबोळी (मुंबई येथील निवृत्त सरकारी अधिकारी श्री.माधवराव तांबोळी यांच्या पत्नी) आणि धाकट्या कन्या सौ. शैलाताई आडकर (पुणे येथील सुप्रसिद्ध उद्योजक श्री.अरुणराव आडकर यांच्या पत्नी).

या सर्वांचेच पूर्वसुकृत मोठे आहे. म्हणूनच भगवान शंकर आणि माता पार्वतीदेवी यांच्यासारखे पारमार्थिक जीवन जगणाऱ्या श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब या दांपत्याच्या प्रपंचात जन्म घेण्याचे भाग्य त्यांना लाभल.

बालपणापासून उत्तम संस्काराचे बाळकडू त्यांना मिळाले. सगळेच मातापिता आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करण्याची काळजी घेतात आणि प्रेम आणि शिस्त यांच्या उचित मिश्रणांतून त्यांची व्यक्तिमत्त्वे घडवण्याचा प्रयत्न करतात. पण या सहाजणांचे भाग्य असे की श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब या दोघांनीही केवळ प्रेमांतूनच या सर्वांची मने घडवली आणि उत्तम संस्कार करून त्यांच्या जीवनाला आकार दिला. घराण्याला शोभेल असा पारमार्थिक अधिकार या सर्वांनाच प्राप्त झालेला आहे आणि ऐहिकदृष्ट्याही सर्वजण यशस्वी व संपन्न जीवन जगत आहेत. या सहाही भावंडांची माहिती थोडक्यात पुढे देत आहोत.

१. डॉ.अशोकमहाराज व सौ.सवितावहिनी

डॉ.अशोकमहाराज हे थोरले चिरंजीव. नामकरणविधीच्या वेळी त्यांचे नांव नारायण असे ठेवले होते. परंतु थोरल्या आईसाहेब त्यांना प्रेमाने अशोक असे संबोधत. तेच नाव पुढे रूढ झाले. त्यांचे पूर्वसुकृत फार मोठे आणि त्यांचे भाग्यही फार मोठे. घराण्याची परंपरा सांभाळण्याच्या दृष्टीनेच त्यांचे व्यक्तिमत्त्व अगदी बालपणापासूनच घडवलेले दिसते. त्यांचे शालेय शिक्षण अनाथ विद्यार्थीगृह, पुणे या शाळेत झाल्यामुळे त्या वयातच साधी रहाणी आणि उच्च विचारणसरणी या तत्त्वाचे संस्कार त्यांच्यावर झाले. नागपूरच्या महाविद्यालयांतून वैद्यकीय शिक्षण घेऊन अशोकमहाराज पदवीधर झाले. पिंपळगांव येथे इ.स. १९६७ साली डॉ.अशोकमहाराजांनी स्वतंत्र दवाखाना उघडून प्रॅक्टीस सुरू केली.

इ.स.१९६७ ते इ.स. १९८६ असा एकोणवीस वर्षांचा कालखंड डॉ.अशोकमहाराजांची ही रूग्णसेवा पिंपळगाव येथील दवाखान्याद्वारे चालू होती. हाताला उत्तम गुण असल्याने रोग्यांची खूप गर्दी असायची. दुरून दुरून रोगी येत रहात. पण डॉ.अशोकमहाराजांवर संस्कारच असे झाले होते की व्यावसायिक दृष्टीकोन मनात कधी आलाच नाही. रूग्णसेवा करायची ती पारमार्थिक साधना म्हणून, सर्वांभूती असलेल्या त्या परमेश्वराची सेवा म्हणून या निष्ठेने डॉ.अशोकमहाराज दवाखान्याद्वारे रूग्णसेवा करीत राहिले. गरीबांना मोफत औषधे द्यायची आणि इतर रोग्यांकडून ते देतील ते शुल्क घ्यायचे या वृत्तीने डॉ.अशोकमहाराजांनी दवाखाना चालवला.

रात्री अपरात्री केव्हाही दार ठोठावले तरीही डॉ.अशोकमहाराज येणाऱ्या व्यक्तीबरोबर रूग्णांना तपासण्यासाठी त्यांच्या घरी जात. अनेक मैलांवर असलेल्या खेड्यातील रूग्णाच्या घरीही रात्रीअपरात्री जाण्यात डॉ.अशोकमहाराजांनी कसूर केली नाही. दरिद्री कुटुंबातील लोकांनी फी पुढे ठेवली तर त्यांनाच उलटे दटावून ती फी खिशात ठेवायला भाग पाडत राहिले.

व्यावसायिक जीवन हे असे चालू असतांनाच डॉ.अशोकमहाराजांची पारमार्थिक साधनाही सातत्याने चालू होती. श्रीदत्तमहाराज यांनी सांगितलेला मंत्रजप, पूजाअर्चा आणि ध्यानधारणा डॉ.अशोकमहाराज सातत्याने करीत राहिले. श्रीगुळवणीमहाराजांनी त्यांना दिलेल्या आज्ञेप्रमाणे ते इ.स. १९६२ सालापासून द्विसाहस्त्रीची पारायणेही अखंडपणे करीत आले आहेत. पातंजल योगसूत्रांत सांगितल्याप्रमाणे दुःखी माणसाबद्दल करुणा ठेवून दयाबुद्धीने मदत करीत राहिले आणि त्रास देणाऱ्या दुर्जनांची उपेक्षा करून त्याबद्दलचे विचारच मनांतून काढून टाकीत आले आहेत.

मौंजीबंधनानंतर लगेचच श्रीदत्तमहाराजांनी साधना तीव्र करण्यासाठी डॉ.अशोकमहाराजांना सूचना करण्यास सुरुवात केली. वेळोवेळी दिलेल्या अशा दिलेल्या सूचनांचे डॉ.अशोकमहाराज वेदाज्ञेसारखे पालन करीत आले आहेत. त्यामुळे आपोआप परंपरा सांभाळण्यासाठी आवश्यक तो अधिकार डॉ.अशोकमहाराजांना प्राप्त झाला.

इ.स.१९८६ मध्ये श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांना परंपरा सांभाळण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेप्रमाणे डॉ.अशोकमहाराजांनी दोन वर्षात प्रॅक्टीस कमी करून पिंपळगावचा पसारा आवरला आणि इ.स. १९८८ मध्ये रेणुकानिवासमध्ये ते येऊन राहिले. श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सोडून दिला आणि परमार्थ क्षेत्रालाच पूर्णपणे वाहून घेतले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे घराण्याचा मंत्राधिकार व शक्तीपात परंपरा डॉ.अशोकमहाराज आता समर्थपणे सांभाळत आहेत.

डॉ.अशोकमहाराजांच्या पत्नी सौ.सवितावहिनी या कळंब गावातील डांगे घराण्यातील. इ.स. १९६९ साली डॉ.अशोकमहाराज आणि सवितावहिनी यांचा विवाह झाला. कवीश्वर घराण्यात पदार्पण केल्यानंतर अल्प काळातच

आपल्या पतीराजांचा आध्यात्मिक अधिकार त्यांच्या ध्यानात आला. तेव्हापासून पतीराजांच्या पारमार्थिक जीवनांतही सौ.सवितावहिनी उचित साथ देत आल्या आहेत. पिंपळगांव येथे दवाखान्याच्या निमित्ताने डॉ.अशोकमहाराजांबरोबरच त्यांचेही वास्तव्य इ.स. १९८६ सालापर्यंत होते. तथापि त्या काळातही सौ.आईसाहेब कुळधर्म, सणवार आणि नित्यनैमित्तिक अनुष्ठाने यांच्या निमित्ताने नेहमी बोलवून घेत असत. त्यामुळे परंपरेची त्यांना माहिती झाली. अनेक व्रते व अनुष्ठाने सौ.सवितावहिनी सातत्याने करीत आल्या आहेत. आपले सासुसासरे हे विठ्ठल व रखुमाई आहेत या श्रद्धेने सौ.सवितावहिनी त्यांची सेवा करीत आल्या आहेत. सासुसासऱ्यांचा शब्द पाळून त्यांच्या त्या नेहमीच आज्ञेत राहिल्या आहेत.

अतिथीसेवा व अन्नदान त्यांना मनापासून आवडते. अनेकदा दुपारी किंवा रात्री उशीरा कोणी साधकमंडळी आली आणि श्रीदत्तमहाराजांनी स्वयंपाक उरला आहे कां असे विचारले म्हणजे सौ.सवितावहिनी प्रसन्नपणे 'होय पुरेसा आहे' असे म्हणत आणि नव्याने स्वयंपाक करून व तो वाढून सर्वांना तृप्त करीत. या त्यांच्या गुणांचे श्रीदत्तमहाराजांना खूप कौतुक वाटे.

सत्त्वगुणाची मूर्ती म्हणावे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे आणि आचार विचारही तसेच होत राहिले आहेत.

या दांपत्याला दोन मुले आहेत. थोरले चिरंजीव आमोद हे इंजिनियर आहेत. तथापि, पूर्णतया श्रद्धावंत आहेत. सात्त्विक वृत्तीने व्रते, अनुष्ठाने नियमितपणे करीत असतात आणि श्रद्धापूर्वक श्रीदत्तमहाराजांनी दिलेली साधनाही सातत्याने करीत असतात. अध्यात्माकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहून अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड कशी घालता येईल याचा विचार त्यांच्या मनांत नेहमी असतो हे त्यांचे मोठेच वैशिष्ट्य आहे.

कन्या रेणुका हिचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिचा विवाह श्री. सूरज तांबोळी यांचेशी झाला आहे. त्यांच्या वागण्या बोलण्यातून कवीश्वर घराण्याचे संस्कार व्यक्त होत असतात याबद्दल सासरच्या मंडळींकडून त्यांच्याबद्दल नेहमीच कौतुकाचे शब्द ऐकायला मिळतात.

२. श्री.अनिलराव व सौ.अनितावहिनी :

श्री.अनिलराव हे श्रीदत्तमहाराजांचे मधले सुपुत्र. नामकरणविधीच्या वेळी त्यांचे नांव चिंतामणी असे ठेवले होते. चिंतामणी हे श्रीगणेशाचे एक नांव आहे. थोरल्या आईसाहेब त्यांना अनिल असे म्हणायच्या. तेच नांव आता रूढ झाले आहे. लहानपणी पोलीओमुळे त्यांचे दोन्ही पाय अधू झाले होते. परंतु सौ.आईसाहेब व सौ.सुमनताई यांनी खूप मेहनत घेऊन दीर्घकाळ आयुर्वेदिक उपचार केले. त्यामुळे ते व्यंग पूर्णपणे दूर झाले. महाराष्ट्र हाऊसिंग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनमध्ये सध्या अधिकारी म्हणून काम करीत आहेत.

महाभारतांतील धर्मराज या थोरल्या पांडवाची आठवण करून देणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. धर्मपालन करण्याची मनापासून आवड आहे. पण धर्मपालन करायचे ते ईश्वराची आज्ञा म्हणून. काही फळ मिळवण्यासाठी नव्हे या वृत्तीने निष्काम वृत्तीने धर्माचरण करीत असतात. वागण्यांत सरळपणा व साधेपणा असतो. धर्माचरणामुळे आणि गुरूकृपेने त्यांचे मन वहाणाऱ्या झऱ्यासारखे अगदी विशुद्ध झाले आहे. त्यामुळे धर्मराजाप्रमाणेच त्यांनाही सर्व माणसे चांगलीच दिसतात. कोणाचे दोष त्यांच्या मनांत येतच नाहीत हे त्यांचे मोठेच वैशिष्ट्य आहे.

रेणुकानिवासमध्येच डॉ.अशोकमहाराजांबरोबरच त्यांचे वास्तव्य असते. रेणुकानिवासमधील बाजारहाट, खरेदी, देखरेख वगैरे व्यवस्थापन विषयक सर्व कामे ते अत्यंत उत्साहाने पार पाडतात. म्हणूनच सौ.ताईमहाराज त्यांना चैतन्यमूर्ती असे म्हणतात. या नामाभिधानात 'चैतन्य' हा शब्द केवळ उत्साहाचे वर्णन करण्यासाठी वापरलेला नसून विश्वाच्या कणाकणांत भरलेल्या ईश्वरी चैतन्यशक्तीकडे ताईमहाराजांनी अंगुलीनिर्देश केला असावा असे वाटते.

श्री.अनिलरावांच्या पत्नी सौ.अनितावहिनी मूळच्या बार्शी येथील अडसूळ घराण्यांतल्या. विवाहाच्यावेळी त्या केवळ शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या होत्या. परंतु पुढे शिकायची उत्कट इच्छा त्यांच्या मनांत होती. सौ.आईसाहेबांनीच त्यांना पुढे शिक्षण घेण्यासाठी उत्तेजन दिले आणि वेळोवेळी त्यांच्या वाट्याची कामे स्वतः करून अभ्यासाला पुरेसा वेळ उपलब्ध करून दिला. त्यामुळेच सौ.अनितावहिनी आधी बी.ए. आणि नतर एम्.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण करू शकल्या.

सेवाव्रताचे संस्कार सौ.अनितावहिनींवर व्हावे यासाठी सौ.आईसाहेबांनी अध्यापिकेची नोकरी करावी असे त्यांना सुचविले. अध्यापन क्षेत्र हे श्रीदत्तमहाराजांच्या आवडीचे क्षेत्र असल्यामुळे त्यांनीही उत्तेजन दिले म्हणून गेली अनेक वर्षे सौ.सवितावहिनी अध्यापक म्हणून एका प्रशालेत नोकरी करीत आहेत.

अध्यापिकेची नोकरी म्हणजे मुलांमधील भगवंताची सेवा ही भूमिका श्रीदत्तमहाराजांनीच त्यांच्या मनावर बिंबविली. यामुळे पहिल्यापासून सौ.अनितावहिनी वर्गात जाऊन मुलांना केवळ शालेय धडे शिकवण्यावर समाधान मानत नाहीत. वर्गात व वर्गाबाहेर सतत त्या सुवचने आणि बोधकथा सांगतात आणि संतांचे उपदेश मुलांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करतात. शाळेतील विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार करण्याचा त्यांचा प्रयत्न सतत चालू असतो, म्हणूनच विद्यार्थीजगांत सौ.अनितावहिनी एक आदराचे स्थान बनल्या आहेत.

सौ.अनितावहिनी सदैव हसतमुख दिसतात. ऋजुता, निगर्वीपणा, साधेपणा, नम्रभाव ही त्यांची काही वैशिष्ठ्ये आहेत. श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांच्या सहवासामुळे त्यांचे अतःकरण सात्त्विक झालेले आहे. त्या सदैव प्रसन्न दिसतात. अडचणीच्या वेळीही त्यांच्या मनाची प्रसन्नता ढळत नाही हे विशेष आहे.

या दांपत्याला कपिलशास्त्री आणि अश्विनराव अशी दोन मुले व रमा ही कन्या आहे. कपिलशास्त्री यांना लहानपणापासून संतांच्या कथा ऐकण्याची आवड आहे हे लक्षात घेऊन सौ.अनितावहिनींनी सातत्याने तशा कथा त्यांना सांगितल्या. त्यामुळे कपिलशास्त्री यांना श्रीदत्तमहाराजांची सेवा करण्याची गोडी लागली आणि ते वेदाध्ययनाकडे वळले. शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून त्यांचे वेदाध्ययन व शास्त्रग्रंथांचा अभ्यास चालू आहे.

डिसेंबर १९९८ मध्य श्रीदत्तमहाराजांनी कपिलशास्त्री यांच्याकडून भागवतसप्ताह (संहितावाचन) सौ.ताईमहाराजांसमोर करून घेतला. भागवतसप्ताहाची आज्ञा करतांना श्रीदत्तमहाराज त्यांना म्हणाले,"साक्षात भगवतीसमोर भागवतसप्ताह करीत आहात हे आपले भाग्य आहे याची जाणीव



श्रीदत्तमहाराज

(लोकनाथतीर्थ स्वामींच्या पुण्यतिथीनिमित्ताने वासुदेवनिवासमध्ये झालेल्या कीर्तनाच्या वेळी)



श्रीदत्तमहाराजांना सुवासिनी ओवाळतांना



सौ. ताईमहाराज




श्रीदत्तमहाराज
एका भक्ताला आशीर्वाद देतांना



रेणुकानिवासमध्ये श्रीदत्तमहाराजांचा वर्धापनदिन



सौ.आईसाहेब व सौ.ताईमहाराज
एका भक्ताच्या घरी



सौ.आईसाहेब - दोन सुना व नातवंडांसमवेत

ठेवून श्रद्धेने सेवा करावी." या आज्ञेप्रमाणे कपिलशास्त्री यांनीही आपला हा पहिला भागवतसप्ताह रेणुकानिवासमध्ये मोठ्या श्रद्धेने संपन्न केला.

श्रीदत्तमहाराज आणि सौ.ताईमहाराज यांनीच त्यांचा उल्लेख कपिलशास्त्री किंवा शास्त्रीबोवा असा करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे आता सर्वजण त्यांना कपिलशास्त्री किंवा शास्त्रीबोवा असे म्हणतात. वेदाध्ययनामध्ये त्यांची गती पाहिली म्हणजे असे वाटते की श्रीदत्तमहाराजांचा कृपाप्रसाद त्यांना प्राप्त झाला आहे. परंपरा पुढे चालवण्यासाठी तसे संस्कार त्यांच्यावर पहिल्यापासून श्रीदत्तमहाराजांनी केलेले असावेत.

श्री.अश्विनराव हेही या दांपत्याचे दुसरे चिरंजीव. इंजिनियरिंगचे व्यावसायिक शिक्षण घेत आहेत. तथापि, त्यांचीही शास्त्रपरंपरेवर मोठी श्रद्धा आहे. संध्यावंदन, स्तोत्रपठण वगैरे नियमितपणे करतात. घरातील व्रते, अनुष्ठाने व कुळधर्म ही कार्ये परंपरेप्रमाणे व्हावीत यासाठी त्यांचा नेहमीच उत्साही सहभाग असतो.

या दांपत्याची कन्या रमा शाळेत शिकत आहे. आजीआजोबांवर तिची विशेष श्रद्धा आहे. तिचा आवाज गोड आहे. भक्तीगीते व अभंग तन्मयतेने म्हणणे तिला मनापासून आवडते. "आवडीने भावे हरिनाम घेसी" हा अभंग म्हणतांना एकदा इतकी तन्मय झाली होती की ऐकणाऱ्यांची हृदये हेलावून गेली होती. एकनाथमहाराजांचे अभंग व मीराबाईंची पदे महाराजांना अनेकवेळा म्हणून दाखवली आहेत.

३. श्री. अजितराव व सौ. जयश्रीवहिनी

श्री.अजितराव हे श्रीदत्तमहाराजांचे तिसरे चिरंजीव. नामकरणविधीच्या वेळी त्यांचे नांव गिरीश असे ठेवले होते. गिरीश हे भगवान श्रीबालाजींचे एक नांव आहे. श्री. अजितरावांचा आणि श्रीगुळवणीमहाराजांचा जन्मदिवस एकच. म्हणून श्री. अजितरावांच्या प्रत्येक वाढदिवसाला श्रीगुळवणीमहाराज त्यांना आश्रमात बोलावून घेत आणि सुवासिनींना आपल्याबरोबर अजितरावांचे औक्षण करण्यास सांगत. श्री.अजितराव अगदी लहान असल्यापासून श्रीगुळवणीमहाराज त्यांचा उल्लेख 'छोटे शास्त्रीबुवा' असा करीत असत.

लहानपणापासून श्री.अजितरावांचा स्वभाव अत्यंत विवेकसंपन्न आणि कारुण्यशील आहे. सामान्य लोकांच्या जीवनातील दुःखे, त्रास व यातना पाहून अजितरावांचे मन अगदी कळवळून जायचे. मनांत सतत त्यांचे चिंतन चालू असायचे. विशेषतः सामाजिक चौकटी आणि चाकोरीबद्ध जीवन यामुळे सामान्य लोकांना ज्या तडजोडी कराव्या लागतात त्या पाहून अजीतराव लहान वयापासूनच अस्वस्थ व्हायचे. आपल्या भाच्यासाठी किंवा पुतण्यासाठी ते काहीही करायला तयार असत. शिक्षणाचा खर्चच नव्हे तर अगदी महाविद्यालयातील प्रवेशासाठी मोठी देणगीही द्यायला ते आपणहून पुढे येतात हे विशेष आहे. अशाच एका अस्वस्थ क्षणी त्यांनी श्रीदत्तमहाराजांना आपले चिंतनात्मक विचार कवितेच्या रूपाने लिहून पाठवले. श्रीदत्तमहाराजांनीही या कवितेला काव्यातूनच उत्तर दिले. अजितरावांची ही कविता व श्रीदत्तमहाराजांचे काव्यमय उत्तर याच पुस्तकात पुढे दिले आहे.

श्रीदत्तमहाराज या कवितेत असे सांगतात की भोवताली दुःखे, यातना, तडजोडी वगैरे जे काही दिसते ती सर्व परमेश्वराची लीलाच आहे. म्हणून आपल्या वाट्याला आलेले काम चोख करावे पण मनाने तटस्थ रहावे. जगांत वावरतांना मन उच्च पातळीवर ठेवण्यासाठी धर्माचरण आणि उपासना करीत रहावे. म्हणजे लाभहानी, जयपराजय, आनंददुःख वगैरे शांतपणे स्वीकारून समाधानी जीवन जगता येते. श्रीदत्तमहाराजांनी या कवितेत केलेला उपदेश म्हणजे भारतीय अध्यात्माचा गाभाच आहे. कोणत्याही तरुणाला या कवितेतील विचार आत्मसात करून समाधानाने जीवन जगणे शक्य आहे. म्हणूनच या कवितेला सर्वांच्याच दृष्टीने महत्त्व आहे. श्रीदत्तमहाराजांची कृपा झाल्यामुळे श्री.अजितरावांना या कवितेतील अध्यात्माचा गाभा पूर्णतया आत्मसात करता आला आहे असे त्यांच्या पुढील जीवनावरून दिसून येते.

आजच्या तरुणांना अनेक प्रश्न भेडसावत असतात. व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळतांनाही मनाने अलिप्त रहाता येईल कां? अधिकाऱ्यांमध्ये व धनसंपन्न लोकांमध्ये वावरतांनाही आंतरिक वैराग्य टिकवता येईल कां? सुशिक्षित बुद्धीवादी तरुण हृदयांतील श्रद्धाभक्ती जतन करू शकेल काय? देशविदेशांत डोळसपणे हिंडत असतांनाही घरांत आमची संस्कृती टिकवता

येईल कां आणि विशुद्ध आध्यात्मिक जीवन जगता येईल कां? या सर्व प्रश्नांची उत्तरे श्री.अजितरावांच्या जीवनांत मिळतात. श्री.अजितराव डी.एम्.एस्. डॉयनालॉग मायक्रोसिस्टिमस् या कंपनीत संचालक या मोठ्या हुद्यावर काम करत आहेत. व्यवसायपरत्वे धनसंपन्न व्यावसायिकांत उठबस करावी लागते. भारतभर विमानाने भ्रमण घडते. परदेशांतही वारंवार जावे लागते. तथापि व्यावसायिक जीवनांत व्याप व जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळतांनाही मनाने अलिप्तच. कोलाहलाचे किंवा प्रक्षोभाचे प्रसंग समोर आले तरीही श्री.अजितराव नेहमी स्थिरचित्त आणि शांतच दिसतात. ऐहिकदृष्ट्या संपन्न जीवन वाट्याला आले असूनही वागण्यात निस्पृहता, निरिच्छपणा व आंतरिक वैराग्य दिसून येते.

श्री. अजितराव व्यवसाय जगांत उच्च पदावर आहेत. पण कोणाकडून काही घेणे ही वृत्तीच मनांतून गेली आहे. उलट इतरांसाठी काही करण्यात, इतरांना देत रहाण्यातच त्यांना मोठा आनंद वाटतो. ऐहिक संपन्नता व मोठा अधिकार अल्पवयात प्राप्त झाला असला तरी मूळांतील स्वभाव सात्विक आहे. तसाच कायम राहिला आहे. नित्याची साधना अखंडपणे चालू आहेच. परंतु अनेक नैमित्तिक अथर्वशीर्षाची सहस्त्र आवर्तने त्यांनी केली आहेत. या एकाच घटनेतून त्यांची श्रद्धा व उत्कट भक्तीभाव दिसून येतो.

मनाने ते सदैव विशुद्ध आध्यात्मिक जीवन जगत असतात. ऐहिकाच्या पलीकडे असलेल्या आध्यात्मिक जाणीवा व अनुभूतींमध्येच त्यांचे मन सतत रमलेले असते.

समोरच्या माणसाचे अंतरंग जाणण्याची, त्यांचे पूर्वसुकृत व पारमार्थिक भूमिका चटकन जाणून थोड्या वाक्यांतच पारमार्थिक मार्गदर्शन करण्याचा अधिकार प्राप्त आहे. पण स्वतःला झाकून घेणेच पसंत करतात. त्यांनी तसे केले तरी त्यांच्या अनुभूती व पारमार्थिक अधिकार चेहऱ्यावरील तेजातून आणि स्थिरचित्त वर्तनातून स्पष्टपणे दिसून येतो.

श्री.अजितरावांचा आवाज गोड आहे. अभंग म्हणणे खूप आवडते. इ.स. १९९५ साली वासुदेवनिवासमध्ये झालेल्या प्रयाग या चरित्रग्रंथाच्या प्रकाशन समारंभात त्यांनी श्रीकृष्णदयार्णव यांचे "नारायण भज रे मानस" हे पद इतक्या

तन्मयतेने म्हटले होते की अनेक उपस्थितांची हृदये हेलावून गेली होती. आश्रमात प्रसादाला असले म्हणजे आवडीने पंक्तीतल्या इतर लोकांबरोबर स्वतःहून उचित असे अभंग व पदे समरस होऊन म्हणतात. संतकवी विष्णुदास यांनी रचलेल्या रेणुकामातेच्या पदांना त्यांनी स्वतः सुरेल चाली लावल्या आहेत आणि ती पदे ते स्वतः उत्तमरितीने गातात. गाण्याची तयारी चांगली आहे. गळाही तयारीचा आहे आणि संगीताचा कानही तयार झालेला आहे. परंतु आवड मात्र भक्तीगीते व अभंग गायनातच सीमित राहिली आहे.

श्री.अजितरावांच्या पत्नी सौ.जयश्रीवहिनी या पदवीधर आहेत. त्या धोपाटे घराण्यांतील. बँकेतील नोकरी विवाहानंतर त्यांनी सोडून दिली आणि पूर्णवेळ गृहिणीची भूमिका आनंदाने स्वीकारली. श्री.अजितरावांच्या धार्मिक अनुष्ठानांत त्या हौसेने पुढाकार घेतात आणि पडेल ते काम आनंदाने करतात.

भगवती प्रकाशनतर्फे श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनांची जी दहा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत त्यांचे अक्षरजुळणीचे बरेचसे काम सौ.जयश्रीवहिनींनी सेवाभावाने स्वतः संगणकावर केलेले आहे. भगवती प्रकाशनचे प्रत्येक पुस्तक देखणे व आकर्षक स्वरूपात प्रकाशित करण्यासाठी श्री. अजितराव व सौ.जयश्रीवहिनी दोघेही सतत प्रयत्नशील असतात.

श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांच्या अखेरच्या तीन वर्षात श्री.अजितरावांनी त्यांची फार मोठीच सेवा केली.डॉक्टरने सांगितलेली कोणतीही औषधे तात्काळ मागवून घ्यायचे व ती औषधे वेळेवर दिली जात आहेत याची काळजी घ्यायचे. हॉस्पिटलसाठी बनविलेले वेगळे फर्निचर - कॉट, खुर्ची, जेवणाचे टेबल वगैरे विकत आणून घरात बसवून घेतले आणि ऑक्सिजन, सिलींडर वगैरे सर्व अतिदक्षता विभागातील सोयी घरातच निर्माण केल्या. ते करतांना घराचे घरपण जाऊ दिले नाही आणि घरातील धार्मिक वातावरणाला जराही धक्का लागणार नाही याचीही काळजी घेतली. रात्रीबेरात्रीही ते सेवेसाठी आईवडिलांसमोर इतक्या तत्परतेने उभे असायचे की अनेकजण म्हणायचे अजितरावांची ही सेवा अगदी पुंडलिकाने आपल्या आईवडिलांची जी सेवा केली त्याची आठवण करून देणारी आहे. विशेष म्हणजे या सेवाकार्यातही सौ.जयश्रीवहिनींची उचित साथ त्यांना लाभली.

सौ.ताईमहाराजांवर त्यांची मोठी भक्ती आहे. त्यांच्या सेवेची संधी मिळावी म्हणून ते अत्यंत उत्सुक असतात आणि त्यासाठी कोणतीही आर्थिक व शारिरीक झीज सोसायची त्यांची तयारी असते.

या दांपत्याची कन्या गायत्री ही अत्यंत चुणचुणीत व हुशार आहे. शाळेत अनेक पारितोषिके मिळवत असते. सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून तिचा शाळेत अनेक वेळा गौरव झाला आहे. तथापि, तिची श्रीदत्तमहाराज व सौ.आईसाहेब यांच्यावर पूर्ण श्रद्धा आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेत असूनही घरात ती कवीश्वर घराण्याला साजेशा संस्कारातच वावरते. व्रते, अनुष्ठाने वगैरे करण्यात तिला मोठाच आनंद वाटतो हे तिचे वैशिष्ट्य तिच्या शाळेतील शिक्षकांनी वेळोवेळी आवर्जून गौरवलेले आहे.

म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की आपली सनातन परंपरा व संस्कृती घरात त्यांनी पूर्णतया सांभाळली आहे आणि परंपरेला अभिप्रेत असलेले विशुद्ध जीवन ते समरसतेने जगत आहेत.

४. सौ.सुमनताई व डॉ.यशवंतराव भातलवंडे, वैराग

सौ.सुमनताई या श्रीदत्तमहाराजांच्या थोरल्या कन्या. सौ.सुमनताईंना बालपणापासून धर्मकार्याची आणि व्रते, अनुष्ठाने करण्याची मनापासून आवड आहे. लहानपणी वाडीला थोरल्या आईसाहेबांबरोबर काही वर्षे रहाण्याचे भाग्य त्यांना लाभले. त्या काळात पहाटे अडीच तीनला उठत. नदीवर स्नान करून देवाला १०८ प्रदक्षिणा घालत. नंतर घरी येऊन गुरूचरित्राला प्रदक्षिणा घालून जप करीत व सप्तशती गुरूचरित्र श्रद्धेने वाचत. तोपर्यंत सकाळचे दहा वाजायचे. म्हणजे जवळजवळ सतत सहासात तास अशी उपासना सातत्याने त्या करीत होत्या. हे खरोखरीच आज आश्चर्य वाटेल असेच आहे.

थोरल्या आईसाहेबांची खूप सेवा त्यांच्याकडून घडली. या सेवेचे फळही त्यांना तसेच मिळाले. वैराग येथील धनसंपन्न व विख्यात भातलवंडे कुटुंबात त्यांचा विवाह झाला. भातलवंडे घराण्यात सात पिढ्यांची वैद्यकीय सेवेची परंपरा आहे. डॉ.यशवंतरावांचे आजोबा निजामाचे राजवैद्य होते. त्यांना हत्ती ठेवण्याचा मान निजामाने दिला होता.

डॉ.यशवंतराव सेवाभावी डॉक्टर म्हणून त्या भागात प्रसिद्ध आहेत. गरीबांकडून फी न घेणे, दुष्काळात पीडितांची सेवा करणे वगैरे सेवाकार्य एखाद्या व्रताप्रमाणे अनेक वर्षे सातत्याने चालू आहे.


डॉ. भातलवंडे यांचीही श्रीदत्तमहाराज आणि सौ. आईसाहेब यांच्यावर फार मोठी श्रद्धा आहे. आपल्या जीवनातील बहुतेक सर्व महत्त्वाचे निर्णय त्यांनी श्रीदत्तमहाराजांना विचारूनच घेतलेले आहेत. श्रीदत्तमहाराजांनी सांगितलेली उपासना ते गेली अनेक वर्षे अत्यंत श्रद्धेने करीत आले आहेत. श्रीदत्तमहाराजांकडे ते श्वशुर म्हणून कधीही बघत नाहीत. ईश्वरीशक्तीचा परिपूर्ण अवतार असलेल्या थोर विभूतीच्या दर्शनाला आपण जात आहोत या भक्तीभावनेनेच ते रेणुकानिवासमध्ये प्रवेश करतात आणि देवालयातील देवमूर्तीचे भक्तीने दर्शन घ्यावे तसे श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतात. एखाद्या देवस्थानमध्ये वावरावे तसे रेणुकानिवासमध्ये वावरतात.

या दांपत्याचे दोन पुत्र श्री.प्रमोदराव व श्री.शिरीषराव हे व्यवसायाने डॉक्टर आहेत आणि त्यांची प्रॅक्टीस उत्तमरितीने चालू आहे. आईवडीलांच्या संस्काराप्रमाणे हे दोघेही डॉक्टर सेवाभावी वृत्तीनेच रूग्णसेवा करण्यात आनंद मानत असतात हे विशेष आहे. तिसरे चिरंजीव श्री.किशोरराव हे टेक्स्टाईल इंजिनियर आहेत.

या दांपत्याला दोन कन्या आहेत - सौ.नीलाताई व सौ.जयाताई. सौ.नीलाताई यांचे पती डॉ.नगरकर हे कोल्हापूरमधील विख्यात डॉक्टर आहेत. सौ. जयाताईंचे पती श्री. गद्रे हे पुण्यातील नामवंत आर्किटेक्ट आहेत.

५. सौ. सुलभाताई व श्री.माधवराव तांबोळी

सौ.सुलभाताई या श्रीदत्तमहाराजांच्या मधल्या कन्या. लहानपणापासून सौ. सुलभाताईंची श्रीदत्तमहाराजांवर व सौ.ताईमहाराजांवर असीम श्रद्धा. १९८० सालापासून सतत ११ वर्षे सौ.सुलभाताई श्रीदत्तमहाराजांच्या सर्व भागवतसप्ताहांना मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहिल्या. श्रीदत्तमहाराजांबरोबर अनेक वेळा प्रवास करण्याचे भाग्य लाभले. पहिल्यापासून वैराग्य हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष आहे.




श्रीदत्तमहाराज आणि श्रीयतिमहाराज यांची
वासुदेवनिवासमध्ये झालेली भेट
('शब्देवीण संवादिजे')



**श्रीदत्तमहाराजांचे
भक्ताच्या घरी
स्वागत**



सौ.आईसाहेबांचे एका भक्ताच्या घरी स्वागत
(समवेत सौ.ताईमहाराज)



सौ.अनितावहिनी कवीश्वर, सौ.ताईमहाराज, सौ.सुलभाताई तांबोळी,
श्रीवासुदेवनिवासमध्ये

श्रीदत्तमहाराजांना सद्गुरू मानून अगदी प्रारंभापासून सौ. सुलभाताईनी आपला प्रपंच सद्गुरूचरणी वाहिला आहे. प्रपंचातील सर्व कामे करीत असतांनाच मनाने त्या प्रपंचातून अलिप्तच असतात. घरातील कामे करतांना आत नामस्मरण सतत चालू असते. गोड आवाजाची जन्मजात देणगी आहे. भक्तीगीते आणि पदे तन्मयतेने गातात. श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराजांसमोर भजन सेवा करण्याचे भाग्य त्यांना अनेक वेळा लाभले आहे.

सौ.सुलभाताईंचे पती श्री. माधवराव तांबोळी मुंबईला मंत्रालयात शासकीय सेवेत होते. निवृत्त झाल्यावर आता ते पुण्याला स्थायिक झाले आहेत. श्री.माधवराव बालपणीच मातृसुखाला वंचित झाले. सौ.आईसाहेबांनाच ते आपली आई मानत. श्रीदत्तमहाराजांची दीक्षा घेतल्यावर त्यांनी जावई ही भूमिका पूर्णतया सोडून दिली. शिष्यभावाने ते श्रीदत्तमहाराजांची सेवा करू लागले. आंघोळीला पाणी काढून देणे, संध्येची तयारी करून ठेवणे, पूजेची तयारी करणे या सेवेपासून ते रात्री अंथरूण घालून देणे, पाय चेपून चरणसेवा करणे अशी सेवाही माधवराव अगदी तन्मयतेने करीत. हे सेवा पाहिली म्हणजे "श्रीदत्तमहाराजांचे ते जामात आहेत" यावर पहाणाऱ्यांचा विश्वासही बसत नसे. सौ.आईसाहेबांनी संकोचाने त्यांना या सेवेपासून परावृत्त करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करून पाहिला. पण श्री.माधवरावांनी त्यांच्या प्रयत्नांना कधीच प्रतिसाद दिला नाही आणि श्रीदत्तमहाराजांची सेवा शिष्यभावाने करणे त्यांनी कधीच सोडले नाही.

श्रीदत्तमहाराजांचे शिष्य हेच आपले खरे आप्त, त्यांची घरे ही आपल्याच आप्तांची घरे आहेत या आपुलकीने श्री.माधवराव व सौ.सुलभाताई दोघेही त्यांच्यात वावरतात. साधेपणाने त्यांच्यातील एक बनून जातात. 'सद्गुरूंची कन्या आणि जामात' म्हणून काही वेगळा मान मिळावा, काही वेगळी वागणूक मिळावी अशी अपेक्षा दोघांच्याही मनांत नसते. हे सर्व पाहिले म्हणजे त्यांच्या जीवनावर आणि व्यक्तिमत्त्वावर विरागवृत्तीचा किती दाट प्रभाव पडला आहे याची जाणीव होते.

आपल्या पत्नीप्रमाणेच श्री. माधवरावांचीही सौ.ताईमहाराजांवर असीम अतुट श्रद्धा आहे. लौकीक दांपत्यजीवनापेक्षा अगदी वेगळे जीवन जगणाऱ्या

या दांपत्यावर सौ.ताईमहाराजांची पूर्ण कृपा झाली नसती तरच नवल. श्रीदत्तमहाराज आणि सौ.ताईमहाराज यांच्या कृपेने मोठाच पारमार्थिक अधिकार आता प्राप्त झालेला आहे असे दिसून येते.


या दांपत्याचे थोरले चिरंजीव श्री.मनोजराव इंडस्ट्रियल इंजिनियर आहेत. धाकटे चिरंजीव श्री.सूरजराव हे कॉम्प्युटर इंजिनिअर आहेत. श्री.सूरजरावांचा विवाह डॉ.अशोकमहाराज यांची कन्या रेणुका हिच्याशी झालेला आहे. सौ.सुलभाताईंची कन्या रंजना हिचा विवाह मॅकॅनिकल इंजिनियर श्री. अतुल वैद्य यांचेशी झाला आहे.

तांबोळी कुटुंबातील सर्व व्यक्तिंची श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराज यांच्यावर मोठी श्रद्धा आहे. मुले, सुना व जावई या सर्वांनाच श्री.माधवराव व सौ.सुलभाताई यांच्या वैराग्यशील जीवनाचा मोठा अभिमान आहे. पारमार्थिक भूमिकेतून ते दोघे जी उपासना करतात आणि ज्या प्रकारचे वैराग्यशील जीवन जगतात त्याला घरातील सर्वांचाच सक्रीय पाठींबाही आहे. अपवाद म्हणून एकही विसंवादी सूर आजतागायत तांबोळींच्या घरात उमटलेला नाही हे खरोखरीच दुर्मिळ म्हणावे असे वैशिष्ट्यपूर्ण चित्र या घरात दिसते.


६. सौ. शैलाताई व श्री. अरुणराव आडकर

सौ.शैलाताई या श्रीदत्तमहाराजांच्या तिसऱ्या कन्या. शैलाताईंनी आपल्या बालपणीच्या ज्या आठवणी सांगितलेल्या आहेत त्यातून श्रीदत्तमहाराज त्यांचे लाड पुरवतांनाच प्रेमाचा वर्षाव करून त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडवित होते याचे मनोरम दर्शन घडते. शैलाताईंना लहानपणी झोपतांना रोज नवी गोष्ट लागायची आणि श्रीदत्तमहाराजही रोज नवी नीतिकथा किंवा बोधकथा सांगून तो हट्ट पुरा करायचे.

पुण्यात कोणी संतमहात्मे आले की श्रीदत्तमहाराज शैलाताईंना अगदी लहानपणापासून नेहमी बरोबर घेऊन जायचे. अशा भेटींच्या वेळी जी धर्मचर्चा व्हायची त्यावेळी श्रीदत्तमहाराज शैलाताईंना शेजारी बसवून घ्यायचे. शैलाताई सांगतात, "त्या गहन चर्चा मला कळायच्या नाहीत. एवढेच कळायचे की मोठे मोठे ज्ञानी संतमहात्मे अगदी शंकराचार्यसुद्धा श्रीदत्तमहाराजांना खूप मान द्यायचे, अतीव आदराने त्यांचे बोलणे ऐकायचे. त्याचाच मोठा आनंद माझ्या



सौ.ताईमहाराजांचे घरी (जालना)
श्रीदत्तमहाराज गेले असतांना



श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराज प्रसाद घेतेवेळी



श्रीदत्तआश्रम जालना येथे
सौ.शैलाताई आडकर, सौ. सुमनताई भातलवंडे, सौ.ताईमहाराज,
सौ. सुलभाताई तांबोळी, सौ. अनिताताई कवीश्वर

मनाला वाटायचा आणि त्या आनंदातच मी चर्चा पूरी होईपर्यंत चुळबूळ न करता श्रीदत्तमहाराजांच्या शेजारी निमूटपणे बसून रहायची."

आईच्या पोटात असतांनाच अभिमन्यूने चक्रव्यूह भेदण्याचे ज्ञान आत्मसात केले होते असे महाभारतकार सांगतात. हे लक्षात घेतले म्हणजे श्रीदत्तमहाराजांनी सौ.शैलाताईवर अगदी लहानपणापासून अध्यात्माचे संस्कार कसे बिंबवले आणि त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडवले हे लक्षात येते. लहान वयामुळे धर्मचर्चेतील शब्दज्ञान सौ.शैलाताईंना झाले नसले तरीही त्या ज्ञानामागील अनुभूती शैलाताईच्या अंतरंगात निश्चितपणे रूजत होत्या. म्हणूनच या संदर्भात सौ.ताईमहाराज एकदा म्हणाल्या होत्या, "श्रीदत्तमहाराजांनी झाड लावून ठेवले आहे ते मोठे झाल्यावर श्रांतांना आणि दुःखितांना सावली मिळावी या हेतूनेच." सौ.ताईमहाराजांचे हे शब्द फार अर्थपूर्ण आहेत असे म्हणावेसे वाटते.

श्री.अरुणराव आडकर यांचेशी विवाह होऊन त्या आडकर घराण्यात आल्या. आडकर घराण्यावर साईबाबांची पूर्ण कृपा आहे. अरुणरावांचे आजोबा श्रीसाईबाबांचे अंतरंग शिष्य म्हणावे एवढे निस्सीम भक्त होते. साईबाबांच्या सेवेसाठी त्यांनी घर सोडले आणि आयुष्यभर त्यांची खूप सेवा करत राहिले. त्यांनी अनेक भक्तिगीते व आरत्या रचल्या असून त्यापैकी श्रीसाईबाबांची आरती आजही सर्वत्र म्हटली जाते. साईबाबांचा जो एकमेव फोटो आज उपलब्ध आहे त्यात साईबाबांबरोबर अरुणरावांचे आजोबाही आहेत. यावरून साईबाबांनी त्यांना किती जवळ केले होते हेच दिसून येते. श्री.अरुणराव फार मोठे पुण्यवंत असून त्यांनीही आजोबांची भक्तिपरंपरा मोठ्या श्रद्धेने तशीच पुढे चालू ठेवली आहे.

विवाहानंतर कोणती उपासना करावी असा संभ्रम सौ.शैलाताईंच्या मनांत निर्माण झाला होता. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांनी त्यांना घराण्यात चालत आलेली श्रीसाईबाबांची उपासना चालू ठेवावी असे सांगितले होते आणि त्यानंतर श्रीदत्तमहाराजांनी शैलाताईंना पूजेच्यावेळी श्रीसाईबाबांच्या फोटोत स्वतःचे दर्शन दिले होते. एकदा साईबाबा दिसायचे तर एकदा श्रीदत्तमहाराज दिसायचे. त्यामुळे दोघेही एकच आहेत या रहस्याचा उलगडा होऊन त्या निश्चिंत मनाने उपासना करू लागल्या.

श्री.अरुणराव आडकर हे शैलाताईचे पती इंजिनियर आहेत. बांधकाम व्यवसायात मोठे कंत्राटदार आहेत. अनेक मोठ्या इमारतीचे बांधकाम त्यांनी कलात्मक व चोख केल्याने त्यांचा नावलौकिक मोठा झाला आहे. शिरडीचे प्रख्यात साईताज हे हॉटेलही त्यांच्याच मालकीचे आहे.

सौ.शैलाताई व श्री.अरुणराव या दोघांनीही श्रीदत्तमहाराजांची दीक्षा घेतली असून त्याप्रमाणे दोघेही श्रद्धेने साधना करतात.

या दांपत्याचे थोरले सुपुत्र श्री.नीरजराव डॉक्टर आहेत. धाकटे सुपुत्र श्री.नीहार इंजिनियर आहेत.

चौघांचीही श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराजांवर मोठी श्रद्धा आहे संपन्न ऐहिक जीवन जगत असूनसुद्धा आडकर कुटुंबातील सर्वांनाच आध्यात्मिक जीवनाची ओढ आहे. आर्थिक संपन्नता व नावलौकिक प्राप्त झालेला असूनही अरूणराव व सौ.शैलाताई नम्र आणि विनयशील राहिल्या आहेत. ऐहिक संपन्नतेबरोबर येणारे कोणतेही अवगुण आडकर कुटुंबीयांच्या जीवनांत प्रवेश करू शकले नाही यातच श्रीदत्तमहाराजांची त्यांच्यावर झालेली कृपा दिसून येते.

अशा रितीने श्रीदत्तमहाराजांच्या कुटुंबांतील सर्व मुलगे, सुना, मुली, जावई आणि नातवंडे श्रीदत्तमहाराजांकडे सद्गुरू म्हणून पहात आहेत. सर्वजण सुशिक्षित आहेत. ऐहिकदृष्टच्या संपन्नस्थितीत आहेत. तरीही अध्यात्मजीवनाकडे सर्वांचीच ओढ आहे. त्या उत्कट ओढीमुळे सर्वजण व्रते, अनुष्ठाने व नित्यनैमित्तिक कर्मे करण्यात मनापासून रस घेत आहेत आणि श्रीदत्तमहाराजांनी सांगितलेली उपासना निष्ठेने आणि सातत्याने करीत आहेत. हे घडले आहे ते केवळ श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब या उत्तुंग विभूतींच्या प्रभावामुळे. अपवाद म्हणूनसुद्धा कणभरही विरोधी प्रक्रिया वा नाराजी एकाही व्यक्तीच्या मनांत आलेली नाही हे अगदी निश्चितपणे सांगता येईल अशी वस्तुस्थिती आहे. श्रीदत्तमहाराजांच्या विभूतीमत्त्वाच्या प्रभावामुळे हे घडू शकले हे उघड आहे.

प्रपंच व परमार्थ यांची श्रीदत्तमहाराजांनी जी यशस्वी सांगड घातली ती सर्व कुटुंबियांनी आदर्श म्हणून मनापासन् स्वीकारली आहे. एकमेकांबद्दल

जिव्हाळा, आपुलकी व एकोपा यांचे जे गहिरे रंग या कुटुंबात दिसतात ते पहाणे हा एक सुखद अनुभव आहे. आपल्या मुलांइतकेच भाचे व पुतणे यांच्यावर प्रेम करणे व त्यांची तितकीच काळजी घेणे, कपडे वगैरे वस्तू खरेदी करतांना इतर कुटुंबीयांचा विचार मनांत येणे हे या कुटुंबीयांमध्ये नेहमीच होत असते. अडचणीच्या वेळी एकमेकाला मदत करणे आणि प्रसंगी इतरांसाठीही मोठी आर्थिक झीज सोसणे हे या कुटुंबातील नित्याचे दृश्य आहे.

कवीश्वर कुटुंबीयांत दिसणारे हे चित्र म्हणजे भारतीय संस्कृतीने आदर्श म्हणून सांगितलेल्या कुटुंबाचे एक प्रातिनिधीक मनोहारी चित्र आहे. श्रीदत्तमहाराज आणि सौ.आईसाहेब यांच्या प्रभावामुळेच भारतीय संस्कृतीतील हे चित्र इथे साकार झालेले आहे. असे एकात्म आणि एकसंघ कौटुंबिक चित्र आजच्या काळात खरोखरी दुर्मिळ आहे. यापूर्वी होऊन गेलेल्या थोर संतांच्या कुटुंबीयांच्या जीवनांतही त्या संतांचा सर्व कुटुंबावर इतका प्रभाव असणे आणि त्यामुळे असे एकात्म आणि एकसंघ कौटुंबिक चित्र दिसणे ही घटना आत्तापर्यंत क्वचितच घडली असेल असे म्हणावेसे वाटते.

कवीश्वर कुटुंबीयांच्या लौकिक आणि अलौकिक जीवनाचे हे चित्र आणखी एका विभूतीच्या चित्राचा समावेश केल्याशिवाय पूर्ण होणार नाही. ती विभूती म्हणजे सौ.ताईमहाराज. कवीश्वर कुटुंबीयांवर श्रीदत्तमहाराजांचा आणि सौ.आईसाहेबांचा जेवढा प्रभाव आहे तेवढाच किंबहुना कांकणभर जास्तच सौ.ताईमहाराजांचा प्रभाव आहे. याचे मुख्य कारण म्हणजे श्रीदत्तमहाराजांचे व सौ.आईसाहेबांचे विभूतीमत्त्व कवीश्वर कुटुंबीयांच्याच नव्हे तर जगाच्यापुढे यथार्थपणे व्यक्त व्हायला सौ.ताईमहाराजांचा कृपाप्रसाद प्रामुख्याने सहाय्यभूत होत राहिला आहे.

शिवाय सौ.ताईमहाराज या कवीश्वर कुटुंबीयांचा एक महत्त्वाचा घटकही आहेत याचे आणखी एक कारण आहे. सौ.ताईमहाराजांचे पिताश्री श्रीकाजळकर-महाराज हे श्रीधुंडिराजमहाराजांचे अंतरंग शिष्य आणि इतके निकटवर्ती होते की ताईमहाराज दोन महिन्याच्या असतांनाच ताईमहाराजांना त्यांनी श्रीधुंडिराज-महाराजांकडे सोपवले. तेव्हापासून ताईमहाराज अनेक वर्षे कवीश्वर कुटुंबातच देऊळगांवराजा येथे वाढल्या. श्रीधुंडिराजमहाराज व

सौ.आईसाहेब यांनी त्यांना अत्यंत प्रेमाने आपल्याच मुलांप्रमाणे ताईमहाराजांचे आपल्या घरातच संगोपन केले.

सौ.ताईमहाराजांचा जन्म इ.स. १९४१ सालचा. म्हणजे त्यावेळी सौ.लक्ष्मीबाई आईसाहेब यांचा श्रीदत्तमहाराजांशी विवाह संपन्न होऊन त्यांनी कवीश्वर घराण्यात प्रवेश केल्याला बारा वर्षे उलटून गेली होती. तेव्हापासून श्रीदत्तमहाराजांचे व सौ.आईसाहेबांचे सौ.ताईमहाराजांवर पूर्ण लक्ष होते.

पुढे काही वर्षे ताईमहाराज आजोळी होत्या. वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे इ.स. १९५५ साली त्यांचा श्री.मधुकरराव चाटुपळे यांच्याशी विवाह झाल्यावर एक वर्षातच म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षीच ताईमहाराजांनी व मधुकररावांनी श्रीधुंडिराजमहाराजांची दीक्षा घेतली. नोकरीच्या निमित्ताने श्री.मधुकररावांचे वास्तव्य निरनिराळ्या गावात झाले पण त्या गावात आले की श्रीधुंडिराजमहाराज सौ.ताईमहाराजांच्या घरी येऊन जायचेच. इ.स. १९७३ सालापासून ताईमहाराजांचे जालना येथे वास्तव्य झाले. जालन्यापासून देऊळगांवराजा फक्त ३० कि.मी.अंतरावर आहे. त्यामुळे त्या काळात ताईमहाराज आठवडचातून एकदा (काहीवेळा दोनदादेखील) देऊळगावराजाला श्रीधुंडिराजमहाराजांच्या दर्शनाला जायच्याच.

इ.स. १९७८ साली श्रीधुंडिराजमहाराजांचे निर्वाण झाले. निर्वाणापूर्वी त्यांनी सौ.ताईमहाराजांचे अध्यात्मजीवन श्रीदत्तमहाराजांकडे सोपवले. तेव्हापासून सौ.ताईमहाराज श्रीदत्तमहाराजांकडे गुरूस्थानी बंधू या नात्याने पाहू लागल्या. त्यांना श्रीदत्तमहाराजांची चाक्षुषी दीक्षाही लाभली. त्या श्रीदत्तमहाराजांना बंधू मानून राखी बांधत. सौ.आईसाहेबही ताईमहाराजांचा नणंद असाच उल्लेख करीत असत.

सौ.ताईमहाराजांची सद्गुरूवरील भक्ती वाढत जाऊन ती अद्वैतभक्तीच्या पातळीवर पोचली आणि त्या सद्गुरूंशी एकरूप पावल्या. त्यामुळे सद्गुरूंचे हृदगत् त्यांना जाणता येऊ लागले. सद्गुरूंच्या वचनांचा, उद्गारांचा आणि कृतींचा गूढार्थही अचूकपणे जाणण्याची योग्यता त्यांच्या मनांत निर्माण झाली. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे भक्त आणि निकटचे कुटुंबीयसुद्धा असा गूढार्थ जाणण्यासाठी ताईमहाराजांकडे जाऊ लागले.

शिवाय श्रीदत्तमहाराजांचे तत्त्वज्ञान सौ.ताईमहाराजांनी स्वतःच्या जीवनांत इतके तंतोतंत आचरणांत आणले आहे की श्रीदत्तमहाराजांच्या तत्त्वज्ञानाच्या त्या जिवंत प्रात्यक्षिक मानल्या जातात. श्रीदत्तमहाराजांच्या तत्त्वज्ञानाच्या त्या महत्त्वाच्या प्रवक्त्या आणि भाष्यकार मानल्या जातात. म्हणूनच श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत आणि धर्मजागरणाच्या कार्यात त्यांना इतके महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

सद्गुरूंशी सौ.ताईमहाराज एकरूप झाल्या आहेत असे दृष्टान्त अनेक भक्तांनाही झाले आणि श्रीदत्तमहाराजांच्या कुटुंबीयांनाही झाले आहे. उदाहरण म्हणून एक दृष्टान्त द्यावासा वाटतो. श्रीदत्तमहाराजांची कन्या गेली अनेक वर्षे सद्गुरूंची पूजा करते. या वर्षी गुरूपौर्णिमेच्या आधी काही दिवस श्रीदत्तमहाराजांच्या त्या कन्येला श्रीदत्तमहाराजांनी स्वप्नांत येऊन सांगितले "आम्ही व सौ.ताईमहाराज एकच आहोत. म्हणून गुरूपौर्णिमेच्या दिवशी सौ.ताईमहाराजांची गुरू म्हणून पूजा करावी."

असे दृष्टान्त अनेकांना झाले आहेत. त्यातील रहस्य सौ.ताईमहाराजांच्या अद्वैत भक्तीच्या परिपूर्णतेतच सापडेल.

श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत आणि धर्मजागरणाच्या कार्यात सौ.ताईमहाराजांचे इतके महत्त्वाचे स्थान आहे की श्रीदत्तमहाराजांचे चरित्र त्यांची माहिती समाविष्ट झाल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. म्हणूनच चरित्राच्या पहिल्या आवृत्तीतच सौ.ताईमहाराजांची माहिती "देवदरबारातील रत्ने" या शीर्षकाखाली समाविष्ट केली हे सर्वांना माहितीच आहे.

या नव्या आवृत्तीत आणखी माहिती समाविष्ट करावी असे अनेकजण सांगत राहिले. त्याप्रमाणे ताईमहाराजांसंबंधी मी बरेच लिखाणही केले होते. परंतु हे कळताच माझे चरित्र लिहायचे नाही किंवा प्रस्तुत चरित्रात नवीन माहितीही घालायची नाही अशी सौ.ताईमहाराजांनी स्पष्टपणे आज्ञा केली. सौ.ताईमहाराजांचा शब्द मला वेद वाक्याप्रमाणे शिरसावंद्य आहे.

अनुज्ञा मिळताच सौ.ताईमहाराजांचे चरित्र लिहिण्यात मला धन्यताच वाटेल या माझ्या भावनांचा येथे उल्लेख करून ठेवतो.

प्रस्तुत चरित्राच्या पहिल्या आवृत्तीत समाविष्ट केलेली सौ.ताईमहाराजांची माहिती पुढे दिली आहे.

सौ.ताईमहाराज

मराठवाड्यातील थोर संत श्रीकाजळकरमहाराज यांच्या सौ.ताईमहाराज या कन्या. श्रीकाजळकरमहाराजांनी आयुष्यभर मराठवाड्यात भक्तिमार्गाचा प्रसार केला. त्यांचा अनुग्रह घेतलेले हजारो शिष्य मराठवाड्यात सर्वत्र पसरलेले आहेत. श्रीधुंडिराजमहाराज व श्रीकाजळकर-महाराज यांच्या प्रभावामुळे ताईमहाराजांना लहानपणापासूनच आध्यात्माची गोडी लागली. व्रते व अनुष्ठाने आणि खूप जपतप केले. लहानपणी त्यांनी अनेक पोथ्या वाचल्या, खूप जपतप केले. श्रीकाजळकर-महाराजांनी श्रीधुंडिराजमहाराजांचा अनुग्रह घेतला होता. आपल्या गुरूंवर त्यांची खूप भक्ती व निष्ठा होती. ताईमहाराजांनी श्रीधुंडिराजमहाराजांचा अनुग्रह घेतला. वारंवार देऊळगांवराजाला जाणे होऊ लागले. सौ.सरस्वती आईसाहेब त्यांना कन्या मानीत, त्यांचे खूप कौतुक करीत. त्यांनी दत्तमहात्म्याची पोथी ताईमहाराजांना दिली. त्यामुळे ताईमहाराजांना दत्तभक्तीची गोडी लागली.

वयाच्या १४ व्या वर्षी त्यांचा विवाह मधुकर चाटुपळे यांच्याशी झाला. सासरच्या घराण्याचेही दीक्षागुरू श्रीधुंडिराजमहाराजच होते. त्यामुळे अध्यात्मसाधनेला अधिकच बहर आला.

सौ.ताईमहाराज श्रीदत्तमहाराजांना भाऊ मानीत. हळूहळू श्रीदत्तमहाराजांचे अवतारी स्वरूप त्यांच्या ध्यानात आले. आपल्या बंधूनाच त्या गुरूस्थानी मानू लागल्या. श्रीदत्तमहाराज मराठवाड्यात नेहमी जात. त्या भागात गेले की जालना येथे वास्तव्य करून असलेल्या ताईमहाराजांकडेही ते जात. श्रीदत्तमहाराजांच्या कृपाप्रसादाने ताईमहाराजांची आध्यात्मिक वाटचाल अत्यंत वेगाने होऊ लागली.

त्या प्रपंचाची जबाबदारी सांभाळतच होत्या आणि श्रीतुकाराम-महाराजांच्या "वाहू हा संसार देवापायी" या उक्तीप्रमाणे त्यांनी प्रपंच भगवंतावर पूर्णपणे सोपवला होता.

सौ.सरस्वती आईसाहेबांच्या निर्वाणानंतर ताईमहाराजांनी पुढाकार घेऊन सुलतानपूर येथे आईसाहेबांचे समाधी मंदिर बांधले.

श्रीकाजळकरमहाराजांच्या निर्वाणानंतर त्यांचे महाराष्ट्रात पसरलेले हजारो भक्त सौ.ताईमहाराजांना गुरूस्थानी पाहू लागले आणि त्यांच्याकडे आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी येऊ लागले. पण पिताश्रींच्या पीठावर गुरूपदी आरूढ झाल्यावरही ताईमहाराजांनी अमानित्त्व सोडले नाही आणि श्रीदत्तमहाराजांच्या चरणी असलेली समर्पणभक्ती व शरणागती सोडली नाही.

सौ.ताईमहाराजांच्या प्रेरणेने श्रीदत्त आश्रम हे मोठे आध्यात्मिक केंद्र जालना येथे उभारले गेले आहे आणि या आश्रमाच्या प्रमुख या नात्याने लोकांना त्या आध्यात्मिक मार्गदर्शनही करीत आहेत. सौ.ताईमहाराजांच्या विभूतीमत्त्वामुळे आणि तपस्येमुळे श्रीदत्त आश्रमाचे कार्य खूपच वाढले आहे. आणि हजारो भक्त श्रीदत्त आश्रमात येत आहेत. समाजाच्या सर्व स्तरावरील लोक आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी येत आहेत. तरीही सौ.ताईमहाराज दीक्षेसाठी सर्वांना श्रीदत्तमहाराजांकडेच पाठवीत राहिल्या आहेत. स्वतःच्या मुलांना व सुनांनाही श्रीदत्तमहाराजांचीच दीक्षा आहे.

जालना येथे त्यांचे वास्तव्य असले तरी सतत त्या श्रीदत्तमहाराजांच्या नामस्मरणाने त्यांच्याच सान्निध्यात असतात. रोज अनेक तास त्या निर्विकल्प समाधीच्या अवस्थेत असतात. समाधी उतरल्यावर सुद्धा त्यांचे सर्व व्यवहार श्रीदत्तमहाराजांच्या स्मरणाने आणि श्रीदत्तमहाराजांसाठीच होत रहातात. श्रीदत्तमहाराजांशिवाय कोणताही विषय त्यांना आवडत नाही. क्षणभरही त्या गुरूस्थानी असलेल्या आपल्या बंधूना-श्रीदत्तमहाराजांना विसरत नाहीत.

"त्वं नो माता त्वं पिताप्तोधिपस्तं। त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुसत्वम्। त्वं सर्वस्वं तो प्रभो विश्वमूर्ति" असा सौ.ताईमहाराजाचा श्रीमहाराजांचरणी भक्तीभाव आहे. सद्गुरूंशी एकरूप होऊन अद्वैत अनुभूती घेतल्यावरही त्या अद्वैत भक्तीचे परिपूर्ण रूपच आहेत. सौ.ताईमहाराजांना गुरूस्थानी मानणारा मोठा संप्रदाय असूनही व श्रीदत्त आश्रम या आश्रमाच्या त्या प्रमुख असूनही ताईमहाराजांचे 'मीपण' पूर्ण लयाला गेलेले आहे आणि त्या पूर्णपणे सद्गुरूमय झालेल्या आहेत. त्यांना क्षणभरही सद्गुरूचे विस्मरण होत नाही.

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या सर्व अवस्थांत त्या श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनातच रंगलेल्या असतात.

"दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या मंत्राचा घोष त्यांना अत्यंत प्रिय आहे. हा घोष कानावर पडला म्हणजे अनेक वेळा त्या महामंत्राशी तन्मय होऊन भावसमाधीत बुडून जातात. सौ.ताईमहाराज अंतर्ज्ञानी आहेत, अनेक सिद्धी त्यांना प्राप्त आहेत.

सौ.ताईमहाराज कोणाच्या घरी जात नाहीत. मोठे मोठे धनिक त्यांचे शिष्य आहेत. ताईमहाराजांनी आपल्या घरी पायधूळ झाडावी म्हणून ते वाटेल ते करायला तयार होतील. अनेकांनी प्रार्थना करूनही काही थोडे अपवाद सोडले तर ताईमहाराज कोणाच्याही घरी जात नाहीत, रहायला तर नाहीच नाही. श्रीमहाराज एकदा म्हणाले होते, "ताईमहाराजांनी घरी यावे म्हणून अनेकजण त्यांची प्रार्थना करीत असतात, पण त्या कोठेच जात नाहीत आणि वासुदेव निवासमध्ये मात्र त्या न बोलावताही येतात हे आश्रमाचे केवढे मोठे भाग्य आहे."

रेणुकानिवास येथे श्रीदत्तमहाराजांच्या घरी असल्या की त्यांना कोणाशी एक शब्दही बोलणे रूचत नाही. सद्गुरूंचे नामस्मरण करण्यात त्या रंगलेल्या असतात. अनेक वेळा डोळे मिटून त्या ध्यानस्थ बसलेल्याच दिसतात. श्रीदत्तमहाराज मात्र येणाऱ्यांना सांगतात, "ताईमहाराज तिकडे बसल्या आहेत. त्यांचे दर्शन घ्या, त्यांना नमस्कार करा."

दृष्टिक्षेपानेही एखाद्याला निर्विकल्प समाधी देण्याचे सामर्थ्य सौ.ताईमहाराजांना प्राप्त झाले आहे. त्यांनी तपश्चर्येने एवढ्या अतींद्रिय शक्ती प्राप्त करून घेतल्या आहेत की अनेक दिवस उपवास करूनही त्या सामान्य माणसासारख्या वावरत असतात. त्यांना थकवा किंवा अशक्तपणा येत नाही, हे विशेष. इंद्रियांवर व देहावर असे प्रभुत्त्व क्वचितच पहायला मिळते.

श्रीदत्तमहाराज सौ.ताईमहाराजांबद्दल असे म्हणतात,"सौ.ताईमहाराज साक्षात शक्तीदेवता आहेत. साक्षात भगवती आहेत. त्यांचे संकल्प सत्य संकल्प असतात. ते लगेच सिद्ध होतात. त्या जगाच्या कल्याणासाठीच आहेत.

स्वतःच्या देहाला त्या मानतच नाहीत. सिद्धीच्या आहारी न गेल्यामुळे अतींद्रिय शक्ती प्राप्त होतात व स्वतःच्या शरीरावर व इंद्रियांवर पूर्ण ताबा येतो याचे उत्तम उदाहरण सौ.ताईमहाराजांच्या रूपाने आपल्याला पहायला मिळते. त्या कीडामुंगीलाही किंवा डासालाही धक्का लावणार नाहीत. 'सर्वभूतहितेरतः' या वृत्तीचे त्या उत्तम उदाहरण आहेत. त्यांची तितिक्षा फार मोठी आहे. त्यांच्याइतकी गुरूश्रद्धा बघायला मिळायची नाही. त्यांची अद्वैतभक्ती आहे. त्यांचे दर्शन व आशीर्वाद आध्यात्मिक प्रगतीला फारच मोलाचे ठरतात, असा अनेक साधकांचा अनुभव आहे."

एकदा दत्तमहाराज, आईसाहेब, कवीश्वर कुटुंबीय आणि ताईमहाराज तुळजापूरला गेले होते. बरोबरची मंडळी तुळजापूरच्या भवानीमातेच्या दर्शनाला निघाली. श्रीदत्तमहाराज एकदम म्हणाले, "तुळजाभवानीच्या दर्शनाने जे साधेल तेच सौ.ताईमहाराजांच्या दर्शनानेही साधेल. त्या प्रत्यक्ष भगवतीच आहेत." श्रीदत्तमहाराजांच्या या एका उद्‌गारातच सौ.ताईमहाराजांचे खरे स्वरूप व अधिकार स्पष्ट होतो.

सौ.ताईमहाराजांची वाणी कानावर पडणे म्हणजे ईश्वराची वाणी ऐकण्यासारखेच आहे. त्यांचे दर्शन घेणे म्हणजे मानवी शरीराच्या आश्रयाने व्यक्त होणाऱ्या आदिशक्तीचे (मूळ ईश्वरीशक्तीचे) वैभव प्रत्यक्ष डोळ्याने पहाणे असते. त्यांची कृपा संपादन करणे म्हणजे त्या आदिशक्तींची कृपा प्राप्त करून घेणे असते. त्यांचे आशीर्वाद म्हणजेच विश्वाला आधारभूत असलेल्या ईश्वरीशक्तीचे, त्या जगन्मातेचे आशीर्वाद असतात. म्हणूनच त्यांचे वर्णन आदिशक्ती, आदिमाया किंवा शक्तीदेवता असे श्रीदत्तमहाराजांनी केले आहे.

परिशिष्ट क्रमांक - ७

* सद्गुरू श्रीधुंडिराजमहाराजांची आरती

आरती करू सद्गुरूची ।
श्रीधुंडिराजरायाची ॥ आरती... ॥धृ॥

असे गौरवर्ण साचा
करी लेप विभूतीचा
अशा त्या पाहूनि स्वरूपाला
भास हो दत्त मनी झाला
(चाल बदलून) .... किती हो वर्णू तया स्वरूपा
किती हो वर्णू तया स्वरूपा
(चाल बदलून) .... न वर्णवे काही
म्हणुनि लवलाही
सांगतो पाही
(चाल बदलून) .... करू सेवा नित्य त्यांची
श्रीधुंडिराजरायाची ॥ आरती.... ॥१॥

किती हो शांत ती वृत्ती
उणी ती उपमा सिंधूची
असे हो दूर ग्रामाला
रक्षितो शिष्यसमूहाला
असे हो भाव पूर्ण ज्याचा
हरीतसे गर्व दासाचा
(चाल बदलून) .... पदी जो नम्र करी माया
पदी जो नम्र करी माया
(चाल बदलून) .... हरितसे ताप
दूर करी पाप
करीत निर्व्याज
(चाल बदलून) .... पहा हो वृत्ती अशी साधी
श्रीधुंडिराजरायाची ॥ आरती... ॥२॥

वास हो नृसिंहवाडीला
स्मरणतसे गौरीतनयाला
पुजुनी नित्य गणेशाला
पूजा अर्पी चंडिकेला
(चाल बदलून) .... दूर करी मोहपाशाला
दूर करी मोहपाशाला
(चाल बदलून) .... नुरवि अनुमात्र
करितसे पात्र
शांत करी गात्र
(चाल बदलून) .... भ्रांती हरिशरण ज्याची
श्रीधुंडिराजरायाची ॥ आरती... ॥३॥

जनाला बोध करायाला
गहीवर धुंडिराजयाला
वाचुनी नित्य भारताला
शिकवितसे ज्ञान जनतेला
(चाल बदलून) .... लावितो भक्ती मार्गाला
लावितो भक्ती मार्गाला
(चाल बदलून) .... भक्तीने जाण
करा पूजन
लाविता मन
(चाल बदलून) .... इच्छा पुरवी अंतरीची
श्रीधुंडिराजरायाची ॥ आरती.... ॥४॥

अठराशे एकावन अब्दाला
नाम हो शुक्ल असे ज्याला
माघ कृष्ण भानुवार दशमीला
गोविंद करी आरतीला
(चाल बदलून) .... मागणे हेचि असे अंती
मागणे हेचि असे अंती

(चाल बदलून) .... नको मज मुक्ती
वसू दे शक्ती
लाभू दे भक्ति
(चाल बदलून) .... रामभजन करण्याची
श्रीधुंडिराजरायाची ।। आरती... ।।५ ।।

श्रीदत्तमहाराजांची आरती

आरती दत्तराजयाची ।
धुंडिराजसुपुत्राची ।।धृ ।।
पुण्यग्रामी तू वससी
भक्ता पावन तू करीशी
भजती त्याते उद्धरिसी
न भजती त्यांही कृपा करीशी
(चाल बदलून) .... पुरुषोत्तमा तू अवतारा
पुरुषोत्तमा तू अवतारा
(चाल बदलून) .... शरण येऊन
विनीत होऊन
धुली घेईन
(चाल बदलून) .... श्री गुरू आपुल्या चरणांची
किमया पावन करण्याची
श्रीदत्तराजयाची ।।१ ।। आरती ....
भागवतावरी तव प्रीति
स्वकुळी गणेश दत्त भक्ती
ज्ञानी विद्यावाचस्पती
अंकीत कुंडलिनी शक्ती

* श्रीगुरुःशरणम् *

(चाल बदलून) .... कवीश्वरा तू ईश्वरा
कवीश्वरा तू ईश्वरा
(चाल बदलून) .... जगती प्रगटून
लीला दावून
तरीही लपवून
चाल बदलून) .... ठेविली ओळख स्वरूपाची
गाईन लीला कीर्तीची ॥२ ॥ आरती ....

शुभ्र वस्त्र शुचिचे ल्याले
वात्सल्या मुर्त रूप आले
ज्ञाना विनये शोभविले
ब्रह्म साकारुनि आले

(चाल बदलून) .... भक्तवत्सला दयाघना
भक्तवत्सला दयाघना
(चाल बदलून) .... दृष्टीने करुण
मजला बघून
जवळी घेऊन
(चाल बदलून) .... वर्षा करी वा ममतेची ।
मागीन भिक्षा भक्तीची ॥३ ॥
आरती श्रीदत्तराजयाची
श्रीधुंडिराजसुपुत्राची ॥

(श्रीदत्तमहाराजांची ही आरती विशिष्ट चालीवर म्हटली जाते. जालना येथील एक भक्त सौ. नेहा दंडे यांनी ''दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा'' हा महामंत्र वेगवेगळ्या रागात गाऊन एक ध्वनिफित प्रकाशित केली आहे.या ध्वनिफितीत ही आरती सौ. नेहा दंडे व त्यांचे सहकारी यांनी चालीवर सुरेलपणे गायलेली आहे. ही ध्वनिफित श्रीदत्त आश्रम, जालना येथे मिळू शकते.)

* ताईमहाराजांना झालेले श्रीदत्तमहाराजांचे दर्शन

(सौ.ताईमहाराजांच्या प्रेरणेनेच प्रस्तुत चरित्राचे लेखन झालेले आहे. त्यांचा सत्यसंकल्प होता म्हणूनच हे चरित्र प्रकाशित होत आहे. त्यांनी चरित्रलेखनाला आशीर्वाद तर दिलेच परंतु चरित्रांत समाविष्ट करण्यासाठी श्रीदत्तमहाराजांचे त्यांना घडलेले दर्शन समर्थपणे शब्दांत रेखाटले हा त्यांचा सर्व साधकांवर झालेला अनुग्रहच आहे. त्यांची वाक्पूजा समाविष्ट झाल्याने या चरित्रग्रंथाचे मोल खूपच वाढले आहे. त्यांची वाक्सुमने सर्व साधकांना प्रेरक, मार्गदर्शक आणि नव्या अनुभूती देणारी ठरतील असा विश्वास वाटतो.)

"जालन्याला महाराज नेहमी आमच्याकडे यायचे. ते आले की, मनाला खूप शांती मिळायची. मूलं लहान होती. त्यांची शिक्षणं व्हायची होती. खूप जबाबदारी होती. पण महाराजांनीच सर्व जबाबदारी घेतली होती. त्यांनी काही कमी पडू दिलं नाही. खाऊन पिऊन सुखी ठेवलं. महाराजांनीच सगळं सांभाळून घेतलं. सर्व व्यवस्थित ठेवलं. अजून काय पाहिजे असतं? प्रपंचही त्यांनीच करून घेतला आणि परमार्थही त्यांनीच करून घेतला. ते पाठीराखे होते म्हणूनच तर सगळं साधलं, मला कधी त्यामुळे काही काळजी वाटली नाही."

परक्या माणसाला मी कधी काही मागितलं नाही. कुणाला काही मागायचं नाही ही जिद्द होती. कशाला मागायचं?

प्रथम प्रथम महाराज दोन महिन्यांनी यायचे. पुढे दर महिन्याला यायला लागले. तिकडे कुठल्या कुठल्या गावाला दौरा असायचा. हा दौरा एस्.टी. बसनेच करायचा. आमच्या भागात आले की जालन्यालाही यायचे. बसने यायचे. रिक्षा येऊन उभा रहायची. प्रत्यक्ष दारात उभे रहायचे. मुलांनाही महाराज आले की बरं वाटायचं. मुलं महाराजांना म्हणायची, "महाराज, आपण आलात की ताईला बरं वाटतं. आम्हालाही खूप बरं वाटतं. आपण नेहमी आमच्याकडे यावं."

मला सारखं कर्दम ऋषींसारखं वाटायचं. भागवतात वर्णन केले आहे तसंच अगदी मला ते आले म्हणजे वाटायचं. महाराज बोलायला लागले

घेतो. कोणाला पत्ता लागणार नाही की महाराजांचे सामर्थ्य काय आहे, महाराजांचे खरे स्वरूप काय आहे?

समोर जीव आला की त्यांचं सगळं पूर्वकर्म त्यांच्या लक्षात येतं, या जन्मातली त्या जीवाच्या हातून झालेली कर्म, मागच्या जन्मातली त्याची कर्म, त्याचे कर्म, त्याचे पूर्वसुकृत, त्याची योग्यता, त्याचा अधिकार काय आहे हे ते लगेच जाणतात. समोरचा जीव कोणता आंतरिक भाव घेऊन आपल्यासमोर आला हेही महाराज लगेचच ओळखतात. कोणालाही शब्दात काही सांगावं लागत नाही. समोरच्या जीवाचं हित कशात आहे हेही महाराजांच्या लगेच लक्षात येतं. मग त्याप्रमाणे महाराज त्या जीवासाठी करीत असतात. त्याच्या प्रपंचातही आणि परमार्थातही क्षणोक्षणी त्याचा सांभाळ करतात. महाराज जे ठरवतात तेच त्या जीवाच्याबाबतीत घडत जातं. आपण ठरवून काही होत नाही. महाराजांनी योजलेलं असतं तेच घडत जातं. महाराजांचं हे सामर्थ्य जीवाला कळणारही नाही पण ते सामर्थ्य असतच असतं.

मोठ्या महाराजांची आरती आहे. त्यात वर्णन केलं आहे. त्याची आठवण महाराजांना पाहून होते. उंच भव्य मूर्ती, तेजसी, खांद्यावर पिशवी. मांडी घालून बसतात. सामान्य माणसासारखे वागतात. सामान्य माणसासारखे बोलतात. हे पाहिलं म्हणजे वाटतं खरंच ईश्वराची लीला काही न्यारीच आहे.

क्षणाक्षणाला ते सांभाळतात. पण ते समजून घ्यायची आपली पात्रताच नसते. ते जे काही सांगतात ते समजून घ्यायचीसुद्धा आपली पात्रता नसते. त्यांचं बोलणंसुद्धा आपल्याला कळत नाही. ते काही विचारतात, आपण काही उत्तर देतो अगदी वेड्यासारखे. शाळेत परिक्षा पास झाल्यावर श्रेणी देतात. पहिली श्रेणी, दुसरी श्रेणी, पण अजून तरी आपली चतुर्थ श्रेणीच चालली आहे. त्यांनी कृपा केली तरच आपल्याला पहिली श्रेणी मिळायची. सगळं त्यांना माहिती असतं. प्रत्येक जीवाची त्यांना कल्पना असते. प्रत्येकाचं कर्म पाहून त्याला फळ देतात. ज्याचं ज्याचं जसं कर्म असतं तसं ते त्याला फळ देतात. आपण म्हणतो महाराज कृपा करा. आशीर्वाद द्या,

त्यांची कृपा आहेच, त्यांचे आशीर्वाद आहेतच, पण आपल्याला आठवणही नसते.

द्विसाहस्त्रीत आहे. कोणी अडचण घेऊन आला की दत्तप्रभू प्रथम धर्मोपदेश करून पहायचे. जर त्याचे पूर्वसुकृत असेल तर त्याला ते पटायचं. पण त्याचं पूर्वसुकृत नसलं तर त्याला दत्तप्रभूंनी केलेला उपदेश पटायचा नाही. मग तो जीव दत्तप्रभूंना सांगायला लागायचा, मला दुःख आहे. अडचणी आहेत. मग दत्तप्रभू त्याला सांगायचे,"देवाची सेवा करा." महाराजांचही तसंच आहे. समोर आलेल्या जीवाला महाराज काही सांगतात. महाराज जे सांगतात ते त्यांचे शब्द आत्मारामापर्यंत खोलवर आत जातात. आपल्याला कळत नाही. आपण त्याचा एवढा खोलवर विचारही करीत नाही. पण महाराज प्रत्येकाचा भाव पहात असतात आणि त्याप्रमाणे त्याला ते सांगतात. त्याची शक्ती जागृत करून देतात. महाराज जे सांगतात ते त्या जीवाला आता जरी पटलं नाही तरी ते खोलवर आंत जाऊन रुजते. तो जीव त्यामुळे स्वच्छ होतो. पुढे त्याचा त्याला उपयोग होतोच होतो. महाराज जो उपदेश करतात तो त्या आत्म्याला असतो. शरीराला त्याचं काय?

आता हा जीव महाराजांकडे जातो, तो दुःखी म्हणून जातो, पीडित म्हणून जातो. मला घर नाही, मला घर पाहिजे, मला खायला पाहिजे, अशी काहीतरी कामना घेऊन तो महाराजांपुढे जातो. त्याला महाराज सांगतात, "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या मंत्राचा जप करा. एवढंच सांगतात. पण तो सांगतांना महाराज आतमध्ये त्याला जागृत करतात. मनुष्य महाराजांपुढे व्यवहाराने आलेला असतो. दुःख सांगायला आलेला असतो, अडचणी सांगायला आलेला असतो. महाराज त्याला जप करा, प्रार्थना करा असं सांगतात आणि तो समाधानाने परत जातो. पण आपल्या आत काय बदल महाराजांनी केला आहे याची त्याला काहीच कल्पना नसते. पण समोर आलेल्या माणसाचं पूर्वकर्म, पूर्वजन्म सारं काही जाणून महाराजांनी त्या जीवाच्या आत खोल आंतरिक बदल केलेला असतो. त्याला आत शुद्ध केलेला असतो. त्याच्या परमार्थाला दिशा लावून दिलेली असते. त्याच्या परमार्थातील अडचणी दूर केलेल्या असतात. त्याला कळले नाही

तरी महाराजांनी जे बीज आत लावलेलें असते, ते रुजले की पुढे त्यामुळेच त्या जीवाचा उद्धार होतो. महाराज पुढचं पहातात. महाराज जे सांगत असतात ते तसेच पुढे घडते. अशी कितीतरी उदाहरणे आहेत. महाराजांनी सांगितलं होतं तसंच पुढे पाचसात वर्षांनी घडलं असं कितीतरी लोक सांगत असतात. महाराजांचं सामर्थ्य काय आहे हे वरून कुणाला कळायचं नाही. असं ईश्वरी शक्तीचं रूप म्हणजे काही वेगळंच आहे. म्हणून तर महाराजांचं नुसतं दर्शन घेतलं तरी सगळं साधतं. प्रपंचही साधतो व परमार्थही साधतो. मग जीवाला आणखी काही करावं लागत नाही. कसले शास्त्रग्रंथ वाचावे लागत नाही, कुठे तीर्थयात्रेला जावं लागत नाही, कुठे स्नानं करावी लागत नाहीत, काही व्रतवैकल्य करावी लागत नाहीत, प्रदक्षिणा घालाव्या लागत नाहीत. काही नाही. नुसतं महाराजांचं दर्शन घेतलं की तेवढं पुरतं. त्यांच्या दर्शनानेच सगळं साधतं.

मला तर नेहमीच असं वाटतं कोठे तीर्थयात्रेला जायला नको, कोठे देवळात जायला नको, कोठे लोटांगण घालायला नको, कुठे प्रदक्षिणा घालायला नको. फक्त महाराजांचं दर्शन घ्यावं. महाराजांचं दर्शन झालं की झालं. दर्शनानेच सगळं साधतं.

भागवतात श्रीकृष्णाच्या लीला सांगितल्या आहेत. महाराजांचही तसंच आहे. कर्दम, कश्यप, पुराणात, भागवतात आपण सगळं वाचतो, ते सगळं आपल्याला इथे प्रत्यक्षात पहायला मिळतं. केवढं भाग्य आहे आपलं.

०००

* श्रीगुरुःशरणम् *

सद्‌गुरूचरणी वाक्‌सुमने

डॉ. अशोकमहाराज कवीश्वर

(श्रीदत्तमहाराजांचे ज्येष्ठ पुत्र आणि निकटचे अंतरंग शिष्य डॉ. अशोकमहाराज यांनी प्रस्तुत चरित्रासाठी आपल्या आठवणी सांगितल्या आहेत. प्रस्तुत चरित्रात डॉ. अशोकमहाराजांच्या आठवणींचा समावेश झाल्यामुळे या चरित्र ग्रंथाचे मोल खूपच वाढले आहे असे वाटते. डॉ. अशोकमहाराजांनी सांगितलेल्या आठवणी पुढे दिल्या आहेत.)


श्रीदत्तमहाराजांचा ज्येष्ठ पत्र आणि विधिवत दीक्षा घेतलेला एक शिष्य म्हणून श्रीदत्तमहाराजांच्या सान्निध्यात रहाता आले हे मोठेच भाग्य. श्रीदत्तमहाराजांच्या कृपाछायेत जीवन व्यतीत करता आले हे तर त्याहून मोठे भाग्य. यामुळे कल्पवृक्षाच्या छायेत बसण्याचे भाग्य लाभले अशीच भावना मनांत दाटून येत आहे.

चरित्रलेखकांनी श्रीदत्तमहाराजांसंबंधी काही लिहावे अशी विनंती केली आहे. तथापि श्रीदत्तमहाराजांचे यथार्थ गुणवर्णन करणे कोणालाही अशक्यच आहे. केवळ शिष्यभाव म्हणून हे दोन शब्द लिहीत आहोत.


अगदी लहानपणापासून सतत वाटत आले आहे की श्रीदत्तमहाराज हे श्रीमद्‌भागवतात वर्णन केल्याप्रमाणे पूर्णपुरुष आहेत. भगवद्‌गीतेत श्रीभगवंतांनी दैवीसंपत्तीची जी लक्षणे वर्णन केली आहेत ती श्रीदत्तमहाराजांचे ठिकाणी उत्कटतेने आढळतात याची जाणीव आयुष्यात फार लवकर झाली.

अहंकार पूर्णपणे गेल्यावरही खरा कर्मयोगी हा आपल्या जीवनांत ज्ञानी भक्ताच्या पातळीवर कसा असू शकतो आणि कर्तेपणाचा अभिमान मनांत न येता सतत कर्म कसे करीत रहातो हे श्रीदत्तमहाराजांच्या चरित्रावरून दिसून येते. स्वतःच्या जीवनांतील कोणतेही कर्म करतांना जो जो प्राणी समोर येतो त्याच्या ठायी ईश्वरभाव मनांत कसा बाळगावा आणि स्वकर्मकुसुमांनी ईश्वराचे कसे पूजन करावे हेही श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांत प्रत्यक्ष पहायला मिळते.

अनेक वेळा श्रीदत्तमहाराज सांगायचे की सर्वांना शिवस्वरूप समजून त्यांना आपण भक्तिभावाची बिल्वदले अर्पण करीत रहावे म्हणजे ईश्वराचे




डॉ.अशोकमहाराज आश्रमात प्रवचन करतेवेळी




श्रीदत्तमहाराज

श्रीदत्तआश्रम जालना येथे प्रवचन



श्रीदत्तमहाराज
गुरूपौर्णिमेला
भक्तांना दर्शन
देतांना



श्रीदत्तमहाराज
यांची बसण्याची
एक आवडती
पद्धती

खरे पूजन होते. त्यांचे हे विचार त्यांनी स्वतःच्या जीवनांत पूर्णतया आचरणांत आणलेले होते हे लहानपणापासून घरातील आम्ही सर्वांनाच जाणवत आले आहे.

श्रीगुरूदेव रा.द. रानडे यांनी एकदा "संतांचे पारमार्थिक अनुभव" यावर एक व्याख्यान दिले होते. त्यानंतर एका पाश्चात्य विदूषीने त्यांना प्रश्न केला की तुमचे स्वतःचे अनुभव काय आहेत? यावर ते फक्त एवढेच म्हणाले की That you can easily read between the lines.

श्रीदत्तमहाराज देखील फारच क्वचित स्वतःच्या अनुभवाबद्दल बोलले असतील. पण त्यांच्या प्रवचनांमधून व एरवीच्या बोलण्यातून ते स्वतःचे पारमार्थिक अनुभवच सांगत आले आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर देवाजवळ काय मागावे याबाबत बोलतांना ते म्हणायचे देवाकडे नेहमी अहेतुकी व अप्रतिहत भक्ती मागावी. हे त्यांचे विचार स्वतः त्यांच्या आचरणांतच प्रतिबिंबित झालेले दिसायचे. ते स्वतःच पराभक्तीच्या भावनेने जीवन जगणाऱ्या थोर भक्ताचे उदाहरण होते.

श्रीमद् भागवताचे निरूपण करतांना प्रल्हादजींची हकीगत सांगतांना ते भावविभोर होत. प्रल्हादजींच्या पराभक्तीची आठवण येऊन त्यांना गदगदल्यासारखे व्हायचे आणि भावभरल्या स्वरांत ते म्हणायचे, "प्रल्हादजींची भक्ती किती थोर असेम्हणत. देवाजवळ काहीही मागायचे नाही भक्तीशिवाय! असे प्रल्हादजी होते.

''श्रीदत्तमहाराजांच्या मनांत प्रल्हादजींबद्दल एवढी भक्ती होती की ते प्रल्हादजींचा नेहमी आदरार्थीच उल्लेख करत."

श्रीदत्तमहाराज जसे बोलत व उपदेश करत त्याप्रमाणे अगोदर त्यांचे स्वतःचे आचरणही तसेच असे. "चित्ते वाचि क्रिया यांचे साधुनामेकरूपता" अगदी तंतोतंत असे होते. घरातील सर्वांना नेहमी असे जाणवायचे की श्रीदत्तमहाराज जे सगळ्यांना शिकवू इच्छितात ते उपदेश शब्दांतून करून नव्हे.

शब्दांतून काही सूचना अनाग्रही रूपाने ते मधूनमधून करायचे. पण त्यांचा स्वभाव आग्रही शब्दांतून कोणाला काही उपदेश करावा असा कधीही नव्हता. जे सांगायचे ते स्वतःच्या आचरणांतून सांगण्यावरच त्यांचा भर असायचा.

याचे एक छोटेसे उदाहरण सांगावेसे वाटते- घरातील सर्वांनी नियमितपणे संध्या करावी असे त्यांना मनापासून वाटे. पण त्यांनी घरात कधीही कोणाला संध्या करा असे शब्दांत म्हटले नाही. स्वतः ते रोज नियमाने संध्या करायचे- प्रवासातून उशिरा अगदी रात्री जरी घरी आले तरीही त्यांचे संध्यावंदन कधीच चुकले नाही. हे पाहूनच घरातील आम्ही सर्वजण नियमित संध्यावंदन करीत आलो आहोत.

संध्यावंदन करण्याबद्दल त्यांचा इतका कटाक्ष होता की ज्वर आला असला किंवा सर्दी-खोकला वगैरे आजारपणामुळे डॉक्टरांनी स्नान करू नये असे सुचविलेले असले तरी ते स्नान करीत असत आणि संध्यावंदनही करीत असत. अशावेळी जर त्यांना घरातील कोणी म्हटले की 'आपल्याला आज दोन-अडीच ताप आहे. आज आपण संध्या केली नाहीत तर बरे होईल.'

असं श्रीदत्तमहाराजांना कुणी सुचवले की त्यांचे उद्‌गार यायचे, "ठीक आहे. संध्या नको तर जेवणही नको."

हे त्यांचे उद्‌गार ऐकले म्हणजे घरातील सर्वांचाच अगदी नाईलाज व्हायचा आणि श्रीदत्तमहाराजांना स्नान करू नका असे सांगण्याचे धाडस व्हायचे नाही.

श्रीदत्तमहाराजांच्या संध्यावंदनाच्या व्रताचे पालन त्यांनी आयुष्यभर नियमाने केले. शेवटच्या पंधरा दिवसांत त्यांना इतका अशक्तपणा आला होता की अंथरूणावर उठून बसणेही त्यांना शक्य होईना. तेव्हा त्यांनी स्नान करणे घडत नाही आणि संध्यावंदनही करणे शक्य होत नाही म्हणून जेवणही बंद केले होते व ते फक्त पेयांवरती राहिले होते.

वास्तविक श्रीदत्तमहाराजांसारख्या अवतारी पुरुषाला ही शास्त्रातील कर्मबंधने आणि आचारबंधने लागू नसतात. परंतु स्वतःच्या आचरणांतून सर्वांना शिकवणारे ते थोर आचार्य होते. म्हणूनच लोकसंग्रहाच्या भावनेतून शास्त्रातील सर्व आचारबंधने ते स्वतः कटाक्षाने शेवटपर्यंत पाळीत राहिले. एकप्रकारे हा समाजापुढे त्यांनी मोठाच आदर्श ठेवला आहे असे आम्हाला वाटते.

श्रीदत्तमहाराज आचारधर्माप्रमाणे सर्व कर्मे निष्ठेने पाळत असले तरीही अनन्य भक्ती आणि ईश्वरार्पण वृत्तीने शरणागती हाच त्यांचा स्थायीभाव होता.

ते कोणतेही कर्म करीत असले तरीही त्या कर्माला पराभक्तीची बैठक असे. त्यांच्या आचाराविचारातून त्यांचा भक्तिप्रधान स्वभावच व्यक्त व्हायचा.

याबद्दल काही उदाहरणे सांगावीशी वाटतात. आचारधर्म कटाक्षाने पाळण्याबद्दल श्रीदत्तमहाराजांचा कटाक्ष असायचा. सोवळेओवळे पाळणे हा त्यांचा स्वभावच होता. रोज सकाळी ते सोवळ्यात राहून पूजाअर्चा, अनुष्ठान वगैरे करीत असत. अशावेळी घरी दर्शनाला अनेकजण यायचे. महाराज सोवळ्यात आहेत याची कल्पना काहीजणांना नसायची. ते भक्त श्रीदत्तमहाराजांच्या चरणांना स्पर्श करून नमस्कार करायला उत्सुक असत. म्हणून घरातील कोणीतरी त्यांना सौम्य शब्दांत दुरूनच दर्शन घेण्याची विनंती करीत असे. ती विनंती ऐकूनसुद्धा काही भक्त श्रीदत्तमहाराजांच्या चरणांना स्पर्श करून नमस्कार करायचे. त्यात भक्तांची उत्कट भक्तीच असायची. काही वेळा भक्तांना आचारधर्म, सोवळेओवळे याची कल्पना नसायची. म्हणूनही ते महाराजांच्या चरणांना स्पर्श करीत. पण अशा प्रसंगातही श्रीदत्तमहाराज कधीही रागावल्याचे कोणीही बघितले नाही. अनेक कर्मनिष्ठ माणसे, अगदी शास्त्रीपंडितसुद्धा सोवळ्यात असतांना कुणी शिवले की अत्यंत क्रोधाधिष्ठ होतात. पण महाराज अशा प्रसंगातही अगदी शांत असायचे ते पाहून श्रीएकनाथ-महाराजांसारख्या शांतीब्रह्माची आठवण व्हायची.

आणखी एक प्रसंग सांगावासा वाटतो. एकदा श्रीदत्तमहाराज वासुदेव निवासमध्ये बसले होते. कोणी हरीजन भक्त आला. त्याने आश्रमातल्या सेवेकऱ्यांना विचारले, ''महाराजांना विचारा. मी आत आश्रमात येऊन दर्शन घेतले तर चालेल का?''

श्रीदत्तमहाराजांनी त्या हरीजन भक्ताला बोलवायला सांगितले, तो आला आणि नमस्कार करून दर्शन घेऊन काहीसा दूर उभा राहिला. एकदम अनपेक्षितपणे तो महाराजांना म्हणाला, ''महाराज, आपल्या पायांवर डोके ठेवण्याची फार इच्छा आहे.''

शांतपणे महाराज त्याला म्हणाले, ''ठीक आहे. हरकत नाही.''

त्यावर तो हरीजन म्हणाला, ''महाराज, मी खालच्या जातीचा आहे.'' त्याचे ते शब्द ऐकूनही महाराज पुन्हा शांतपणे त्याला म्हणाले, ''हरकत नाही.''

आणि खरोखरीच त्या हरीजनाने महाराजांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. त्यावेळी त्याच्या डोळ्यातून भक्तीभावनेचे अश्रू ओघळत होते. कृतार्थतेची भावना त्याच्या चेहऱ्यावर दाटून आली होती. त्याचा तो भक्तीभाव ओळखूनच महाराजांनी त्याला पायावर डोके ठेवू दिले. एरवी महाराजांच्या पायांना स्पर्श करण्याची संधी फारशी कोणाला मिळत नसे. हा प्रसंग पाहिला म्हणजे एकनाथमहाराज हरीजनांच्या घरी जेवायला गेले होते याची आठवण होते.

एक मुंबईचे भक्त नव्यानेच महाराजांकडे यायला लागले होते. महाराजांच्या दर्शनांच्या वेळी चरणांना स्पर्श करायचा नसतो हे त्यांना माहिती नव्हते. ते वासुदेव निवासमध्ये आले आणि भक्तीभावाने श्रीमहाराजांच्या अगदी जवळ जाऊन म्हणाले, ''महाराज, माझ्या डोक्यावर दोन्ही हात ठेवा नां!''

त्या भक्ताचा भाव महाराजांनी जाणला आणि प्रसन्नपणे स्मितहास्य करून महाराजांनी लगेच त्या भक्ताच्या मस्तकावर दोन्ही हात ठेवले. त्या भक्ताने महाराजांचे मस्तकावरील हात स्वतःच्या हाताने घट्ट पकडले आणि काही क्षण महाराजांचे हात त्याने मस्तकावर तसेच घट्ट धरून ठेवले. जवळचा सेवेकरी पुढे होऊन त्या भक्ताला महाराजांचे हात सोडायला सांगणार होता. पण महाराजांनी त्या सेवेकऱ्याला खुणेनेच थांबायला सांगितले. त्या भक्ताचे पूर्ण समाधान झाल्यावरच महाराजांनी आपले हात काढून घेतले. भक्ताच्या उत्कट भक्तीभावनेला महाराजांचा असा प्रतिसाद असायचा.

एकदा मुंबईला महाराज नीलाताईंच्या घरी असतांना एक भक्त आपला पंधरा सोळा वर्षांचा मुलगा बरोबर घेऊन आले. त्या मुलाचे शुद्ध अंतःकरण आणि त्याची भक्ती भावना उत्कट होती. म्हणूनच महाराजांनी त्याला जवळ घेतले, मांडीवर बसवले आणि त्या मुलाच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवला.

यावरून असे दिसते की आचारधर्माच्या नियमांपेक्षा महाराज भक्तीभावना महत्त्वाची मानत.

खर्डा या गावात महाराजांचे खूप भक्त आहेत. उत्कट भक्तीभाव असणारे अनेक लोक तेथे आहेत. म्हणूनच महाराज त्या गावात गेले की ते भक्त अधिकार वाणीने महाराजांना म्हणायचे. महाराज पाय जरा पुढे करा. पायावर पाणी

घालायचे आहे. दुसरा एखादा भक्त म्हणायचा, महाराज पाय जरा पुढे करा. मला जरा पायावर डोकं ठेवायचे आहे.

भक्तीभावना उत्कट असली की असा अधिकार भक्ताला प्राप्त होतो.

श्रीवक्रतुंडमहाराजांनी काही मुसलमान भक्तांना दीक्षा दिली होती आणि ते भक्तही पुढे आयुष्यभर श्रीवक्रतुंडमहाराजांची भक्ती करीत राहिले. श्रीदत्तमहाराजांचेही असे मुसलमान भक्त महाराष्ट्रात ठिकठिकाणी आहेत.

भक्तीभावनेने नामस्मरण करणे महाराजांना फार आवडत असे. चोवीस तास नामस्मरण होऊ शकत नाही म्हणून संध्या, पूजा केली पाहिजे, गायत्री जप केला पाहिजे असे श्रीदत्तमहाराज सांगत असत.

श्रीदत्तमहाराज भक्तिप्रिय असल्याने सर्वांत शेवटी मधुसूदन-सरस्वतींचा भक्तिरसायन हा ग्रंथ वाचून घेतला व म्हणाले की भक्ती हा स्वतंत्र पाचवा पुरुषार्थ आहे आणि भक्ती हेच भक्तीचे फळ आहे.

आपले पारमार्थिक अनुभव घरातही कोणाला सांगत नसत आणि बाहेरही त्यांनी आपले अनुभव स्पष्टपणे सांगितले आहेत असे कधी आम्हा मंडळींच्या कानावर आलेले नाही. कारण रसास्वाद हा मोठा दोष आहे असे त्यांना वाटत असे. यातून सर्वांनाच खूप काही शिकण्यासारखे आहे

श्रीदत्तमहाराजांच्या खाण्यापिण्याच्या कोणत्याही आवडी नव्हत्या. पानात जे असेल ते खायचे, एखादा पदार्थ जरी चांगला झाला नसला तरी आयुष्यात कधी अमूक पदार्थ चांगला झाला नाही असे त्यांनी एकदाही म्हटल्याचे आम्हा घरातील मंडळींना आठवत नाही. त्यांची फक्त एकच आवड आम्हा मंडळीच्या लक्षात आली होती. जेवणानंतर त्यांना साधा कुटलेला विडा आवडत असे. पण श्रीदत्तमहाराजांनी कधीही कोणाला जेवणानंतर विडा कुटून द्या असे म्हटले नाही. घरातील कुणी विडा कुटून ठेवला तरच तो उचलून खायचे. बाहेर कोठे प्रसादाला गेल्यानंतरसुद्धा कोणीही विडा हवा का असे विचारले तरीही त्यांनी विडा द्या असे चुकूनही कधी म्हटले नाही. मग स्वतःहून कोणाकडे विडा मागणे तर अशक्यच. संपूर्ण आयुष्य एखाद्या वेळेला देखील त्यांनी कुटलेला विडा कोणाकडे मागितला नसेल.

शेवटच्या दोन वर्षात त्यांच्या भक्तीमध्ये एवढी उत्कटता निर्माण झाली होती की त्या भक्तीतून पूर्ण परावैराग्य असे ज्याला म्हणावे असा त्यांचा स्वभाव दिसून येत होता. या शेवटच्या दोन वर्षात आम्ही विडा कुटून पुढे ठेवला तरी ते घेत नसत. ती एकमेव आवड. पण तीही त्यांनी पूर्ण बंद करून टाकली. इतके वैराग्य क्वचितच पहायला मिळत असे. विशेष म्हणजे ते वैराग्य भक्तीतून आले होते. वैराग्यासाठी ते वैराग्य आले नव्हते. ते वैराग्य दुसऱ्या कुठल्याही कारणासाठी नव्हते.

भक्तीभावनेने म्हटलेले अभंग आणि भजन त्यांना खूप आवडत असत. श्रीवासुदेव निवासात भजनी मंडळाचे भजन ऐकण्यात ते अगदी रंगून जात. ते स्वतः संगीताचे उत्तम जाणकार होते. स्वतः तबला उत्कृष्ट वाजवणारे होते. मुंजाबाच्या बोळात शिरोळकर स्वामींच्यापुढे संस्कृतमध्ये अडीच तास कीर्तन त्यांनी केले होते. दरबारी कानडा हा त्यांचा आवडता राग ! या रागातील "तुजवीण आम्हा असे कोण देवा'' हे नाथांचे पद त्यांना अतिशय आवडत असे व ते पद ते अत्यंत तल्लीन होऊन म्हणत असत.

"नारायण भज रे मानस" हे कृष्णदयार्णवांचे पद तर त्यांना फारच आवडत असे. घरातील मंडळींनी अनेक वेळा पाहिले आहे की संध्याकाळी श्रीदत्तमहाराज घरातल्या घरात फेऱ्या मारीत रहात व "नारायण भज रे मानस" हे पद ते अगदी घोळवून घोळवून पुनःपुन्हा म्हणत रहात. ते पद म्हणतांना श्रीदत्तमहाराज एवढे तल्लीन व्हायचे की भोवतालच्या जगाची जाणीव पूर्णपणे नाहीशी व्हायची. पुनःपुन्हा हाक मारली तरीही त्यांचे लक्ष जायचे नाही. इ.स.१९९७ सालच्या जानेवारी महिन्यापासून अनेक महिने श्रीदत्तमहाराजांना एक वृद्ध सत्पुरुष समोर दिसत होते. ते वृद्ध सत्पुरुष चोवीस तास अखंड ''नारायण भज रे मानस'' हे श्रीकृष्णदयार्णवांचे पद गात असत. चाली वेगवेगळ्या असत, ताल वेगवेगळे असे, कधी वाद्यांची संगत त्या गायनाला असे तर कधी नसे. सतत चोवीस तास श्रीदत्तमहाराजांना हे पद वेगवेगळ्या तालासुरात आणि वेगवेगळ्या रागात गायलेले ऐकू येत होते.

भागवतातील गोपी गीतही त्यांना फार आवडत असे. श्रीदत्तमहाराजांच्या दोन्ही कन्या हे पद जेव्हा रागामध्ये गाऊन दाखवत तेव्हा त्यांचे डोळे भरून यायचे आणि भावविभोर स्वरांत ते म्हणायचे, वाहऽ वा, गोपींचे काय प्रेम.

श्रीमहाराज स्वतः अखंड अनुसंधानात असत. रात्री झोपेत सुद्धा त्यांच्या श्वासामध्ये गजानन, गजानन हा उच्चार घरातील सर्वांनी कितीतरी वेळा ऐकला असेल.

सद्गुरूंची सेवा म्हणजे त्यांचे अखंड स्मरण करणे, सेवा म्हणजे काही शारीरिक सेवा एवढाच त्याचा अर्थ नाही असे ते सांगत. ज्ञान कसे मिळवावे याबद्दल गीतेतील "परिप्रश्नेन सेवया" यापेक्षाही "श्रद्धावान लभते ज्ञान" ही अंतरंग साधना जास्त महत्त्वाची असे ते म्हणत. कारण कोणी एखादा परीक्षा पाहण्याकरता म्हणून सेवेचे नाटक करू शकतो हे कारण त्यांनी सांगितले. तसेच एकदा कोणी शिष्याने त्यांना असे म्हटले की महाराज, आपण फार मोठे आहात. आपल्यासारखे दुसरे कोणी तसे दिसत नाहीत. यावर ते म्हणाले की आपल्या गुरूबद्दलचा आदर बोलून दाखवणे म्हणजे जास्त आदर आहे का मनात ठेवणे हे जास्त आदराचे आहे याचा विचार व्हावा. या त्यांच्या उत्तरावरून आपणालाही उत्तर मिळते की श्रीदत्तमहाराजदेखील त्यांच्या दोन्ही गुरूंबद्दल (प.पू.गुळवणीमहाराज व प.पू. दीक्षित स्वामीमहाराज) फारसे कधी का बोलत नसत? त्यांचा स्वतःच्या सद्गुरूंबद्दलचा आदर त्यांनी वामननिवास या श्री औरवाड येथील श्रीदत्तअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार या सद्गुरू-स्मारक उभारणीकरता घेतलेल्या अखंड परिश्रमांवरून व श्रीगुळवणीमहाराज व प.प्.दीक्षितस्वामीमहाराज असतांना त्यांच्या केलेल्या सेवेतून समजतो.

अनेक लोक विचारतात श्रीदत्तमहाराजांना वाचनाची कोणती पुस्तके वाचायला आवडत असत? वाचन हा त्यांचा अतिशय आवडता छंद होता. शेवटपर्यंत रात्री दोनदोन वाजेपर्यंत ते पुस्तके वाचत असत. अनेक मासिकेही ते रस घेऊन वाचायचे. उत्तर रामचरित्, मेघदूत, शाकुंतल वगैरे अभिजात संस्कृत साहित्य त्यांनी अनेक वेळा वाचलेले होते. म्हणूनच भास, भवभुती, कालिदास यांची संस्कृत अवतरणे ते म्हणून दाखवत असत. विवेकानंदांचे वाङ्मयही त्यांनी चांगले अभ्यासलेले होते. संतांच्या जीवनावरील कादंबऱ्या वाचायलाही त्यांना खूप आवडायचे. श्रीज्ञानदेवांच्या जीवनावरील इंद्रायणी काठी ही कादंबरी त्यांनी आवडीने वाचली होती. श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी

विवेकानंद, स्वामी शिवानंद यांची चरित्रेही त्यांनी पुनःपुन्हा वाचून काढली. ऐतिहासिक कादंबऱ्या वाचणेही त्यांना आवडायचे. श्री.बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेले छत्रपती शिवाजीमहाराजांचे चरित्र त्यांनी मनापासून वाचले होते आणि त्यांना ते मनापासून आवडले होते.

श्रीदत्तमहाराज रोज वृत्तपत्रे नियमाने वाचत असत. जगात कोठे काय चालले आहे हे ते जिज्ञासेने जाणून घेत असत. तसेच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात देशांत व परदेशांत नवे कोणते विचारप्रवाह येत आहेत याच्याकडेही त्यांचे बारकाईने लक्ष असे व त्या नव्या विचारप्रणालींची पूर्ण माहितीही ते करून घेत असत.

संत श्रीकृष्णदयार्णव यांचा हरिवरदा हा ग्रंथ त्यांना मनापासून आवडला होता. भागवताच्या दशमस्कंधावरील ही टीका श्रीकृष्ण दयार्णव यांनी अठराव्या शतकांत लिहिली आहे. सुमारे बेचाळीस हजार ओव्यांचा हा ग्रंथ आहे. म्हणजे ज्ञानेश्वरीच्या पाचपट मोठा. आज कोणालाही सांगितले तर अशक्य वाटेल. परंतु एवढा मोठा हा ग्रंथ श्रीदत्तमहाराजांनी केवळ तीन दिवसात वाचून काढला आहे. केवळ वाचला असे नाही तर त्यातील अनेक ओव्या त्यांच्या पाठ झाल्या होत्या व त्या ओव्या ते वेळोवेळी सांगत असायचे. तसेच हरिवरदा ग्रंथातील अनेक संदर्भही त्यांनी वेळोवेळी सांगितलेले आहेत.

स्वामी विवेकानंदांनी एन्सायक्लोपीडीयाचे दहा खंड केवळ आठ दिवसांत वाचले होते आणि ते पाहून आश्चर्य करणाऱ्या शिष्याला स्वामीजी म्हणाले होते की "कोणतेही पान उघड आणि काहीही विचार, मी सांगतो." श्रीदत्तमहाराजांनी हरिवरदाचे मोठे तीन खंड तीन दिवसांत वाचले होते आणि त्यानंतर पुढे अनेक दिवस श्रीदत्तमहाराज हरिवरदा या ग्रंथातील ओव्या सांगत होते. एकदाच तो ग्रंथ वाचला होता तरीही त्यांच्या अनेक ओव्या पाठ झाल्या होत्या. तसेच हरिवरदा या ग्रंथात श्रीकृष्णदयार्णव यांनी भक्तीचे जे वेगळे वर्णन केले आहे तेही महाराज अनेक भक्तांना सांगत होते. हे पाहिले म्हणजे विवेकानंदांनी एन्सायक्लोपीडीयाचे खंड एकदा वाचून आत्मसात केले होते या घटनेचीच आठवण होते.

मराठी संतवाङ्मयाचा श्रीदत्तमहाराजांचा अभ्यास अत्यंत सखोल होता. ज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथीभागवत वगैरे अनेक ग्रंथ त्यांनी पूर्णतया आत्मसात केलेले होते. या ग्रंथांसंबंधी त्यांचे स्वतःचे असे स्वतंत्र आणि सखोल चिंतन होते. ऋतंभरा प्रज्ञेच्या आधाराने त्यांनी या ग्रंथातील अनुभूती जाणून घेतल्या होत्या असे अनेक अभ्यासक सांगतात. म्हणूनच त्यांनी या ग्रंथातील काही विशिष्ट ओव्यांवर जे भाष्य केले आहे ते मराठी भाषेत अपूर्व वाटावे असे आगळेवेगळे आहे असे अनेक विद्वान म्हणतात. एकच उदाहरण पुरेसे आहे. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या ओवीबद्दल ते एकदा म्हणाले होते की या मंगलाचरणातच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी- आत्मस्वरूप हे शास्त्रप्रचीती, आत्मप्रचीती व तर्काने असे सिद्ध होणारे आहे असा खुलासा केलेला आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. विस्तारभयास्तव ते टाळत आहोत.

श्रीगुरूचरित्रही त्यांचा अत्यंत आवडीचा ग्रंथ होतात. या ग्रंथाबद्दल ते म्हणत की श्रीगुरूंबरोबर भक्तांचेही ते चरित्र आहे. दीपकापासून शूद्रापर्यंत सर्वांच्याही कथा यात आलेल्या आहेत.

श्रीदत्तमहाराजांना संस्कृत, हिंदी, मराठी व कानडी या भाषा उत्तम येत होत्या. इंग्रजीही त्यांना समजायचे. पण त्यांना इंग्रजी बोलणे आवडायचे नाही. आम्ही कुटुंबीयांनी अनेक वेळा पाहिले आहे की श्रीदत्तमहाराजांच्या जावयांनी व नातवांनी आणलेले अनेक इंग्रजी ग्रंथ श्रीदत्तमहाराज स्वतःच बराच वेळ चाळत असत.

शालेय वयातील त्यांच्या नातवाला एकदा त्यांनी एक इंग्रजी भाषेतील एक अभिजात पुस्तक वाचायला सांगितले. तेव्हा तो म्हणाला, महाराज हे पुस्तक मी वाचायचा प्रयत्न केला. पण मला ते समजत नाही. तेव्हा श्रीदत्तमहाराज त्याला म्हणाले, "ते पुस्तक घेऊन यावे आणि जो भाग कळला नाही तो विचारावा. आम्ही तो भाग तुम्हाला समजावून सांगतो."

नातू इंग्रजी पुस्तक घेऊन आला आणि त्याला न कळलेले परिच्छेद तो वाचून दाखवू लागला. आश्चर्य म्हणजे त्याने त्या परिच्छेदातील दोनतीन वाक्ये वाचली की लगेच श्रीदत्तमहाराज त्या परिच्छेदातील मतितार्थ त्याला मराठीतून सांगायचे.

हे पाहून महाराजांचा नातू खरोखरीच आश्चर्यचकित झाला. त्याने महाराजांना विचारले, महाराज आपण इंग्रजी भाषा इतकी चांगली केव्हा शिकलात?

या प्रश्नाचे उत्तर श्रीदत्तमहाराजांनी दिले नाही. एक मंद स्मित त्यांच्या चेहऱ्यावर झळकले. तेव्हा तो नातू महाराजांना विचारू लागला, "महाराज आपल्याला किती भाषा येतात."

या प्रश्नाचे उत्तरही श्रीदत्तमहाराजांनी दिले नाही. फक्त त्यांच्या चेहऱ्यावर सौम्य हास्य झळकले. तेव्हा नातवाने अप्रत्यक्षरित्या महाराजांना विचारायचे ठरवले. तो म्हणाला,"महाराज, संतपुरुषांना इतर भाषांचा अभ्यास न करताही अनेक भाषा समजतात असे म्हणतात. ते कसे काय होत असेल?

श्रीदत्तमहाराज म्हणाले, "आत्मतत्त्व ज्याने जाणले आहे त्याला जगातील सर्व भाषा जाणता येतात. आत्मतत्त्व म्हणजे ईश्वरच. ईश्वरालाच जाणले म्हणजे त्या ईश्वराने निर्माण केलेल्या भाषाही जाणता नाही कां येणार?

श्रीदत्तमहाराजांना वेगवेगळ्या भाषा कशा समजतात या प्रश्नाचे उत्तर अप्रत्यक्षरित्या त्यांनी दिले होते-केवळ त्या नातवाबद्दल वाटणाऱ्या प्रेमामुळे. एरवी असे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघणे जवळजवळ अशक्यच होते.

श्रीदत्तमहाराजांकडे अनेक विदेशी विद्वान येत असत. फ्रेंच, जर्मन वगैरे युरोपीय भाषाच जाणणारेही अनेक विद्वान यायचे. बहुतेक वेळा दुभाषा बरोबर असायचा. पण असा अनुभव यायचा की युरोपीय विद्वानाने त्याच्या भाषेत जे काही विचारले होते त्याचे दुभाषाने इंग्रजीत भाषांतर करून सांगायला सुरुवात केली की लगेच-त्याचे बोलणे पूर्ण होण्यापूर्वीच -श्रीदत्तमहाराज त्या शंकेचे मराठीतून व हिंदीतून उत्तर देऊन टाकायचे.

दुभाषाचे बोलणे पूर्ण होण्यापूर्वीच श्रीदत्तमहाराजांना प्रश्नकर्त्याची शंका कशी काय समजायची आणि त्या शंकेचे यथार्थ उत्तर त्यांच्या तोंडून कसे काय यायचे या गोष्टीचे अनेकांना आश्चर्य वाटत असे. श्रीदत्तमहाराज शब्दांच्या पातळीवरून त्या युरोपीय विद्वानाशी संपर्क साधत नसावेत. अतींद्रिय पातळीवर त्या विद्वानाच्या मनांतील विचार ते जाणून घेत असावेत आणि

म्हणूनच दुभाषाने त्या विद्वानाचा प्रश्न पूर्ण करण्यापूर्वीच त्यांचे उत्तर ओठावर येत असावे.

विशेष म्हणजे दुभाषाला तत्त्वज्ञानाचे फारसे ज्ञान नसून सुद्धा त्या श्रीदत्तमहाराजांच्या उत्तराचे त्याने केलेले भाषांतर त्या आलेल्या विद्वानांना उत्तम समजत असे असे सर्वांच्याच अनुभवाला येत होते. याचे कारण बहुधा असे असावे की श्रीदत्तमहाराज अतींद्रिय पातळीवरून त्या विद्वानाच्या मनांतील शंका जाणून घेत असावेत आणि त्याच अतींद्रिय पातळीवरून त्या शंकेचे उत्तरही विद्वानाच्या मनांत संक्रमीत करीत असावेत. एक प्रकारे शब्दांच्या माध्यमापलीकडे हे संवाद होत असत. श्रीज्ञानदेव "शब्देविण संवादिजे।" असे जे म्हणतात तशा प्रकारचे हे संवाद असत असे वाटते.

अमेरिकेतील इंगोल्स नावाच्या एक विदुषी पुण्याला येऊन डेक्कन जिमखान्यावरील एका बंगल्यात राहिल्या होत्या. त्यांना हिंदी व संस्कृत फारच तोडके मोडके यायचे. पण तरीही त्या हिंदी व संस्कृतमधून बोलायच्या आणि महाराज लगेच त्या शंकेचे उत्तर हिंदीतून वा संस्कृतमधून द्यायचे. जवळजवळ एक वर्षाहून अधिक काळ नियमाने श्रीमती इंगोल्स यांचे श्रीदत्तमहाराजांशी असे संवाद होत राहिले आणि वेदान्त आत्मसात करून वर्षभरातच इंगोल्स अमेरिकेत परत गेल्या. या संवादामध्ये दुभाषा नसायचा. हे संवाद असेच अतींद्रिय पातळीवरचे होत असावेत नाहीतर एरवी आश्चर्य वाटेल अशीच ही घटना आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीत आम्ही नेहमीच असे पाहिले आहे की समोर आलेल्या माणसाच्या मनोवृत्ती, त्याचे विचार तात्काळ त्यांना जाणता येत असत आणि त्या माणसाने शब्दातून काहीही व्यक्त केले नाही तरी महाराज त्याचे मनोगत जाणून प्रश्न विचारण्यापूर्वीच उत्तरे देत.

श्रीदत्तमहाराज सर्वज्ञानी होते असे म्हणतात. त्याचा प्रत्यय अनेक वेळा येत असे. ज्ञान दोन प्रकारचे असते- परोक्ष ज्ञान (शब्दज्ञान) आणि अपरोक्ष ज्ञान (अनुभूती). शब्दज्ञान व अपरोक्षज्ञान या दोन्ही बाबतीत श्रीदत्तमहाराजांच्या भेटीला देशभरांतून मोठे विद्वान, शास्त्रपंडित यायचे. त्यापैकी अनेक शास्त्री पंडितांनी आयुष्यभर एकाच विषयाचे अध्ययन केलेले

असायचे. त्या विशिष्ट शास्त्राच्या अध्ययनालाच त्या पंडिताने सर्व आयुष्य वाहिलेले असायचे. त्या शास्त्रावर चर्चा सुरू व्हायची. गहन चर्चा चालायच्या. पण चर्चा त्या शास्त्रातील शब्दज्ञानाबद्दल असो किंवा त्या शास्त्रातील विशिष्ट अनुभूतींबद्दल असो, त्या विद्वानाला चर्चेच्या शेवटी नेहमी असेच जाणवायचे की त्याच्यापेक्षा श्रीदत्तमहाराजांनाच त्या शास्त्रांतले ज्ञान आहे. मोठ्या समाधानाने ते परत जायचे.

अनेक संतमहात्मेही भेटीला यायचे. अशावेळी होणाऱ्या चर्चा आध्यात्मिक अनुभूतींबद्दलच असत. अनेक वेळा आत्मानुभवावर बोलणे व्हायचे. असे संवाद शब्दांपेक्षा जास्त 'शब्देविण संवादिजे' या पद्धतीनेच जास्त व्हायचे असे संतमहात्मेही समाधानानेच परत जायचे.

अशा अपरोक्ष ज्ञानावरील शब्देविण झालेल्या संवादाचे एक उदाहरण द्यावेसे वाटते. त्या महात्म्याने जातांना जी प्रतिक्रिया व्यक्त केली ती फारच अर्थपूर्ण आहे, बोलकी आहे. त्याचे वय पंचाहत्तरीच्या आसपास होते. अगदी लहान वयापासून तो ज्ञानेश्वरीची पारायणे करीत होता. आठवड्याला एक पारायण अशी ज्ञानेश्वरीची त्याने तीन हजारांहून अधिक पारायणे केली होती. ज्ञानेश्वरी मुखोद्गतच होती त्याला. श्रीदत्तमहाराजांबरोबर बराच वेळ बसला होता. ज्ञानेश्वरीतील अनुभूतींसंबंधीच बोलणं झालं. जातांना तो श्रीदत्तमहाराजांना म्हणाला, ''साठ वर्षे ज्ञानेश्वरी वाचली. पण तीन हजार पारायणे होऊनही जे कळलं नव्हतं ते आपल्या दर्शनानं कळलं.''

नुकताच तो रामेश्वरच्या यात्रेला जाऊन आला होता. त्याचा उल्लेख करून तो म्हणाला, ''आपलं दर्शन घेतांना वाटले. आज खरी रामेश्वराची यात्रा घडली.''

श्रीमहाराजांनी विद्यादानाचे कार्य अगदी वयाच्या ८८ व्या वर्षापर्यंत चालू ठेवले होते. उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्र यांवरील ग्रंथ समजून घेण्यासाठी नियमितपणे काही मंडळी येत असत व श्रीमहाराज अत्यंत उत्साहाने समजावून सांगत असत. श्रीदत्तमहाराजांनी एका आपल्या नातवाला संपूर्ण दासबोध दीड वर्षात समजावून सांगितला होता. साधकांनी श्रीदत्तमहाराजांना विचारलेल्या

प्रश्नांची उत्तरे अनेकजण ध्वनिमुद्रित करून घेत असत आणि अशा काही प्रश्नोत्तरांचे संकलन 'विचारधन भाग - १', 'भाग - २', 'भाग - ३' असे तीन भागात प्रसिद्ध झालेले आहे.

अलीकडच्या तीन वर्षात त्यांनी आहार तर जवळजवळ बंदच केला होता. डॉक्टरांनी झोप लागते का, असे विचारल्यास ते म्हणत आता फक्त जागृती व स्वप्न एवढ्या दोनच अवस्था आहेत. झोप व भूक ही बिलकुल नाहीत. "नारायण भज रे मानस" हे पद मात्र अखंड आतून ऐकू येते असे म्हणत.

भीष्माचार्यांचे चरित्र त्यांना फार आवडत असे. ते म्हणायचे, ''भीष्माचार्य हे गोपाळकृष्णांचे फार मोठे भक्त होते. ते इच्छामरणी होते. आयुष्याच्या शेवटपर्यंत सर्व इंद्रिये त्यांच्या ताब्यात होती. शेवटपर्यंत भीष्माचार्य शुद्धीत होते. त्यांनी स्वतःचे जीवन संपवायचे ठरवले तेव्हा आपल्या वाणीचा निग्रह स्वतःच्या मनामध्ये केला, वाणी बंद केली आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणे विशिष्ट दिवस निवडून त्या दिवशी आपला देह ठेवला.''

भीष्माचार्यांप्रमाणेच श्रीदत्तमहाराजसुद्धा इच्छामरणी होते. उत्तरायण लागल्यानंतर (सौ.आईसाहेबांच्या निर्वाणानंतर) लगेचच ते म्हणाले, आता आमचा नंबर आहे व थोड्याच दिवसांनी त्यांना ताप येऊ लागला. औषधे लागू पडेनात व श्रीमहाराजांनी देखील शेवटचे तीन आठवडे वाणी पूर्ण बंद केली. अंथरूणावर पडल्यावर सुद्धा दोन्ही हात बराच काळ जोडलेल्या स्थितीत व पूर्ण ध्यानावस्थेत असत. काही कॉफी व पेज पिण्यापुरते त्यांनी तोंड उघडावे परंतु कोणाकडेही लक्ष त्यांनी दिले नाही.

श्रीदत्तमहाराजांच्या अखेरच्या कालखंडात महाराजांचे नातू आणि बाहेरचे दोनतीन निकटवर्ती तरुण यांनी महाराजांची जी सेवा केली त्याला तोड नाही. खरीखुरी निरलस सेवा, निरपेक्ष सेवा. महाराजांनी काही सांगायच्या अगोदरच ही मुले पुढे व्हायची व सेवा करायची. अगदी चोवीस तास. महाराजच एकदा भावभरल्या शब्दांत म्हणाले होते. ''संदीपकाने वाराणसीला वेदधर्मा ऋषींची सेवा केली होती तसे हे चाललंय.'' खरोखरच या तरुण मुलांची सेवा संदीपकाच्या सेवेची आठवण करून देणारी होती.

"अनाश्रमी न तिष्ठेत्" या शास्त्रवचनाप्रमाणे सौ.आईसाहेबांच्या नंतर श्रीदत्तमहाराज फार काळ राहिले नाहीत. त्यांच्यानंतर बरोबर ५० व्या दिवशी आपलेही कार्य त्यांनी संपविले व ईश्वररूप झाले.

गीतेत सांगितल्याप्रमाणे संपूर्ण आयुष्य स्थितप्रज्ञ अवस्थेत ते जगले व शेवटपर्यंत सर्व इंद्रिये आपल्या ताब्यात होती व अशा ध्यानावस्थेत ते ब्रह्मलीन झाले.

भागवतात भगवान श्रीकृष्णांचे लीलावर्णन आहे. भगवान श्रीकृष्णांची आठवण सदैव होईल असेच विभूतीमत्त्व श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने पहायला मिळते. तशीच तत्त्वचिंतनाची बैठक आणि तसेच ज्ञानाचे प्रकटीकरण आणि तसेच सांगितलेले तत्त्वज्ञान स्वतः आचरणांत आणून संपूर्ण जीवन जगणे. भगवान श्रीकृष्णांनी गीता नुसती सांगितली नाही, ते तसे प्रत्यक्ष जगले शंकराचार्य-स्वामीमहाराजांचे तसेच. जे तत्त्वज्ञान शंकराचार्य-स्वामीमहाराजांनी जगाला सांगितले ते तसेच स्वतः आचरणांत आणून जगापुढे एक थोर आदर्श ठेवला. श्रीदत्तमहाराज यांचे जीवन व कार्यही भगवान श्रीकृष्ण व शंकराचार्यस्वामीमहाराज यांची आठवण करून देणारे आहे.

***

* असे वत्सल पिता । असे प्रेममूर्ती सद्गुरू ।

(श्रीदत्तमहाराजांच्या कन्येने सांगितलेल्या आठवणी पुढे दिल्या आहेत. लहानपणी त्या महाराजांना दादा असे म्हणत. त्यांच्या लहानपणच्या आठवणीत एका वत्सल प्रेमळ पित्याचे दर्शन घडते. क्रमाक्रमाने त्यांना कसे अनुभव येत गेले, त्यांची श्रद्धा कशी वाढत गेली आणि त्या श्रीदत्तमहाराजांकडे सद्गुरू म्हणून कशा पाहू लागल्या, याचे मनोरम दर्शन त्यांच्या आठवणीत पहायला मिळते. या आठवणी पुढे दिल्या आहेत.)

"माझ्या लहानपणच्या ज्या आठवणी आहेत त्या आईवडिलांच्या अमाप प्रेमाने भरलेल्या आहेत. आईवडिलांचे प्रेम आम्हा सर्वच भावंडांना भरभरून मिळाले. सामान्यतः आई आपल्या मुलांवर खपच प्रेम करते आणि वडील मुलांना वळण लावण्यासाठी वरपांगी काहीसे कठोर राहून मुलांना शिस्त लावतात.परंतु आमच्या बाबतीत काही वेगळेच घडले. आईने आमच्यावर जीवापाड प्रेम केलंच, परंतु आमच्या वडीलांनीही वात्सल्याचा आणि मायेचा इतका वर्षाव केला तितका काही मुलांना आपल्या सख्ख्या आईकडूनही लाभत नसेल."

उभ्या आयुष्यात दादा कधीही कोणावरही रागावलेले आम्हाला दिसले नाहीत. त्यांनी कधी कठोर शब्द उच्चारला नाही किंवा आवाज चढवून ते कधीही बोलले नाहीत. सर्वांना निरपेक्ष प्रेम देणे हा त्यांचा स्वभावच होता. आम्हा मुलांशी तर ते नेहमीच आर्जवी गोड हळुवार शब्दात बोलत. वडीलांनाही हात उगारणे,शिक्षा करणे किंवा निर्भत्सना करणे असे कधी झालेच नाही. आम्हा मुलांकडून चुका घडल्याच नाहीत असे नाही. पण आमच्या हातून चूक झाली किंवा प्रमाद घडला तरी दादांच्या स्वरातला प्रेमळभाव आणि वात्सल्य कधीच कमी झालेले दिसले नाही. आम्ही हट्ट केला तरी आर्जवी शब्दात, हळुवार शब्दात ते आमची समजूत काढत. त्यांच्या अशा वात्सल्याच्या छायेतच आमची मने घडत गेली, व्यक्तिमत्त्वेही उमलत गेली. आणि आमची जीवनं बहरली, सुफलीत झाली. कुंभार फिरणाऱ्या चाकांवर मातीच्या गोळ्याला हळुवार हाताने थोपटूनच सुंदर

घडे बनवतो तसे दादांनी प्रेमाने थोपटूनच आमची जीवने घडवली. असं वात्सल्य मिळायला फार मोठे पूर्वसुकृत असले पाहिजे असं आज वाटते.

लहानपणी झोपण्यापूर्वी रोज मला गोष्ट लागायची. दादाही रोज गोष्ट सांगायचे. अगदी दहा वर्षाची होईपर्यंत मी दांदाजवळच झोपत असे. दुसरं कोणी त्यांच्याजवळ झोपलेलं मला मुळीच खपत नसे. रोज सकाळी आई मला दूध प्यायला सांगायची, पण मला काही दूध प्यायला आवडायचं नाही. मी टाळायला पहायची. मग आई दूधाचा पेला दादांसमोर ठेवायची आणि मला द्यायला सांगायची. दादा अगदी गोड आर्जवी शब्दांत माझी समजूत काढायचे आणि मला दूध प्यायला लावायचे. मला साबुदाण्याची खिचडी खूप आवडायची, तर दादांसमोर खिचडी आली की आधी त्यातली थोडी माझ्यासाठी बाजूला काढून ठेवायचे आणि मगच ती खिचडी स्वतः खायचे.

लहानपणी मी खूपच हट्टी होते. सारखे माझे हट्ट चालायचे. पण दादांनी न रागवता माझे सगळे हट्ट पुरवले. मी रागावले, रुसले की दादा अगदी गोड शब्दांत बोलून माझी समजूत काढायचे. मग माझा रुसवा कोठच्या कोठे पळून जायचा. माझा धाकटा भाऊही खूप हट्टी होता. तो हट्ट करायला लागला, रडायला लागला की दादा त्याला जवळ घ्यायचे, "काय देऊ? काय देऊ? काय हवं?" असं अगदी आर्जवी शब्दांत विचारायचे. गोड बोलून समजून काढायचे.

त्यावेळी पुण्यात अनेक मोठे संतमहात्मे यायचे. श्रीधरस्वामी, शंकराचाय असे अनेकजण यायचे. ते आवर्जून दादांना बोलवायचे. दादांच्या बरोबर आम्हीपण दर्शनाला जायचो. त्यावेळी संतांचे मोठेपण असं काही कळत नव्हतं. दादांनी दर्शनाला चल म्हटलं की जायचं, नमस्कार करा म्हटलं की नमस्कार करायचा. यापेक्षा जास्त काही नाही. एवढं मात्र कळायचं शंकराचार्य, श्रीधरस्वामी सगळेजण दादांना खूप मान द्यायचे. दादांचा खूप आदर करायचे.

दादांनी ज्या ज्या गोष्टी मला शिकवल्या त्यात मला खूप प्राविण्य मिळालं. मला पत्र लिहायला त्यांनीच शिकवलं. मला जवळ घेऊन पुढे पाटी ठेवायचे व म्हणाये, "हं आता तुमच्या ताईंना पत्र लिहा बरं." मी

पाटीवर पत्र लिहिलं की माझ्यापुढे पोस्टकार्ड ठेवायचे व ते पोस्टकार्डवर लिहायला सांगायचे. त्यातूनच मला पत्र लिहायची गोडी लागली. आजही मी लिहिलेली पत्र सगळ्यांनाच खूप आवडतात.

आम्ही नारायण पेठेत रहात होतो. तीनच खोल्या होत्या. धुंडिराजमहाराज आले की घरी खूप लोक त्यांना भेटायला यायचे. घर अगदी भरुन जायचं. दर्शनाला इतके लोक यायचे की घरात पाऊल टाकायला जागा नसायची. सकाळी साडेदहा वाजता श्रीधुंडिराजमहाराज, आजी आणि दादा याच सोवळ्यात जेवण व्हायचं. जेवण झाल्यावर ते तिघे बाहेर यायचे. मग सगळी पोरं आम्ही स्वयंपाकघरात जायचो. अन्न झाकून ठेवलेलं असायचं, आई वाढायची, दादांना डाव्या हातानं वाढून घेतलेलं मुळीच आवडत नाही. त्यामुळे आम्हाला तसं न करायची सवयच झालेली होती. एकदा आम्ही सगळी पोरंपोरच जेवायला बसलो होतो. मी डाव्या हातानं वाढून घ्यायला लागले. एकदम त्याचवेळी दादा आत आले. घाबरून गेले सगळे. पण दादा रागावले नाहीत, अगदी शांतपणाने म्हणाले, "काही हरकत नाही, उजव्या हातानं घेऊ नका म्हणजे झालं।" आम्हाला इतकं लाजल्यासारखं झालं. सगळी भांडी अगदी भराभर सरकवून दिली. पुन्हा कधी आयुष्यात डाव्या हाताने वाढून घेतले नाही.

गुरूमहाराजांबद्दल दादा आम्हाला खूप सांगायचे. पुनःपुन्हा सांगायचे. "त्यांचा एक शब्दही मोडू नका. त्यांचा शब्द नी शब्द ऐकत जा आणि ते सांगतील तसंच करीत जा."

परगावी एका ठिकाणी मला दाखवायला न्यायचं होतं. त्या लोकांचं पत्र आलं की अमुक तारखेला दाखवायला घेऊन या म्हणून. त्यावेळी आई टनागपूरला गेली होती. पंधरा दिवसांनी ती यायची होती. मला वाटलं आई बरोबर नसेल तर कसं जायचं? दादांच्या समोर एकदम असं कसं सांगायच? घरात एकदम कुणीच असं दादांच्यासमोर म्हणून बोलत नाही. मी वहिनीच्या मागे लागले की दादांना सांगा म्हणून, आईला येऊ दे, मगच आपण बार्शीला जाऊ. पण दादांनी शब्द दिला होता. एकदा शब्द दिला म्हणजे काही झालं तरी दादा शब्द पाळणारच. दादा गोड आर्जवी शब्दांत मला म्हणाले, "असं

नाही, त्यांचं पत्र आलंय, जायला पाहिजे." दादांनी इतक्या गोड आर्जवी शब्दांत सांगितलं की मला काही पुढे बोलता आलचं नाही. मी दादांबरोबर त्या गावाला गेले. तेथे दाखवण्याचा कार्यक्रम झाला. पसंती झाली, साखरपुडा ठरला. ज्यांच्या घरी उतरलो होतो तेथून साखरपुड्याला निघायचं, मी आत बाथरुममध्ये गेले. बाथरुमचं दार तसे कमी उंचीचं होतं. पायऱ्यांवरुन येताना एकदम दाराची चौकट ठणकन् डोक्याला लागली, मी एकदम खालीच बसले. समोरच्या खोलीत दादा बसले होते, ते धावतच आले, मला हाताला धरून उठवलं. अगदी हळूवार आवाजात म्हणाले, "आता सासरी जायचं, नम्रतेने वागायला पाहिजे. खाली वाकून दारांतून जावं." त्यांचं ते हळूवार स्वरातलं वाक्य आठवलं की अजून गलबलून येतं. डोळ्यांत पाणी येतं. (हे सांगतानाच महाराजांच्या कन्येला अगदी गदगदून आले. त्यांच्या डोळ्यांत अश्रू जमा झाले. त्यांना पुढे बोलवेना. दोन मिनिटं त्या तशाच भावविवश होऊन स्तब्धच राहिल्या.)

विवाहानंतर वळकटी बांधून मी सासरी निघाले, तेव्हा अगदी घाबरून गेले होते. तर दादा जवळ आले, हळूवार स्वरात म्हणाले, "आता सासरी जायचं ! घाबरायचं काय त्यात? फक्त काही चूक झाली तर लगेच कबूल करून टाकायची. झालेली चूक लपवायची नाही म्हणजे झालं." त्यावेळचे त्यांच्या डोळ्यातले भाव आणि त्यांच्या स्वरातला हळूवारपणा कधीच विसरता येणार नाही.

सासरचे लोक साईबाबांचे खूप भक्त आहेत. लग्नानंतर आम्ही सासरचे सगळेजण शिर्डीला साईबाबांच्या दर्शनाला गेलो होतो. शिर्डीला साईबाबांच्या मूर्तीसमोर मी उभी राहिले आणि मला काय झालं कुणास ठाऊक? एकदम प्रदक्षिणाच घालायला लागले. १०८ प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावरच मी थांबले. आम्ही शेगांवला गेलो तिथेही असंच झालं. तिथे गजाननमहाराजांचा मोठा फोटो आहे, शाल पांघरलेला. त्या फोटोसमोर मी उभी राहिले आणि आपोआप माझे डोळे मिटले गेले. मी सगळं विसरून खूप वेळ तशीच फोटोसमोर उभी राहिले. पंढरपूरलाही असंच झालं. आता असं लक्षात येतं की दादांची मुलगी विवाहानंतर प्रथमच आली आहे. म्हणून

तिथं शिर्डीला, शेगांवला, पंढरपूरला माझं खूप कौतुक झालं होतं.जसं जालन्याला महाराजांच्या घरचं कोणी आलं की ताईमहाराजांना खूप आनंद होतो आणि त्या कौतुक करतात, तसं मला मुलगा होईपर्यंत दादा माझ्या सासरी काहीही खात नव्हते. शास्त्रांत तसे आहे ना ! माझ्या थोरल्या मुलाचा जन्म झाला. तेव्हा त्याच्याकडे पहात दादा म्हणाले, "तुम्ही आम्हाला परवानगी दिलीत आणि मी दिलेले दहीपोहे त्यांनी खाल्ले."

दादांच्या अतींद्रिय शक्तीची जाणीव मला प्रकर्षाने झाली तो प्रसंग सांगते. आम्ही नगरला होतो. माझा मुलगा चौथीत होता. मनात खूप वाटत होतं, काहीतरी देवाची उपासना आपल्या हातून नियमित घडावी. काय उपासना करावी ते दादांनाच विचारावे असा विचार मनात येत होता. तेव्हा दादा पुण्याला होते. माझ्याकडे दादांच तर येण्याचं काहीच ठरलेलं नव्हतं. दिवसभर मी दादांचीच आठवण करीत होते आणि संध्याकाळी साडेसहा वाजता एकदम दारात गाडी उभी. दादा, आई, ताईमहाराज आणि दोघे-तिघेजण आले होते. माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. मी स्वप्न तर पहात नाही असं वाटायला लागलं. जालन्याहून पुण्याला परततांना ते माझ्या घरी आले होते. मी खूप म्हटलं, "आजची रात्र तरी रहा." पण दादा म्हणाले, 'आजच जायला पाहिले.' पण गाडीचे चाक पंक्चर झालं.

गाडी नीट होईपर्यंत रात्र झाली. मग त्यांचे माझ्या घरी राहणं झालं. दादा म्हणाले, "टायरनं तुमची इच्छा पूर्ण केली. नाही पण अशी इच्छा करू नये."

दुसऱ्या दिवशी सकाळी घरकामाच्या गडबडीत उपासना काय करावी ते दादांना विचारायला जमलंच नाही. मनांत सारखं येत होतं तरी विचारणं झालं नाही.दादा जायला निघाले. मी नमस्कार केला. समोरच साईबाबांचा फोटो लावला होता. दादा साईबाबांच्या फोटोकडे पहात म्हणाले, "साईबाबा तुमच्या घरी आहेत. त्यांचीच उपासना फक्त चालू ठेवा. दुसरी काही उपासना करायची गरज नाही." म्हणजे माझा प्रश्न मी त्यांना विचारलाच नव्हता. तरीही त्यांनी घरी येऊन त्या प्रश्नाचं उत्तर दिलं होतं. त्या क्षणांपासून दादांकडे सद्गुरू म्हणून पहावेसे वाटू लागले.

दादांनी मला संकटाच्या वेळी सावरून घेतले त्याची एक हकीगत सांगते. एकदा सकाळी साईबाबांच्या फोटोची पूजा करतांना मला एकदम तिथे महाराजच दिसायला लागले. एकदा महाराज दिसायचे, एकदा साईबाबा दिसायचे. महाराजांच्या आणि साईबाबांच्या डोळ्यांतून पाणी येत होतं. ते मी फोटोत त्या दिवशी प्रत्यक्ष पाहिले. माझे यजमान परदेशात होते. त्यामुळे मी एकदम घाबरूनच गेले. महाराजांच्या आणि साईबाबांच्या डोळ्यात अश्रू कां दिसतात? हे तिकडे आजारी पडले का? ह्यांची तब्येत बिघडली आहे का? हजार विचार मनात यायला लागले. त्यावेळी सासरे घरी नव्हते. मी कामवालीला काहीतरी सांगायला म्हणून बाहेर आले आणि एकदम वॉचमनने तिथे उभी केलेली शिडी माझ्या डोक्यावर पडली. मी खालीच कोसळले. डोकं रक्तानं भिजून गेलं. आसपासचे लोक धावत आले. त्यांनी मला घरात नेलं. औषधपाणी केलं. थोडक्यात बचावले होते. त्यावेळी मला कळलं फोटोत महाराजांच्या आणि साईबाबांच्या डोळ्यांत पाणी का येत होतं? माझ्यावर असं संकट येणार आहे हे जाणून स्वतः महाराज माझ्या घरी त्या दिवशी आले होते. म्हणूनच थोडक्यात निभावलं होतं.

दादांचे सद्गुरू हे खरे रूप मला जाणवले ते पुण्यात वामननिवास ही वास्तू बांधून झाली त्यावेळी. मी तिथे आठ दिवस राहिले होते. हजारो लोक महाराजांच्या दर्शनाला यायचे, दर्शनाला खूप मोठी रांग लागायची. ताईमहाराजांचा सहवासही मला त्यावेळी पहिल्यांदा घडला. महाराजांवरची लोकांची भक्ती पाहिली आणि मला वाटायला लागलं, आपल्या हातून तर साधना काहीच घडत नाही. त्या रात्री मी एक स्वप्न पाहिलं. स्वप्नात मला महाराजांचं पत्र आलं होतं. महाराजांचं अक्षर मी एकदम चटकन ओळखलं. कार्ड होतं, त्या कार्डावर महाराजांनी आपल्या स्वतःच्या हस्ताक्षरात मोठ्या अक्षरात लिहिलं होतं, "गुळवणी महाराज." बस एवढंच लिहिलं होतं. पत्रात दुसरा काहीच मजकूर नव्हता. म्हणजे माझ्या हातून काही साधना घडणार आहे की नाही असा जो प्रश्न मनात आला होता त्याचं महाराजांनी स्वप्नात उत्तर दिलं होतं. सकाळी मी ताईमहाराजांना सांगितलं. ताईमहाराज म्हणाल्या, "रोज महाराजांचं श्रद्धेने दर्शन घेत जा. बाकी जप, वाचन,

व्रतवैकल्ये असं काहीही केलं नाही तरी चालेल."

त्यानंतर आम्ही पुण्यातच वास्तव्याला आलो आणि मी रोज महाराजांच्या दर्शनाला यायला लागले. एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे. घरी कामाचा खूप रगाडा असतो. वाटतं आज दर्शनाला जायला मिळतंय की नाही? पण महाराजांची प्रार्थना केली की दर्शनाला जायला जमतंच जमतं. महाराजांपुढे निवांत बसायला मिळावं अशी प्रार्थना केली की तीही संधी मिळते. महाराज त्या दिवशी बसवून घेतात व भरपूर बोलतात. आपल्या मनातल्या भावना महाराज अगदी बरोबर ओळखतात. काही शब्दांत सांगावं लागतच नाही. आईसाहेबही असंच बरोबर मनातलं ओळखतात. शेवटी हे जे गुरूस्थान आहे त्या गुरूस्थानावरील पत्नीपद आईसाहेब भूषवीत आहेत, तेवढी त्यांची योग्यता आहे म्हणूनच ना? आईसाहेबही स्पष्ट बोलतात पण पोटात खूप माया आहे. समोरच्या भक्ताच्या आंतरिक भावना त्या लगेच जाणतात व भक्ताला तशी मायाही देतात. मध्ये औरंगाबादचे एकजण पत्नीला घेऊन दर्शनाला आले होते. ते हॉटेलात राहिले आहेत ते समजताच एकदम आईसाहेब म्हणाल्या, "का? हॉटेलात का उतरलात? आश्रमात सोय आहे ना? प्रसाद मिळतो त्या स्थानात राहणं होतं, पुढच्या वेळी आल्यावर लक्षात ठेवा. आश्रमात रहायचं, प्रसाद घ्यायचा, हॉटेलात नाही."

माझा मुलगाही रोज संध्याकाळी महाराजांच्या दर्शनाला येतो. आधी पाय धुतो आणि मग दर्शन घेतो. एकदा महाराज एकदम समोर आले. त्याने पाय धुतले नव्हते म्हणून तो दर्शन घ्यायचा थांबला तर ताईमहाराज समोर आल्या. त्याने पाय धुतले नव्हते म्हणून तो दर्शन घ्यायचा थांबला तर ताईमहाराज त्याला म्हणाल्या, "असे इथे असाच साष्टांग नमस्कार घातला तरी चालतो. महाराजांचं दर्शन म्हणजे साक्षात वाडीचे दर्शन. स्नान, हातपाय धुणे कशाचीही गरज नाही."

मुलाला मेडिकलच्या शिक्षणासाठी परगावी ठेवले. मला खूप काळजी वाटायची. रॅगिंग असतं. वाईट संगत लागते, वाईट सवयी लागतात, अभ्यासाकडे दुर्लक्ष होतं, फार फार काळजी वाटायची. पण रोज संध्याकाळी महाराजांच्या दर्शनाला गेले की महाराज म्हणायचे, "तुम्ही काळजी करू

नका, तो अभ्यासाला लागलेला आहे." खरोखरच मुलाने चांगला अभ्यास केला व तो परीक्षेत चांगला उत्तीर्ण झाला.

जे लोक श्रद्धेने येतात त्यांची श्रद्धा महाराज बरोबर ओळखतात. त्यांना खूप मायेनं वागवतात. त्यांच्यावर खूप प्रेम करतात. हे सगळं पाहिलं म्हणजे वाटतं परमेश्वराचे परिपूर्ण रूप याच्यापेक्षा वेगळं काही असू शकत नाही. इथे सद्गुरू या परमेश्वरी शक्तीचे अवतारी प्रकटीकरण परिपूर्ण रूपात दिसते. पारमार्थिक वाटचालीसाठी असे प्रेममूर्ती सद्गुरू लाभले यांत माझं फार मोठं सुकृत असलं पाहिजे.

***

* ।। लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।।

(प्रश्न काव्यातून ! आणि उत्तरही काव्यातून !!)

श्रीदत्तमहाराजांचे कनिष्ठ चिरंजीव श्री.अजितराव हे पुण्याहून मुंबईला रेल्वेने जात होते. मनांत चिंतन चालू होते. जगांत सभोवती दिसणारी सुखदुःखे, बंधने, सीमारेषा, चैतन्याची ओढ, अपरिहार्यपणे कराव्या लागणाऱ्या तडजोडी, त्यामुळे मनाला वाटणारी अस्वस्थता असे अनेक विचार मनात रेंगाळले होते. त्यांच्या मानसिक चिंतनाने काव्याचा आधार घेतला आणि त्या मनःस्थितीचे प्रतिबिंब काव्यात प्रगटले. ही कविता त्यांनी रेल्वेतच टिपून ठेवली. ही कविता पुढीलप्रमाणे होती.

संभ्रम !

आक्रंदतो मी का असा
उमजेना माझेच मला
या मरुभूमीचा भार जणू
माझ्याच एकट्या शिरी आला ।।१।।

मळलेली वाट जपताना
कुणी दिसे कंटाळलेला
परी या वाटेवरीच असे
सुखदुःखांच्या शृंखला ।।२।।

हीच वाट पुसायची
असा निर्बंध आलेला
परी तो नसेची आलेला ।।
तो तर लादलेला ।।३।।

अतिक्रमण करण्याने
वाव मिळतो विवंचनेला
ह्यातून मग कुणी मुकती
चैतन्यशील आनंदाला ।।४।।

मानतो मी चौकटी
आवश्यक जीवनाला
तरी का बरे त्यांनी जखडावे
मनुष्य स्वभावाला ॥५॥

चैतन्य मी, सृजन मी
हा योग मला गवसला
परी जन्मसिद्ध हक्क हा
कुणी माझा हिरावला ॥६॥

निर्मम चैतन्य निसर्गातील
सळसळवी माणसाला
परी तो अभागी नसे
तितुकाच तृषार्तलेला ॥७॥

हे असेच चालायचे समजून
तडजोडीचा प्रोत आला
परंतु तिथे मात्र मी
असे उगाच गमलेला ॥८॥

मज काय हवे वदताना
मी बराच अडलेला
हाच असे का योग्य
हा संभ्रम पडलेला ॥९॥

खरंच सांगतो मी, काहीच
कसे कळेना मला
दाखविल का कुणी वाट
नेणती या पांथस्थाला ॥१०॥

***

मुंबईला गेल्यावर श्री.अजितरावानी ही कविता पत्रात लिहून श्रीदत्तमहाराजांना पाठवून दिली. श्रीदत्तमहाराजांनी या पत्राला काव्यांतूनच उत्तर दिले. ते उत्तर पुढीलप्रमाणे आहे.

* लीला समस्त अजित प्रभुराजयाची

कोणी सुयत्नरत सज्जन देवभक्त ।
सौख्यात जीवन सदोदित कंठतात ॥
कोणीही कांस धरि संभ्रममालिकेची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥१॥

कोठे सदैव विपुलान्न जले प्रशान्ति ।
कोठे सदैव तदलाभभरे अशान्ति ॥
ऐशी दशा जगि दिसे नियतिक्रमाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥२॥

की धर्ममार्ग बरवा जगदीशमान्य ।
की अर्थमार्ग बरवा व्यवहारमान्य ॥
ऐसी अभागि जनपद्धति संशयाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥३॥

कां हें सुधर्मनिरतास हि दृश्यःदुख ।
कां हे अधर्मनिरतासचि दृश्यसौख्य ॥
सिद्धान्तरीति विलसे जनसंभ्रमाची ॥
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥४॥

मातापितास्य चिरपुत्रवियोगदुःख ।
बालास अल्पवयि मातृवियोगदुःख ॥
कोणास शक्ति जगि दुःख निवारणाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥५॥

कोणी नियामक म्हणोनि जगात मान्य ।
कोणी नियम्य म्हणुनी अति हीन दीन ॥
ऐसी नियम्यनियति कधी जावयची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥६॥

गुण तेचि दोष दिसती जगि ती असूया ।
नाही जिला म्हणुनि तीच त्रिमूर्तिमाता ॥
झाली जगी सततकीर्तीमयी हि साची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥७॥

सत्कर्मशील दमशील सुदानशील ।
ईशानुरक्त गुरुभक्त परोपकारी ॥
पांथस्थ धर्मरत संभ्रममुक्त तोचि ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥८॥

लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।
लीला अमोघचि तया जगदीश्वराची ॥
लीला सुमंगल हितैषि जनार्दनाची ।
लीलानु चिंतन करी सुखि नित्य तोचि ॥९॥

***

या कवितेत श्रीदत्तमहाराज श्री. अजितरावांना सांगताहेत, हे विश्व म्हणजे जगदीश्वराची लीला आहे, खेळ आहे, क्रीडा आहे. हा खेळ असाच चालू रहाणार आहे. या खेळात आपल्या वाट्याला जो भाग येतो तो आपण खेळत रहावे. पण तो भाग गंभीरपणाने घ्यायचा नसतो, मनाला लावून घ्यायचा नसतो आणि तरीही आपण या खेळात प्रामाणिकपणे खेळतच रहायचे असते. आपल्या प्रयत्नात शिथिलता येऊ द्यायची नसते. हा खेळ खेळत असतांना आपले मन उच्च पातळीवर, उदात्त पातळीवर ठेवले पाहिजे. धर्मपालन करावे, सत्कर्म करावे, भक्ती करावी म्हणजे मनांत संभ्रम निर्माण होत नाहीत. मनाने आपण काहीसे अलिप्त राहिले पाहिजे. कोणताही लाभ, हानी, जयपराजय, आनंददुःख जे पुढे येईल ते अलिप्तपणाने पहात, मनाने तटस्थ राहून हा जीवनाचा खेळ सदैव खेळत राहिले पाहिजे.

जगदीश्वराच्या लीलेचे हे मर्म ज्याने आत्मसात केले त्यालाच आपले जीवन चांगल्या प्रकारे कसे जगता येईल याचे आकलन होऊ शकते. भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिकतेचा हा गाभा आहे. तो आपलासा केला की जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते आणि तटस्थपणे निर्लिप्त वृत्तीने जीवन जगता येते. हा अध्यात्माचा ठेवा अंतरंगात जपून ठेवला म्हणजे ऐहिकाच्या कोलाहलांत स्थिरचित्तवृत्तीने वावरता येते. आघात अंगावर झेलता येतात, आंतरिक प्रक्षोभ होईल असे प्रसंग पुढे आले तरी स्थिरचित्ताने प्रक्षोभाच्या प्रसंगाला सामोरे जाता येते, विरोध सहन करावा लागला तरी यातना, निराशा व मनस्ताप यांच्या कालखंडातून पुढे जाता येते. जनकल्याणासाठी जीवन व्यतीत करता येते, मन त्यांतून बाहेर पडल्यावर साऱ्या द्वंद्वाच्या अतीत पोचणारी, ऐहिकाच्या पलीकडे असलेल्या क्षेत्राचा वेध घेणारी एक शांत, समाधानी समधात वृत्ती प्राप्त करून घेता येते.

ऐहिकांतील मृत्तिकेचा स्पर्शही न होऊ देता विशुद्ध आध्यात्मिक जीवन जगता येते. श्रीदत्तमहाराजांनी या कवितेतून असा भारतीय अध्यात्माचा गाभाच आपल्या हाती दिला आहे.

***

* एका वासुदेवनिवासी साधकाच्या आठवणी

(वासुदेव निवासमध्ये सुमारे पंचवीस वर्षे वास्तव्य करून असलेल्या एका साधकाने श्रीदत्तमहाराजांसंबंधी ज्या आठवणी सांगितल्या त्या पुढे दिल्या आहेत.)

आचारः प्रथमो धर्मः। या तत्त्वाला त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व होते. मग ते नित्यकर्म असो अथवा नैमित्तिक असो! श्रीदत्तमहाराजांच्या जीवनांतील अनेक लहानमोठ्या, प्रसंगामध्ये आपल्याला आचारधर्मांबरोबरच साधेपणा, अमानित्त्व, लीनता, स्थितप्रज्ञता, प्रसिद्धीपराङ्मुखता, वक्तृत्व हे सत्त्वगुण प्रकर्षाने अनुभवण्यास मिळतात.)

* कमालीचा साधेपणा

श्रीदत्तमहाराजांनी आपल्या शरीराची वाजवीपेक्षा जास्त काळजी कधीही घेतली नाही. शनिवार पेठेतील वर्तक वाड्यातील आपल्या घरापासून श्रीवासुदेव निवासापर्यंत भर दुपारी ते अनवाणी येत असत. अंगावर देखील धोतर आणि उपरणे एवढीच वस्त्रे असत. आश्रमात दुपारी विश्रांती घेताना देखील नेहमीचेच उपरणे पांघरून आपल्या बैठकीच्या लहानशा गादीवर अंग दुमडून झोपत असत. पावसाळा असो, उन्हाळा असो अथवा हिवाळा असो, त्यांचा पोषाख ठरलेला - धोतर आणि उपरणे !

कुठेही परंगावी जायचे असो, त्यांचे सामान अत्यंत आटोपशीर असे, हातात एक लहानशी पिशवी व बोचक्यासारखी लहानशी वळकटी! त्यामध्ये एखाद्दुसरी शाल, नित्य लागणारी वस्त्रे व उपकरणे एवढेच सामान असे. त्यांच्या या कमालीच्या साधेपणामुळे लोक त्यांना एक सामान्य याज्ञिकी करणारा ब्राह्मण असे समजत असत.

* अमानित्त्व

अंदाजे १९७८ सालचा हा प्रसंग; आश्रमात शिकण्यासाठी दोन-तीनच विद्यार्थी होते. प.पू. श्रीदत्तमहाराज रोज भोजन आटोपून साधारण एकच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातून आश्रमात विश्रांतीसाठी येत असत.

श्रीदत्तमहाराज वरच्या खोलीत असत. वासुदेव निवासमधील दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीत विश्रांती घेत असत.

एक दिवस वाराणसीहून एक साधक वासुदेव निवासमध्ये आले. त्यांनी श्रीदत्तमहाराजांची दीक्षा पत्राद्वारे घेतलेली होती. परंतु त्यांनी श्रीदत्तमहाराजांना प्रत्यक्षात कधीही पाहिले नव्हते. वाराणसीहून आगगाडीने ते पुणें स्टेशनवर आले आणि रिक्षा करून ते आश्रमात सरळ आले. त्यावेळी दुपारचे दोन वाजले होते. आश्रमात खालच्या मजल्यावर त्या साधकाला कुणीही न दिसल्यामुळे तें सरळ जिना चढून वरती गेले.

त्यांना समोर श्रीदत्तमहाराज दिसले. परंतु प्रत्यक्ष पाहिलेले नसल्यामुळे त्याला आपल्याला ज्यांची दीक्षा झाली ते हेच आपले सद्गुरू हे ओळखता आले नाही. आश्रमातलेच कोणीतरी सेवक असतील असे समजून त्याने सरळ श्रीदत्तमहाराजांनाच विचारले,"दत्तमहाराज कुठे आहेत?"

श्रीदत्तमहाराजांनी त्यांना नाव विचारले, आपण कुठच्या गावाहून आलात त्याचीही त्यांनी चौकशी केली. वाराणसीमधील ज्या साधकाला आपण दीक्षा दिली आहे तेच हे गृहस्थ.

श्रीदत्तमहाराजांनी त्यांना विचारले, 'आपले भोजन व्हायचे आहे ना.' ते साधक होय म्हणाले. तेव्हा महाराजांनी त्यांना असे सांगितले की, ''खाली जाऊन भोजन करावे.''

ते गृहस्थ खाली आले, पण खाली कुणीच न दिसल्याने ते पुन्हा वरच्या मजल्यावरती गेले आणि श्रीदत्तमहाराजांना म्हणाले, 'खाली कुणी नाही.'

श्रीदत्तमहाराज त्यांना म्हणाले, 'चला, मी आलो.' असे म्हणून उपरणे सावरून श्रीदत्तमहाराज खाली आले. त्यांनी पाट मांडला, तांब्या भरून पुढे ठेवला, आत जाऊन ताट-वाटी घेऊन आले आणि त्यांना भोजनाला बसायला सांगितले. समोर स्वतः उभे राहून सर्व पदार्थ वाढले आणि जेवण झाल्यावर त्यांना ते म्हणाले की आपण वरती जाऊन विश्रांती घ्यावी. दुपारी चार वाजता आपल्याला श्रीदत्तमहाराज भेटतील.

ते गृहस्थ हात धुवायला गेले तेवढ्यात श्रीदत्तमहाराजांनी त्याची ताट-वाटी उचलून भांडी घासायच्या जागी नेऊन ठेवली आणि उष्टे काढून स्वतः

ओल्या फडक्याने ती जागा पुसून स्वच्छ केली व पाट जागच्याजागी ठेवून दिला. श्रीदत्तमहाराज उष्टी काढत आहेत हे त्या गृहस्थाने पाहिले परंतु हेच आपले सद्गुरू आहेत हे त्यांना माहित नसल्याने त्यात त्यांना काहीच वाटले नाही. ते दुसऱ्या मजल्यावर गेले आणि त्यांनी चार वाजेपर्यंत विश्रांती घेतली. एवढ्यात त्यांना आश्रमातील कोणी सेवक दिसले.

त्यांनी त्या सेवकांना विनंती केली की मला श्रीदत्तमहाराजांकडे घेऊन जावे. तो सेवक त्या गृहस्थांना श्रीदत्तमहाराजांकडे घेऊन आला आणि दत्तमहाराजांना पाहून तो साधक स्तंभितच झाला. ज्यांनी आपल्याला जेवण वाढले आणि नंतर आपली उष्टी काढली ते स्वतः आपले सद्गुरू आहेत याची जाणीव होताच त्याला भडभडून आले. तो ओक्साबोक्शी रडू लागला. त्याच्या तोंडातून एक शब्दही फुटेना. डोळ्यांतून अश्रुंच्या धारा वहात होत्या. त्याने श्रीदत्तमहाराजांच्या पायांना घट्ट मिठी मारली आणि हमसून हमसून तो रडू लागला.

श्रीदत्तमहाराजांनी शांतपणे त्याच्या पाठीवरून हात फिरवला आणि ते सौम्य शब्दांत पुनःपुन्हा म्हणत राहिले, ''शांत व्हा ! शांत व्हा!!''

बऱ्याच वेळाने त्या गृहस्थांचा उमाळा आवरला. श्रीदत्तमहाराजांनी त्यांच्या साधनेची चौकशी केली आणि त्यांना उचित उपदेश केला. केवढे हे अमानित्त्व!

* औरवाडबद्दल विलक्षण प्रेम

औरवाड हे श्रीदीक्षितस्वामीमहाराजांचे स्थान. श्रीदत्तमहाराजांचे ते पहिले गुरू. श्रीदत्तमहाराज जेव्हा जेव्हा वाडीला जात तेव्हा तेव्हा औरवाडला आवर्जून जात असत.

औरवाडला गेले म्हणजे ते अतिशय भावविभोर होत असत. श्रीदीक्षितस्वामी-महाराजांची आठवण आली म्हणजे त्यांचे हृदय भरून येत असे. दीक्षितमहाराजांनी वापरलेल्या वस्तू पाहिल्या म्हणजे तर ते अगदी सद्गदीत होऊन जात. अनेक वेळा ते स्वतःला हरवून जाऊन गुरूभक्तीने पूर्णपणे समाधीमग्न झाल्याचे दृश्य औरवाडला अनेक लोकांनी बघितले आहे.

त्या ठिकाणी प.पू.श्रीदीक्षितस्वामींच्या शिष्या गं.भा. यमुताई रहात असत. श्रीदत्तमहाराज त्यांना भेटून त्यांची मोठ्या आस्थेने विचारपूस करीत, त्यांनी वाढलेल्या ज्वारीच्या कण्या मोठ्या प्रेमाने मनापासून खात असत. जणू काही आपले सद्गुरू श्रीदीक्षितस्वामी-महाराजांचाच प्रसाद आपण घेत आहोत अशा भावनेने ते औरवाडला अगदी पाणीसुद्धा घेतांना गंगाजल प्राशन करीत आहोत अशा भावनेत असत.

* श्रीदत्तमहाराजांचा सत्तरावा वाढदिवस

१९८० साल, श्रीदत्तमहाराजांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त आश्रमांत काही धार्मिक कार्यक्रम आयोजित केले होते. महाप्रसादाकरिता श्रीवासुदेव निवासात बरीच गर्दी झाली होती. लोक पाने धरण्यासाठी गडबड करीत होते. एका पंक्तीत दोन-चार पाने शिल्लक होती, त्यातील एका पानावर श्रीदत्तमहाराज येऊन बसले देखील!

एका सामान्य भक्ताप्रमाणे सामान्यांच्या पंक्तीत बसलेले श्रीदत्तमहाराज, आपल्या कृतीने बरेच काही सांगून गेले. सांगता समारंभामध्ये मोठे हार घालून ज्यांचा सत्कार केला, ज्यांना लाखाचा निधी दिली, ज्यांचा गुणगौरव केला अशी महान व्यक्ती आपल्या पंक्तीत बसलेली आहे, हे कित्येकांना कळलेदेखील नाही; त्यामुळे श्रीदत्तमहाराजांचे भोजन होण्याआधीच काही मंडळी हात धुण्यासाठी उठली देखील! स्वतःचे मोठेपण झाकून घेण्याची केवढी ही कुशलता, खबरदारी !

या पद्धतीने दीक्षा देताना देखील श्रीदत्तमहाराज वागत असत. त्यांनी कुणालाही कधीही असे सांगितले नाही की, मी तुम्हाला दीक्षा देतो. दीक्षा पत्राद्वारे असो किंवा प्रत्यक्ष असो, ते सांगत, 'श्रीगुरूमहाराजांच्या (प.पू.गुळवणीमहाराज) फोटोला हार घाला. फोटोपुढे नारळ ठेवा, पेढे ठेवा आणि श्रीमहाराजांना प्रार्थना करा की माझ्यावर अनुग्रहाची कृपा करा. श्रीगुरूमहाराज तुमच्यावर कृपा करतील. नंतर तो नारळ फोडून घरच्या सर्वांनी खावा.' याप्रमाणे दीक्षा झाल्यानंतर साधक जेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास जात आणि सांगत, 'महाराज, खाण्यापिण्याचे नियम (कांदा-लसूण) इतके काटेकोरपणे पाळणे आम्हाला कठीण वाटते.' तेव्हा श्रीदत्तमहाराज म्हणत,

'ठीक आहे. काळजी करू नका. हळूहळू आपल्या सवयी कमी करत जा, पुढे या गोष्टी आपोआपच बंद होतील.' भक्ताची आर्तता पाहून त्यांचे अंतःकरण विरघळून जायचे.

श्रीदत्तमहाराजांची बसण्याची ढब वेगळीच असे, तसे ते मुद्दामच बसत असावेत. त्यांची पाऊले मांडीच्या इतक्या आत त्यांनी घेतलेली असत की, त्यांच्या पावलांच्या अंगठ्यांना सहसा कुणाला स्पर्श करता येत नसे. खुर्चीवर बसले असले तरी ते त्यांची पाऊले इतकी मागे घेत असत की, त्यांच्या पावलांना स्पर्श करणे अशक्य होत असे. 'अलौकिक नोहावें लोकांप्रती' अशी श्रीदत्तमहाराजांची कृती होती.

*** परमेश्वरचरणी लीनता, नम्रता**

१९९० सालच्या सुमारास औरवाड येथे श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह ठरला. औरवाड येथे स्नानाची व अन्य विधींची सोय नव्हती. तेथील गैरसोयी श्रीमहाराजांना सांगताच श्रीमहाराज म्हणाले, 'देवांचे अन्य सेवेकर जसे रहातात तसेच आम्ही राहू.'

स्वतः इतके मोठे असूनदेखील सामान्य सेवेकऱ्यांच्या सारखेच स्वतःला मानणे व वागणे हे किती कठीण आहे! वास्तविक त्यांचे वय ऐंशीच्या पुढे गेलेले होते. पण स्वतःचे एवढे वय असूनही श्रीमद् भागवत सेवेपुढे त्यांना स्वतःला होणाऱ्या त्रासाची बिलकूल चिंता वाटली नाही.

श्रीदत्तमहाराजांचे श्रीमद् भागवतावर अलोट प्रेम होते. एक वर्षी श्रीवासुदेवनिवासात श्रीमद् भागवतावर विवेचन करताना श्रीदत्तमहाराजांना ताप असूनही त्यांनी विवेचन चालूच ठेवले; शेवटी आरतीच्या वेळी श्रीदत्तमहाराजांना पुष्कळ थंडी भरून आली; त्यामुळे त्यांना उभेदेखील रहाता येईना. परंतु आरती होईपर्यंत श्रीदत्तमहाराज मोठ्या नेटाने तसेच उभे राहिले.

साधू, संत व संन्यासी यांच्याबद्दलचा श्रीदत्तमहाराजांचा आदरभाव वाखाणण्याजोगा होता. करवीर पीठाधिपती प.प. (परमहंस परिव्राजकाचार्य) विद्याशंकर भारती आश्रमात आले होते.

श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराजांना बसण्यासाठी जे आसन मांडले होते त्याच्या शेजारीच श्रीदत्तमहाराजांनाही बसण्यासाठी आसन मांडले होते. ते

पाहून श्रीदत्तमहाराज काहीसे अस्वस्थ झाले. शंकराचार्य-स्वामीमहाराजांच्या शेजारी आपण आसन ग्रहण करणे त्यांना योग्य वाटले नाही. परंतु ते कोणालाही काहीही बोलले नाहीत.

शंकराचार्य-स्वामीमहाराज आपल्या आसनावर जाऊन बसताच श्रीदत्तमहाराज हळूच त्यांच्यासमोरच खाली जमिनीवर बसले. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या आसनावर बसावे म्हणून काही लोकांनी सुचविले. स्वतः शंकराचार्य-स्वामीमहाराजांनीदेखील त्यांना तसा आग्रह केला. परंतु श्रीदत्तमहाराजांनी आपले श्रोत्यातील स्थान सोडले नाही. ते शांतपणे तेथेच बसून राहिले.

नेमके असेच भोजनाच्या वेळी घडले. शंकराचार्य-स्वामीमहाराजांच्या शेजारी श्रीदत्तमहाराजांचे पान मांडले होते. हे श्रीदत्तमहाराजांनी पाहिले. परंतु त्यांनी तोंडातून एक अक्षरही काढले नाही. शांतपणे स्वतःच ते त्या ठिकाणी गेले आणि आपले ताट उचलून स्वतःच समोर जेथे वासुदेव निवासातील इतर विश्वस्त बसले होते तेथे ते जाऊन बसले.

वास्तविक श्रीदत्तमहाराज वासुदेव निवासचे पीठाधीश्वर होते. उत्तराधिकारी या नात्याने त्यांना शंकराचार्य-स्वामीमहाराजांच्या बरोबर बसणे निश्चितच अनुचित ठरले नसते. परंतु श्रीदत्तमहाराजांचे अमानित्त्व अलौकिक कोटीचे होते म्हणूनच ते असे वागले.

* प्रसिद्धीपराङ्मुखता

१९८० सालच्या अगोदर श्रीदत्तमहाराजांचा आश्रमात कोठेच मोठा फोटो नव्हता. म्हणून विश्वस्तांनी मोठा फोटो तयार करून घेऊन तो वरील दिवाणाच्या खोलीत ठेवला. आपला फोटो त्या खोली ठेवला ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांना मुळीच रूचली नाही, त्यांनी श्री. कोंढरेंना बोलावले आणि सांगितले की हा फोटो उचलावा आणि तिसऱ्या मजल्यावरील आतील अडगळीच्या खोलीत ठेवावा.

श्री. कोंढरे यांना आश्रमाच्या विश्वस्तांनी अगोदरच याबद्दल सांगून ठेवले होते त्यामुळे त्यांनी तो फोटो तेथून उचलला नाही.

त्यांनतर श्रीदत्तमहाराजांनी श्री. कोंढरे यांना व इतर अनेक लोकांना तो फोटो तेथून उचलण्यासंबंधी सांगितले. परंतु विश्वस्तांच्या सांगण्यावरून श्री.कोंढरेंनी त्याकडे दुर्लक्ष केले.

श्रीदत्तमहाराज दौऱ्यावर गेले असतांना विश्वस्तांनी तो फोटो फ्रेम करून दिवाणावरील भिंतीवर बसवून टाकला. ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांना बिलकूल आवडली नाही, त्या दिवसापासून श्रीदत्तमहाराजांनी त्या खोलीत कामाशिवाय जाणेच बंद करून टाकले.

❊ व्यवहारदक्ष

श्रीदत्तमहाराज साक्षात्कारी असूनही अत्यंत व्यवहारदक्ष होते. पत्रव्यवहार करण्याकरिता श्रीदत्तमहाराजांना कार्डे, पाकिटे लागत असत. त्याकरिता व्यवस्थापकांच्या जवळ पन्नास-शंभर रुपये देऊन, त्यांच्याकडून कार्डे व पाकिटे आणून घेत; पण आश्रमातील कार्डे, पाकिटे त्यांनी कधीही वापरली नाहीत. भक्तमंडळींना लग्न-मुंजीकरिता अहेर पाठवितांना देखील कमीशनसकट मनीऑर्डरचे पैसे व्यवस्थापकांच्या जवळ ते देत असत.

कांचीकामकोटीचे प.प.श्रीशंकराचार्यांनी (जयेंद्र सरस्वती) काही कारणास्तव पीठाचा त्याग केला होता व तपश्चर्या करण्याकरिता ते निघून गेले होते. त्यांच्याबद्दल द्वारकापीठाधीश प.प.स्वरूपानंद सरस्वती यांनी वर्तमानपत्रात जाहीरपणे अनुदार उद्‌गार काढले होते. द्वारकापीठांच्या हस्ते श्रीदत्तमहाराजांचा सत्कार होणार होता. परंतु श्रीदत्तमहाराज त्या सत्काराला गेले नाहीत. कारण द्वारकापीठाधीशांचे हे बोलणे श्रीदत्तमहाराजांना आवडले नव्हते. त्यांनी आपली नाराजी तेथे न जाण्याने व्यक्त केली, फक्त श्रीदत्तमहाराज एवढेच म्हणाले, थोरामोठ्यांनी सामान्यांचा असा बुद्धिभेद करू नये.

❊ महान त्याग

कोठेही जाहिरात न केल्यामुळे श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या असीम त्यागाची कल्पना कोणालाही नाही. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील त्यांच्या वडिलोपार्जित घराची किंमत केल्यानंतर आपल्या सर्व बंधूंना त्यांचा वाटा देऊन टाकला व नंतर सर्व घराचा ट्रस्ट केला आणि ते घर देऊळगांवराजाच्या ट्रस्टला जोडून टाकले.

पुण्यातील श्रीवामननिवास ही वास्तू म्हणजे श्रीमहाराजांच्या अथक प्रयत्नांचे व असीम त्यागाचे चालते बोलते उदाहरण आहे. ही वास्तू उभारण्याकरिता गावोगावी श्रीमद् भागवत सप्ताह करून आलेले सर्व पैसे श्रीदत्तमहाराज विश्वस्तांच्या हवाली करीत. हे त्यांचे कार्य दोन-चार वर्षे चालले होते.

पण श्रीदत्तमहाराजांनी या कार्याची लोकांना जरासुद्धा कल्पना येऊ दिली नाही. श्रीदत्तमहाराजांचे प्रत्येक कार्य इतके अबोलपणे व अलिप्तपणे चालायचे की, त्यांच्या महान कार्याची कोणालाही कल्पनाच येत नसे. श्रीदत्तअमरेश्वर जीर्णोद्धाराच्या वेळी श्रीमद् भागवतसप्ताह व श्रीगुरूपौर्णिमा यांतून मिळालेली सर्वच्या सर्व रक्कम न मोजता श्रीदत्तमहाराज जीर्णोद्धार मंडळाकडे देत असत. दोन तीन वर्षामध्ये श्रीदत्तमहाराजांनी जवळ जवळ तीन चार लाख रुपये सहजरित्या श्रीदत्त अमरेश्वरकरिता दिले.

अशीच गोष्ट काशीयात्रेच्या वेळी घडली. तेथे दानधर्म करण्याकरिता त्यांनी शेकडोंनी वस्त्रे, उपवस्त्रे व अन्य गोष्टी घेतल्या होत्या. परंतु स्वतः मात्र आठवारी साधे धोतर व करवतकाठी उपरणे याशिवाय काहीही परिधान केले नाही.

दुसऱ्याला मोठेपणा देणे, स्वतःची स्तुती स्वतःच्या कानाने न ऐकणे

श्रीदत्तमहाराजांच्या अमृतमहोत्सवाचा सांगता समारंभ सुरू होता. प्रमुख व्यक्तींची भाषणे झाली. नंतर प.पू.वै.श्रीधुंडिराजमहाराज देगलूरकर यांचे अध्यक्षीय भाषण सुरू झाले. प्रास्ताविक संपताच श्रीधुंडिराजमहाराजांनी प.पू.श्रीमहाराजांची स्तुती करण्यास सुरुवात केली. ती स्तुती ऐकताच श्रीदत्तमहाराज पटकन उठले आणि त्यांनी श्रीधुंडिराजमहाराजांच्या हातातील माईक आपल्या हातात घेतला व बोलण्यास सुरुवात केली. 'आपण सर्व भक्तमंडळी व साधक प.पू.योगीराजांच्या अतिशय प्रेमातील आहोत, याशिवाय येथे जमलेली विद्वान मंडळी, सत्पुरुष व श्रीधुंडिराजमहाराजांची आपल्या सर्वांवर असीम कृपा व प्रेम आहे. त्यांचे असेच प्रेम आपल्यावर रहावे अशी आपण त्यांना प्रार्थना करूया.'असे बोलून त्यांनी सभा संपवली.

लोकांना वाटले, श्रीदत्तमहाराजांना कामाची घाई असावी म्हणून त्यांनी सभा संपवली असावी. परंतु प्रत्यक्षात मात्र श्रीधुंडिराजमहाराजांनी केलेली

आपली स्तुती श्रीदत्तमहाराजांना स्वतःच्या कानाने ऐकायची नव्हती व दुसऱ्यांना ऐकवायची नव्हती.

श्रीदत्तमहाराजांच्या स्वभावाचे एक खास वैशिष्ट्य होते. दुसऱ्याचा अगदी लहानसा गुणदेखील ते मोठा करून सांगत व त्याचे मनापासून कौतुक करीत. श्रीदत्तमहाराजांनी केलेले कौतुक तोंडदेखले कधीच नसायचे. एखाद्याने केलेली कविता, प्रसंग किंवा तक्रार ते नीट वाचून बघत असत व त्या व्यक्तीला समाधानकारक उत्तर देत असत.

साधारण दहा ते पंधरा वर्षापूर्वीचा हा प्रसंग असेल. आश्रमात नित्य येणाऱ्या एका सद्भक्ताने श्रीदत्तमहाराजांचा श्रीमद् भागवतसप्ताह आपल्या घरी ठरविला होता. त्या भक्ताला कुणीही नसल्यामुळे त्याने आपले स्वतःचे श्राद्ध गयेला जाऊन केले होते. परंतु या गोष्टीची पूर्वकल्पना त्या भक्ताने श्रीमहाराजांना दिली नव्हती.

श्रीदत्तमहाराजांना जेव्हा निनावी पत्र आले तेव्हा श्रीमहाराजांना ही गोष्ट समजली. वास्तविक पहाता श्रीदत्तमहाराजांना त्या भक्ताच्या घरी श्रीमद् भागवतसप्ताह करायचा की नाही हा निर्णय घेणे सहज शक्य होते. परंतु दुसऱ्याला मोठेपणा देणे व लोकापवाद टाळणे या दोन्ही गोष्टी साधायच्या असल्याने श्रीदत्तमहाराजांनी पंडित श्रीगणेशशास्त्री शेंडे यांच्याकडे श्री.रघुनाथराव कुळकर्णी, श्री. भाऊसाहेब वाकडे व श्री. दाते यांना पाठवले.

पं.गणेशशास्त्रींनी सर्व हकीकत ऐकून घेतली व सांगितले, स्वतःचे श्राद्ध केलेला माणूस प्रेतवत होतो; त्याला कोणत्याच धार्मिक गोष्टी करण्याचा अधिकार रहात नाही.श्रीदत्तमहाराजांना पं.गणेशशास्त्रींचे म्हणणे व निर्णय सांगितला गेला. तो निर्णय प्रमाण मानून श्रीदत्तमहाराजांनी त्या गृहस्थाच्या घरी श्रीमद् भागवतसप्ताह केला नाही.

आश्रमाचा एक माजी विद्यार्थी वे. मू. राजाराम कुळकर्णी याने पंधरा वर्षांपूर्वी श्रीदत्तमहाराजांच्या प्रेरणेने अग्निहोत्र घेतले. या आपल्या विद्यार्थ्याचा गौरव करतांना प्रवचनात एकदा श्रीदत्तमहाराज म्हणाले, '' यः क्रियावान् स पण्डितः। आम्ही नुसतेच शब्दपंडित आहोत. श्रौतकर्माचे फळ कसे महान

आहे हे मीमांसा शास्त्राने नुसते सांगत बसतो. पण आम्ही करत मात्र काही नाही. कारण श्रौतकर्म किती कठीण असते हे वेदमूर्ती राजाराम कुलकर्णींसारखे ते करणारेच जाणतात.''

वस्तुतः श्रीदत्तमहाराजांचे हे शब्द म्हणजे केवळ विनय आहे हे सर्वांना माहिती आहे. या विनयाच्या भावनेतूनच श्रीदत्तमहाराजांनी आपल्या विद्यार्थ्याला मोठेपण दिले व स्वतःला केवळ शब्दपंडित म्हटले. केवढे हे विशाल मन! दुसऱ्याला मोठेपण देण्याची श्रीदत्तमहाराजांची सहजवृत्ती नेहमीच दिसून येत असे.

* क्षमाशीलता

१९९० साल. श्रीदत्तमहाराजांचा सहस्त्रचंद्रदर्शनशांती महोत्सव ठरला आणि श्रीमदत्तहाराजांची प्रकृती एकाएकी बिघडली. काय झाले आहे हे श्रीदत्तमहाराजांना कळले होते. पण कोणालाही न सांगता सर्व त्रास शांतपणे ते सहन करीत होते. डॉक्टरी उपचार चालू होते, पण थोडासुद्धा फरक पडत नव्हता.

महोत्सवाच्या आधी पंधरा दिवस कुंडली पीठाचे शंकराचार्य श्रीवासुदेव निवासात आले होते. त्यांच्या कानावर महाराजांच्या प्रकृतीसंबंधी सर्व हकीगत घातली गेली. तेव्हा ते म्हणाले, 'काय आहे ते मी पहातो.' असे म्हणून त्यांनी आपल्या खोलीचे दार बंद करून घेतले. अर्ध्यापाऊण तासाने स्वामीमहाराजांनी दार उघडले. आपल्या पायांकडे स्वामींनी बोट करून दाखवले. तेव्हा दिसले की त्यांच्या पायाला सूज आली आहे ते म्हणाले, 'श्रीदत्तमहाराजांवर प्रयोग झालेला आहे. हा प्रयोग उलटावावयाचा काय? ते श्रीदत्तमहाराजांना विचारावे.

श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'प्रतिकार करू नका, उलटवू नका. कारण प्रयोग करणाऱ्या व्यक्तीला त्रास होईल. फार फार तर प्रतिबंध करा.' केवढी ही दयाबुद्धी.

* ईश्वरार्पण वृत्ती

श्रीदत्तमहाराजांच्या मोतीबिंदूचे ऑपरेशन १९८० सालच्या आधी झाले. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे आणि अतिकडक वागण्यामुळे ते ऑपरेशन

बिघडले. श्रीमहाराजांना कमी दिसू लागले. तरीदेखील श्रीदत्तमहाराजांनी डॉक्टरांना दोष न देता, आपले प्रारब्ध म्हणून ते शांत बसले. केवढे हे उदार अंतःकरण ! केवढी ईश्वरार्पण वृत्ती, केवढी क्षमाशीलता.

श्रीदत्तमहाराजांच्या क्षमाशीलतेची कसोटी पहाणारा एक विलक्षण प्रसंग येथे सांगावासा वाटतो.

श्रीदत्तमहाराजांनी गोखले नगरचे आपले स्वतःचे घर एका अडलेल्या गरजू व्यक्तीला काही दिवसापुरते रहाण्यासाठी दिले होते. पण पुढे त्या व्यक्तीने आपला शब्द फिरविला. जागा सोडली नाही. उलट श्रीमहाराजांना त्रास देण्यास सुरुवात केली. परंतु क्षमाशील श्रीमहाराज त्याच्यावर रागावले नाहीत. त्याला असे न वागण्याबद्दल उपदेशपर सुंदर पत्र लिहिले. त्या पत्राचा शेवट असा केला, परमेश्वराच्या दरबारी आपण एक गरीब ब्राह्मणाला निष्कारण का छळले, याचे उत्तर देण्याची वेळ आपणावर येऊ नये व आपणास परमेश्वराकडे शिक्षा होऊ नये अशी श्रीपरमेश्वर चरणी आम्ही हात जोडून कळकळीची प्रार्थना करतो.'

तरीही त्या व्यक्तीच्या मनावर काही परिणाम झाला नाही. त्याने पोलीस चौकीवर जाऊन तक्रार करण्यास सुरु वात केली. एकदोनदा पोलीस चौकशी करून येऊन गेले. पुढे त्याने श्रीदत्तमहाराजांवर फिर्याद केली तेव्हा श्रीदत्तमहाराज न्यायालयात हजर राहू लागले. परंतु श्रीदत्तमहाराजांच्या मनाची समता ढळलेली कोणीही कधीही पाहिलेली नाही. कोर्टाचे समन्स घेऊन येणारा शिपाई अज्ञानामुळे वेडेवाकडे शब्द बोलला. पण श्रीदत्तमहाराजांच्या चेहऱ्यावरील गांभीर्य थोडेही ढळले नाही.

न्यायालयात त्यांना काही तास बसायला लागले. पण आश्रमात जितक्या गांभीर्याने ते बसत असत तितक्याच गांभीर्याने व शांतपणे ते न्यायालयातही बसले होते. पुढे न्यायालयाने सर्व गोष्टी लक्षात घेऊन श्रीदत्तमहाराजांचे घर त्यांना परत मिळवून दिले. तोपर्यंत श्रीदत्तमहाराजांच्या कुटुंबीयांना खूपच मनस्ताप झाला. पण श्रीदत्तमहाराजांच्या तोंडून त्या व्यक्तीबद्दल कधीही कटुता व्यक्त करणारा शब्द बाहेर पडला नाही. काय हा करुण भाव ! केवढी ही क्षमाशीलता !!

* समयसूचकता

कितीही अडचणीचा प्रसंग असला तरी असामान्य तितिक्षा आणि समयसुचकता दाखवून त्या प्रसंगातून वाट काढणे हे श्रीदत्तमहाराजांचे मोठेच वैशिष्ट्य होते. पुन्हा अशी वाट काढतांना ते कोणालाही दोष येणार नाही अशा पद्धतीनेच वागत असत. हा त्यांचा गुण प्रकर्षाने दाखविणारा एक प्रसंग सांगतो.

साधारण १५ वर्षापूर्वीचा काळ असेल. श्रीदत्तमहाराज आश्रमात उत्सव महोत्सवाच्या वेळी नित्य प्रसादास थांबत असत. त्यावेळी प.प.(परमहंस परिव्राजकाचार्य) श्रीटेंबेस्वामी महाराजांच्या फोटोखाली त्यांचे पान असे व त्यांच्या उजव्या हातास वयस्कर व परिचित व्यक्तींची पाने असत.

त्या दिवशी सर्व मंडळी आपापल्या पानावर बसली होती. परंतु एका परिचित व्यक्तीला बोलावणे पाठविण्याचे राहून गेले होते. त्यामुळे ती व्यक्ती आश्रमात प्रसादासाठी आलेली नव्हती. श्रीदत्तमहाराजांना ते समजले. त्या व्यक्तीला बोलावणे पाठवून घ्यायचे तर बराच वेळ लागला असता. इतर सर्व लोक आपापल्या पानावरती येऊन बसले होते. काही क्षणातच पंगत सुरू होणार होती.

श्रीदत्तमहाराजांनी मनाशी निश्चय केला की त्या व्यक्तीला बोलावून घ्यायचे व त्या व्यक्तीने प्रसाद घेतल्याशिवाय स्वतः प्रसाद घ्यायचा नाही. परंतु कोणतीही वाच्यता न करता ते शांतपणे पानावर बसले. संकल्प होताच पानाभोवती पाणी फिरविण्याचा, आहुत्या घालण्याचा श्रीदत्तमहाराजांनी इतका सुंदर अभिनय केला की लोकांना वाटले श्रीदत्तमहाराज जेवायलाच बसले.

सर्व मंडळींनी भोजनास सुरुवात करताच श्रीदत्तमहाराज एकदम उठले आणि आतल्या खोलीत जाऊन बसले तेव्हाच लोकांना समजले की श्रीदत्तमहाराजांनी भोजनाला सुरुवात करण्याचा केवळ अभिनय केला होता. परंतु पंगत एकदा सुरू झालेली असल्यामुळे सर्वांची जेवणे व्यवस्थित पार पडली.

श्रीदत्तमहाराज आपले ताट घेऊन स्वयंपाकघरात आले. तिथे आपले व त्या व्यक्तीचे पान मांडले व त्या व्यक्तीला बोलावणे पाठविले. ती व्यक्ती येईपर्यंत

श्रीदत्तमहाराज खिडकीजवळ उभे होते. ते दिसताच, 'या, बसा', असे म्हणून त्यांना पाट दाखविला. ती व्यक्ती बसताच त्यांच्या शेजारी श्रीदत्तमहाराज जेवायला बसले व सावकाश होऊ द्या, असे म्हणाले. त्या व्यक्तीबरोबरच श्रीदत्तमहाराजांनी जेवण घेतले. या सर्व प्रसंगात श्रीदत्तमहाराजांनी जी समयसूचकता दाखवली आणि कोणावरही प्रसंग येऊ दिला नाही हे पहाण्यासारखे आहे.

अनेक भक्तमंडळींचे लहान मोठे अपराध होत असत. परंतु श्रीदत्तमहाराज सर्वांचे अपराध पोटात घालून त्यांना उदार अंतःकरणाने क्षमा करत असत. याबाबतचा एक प्रसंग सांगावासा वाटतो. श्रीगुरूमहाराजांचे नुकतेच निर्वाण झाले होते. त्यांनी उत्तराधिकारी म्हणून श्रीदत्तमहाराजांना नेमलेले होते. एका दुसऱ्या भक्ताला स्वतः उत्तराधिकारी होण्याची इच्छा होती. म्हणूनच ते एकदा आश्रमात आले आणि श्रीदत्तमहाराज गादीवर बसलेले पाहून त्यांचे पित्त एकदम खवळले.

तावातावाने श्रीदत्तमहाराजांकडे वरच्या खोलीत गेले आणि मोठ्याने ओरडून म्हणाले, ''तुम्हाला गादीवर कोणी बसवले आहे.? उठा या गादीवरून ताबडतोब. तेथे मला बसायचे आहे.''

श्रीदत्तमहाराज शांतपणे त्यांना म्हणाले, 'तुम्ही बसा, आमची काहीही हरकत नाही; खाली देवापुढे चलावे, आपण दोघेही दत्तप्रभुंची प्रार्थना करूया आणि नंतर आपण या गादीवर येऊन बसावे.' खरोखरीच श्रीदत्तमहाराज त्या गादीवरून उठून मंदिरात श्रीदत्तप्रभुंच्या पुढे राहून हात जोडून उभे राहिले. परंतु ती व्यक्ती एकदम थंड झाली आणि काही न बोलता आश्रमातून निघून गेली.

असेच एकदा श्रीदत्तमहाराज वरच्या खोलीत बसले होते. समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या घुश्शातच श्रीदत्तमहाराजांच्यासमोर जाऊन त्यांना रागाने बोलू लागली. 'तुम्हाला काय समजतंय का?'

श्रीदत्तमहाराज शांतपणे म्हणाले, 'तुम्ही म्हणता आहात, ते अगदी बरोबर आहे, आम्हाला खरंच काहीही कळत नाही, आम्ही अजाण आहोत. आम्ही अज्ञानी आहोत.'

वरील दोन्ही प्रसंगातील उर्मट वक्तव्यावर जराही न रागावता शांत व दयाळू अंतःकरणाच्या श्रीदत्तमहाराजांनी त्या व्यक्तींना क्षमा केली. एवढेच नव्हे तर त्यांनी अपमान केलेला असूनसुद्धा श्रीदत्तमहाराजांनी सर्वकाही आत गिळून टाकले व तोंडातून एक अपशब्दही काढला नाही. त्याक्षणी तर श्रीदत्तमहाराजांनी क्षमा केलीच. परंतु त्यानंतर कधीही त्या व्यक्ती समोर आल्या तर श्रीदत्तमहाराजांनी त्या प्रसंगांची कधीही त्यांना आठवणही दिली नाही. केवढे हे उदार, क्षमाशील अंतःकरण !

* योग्य शब्दात समाधान करण्याची हातोटी

दहा-बारा वर्षांपूर्वी श्रीवामननिवासमध्ये एक सद्गृहस्थ 'स्पिरीच्युअल हिलिंग' या शास्त्राने रोग्यांचे रोग बरे करीत असत. लोकांना बरेवाईट अनुभव येत असत. ते गृहस्थ खाण्यापिण्याबाबत काळ-वेळ (ग्रहण) इत्यादीबद्दल कोणताच विधिनिषेध पाळत नसत. त्यांच्याबद्दल श्रीदत्तमहाराजांकडे तक्रारी गेल्या व त्यांचे हे उपचार बंद करण्याविषयी श्रीदत्तमहाराजांना लोकांनी विनंती केली.

श्रीदत्तमहाराजांनी त्या गृहस्थांना असा निरोप पाठवला - 'आजपर्यंत तुम्ही पुष्कळ रोग्यांवर उपचार केले आहेत; त्यामुळे तुमच्या कार्याची माहिती बऱ्याच जणांना झाली आहे. त्या कार्याचा प्रचारही पुरेसा झालेला आहे. तेव्हा यापुढील कार्य तुम्हास घरी करण्यास हरकत नाही.'

तसाच प्रसंग दोन तीन वर्षांपूर्वी पुण्यात घडला. गणपती दूध पितो अशी वार्ता सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली. श्रीदत्तमहाराज खाली हॉलमध्ये बसले होते. समोर बरीच भक्तमंडळी बसली होती.

एक महिला श्रीदत्तमहाराजांना तावातावाने सांगू लागली, 'महाराज, गावातले सर्व गणपती दूध पीत आहेत, तर आपल्या देव्हाऱ्यातील गणपती दूध पितो का, हे पहा. कोणाला तरी सोवळे नेसून देवघरात जायला सांगा.'

श्रीदत्तमहाराजांनी त्या महिलेचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि तिला म्हणाले, 'तुमच्या देव्हाऱ्यात गणपती आहे ना, त्याला प्रथम तुम्ही दूध पाजा. तुमचा गणपती दूध प्यायला की आम्ही आमच्या देव्हाऱ्यातील गणपतीला दूध पाजू.'

प्रश्नकर्त्या माणसाला न दुखवता, त्याचे समाधान करून त्याला परत पाठविण्याची श्रीदत्तमहाराजांची हातोटी काही वेगळीच होती.

श्रीदत्तमहाराज दौऱ्यावर गेले असतांनाचा हा प्रसंग. एक मोठा श्रीमंत भक्त. श्रीदत्तमहाराजांच्यावर अलोट प्रेम व भक्ती ! श्रीदत्तमहाराजांच्या पादुका नित्य पूजेत असाव्यात अशी त्याची तीव्र इच्छा. म्हणून त्याने आपल्या घरी श्रीदत्तमहाराजांच्या पाद्यपूजेचा घाट घातला. त्याकरिता चांदीच्या मोठ्या पादुका करून घेतल्या.

श्रीदत्तमहाराज पाद्यपूजेला जाताना आपल्याबरोबर प.पू.योगीराज गुळवणीमहाराजांच्या पादुका नेत असत. त्या पादुकांचीच पाद्यपूजा होत असे. त्या श्रीमंत भक्ताच्या घरी पाद्यपूजा सुरू झाली. प.पू.श्रीमहाराजांनी त्या भक्ताने तयार करून घेतलेल्या चांदीच्या पादुकांवर श्रीगुळवणीमहाराजांच्या पादुका ठेवण्यास सांगितले. त्या पादुकांची पंचामृती पूजा होऊन अभिषेक, आरती इत्यादी उपचार झाल्यावर प.पू.योगीराजांच्या पादुका पुसून बाजूला ठेवण्यात आल्या.

ही पूजा झाल्यानंतर तो श्रीमंत भक्त श्रीदत्तमहाराजांना म्हणाला, 'महाराज, आता तुम्ही मी तयार करून घेतलेल्या पादुका पायात घाला म्हणजे मला त्या नित्य पूजेत ठेवता येतील.'

श्रीदत्तमहाराजांनी त्याच्याकडे शांतपणे पाहिले व म्हणाले, 'अहो, तुम्ही आणलेल्या पादुका प्रत्यक्ष श्रीगुळवणीमहाराजांनी घातल्या आहेत. त्यांनी घातलेल्या पादुका आम्ही पुन्हा कशा घालणार?'

श्रीदत्तमहाराजांचे हे बोलणे ऐकून पाद्यपूजेला जमलेली मंडळी स्तिमीतच झाली. त्या भक्तालाही श्रीदत्तमहाराजांच्या या सांगण्यावर काही बोलताच येईना.

त्याचा भाव ओळखून श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'अहो, आमचे काय घेऊन बसलात, आता तर तुमच्या घरी योगीराज श्रीगुळवणीमहाराज आले आहेत.'

* वक्तृत्व

श्रीदत्तमहाराजांची विषयविवेचन करण्याची शैली समोरच्या श्रोतृवृंदावर अवलंबून असे. विषयवार न करता प्रसंग, वेळ, ठिकाण बघून श्रीमहाराज बोलत

असत. त्यामुळे समोरचे श्रोते विषयाशी पूर्णपणे एकरूप होऊन जात असत.

सिंहगडच्या पायथ्याशी कोंढणपूर म्हणून एक गाव आहे. तेथील दत्तमंदिराचा कळस प.प.श्रीगजानन-स्वामीमहाराज यांच्या हस्ते बसविण्यात आला. तेव्हा श्रीदत्तमहाराजांचे समोरच्या लोकांना उद्देशून भाषण झाले. त्या भाषणात नरवीर तानाजी मालुसरे, शिवाजीमहाराज, संतश्रेष्ठ श्रीतुकाराममहाराज व रामदासस्वामी यांचे राष्ट्रप्रेम व धर्मप्रेम कसे होते हे निरनिराळ्या उदाहरणांद्वारे श्रीदत्तमहाराज लोकांना सांगत होते. हे सांगतांना तुकाराममहाराजांचे अभंग व रामदासस्वामींच्या दासबोधातील ओव्याच्या ओव्या श्रीदत्तमहाराज म्हणून दाखवीत होते. धर्मावर निष्ठा असली म्हणजे आपोआपच देशप्रेम निर्माण होते हे विचार अतिशय साध्या व सोप्या भाषेत श्रीदत्तमहाराजांनी लोकांना पटवून दिले.

याउलट, श्रीगुरूदेव रानडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' या संस्थेच्या हॉलमध्ये श्रीदत्तमहाराजांचे व्याख्यान होते. व्याख्यानाला सर्व विद्वान मंडळी जमली होती. त्यावेळी न्याय, वेदान्त व तत्त्वज्ञान यांचे दाखले देत, श्रोत्यांना 'श्रीगुरूदेव रानडे याचे तत्त्वज्ञान' हा विषय श्रीदत्तमहाराज समजावून देत होते. संपूर्ण भाषण म्हणजे विद्वत्तेचे व विषयाचे सखोल ज्ञान असल्याचे एक द्योतक होते.

महान पंडित असूनही कोंढणपूरच्या भाषणात श्रीमहाराजांनी आपल्या पांडित्याची जरासुद्धा लोकांना कल्पना येऊ दिली नाही; तर ट्रेनिंग कॉलेजमध्ये मात्र पंडितांच्यासमोर पांडित्यपूर्ण भाषेत विषय विवेचन केले.

* आचारनिष्ठा

श्रीदत्तमहाराजांनी आयुष्यभर कटाक्षाने पाळलेली आचारनिष्ठा शेवटच्या क्षणापर्यंत पाळली. अखेरच्या आजारात प्रकृती अस्वास्थामुळे श्रीदत्तमहाराजांना संध्या करणे अशक्य झाले. आचमनाकरिता हातात घेतलेले पाणी तोंडापर्यंत पोहोचेचना. तेव्हा त्यांचे चिरंजीव श्री. अजितरावांनी त्यांनी संध्यावंदन न करण्यासाठी सुचविले.

यावर श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''पण संध्या नाही म्हणजे अन्न नाही.'' असे म्हणून श्रीदत्तमहाराज डोळे मिटून स्वस्थ पडून राहिले.

खरोखरीच श्रीदत्तमहाराजांना आजारपणामुळे उठून स्वतः स्नान करणे अशक्य झाले आणि स्नान न झाल्यामुळे संध्यावंदन करता येईना. तेव्हा त्यांनी घन आहार घेणे पूर्णपणे बंद केले. त्या दिवसापासून शेवटच्या क्षणापर्यंत श्रीदत्तमहाराजांनी अन्न घेतले नाही व मौन धारण केले.

केवढा हा आचारपालनाचा निश्चय ! श्रीदत्तमहाराजांचे संपूर्ण जीवन आचारधर्माचा मूर्तीमंत आदर्श होता.

सद्गुरू श्रीदत्तमहाराजांना कोटी कोटी प्रणाम !

***

साधकांचे अनुभव

(श्रीदत्तमहाराजांच्या काही भक्तांचे निवडक अनुभव व आठवणी पुढे दिलेल्या आहेत. यापैकी काही अनुभव अतींद्रिय पातळीवरचे आहेत. साधुसंतांजवळ काही अतींद्रिय शक्ती असतात आणि त्यांच्या कृपेने साधकांच्या अंतःकरणाची शुद्धी होऊन त्यांना अनेक अतींद्रिय अनुभव येतात असे उल्लेख जगातील बहुतेक सर्व धर्मग्रंथात आढळतात. संतांच्या कृपेमुळे साधकांच्या मनातील अहंकार कमी कमी होत जातो आणि रागद्वेष वगैरे विकारही कमी कमी होत जातात. आध्यात्मिक वाटचालीत विशिष्ट टप्प्यापर्यंत आल्यावर साधकांना अतींद्रिय अनुभव प्राप्त होतात आणि त्यामुळे गती मिळते असे दिसते.

भारतीय अध्यात्मशास्त्र असे सांगते की, ईश्वरकृपेनेच माणसाची आध्यात्मिक वाटचाल होत रहाते आणि शेवटी तो साधक ईश्वरस्वरूपच होऊन जातो. अध्यात्मसाधना करावी असे खूप लोकांना वाटते. त्यातील बहुतेक लोकांना सद्गुरूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे थोडीफार आध्यात्मिक वाटचाल करणे शक्य होते. परंतु त्यापैकी फारच थोड्या साधकांना अंतिम अवस्था म्हणजे ईश्वराशी एकरूप होण्याची शक्यता प्राप्त होते. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे ईश्वरीशक्ती स्वतःच अवतीर्ण होऊन धर्मजागरणाचे काम करीत असते. असे महापुरुष अगदी बालवयापासून ईश्वरीशक्तीशी एकरूप असतात. फारशी साधना न करताही त्यांना अनेक अतींद्रिय शक्ती प्राप्त झालेल्या दिसून येतात. अशा अवतारी पुरुषांना युगपुरुष असे म्हटले जाते. श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे अशा अवतारी पुरुषांपैकी एक आहेत. विसाव्या शतकांतील थोर संत असे त्यांचे वर्णन केले जाते. त्यांच्याच कृपेने अनेक साधकांची आध्यात्मिक प्रगती होऊन त्यांना अतींद्रिय अनुभव प्राप्त झालेले आहेत. यापैकी काही निवडक प्रातिनिधीक अनुभव पुढे दिले आहेत.

हे अनुभव आणि आठवणी निवेदन करणारे सर्व भक्त जबाबदार व्यक्ती आहेत. बहुतेक सर्वजण उच्चविद्याविभुषित आहेत व दीर्घकाळ साधनेत रंगलेले आहेत. या अनुभवांचे श्रेय सर्वस्वी सद्गुरूंचे आहे या श्रद्धेने आपले

नाव प्रकट न करण्याची बहुतेक सर्व भक्तांची इच्छा आहे. म्हणूनच कोणत्याच भक्ताचे नाव येथे प्रकट केलेले नाही. सर्व भक्तांनी हे अनुभव जसे जाणवले तसे जास्तीतजास्त प्रामाणिकपणे निवेदन केले आहेत व आम्हीही तितक्याच प्रामाणिकपणे ते तसेच वाचकांपुढे मांडलेले आहेत.

हिरण्ययोग (स्वप्नयोग) *या नावाने आध्यात्मिक साधनेतील स्वप्नांचे महत्त्व विशद करणारे विचार काही संतांनी मांडले आहेत.*

काही पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ असे सांगतात की स्वप्न म्हणजे जागेपणी मनांत आलेल्या विचारांचे प्रतिबिंब. म्हणून सर्व स्वप्ने मिथ्याच असतात.

भारतीय मानसशास्त्रज्ञ मात्र असे मानत नाहीत. भगवान पतंजलींनी "स्वप्ननिद्रावलंबनाद्वा" असे योगसूत्र सांगितले आहे.

अनेक संत सांगतात की स्वप्नांतील इतर सर्व पदार्थ कल्पित असतात. परंतु स्वप्नामध्ये दिसलेले भगवंत श्रीगुरू किंवा सत्पुरुष ही मनाची कल्पना नव्हे. जागृती व स्वप्न यांना आधार ईश्वरच असतो म्हणूनच ईश्वर जागृतीत जसे दर्शन देऊ शकतो तसेच स्वप्नांतही दर्शन देऊ शकतो. जग मिथ्या आहे परंतु भगवंत मिथ्या नाहीत. स्वप्नांत घडलेले भगवंताचे दर्शनही सत्यच आहे कारण इच्छा असली म्हणजे ते स्वप्नांत प्रगट होत नाहीत. गुलाबरावमहाराज म्हणतात.

सत्ताद्वयवादात स्वप्न जागृत समान ।
त्या स्वप्निक भगवद्दर्शनहि तीव्र संवेगू ॥

श्रीगुलाबरावमहाराजांनी हिरण्ययोग या ग्रंथात आध्यात्मिक विकासांतील स्वप्नांचे महत्त्व स्पष्ट केले आहे आणि स्वप्नयोग-प्रक्रिया सांगितली आहे. रामकृष्ण मिशननेही स्वप्नयोग या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध करून हाच विषय विस्ताराने मांडला आहे.

संतांचे हे विचार लक्षात घेतले म्हणजे स्वप्नामध्ये सद्गुरूंचे दर्शन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे दिसून येते. पुढे दिलेल्या सर्व स्वप्नांचा त्या त्या संबंधित साधकांच्या आध्यात्मिक विकासावर सखोल परिणाम झालेला आहे. हे लक्षात घेऊनच या स्वप्नांकडे पाहिले पाहिजे.)

१. समोरच्या भक्ताच्या मनांतील विचार ओळखून मार्गदर्शन

मुंबईचे एक भक्त मे १९७८ पासून सातत्याने श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला येत आहेत. १ एप्रिल, १९८० मध्ये त्यांनी महाराजांच्या अतींद्रिय शक्तीचा एक अनुभव स्वतः जो अनुभवला तो असा आहे. ते मुंबईहून सकाळीच वासुदेवनिवासमध्ये महाराजांच्या दर्शनाला आलेले होते. दुपारी श्रीदत्तमहाराज आलेले पत्रे वाचून त्यांना उत्तरे लिहोत होते. समोरच मुंबईहून आलेले भक्त बसले होते. त्यांना श्रीदत्तमहाराजांच्या पूर्वजीवनाची आणि श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची फारशी माहिती नव्हती. त्यामुळे त्यांचे मन श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीत निरनिराळे तर्क करण्यातच दंग होते. नुकतेच त्यांनी पॉल ब्रँटन या सुप्रसिद्ध ब्रिटीश विचारवंताचे एक पुस्तक 'भारतीय आध्यात्मिक रहस्याच्या शोधात' वाचले होते. महाराज पत्रांची उत्तरे लिहिण्याच्या कामात दंग असतांनाच मुंबईच्या त्या भक्ताच्या मनात विचार आला, श्रीदत्तमहाराजांनी वेदान्त आणि धर्मशास्त्र यावरील अनेक संस्कृत ग्रथ वाचलेले असतील. पण त्यांना पॉल ब्रँटन यांचे हे पुस्तक वाचायला मिळाले असल्याची शक्यताच नाही. कारण मूळ पुस्तक इंग्रजीत आहे आणि त्या पुस्तकाचा मराठी अनुवादही नुकताच प्रसिद्ध झाला असला तरीही त्याचा फारसा गाजावाजा झालेला नाही.

हा विचार त्या मुंबईच्या भक्ताच्या मनात आला आणि त्याच क्षणी खाली मान घालून शांतपणे पत्रांची उत्तरे लिहिणाऱ्या श्रीदत्तमहाराजांनी आपली मान वर केली. क्षणभर त्या मुंबईच्या भक्ताकडे रोखून पाहिले आणि पुन्हा खाली मान घालून पत्र लिहायला सुरुवात केली.

मुंबईच्या त्या भक्ताला श्रीदत्तमहाराजांच्या कृतीचा काहीही अर्थ समजला नाही. तो तसाच श्रीदत्तमहाराजांबद्दल, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल विचार करीत राहिला.

हातातील पत्र लिहून झाल्यावर श्रीदत्तमहाराजांनी लिहून झालेले पत्र आणि आपले लेखनसाहित्य मांडीवरून उचलून खाली ठेवले आणि मुंबईच्या त्या भक्ताकडे बघून त्यांनी सहजपणे बोलायला सुरुवात केली. त्यांच्या पहिल्याच प्रश्नाने तो भक्त एकदम हादरून गेला. त्यानंतर श्रीदत्तमहाराजांशी

झालेले संभाषण त्या मुंबईच्या भक्ताने पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

श्रीदत्तमहाराज - काय तुमचे पॉल ब्रँटन काय म्हणतात?

मी - (क्षणभर मी इतका भांबावलो की मला काय बोलावे ते सुचेचना. नंतर स्वतःला सावरून म्हटले) महाराज, पॉल ब्रँटन इथे पुण्याला मेहेरबाबांकडे येऊन चार दिवस राहिला. पण मेहेरबाबांकडून त्याला अपेक्षित असे काहीच ज्ञान मिळाले नाही. त्याच्या म्हणण्याप्रमाणे मेहेरबाबांचे काही खरे नव्हते. तो चार दिवस राहून परत गेला.

श्रीदत्तमहाराज- तुम्ही गोंदवलेकर-महाराजांचे चरित्र वाचले आहे का?

मी - हो.

श्रीदत्तमहाराज - गोंदवलेकर-महाराज गुरूच्या शोधात बाहेर पडले. प्रथम साईबाबांकडे गेले. पण बाबांनी त्यांना सांगितले, तुझा गुरू मी नाही वगैरे. तिथून ते अक्कलकोट स्वामींच्याकडे गेले. स्वामींनीही त्यांना तेच सांगितले. शेवटी ते हूमणाबादला माणिक प्रभूंच्याकडे गेले. माणिक प्रभूंनीही त्यांना सांगितले, बाबा, तुझा गुरू मी नाही म्हणून परत पाठवले, त्यांची गोंदवलेकर महाराजांना ज्ञानदीक्षा देण्याची योग्यता नव्हती का? तसं नाही. त्याचा अर्थ इतकाच की त्यांचे काम तुकाईंकडेच व्हायचे होते. हे सगळे ठरलेले असते. पॉल ब्रँटन यांना मेहेरबाबांचा काही अनुभव आला नाही याचा अर्थ इतकाच की त्याचे काम मेहेरबाबांकडून करण्याची नियतीची इच्छा नव्हती. पॉल ब्रँटन भारतभर खूप हिंडले. अनेक सत्पुरुषांना भेटले. साधुपुरुषांशी त्यांनी चर्चा केली. पण त्यांना हवी ती अनुभूती झाली नाही. याचा अर्थ ते सगळे सत्पुरुष कमी होत असे नाही. तेच पॉल ब्रँटन अरुणाचलमवर गेले आणि तेथे रमण महर्षींनी त्यांना आत्मसाक्षात्कार घडवला. याचा अर्थ पॉल ब्रँटन यांचे गुरू रमण महर्षी होते.

श्रीदत्तमहाराजांनी किती कुशलतेने माझे अज्ञान दूर केले आणि पुढे देखील कोणत्याही सत्पुरुषांबद्दल आपण कसे जपून बोलले पाहिजे याची शिकवणच दिली.

२. मुंबईचे एक भक्त सांगतात

मुंबईचे एक भक्त लहानपणापासून अनेक वर्षे महाराजांच्या दर्शनाला येत आहेत. महाराजांच्या सहवासात दीर्घ काळ राहिले आहेत. ते सांगतात, श्रीमहाराज कोणतीही गोष्ट करतात किंवा करण्यासाठी सांगतात त्यामागे एक विशिष्ठ हेतू असतो. त्यांची कोणतीही गोष्ट विचारपूर्वक केलेली असते. पण श्रीमहाराजांचा तो हेतू आपल्या कधीच लक्षात येत नाही म्हणून त्यांनी सांगितलेली गोष्ट ताबडतोब कसलाही विचार न करता त्यांनी सांगितले तशीच करून टाकावी. या बाबतीत माझे अनुभव सांगतो.

१) अशीच दुपारची वेळ होती. जेवायला थोडासा वेळ होता. मी स्नानसंध्या आटोपली होती. मला अजितकाकांकडे काही कामाकरिता जायचे होते. तेव्हा मी कपडे घातले, महाराजांना नमस्कार केला व जरा काकांकडे जाऊन येतो असे सांगितले. त्यावर महाराजांनी मला प्रश्न केला, तुमची गाडी घेऊन जाणार का? तेव्हा मी म्हणालो, 'नाही. संदीपची गाडी आहे. तो मला त्यांच्या गाडीवर मागे बसवून घेऊन जाईल.' त्यावर महाराज काहीही बोलले नाहीत. त्यांनी माझ्याकडे पाहून न पाहिल्यासारखे केले. मला याचा काहीही अर्थबोध झाला नाही. महाराजांना होय म्हणायचे आहे का नाही म्हणायचे आहे, हे मला कळेना. आपले उत्तर महाराजांना आवडले नसल्याचे मला जाणवले. पण मी घाईत असल्यामुळे फारसा विचार न करता बाहेर आलो आणि संदीपला घेऊन गाडीजवळ आलो. तेव्हा आमच्या लक्षात आले की गाडीचे मागचे चाक पंक्चर झाले आहे. तेव्हा मी परत आत आलो आणि महाराजांना नमस्कार करुन मी स्वतःची गाडी घेऊन जात असल्याचे सांगितले. महाराज म्हणाले, 'हो, आम्हीही तेच सांगितले होते.'

२) परवाचीच गोष्ट आहे. मी संध्या करीत बसलो होतो. महाराज बाहेर बसले होते. महाराजांची संध्या वगैरे झाली होती आणि भोजनाच्या ठिकाणी महाराज बसले होते. भोजनाचे ताट आणायचं होतं. ते नुसतेच टेकून बसले होते. तेवढ्यात ते एकदम म्हणाले, 'अरे, जा ते बाहेरचे दार लावून ये.' आम्ही बाहेर जाऊन पाहिलं, तर खरंच बाहेरचं दार उघडं होतं. लगेच मी

कडी लावून आलो. आत बसलेल्या महाराजांना एकदम बाहेरचे दार उघडे राहिले आहे हे आत बसूनच कसे कळले याचाच मी विचार करीत राहिलो. तेव्हा महाराज म्हणाले, 'अहो, दार उघडं टाकत जाऊ नका.'

३) दुपारची गोष्ट. गोष्ट अशी झाली की सकाळी एक मनिऑर्डर आली. मी मनिऑर्डर घेऊन ती देवाजवळ जाऊन महाराजांच्या पाटापाशी ठेवली. आमच्यापैकी कुणालाच माहिती नव्हतं ती मनिऑर्डर कुणाची आहे. ती नुसती तेथेच पडली होती. डॉ.अशोकमहाराजानी सांगितलं की ही मनिऑर्डर आजोबांना दे. डॉ.अशोकमहाराजांनी कोणाची तरी मनिऑर्डर आहे हे बघितले होते, पण कोणाची आहे हे त्यांनी बघितले नव्हते. महाराज संध्या करीत होते. 'कोणाची आहे ती?' महाराजांनी विचारले. या प्रश्नाचे उत्तर कोणीच देऊ शकले नाही. कारण मनीऑर्डर कोणाची आहे हे माहिती नव्हते. कोणीच उत्तर देत नाही हे पाहून महाराज स्वतःच म्हणाले, 'काय देवळ्यांची आहे काय?' नंतर कळलं की, ती देवळ्यांचीच मनिऑर्डर होती.

४) कित्येक वेळेला असंही होतं की येणारी सर्व भक्तमंडळी मनामध्ये ठरवून येतात की महाराजांना आपण अमुक प्रश्न विचारायचा. पण तो प्रश्न विचारायच्या पूर्वीच महाराज त्याचं उत्तर आपल्या बोलण्यातून सांगून टाकतात.

कधी कधी असं होतं की आपल्या मनात अनेक प्रश्न घर करून असतात. ते महाराजांना गेल्यावर प्रश्न विचारायचे असे आपण ठरवतो. पण महाराजांपुढे विचारण्यासाठी नेमकी सुरुवात कशी करायची हे आपल्याला कळत नाही. अशा वेळी महाराजच सुरुवात करून देतात, 'हं, बोला ! काय म्हणताय?' त्यांनी तेवढी जरी सुरुवात करून दिली तरी आपल्याला ती पुरते.

५) माझ्या आईने महाराजांबद्दलचा एक अनुभव मला सांगितला तो असा. महाराजांची एक मुलगी होती. शोभा हे नाव होतं तिचं. ती मुलगी जेव्हा आजारी होती तेव्हा महाराज वाडीला होते. ज्या दिवशी तिची प्राणज्योत मालवली तेव्हा महाराजांना तिकडे स्वप्न पडल. त्यांच्या घरात एकदम काळी दिसणारी माणसं शिरली आणि त्यांनी जाऊन देवाला स्पर्श



सौ. कल्याणी नामजोशी यांनी प्रवचन संपन्न केल्यानंतर
श्रीदत्तमहाराजांचा आशीर्वाद घेतांना



श्रीदत्तमहाराज - विवेक चूडामणी या ग्रंथावर निरूपण करतांना



श्रीदत्तमहाराज

(अंतर्लीन ध्यानमुद्रा)

केला. असं स्वप्न महाराजांनी पाहिलं आणि नंतर महाराजांना जाग आली. शोभा मावशी गेल्याचं त्यांना कळवलं त्याचवेळी महाराज म्हणाले, "हो, ज्यावेळी शोभामावशी गेली, नेमक्या त्याचवेळी मला असं जाणवलं. मला तसं स्वप्न पडलं लगेच." म्हणजे ते त्यांना आधीच कळलं होतं.

३. अनुग्रह घेतांना आलेला अनुभव

एका साधकाला जेव्हा श्रीदत्तमहाराजांनी अनुग्रह दिला तेव्हा त्यांनी त्याच्यावर कशी कृपा केली हे पाहण्यासारखे आहे. त्या साधकाला बसायला सांगितले. सकाळी लवकर उठून स्नान करून तो साधक बैठकीला ध्यानमंदिरामध्ये जाऊन बसला. एका क्षणात तो सर्व जग विसरून गेला. श्रीदत्तमहाराजांचे तो चिंतन करू लागला. श्रीदत्तमहाराजांची तो प्रार्थना करु लागला. भोवतालच्या जगाचा त्याला पूर्ण विसर पडला. त्याचे डोळे मिटलेले असतांनाच त्याला असे दिसले की श्रीगुळवणीमहाराज समोर उभे आहेत. ते चालत चालत साधकाच्या समोर काही क्षण उभे राहिले. काही पावले इकडे तिकडे टाकून पुन्हा ते साधकासमोर असलेल्या श्रीगुळवणीमहाराजांच्या फोटोसमोर मध्ये जाऊन तेथे नाहीसे झाले.

बैठक चालू असतांना एका तासांत श्रीगुळवणीमहाराजांचे असे दर्शन त्या साधकाला चार वेळेला घडले. सात वाजता त्याने बैठक संपविली आणि तो अतीव आनंदाने श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला त्यांच्या घरी गेला. श्रीगुळवणीमहाराजांचे दर्शन चार वेळा घडले असे त्या साधकाने श्रीदत्तमहाराजांना सांगितले. श्रीदत्तमहाराज फक्त अर्थपूर्ण हसले. त्यांनी त्या अनुभवावर काहीही भाष्य केले नाही.

काही दिवसांनी त्या साधकाला सौ.ताईमहाराजांचे दर्शन घेण्याचा योग आला. श्रीदत्तमहाराजांनी दीक्षा दिली, तेव्हा बैठकीला बसलो असतांना, श्रीगुळवणीमहाराजांचे चार वेळा दर्शन झाले असे त्या साधकाने सौ.ताईमहाराजांना निवेदन केले. त्यावर हसून ताईमहाराज म्हणाल्या, "ते श्रीदत्तमहाराज स्वतःच होते. आश्रमात श्रीदत्तमहाराज स्वतःच्या रूपात कसे बरे दर्शन देतील? त्यांनी श्रीगुळवणीमहाराजांच्या रूपात तुम्हाला दर्शन दिले. बैठकीच्या वेळी हे दर्शन तुम्हाला झाले यात तुमचे फार मोठे पूर्वसुकृत आहे."

४. आश्रमात वास्तव्य करीत असतांना आलेला अनुभव

पुढे काही दिवसांनी साधकाला श्रीदत्तमहाराजांनी आश्रमात राहून साधना करायला सांगितले. तो साधक रात्री ध्यान मंदिराच्या समोरच्या खोलीत एकटाच झोपत असे. त्या वेळेला उत्सव वगैरे नसल्यामुळे कोणी साधक आश्रमात रहात नव्हते. सुमारे दहा दिवस तो साधक आश्रमात राहिला. अनेक वेळा रात्री त्या साधकाला जाग येत असे, भोवताली कुणीतरी चालते आहे, पावलांचा स्पष्ट आवाज ऐकू येत आहे असे त्याला जाणवे. पण कोणी दिसत नसे. तो उठून दिवा लावून पाही. पण कोणीच व्यक्ती दिसत नसे. खिडकीतून बाहेर पाहिल्यानंतरही कुणीच दिसत नसे. असा प्रसंग जवळ जवळ रोज रात्री घडत असे. कोणी चालल्याचा आवाज येत आहे परंतु कोणी दिसत तर नाही. असे पाहूनही त्याला भिती अशी कधी वाटली नाही. उलट त्याचे मन अतीव आनंदाने भरून जात असे.

काही दिवसानंतर त्याला सौ.ताईमहाराजांच्या दर्शनाला जालना येथे जाण्याचा योग आला तेव्हा त्याने आपल्याला आलेला अनुभव सौ.ताईमहाराजांना सांगितला. तेव्हा त्या म्हणाल्या, "अहो, ते श्रीदत्तमहाराजच होते. त्या वास्तूत श्रीदत्तमहाराज नेहमीच दिवस रात्र फिरत असतात. ज्या साधकांचे पूर्वसुकृत चांगले आहे, त्यांनाच त्यांचे दर्शन होते. निदान पावलांचा तरी आवाज येतो. श्रीदत्तमहाराजांचे रात्री फिरणे तुम्हाला पावलांच्या आवाजाच्या रूपाने का होईना जाणवले यामागे तुमचे पूर्वसुकृत आहे. श्रीमहाराजांनी कृपा करण्यासाठीच हा अनुभव तुम्हाला दिला."

५. स्पर्शदीक्षेचा गूढ अनुभव

प्रतिकूल परिस्थिती असली, दुःख भोगावी लागली आणि अडचणी आल्या म्हणजे साधक विचार करायला लागतो. त्या अडचणींचा उपयोग करून आपली परमेश्वरावरील श्रद्धा वाढविता येते असे श्रीदत्तमहाराज अनेक वेळा सांगतात. किंबहुना आपल्या जीवनात आलेल्या अडचणी किंवा दुःखे ही जर आपण सोसली तर त्या तितिक्षेने प्रारब्धाचा नाश होतो आणि भगवंताकडे लवकर जाता येते असे श्रीदत्तमहाराजांनी अनेक वेळा भक्तांना सांगितलेले आहे. एका भक्ताच्या घरी बऱ्याच अडचणी होत्या. परंतु त्याने

ही गोष्ट श्रीदत्तमहाराजांसमोर कधीच काढली नाही. त्याची अशी श्रद्धा होती की महाराज अंतर्यामी आहेत. त्यांना सर्व कळतेच. त्यामुळे महाराजांच्या दर्शनालाच फक्त जायचे. परंतु आपल्या व्यवहारातील अडचणी किंवा संसारातील अडचणी श्रीदत्तमहाराजांना कधीही सांगावयाच्या नाहीत असे त्याने ठरविले होते.

पुढे एके दिवशी रात्री त्याला स्वप्न पडले. त्या स्वप्नात त्या साधकाला असे दिसले की, तेथे एक पलंग होता आणि त्या पलंगावर श्रीगुळवणीमहाराज झोपलेले होते. एवढ्यात एक वेडा मनुष्य त्या भक्ताच्या अंगावर धावून आला आणि काठी घेऊन त्या भक्ताला मारु लागला. तेव्हा तो भक्त धावत श्रीगुळवणीमहाराजांकडे गेला आणि त्यांना आर्ततेने म्हणू लागला, "महाराज, उठा, उठा. मला वाचवा." एवढ्यात श्रीदत्तमहाराज पुढे आले. त्यांनी त्या भक्ताला थांबवले आणि सांगितले, एवढ्या छोट्या गोष्टीसाठी श्रीगुरूमहाराजांना कशाला त्रास देता? सहन करा, प्रारब्धाचे भोग हे सहनच करावयाचे असतात. कोणतीही तक्रार न करता, सहन करीत रहा म्हणजे सर्व अडचणी आपोआप दूर होतील.

एवढे बोलून श्रीमहाराजांनी त्या भक्ताच्या कपाळावर भ्रुकुटीमध्ये आपल्या उजव्या हाताच्या मधल्या बोटाने स्पर्श केला आणि त्या भक्ताला स्वप्नामधेच अतीव आनंदाच्या आणि शांतीच्या लाटा उसळत आहेत असा अनुभव आला.

हे स्वप्न संपल्यावर जेव्हा तो जागा झाला, तेव्हा श्रीदत्तमहाराजांनी त्याच्या कपाळावर केलेला स्पर्श तसाच जागृत होता आणि त्याच्या हृदयात अपार शांती नांदत होती. श्रीदत्तमहाराजांनी आपल्याला सर्व सहन करायला सांगितले आहे. जर आपण सहन केले तर व्यावहारिक अडचणी आपोआपच दूर होतील या श्रद्धेने तो सारे सहन करीत राहिला. तक्रार करायची नाही, विलाप करायचा नाहो, चिंता करायची नाही आणि सर्व सहन करीत रहायचे या भूमिकेने तो वागत राहिला. हळूहळू त्याच्या अडचणी कमी होत गेल्या आणि श्रीमहाराजांनी त्याच्या कपाळावर जो स्पर्श केला होता तो स्पर्श सुमारे तीन महिने तसाच त्याला जाणवत राहिला. या काळात त्याला सतत

शांतीचा आणि समाधानाचा अनुभव येत होता. त्या साधकाने हा अनुभव जेव्हा सौ.ताईमहाराजांना निवेदन केला तेव्हा सौ.ताईमहाराज असे म्हणाल्या, ती एक स्पर्शदीक्षाच होती. अशी स्पर्शदीक्षा श्रीमहाराज निवडक साधकांनाच देतात. परंतु त्या स्पर्शदीक्षेमुळे त्या साधकाची आध्यात्मिक प्रगती झपाट्याने होते.

६. चरणस्पर्शाचा गूढ अनुभव

एक साधक महाराजांकडे जात राहिला. हळूहळू श्रीदत्तमहाराजांच्या कृपेने त्याला शांती व समाधान प्राप्त होऊ लागले. एकदा त्याला स्वप्नात आपण श्रीदत्तमहाराजांच्या घरी आहोत असे दिसले. तो श्रीदत्तमहाराजांच्या घरात वरच्या मजल्यावर बसला होता. तेथे परमपूजनीय सौ.आईसाहेब होत्या. त्याने प.पू. सौ.आईसाहेबांना सांगितले की, मी श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घ्यायला खाली जातो. परंतु प.पू. सौ.आईसाहेब म्हणाल्या, थांबा आणि तेवढ्यात तिकडून श्रीदत्तमहाराज जिना चढून वर येत आहेत असे त्याला दिसले. श्रीदत्तमहाराज जिना चढून पुढे आले. त्या साधकाने भावभक्तीने दुरून जमिनीवर श्रीदत्तमहाराजांच्या चेहऱ्याकडे पाहिले तेव्हा त्याला असे वाटले की, श्रीमहाराजांनी डोळ्याने आपल्याला त्यांच्या चरणांना स्पर्श करायची अनुमती दिली आहे. मोठ्या श्रद्धेने त्याने श्रीमहाराजांच्या चरणावर मस्तक ठेवले आणि तो मोठमोठ्याने प्रार्थना करू लागला. त्याला हुंदक्यावर हुंदके येऊ लागले आणि तो पुन्हा मला ब्रह्मपदी बसवा हीच प्रार्थना करू लागला. एवढ्यात हे स्वप्न संपले तरी त्याला असा अनुभव आला की त्याच्या कपाळाला महाराजांच्या चरणाचा जो स्पर्श झाला होता तो तसाच जागेपणातही त्याला जाणवत राहिला. तसेच ज्या तळमळीने, कळकळीने, रडत रडत त्याने प्रार्थना केली होती ती आर्तता तशीच त्याच्या मनात जागे झाल्यावरही टिकून होती.

श्रीदत्तमहाराजांच्या चरणांचा त्या साधकाच्या कपाळाला जो स्पर्श झाला होता तो स्पर्श त्या साधकाला अनेक आठवडे तसाच कपाळावर जाणवत राहिला. ही हकीकत जेव्हा त्या साधकाने सौ.ताईमहाराजांच्या पुढे निवेदन केली तेव्हा त्या म्हणाल्या, "अखंड अनुसंधान रहावे म्हणूनच

श्रीमहाराजांनी तुमच्यावर अशाप्रकारे कृपा केली आहे. श्रीदत्तमहाराजांचा स्पर्श सतत जाणवत राहिल्यामुळे भगवंताचे अखंड अनुसंधान रहाते. ते तसे रहावे यासाठीच श्रीमहाराजांनी तुम्हाला हा अनुभव दिला आहे."

७. न पाहिलेल्या घराचे अचूक वर्णन केले

श्रीमहाराजांना अतींद्रिय शक्ती पूर्णपणे प्राप्त झालेली असल्यामुळे त्यांना सर्व गोष्टी समजतात असे अनेक साधकांना जाणवले आहे. मुंबईत रहाणाऱ्या एका साधकाने मुंबईतच एक फ्लॅट विकत घेतला. त्यानंतर काही दिवसांनी तो पुणे येथे श्रीमहाराजांच्या दर्शनाला श्रीमहाराजांच्या घरी गेला. गेल्यावर त्यांना नमस्कार केला आणि श्रीमहाराजांना म्हटले, "महाराज, आपल्या कृपेने नवीन घर घेतले आहे." श्रीमहाराजांनी क्षणभर त्या साधकाकडे रोखून पाहिले आणि श्रीमहाराज म्हणाले, "होय घर चांगले आहे. उंचावर आहे. हवा आणि प्रकाश भरपूर आहे. वाराही चांगला आहे." जणू महाराजांना ते घर प्रत्यक्षच दिसत होते. मोठ्या भक्तीभावाने त्या साधकाने सांगितले की, महाराज, एक खोली देवघर म्हणून ठेवणार आहे. तेव्हा महाराज म्हणाले, "होय, त्या खोलीतच ध्यानाला बसत जा. चांगले आहे." महाराजांनी घर स्वतः कधीच बघितलेले नव्हते. तसेच इतर कुणीही त्याबाबतीत महाराजांना काही सांगितले असण्याचा संभव नव्हता.

८. अनाग्रही असूनही स्पष्ट व निश्चित मार्गदर्शन

महाराज सामान्यतः अनाग्रही भूमिकेमध्ये असतात. एखाद्या भक्ताने मी अमुक करू काय? असे विचारले तर महाराज नेहमीच स्पष्ट शब्दांत उत्तर देतातच असे नाही. व्यावहारिक गोष्टी या प्रारब्धाप्रमाणे घडत असतात. भक्ताने सद्गुरूच्याकडे पारमार्थिक गोष्टीबद्दल मार्गदर्शन विचारावे असे श्रीमहाराजांना वाटते. जर एखाद्या व्यक्तीने विशिष्ठ कार्यक्रम ठरवलेला असला तर तो बदलायला महाराज कधीही सांगत नाहीत. परंतु एखाद्या भक्तावर जर कृपा करावयाची असेल तर त्याच्या श्रद्धेला प्रतिसाद म्हणून महाराजांनी आग्रही भूमिकेतून कार्यक्रम बदलायला सांगितल्याचीही काही उदाहरणे आहेत.

एक मुंबईचे भक्त रजा घेऊन सिमला येथे तीन आठवड्याच्या सुट्टीसाठी जाणार होते. त्यांनी रेल्वेची तिकीटेही काढली होती आणि सिमला येथे हॉटेलमध्ये कुटुंबीयांसाठी दोन खोल्याही आरक्षित केल्या होत्या. तसेच दिल्लीहून सिमल्याला जाण्यासाठी टॅक्सीचीही व्यवस्था करून ठेवली होती. त्यांनी सहज म्हणून पुण्याला आदल्या दिवशी फोन केला आणि डॉ.अशोकमहाराजांना सांगितले की महाराजांच्या कानावर घालावे की मी तीन आठवड्याची रजा घेऊन कुटुंबीयांसाठी सिमल्याला जाणार आहे. तेव्हा डॉ.अशोकमहाराज त्यांना म्हणाले, "आपण थांबा, मी महाराजांना विचारून सांगतो." ते महाराजांकडे गेले आणि त्यांनी महाराजांना सांगितले की अमुक अमुक व्यक्तीचा फोन आहे आणि त्यांनी तीन आठवड्यासाठी सिमल्याला रजा घेऊन जाण्याचे आपल्या कानावर घालायला सांगितले आहे. तेव्हा महाराज एकदम म्हणाले, "त्यांना म्हणावे, नका जाऊ, कशाला जायचे? उद्या दुपारपर्यंत त्यांनी पुण्याच्या आश्रमात यावे असा निरोप त्यांना सांगावा."

डॉ.अशोकमहाराजांनी ताबडतोब येऊन फोनवर ही महाराजांची आज्ञा त्या भक्ताच्या कानावर घातली. कुटुंबीयांची नाराजी, रेल्वेची तिकीटे रद्द करण्यातील आर्थिक नुकसान, हॉटेलचे आरक्षण वगैरे विचार भक्ताच्या मनात गेले. परंतु ज्याअर्थी महाराजांनी स्पष्टपणे आज्ञा दिली आहे तेव्हा त्या आज्ञेने पालन करण्यातच आपले हित आहे, या श्रद्धेने त्याने जाण्याचा बेत रद्द केला, कुटुंबीयांची नाराजगी सहन केली. वेगळा कार्यक्रम आखून कुटुंबीयांना दुसरीकडे जायला सांगितले आणि दुसऱ्या दिवशी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे तो आश्रमात येऊन हजर झाला.

आश्रमात त्याने महाराजांचे दर्शन घेतले. श्रीदत्तमहाराज काही कार्यक्रमाकरिता आश्रमातच आलेले होते. श्रीदत्तमहाराजांनी त्या भक्ताला भोजन करावयाला सांगितले. आश्रमात रहाण्याची व जेवण्याची त्या भक्ताची पहिलीच वेळ होती.त्याने भोजन केल्यानंतर जेव्हा श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतले तेव्हा त्याला असे वाटले की महाराजांनी फक्त जेवायला किंवा फार तर एक दिवस आश्रमात रहाण्यासाठी बोलावले असेल.

आता कुठे जावे असा विचार करत करत त्याने श्रीदत्तमहाराजांना सांगितले,"कोल्हापूरला जाऊन अंबाबाईचे दर्शन घेण्यासाठी उद्या जावे म्हणतो. जावे काय?"

क्षणभर श्रीदत्तमहाराजांनी त्या भक्ताकडे पाहिले आणि ते म्हणाले, "कोल्हापूरला सध्या फार गर्दी असेल."

तेव्हा त्या भक्ताने पुन्हा असे म्हटले, "वाडीला जाऊन श्रीयतिमहाराजांचे दर्शन घ्यावे अशीही मनात इच्छा होती, उद्या यतिमहाराजांच्या दर्शनाला वाडीला जावे काय?" श्रीदत्तमहाराजांनी त्या भक्ताकडे पुन्हा रोखून पाहिले व म्हणाले, "यतिमहाराज तेथे असतील की नसतील कोण जाणे?" पुन्हा केव्हातरी जाता येईल, आता मात्र दुसरीकडे कुठे जाऊ नये अशी श्रीदत्तमहाराजांची इच्छा आहे हे भक्ताच्या लक्षात आले. त्यानें श्रद्धापूर्वक नमस्कार करुन महाराजांना म्हटले, 'महाराज आश्रमात किती दिवस रहावे?' तेव्हा श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'पाहिजे तितके दिवस रहा.'

श्रीदत्तमहाराजांची अशी स्पष्ट आज्ञा झाल्यामुळे तो भक्त मोठ्या श्रद्धेने आश्रमातच राहिला. आश्रमात रहाण्याचे नियम किंवा पद्धत त्याला काहीच माहिती नव्हती. त्याने श्री.विद्याधर फडके आणि श्री.प्रसाद पाटणकर यांच्याकडून नियम समजावून घेतले आणि मौन पाळून दहा दिवस तो आश्रमात राहिला.

चारच दिवसांनी गुरूपौर्णिमा होती. म्हणून तो श्रीदत्तमहाराजांच्याकडे गेला आणि म्हणाला, "महाराज गुरूपौर्णिमेपर्यंत आश्रमातच राहिले तर बरे होईल ना? गुरूपौर्णिमेला आश्रमात आपले दर्शन होईल ना?"

श्रीमहाराजांनी एकदम स्पष्टपणे विचारले, "गुरूपौर्णिमेला जालन्याला जाणार काय?" तेव्हा श्रीदत्तमहाराजांचीच ही आज्ञा आहे, असे जाणून त्याने महाराजांना वंदन केले आणि तो म्हणाला 'होय, महाराज ! गुरूपौर्णिमेला जालन्यालाच जाईन' आणि त्यानंतर त्याने श्रीमहाराजांना विचारून गुरूपौर्णिमेला जालन्याला जायचा विचार ठरविला. सौ.ताईमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे तेथेही दहा दिवस राहून त्याने साधना केली. पुणे व जालना या ठिकाणी त्याने जे वास्तव्य केले या काळात श्रीमहाराजांनी त्या भक्ताचे आंतरिक जीवन उजळून टाकले.

९. एक आगळेवेगळे दर्शन

एकदा एक भक्त श्रीदत्तमहाराजांच्या घरी दर्शनाला गेला होता. श्रीमहाराजांनी त्याला आत बोलवले. महाराज जमिनीवर पसरलेल्या गादीवर बसलेले होते. भक्ताने श्रीमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला आणि उठून त्याने महाराजांच्या चेहऱ्याकडे पाहिले. श्रीदत्तमहाराजांचे दोन्ही डोळे सूर्यासारखे तेजस्वी, प्रखरपणे तळपत होते. श्रीमहाराज त्या प्रखर दृष्टीने भक्ताकडे पहात होते. श्रीमहाराजांच्या डोळ्यांकडे पाहून भर दुपारी तळपणाऱ्या सूर्याची आठवण भक्ताला झाली. तो क्षणभरही श्रीमहाराजांच्या डोळ्यांतील तेज सहन करू शकला नाही. त्याने लगेच मान खाली घातली व श्रीमहाराजांच्या पायावर स्थिर केली.

त्या भक्ताची सौ.ताईमहाराजांशी भेट झाली, त्यावेळी हे त्याने सौ.ताईमहाराजांना निवेदन केले. तेव्हा त्या म्हणाल्या, भगवंताने अर्जुनाला जसे विश्वरूप दाखवले तसेच हे दर्शन होते.

१०. अहेतुक प्रेमाचा वर्षाव

मुंबईच्या एका भक्ताची ही हकीकत आहे. ते आजारी झाले. त्यांना काय वाटले कोणास ठाऊक. त्यांनी ठामपणे मनाशी ठरवले की श्रीदत्तमहाराज जोवर औषध घ्यायला सांगत नाहीत तोवर औषध घ्यायचे नाही. डॉक्टरांनी दिलेली औषधे त्यांनी तशीच बाजूला ठेवून दिली. घरची मंडळी चिंतते पडली. त्यांनी त्या भक्ताला महाराजांच्या घरी फोन जोडून दिला. डॉ.अशोकमहाराज फोनवर आले. त्या भक्ताने फोनवर डॉ.अशोकमहाराजांना सांगितले की जोवर श्रीदत्तमहाराज औषध घ्यायला सांगत नाहीत तोवर मी औषध घेणार नाही.

डॉ.अशोकमहाराजांनी आंत जाऊन श्रीदत्तमहाराजांना सर्व निवेदन केले. श्रीदत्तमहाराजांनी डॉ.अशोकमहाराजांना सांगितले, "त्यांना उद्या साडेबारा वाजेपर्यंत पुण्याला आश्रमांत यायला सांगावे."

तो भक्त दुसऱ्या दिवशी साडेबारा वाजता आश्रमांत पोचला. श्रीमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला. श्रीमहाराज अत्यंत कोमल स्वरात

म्हणाले, "देहही देवाने निर्माण केला आहे. औषधही देवाने निर्माण केले आहे. मग देवाने निर्माण केलेले औषध देवाने निर्माण केलेल्या देहाला द्यायला काय हरकत आहे? श्रीवासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज औषध घेत नसत. आजारी पडले की नुसते पडून रहायचे बरे व्हायचे. पण ती फार वरची अवस्था झाली. आपण औषध घ्यायला हरकत नाही."

त्या शब्दांत एवढे प्रेम, करुणा आणि वात्सल्य भरलेले होते की ते शब्द ऐकून त्या भक्ताचे हृदय हेलावून गेले. त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. त्याने श्रीमहाराजांना पुन्हा साष्टांग नमस्कार घातला. श्रीमहाराज अत्यंत प्रेमभरल्या स्वरांत म्हणाले, 'आधी प्रसाद घ्यावा.'

तशाच भारलेल्या अवस्थेत तो भक्त आतल्या खोलीत गेला. आश्रमातील मंडळींनी पाट मांडला, ताट वाढून पुढे ठेवले. तो भक्त तसाच पाटावर बसला व जेवू लागला. बनियन व शर्ट काढावयाचे भानही त्याला राहिले नाही. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वहात होते. तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता.

वास्तविक आश्रमाचा नियम असा आहे की अंगातील शर्ट, बनियन काढून मगच जेवायला बसावे. भक्ताच्या त्या अवस्थेत आश्रमाच्या नियमांचा भंग झाला होता. परंतु भक्ताची ती भावविभोर अवस्था पाहून आश्रमांतील कोणी मंडळीनीही त्याला शर्ट व बनियन काढायला सांगितले नाही. ते त्याच्या ताटात पदार्थ बाढत गेले. तो भक्त तसाच भावविभोर अवस्थेत जेवत गेला. आपण काय खात आहोत याचे त्याला भानही नव्हते. जेवण करुन तो उठला. एवढ्यात श्रीमहाराजांनी परत बोलावणे पाठवले. श्रीमहाराज म्हणाले,"औषध घेतलेत का! घेतले नसेल तर आधी आमच्यासमोर औषध घ्या पाहू."

ते शब्द ऐकले आणि त्या भक्ताला वाटले,'हे प्रेम मिळाले. जीवन धन्य झाले. आता जीवनांत आणखी काही मिळवायचे राहिले नाही. याक्षणी मृत्यू यावा आणि महाराजांच्या समोरच जीवन संपावे.' ही हकीकत सांगताना तो भक्त पुन्हा तसाच हेलावून गेला. भावविभोर झाला आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. त्याला पुढे एक शब्दही बोलवेना.

११. 'पाय ठेवणारा कोण आहे?'

एका भक्ताच्या मुलाने त्याला विचारले, विश्वाच्या कणाकणांत परमेश्वर आहे. मग आपण जमिनीवर पाय ठेवतो. म्हणजे परमेश्वरावर पाय ठेवतो. यात परमेश्वराचा अपमान आपल्या हातून होत नाही कां ?

त्या भक्ताला या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. त्या मुलाने हा प्रश्न अनेकांना विचारला व कोणीच या पश्नाचे उत्तर देऊ शकले नाही. त्या मुलाने श्रीमहाराजांना हा प्रश्न विचारला तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता श्रीमहाराजांनी उत्तर दिले, "अहो, पण जमिनीवर पाय ठेवणारा तरी कोण आहे. तोही परमेश्वरच आहे ना? मग त्यांत अपमान कसा होईल?"

प्रश्न विचारणाऱ्या मुलाचे पूर्ण समाधान झाले.

१२. 'गुरूमहाराजांच्या खडावांना पदस्पर्श कसा करता येईल?'

हिंगोली येथे श्रीमहाराजांचे एक भक्त आहेत. त्यांना अशी इच्छा झाली की श्रीदत्तमहाराजांच्या चांदीच्या खडावा करून त्या देवघरांत ठेवाव्या, त्यांची रोज पूजा करावी. त्याप्रमाणे त्यांनी चांदीच्या खडावा करून घेतल्या. श्रीदत्तमहाराजांच्या पायाचा स्पर्श त्या खडावांना श्रीदत्तमहाराजांच्या पुढील भेटीत करून घ्यावा आणि मग त्या देवघरात पूजेसाठी ठेवाव्या असे त्यांनी ठरवले. श्रीदत्तमहाराज जेव्हा हिंगोलीला आले, तेव्हा त्यांनी श्रीदत्तमहाराजांना पाद्यपूजेसाठी घरी बोलावले आणि नव्याने बनवलेल्या चांदीच्या खडावांना पदस्पर्श करावा अशी प्रार्थना केली. श्रीदत्तमहाराज काही बोलले नाहीत. ते त्या भक्ताच्या घरी गेले. त्यांच्याबरोबर त्यांनी श्रीगुरूमहाराजांच्या पादुका नेल्या. पाद्यपूजेच्या वेळी श्रीदत्तमहाराजांनी भक्ताने नव्याने घडवलेल्या चांदीच्या खडावा आधी ठेवल्या, त्यावर श्रीगुरूमहाराजांच्या पादुका ठेवल्या व श्रीगुरूमहाराजांच्या पादुकांची पाद्यपूजा यथासांग करून घेतली.

सर्व आटोपल्यावर शेठजींनी त्या नव्याने बनवलेल्या चांदीच्या खडावा पुढे ठेवल्या व श्रीदत्तमहाराजांना त्या खडावांना पदस्पर्श करण्याची विनंती केली. तेव्हा श्रीदत्तमहाराज म्हणाले,'अहो काय बोलतांय काय?

श्रीगुरूमहाराजांनी त्या आताच पाद्यपूजेच्या वेळी पायांत घातल्या होत्या ना ! श्रीगुरूमहाराजांनी ज्या खडावा पायात घातल्या त्यांना आम्ही पदस्पर्श कसा काय करू शकतो? श्रीगुरूमहाराजांनी घातलेल्या या खडावा आपण देवघरात ठेवाव्या व त्यांची रोज पूजा करावी.'

श्रीदत्तमहाराजांचा हा युक्तिवाद ऐकून शेठजी निरुत्तर झाले.

१३. व्यक्तिगत देणगीही आश्रमांतच जमा केली

एक शेठजी आले होते. त्यांनी आश्रमाला काही देणगी दिली. त्या देणगीचा आश्रमाच्या व्यवस्थापकांनी स्वीकार केला आणि पावती दिली. त्यानंतर शेठजी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला गेले. शेठजींनी श्रीदत्तमहाराजांना व्यक्तिगत स्वरूपाची देणगी म्हणून १०,००० रुपये देण्याची इच्छा व्यक्त केली. श्रीदत्तमहाराजांनी सांगितले, 'आपल्याला काय द्यायचे ते आश्रमाला द्यावे आम्ही व्यक्तिगत देणगी स्वीकारू शकत नाही.'

शेठजी म्हणाले, 'मी आश्रमाला द्यायची ती देगणी दिलीच आहे. आता आपल्याला व्यक्तिगत देणगी द्यायची इच्छा आहे, ही दहा हजार रुपयांची रक्कम आपण व्यक्तिगत देगणी म्हणून स्वीकारायची कृपा करावी अशी प्रार्थना आहे.'

अनेक वेळा श्रीदत्तमहाराजांनी नकार देऊन सुद्धा शेठजींनी ती रक्कम उचलली आणि आश्रमाच्या कार्यालयात स्वतः जाऊन ती रक्कम व्यवस्थापकांच्या हातात दिली व शेठजींच्या नावाने त्या रक्कमेची पावती फाडायला सांगितली. तेवढ्यात शेठजी आश्रमाच्या कार्यालयात आले. श्रीमहाराजांनी काहीही न बोलता ती पावती शेठजींच्या हातात ठेवली.

तेव्हा शेठजी म्हणाले, 'हे काय महाराज, ही रक्कम आम्ही आपणांस अर्पण केली होती'. श्रीदत्तमहाराज शांतपणे म्हणाले, ''त्या रकमेचा आपणांस पाहिजे तसा विनियोग आपण केला, आम्हाला पाहिजे तसा विनियोग आम्हाला करता येणार नाही कां?''

शेठजींजवळ या श्रीमहाराजांच्या प्रश्नाला उत्तर नव्हते.

१४. अभंग स्वतः गाऊन दाखवला

एका भक्ताने असे ऐकले होते की श्रीदत्तमहाराज पूर्वी अभंग फार छान म्हणत असत. संत श्रीकृष्णदयार्णव यांनी रचलेला 'नारायण भज रे मानस' हा अभंग महाराजांना फार आवडत असे. व तो अभंग महाराज पारंपारिक चालीवर म्हणत असत असेही त्याला कोणीतरी सांगितले होते. त्या भक्ताला श्रीमहाराजांच्या तोंडून तो अभंग पारंपारिक चालीत ऐकावा अशी इच्छा झाली. पण महाराजांचे वय सत्त्याऐंशी वर्षांच्या पुढे गेलेले. त्यांना त्रास देणे मुळीच बरोबर नाही असे त्या भक्ताला वाटले.

तो भक्त डॉ.अशोकमहाराजांकडे गेला व त्यांना म्हणाला, 'नारायण भज रे मानस' हा अभंग पारंपारिक चालीने ऐकावा अशी खूप इच्छा आहे. श्री.सरजराव किंवा श्री.अजितराव यांना ती चाल माहित असेल. ते मला म्हणून दाखवतील का?'

डॉ.अशोकमहाराजांनी क्षणभर त्या भक्ताकडे रोखून पाहिले. त्या भक्ताची मनांतील इच्छा त्यांनी ओळखली. ते एकदम म्हणाले, 'महाराजांच्या तोंडून हा अभंग तुम्हाला ऐकायचा आहे का?'

तो भक्त एकदम गांगरून गेला. त्याला काय बोलावे हे कळेना. तो हो नाही असे काहीच म्हणाला नाही. डॉ.अशोकमहाराज एकदम म्हणाले, 'चला आत. महाराज म्हणून दाखवतील तुम्हाला तो अभंग.'

तो भक्त भारावलेल्या अवस्थेत आंत गेला. डॉ.अशोकमहाराजांनी श्रीमहाराजांना सांगितले आणि क्षणाचाही विलंब न लावता सत्त्याऐंशी वर्षांच्या श्रीदत्तमहाराजांनी तो अभंग पारंपारिक चालीत, पारंपारिक शैलीत तालासुरात आवश्यक ते आलाप घेत तल्लीन होऊन म्हणून दाखविला.

१५. समाधीचा अनुभव स्वप्नांत दिला

एका भक्ताला निर्विकल्प समाधी म्हणजे काय याचे कुतूहल होते. निर्विकार समाधी प्राप्त झाल्यावर 'अहं' शिल्लक रहातो काय, जाणीव शिल्लक रहाते काय असे प्रश्न त्याच्या मनात होते. एके दिवशी त्याला स्वप्न पडले. स्वप्नात त्याने पाहिले की सकाळचे साडेनऊ वाजले होते व तो

श्रीमहाराजांच्या घरी होता. घरांत सर्वजण, महाराजांचे चिरंजीव, सुना, नातवंडे वावरत होती. महाराजांनी त्याला बसायला सांगितले आणि एकदम त्याचे देहभान नाहीसे झाले. सर्व जाणीव लोपली. स्वप्नांतच त्याने असे पाहिले की महाराज त्याला जेवायला उठा म्हणून हाक मारीत होते तेव्हा त्याला जाणीव परत प्राप्त झाली. त्यावेळी दुपारचे अडीच वाजले होते. महाराजांच्या घरातील सर्व मंडळी, चिरंजीव, सुना व नातवंडे व स्वतः महाराज त्या भक्तासाठी जेवायचे थांबले होते. येथेच स्वप्न संपले. स्वप्नातच महाराजांनी त्या भक्ताला निर्विकल्प समाधीचा अनुभव दिला होता.

१६. विकारांच्या पलीकडे जाण्याचा अनुभव

एकदा एका भक्ताला असे स्वप्नांत दिसले की तो श्रीदत्तमहाराजांच्या घरी आला. श्रीमहाराज मांडी घालून बसले आहेत. त्या तेजस्वी सगुण रूपाचे दर्शन घेतांना त्याला खूप आनंद वाटला. एवढ्यात श्रीमहाराजांनी त्याला जवळ यायला खुणावले. तो अतीव आदराने श्रीमहाराजांच्या जवळ गेला. श्रीमहाराजांनी त्याच्या कपाळावर भ्रूमध्याच्या ठिकाणी बोटाने स्पर्श केला. तेव्हा त्याला एकदम सर्व विकारांच्या पलीकडे गेल्याचा, सर्व द्वंद्वांच्या पलीकडे गेल्याचा अनुभव आला. तो एकदम श्रीमहाराजांच्या आणखी जवळ गेला व त्याने आपले कपाळ श्रीमहाराजांच्या कपाळावर टेकले. त्यासरशी काही दिव्य अनुभूतींनी त्याचे शरीर व मन भरून गेले. तो जागा झाला तरी ती अवस्था तशीच कायम होती. विकारांच्या पलीकडे गेल्याचा हा अनुभव बरेच दिवस टिकला.

१७. दूरध्वनीवरून झालेले संभाषण

मुंबईच्या एका भक्ताने श्रीदत्तमहाराजांच्या घरी फोन केला. त्यावेळी श्रीमहाराजांच्या घरी नुकताच कॉर्डलेस फोन आला होता. त्या भक्ताचा आवाज ओळखून श्री. आमोद याचा फोन उचलला. सरळ श्रीमहाराजांच्या हाती दिला. श्रीमहाराजांनी विचारले, 'काय आहे?' फोनमध्ये पावसाळी हवेमुळे खरखर होती त्या भक्ताला श्रीमहाराजांचा आवाज ओळखू आला नाही. त्या भक्ताने विचारले, 'आपण कोण बोलता आहात ?'

क्षणार्धात उत्तर आले, 'दत्तात्रेय कवीश्वर' नेहमीच्याच शांत, सौम्य, ऋजु स्वरांत. भक्ताने आपला आवाज ओळखला नाही यांत आपला मान राखला गेला नाही असे काहीही त्या स्वरांत नव्हते. त्या भक्ताला शरमेने मेल्याहून मेल्यासारखे झाले. पण श्रीदत्तमहाराज काहीच झाले नाही अशा स्वरांत नेहेमीसारखेच बोलले व त्या भक्ताच्या घरच्या मंडळीची त्यांनी चौकशी केली.

१८. इतर व्यक्तींच्या माध्यमातून प्रेम

एक भक्त अतिशय गरिबीतून, खूप कष्टाने जीवनात वर आला होता. त्याला जवळचे नातलग फारसे नव्हते. त्यामुळे तो एक प्रकारे प्रेमाचा भुकेलेला राहिला होता. त्याला इतरांनी आपले कौतुक करावे असे वाटत असे. तो सौ.ताईमहाराजांकडे गेला असतांना सौ.ताईमहाराजांनी त्याच्या मनाची ही भूक ओळखली आणि त्या म्हणाल्या, 'जगात कोणी आपले कौतुक करावे असे का वाटावे? खरे कौतुक श्रीमहाराजच करतात. श्रीमहाराजांनी कौतुक केले की झाले. बाकीच्यांचे कौतुक काय करायचे आहे?'

यावर तो भक्त सौ.ताईमहाराजांना कळवळून असे म्हणाला, "ताईमहाराज माझ्या हृदयाची ही प्रेमाची भूक शमवणे फार कठीण आहे. मला इतरांचे प्रेम फार हवेसे वाटते." तेव्हा क्षणभर विचार करून सौ.ताईमहाराज म्हणाल्या, "ठीक आहे यापुढे तुम्हाला अशा प्रेमाची किंवा कौतुकाची गरज पडेल तेव्हा कोणीतरी तिसरी व्यक्ती समोर येऊन तुम्हाला त्या प्रसंगी आवश्यक वाटत असलेले प्रेम देईल किंवा तुमचे कौतुक करील. पण त्या वेळेला लक्षात ठेवा की ते प्रेम किंवा कौतुक श्रीमहाराजांनी तिसऱ्या व्यक्तीच्या रूपाने तुमच्याकरिता केलेले आहे. जर ती व्यक्ती पुन्हा तुम्हाला भेटली तर पुन्हा तेच प्रेम त्या व्यक्तीकडून मिळेल किंवा तेच कौतुक त्या व्यक्तीकडून अनुभवायला मिळेल, असे मात्र समजू नका. तसे बहुधा होणारही नाही, कारण ते कौतुक किंवा ते प्रेम त्या व्यक्तीने केलेले नसून श्रीमहाराजांनीच त्या व्यक्तीच्या माध्यमातून ते प्रेम केले याची जाणीव तुम्ही ठेवावी."

त्या भक्ताला फारच समाधान वाटले. हळूहळू त्याने तशा प्रकारची धारणा ठेवल्यामुळे आपल्या प्रेमाच्या तृष्णेवर मात करता आली आणि खरेखुरे वैराग्य तो मनामध्ये बाणवण्याचा प्रयत्न करू शकला.

१९. ध्यान कसे करावे याचे मार्गदर्शन

एका भक्ताने सौ.ताईमहाराजांना ध्यानासंबंधी विचारले. त्या संबंधीची प्रश्नोत्तरे झाली ती पुढे दिली आहेत. त्यावरून ध्यानाच्या वेळी काय करावयाचे असते ते लक्षात येईल.

भक्त :- 'ताईमहाराज, जेव्हा मी बैठकीला बसतो किंवा ध्यानाला बसतो तेव्हा काय करायचे? श्रीमहाराजांची प्रार्थना करायची की श्रीमहाराजांचे नामस्मरण करायचे कां साक्षीभावाने रहायचे?'

सौ.ताईमहाराज :- आपण काहीच करु शकत नाही. जे येईल ते. जे श्रीमहाराज करून घेतील ते.

भक्त :- ध्यानाच्यावेळी प्रार्थना करावीशी वाटते. श्रीमहाराजांची प्रार्थना केली तर चालेल ना ?

सौ.ताईमहाराज :- जे महाराज करून घेतील ते.

भक्त :- जेव्हा ध्यानाला बसतो तेव्हा अशी एक अवस्था येते की त्याला झोप म्हणायचे नाही किंवा काय म्हणायचे नाही हे कळत नाही?

सौ.ताईमहाराज :- जे होईल ते होऊ द्यायचे, आपले त्यात काही नाही. आपण त्यात काही करू शकत नाही. श्रीमहाराज जे करून घेतील ते फक्त आपण अनुभवयाचे असते.

भक्त :- हीच शांतीची अवस्था का ?

सौ.ताईमहाराज :- होय त्यातच शांती आहे. समाधान वाटतं ना त्यात आपल्याला? बसून रहायचं शांतपणे. जे महाराज करून घेतील ते आपण फक्त पहात रहायचं.

भक्त :- त्यावेळी जो शांतीचा अनुभव येतो, त्या शांतीचा परिणाम दिवसभर टिकेल काय?

सौ.ताईमहाराज :- 'हो ! नं टिकायला काय झाले?' श्रीमहाराजांचं सगळं सामर्थ्य आहे. आपण काही करायचं नाही. तेच सगळं करतात.

भक्त :- 'पहाटेच ध्यानाला बसावं का? कां इतर कोणत्या वेळी बसावं?'


सौ.ताईमहाराज :- 'असं काही नाही. जे जेव्हा जसं होईल तसं करायचं. ते असं काही ठरवून होत नसतं. जेव्हा श्रीमहाराज करायचं तेव्हा बरोबर करतात. ठरवून किंवा टाईम ठरवून असं महाराजांचे काही नसते. मागेपुढे जसे होईल तसे.जेव्हा होईल तसे असते. आपण काही नसतो. श्रीमहाराजांच्या इच्छेने सारं काही होत असते.

२०. अतींद्रिय शक्ती

समोरच्या माणसाच्या अंतरंगातील सर्व काही श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराज स्पष्टपणे पाहू शकतात आणि मनाने कोठेही जाऊन काहीही पाहून येऊ शकतात. हा अनुभव आल्याचे अनेक भक्त सांगतात.

एक भक्त नुकताच श्रीदत्तमहाराजांकडे यायला लागला होता. श्रीदत्तमहाराजांनी त्याला जालन्याला सौ.ताईमहाराजांच्या दर्शनाला पाठवले. पहिल्यांदा तो जालन्याला आला होता. श्रीदत्त आश्रमातच उतरला. सकाळी सौ.ताईमहाराजांच्या दर्शनाला गेला. त्यांना नमस्कार करून तो लीनतेने म्हणाला,"ताईमहाराज, एक निवेदन करायचं होत!" सौ.ताईमहाराज काहीच बोलल्या नाहीत. आपलं बोलणं सौ.ताईमहाराजांनी ऐकलं नसावं असं वाटून तो भक्त पुन्हा म्हणाला, "एक निवेदन करायचं होत !" एकदम सौ.ताईमहाराज म्हणाल्या, "काय सांगणार आहात? तुमच्या पूर्वायुष्यात तुम्हाला अनेक संतमहात्म्यांचा सहवास घडलाय, त्यांच मार्गदर्शन तुम्हाला मिळालंय हेच सांगणार आहात ना? पण मी जाऊन प्रत्यक्ष पाहून आले. मला तर तसे कोणीच दिसले नाही?"

तो भक्त आश्चर्यानं थक्क झाला. खरोखरच त्याला तेच सांगायचं होतं. सौ.ताईमहाराजांचे बोलणे ऐकून त्याचा कानावर विश्वासच बसेना. कोणीच तसे दिसले नाही हे सौ.ताईमहाराज का म्हणताहेत हे त्याला कळेना, तो लीनतेने म्हणाला, "पण ताईमहाराज स्वामीजी व महाराज मोठेच संत आहेत.



श्रीदत्तमहाराज



श्रीदत्तमहाराज
वाडीला जातांना
हास्यमुद्रा



सौ. आईसाहेब

आतपर्यंत त्यांचे खूप मार्गदर्शन मला मिळाले आहे." एकदम सौ.ताईमहाराज म्हणाल्या,"कशाला उगीच मोठेपणा देताय त्यांना? श्रीदत्तमहाराजांची तुमच्यावर कृपा झालीय. आता तुम्हीच त्यांना मार्गदर्शन करु शकाल !"

तो भक्त हे ऐकून विस्मित झाला. पण त्याला वाटलं सौ.ताईमहाराज उगीच कौतुकाने बोलताहेत झाले. कशाला प्रतिवाद करायचा म्हणून तो गप्प बसला.

दोन महिन्यांच्या कालावधीनंतर त्याने ताईमहाराजांकडे उल्लेख केलेल्या पहिल्या स्वामीजींना तो भक्त भेटायला गेला. ध्यानधारणेतील काही उच्च अनुभूतींसंबंधी बोलणे सुरू झाले आणि त्या भक्ताचे बोलणे ऐकून ते स्वामीजी म्हणाले,"मला या प्रकारच्या अनुभूतीचा अनुभव नाही." हे बोलून ते थांबले नाहीत. त्या अवस्थेबद्दल तेच त्या भक्ताला वेगवेगळे प्रश्न विचारू लागले आणि तो भक्त जे सुचेल ते बोलत गेला. शेवटी त्या स्वामीजींनी त्या भक्ताला नमस्कार केला आणि म्हणाले," गुरूकृपेने आपणांस बऱ्याच अनुभूती मिळाल्या आहेत असे दिसते. ऐकायला खूप बरे वाटले."

पुढे एक महिन्याच्या कालावधीनंतर तो भक्त ताईमहाराजांकडे उल्लेख केलेल्या दुसऱ्या महाराजांकडे गेला. तेथे ब्रह्मानंदासंबंधी बोलणे निघाले. ब्रह्मानंदाच्या अनुभवासंबंधी तो भक्त बोलू लागताच ते महाराज म्हणाले, "मला या अवस्थेचा अनुभव नाही." त्यांनी त्या अवस्थेबद्दल भक्ताला काही प्रश्न विचारून माहिती घेतली.

अशाप्रकारे सौ.ताईमहाराजांचे शब्द अक्षरशः खरे झाले.

२१. मार्गदर्शनातील सुसंवाद

श्रीदत्तमहाराजांकडे मार्गदर्शनासाठी येणाऱ्या भक्ताला श्रीदत्तमहाराज स्वतः मार्गदर्शन करीत त्याचप्रमाणे सौ.आईसाहेब, सौ.ताईमहाराज व डॉ.अशोकमहाराज यांचेकडून मार्गदर्शन मिळते. या चौघांच्या मार्गदर्शनात नेहमीच सुसंवाद असायचा, एकरूपता असायची. या चौघांनी वेगवेगळ्या वेळी एकेकट्याने मार्गदर्शन केले तरीसुद्धा चौघांकडूनही मिळालेले मार्गदर्शन एकाचवेळी, एकाच व्यक्तीने केले आहे असे वाटावे इतकी एकरूपता त्या

मार्गदर्शनात असते. अनेक भक्त अशा आठवणी सांगतात. आंतरिक पातळीवर हे चौघेही एकमेकाला संदेश पाठवत असावेत त्यामुळेच या मार्गदर्शनाने सुसंवाद होत रहातो.

एका भक्ताला श्रीदत्तमहाराजांनी १९९३ साली दीक्षा देतांना सांगितले श्रद्धा हेच अंतरंग साधन श्रेष्ठ आहे. ज्ञानाचा मार्ग फार अवघड आणि खूप वेळ लागेल असा आहे. श्रीदत्तमहाराजांनी अशाप्रकारे त्या भक्ताला श्रद्धा मार्गाने जायला सांगितले होते.

काही दिवसांनी तो भक्त सौ.आईसाहेबांकडे आपल्या प्रापंचिक गोष्टींबद्दल बोलत होता. तेव्हा सौ.आईसाहेब एकदम म्हणाल्या, 'तुमचा श्रद्धामार्ग. श्रद्धेनेच तुमचे होईल.'

त्यानंतर काही महिन्यांनी तो भक्त डॉ.अशोकमहाराजांजवळ बोलत बसला असतांना ते त्याला म्हणाले, "केवढ्या श्रद्धेने आपण महाराजांकडे येता. अशीच श्रद्धा ठेवावी."

पुढे तो भक्त जालन्याला सौ.ताईमहाराजांच्या दर्शनाला गेला असतांना साधनेबद्दल तो भक्त ताईमहाराजांना विचारणार एवढ्यातच त्या म्हणाल्या, 'महाराजच सर्व काही करून घेतात. आपण फक्त श्रद्धाभाव ठेवायचा म्हणजे झाले.'

चौघांनीही वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या ठिकाणी त्या भक्ताला एकच मार्ग स्पष्टपणे सांगितला होता.

२२. आंतरिक पातळीवरील संदेशांची देवाण-घेवाण

श्रीदत्तमहाराज, डॉ.अशोकमहाराज व सौ.ताईमहाराज यांच्यात आंतरिक पातळीवर नेहमीच संदेशांची देवाणघेवाण होत असते. याबाबतीत एका भक्ताने आपला अनुभव पुढील शब्दात सांगितला आहे. एकदा तो रविवारी सकाळी रेणुकानिवासमध्ये गेला. श्रीदत्तमहाराज विश्रांती घेत होते. त्यांच्या खोलीचा दरवाजा बंद होता म्हणून तो भक्त वरच्या मजल्यावर डॉ.अशोकमहाराजांकडे गेला. सुमारे पाऊणतास दोघांचे बोलणे चालले होते. त्यानंतर एकदम डॉ.अशोकमहाराजांनी विचारले श्रीदत्तमहाराजांचे दर्शन झाले की नाही.

भक्त म्हणाला,"नाही, मी सरळ आपल्याकडेच आलो आहे."

डॉ.अशोकमहाराज त्याला म्हणाले, ''महाराज आता उठले असतील. आपण खाली जाऊन दर्शन घ्यावे.''

आणि त्याचक्षणी खालच्या मजल्यावर श्रीदत्तमहाराजांच्या खोलीचा दरवाजा उघडला गेला. महाराजांच्या सांगण्यावरून श्री.अमोद हे डॉ.अशोकमहाराजांचे चिरंजीव वर सांगायला आले. महाराज आपल्याला बोलावताहेत. भक्त लगबगीने खाली गेला आणि त्याने श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतले.

रेणुकानिवासमधून बाहेर पडतांना त्याच्या मनांत एकच विचार सारखा येत होता. तो भक्त तर सरळ वरच्या मजल्यावर डॉ.अशोकमहाराजांकडे गेला. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांच्या खोलीचे दार बंदच होते. खोलीचे दार बंद असताना आणि त्यांना कोणीही कसलाही निरोप दिलेला नसताना श्रीदत्तमहाराजांना कसे काय कळले की तो भक्त वरती डॉ.अशोकमहाराजांकडे बसला आहे आणि त्यांनी श्री.अमोदला त्या भक्ताला बोलावण्यासाठी वर कसे काय पाठवले? वरच्या मजल्यावर डॉ.अशोकमहाराज भक्ताशी बोलत बसले असताना एकदम कसे काय त्यांना कळले की श्रीदत्तमहाराज खालच्या खोलीत उठले आहेत आणि त्या भक्ताला दर्शनाला जाता येईल? डॉ.अशोकमहाराजांनी भक्ताला दर्शनासाठी खाली जायला सांगताच एका क्षणात श्रीदत्तमहाराजांच्या खोलीचा दरवाजा कसा उघडला गेला? आणि श्रीदत्तमहाराजांच्या सांगण्यावरून अमोद भक्ताला वरती कसा काय बोलवायला आला? सगळेच अनाकलनीय. आंतरिक पातळीवरील ही संदेशांची देवाणघेवाण, विज्ञानाला ज्ञात असलेल्या सृष्टीनियमांच्या पलीकडची आहे हेच खरे.

२३. आंतरिक पातळीवरील संदेश

श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराज यांच्यात ही संदेशांची देवाणघेवाण चालते. ताईमहाराज जालन्याला श्रीदत्त आश्रमात असतात. श्रीदत्तमहाराज पुण्याला रेणुकानिवासमध्ये असतात. पण एका क्षणात संदेश जातो आणि

त्याचक्षणी लगेच उत्तरही येते आणि तशी कृती होऊन जाते. एक भक्त सांगतात ते जालन्याहून मुंबईला जायचे होते. ताईमहाराजांनी त्यांना सांगितले की, पुण्याला जाऊन श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घ्यावे आणि मगच मुंबईला जावे. सौ.ताईमहाराजांनी सकाळी साडेअकरा वाजता जालन्याच्या बस स्टॅन्डवरून पुण्यासाठी निघणाऱ्या एस.टी.ने त्या भक्ताने जावे असे सांगितले.

तो भक्त त्याप्रमाणे एस्.टी.स्टॅन्डवर वेळेवर गेला. काही कारणांमुळे साडेअकरा वाजता सुटायची गाडी दोन वाजता सुटली. गाडी पुण्याला पोचली तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते. एवढया रात्री श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनासाठी जावे कां तसेच मुंबईला जावे असा विचार भक्ताच्या मनात आला. पण सौ.ताईमहाराजांची आज्ञा आहे तेव्हा दर्शनाला जावेच असा विचार करून तो महाराजांच्या घरी गेला. रात्रीचे पावणेदहा वाजले होते. पण घराचे दार उघडेच होते. त्याने घरात प्रवेश केला. सौ.आईसाहेब बाहेरच्या खोलीतच बसल्या होत्या. भक्ताला पाहून त्या म्हणाल्या दोन दिवस महाराजांना ताप येतोय. महाराज खोलीच्या बाहेर पडलेलेच नाहीत. आश्रमातही गेले नाहीत. त्यामुळे कोणालाही दर्शन मिळालेले नाही. तो भक्त काहीसा खट्टू होऊन परत जायला निघणार एवढ्यात डॉ.अशोकमहाराज आतून आईसाहेबांच्या खोलीत आले आणि भक्ताला म्हणाले, ''महाराज आत्ताच उठलेत, संध्या करण्यासाठी पाटावर येऊन बसताहेत, आपण दर्शनासाठी यायला हरकत नाही.'' काहीसा चकीत होऊन तो भक्त आत श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला गेला. श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार घालून जालन्याहून आलो असे त्या भक्ताने सांगितले. नंतर जालन्याला आलेल्या ध्यानासंबंधीच्या अनुभवाबद्दल तो श्रीदत्तमहाराजांना सांगायला सुरुवात करणार तेवढ्यात श्रीदत्तमहाराज त्याला म्हणाले, ''आपल्याला तेथे जे अनुभव आले ते सौ.ताईमहाराजांच्या सान्निध्यामुळे आले आहेत. त्यांनीच आपल्याला ते अनुभव दिले.'' भक्ताने श्रीदत्तमहाराजांना निवेदन करण्यापूर्वीच सर्व काही ओळखून श्रीदत्तमहाराजांनी उत्तर दिले होते. एवढेच बोलून श्रीदत्तमहाराज आपल्या खोलीत गेले.

दोन दिवस आजारीपणामुळे खोलीच्या बाहेर न पडलेले श्रीदत्तमहाराज केवळ पाच मिनिटाकरिता संध्येच्या निमित्ताने बाहेर कसे काय येऊन बसले?

हा काही योगायोग नव्हता. सौ.ताईमहाराजांनी त्या भक्ताला दर्शनासाठी पाठवले तेव्हा श्रीदत्तमहाराजांना आंतरिक पातळीवर संदेश पाठविला होता आणि भक्ताला तेथे आलेले अनुभवही त्यांनी श्रीदत्तमहाराजांना निवेदन केले होते. गाडी उशीरा पुण्यात आली याचेही श्रीदत्तमहाराजांना ज्ञान झाले होते आणि भक्त रेणुकानिवासमध्ये प्रवेश करणार त्याचवेळी नेमके ते पाच मिनिटांसाठी आपल्या खोलीतून बाहेर येऊन पाटावर बसले होते. हे सगळे घडले ते संदेशांची देवाणघेवाण झाल्यामुळे विशिष्ट पद्धतीने नियोजित होऊन तसे घडले होते. विज्ञानाला याबाबतचे नियम आज ज्ञात नाहीत. पण अशा गोष्टी घडतात हे सत्य आहे. भविष्यकाळात या संबंधीचे नियम विज्ञानालाही ज्ञात होतील आणि आज चमत्कार वाटणाऱ्या या घटना नित्याच्या जीवनातील एक भाग होऊन बसतील असे म्हणावेसे वाटते.

२४. श्रीदत्तमहाराजांच्या देहातीत अवस्थेचा अनुभव

प्रयाग येथील एका भक्ताचा एक विलक्षण अनुभव त्यांच्याच शब्दांत पुढे दिला आहे.

१९८३ साली श्रीदत्तमहाराज त्रिस्थळी यात्रेनिमित्त ३०-४० भक्तांसह प्रयागला येणार असे पत्र आले व मला खूप आनंद झाला. श्रीदत्तमहाराजांची सेवा करण्याची अमोल संधी मिळत आहे हे आपले मोठे भाग्य आहे असा विचार करून त्यांच्या पत्राप्रमाणे सर्व व्यवस्था करून ठेवली.

ठरल्याप्रमाणे श्रीदत्तमहाराज आले. त्यांचे स्वागत प्रयाग महाराष्ट्र भवनतर्फे झाले. सुवासिनींनी ओवाळले. गोपाळ मंदिरात तीर्थश्राद्धास सुरुवात झाली. श्रीदत्तमहाराज श्राद्धसंकल्पास बसले. पात्रप्रोक्षण करवून कुलदेवतेचा नैवेद्य करण्यासाठी श्रीदत्तमहाराज नैवेद्य वाढून ठेवलेल्या जागी गेले. खाली बसून नैवेद्य झाला. नैवेद्याच्या जागी कपाट होते. त्या कपाटाचे दार आपोआपच उघडले गेले. ते आमच्या कोणाच्याच लक्षात आले नाही. नैवेद्य करवून श्रीदत्तमहाराज संकल्पासाठी उठले तर ते जाड लाकडी दार क्षौर झालेल्या गुळगुळीत डोक्यावर ताडकन लागले. केवढा आवाज झाला! आम्ही सर्वजण स्तंभितच झालो.आमचा सर्वांचा जीव कळवळला. एवढ्या या वयात हे असे लागणे व तेही इतक्या जोराचे. माझ्या अंगावर काटाच उभा राहिला. काय होणार या कल्पनेने मी घाबरुन गेलो.

श्रीमहाराजांना किती यातना झाल्या असतील? पण लागलेल्या जागी त्यांनी हातसुद्धा फिरवला नाही. लगेच शांतपणे काहीही न घडल्यासारखे ते म्हणाले, "चालू द्या मंत्रविधी. थांबू नका" दुर्दैव असे की पुन्हा त्याच जागी तेच दार ताडकन लागले. केवढे अघटीत झाले. मला काहीच सचेना. आश्चर्य की डोक्यावर हातही फिरवला नाही. लागलेल्या जागी चोळले नाही. राग नाही, दुःख नाही, काही नाही. जणू देहाचे भानही नाही. शांतपणे मंद स्मित करून म्हणाले, 'मंत्र चालू द्या' असे म्हणून काहीही न घडल्यासारखे पुन्हा श्राद्धविधीत मग्न झाले. केवढी तितिक्षा.

असेच गयाक्षेत्री घडले. ते मे महिन्याचे दिवस होते. विस्तव पडावा असे प्रखर ऊन तळपत होते. त्या उन्हात गदाधराच्या देवळात दुपारी एक वाजता आम्ही सर्वजण गेलो. देवळाच्या पटांगणातील दगड खूप तापलेले होते. विस्तवाचा स्पर्श व्हावा तसा त्याचा गरम स्पर्श लागत होता. ते पटांगणात जोडे घालूनसुद्धा ओलांडणे कठीण. श्रीदत्तमहाराजांच्या पायात कधीच काही नसते. पायाला फोड येतील अशा या तापलेल्या रस्त्यावरून कसे जायचे असा प्रश्न आम्हाला पडला. श्रीदत्तमहाराजांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही त्या दगडांवर ओले पंच आंथरले. श्रीदत्तमहाराजांनी त्या पंच्यावरून जावे असे वाटते होते. पण आश्चर्य असे की, श्रीदत्तमहाराजांनी त्या पंच्यावर पायही ठेवला नाही. त्या भाजणाऱ्या दगडांवरून शांतपणे आपण ज्या चालीने चालतो तसे चालत गेले. चेहऱ्यावर मंद स्मित होते. पाय भाजताहेत म्हणून भरभर चालणे नाही. काही नाही. सहज स्थितीतील ते चालणे होते. शांतपणे मंद स्मित करीत प्रसन्न मुखाने तसेच चालत श्राद्धविधीच्या ठिकाणी पोचले. आमची धावपळ झाली. त्यांचे शांत सहज स्थितीतील चालणे पाहून आम्ही सर्व मंडळी आश्चयचकित झालो.

डोळ्यावर विश्वास बसणार नाही असे ते दृश्य होते. कोणत्या प्रकारची सहनशीलता हेच कळेना. श्राद्धविधी दोन तास चालला होता. आम्ही सारे तहानेने व्याकुळ झालो होतो. अंगातून वाफा निघत होत्या. पण श्राद्धविधीच्या दोन तासाच्या काळात श्रीमहाराजांनी पाण्याचा थेंबही घेतला नाही. शांतपणे सहज स्थितीत प्रसन्न मुद्रेने त्यांनी तो दोन तासांचा श्राद्धविधी

पूर्ण केला. हीच देहातीत अवस्था. आत्मसंयम,स्थिरता,स्थितप्रज्ञता, नम्रता आणि अशी तितिक्षा परमेश्वराशी एकरूप झालेल्या संतमहात्म्यांच्या ठिकाणीच असू शकते. अशा संतांचे दर्शन म्हणजे परमेश्वराचेच दर्शन होय. म्हणूनच त्या दिवशी प्रत्यक्ष परमेश्वराचेच दर्शन श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने झाले.

२५. एका बालभक्ताचे अनरूप

श्रीदत्तमहाराजांकडे नियमितपणे येणाऱ्या एका बालभक्ताने आपल्या आठवणी पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.

१) मी आठवीत जाईपर्यंत म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत मला महाराजांकडे दर्शनाला जावे असे कधी वाटले नव्हते. मी आठवीत असतांना माझा हात फ्रॅक्चर झाला. त्यामुळे मला संध्याकाळी खेळायला जाता येत नव्हते किंवा तबला शिकायला जाता येत नव्हते. म्हणून सहजच एके दिवशी मी आश्रमात आईबरोबर गेलो आणि श्रीदत्तमहाराजांना नमस्कार केला. त्यांनी मला साखरफुटाणे दिले आणि माझी खूप प्रेमाने चौकशी केली.

फ्रॅक्चर झाल्यामुळे तेव्हा फुटबॉल किंवा तबला असे काही करता येत नव्हतं. तेव्हा काय करायचं संध्याकाळी? म्हणून मग मी आपला रोज संध्याकाळी वासुदेव निवासमध्ये श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला जायला लागलो. श्रीमहाराजांच्या पुढे जाऊन बसायचो. श्रीदत्तमहाराज मला एक पेढा द्यायचे किंवा खडीसाखर द्यायचे. विचारायचे, "कसा आहे, आता हात बरा आहे ना."

मी म्हणायचो, 'हो बरा आहे' दर दोन तीन दिवसांनी मी हात डॉक्टरांना दाखवायला जायचो. मग दरवेळेला डॉक्टरांकडेसुद्धा जाताना मी महाराजांना सांगून जायला लागलो.

एक महिन्यानंतर एक्सरे काढायचा होता. एक्सरे काढायला जातानाही महाराजांना सांगायला गेलो, 'महाराज एक्सरे काढायला जातोय.' तर महाराज म्हणाले, 'बरंय बरंय.'

डॉक्टर म्हणाले होते की फ्रॅक्चर बरं व्हायला किमान अडीच तीन महिने लागतील. पण एक महिना झाल्यावर एक्सरे काढला तर हात पूर्ण बरा झाला

आहे असं दिसून आलं. डॉक्टरांनासुद्धा खूपच आश्चर्य वाटलं की इतक्या लवकर कसा काय हात बरा झाला? डॉक्टरांनी हाताचे प्लॅस्टर काढलं. त्याच्यानंतर माझा हात आजपर्यंत कधी दुखलापण नाही. त्या एका महिन्यामध्ये मी दररोज महाराजांच्यापुढे येऊन बसायचो. महाराजांच्या कृपेने हात लवकर बरा झाला अशी माझी खात्री झाली.

मग मला महाराजांच्यापुढे येऊन बसायची गोडी लागली आणि तेव्हापासून जीवनाला असं वळण लागलं. आता एक दिवसही श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेणे मला चुकवावेसे वाटत नाही. श्रीदत्तमहाराज आता आश्रमात रोज संध्याकाळी येत नाहीत म्हणून मी रोज संध्याकाळी श्रीमहाराजांच्या घरी रेणुका निवासमध्ये जातो व भजन व आरती झाल्यावरच घरी जातो.

२) आश्रमांत किंवा रेणुका निवासमध्ये असतांना माझे पाय कधीच दुखत नाहीत. एकदा आश्रमात एका कार्यक्रमाला श्रीशंकराचार्य-स्वामीमहाराज आले होते.तेव्हा त्यांच्या मागे बटू म्हणून मी दंड घेऊन दोन तास कार्यक्रम संपेपर्यंत उभा राहिलो होतो. एरवी जरा अर्धातास उभा राहिलो की नक्कीच माझे पाय दुखतात. खेळतांनाही अनेक वेळा पाय दुखतात. पण आश्रमात श्रीगुळवणीमहाराजांची शक्ती आहे. आपल्या श्रीदत्तमहाराजांची शक्ती आहे. त्या शक्तीमुळे मी कार्यक्रम संपेपर्यंत दोन अडीच तास शंकराचार्यांचा दंड घेऊन हालचाल न करता शंकराचार्यांच्या मागे स्तब्ध उभा राहिलो होतो, तरी पाय दुखले नाहीत. ही श्रीदत्तमहाराजांचीच सगळी कृपा आहे.

३) श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला रोज संध्याकाळी मी जातो. ताप असला, डोकं दुखत असलं, खूप दमलो असलो तरी मी संध्याकाळचा दर्शनाचा नेम कधीच चुकवत नाही. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आलो की सगळं बरं होऊन जातं. ताप, डोकेदुखी, दमणूक असं सारं नाहीसं होऊन जातं. आईचेसुद्धा घरी असलं की गुडघे खूप दुखतात, पण आश्रमात किंवा महाराजांच्या घरी पायऱ्या चढतांना तिला काही त्रास होत नाही आणि घरी गुडघे दुखत असले तरी श्रीमहाराजांच्या दर्शनानंतर बरे होतात, दुखायचं

थांबतं. ही सारी श्रीदत्तमहाराजांचीच शक्ती आहे, त्यांची कृपा आहे. मी श्रीदत्तमहाराजांकडे दर्शनाला रोजच जातो. आरती व भजनाला थांबतो पण श्रीदत्तमहाराजांना प्रश्न असा कधीच विचारला नाही. श्रीमहाराजांसमोर मी नुसता जाऊन बसतो. बसल्यानंतर प्रसन्न वाटतं आणि डोळे आपोआप मिटतात. उघडावेसेच नाही वाटत. ध्यान लागले म्हणज डोळे नुसते बंद रहातात आणि काही वेळ परत उघडत नाहीत. खूप प्रसन्न वाटतं. म्हणून रोज श्रीदत्तमहाराजांपुढे बसतो, श्रीमहाराजांनी जो मंत्र दिला आहे त्याचा जप करीत बसतो.

४) मला खूप वाटतं की श्रीदत्तमहाराजांची सेवा करावी, त्यांचे पाय दाबून द्यावे. पण प्रत्यक्षात तसे घडत नाही आणि मग स्वप्न पडतं की, श्रीदत्तमहाराज बसलेले असतात आणि मग मी जातो, नमस्कार करतो. मग कधी कधी सेवा करायला मिळते. असं स्वप्न अनेकवेळा पडते म्हणजे प्रत्यक्षात काही सेवा करायला वगैरे मिळत नाही. मग नंतर स्वप्नात श्रीदत्तमहाराज येऊन सेवा करून घेतात असंच वाटतं.

५) आमच्या घरी एकदा श्रीदत्तमहाराज आले होते. तेव्हा घर अगदी आनंदाने व प्रसन्नतेने भरून गेलं होतं. तोपर्यंत आमच्या घरात असं शांत किंवा असं एवढं प्रसन्न नव्हतं वाटत. पण श्रीदत्तमहाराज घरी येऊन गेल्यावर घरांत खूप प्रसन्न असं वाटायला लागलं. श्रीदत्तमहाराज जेव्हा आमच्या घरी आले होते, तेव्हा आम्हाला सगळ्यांनाच खूप आनंद झाला, कार्यक्रमही छान झाला. श्रीदत्तमहाराजांच्या कृपेमुळे त्या दिवसापासून घरातले वातावरण पूर्णपणे पालटून गेले. खूप प्रसन्न असे घरात वाटायला लागले.

६) सौ.ताईमहाराज आणि श्रीदत्तमहाराज काही वेगळे नाही आहेत. एकच आहेत. आपल्याला श्रीदत्तमहाराजांना काही प्रश्न विचारायचा असेल आणि आपल्याला वाटत असेल की कसा विचारावा; तर सौ.ताईमहाराजांना विचारलं तरी चालतं. सौ.ताईमहाराज मार्गदर्शक आणि सूचक बोलतात. काही आपल्याला करायचं असेल तर सौ.ताईमहाराजांना विचारावं आणि त्यांनी सांगितलं असेल तसं अगदी तसंच करून टाकावं. त्यांच्या शब्दाप्रमाणे केलं की आपलं सगळं कल्याण होतं आणि ते काम बरोबर पूर्ण होतं, फलदायी होतं.

७) आज असं वाटतं की अगदी लहानपणापासून मुंज झाली तेव्हापासून श्रीदत्तमहाराजांकडे आलो असतो तर फार बरं झालं असतं. मुंजीच्या वेळेला महाराजांनी आशीर्वाद दिले असते तर फार चांगल झालं असतं. अनेक वेळा अगदी लहान बाळे श्रीमहाराजांच्या दर्शनाला आईबरोबर येतात. त्यांनासुद्धा महाराज पेढे देतात. अशी लहान बाळं दर्शनाला आलेली पाहिली की वाटतं, केवढं त्यांचं भाग्य आहे. आपणही असंच बालपणापासूनच दर्शनाला यायला हवं होतं.

२६. कोणाही जीवाचा न घडो मत्सर

इ.स. १९७५ मध्ये श्रीदत्तमहाराजांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन झाले. शस्त्रक्रिया करणारे गृहस्थ निवृत्त झालेले नेत्रशल्य विशारद होते. त्यांनी श्रीदत्तमहाराजांना जवळ जवळ सक्तो करूनच ऑपरेशन करुन घेण्यास भाग पाडले. "कर्मणो गहना गति" या न्यायाप्रमाणे आपरेशननंतर १ ते २ महिने सतत डोळ्यातून रक्तस्त्राव होत होता. पुढे दुसऱ्या डॉक्टरकडून तो डोळा दुरूस्त करावा लागला. झालेल्या प्रकाराबद्दल घरामध्ये असंतोष होता. परंतु श्रीदत्तमहाराज मात्र शांत होते. ते म्हणाले, 'परमेश्वराने आपल्याला कसलीही पीडा न देता ६७ वर्ष विनासायास दृष्टी दिली असता असा एखादा प्रसंग प्रारब्धवशात आला तर खेद का करायचा? कोणाबद्दलही असूया (मत्सर, तिरस्कार) असता कामा नये. प्रारब्धाने जे होणार आहे ते टळणार नाही.'

स्वतःच्या घरीसुद्धा अतिथीप्रमाणे वागणारे, बालकभाव सदैव जपणारे, भयाचा सर्वथा अभाव असणारे, अपकार करणाऱ्यावर सदैव उपकारच करणारे, उत्तमप्रकारे अंतःकरणाची संशुद्धी असणारे आणि क्रोधाला जरा देखील थारा न देणारे, कायावाचामनाने कोणालाही कसलेली दुःख न देणारे, तत्त्वज्ञान व सात्त्विक दानात निरंतर अग्रेसर असणारे असे श्रीदत्तमहाराज माझे गुरू आहेत याचा मला अतीव अभिमान वाटतो.

२७. बार्शीला झालेल्या भागवत सप्ताहातील एक आठवण

इ.स. १९८८ यावर्षी बार्शी येथे श्रीडोंगरेमहाराजांचा भागवतसप्ताह झाला. श्रीदत्तमहाराज त्यावेळी बार्शीला आले होते. श्रीदत्तमहाराज बार्शीला

आल्याचे वर्तमान समजताच श्रीडोंगरेमहाराज स्वतः त्यांच्या दर्शनाला आले आणि श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला. त्यावेळी अनेक भक्तगण उपस्थित होते. हा प्रसंग अगदी अंगावर आनंददायक रोमांच आणणारा होता. त्यावेळी सर्व भक्तवृंदातून 'गोपालकृष्ण महाराज की जय' याचा उत्स्फुर्तपणे जयजयकार झाला. उत्तरादाखल श्रीदत्तमहाराजांनी आसनावर बसण्यासाठी सांगून स्वतः जमिनीवर बसले. परंतु डोंगरेमहाराजांनी त्यांच्या हातास धरून आपल्या आसनावर बसविले. त्यांचा पुष्पहार श्रीफळ श्रीमहावस्त्र देऊन सत्कार केला. यानंतर दोघांमध्ये पुढीलप्रमाणे संवाद झाला.

श्रीदत्तमहाराज :- 'मी आपली प्रसादवाणी ऐकण्यासाठी आलो आहे.'

पू. डोंगरेमहाराज :- 'आमच्यामध्ये आपण ऐकण्यासारखे काही नाही. आपणच आज रोजी प्रथम व्यासपीठावर येऊन आम्हास उपदेश करावा व आम्हास पावन करावे.'

श्रीदत्तमहाराज :- 'आपली उपासना फार मोठी आहे. अनन्यसाधारण अशी श्रीकृष्णभक्ती आहे. श्रीकृष्णाच्या कृपेने आपला कार्यक्रम चालू आहे. मध्येच मी सांगणे योग्य होणार नाही. शास्त्रामध्ये बसत नाही.

पू. डोंगरेमहाराज :- 'आपण व्यासरूप आहात. शास्त्राचा संबंध येत नाही.आपण जरूर उपदेश करावा. आपण ज्येष्ठ व श्रेष्ठ आहात.'

असे म्हणून पू. डोंगरेमहाराज श्रीदत्तमहाराजांना अत्यंत आग्रहपूर्वक स्वतःच्या गाडीमध्ये बसवून कार्यक्रमाचे ठिकाणी बरोबर घेऊन गेले. कार्यक्रम स्थळी गेल्यावर श्रीदत्तमहाराजांच्या हातास धरून प्रथम पू. डोंगरेमहाराजांनी व्यासपीठावर बसविले. किमान १० हजार श्रोतृवृंद जमलेला होता. भव्य मंडप योजना करण्यात आली होती. व्यासपीठावर दोघेही आल्यावर पू. श्रीडोंगरेमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला व म्हणाले, 'आज आपले निरूपण झाले पाहिजे.' श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'आपले चालू द्या.' परंतु श्रीडोंगरेमहाराज ऐकेनात. पुनःपुन्हा हात जोडून आपणच काही सांगावे अशी प्रार्थना करीत राहिले. श्रीदत्तमहाराजांनी काही वेळ सेवाभावनेने प्रवचन केले व पू.डोंगरेमहाराजांनी पुढे सुरू करावे असे सांगितले. तेव्हा श्रीडोंगरेमहाराजांनी पुन्हा श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार

घातला व विनीत भावाने,'जशी व्यासांची आज्ञा' असे उद्‌गार काढून निरूपणाला सुरु वात केली. हा प्रसंग सर्व प्रेक्षकांनी पाहिला, तेव्हा अक्षरशः सर्वांच्या डोळ्यातून भक्तीप्रेमाचे अश्रू पाझरत होते. देवदुर्लभ असे हे दृश्य पाहतांना अनेकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले होते

२८. हृदयातील अथांग प्रेम

एक भक्तसाधिका सांगतात-

पूर्वी काही वर्षे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील शेल पिंपळगांव येथे माझ्या यजमानांचा दवाखाना होता. तेव्हा आम्ही तेथे रहात होतो. त्यावेळी एका दिवाळीसाठी श्रीदत्तमहाराज ४/५ दिवस आले होते.

त्या गावी भीमा व भामा या दोन नद्यांचा संगम आहे. श्रीदत्तमहाराज रोज सकाळी त्या संगमावर स्नानाला व संध्याकाळी संध्येला जात असत. येताना हातात पाण्याने भरलेला एक तांब्या असायचा. त्यावेळी आमच्याकडे एक कोळी पाणी आणून भरत होता. त्याचे पाणी श्रीदत्तमहाराजांना चालणार नाही म्हणून आम्ही दोघी (मी व माझ्या धाकट्या वन्स) नदीवरून पाणी आणीत होतो. ४/५ दिवस राहिल्यावर महाराज पुण्याला जायचे नक्की झाले. तेव्हा त्यांनी मला सांगितलं,'उद्या आम्ही सकाळीच निघतो. आम्ही तांदळाची खिचडी बनवू आणि ती खाऊन मग निघू.' त्यांना सकाळच्या अगदी पहिल्या गाडीने पुण्याला जायचे होते. त्यासाठी ते पहाटे उठून नदीवरून स्नान करून पाणी घेऊन आले. आपली खिचडी केली. आम्ही करायला तयार होतो. पण आमची धावपळ नको, केवळ आम्हाला त्रास नको हा आपलेपणा त्यात होता आणि त्यांची स्वतःची आचारबंधनेही त्यांना कटाक्षाने पाळायची होती.

त्यांनी स्वतः खिचडी केली, खाल्ली व आमच्यासाठीही ठेवली होती. म्हणाले,'पहा, तुमच्यासारखी काही जमली नसेल.'

हे त्यांचे शब्द ऐकताना माझे डोळे पाण्याने ओघळत होते. माझ्या भोळ्याभाबड्या मनाला वाटते होते, की साक्षात पंढरपूरच्या पांडुरंगाने, साक्षात भगवान श्रीगोपाळकृष्णाने खिचडी स्वतः बनवली, खाल्ली आपल्याला हा प्रसाद आहे.

आपल्या गोष्टीची तसदी इतरांना पडू नये, आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये, कष्ट पडू नयेत याबद्दल ते नेहमी सावध राहून काळजी घेत असतात. त्यांच्या हृदयात अपार प्रेम भरलेले असते. हे त्यांचे प्रेम शब्दातून जेवढे दिसते त्यापेक्षा ते कृतीतून फार दिसते. शब्दांनी त्यांनी कधी कुणालाही दुखवलं नाहीच. पण प्रेम व्यक्त करण्यासाठी शब्दापेक्षा ते प्रत्यक्ष कृतीच जास्त पसंत करतात, त्यामुळे त्यांच्या प्रेमाचा निर्मळ अथांगपणा स्पष्ट होतो.

२९. जसा भाव तसे दर्शन

दर्शनाला येणाऱ्या साधकांच्या मनातील भाव, त्यांचे विचार, त्यांच्या इच्छा सगळं सगळं लगेच श्रीदत्तमहाराजांना समजत. आरशात एखाद्या वस्तूचं स्वच्छ प्रतिबिंब दिसतं, तसं श्रीमहाराजांना प्रत्येकांचे मन स्वच्छ पहाता येतं. समोरच्या माणसाचा भाव जसा असेल तसे महाराज वागतात.

मुंबईच्या एक भक्त आहेत. त्या एकदा दर्शनाला आल्या होत्या. त्यांची खूप इच्छा होती की श्रीदत्तमहाराजांची श्रीज्ञानेश्वरस्वरूपात पूजा करावी. त्यांनी तसं पत्र लिहिलं होतं. त्या दर्शनाला आल्या व म्हणाल्या, "आपण ज्ञानेश्वर-महाराजांच्या रूपातच आम्हाला दिसता. आपली पूजा म्हणजे श्रीज्ञानेश्वर-महाराजांचीच पूजा आहे. तेव्हा त्या भावाने आपली पूजा करायची परवानगी आपण मला द्यावी अशी प्रार्थना आहे."

श्रीदत्तमहाराजांनी त्या भक्तसाधिकेचा भाव मनोमन जाणला. ते म्हणाले, "आमची काही योग्यता नाही. पण आपले सगळ्यांचे प्रेम आहे, श्रीगुरूमहाराजांची कृपा आहे म्हणून चाललंय."

त्या भक्तसाधिकेने पुन्हा हात जोडले आणि गहिवरलेल्या स्वरांत डोळ्यांत अश्रू आणून प्रार्थना केली, "महाराज, आपली श्रीज्ञानेश्वरस्वरूपांत पूजा करावी अशी फार फार इच्छा आहे. आपण नाही म्हणू नये." श्रीदत्तमहाराज काहीच बोलले नाहीत. तेव्हा पुनःपुन्हा त्या तीच प्रार्थना करीत राहिल्या. शेवटी श्रीदत्तमहाराज म्हणाले, "आपली इच्छा म्हणजे माऊलीची इच्छा. काही हरकत नाही."

त्या भक्तसाधिकेला खूपच आनंद झाला. पूजेचा दिवस ठरला. त्या ठरलेल्या दिवशी त्या भक्तसाधिका मुंबईहून आल्या. त्यांच्याबरोबर ७०/८०

स्त्रिया होत्या. सर्वजणी आश्रमातच उतरल्या. सकाळी सगळ्याजणी रेणुकानिवासमध्ये आल्या. श्रीदत्तमहाराज हेच साक्षात श्रीज्ञानेश्वरमहाराज आहेत या श्रद्धेने व या भक्तीभावाने त्यांनी श्रीदत्तमहाराजांची पूजा केली. त्यावेळी अनेक भक्तांच्या डोळ्यांतून भक्तीभावनेने अश्रू ओघळत होते. आज साक्षात ज्ञानोबांचे दर्शन झाले असे त्या भक्तसाधिकेला वाटत होते.

बार्शीचे एक गृहस्थ श्रीदत्तमहाराजांचे निस्सीम भक्त आहेत. एका यात्रा कंपनीबरोबर काशीयात्रेला जायचे त्यांनी ठरवले. जाताना ते पुण्याला आले आणि त्यांनी श्रीदत्तमहाराजांचे दर्शन घेतले. काशीयात्रेचा बेत त्यांनी श्रीदत्तमहाराजांना निवेदन केला.

श्रीदत्तमहाराज म्हणाले, "तेथे कोणाकडे उतरणार आहात?"

ते भक्त म्हणाले, "आमची सोय सगळी झालेली आहे महाराज."

श्रीदत्तमहाराज पुन्हा म्हणाले, 'प्रयागला ते पित्रे नावाचे पुजारी आहेत. ते सगळी सोय करतात. तिथे उतरणार आहात काय?'

ते भक्त म्हणाले, 'नाही महाराज. आमची सगळी सोय यात्रा कंपनीने केलेली आहे.

मग महाराज काहीच बोलले नाहीत. ते भक्त काशी व प्रयाग अशी यात्रा पूर्ण करून बरोबर गंगा घेऊन पुण्याला पुन्हा श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आले.

श्रीदत्तमहाराजांनी विचारले, 'यात्रा सगळी ठीक झाली ना? उतरायची सोय वगैरे सर्व व्यवस्थित होती ना?'

ते भक्त म्हणाले, 'नाही महाराज. फारच त्रास झाला. उतरायची सोय अगदीच अपुरी होती. ज्यांच्याकडे उतरलो होतो त्यांच्याकडे काहीच व्यवस्था नव्हती.'

श्रीमहाराज म्हणाले, ''आम्हाला तस वाटलंच होतं. म्हणून तर आम्ही तेथे 'पित्रे' यांचेकडे आपण उतरावे असे सुचवित होतो. पण सोय झालेली आहे असे आपण म्हणालात म्हणून पुढे आम्ही काही बोललो नाही.''

श्रीदत्तमहाराजांचे ते शब्द ऐकून त्या भक्ताला गहिवरून आले. त्याच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. त्यांना बोलवेना. काही क्षण गेल्यावर

ते म्हणाले, 'महाराज आपणच काशीविश्वेश्वर आहात. आपली काशीविश्वेश्वर स्वरूपात पूजा करावी अशी फार इच्छा आहे. तेथे काशीविश्वेश्वराचं दर्शन घेताना सारखी आपलीच आठवण येत होती. आपलेच दर्शन तेथे घेतल्यासारखे वाटत होते. काशीविश्वेश्वराच्या स्वरूपात आपण माझी पूजा स्वीकारावी अशी प्रार्थना आहे.'

त्या भक्ताची भक्तीभावना फारच उत्कट होती. त्यांनी पुनःपुन्हा विनीत भावनेने प्रार्थना केली. मग मात्र त्यांचा भाव ओळखून श्रीदत्तमहाराजांनी संमती दिली.

त्या भक्ताने त्या दिवशी साक्षात काशीविश्वेश्वराची पूजा या भावनेने श्रीदत्तमहाराजांची पूजा केली. 'खरी काशीयात्रा घडली' असे ते म्हणाले. ती पूजा पहात असतांना तेथे उपस्थित असलेल्या सगळ्यांनाच वाटत होते की आपण प्रत्यक्ष काशीविश्वेश्वराचेच दर्शन घेत आहोत.

म्हणूनच तर ताईमहाराज म्हणत असतात, 'श्रीमहाराज भक्तवत्सल आहेत. त्यांच्या मनात भक्तांबद्दल वत्सलता आहे आणि भक्तांचा त्यांना अभिमानही आहे. जसा त्या भक्ताचा भाव असेल तसे दर्शन श्रीमहाराज त्या भक्ताला देत असतात. जसा भाव तसे दर्शन मिळते.'

३०. शास्त्रग्रंथातील ज्ञान आणि अनुभूती यांचे मूर्तीमंत रूप

एक भक्त सांगतात, कांचीकामकोटीचे शंकराचार्य-स्वामीचंद्रशेखर सरस्वती यांना श्रीदत्तमहाराजांबद्दल खूपच प्रेम व आदर होता. श्रीदत्तमहाराजांना ते खूपच मानायचे. एकदा ते उगारला आले होते, त्याचवेळी श्रीदत्तमहाराज उगारला आले होते. आचार्यांना जेव्हा समजले की श्रीदत्तमहाराज उगारला आले आहेत, तेव्हा सकाळी नदीवर स्नानाला जाताना आचार्यांनी बरोबर एक भरजरी शाल घेतली. आदल्याच दिवशी श्रीदत्तमहाराज उगारला आले होते. त्यांची आणि आचार्यांचा भेट व्हायची होती. पण आचार्यांनी नदीवर सकाळी स्नान केलं आणि तसेच महाराज जेथे उतरले होते तेथे आचार्य गेले आणि श्रीदत्तमहाराजांचा गौरव करून त्यांनी श्रीदत्तमहाराजांना ती भारी शाल पांघरली. आचार्य स्वामीचंद्रशेखर सरस्वती त्यावेळी म्हणाले, "शास्त्रात जे काही सगळं सांगितलेलं आहे त्याचा प्रत्यक्ष परिपूर्ण अनुभव

श्रीदत्तमहाराजांनी स्वतः घेतलेला आहे. श्रीदत्तमहाराज पूर्ण अनुभवी आहेत. सगळी विद्वत्ता, सगळ्या शास्त्रग्रंथातील ज्ञान आणि त्या ज्ञानातील सगळी अनुभूती श्रीदत्तमहाराजांमध्ये पूर्णपणे मुरलेली आहे."

श्रीचंद्रशेखर-सरस्वती यांची फार इच्छा होती की दत्तमहाराजांना कांची कामकोटीच्या शंकराचार्यांच्या पीठावर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून नेमावं. तसं त्यांनी श्रीगुळवणीमहाराजांना कळवलंही होतं आणि श्रीगुळवणीमहाराजांची अनुज्ञा मागितली होती. तेव्हा श्रीगुळवणीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना सांगितलं,"आम्ही आपल्याला इथल्या पीठासाठी धरलंय. तिकडे कांचीकामकोटीला कसे काय जाता? तुम्हाला तिकडे जाऊन कसं चालेल?" श्रीगुळवणी महाराजांनी असं म्हटल्यावर श्रीदत्तमहाराज काही बोलणं शक्यच नव्हतं.

४) श्रीदत्तमहाराजांचा एक मोठा विशेष म्हणजे ते जसं बोलतात ते सगळं त्यांनी स्वतः आचरलेलं असतं. त्यांनी सगळं आत्मज्ञान आचरणात आणलं आहे. स्वतः सगळ्याची अनुभूती घेतली आहे. त्याप्रमाणे ते स्वतः तसं वागतात. नुसतं शब्दपांडित्य नाही तर संपूर्ण अनुभूती त्यांच्याजवळ आहे आणि ती त्यांची अनुभूती त्यांच्या भक्तांनाही ते देऊ शकतात. तेवढा अधिकार आहे श्रीदत्तमहाराजांचा. परिपूर्ण आत्मज्ञान आणि श्रीदत्तमहाराजांनी स्वतः घेतलेली अनुभूती आपल्या भक्तांना देण्याचे पूर्ण सामर्थ्यही श्रीदत्तमहाराजांजवळ आहे. असे पूर्णत्त्व इतर कुठे पहायला मिळत नाही.

श्रीदत्तमहाराज सिद्ध म्हणूनच जन्माला आले. जन्मतःच त्यांच्याजवळ सगळं ज्ञान व अनुभूती होती. इतर संतांना साधना करून ज्ञान व अनुभूती मिळवावी लागते. तसं महाराजांचं नाही. ते पूर्ण म्हणूनच जन्माला आले. त्यांना साधना अशी करावीच लागली नाही. नवीन काही शिकावं असं लागतच नाही. लौकिक अर्थाने त्यांनी शिक्षण घेतलेलं दिसतं. पण ते जगाला दाखवायला केवळ. सगळं ज्ञान व अनुभूती घेऊन ते अवतीर्ण झाले आहेत. स्वतःजवळ पूर्ण ज्ञान व पूर्ण अनुभूती असल्यामुळे श्रीदत्तमहाराज अगदी स्पष्टपणे निसंदिग्धपणे सांगतात,"वरवर शास्त्रवचनांमध्ये जो विरोध दिसतो तो तसा नाहीच आहे. साधक स्वतः जेव्हा प्रत्यक्ष अनुभव घेतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की निरनिराळ्या शास्त्रवचनांमध्ये विरोध नाहीच आहे."

म्हणूनच श्रीदत्तमहाराज नेहमी समन्वयाची भूमिका घेताना दिसतात. कर्म,भक्ती, ज्ञान, योग, वैराग्य या सगळ्याचा जो समन्वय श्रीदत्तमहाराज घालतात तो तसा कुठेच पहायला मिळत नाही. अनेक पंडित कुठलातरी अभिनिवेश घेऊन बोलत असतात. तसा श्रीदत्तमहाराजांकडे अभिनिवेश कसलाच नाही. स्वतःची अनुभूती असल्यामुळेच श्रीदत्तमहाराज अगदी ठामपणे निसंदिग्धपणे बोलतात. तरीही त्यात कोठलाच अभिनिवेश नसतो.

श्रीदत्तमहाराजांना भक्तिरसायन हा ग्रंथ खूप आवडतो. दासगणू महाराजांनी त्याचे मराठीत रुपांतर केलंय. नीलाताईंनी श्रीदत्तमहाराजांच्या हातात श्रीदासगणूमहाराजांचे पुस्तक दिले तर महाराज म्हणाले, "इ.स.१९७३ साली आम्ही त्यांच्याकडे सांगायला जात होतो."

श्रीदत्तमहाराजांकडून भक्तिरसायन हे पुस्तक श्रीदासगणू महाराजांनी समजून घेतलं आणि त्यानंतर त्यांनी ते मराठीत आणलं. श्रीदत्तमहाराजांना रसायन हा ग्रंथ का आवडतो तर श्रीदत्तमहाराज सांगतात, "भक्तिरसायन या ग्रंथात भक्ती हा वेगळा स्वतंत्र पुरुषार्थ आहे असं सांगितलंय. खरी भक्ती किंवा खरं प्रेम कसं असतं तर गोपाळकृष्ण रोज द्वारकेला राजवाड्यातून बाहेर पडायचे तेव्हा द्वारकेतील सगळे स्त्री-पुरुष राजरस्त्यावरील घरांच्या गच्च्यांवर उभे असायचे, गोपाळकृष्णांचे सगुण रूप बघायला. याला खरं प्रेम म्हणतात. भक्ती हेच भक्तीचे फळ आहे. ज्ञान हे भक्तीचे फळ नाही." भक्ती वेगळी स्वतंत्र आहे आणि त्या भक्तीने ती भक्ती मिळवणे हेच त्याचं फळ असं त्यांनी मांडलंय. त्यामुळे ते महाराजांना विशेष आवडते. महाराज स्वतःसुद्धा महाज्ञानी असून ते ज्ञानाच्या भूमिकेत फारसे राहिले नाहीत. भक्तीमध्यच राहिले.

३१. एक आगळे दर्शन

इ.स. १९९५ साली श्रीदत्तमहाराज वाडीला गेले होते. तेव्हाची एक आठवण सांगण्यासारखी आहे. सौ. ताईमहाराज आल्या होत्या, खूप भक्त आले होते. श्रीदत्तमहाराज औरवाडला गाडीतून उतरले आणि अमरापूर मंदिराकडे चालत निघाले तर सौ.ताईमहाराज पुढे गेल्या व सतत एकामागून एक साष्टांग नमस्कार श्रीदत्तमहाराजांना घालू लागल्या. श्रीदत्तमहाराज जसे

पुढे पाऊल टाकायचे, तशा सौ. ताईमहाराज महाराजांकडे तोंड करून त्यांना पाठ न दाखवता रस्त्यातच साष्टांग नमस्कार घालत घालत अमरापूर मंदिरापर्यंत गेल्या.

तसं खूप अंतर आहे ते, पण श्रीदत्तमहाराजांकडे न पाठ करता साष्टांग नमस्कार घालतच त्या देवळात आल्या. आत आल्यावर सौ.ताईमहाराज म्हणाल्या श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी सगळी तीर्थ, सगळ्या पवित्र नद्या त्यावेळी आलेल्या दिसत होत्या. गंगामाई, कृष्णामाई, गोदावरीमाई सगळ्या. तुम्हीसुद्धा सगळ्यांनी त्यावेळी महाराजांना साष्टांग नमस्कार घालायला हवे होतेत.

या प्रसंगानंतर श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''सौ.ताईमहारा या साक्षात् आदिशक्ती आहेत, भगवती आहेत. त्यांनी असे साष्टांग नमस्कार घालू नयेत. पण भक्तीत सगळे चालते.''

३२. एका ज्येष्ठ भक्तभगिनीच्या आठवणी

श्रीगुळवणीमहाराज व श्रीदत्तमहाराज यांचा सहवास दीर्घकाळ लाभलेल्या एका भक्त भगिनींनी सांगितलेल्या आठवणी त्यांच्याच शब्दात पुढे दिल्या आहेत.


साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या या ओवीत वर्णन केलेले अमृताचे पाझर श्रीदत्तमहाराजांच्या वाणीतून जगाच्या कल्याणाकरिता सदैव पाझरत असतात. साक्षात ब्रह्माच्या वाणीतून श्रीभागवत सांगितले जावे तसे त्यांचे श्रीभागवतावरील निरूपण असते. कुरवपूर येथे झालेल्या भागवतसप्ताहात श्रीदत्तमहाराजांचे निरुपण ऐकायला प्रत्यक्ष श्रीपादवल्लभ येत होते असे सांगतात. एवढा अधिकार व प्रतिभाशाली वक्तृत्त्व असूनही श्रीदत्तमहाराज मर्यादापुरुषोत्तमच राहिले आहेत.

एकदा श्रीदत्तमहाराज व त्यांचे परम पूजनीय पिताजी श्रीधुंडिराजमहाराज आमच्या घरी आले होते. बसण्यासाठी बैठक घालून ठेवलेली होती. परंतु

सौ.ताईमहाराज





श्रीक्षेत्र नरसोबाचीवाडी येथे सौ.ताईमहाराज स्नान करून श्रीदत्तमहाराजांना ओलेत्याने साष्टांग नमस्कार घालत औरवाड येथे आल्या त्यावेळी



श्रीवासुदेवानंद-सरस्वती-स्वामीमहाराजांच्या
७५व्या पुण्यतिथीनिमित्त भक्तांना आशीर्वाद देतांना



श्रीदत्तमहाराज व सौ. आईसाहेब यांनी श्रीदत्तयागाचे
यजमानपद भूषविले

श्रीमहाराज आपल्या वडिलांच्या शेजारी बैठकीवर न बसता एका बाजूला साध्या सतरंजीवर अत्यंत विनित भावाने बसले होते. वडिलांची मर्यादा कशी सांभाळावी याचा आदर्श वस्तुपाठच त्या दिवशी मला शिकायला मिळाला. श्रीदत्तमहाराज म्हणजे अपार सामर्थ्य व क्षमाशीलवृत्ती, प्रखर ज्ञानतेज. पण त्याच्या जोडीला मनाचे मार्दव, कठोर कर्तव्यनिष्ठा, तिच्याबरोबर हळुवार आणि कोमल अंतःकरण. निरपवाद सत्यनिष्ठा पण तितकीच सर्वांशी सौख्यदायक वागणूक. ऐश्वर्यसंपन्नता पण कोणत्याही त्यागाची तयारी. अत्यंत बुद्धिमान, ज्ञानी परंतु तितकेच निगर्वी. सर्व विद्यांमध्ये पारंगत पण अत्यंत विनयशील. अशा परस्परविरोधी अनंत सद्‌गुणांचा पुतळा असलेले श्रीदत्तमहाराज मर्यादापुरुषोत्तमच आहेत. धन्य हे महाभाग्यवान श्रीसद्‌गुरुस्वरूप पिताजी श्रीमत् प.पू. धुंडिराजमहाराज व जगत् कल्याणार्थ अवतीर्ण झालेले परम भाग्यशाली पुत्र श्रीदत्तमहाराज.

परम पूजनीय श्रीसद्‌गुरू योगिराज श्रीगुळवणीमहाराज श्रीदत्तमहाराजांना बरोबर घेऊन एकदा आमच्या घरी आले होते. श्रीगुरूमहाराज येणार होते हे माहीत होते, परंतु श्रीदत्तमहाराज येणार हे माहित नव्हते. मी त्यादिवशी कां कोणास ठाऊक एक फुलाचा व एक तुळशीचा हार आणला होता. श्रीदत्तमहाराज आले म्हणून इतका परमानंद झाला परंतु श्रीदत्तमहाराजांना घालण्यास दुसरा फुलांचा हार नाही म्हणून वाईट वाटले. पूजा केल्यावर जेव्हा हार घालण्याची वेळ आली तेव्हा श्रीगुरूदेव श्रीगुळवणीमहाराजांना हार घालून मी एवढेच म्हटले की महाराज, श्रीदत्तमहाराजांना मी आता तुळशीचा हार घालते, तेव्हा श्रीसद्‌गुरूमहाराज योगिराज म्हणाले, "अगं, श्रीदत्तमहाराजांना तुळशीचाच हार पाहिजे, तू जरूर तो हार श्रीदत्तमहाराजांना घाल."

"अगं, श्रीदत्तमहाराज म्हणजे, आत्मज्ञानी असूनही प्रेमळ भक्त (शिष्य)आहेत, अत्यंत कनवाळू असूनही स्वमनाचे स्वामी आहेत. योगसामर्थ्यसंपन्न परंतु लोकांमध्ये वागतांना क्षमाशील, शास्त्रवेत्ते विद्वान असूनही प्रसंगानुसार विनम भावाने वागण्याचे चातुर्य जाणणारे असे सद्‌गुरुस्वरूप श्रीदत्तमहाराज श्रीदत्तावतार आहेत बरं का !"

आणखीही एक गोष्ट श्रीगुरुदेव सहजगत्या बोलून गेले, ''अगं, श्रीदत्तमहाराज आमच्यापेक्षा मोठे आहेत हं! कारण प्रपंचात असूनही कमलपत्रवत श्रीदत्तमहाराज अलिप्तच आहेत'' आणि हे बोलत असतांना श्रीगुरूमहाराजांचा आनंदमय प्रेमभाव नुसता ओसंडून वहात होता. मला तर असे वाटते, श्रीनिवृत्तीनाथ म्हणजे श्रीसद्गुरूराज योगिराज व त्यांच्या कृपाप्रसादाने भागवत सांगणारे श्रीज्ञानदेव म्हणजे श्रीदत्तमहाराज.

अस्सल सुवर्णासारखे निखळ साधुत्त्व म्हणजे श्रीदत्तमहाराजांचे जीवन. सोन्याला जसा सुगंध असावा त्याप्रमाणे अद्वैत ज्ञान व भक्ती यांचा सुवर्ण संगम श्रीदत्तमहाराजांच्या जीवनामध्ये दिसून येतो.

भगवद्गीतेने जो संन्यास सांगितला आहे तो कर्माचा नव्हे तर हे कर्म व ते मी करता या बुद्धीचा. अशा निष्काम वृत्तीवर आरुढ होऊन श्रीदत्तमहाराजांचे प्रत्येक कर्म होत आहे. जगाच्या धकाधकीच्या मामल्यात ज्यांच्या मनाचा समतोल ढळत नाही ती समाधी अवस्था आणि खरी समाधी कर्मातूनच होत असते असे त्यांच्या कृतिशीलतेतूनच प्रकट होत असते. आत्मज्ञानाच्या स्वानंद साम्राज्याचे राजे असलेल्या श्रीदत्तमहाराजांच्या चरणी ही वाक्पुष्पांजली अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करते व शेवटी एवढेच म्हणते, श्रीदत्तमहाराजांच्या चरणी लोटांगण घालत जावेसे वाटते. कारण तेथे परमशान्ती प्रसन्नतेने विसाव्याला आली आहे असे दिसते.

३३. भक्तसाधिकेवर कृपा

मुंबईच्या एका भक्त भगिनीनी पुढील आठवण सांगितली आहे. श्रीनानामहाराज तराणेकर, श्रीदत्तमहाराज कवीश्वर व सौ.ताईमहाराज यांचे एकत्र दर्शन गुरूकृपेने मला झाले. फेब्रुवारी १९८८ मध्ये श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह श्रीनानामहाराज व सौ.ताईमहाराज यांच्या उपस्थितीत आमचे घरी झाला. हा भागवतसप्ताह होण्यापूर्वी श्रीदत्तमहाराजांना विनंती केली की, "महाराज ! श्रीनानामहाराज आमच्याकडे येणार आहेत तेव्हा आपणही याव ही प्रार्थना आहे.'' 'माझ्या मनांत श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह आमचेकडे व्हावा ही इच्छा होती. श्रीमहाराज म्हणाले, बघू तेव्हा आम्ही कोठे असू.' नंतर श्रीनानामहाराज आमचे घरी आले. रोज सायंकाळी

करुणात्रिपदी वगैरे होत असे. ते झाल्यावर एके दिवशी श्रीदत्तमहाराजांचा भागवतसप्ताह गोरेगावला होणार आहे असे जाहीर झाले. ज्या दिवशी भागवतसप्ताह ठरला त्याचे आदले दिवशी श्रीनानामहाराज म्हणाले, "भागवतसप्ताह येथेच होईल. श्रीमहाराजांना तसे कळवा."

नंतर भागवतसप्ताह केवळ श्रीनानामहाराज, श्रीदत्तमहाराज व सौ.ताईमहाराज यांच्या कृपेने आमचे येथे झाला. नानामहाराज म्हणत की, श्रीदत्तमहाराज व आम्ही एकच आहेत. श्रीदत्तमहाराज आमचेकडे जेव्हा आले तेव्हा श्रीनानामहाराज स्वतःच्या खोलीतून उठून महाराजांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वारापर्यंत चालत येत असत आणि श्रीदत्तमहाराजांचे स्वागत करीत असत.

या आठवणी मनांत जाग्या झाल्या म्हणजे ऊर भरून येतो आणि डोळ्यात अश्रू जमा होतात.

३४. अखंड भगवंताच्या अनुसंधानातच असतात

श्रीदत्तमहाराज हे अखंड भगवंतांच्या अनुसंधानात असतात. इतरांशी ते जरी बोलत असले किंवा देहाने ते कोणतेही कार्य करीत असले तरीही त्यांचे मन सदैव भगवंताच्या नामामध्ये दंग असते. आतल्या आत भगवंताच्या नामस्मरणांतच ते रंगून गेलेले असतात. याचा अनुभव त्यांच्याभोवती वावरणाऱ्या अधिकारी पुरुषांना नेहमीच येत असतो. अशा अनेक आठवणी सांगितल्या जातात. त्यापैकी एक आठवण पुढे दिली आहे.

श्रीदत्तमहाराजांना समोर एक वृद्ध सत्पुरुष दिसत होते आणि ते "नारायण भज रे मानस"*

---

* *तळटीप - ''नारायण भज रे मानस ।'' हा अभंग संत श्रीकृष्णदयार्णव यांनी रचलेला आहे. भगवंताची भक्ती करीत रहावे, विषयांची उपेक्षा करून अद्वैत अनुभूतीचे भान ठेवून सतत आत्मानंदात रहावे असे 'गुज' श्रीकृष्णदयार्णव या अभंगातून स्वतःच्या मनाला हळुवारपणे सांगत आहेत. ईश्वरस्वरूपज्ञानी भक्ताची आत्मस्थिती या अभंगात संतकवींनी वर्णन केली आहे. अद्वैत अनुभूतींबरोबर येणारी अद्वैतभक्ती म्हणजे भगवंताच्या अखंड अनुसंधानात रहाण्याची आत्मानंदाची अवस्था या अभंगात श्रीकृष्णदयार्णव यांनी शब्दबद्ध केली आहे.*

हा अभंग तन्मयतने गात आहेत असे स्पष्टपणे ऐकू येत होते. कधी त्या सत्पुरुषाने गायलेले या अभंगाचे नुसते स्वर ऐकू येत तर कधी त्या स्वरगायनाला तबला, पेटी, तंबोरा अशी वाद्यांची साथ असे. वेगवेगळ्या रागांत हा अभंग वेगवेगळ्या वेळी गायलेला रात्रंदिवस श्रीदत्तमहाराजांना स्पष्टपणे ऐकू येत होता. मग तो अभंग श्रीदत्तमहाराज रंगून जाऊन स्वतःच तालासुरात म्हणायचे. घरांतील व्यक्तींना बोलवायचे आणि म्हणायचे, "बसा इथे, तुम्हालाही 'नारायण भज रे मानस' अभंग ऐकू येतो आहे कां?"

घरातील व्यक्तींनी ऐकू येत नाही असे हलकेच सूचित करताच श्रीदत्तमहाराज आश्चर्याने म्हणायचे "काय? तुम्हाला ऐकू येत नाही? आम्हाला तर अगदी स्पष्टपणे ऐकू येत आहे. ते बघा, तेथे ते वृद्ध सत्पुरुष बसले आहेत. या अभंगाचे गायन अखंड चाललेले आहे. चोवीस तास गात आहेत. एकच पद गात आहेत. आम्हाला शक्तो नाही. अशक्तपणा आहे. नाहीतर आम्ही त्या सत्पुरुषाकडे आता लगेच जाऊन आलो असतो. बघा, बघा, किती रंगून तो अभंग गात आहेत" असे म्हणून श्रीदत्तमहाराज तो अभंग जसा त्यांना ऐकू येत होता तसा रंगून तालासुरांत गाऊन दाखवायचे.

नारायण भज रे मानस।
नारायण भज रे।
त्रिभुवनपतीपद चिंतीसी जरी तू।
काय उणे तूज रे मानस।
नारायण भज रे मानस ॥ध्रु॥

विषय उपेक्षुनी। अनुभव लक्षुनी।
आत्मपरी रत रे मानस।
नारायण भज रे मानस।
नारायण भज रे मानस ॥१॥

हेची कथि गुज रे मानस।
नारायण भज रे मानस ॥२।

मग श्रीदत्तमहाराज पुन्हा डोळे मिटून हा अभंग ऐकत रहायचे. रंगून त्या अभंग गायनाला दाद द्यायचे. ''वा ऽ वा किती छान म्हणताहेत.'' मग पुन्हा डोळे मिटून तो अभंग तन्मयतेने ऐकत रहायचे.

एकदा डॉक्टर त्यांना तपासायला आले होते. श्रीदत्तमहाराज अभंग असेच तल्लीनतेने ऐकत होते. डॉक्टरांनी प्रकृती तपासण्यासाठी काही प्रश्न श्रीदत्तमहाराजांना विचारले तर श्रीदत्तमहाराजांनी त्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी डॉक्टरांनाच विचारले, "तुम्हाला तो अभंग ऐकू येतो आहे का?"

श्रीदत्तमहाराजांनी डॉक्टरांना "नारायण भज रे मानस" हा अभंग गाऊन दाखवला आणि म्हणाले, "आम्हाला इतरांचे काही ऐकू येत नाही. पण त्या वृद्ध सत्पुरुषाने गायलेले 'नारायण भज रे मानस' मात्र स्पष्टपणे ऐकू येत आहे. अखंड दिवसरात्र तेच ऐकू येत आहे."

हे बोलणे झाल्यानंतर सुमारे तीन महिन्यानंतर डॉक्टरांनी श्रीदत्तमहाराजांना विचारले, "महाराज, अजूनही 'नारायण भज रे मानस' हा अभग आपल्याला ऐकू येत आहे कां?"

श्रीदत्तमहाराज म्हणाले, "होय, हा अभंग अगदी स्पष्टपणे अजूनही आम्हाला ऐकू येत आहे."

त्यानतर काही दिवसांनी डॉक्टरांनी श्रीदत्तमहाराजांना श्रवणयंत्र कानात बसवले. त्यावेळी त्यांनी श्रीमहाराजांना विचारले. श्रवणयंत्रामुळे तो अभंग आता अधिक स्पष्ट ऐकू येतो आहे का? तेव्हा महाराज म्हणाले, "तो अभंग आम्हाला सतत ऐकू येत असतो. त्याचा श्रवणयंत्राशी काहीही संबंध नाही."

३५. मूर्तिमंत अमानित्व

श्रीमहाराजांच्या दर्शनाला नेहमी येणारा एक भक्त व्यावहारिक जीवनांतील काही अडचणीत होता. एकदा तो दर्शनाला आलेला होता. काही न बोलताच त्याने नेहमीप्रमाणे श्रीमहाराजांचे दर्शन घेतले आणि श्रीदत्तमहाराजांच्या खोलीतून बाहेर जायला निघाला इतक्यात श्रीमहाराज त्याला म्हणाले, "एकदा पत्रिका कोणाला तरी दाखवून बघा. तेही एक शास्त्र आहे." त्या भक्ताच्या लक्षात आले की आपल्या जीवनांतील

व्यावहारिक अडचणींकडे श्रीमहाराजांचे लक्ष आहे. त्याने लीनतेने विचारले, 'महाराज पत्रिका कोणाला दाखवावी. कोणी चांगले ज्योतिषी माझ्या माहितीत नाहीत.' श्रीदत्तमहाराज म्हणाले, "कोणालाही दाखवावी. श्री.कोडणोकरगुरूजींना दाखवली तरी चालेल."

त्या भक्ताने श्री.कोडणोकर गुरूजींना पत्रिका दाखवली. पत्रिकेचा अभ्यास करून श्री.कोडणोकर गुरूजींनी सांगितले की 'शनीची पीडा आहे. शनीचा जप करुन घ्यावा. तसेच महालय श्राद्ध करून घ्यावे म्हणजे व्यावहारिक अडचणी दूर होतील. पत्रिकेवरून असे दिसते की आध्यात्मिक प्रगतीची ओढ आहे. परंतु त्यात बरेच प्रतिबंध आहेत. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला नियमितपणे येत जा म्हणजे ते प्रतिबंध दूर होतील.'

त्या भक्ताच्या मनांत क्षणभर विचार आला. आध्यात्मिक प्रगतीबद्दल श्रीकोडणोकर-गुरूजींनी सांगितलेले श्रीमहाराजांच्या चरणी निवेदन करावे किंवा कसे. श्रीमहाराजांचे अमानित्त्व त्याला माहिती होते. श्रीमहाराजांच्या दर्शनाने आध्यात्मिक प्रगतितील प्रतिबंध दूर होतील हे निवेदन करणे श्रीमहाराजांना रुचेल का नाही हे त्याला कळेना. परंतु सद्गुरू आईसारखेच असतात. मुलाने आईला सगळेच सांगायला काही हरकत नसते असा विचार करून तो भक्त हलक्या स्वरात श्रीचरणी निवेदन करू लागला. 'महाराज श्री.कोडणोकरगुरूजी असेही म्हणाले की आध्यात्मिक प्रगतीची ओढ असली तरी पत्रिकेवरून दिसले की त्यांत बरेच प्रतिबंध आहेत. म्हणून श्रीमहाराजांच्या दर्शनाला नियमितपणे येत जा म्हणजे ते प्रतिबंध दूर होतील' असे गुरूजी म्हणाले. त्या भक्ताचे हे शब्द ऐकले आणि श्रीमहाराजांच्या डोळ्यांत खोल अशी तीव्र वेदना उमटली. चेहरा व्याकुळतेने आक्रसल्यासारखा झाला. शरीर क्षणभर थरथरले. एखादा आघात झाल्यावर होते तसे झाल्यासारखे दिसले. ते अतिशय व्याकुळतेने म्हणाले, "आमच्या दर्शनाने काय होणार? देवाचे दर्शन घ्यावे. देवाची प्रार्थना करावी."

श्रीमहाराजांचे ते व्याकुळ शब्द आणि श्रीमहाराजांच्या डोळ्यांत खोलवर उमटलेली ती वेदना पाहून भक्ताला गलबलून गेल्यासारखे झाले. आपल्या निवेदनाने श्रीमहाराजांना व्याकुळतेचा अनुभव घ्यायला आपण कारणीभूत

झालो हा मोठाच अपराध आपल्या हातून घडला याचे त्याला फार वाईट वाटले. त्याने मनोमन कळवळून प्रार्थना केली, 'महाराज, मला क्षमा करा' आणि तो खोलीच्या बाहेर पडला.

श्रीदत्तमहाराजांचे हे मूर्तिमंत अमानित्व पाहून त्याला श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या ओवीची आठवण झाली.

'पूज्यता डोळा न देखावी। स्वकीर्ती कानी नायकावी।
हा अमुका ऐसी नोहे। सेचिलोका।'

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या ओवीत निवेदन केलेले पराकोटीचे अमानित्व येथे मूर्तिमंत साकार होते.

श्रीमहाराजांच्या अमानित्वाच्या या दर्शनाने भक्त प्रभावित झाला. अमानित्व हेच ज्ञान, मान हेच अज्ञान या श्रीमुखांतून एकदा ऐकलेल्या वाक्याची त्याला सतत आठवण राहू लागली. ते वाक्य त्या भक्ताच्या जीवनाचे प्रमख सूत्र बनून गेले.

श्रीमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्याने श्री.कोडणीकर-गुरूजींकडून सर्व यथाशास्त्र करून घेतले. यथावकाश त्या भक्ताच्या व्यावहारिक अडचणी दूर झाल्या.

वस्तुतः सद्गुरूंचा अवतार जीवांना मुक्त करण्यासाठीच आहे. जिज्ञासू भक्तांना मार्गदर्शन करणे, संकटात सापडलेल्या जीवांना त्या संकटातून सोडवणे, अर्थार्थी भक्तांच्या इच्छा पूर्ण करणे ही सगळी कार्य सद्गुरूच करीत आहेत. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे, अधिकाराप्रमाणे त्याचं कार्य करणे हे सद्गुरूचेच सामर्थ्य आहे. परंतु हे कार्य होत असतांना कसलाही कर्तृत्त्व अभिमान नाही. स्वतःच्या शक्तीने कार्य होत असतांनाही ती आपली शक्ती विसरून जाणं हे फार मोठं सामर्थ्य आहे. सद्गुरूरुपाने अवतार घेणाऱ्या ईश्वरालाच हे शक्य आहे. असे परिपूर्ण अमानित्व ही ईश्वरी अवतार ओळखण्याची महत्त्वाची खूणच आहे असे म्हणता येईल.

३६. गुरूकृपा

सद्गुरू श्रीदत्तमहाराजांच्या अगदी निकट असलेले एक साधक आपल्या आठवणी पुढील शब्दांत सांगत आहेत. "वयाच्या ३५व्या वर्षी मी श्रीवासुदेव

निवासमध्ये प्रथम आलो. १९७२ सालचा तो मार्च महिना होता. माझे शिक्षण झालेले नाही. कारण मला नीट बोलता येत नव्हते. मोटार मेकॅनिक म्हणून मी पुणे महानगरपालिकेत नोकरीला लागलो होतो. कपडे मेकॅनिकचे तेलकट कळकट. कोणी मित्र नाही. रोज येऊन वासुदेव निवासमध्ये श्रीगुरूमहाराजांचे दर्शन घेऊ लागलो. मला वाटे महाराजांनी आपल्या मस्तकावर हात ठेवावा. आपल्यावर कृपा करावी. पण कधी बोलण्याचे धाडस झाले नाही."

"१९७३ साल उजाडले. एक दिवशी नेहमीप्रमाणे श्रीगुरूमहाराजांच्या दर्शनास गेलो. घरच्या देवासाठी हाराचा पुडा हातात होता. मी महाराजांना नमस्कार करतांना महाराज म्हणाले,"हार आहे ना पुड्यात?" मी मानेनेच होय सांगितले, त्यावर महाराज म्हणाले, "सोडा तो पुडा आणि मला हार घाला," या वाक्याने मी गहिवरून गेलो. साऱ्या अंगाला कंप सुटला, डोळ्याला अश्रुंच्या धारा लागल्या. थरथरत्या हातांनी श्रीगुरूमहाराजांच्या गळ्यात हार घातला. उरलेली फुले आणि मंजिऱ्या श्रीचरणावर वाहिल्या आणि पायावर डोके ठेवताच रडण्याचा जोरदार हुंदका आला. श्रीगुरूमहाराज वाकले, माझ्या डोक्यावर हात ठेवला. पाठीवर हात फिरवला, बसा म्हणाले, तिथेच त्यांच्याजवळ बसलो. अंगाचा थरकाप होतोय. डोळ्यांतून अश्रु वहाताहेत. चेहरा-डोळे लाल झालेत. आतून आनंद होत होता, परंतु असे होईल असे स्वप्नात वाटले नव्हते. मनात खंत होते तसे न सांगता अचानकपणे घडले. त्या कृपाळूपणाचे ओझे असह्य झाले. माझ्यासारख्या-अपात्र जीवावर केवढे अनंत उपकार."

घरी गेलो. आई-वडिलांना सांगितले. त्यांना समाधान वाटले. वडील म्हणाले, "आता मला तुझी काळजी नाही. मला जे जमले नाही ते तू करून दाखवलेस, धन्य आहे."

'श्रीगुरूमहाराजांनी माझ्यावर कृपा केली. मला दीक्षा दिली. पण मला काही कळले नाही. कृपा झाली म्हणजे काय झाले? गुरू म्हणजे काय? दीक्षा म्हणजे काय? साधना म्हणजे काय? नेमके काय करायचे? हे प्रश्न डोक्यात सुरू झाले. एके दिवशी नेहमीप्रमाणे दर्शनास गेलो. त्यावेळी

महाराज स्वतःहून माझ्याशी बोलले, म्हणाले, "योगवाणी नावाचे छोटे पुस्तक आहे ते घ्या व वाचा. म्हणजे सगळा उलगडा होईल आणि दिगंबराचा जप जमेल तेवढा करीत जा." याही वेळी जे प्रश्न मनांत होते ते महाराजांना विचारले नव्हते. त्याचा उलगडा त्यांनी स्वतःहून केला. संत सत्पुरूष दुसऱ्याच्या मनातले भाव ओळखतात याचे हे दोन अपूर्व अनुभव.

"पुढे १९७४ च्या जानेवारीस श्रीगुरूमहाराजांचे महानिर्वाण झाले. माझ्या डोक्यात पुन्हा विचार येऊ लागले. आपले छत्र गेले. दुसरे महाराज आपल्याला इतके जवळ करतील का? "

आश्रमात श्रीदत्तमहाराजांचे दर्शन होऊ लागले. हळूहळू ओळख-परिचय झाला. मी अत्यंत गरीब परिस्थितीतला कामगार, मेकॅनिकच्या कामामुळे तेलाचे डाग पडलेल्या कपड्यात वावरणारा. मोठ्या लोकांत कसे वागायचे हे काहीच माहित नसलेला, कोणी मित्र नसलेला, अशिक्षित, अडाणी, काही वाचन न झालेला, मुखदुर्बल, अबोल, भिडस्त, अनेक दोषांनी भरलेला. पण श्रीदत्तमहाराजांनी मला एकदम खूप जवळ केले हे त्यांचेच मोठेपण. त्यांच्या अगदी निकट यायला त्यांनी संधी दिली हे केवळ माझे भाग्य !''

''इ.स. १९७६ पासून दरवर्षी श्रीदत्तमहाराजांबरोबर मला गाणगापूर, तुळजापूर वगैरे तीर्थयात्रेला जायची संधी त्यांच्या कृपेने लाभली. आपल्या गुरूंचे समवेत मी यात्रेला जात आहे यातच माझे फार मोठे भाग्य आहे असे मला वाटत असे. गाणगापूरला श्रीदत्तमहाराज यांनी श्रीपादुकांची पूजा केल्यावर गुरूजी मला म्हणाले, ''पादुकांना स्पर्श करा. गंध, अत्तर लावा, फुले वाहा; डोके ठेवा पादुकांवर.'' या भाग्याचे काय वर्णन करावे. संतांची संगत देवाला जवळ करते. या निर्गुण पादुकांची पूजा आपल्या हातांनी घडावी, त्या पादुकांवर डोके ठेवून नमस्काराचा योय यावा, भाग्य देवदुर्लभ नाही कां? दरवर्षी श्रीदत्तमहाराज मला गाणगापूरला बरोबर घेऊन जात असत. भीमा-अमरजा संगमावर त्यांच्या बरोबर स्नान होत असे. ते आमच्या अंगावर पाणी शिंपडत असत. नदीवर स्नानाच्या वेळी आम्ही श्रीदत्तमहाराज यांच्याजवळ रहात असू. त्यांनी तीर्थात बुडी मारल्यावर तो तीर्थाचा प्रवाह आमच्याजवळ आला की आम्ही त्या सद्गुरू तीर्थामध्ये बुडी मारत असू. तो आनंद-उल्हास, ते चैतन्य

काही अलौकिक असे. इ.स. १९९५ पर्यंत तेवीस वर्षे हे भाग्य मिळत राहिले.

श्रीदत्तमहाराज यांच्याबरोबर भोजन प्रसादाचा योगही वारंवार येत असे. आश्रमात ते निमंत्रण देत. श्रीदत्तमहाराज यांचे घरीही भोजन प्रसादाचा योग वारंवार येत असे. अद्यापही ते घरी भोजनप्रसादासाठी बोलवीत असतात. कोणत्या शब्दांत या परमभाग्याचे वर्णन करू? हे माझ्यासारख्या अतिसामान्य, गरीब, मुखदुर्बल, अशिक्षित कामगाराला श्रीदत्तमहाराजांची अशी आत्मीयता लाभणे हे केवढे भाग्य? श्रीदत्तमहाराज माझे खरे पिता व गुरू आहेत.''

''माझ्या ज्येष्ठ मुलीचा विवाह श्रीदत्तमहाराज यांनीच घडवून आणला. आम्ही गरीब. पण स्थळ चांगल्या मानसन्मान असलेल्या घराण्यातील मिळावे ही श्रीदत्तमहाराजांची कृपा. श्रीदत्तमहाराजांनी माझ्या मुलीसाठी एका श्रीमंत मान्यवर घराण्यात शब्द टाकल्यामुळेच हे घडले. साखरपुडा आश्रमात झाला. श्रीदत्तमहाराज स्वतः उपस्थित होते.

दुसऱ्या मुलीचा साखरपुडाही श्रीवामन निवासात झाला. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे अंगात ताप होता. घरचे लोक जाऊ नका म्हणून सांगत होते पण श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''आम्ही येतो म्हणून शब्द दिला आहे, ते वाट पहात असतील. आम्हाला गेले पाहिजे.'' श्रीवामन निवासात साखरपुडा करण्यास श्रीदत्तमहाराजांनीच सांगितले. त्यांचा हेतू हा की, हॉलच्या भाड्याचे पैसे वाचावेत व विवाहाचा खर्च कमी व्हावा. या आत्मीयतेची कृतज्ञता म्हणजे डोळे पाण्याने भरून येण्यात होते. मी काय साधना केली म्हणून त्यांनी माझ्यावर एवढे प्रेम करावे? माझ्या गरीबाच्या लहानशा घरी ते अनेक वेळा आले. अगदी प्रेमाने आपल्याच घरी बसावे तसे बसले. आत्मीयतेने घरातल्या सगळ्यांशी बोलले आणि तुटपुंज्या साधनांनी केलेली सेवा गोड मानून घेतली. कृतज्ञता व आनंद तरी कसा व्यक्त करायचा!

एकदा मी आश्रमातून श्रीदत्तमहाराजांच्या बरोबर त्यांच्या घरी नेहमीप्रमाणे गेलो. त्याचे गाठोडे घेणे एवढे माझे काम. त्यांच्या घरी गेल्यानंतर मी ते गाठोडे घेऊन त्यांच्या घरात गेलो. मी आलो म्हणजे श्रीदत्तमहाराज आले हे त्यांच्या घरातील सर्वांना समजले होते. त्या दिवशी घरात मी बोलत थांबलो. तेवढ्यात मला वाटले, श्रीदत्तमहाराज अजून का बरे घरात आले नाहीत. हा विचार

करीत लगबगीने बाहेर आलो. तो रिक्षा गेलेली. श्रीदत्तमहाराज तिथे अंगणातच काठी टेकून उभे होते. मला कारण काहीच कळले नाही. तेवढ्यात घरातील नातू-सूना वगैरे बाहेर आल्या. तेव्हा त्यांनी विचारले, ''महाराज, इथे उभे का? घरात या ना!''

तेव्हा श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''यांच्या चपला येथे आहेत, बाहेरच्या एका कुत्र्याने अनेक चपला येथून नेल्या आहेत, म्हणून थांबलो होतो'' आणि मग माझ्या लक्षात आले ते परमेश्वरस्वरूप सद्गुरू माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या तुटक्या झिजलेल्या चपलांची राखण करीत तेथे उभे राहिले होते. काय बोलावे हेच मला कळेना. मी स्तंभित होऊन पहातच राहिलो. मजकडे पाहून अत्यंत ऋजू सौम्य शब्दांत श्रीदत्तमहाराज म्हणाले, ''चपला आतल्या बाजूला ठेवीत जाव्यात म्हणजे कुत्रा घेऊन जाणार नाही.''

''परमेश्वर यापेक्षा काही वेगळा असू शकेल का ?''

३७. शस्त्रक्रियेच्यावेळी उपस्थिती

हा अनुभव राष्ट्रीयकृत बँकेत काम करणाऱ्या एका व्यवस्थापकाचा आहे. त्यांनी सांगितले की, त्यांच्या पोटावरची शस्त्रक्रिया करण्यासाठी जेव्हा भूल दिली तेव्हा त्यांचे शरीर बधीर झाले, परंतु त्यांची जाणीव लोपली नाही. त्यांना सतत असे दिसत राहिले की ऑपरेशन थिएटरमध्ये कोपऱ्यात श्रीदत्तमहाराज आणि सौ.ताईमहाराज उपस्थित आहेत आणि त्यांच्या शस्त्रक्रियेवर देखरेख करीत आहेत. संपूर्ण शस्त्रक्रिया होईपर्यंत हे दोघेही तेथे उपस्थित होते असे त्या साधकाला जाणवत राहिले. त्यामुळे त्या साधकाला मोठाच धीर वाटला आणि जणू काही दुसऱ्या एखाद्याची शस्त्रक्रिया दुरून बघावी तशा तटस्थ भावनेने तो त्याची स्वतःची शस्त्रक्रिया बघत राहिला.यथावकाश शस्त्रक्रिया पूर्ण झाली आणि संपूर्णतया यशस्वीही ठरली.

शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याने चौकशी केली तेव्हा इतर डॉक्टरांना आणि सेविकांना श्रीदत्तमहाराज आणि सौ.ताईमहाराज यांचे ऑपरेशन थिएटरमधील अस्तित्व जाणवलेले नव्हते असे त्या भक्ताला आढळले.

एका भक्ताची एक मोठी शस्त्रक्रिया मद्रासला झाली. शस्त्रक्रियेच्या वेळी ऑपरेशन थिएटरमध्ये त्या भक्ताला असे जाणवत राहिले की, तो जालना येथे

श्रीदत्त आश्रमात नेहमीप्रमाणे वावरत आहे आणि श्रीदत्तमहाराज आणि सौ.ताईमहाराज यांच्या उपस्थितीत नित्याप्रमाणे आश्रमात कार्यक्रम चालू आहेत. श्रीदत्त आश्रमात उत्सव संपन्न होताना जसे पावित्र्याने भारलेले वातावरण असते तसेच या साधकाला सतत जाणवत राहिले.

शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्या साधकाला हॉस्पिटलमधील स्पेशन रूममध्ये विश्रांतीसाठी व पुढील उपचारांसाठी तीन दिवस ठेवण्यात आले. या तिन्ही दिवसांच्या हॉस्पिटलमधील वास्तव्यात त्या साधकाला सौ.ताईमहाराज तेथे प्रत्यक्ष उपस्थित आहेत असे सतत जाणवत राहिले. त्याने डोळे मिटले की सौ.ताईमहाराजांची ध्यानस्थ मूर्ती त्याला मिटल्या डोळ्यासमोर दिसत राहिले. झोपतही त्याला श्रीदत्त आश्रम व सौ.ताईमहाराज यांचीच स्वप्ने पडत. तो जागा असतांना डोळे उघडून त्याने अनेक वेळा सर्व दिशांना पाहिले. प्रत्यक्ष डोळ्यांनी त्याला ताईमहाराजांचे दर्शन कधीही झाले नाही. परंतु ताईमहाराज त्या खोलीत ध्यानस्थ बसल्या आहेत असे सतत जाणवत राहिले. यामुळे त्याचे आरोग्य अत्यंत झपाट्याने सुधारत गेले. तिसऱ्या दिवशी हॉस्पिटलमधून घरी सोडतांना डॉक्टरांनी असे उद्गार काढले की त्या साधकाची तब्येत अपेक्षेपेक्षा खूपच लवकर सु धारली होती.

३८. अचूक रोगनिदान, सुयोग्य उपाययोजना

मुंबईचा एक भक्त बराच आजारी झाला. काही महिन्यांपूर्वीच त्याचे हृदयशस्त्रक्रियेचे ऑपरेशन झालेले होते. त्यातून तो हळूहळू बरा होत असतांनाच नवा आजार आला होता. त्या भक्ताचा आजार एकदम वाढला. डॉक्टरी उपचार चालू असूनही एक आठवड्यात आजाराने अक्राळविक्राळ रूप धारण केले. डॉक्टर हतबद्ध झाले. तपासण्या झाल्या. पण निदान होईना. काय औषधे द्यावीत हेच डॉक्टरना कळेना. भक्ताला एवढा अशक्तपणा आला की स्वतःला एक पाऊलही पुढे टाकवेना. स्वतःची आंघोळही करणे त्याला जमेना. जेवायला उठून बसायलाही त्रास होऊ लागला.

त्या भक्ताने पुण्याला रेणुकानिवासमध्ये फोन केला. डॉ.अशोकमहाराज फोनवर आले. त्या भक्ताने धापा टाकतच प्रयत्नपूर्वक शब्द फोनवर उच्चारले, ''महाराजांना निवेदन करावे. मला फारच बरे वाटत नाहीए. तपासण्या झाल्या पण निदान होत नाहीए. काय औषधे द्यावीत हे डॉक्टरांना सूचत नाहीए.''

डॉ.अशोकमहाराज म्हणाले, "श्रीमहाराज इथेच बसले आहेत, आपण त्यांच्याशी बोला." एवढे बोलून डॉ.अशोकमहाराजांनी फोन श्रीमहाराजांच्या हाती दिला. तो भक्त महाराजांना म्हणाला, 'महाराज अगदीच बरे वाटत नाहीए.'

श्रीदत्तमहाराज एकदम म्हणाले, "ऑपरेशन करून घ्यावे ताबडतोब, म्हणजे बरे वाटेल." त्या भक्ताने म्हटले 'जशी आज्ञा.''

फोन बंद झाला. ऑपरेशन कसले? कोठे करायचे? कोण डॉक्टर? असे विचार मनांत येत आहेत तोच त्या भक्ताला एकजण भेटायला म्हणून आला. तो त्या भक्ताच्या पत्नीला म्हणाला, माझे काका मोठे डॉक्टर आहेत. ते मद्रासच्या अपोलो हॉस्पिटलचे संस्थापक विश्वस्त आहेत. त्या हॉस्पिटलांत सर्व प्रकारच्या सोयी आहेत. तेथेच सर्व उपचार करूया.

त्या भक्ताच्या पत्नीलाही ते पटले. त्या म्हणाल्या, 'ठीक आहे, तसेच करूया.' त्या विद्यार्थ्याने मद्रासला काकांच्या घरी फोन लावला. त्याचे काका चीनला एका परिषदेसाठी बीजींगला गेलेले होते. काकांच्या घरून चीनमधील बीजींगच्या हॉटेलचा दूरध्वनी क्रमांक घेऊन त्या विद्यार्थ्याने चीनला फोन लावला. स्थानिक कॉल लागावा तसा एका क्षणात आयएसडी फोन लागला. काका स्वतःच फोनवर आले. त्या विद्यार्थ्याने भक्ताच्या आजारीपणाची वार्ता सांगितली व फोन भक्ताच्या हातात दिला. डॉक्टरांनी फोनवरूनच सर्व लक्षणे त्या भक्ताला विचारली आणि मनाशीच काही उपाययोजना निश्चित करून सांगितले. "मी परवा विमानाने मद्रासला पोचतो आहे. आपणही तेथे विमानाने यावे. तडक अपोलो हॉस्पिटलमध्येच यावे. मी बघता.''

भक्ताच्या पत्नीला तो विचार पटला. लगेच भक्ताच्या पत्नीनी मद्रासला अपोलो हॉस्पिटलला एस्.टी.डी. फोन लावला. खोली आरक्षित केली. मद्रासच्या विमानाची तिकीटे काढली.

त्या भक्ताने रेणुकानिवासमध्ये फोन लावला. फोनवर सौ.सवितावहिनी आल्या. त्या भक्ताने मद्रासला अपोलो हॉस्पिटलमध्ये परवा जात असल्याचे श्रीमहाराजांना सांगावे अशी विनंती केली. सौ. सवितावहिनी म्हणाल्या,

"मी महाराजांच्या कानावर घालते, काळजी करू नका. महाराज सांभाळणारे आहेत, तेच सर्व काही करून घेतील."

तिसऱ्या दिवशी तो भक्त, त्याची पत्नी व मुलगा विमानतळावर टॅक्सीने जायला निघाले. टॅक्सीतून विमानतळाकडे जातांना वाटेतच भक्ताची प्रकृती एकदम बिघडली. तो अत्यवस्थ झाला. त्याला श्वास लागला. तो श्वासासाठी धापा टाकू लागला. त्याच्या पोटात सर्व आतडी गोळा होऊन आली. त्याने मान खाली टाकली. भक्ताचा मुलगा घाबरला. तो आईला म्हणाला, "आई बाबा मद्रासपर्यंत कसे पोचणार? मद्रासला जायचं रद्द करूया." टॅक्सी ड्रायव्हर म्हणाला, 'ये बहुत बीमार लगते हैं। आप रिस्क न लिजीये। एअरपोर्ट न जायोए। बम्बईमेंही कोई बडे हॉस्पिटलमें ले चलते हैं।

सामान्य स्त्री खचून गेली असती. तिचा धीर सुटला असता. पण भक्ताच्या पत्नीच्या अंगी सर्व धैर्य एकवटून आले, निर्धाराने त्या म्हणाल्या, 'नाही मद्रासलाच जायचं, काय होईल ते होऊ दे.' त्यांनी आठवणीने स्वतः पर्समध्ये आपत्कालीन औषधाच्या गोळ्या ठेवल्या होत्या. त्या त्यांनी काढल्या व भक्ताचे तोंड आपल्या हाताने उघडून त्या गोळ्या त्याच्या तोंडात घातल्या. त्यामुळे त्या भक्ताला श्वास घ्यायला थोडे सुकर झाले, धाप कमी झालो. भक्ताच्या पत्नी टॅक्सी ड्रायव्हरला म्हणाल्या, "चालू द्या टॅक्सी पुढे, विमानतळावरच जाऊया."

विमानतळावर स्ट्रेचर नव्हते, पत्नींनी व्हीलचेअर मागवली व त्या भक्ताला व्हीलचेअरमध्ये बसवून विमानाकडे निघाल्या. मुलाने तिकीटे दाखवून बोर्डींग पास आणले. भक्ताचे गंभीर आजारपण पाहून विमान अधिकारी त्याला विमानात घेईनात. विमानातच काही बरेवाईट झाले तर. पण भक्ताच्या पत्नीने निर्धाराने सांगितले,"जबाबदारी आमची, विमान कंपनीवर काहीही जबाबदारी नाही." त्यांनी तसा इंडेम्निटी बाँड भरून सही करून अधिकाऱ्यांना दिला. तेव्हाच अधिकाऱ्यांनी भक्ताला विमानात घेतले.

अपोलो हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी भक्ताला घ्यायला स्वतःची मोटार मद्रास विमानतळावर पाठवली होती. विमानतळावरून सरळ पत्नींनी

भक्ताला अपोलो हॉस्पिटलमध्ये नेले व लगेच कन्सल्टींग रूमकडे व्हील चेअरवरून नेले. बाहेर रोग्यांची मोठी रांग होती. पण डॉक्टरांनी एका क्षणाचाही विलंब न लावता ती पेशंटची रांग तशीच बाजूला ठेवून तपासणीच्या खोलीत भक्ताला घेतलं आणि तपासलं. डॉक्टरांनी ऑपरेशन करायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी ऑपरेशन थिएटरमध्ये घेतल्यावर डॉक्टरांना असे आढळून आले की मागच्या वर्षी जे हृदयाचे ऑपरेशन केले होते त्यात हृदयाला शिवून जोडलेल्या दोन रक्तवाहिन्या सुटल्या होत्या. शिवलेले जोड निखळले होते. त्यामुळे शरीराला रक्तपुरवठा होत नव्हता. फारच क्वचित वेळा असे घडते. हे रोगनिदान बाहेरून तपासून होणे अवघड होते. बाहेरून औषधे देऊन काही उपयोग झाला नसता. त्या रक्तवाहिन्या पुन्हा हृदयाला योग्य जागी शिवणे हा एकच उपाय होता. डॉक्टरानो तसे केले. त्या भक्ताची प्रकृती सुधारू लागली. हळूहळू तो भक्त बरा होत गेला.

त्या भक्ताची अवस्था खरोखरीच गंभीर होती. मुंबईचे डॉक्टरही हतबद्ध झाले होते. तपासण्या करूनही त्यांना रोगनिदान होत नव्हते. पण महाराजांनी पुण्यातून फोनवर सूचना केली,"ऑपरेशन करून घ्यावे." सारी चक्रे आपोआप फिरली. एरव्ही ज्यांची अपॉइन्टमेंट दोनदोन महिने मिळत नाही ते ज्या आजारासाठी हवे असलेले तज्ज्ञ डॉक्टर देहाने परदेशात गेले असूनही त्यांचे नाव पत्नीच्या पुढे येताच काही क्षणात फोनवर उपलब्ध झाले. फोनवरून त्यांनी लक्षणे समजून घेतली व उपाययोजना निश्चित केली. तीन दिवसात ऑपरेशनही झाले.

उपचारासाठी हवे असलेले तज्ज्ञ निष्णात डॉक्टर काही क्षणातच कसे उपलब्ध झाले? आपत्कालीन औषधाच्या गोळ्या पर्समध्ये ठेवायची बुद्धी पत्नींना कोणी दिली? श्वासासाठी धापा टाकणाऱ्या अत्यवस्थ पतीला समोर पाहूनही न डगमगता नियोजित प्रवास स्थिरचित्ताने पुरा करण्याचे असामान्य धैर्य पत्नींना कोणी दिले? तात्काळ सुयोग्य उपाययोजना आपोआप कशी होत गेली? हे सगळे योगायोगच आहेत का? या प्रश्नांची उत्तरे ज्याची त्याने ठरवायची आहेत.

३९. डॉक्टरांचे डॉक्टर

श्रीदत्तमहाराज म्हणजे चैतन्याचा केवळ गाभाच. आपल्या जीवघेण्या आजाराचा उपयोगसुद्धा भक्तांचा उद्धार करण्यासाठी कसा करून घेतला हे सांगण्यासाठी ही आठवण.

इ.स.१९९१ मध्ये श्रीरामनवमीच्या पवित्र दिवशी श्रीदत्तमहाराजांनी पुणे येथे श्रीवामन निवासच्या पवित्र वास्तुमध्ये श्रीतुळजाभवानी आरोग्यधामची स्थापना केली. डॉ.अरुंधती मानवी एम्.डी.(मेडिसिन) या त्यांच्या अनुगृहीत डॉक्टरांना बोलावून त्यांच्या द्वारा आरोग्यविषयक विश्वस्त न्यासाची स्थापना केली आणि आरोग्यधामाचे सर्व कार्य त्यांच्यावर सोपविले. दुर्दैवाने कांही मान्यवर भक्तांनी डॉ.मानवी यांची हे कार्य करण्याची क्षमता व अधिकार याबद्दल शंका व्यक्त करण्यास सुरुवात केली. कांही भक्तांनी तर कोणी अधिकारी वयस्कर डॉक्टरांची नेमणूक करण्यासंबंधी आपले विचार श्रीदत्तमहाराजांपुढे मांडले. परंतु श्रीदत्तमहाराज काहीच बोलले नाहीत. त्यांनी याबाबत मौन धारण केले.

या संदर्भात श्रीदत्तमहाराज कोणाची बाजू घेतात याचे कुतूहल अनेक मान्यवर भक्तांना वाटत होते. श्रीदत्तमहाराज नित्य नियमाप्रमाणे प.प.श्रीनारायणस्वामी-महाराजांच्या उत्सवासाठी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे मुक्कामासाठी गेले. चारच दिवसांनी पुण्यात फोन आला की श्रीदत्तमहाराजांना अत्यंतिक धाप लागत असून तब्येत अतिशय खराब आहे. त्याही अवस्थेत श्रीदत्तमहाराजांनी श्रीनारायणस्वामींच्या मठात अर्धा तास पुराणसेवा केली. त्यामुळे त्यांची तब्येत खूपच बिघडली आहे. मिरजेच्या डॉ. प्राणी इत्यादी जेष्ठ डॉक्टरांनी श्रीदत्तमहाराजांना अतिदक्षता विभागात हलविण्याचा सल्ला दिला आहे आणि तेथील हृदयरोगतज्ञांनी तर ऑक्सिजन देण्यासही सांगितले आहे असे दुरध्वनीवरून रेणुकानिवास येथे कळविण्यात आले !

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे ऑक्सिजन सिलिंडर कोठून मिळणार? श्रीदत्तमहाराज तर श्रीनारायणस्वामींच्या उत्सवातील महापूजा झाल्याशिवाय नृसिंहवाडी सोडण्यास तयार नव्हते. त्यामुळे दर तासाला त्यांच्या तब्येतीत जास्तच बिघाड होऊ लागला. अशावेळी पुण्यातील एक सद्भक्त आणि

श्रीदत्तमहाराजांच्या डॉक्टर या दोन्ही नात्यांनी डॉ. अरुंधती मानवी रात्री श्रीवाडी येथे जाण्यास निघाल्या. त्यांनी ऑक्सिजन सिलिंडर व आपत्काली लागणारी सर्व औषधे व उपकरणे बरोबर घेतली होती. श्रीदत्तमहाराज रूग्णवाहिकेतून पुण्याला येणार नाहीत असा निरोप होता. त्यामुळे इच्छा असूनही डॉ. मानवी रूग्णवाहिका बरोबर नेऊ शकल्या नाहीत. ॲम्बॅसिडर गाडी घेऊनच त्या वाडीला गेल्या.

डॉ. मानवी वाडीला पहाटे पोचल्या. त्यांनी श्रीदत्तमहाराजांना लगेच तपासले. त्यांना आढळले की श्रीदत्तमहाराज हृदयविकाराने आजारी असून दुर्धर अवस्थेमध्ये होते. त्यांच्या डॉक्टरी ज्ञानाप्रमाणे (Acute left ventricular failure) म्हणजे हृदयाचा डावा भाग जवळ जवळ निकामी झाला होता. त्यामुळे त्यांची श्वासाची गती एक मिनिटाला ४० ते ४२ इतकी तीव्र झाली होती. नाडी अनियमित व जलद होती. (सामान्यपणे नाडी ७० ते ८८ असते. पण श्रीदत्तमहाराजांची नाडी १२० ते १४० यामध्ये कमी जास्त होत होती.) ब्लड प्रेशर कमी झाले होते. प्रचंड धाप लागली होती. अशक्तपणामुळे तोंडातून शब्दही काढणे त्यांना अशक्य झाले होते.

डॉ. मानवी यांनी ताबडतोब ऑक्सिजन चालू केला. त्यामुळे श्रीदत्तमहाराजांची धाप काहीशी कमी झाली. श्रीदत्तमहाराजांनी डोळे उघडून डॉ. मानवींकडे पाहिले आणि काहीसे हसून अत्यंत खोल गेलेल्या आवाजात त्यांनी डॉ. मानवींना प्रश्न केला, ''काय हो तुमच्या बहिणीची बदली झाली का !''

हा प्रश्न ऐकून डॉ. मानवींना आश्चर्याचा धक्काच बसला. कारण जेव्हा प्रथम पुण्यात महाराजांची तब्येत खराब आहे ही बातमी कळली तेव्हा डॉ. मानवी वासुदेव निवासमधील मठामध्ये श्रीदत्तमहाराजांच्या फोटोसमोर बसून नित्याची साधना करीत होत्या. त्यावेळी त्यांनी मनांतल्या मनांत श्रीदत्तमहाराजांच्या चरणी याचना केली होती की त्यांच्या भगिनींची बदली पुण्यात व्हावी ही त्यांची प्रार्थना सद्गुरूंपर्यंत पोचली होती हे उघड झाले होते. ही या मनाची खूण त्या मनाला पटली.

परंतु स्वतः श्रीदत्तमहाराज अत्यवस्थ असतांनासुद्धा तशा प्राणांतिक अवस्थेमध्येही केवळ भक्तांचेच विचार मनांत होते. सद्गुरूचीही भक्तवत्सलता

पाहून डॉ. मानवींचे हृदय हेलावून गेले. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. क्षणभर त्यांच्या तोंडातून शब्दही फुटेना.

मोठ्या प्रयत्नांनी स्वतःला सावरून नेहमीच्या शांत स्वरांत त्या महाराजांना म्हणाल्या, '' महाराज, ते बदली बिदलीचे राहू दे ! आधी आपण बरे व्हा ! त्यातच सर्व कांही आले ! आपण लवकर पुण्याला जाऊ व नेहमीच्या आपल्या डॉक्टरांचे औषध सुरू करू !''

श्रीदत्तमहाराजांनी क्षणभर त्यांच्याकडे रोखून पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीचे ईश्वरी हास्य तरळले आणि ते डॉ. मानवींना हसून म्हणाले, ''दत्तप्रभुंच्या या पावनक्षेत्री काय व्हायचे ते होऊ दे !''

डॉ. मानवींनी भराभर औषधे काढली. शिरेमधून 'लॅसिक्स', 'लॅनोक्सिन' अशी इंजेक्शने दिली. तोंडाने 'टेरिफायलिन' आणि 'सिप्लॉक्स' या गोळ्या दिल्या. वर कोमट पाणी दिले ! श्रीदत्तमहाराजांना एवढी धाप लागत होती की त्यांना आडवे झोपणे अशक्य झाले होते. बसणे तर त्याहून अवघड जात होते. परंतु औषधे व इंजेक्शने दिल्यावर अर्ध्या तासातच श्रीदत्तमहाराजांचा दम हळूहळू कमी होऊ लागला. ऑक्सिजन सतत दिला जात होता.

श्रीदत्तमहाराजांचा दम कमी झाल्यावर डॉ.मानवींनी ऑक्सिजन थोडा मंद केला. मग एक तासभर श्रीदत्तमहाराजांना शांत झोप लागली. ब्लड प्रेशर पूर्ववत आले. नाडी अनियमितपणे चालत होती, ती पुष्कळशी नॉर्मल रेटवर (८० ते ९० प्रती मिनिट) चालू लागली. परंतु श्रीदत्तमहाराजांना वारंवार लघुशंकेसाठी जावे लागू लागले. हा औषधांचा परिणाम होता. पण एकदाही श्रीदत्तमहाराजांनी अंथरूणावर युरीन पॉट घेण्यास संमती दिली नाही. दरवेळेला अंथरूणावरून स्वतः उठून ते सुमारे तीस फूट अंतरावर लांब असलेल्या स्नानगृहाकडे जात राहिले.

मेडिकल सायन्समधील लक्षणांप्रमाणे श्रीदत्तमहाराजांना हृदयविकाराचा अत्यंत तीव्र झटका आला होता. ते अत्यवस्थ अवस्थेत होते. अंथरूणातून उठणे किंवा कोणत्याही प्रकारची शारीरिक हालचाल करणे अत्यंत धोक्याचे होते. डॉ. मानवींचे मेडिकल शास्त्राचे ज्ञान त्यांना सांगू लागले की इतका तीव्र झटका आलेले फारच थोडे रूग्ण वाचण्याची शक्यता असते. अशा रूग्णाला

पूर्ण बेडरेस्ट-पूर्ण विश्रांती घेण्याची आवश्यकता असते. डॉ. मानवींनी तसे श्रीदत्तमहाराजांना सांगून बघितले पण श्रीदत्तमहाराज फक्त हसले. त्यांनी अंथरूणावरून उठून स्नानगृहाकडे जाणे सोडले नाही. ते पाहून डॉ. मानवींचा जीव अत्यंत व्याकुळ झाला.

त्यांनी श्रीदत्तमहाराजांना ताबडतोब पुणे येथे नेण्याचे ठरवले आणि त्या काहीशा विकल स्वरात श्रीदत्तमहाराजांना म्हणाल्या, ''महाराज आपण पुण्याला जाऊ या. तेथे घरात सर्व सोयी जवळच आहेत. शिवाय सौ.आईमहाराज किती व्याकुळ होऊन आपली वाट पहात आहेत. पुण्याला श्रीवासुदेव निवासमध्ये श्रीनारायण स्वामींचा उत्सव आहेच की ! तेथे आपण सेवा करू! येथे आता रहाणे नको.''

श्रीदत्तमहाराज हसले आणि शांतपणे म्हणाले, ''ठीक आहे. आजची महापूजा करुन मग दुपारी चार वाजता पुण्याला जाण्यासाठी निघूया.''

सकाळी नऊ वाजता श्रीदत्तमहाराज आंघोळीसाठी उठले आणि स्नानगृहाकडे निघाले. सर्वांनी स्नान राहू द्यावे अशी प्रार्थना केली. पण मंदपणे हसून श्रीदत्तमहाराज स्नानगृहाकडे चालायला लागले. श्री. विद्याधर फडके यांनी व्हीलचेअर पुढे केली. पण ती बाजूला सारून ते चालतच गेले आणि दरवाजा आतून बंद करून घेतला. स्वतःची स्वतः आंघोळ केली. स्वतःचे धोतरसुद्धा स्वतः पिळले.

हे सर्व होत असलेले पाहून सर्वांचीच अवस्था विलक्षण भावविभोर आणि व्याकुळ झाली. श्रीदत्तमहाराज ज्या अवस्थेत होते असे पेशंट अतिदक्षता विभागामध्येच ठेवले जातात. त्यांना अंथरूणावरून अजिबात उठून बसण्याची परवानगी दिली जात नाही. तपासण्या, औषधे देणे, देहाचे विधी वगैरे सर्व काही त्या अंथरूणावर करण्याची डॉक्टरांची आज्ञा असते व ती सर्व पेशंटना काटेकोरपणे पाळावीच लागते.

हे सर्व पहाण्याची सवय असल्यामुळे श्रीदत्तमहाराज अंथरुणावरून उठणे व स्नान करणे पाहून डॉ.मानवी यांचीच नाडी बंद पडायची वेळ आली. अशा हालचाली केल्यामुळे श्रीदत्तमहाराजांच्या हृदयावर किती ताण येईल, त्यांच्या नाडीचे ठोके किती वाढतील, त्यांना किती दम लागेल, त्यांचा श्वासोच्छ्वास

किती अनियमित होईल असे विचार डॉ.मानवींच्या मनांत आले आणि त्यांचे स्वतःचेच हृदय धडधडू लागले . त्यांचे डोळे सजगपणे सर्व पहात होते. त्यांचे कानही सर्व आवाज डॉक्टरी ज्ञानातून जागरूकपणे ऐकत होते. पण डॉक्टरच्या अधिकाराने किंवा भक्ताच्या नात्याने श्रीदत्तमहाराजांना त्या परावृत्त करू शकत नव्हत्या.

त्यांच्या कोमल हृदयाला तो ताण असह्य झाला. क्षणभर त्यांना वाटले काहीतरी विचित्र घडणार आणि आपले धडधडणारे हृदय एकदम बंद पडणार. काहीशा हताश होऊन त्या एकटक नजरेने स्नानगृहाकडे पहात राहिल्या - सर्वजण तेथेच उभे राहून परमेश्वराची प्रार्थना करत राहिले.

श्रीदत्तमहाराजांनी स्नानगृहाचा दरवाजा उघडला तेव्हा अतिश्रमाने त्यांचा देह अक्षरशः थरथरत होता. जीवाच्या करारानेच ते केवळ उभे होते. तेव्हा श्री.विद्याधर फडके यांनी व्हीलचेअर पुढे करून काहीशा जबरदस्तीनेच त्यांना त्यात बसवले व अंथरूणापर्यंत आणले. पण श्रीदत्तमहाराजांनी अंथरूणावर झोपण्याचे नाकारले. स्वतःला काहीच झालेले नाही अशा आविर्भावाने श्रीदत्तमहाराजांनी सोवळे स्वतः नेसले आणि पाटावर बसून नेहमीप्रमाणे संध्या केली, जपही केला आणि अत्यंत खोल गेलेल्या आवाजात देवळातील महापूजेसाठी कोणकोण जाणार याची चौकशी सुरू केली.

डॉ.मानवींनी त्यांना कॉफी व इतर औषधे दिली. ती घेतल्यावर मात्र डॉ.मानवींच्या प्रार्थनेला मान देऊन श्रीदत्तमहाराजांनी दोन तास विश्रांती घेतली. त्यांना अगदी शांत झोप लागली होती. ऑक्सिजन चालूच ठेवला होता. डॉ.मानवी व इतर भक्त तेथे बसून होते. दुपारी बाराच्या सुमाराला जसे देवळात महापूजेचे विधी सुरू झाले तसे श्रीदत्तमहाराज अंथरूणावरून उठले आणि खाली पाटावर येऊन बसले. एका विलक्षण भावसमाधीत (ट्रान्समध्ये) ते गेले. जणू काही देवळातील पूजेचे सर्व विधी तेच स्वतः करून घेत होते !

दुपारी दोनच्या सुमाराला तेथेच पाटावरच श्रीदत्तमहाराजांनी महाप्रसाद घेतला आणि नंतर थोडी विश्रांती घेऊन पुण्याला जायचा निर्णय जाहीर केला.

अवघे वाडी गाव श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला लोटले. सर्वांना यथासांग दक्षिणा आणि प्रसाद देऊन श्रीदत्तमहाराज व्हीलचेअरमध्ये बसून

देवदर्शनासाठी निघाले. महाराजांची मुख्य देवळात जाऊन पादुकांची दर्शन घेण्याची इच्छा होती. पण अनेक पायऱ्या खाली उतरणे व्हीलचेअरमधून शक्य नव्हते. म्हणून महाराजांचा नाईलाज झाला. ते नारायणस्वामींच्या मठात गेले. स्वामींपाशी येताच श्रीदत्तमहाराजांनी व्हीलचेअर मागे ढकलून दिली, ते उभे राहिले आणि स्वामींचे दर्शन घेऊन स्वतः पायी प्रदक्षिणा घालण्यास आरंभ केला. प्रदक्षिणा झाल्यावर त्यांनी ओट्यावरील सर्व मूर्ती व छायाचित्रे - श्रीटेंबेस्वामीमहाराज, श्रीनारायण-स्वामीमहाराज वगैरे ऋषीवरांचेही दर्शन घेतले. मोठ्या प्रेमाने त्यांनी सर्वांना साष्टांग नमस्कार घातले. वास्तविक उभे रहातांना किंवा प्रदक्षिणा घालतांना प्रचंड धाप लागत होती. एकेक पाऊल टाकतांनाही ते जीवाच्या कराराने चालत होते. चमत्कार वाटावा असे घडत होते. साष्टांग नमस्कार घालतांना मात्र त्यांना काहीही त्रास होत नव्हता तेवढ्यापुरती धाप थांबत होती.

पादुकामंदिराचे कळसदर्शन करून श्रीदत्तमहाराज पुण्याला जाण्यासाठी ॲम्बॅसिडरगाडीत येऊन बसले. गावातील काही लोकांनी रूग्णवाहिकेने (ॲम्ब्युलन्सने) पुण्याकडे जाणे बरे असे सांगून बघितले. पण श्रीदत्तमहाराजांनी त्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनासाठी सर्व गाव लोटला. अनेक लोकांना वाटत होते श्रीदत्तमहाराज एवढे दुर्धर आजारी. आता हे शेवटचेच दर्शन. अनेक भक्तांनी श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला.

श्रीदत्तमहाराजांना एवढा धाप लागत होता की झोपताही येत नव्हते आणि बसताही येत नव्हते. म्हणून ॲम्बॅसिडरच्या मागच्या बाजूला लोड व तक्के ठेवले आणि त्यात श्रीदत्तमहाराजांना बसवले. शेजारी डॉ. मानवी स्वतः बसल्या. ऑक्सिजन लावलेलाच ठेवला. तशा अवस्थेत ॲम्बॅसिडर गाडीचा पुण्याकडील परतीचा प्रवास सुरू झाला ! वाडी ते पुणे या संपूर्ण प्रवासात डॉ.मानवी काळजीपूर्वक श्रीदत्तमहाराजांकडे पूर्ण लक्ष ठेवून होत्या. मधून मधून नाडीवर हात ठेवून तपासत होत्या. गरजेप्रमाणे ऑक्सिजन कमीजास्त तीव्र करत होत्या.

ॲम्बॅसिडर गाडी पुणे शहरात शिरल्यावर डॉ. मानवी श्रीदत्तमहाराजांना म्हणाल्या, ''महाराज आता आपण हॉस्पिटलमध्येच जाऊया''

परंतु श्रीदत्तमहाराजांनी या विनंतीला पूर्ण नकार दिला. त्यांनी गाडी घरीच न्यायला लावली आणि घरी पोचल्यावर आपल्या खोलीत अंथरूणावर जाऊन पहुडले. तेव्हा डॉ. मानवींनी श्रीदत्तमहाराजांचे नेहमीचे तज्ञ आरोग्य सल्लागार डॉ.ह.वि. सरदेसाई यांची मदत घेऊन श्रीदत्तमहाराजांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्याचे ठरविले. त्यांना खात्री वाटत होती की श्रीदत्तमहाराजांना या अवस्थेत पाहून डॉ. ह.वि. सरदेसाई हे श्रीदत्तमहाराजांचे मन वळवतील आणि त्यांना हॉस्पिटलमध्ये जाण्यास तयार करतील.

डॉ.ह.वि. सरदेसाई येईपर्यंत अर्ध्यातासाचा वेळ गेला. काय आश्चर्य ! या अर्ध्या तासातच जादूची कांडी फिरावी तसे श्रीदत्तमहाराजांची तब्येत एकदम सुधारली. त्यांच्या शरीराचे ब्लड सर्क्युलेशन नॉर्मल झाले. फुफ्फुसातील क्रेप्टस् नाहीसे झाले. ब्लड प्रेशर नॉर्मल झाले. श्वास नेहमीच्या गतीवर आला. मात्र नाडी ७० ते ७५ इतकी मंद होती. नाडी थोडी अनियमित होती पण ती तशी बरीच वर्षे होती.

डॉ. सरदेसाईंनी श्रीदत्तमहाराजांना काळजीपूर्वक तपासले व ते डॉ. मानवींना म्हणाले, ''कशाला त्यांच्या इच्छेविरुद्ध उगीच हॉस्पिटलमध्ये नेता? श्रीमहाराजांची तब्येत ठीक आहे. घरीच औषधे देऊया !''

हे शब्द ऐकून डॉ.मानवी अक्षरशः अवाक् झाल्या. जे काही आपण डोळ्याने पहातो आहोत तो चमत्कार आहे का? ते स्वप्न आहे का? त्यांना काहीच कळेना. त्यांनी स्वतःला प्रयत्नपूर्वक सावरले. त्यांच्या मनांत विचार आले, 'खरंच सर्व गोष्टी या महापुरुषाच्या ताब्यात आहेत. यांना माझ्या ट्रीटमेंटची, त्या ऑक्सिजनची, या औषधाची काय आवश्यकता आहे? एका क्षणात तब्येतीवर काबू मिळविण्याची ही काय जादू आहे? ही कोणती शक्ती आहे?

डॉ. मानवी यांनी श्रीदत्तमहाराजांपुढे आपले हे विचार स्पष्ट मांडले. श्रीदत्तमहाराज खळखळून हसले आणि म्हणाले, ''कुंभकाने सर्व काही होते. तसेच याही वेळी झाले आहे.''

डॉ. मानवी म्हणाल्या, ''महाराज एक विचारू का?'' आपणांस नारायणस्वामींच्या मठात प्रदक्षिणा घालतांना प्रचंड धाप लागत होती. पुढे

पाऊल टाकवत नव्हते. पण साष्टांग नमस्कार घालतांना मात्र आपण नेहमीसारखे नॉर्मल होता, धाप लागलेली नव्हती हे आम्ही डोळ्यांनी प्रत्यक्ष पहात होतो. हे कसे काय घडत होते?

श्रीदत्तमहाराज हसून म्हणाले, ''त्यावेळी आम्ही कुंभक करून श्वासोच्छ्वास नियंत्रित करत होतो.''

डॉ. मानवी विचार करू लागल्या. हे शक्य आहे का? डॉक्टरी सायन्समध्ये हे कुठेही असे लिहिलेले नाही किंवा ऐकिवातही नाही. पण ते घडतांना स्वतः त्यांनी डोळ्यांनी बघितले होते. डॉ. मानवींना वाटले माझ्या औषधांनी आणि ऑक्सिजनमुळे श्रीदत्तमहाराज बरे झाले हे खोटे श्रेय घेणे झाले. हा सर्व ईश्वरी सामर्थ्याचा चमत्कार आहे. तो श्रीदत्तमहाराजांनीच स्वतः हेतुपूर्वक घडवून आणला आहे.

या चमत्कारामुळे एक गोष्ट मात्र लगेचच झाली. ती म्हणजे डॉ.मानवींनी श्रीदत्तमहाराजांना अत्यंत गंभीर आजारातून एका दिवसांत बरे केले असे सर्वत्र पसरले. अक्षरशः मृत्यूच्या दाढेतून परत आणले अशी वार्ता सर्वत्र पसरली. त्यामुळे डॉ. मानवी यांच्या आरोग्यधाम चालविण्याच्या योग्यतेबद्दल शंका काढणारे मान्यवर एकदम शांत झाले, चूपचाप बसले.

त्याहून महत्त्वाचे म्हणजे डॉ. मानवींना आपल्या विद्येविषयीचा जो काही अभिमान होता तो पूर्णपणे गळून पडला. विद्येचा अहंकार ही अध्यात्माला अत्यंत बाधक गोष्ट आहे हे त्यांच्या लक्षात आले. या अहंकारामध्ये आपण अडकू नये अशी सद्गुरूंची इच्छा आहे याची त्यांना जाणीव झाली.

तुळजाभवानी आरोग्यधाम चालवतांना योगोपचार आणि आयुर्वेद यावर भर द्यावा असे श्रीदत्तमहाराजांना वाटत होते. तथापि स्वतःला सुशिक्षित व बुद्धिमान समजणारे लोक ते मानतील का? योगशास्त्राच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवतील का? त्यांना उदाहरण देऊन लोकांच्या मनांत तसा विश्वास निर्माण करावा या विचाराने तर श्रीदत्तमहाराजांनी हे सर्व घडवून आणले नाही ना असाही विचार डॉ. मानवी यांच्या मनांत आला. डॉ.मानवींना वाटले या चमत्कारामुळे त्यांच्या स्वतःच्या विचारधारणेत आमूलाग्र बदल घडला आहे. हाच का तो शक्तिपात! हीच का ती वेधदीक्षा ! असेही विचार त्यांच्या मनांत तरळून गेले.

श्रीदत्तमहाराजांना कुंभकाने जे जमले ते इतर रूग्णांना का जमू नये? रूग्णांनी प्रथमपासून योगोपचारांचा अवलंब केला तर त्यांनाही फायदा होईलच ना! ''स्वल्पस्यमपि धर्मस्य त्रायतो महता भयात्।'' हे भगवान श्रीकृष्णांचे गीतेतील वचन श्रीदत्तमहाराज नेहमी सांगत असत. थोडीशी धर्मपरायणता असली म्हणजे त्या भक्ताचे मोठ्या भयंकारक संकटापासूनही भगवान संरक्षण करतात असे श्रीदत्तमहाराज नेहमीच सांगत याची डॉ. मानवींना तीव्रतेने आठवण झाली.

या विचारांपासून प्रेरणा घेऊन श्रीतुळजाभवानी आरोग्यधाममध्ये या पवित्र वास्तूत 'योगोपचार' ही उपचारप्रणाली सुरू करण्यात आली आहे. ती आजही तशीच चालू आहे. इतर रूग्णालयांसारखे हे रूग्णालय नाही. येथे ईश्वरी शक्तीचे अधिष्ठान ठेवून मुख्यतः योगोपचाराने विविध व्याधींवर उपचार केले जातात. हजारो लोकांना त्याचा मोठाचा फायदा होत आहे. अनेक रूग्ण सांगत असतात, झालेला फायदा त्यांच्या कल्पनेच्या पलीकडे होता. अनेकजण म्हणतात, एखादा चमत्कार म्हणावा इतके बरे वाटले. ही सर्व श्रीदत्तमहाराजांचीच कृपा आहे, शक्तिस्वरूपिणी श्रीतुळजाभवानीमातेचीच कृपा आहे असे म्हणून अनेक रूग्ण सद्गदीत होतात आणि उपचार करणाऱ्या डॉ.मानवींना श्रद्धेने व भक्तिभावाने वंदन करतात.

४०. आगळी गुरूपौर्णिमा

मबईचे एक भक्त गुरूपौर्णिमेला पुण्याला श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनासाठी जात असत. एका वर्षी व्यावसायिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांना पुण्याला जाणे शक्य नव्हते. मुंबईत काही ठिकाणी श्रीदत्तमहाराजांचे भक्त गुरूपौर्णिमेचा उत्सव साजरा करतात. दैववशात त्या भक्ताला तेथेही जाणे शक्य झाले नाही.

त्यामुळे गुरूपौर्णिमेच्या दिवशी तो भक्त अतिशय उदास झाला. मनातल्या मनांत श्रीदत्तमहाराजांचे स्मरण करीत राहिला.दिवसभर त्याच्या मनांत गुरूपौर्णिमेला पुण्याला जाता आले नाही याबद्दलची खिन्नता होती.

गुरूपौर्णिमेच्या दिवसानंतर चारपाच दिवसांनी साधकाला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात साधकाला असे दिसले की, तो गुरूपौर्णिमेच्या उत्सवासाठी वासुदेव निवासमध्ये पुण्याला आलेला आहे. शेकडो भक्त उत्सवासाठी तेथे आलेले त्याला दिसले. कोणी आपापसात गप्पा मारीत होते, कोणी फराळ

करीत होते, कोणी पोथी वाचत होते, कोणी झोपले होते, काही भक्त ध्यान करीत होते. त्या भक्ताने विचार केला की स्नान केला की आज गुरूपौर्णिमेचा दिवस आहे.आपणही इतर भक्तांप्रमाणेच स्नान करावे आणि श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आतल्या खोलीत जावे.

स्नान करण्यासाठी तो भक्त वासुदेव निवासमधील स्नानगृहांकडे गेला. परंतु आश्रमातील सर्व स्नानगृहांसमोर स्नान करण्यासाठी हातात कपडे घेऊन उभे असलेल्या भक्तांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. त्या साधकाला रांगेत उभे राहून सुद्धा लवकर स्नान करायला संधी मिळेल असे दिसेना. त्या भक्ताचा मनांत लवकरात लवकर श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला जावे हाच एक विचार होता. तो तेथेच उभा असतांना गावांत रहाणारा त्याचा धाकटा सख्खा भाऊ तेथे आला आणि त्या साधकाला म्हणाला, ''तू आजारी आहेस. असे रांगेत उभे रहाणे, स्नान करणे वगैरे तुला झेपायचे नाही. तुझ्याच्याने हे असले श्रम व्हायचे नाहीत. तुझ्या आरोग्याला गरज असलेली तुझी सोय इथे व्हायची नाही. तुला गुरूपौर्णिमेच्याच उत्सवात सहभागी व्हायचे आहे ना? माझ्याबरोबर चल. जवळच एका बंगल्यात गुरूपौर्णिमेचा मोठा उत्सव असतो. तेथे जाऊया. तेथे तुझी उत्तम सोय मी करून देतो.''

त्या भक्ताला श्रीदत्तमहाराजांच्याशिवाय दुसऱ्या कोणाकडेही गुरूपौर्णिमेच्या उत्सवासाठी जाणे बरे वाटेना. परंतु एवढ्या कळकळीने आपला भाऊ सांगतो आहे म्हणून भावाच्या हृदयातील भावनांचा हिरमोड करावा असेही वाटेना. तो सौम्य शब्दांत भावाला म्हणाला, ''तू हो पुढे. जमलं तर मी तेथे येतो.''

भाऊ निघून गेला. स्नानगृहात स्नान करायला गेलो तर बराच वेळ जाईल म्हणून तो भक्त नळावर गेला. त्याने बॅग व कपडे बाजूला ठेवले व तो गार पाण्यानेच नळाखाली आंघोळ करू लागला. त्याला गार पाण्याने स्नान करताना बघून एक वृद्ध साधिका कळवळून म्हणाल्या, ''अहो गार पाण्याने स्नान कशाला करता? मी तुम्हाला येथेच बादलीतून गरम पाणी आणून देते.''

पण त्या भक्ताला वाटले. त्या बाईंनी गरम पाणी आणून देण्यात बराच वेळ जाईल. त्यांनी काही न बोलता मानेनेच नकार दिला आणि नळाखालीच

स्नान पूर्ण केले. स्नान होताच त्याला दिसले की त्याने बाजूला काढून ठेवलेले त्याचे कपडे चोरीला गेले आहेत. टॉवेलही गेला आहे, चपला व बॅगही चोरीला गेल्या आहेत. अंगावरील भिजलेल्या लंगोटीशिवाय त्याच्या जवळ काहीच उरले नव्हते.

त्याने कोणाकडे तरी टॉवेल किंवा कपडे मागितले असते तर कोणीही साधकाने आणून त्याला ते दिले असते. पण त्याला कोणाशी बोलावे असे वाटेना. काहीशा अंतर्मुख अवस्थेत तो गेला होता. तोंडातून शब्द काढणेही त्याला नको वाटत राहिले. तसेच ओलेत्याने श्रीदत्तमहाराजांकडे जाण्याचे त्याने ठरवले. लोक काय म्हणतील याचा विचार न करता तो तसाच ओलेत्याने उघडाच श्रीदत्तमहाराजांच्या खोलीत गेला.

त्याला वाटले होते. श्रीदत्तमहाराजांच्या खोलीत खूप भक्तांची गर्दी असेल. पण तेथे काहीच गर्दी नव्हती. दोन-तीन साधक व दोन-तीन मुले एवढेच लोक तेथे होते.

त्याला वाटले, त्याला असा उघडा आणि ओलेता पाहून ते भक्त आणि ती मुले काहीशा विचित्र नजरेने त्याच्याकडे पहातील. पण तसे काहीच घडले नाही. त्या सेवेत असलेल्या दोनतीन साधकांना काहीच वाटले नाही. खोलीतील दोन तीन मुले श्रीकृष्णाच्या जेवणावरील नाटक खेळत होते. एक छोटा यशोधन सारखा दिसणारा भक्त श्रीकृष्ण झाला होता. त्याच्या डोक्यावर मोरपिसाचा मुकुट होता. हातात बासरी होती. पिवळा पीतांबर अंगावर होता. दोन मुले गोप बाळ झाली होती. त्यांचे श्रीकृष्णाचे नाटक श्रीदत्तमहाराज मोठ्या कौतुकाने पहात होते. तो भक्त तसाच ओलेत्याने उघडा श्रीदत्तमहाराजांपुढे गेला. अत्यंत प्रेमभरल्या नजरेने, ओथंबलेल्या भक्तीभावनेने त्याने हात जोडले आणि तो श्रीदत्तमहाराजांची श्रीमूर्ती पाहू लागला.

श्रीदत्तमहाराजांनी आपली कृपादृष्टी त्याच्याकडे वळवली. प्रेमभरल्या नजरेने त्यांनी क्षणभर भक्ताकडे पाहिले. श्रीदत्तमहाराजांची कृपादृष्टी भक्तावर पडताच त्याचे देहभान हरपले. दिशा, काळ, स्थळ यांच्या पलीकडे असलेली निर्विकल्प समाधीची अवस्था त्या भक्ताला प्राप्त झाली. अपार शांतीमध्ये तो बुडून गेला. 'मी'ची जाणीवही लोपून गेली.....

स्वप्न संपल्यावर तो भक्त जागा झाला. तेव्हा त्या भक्ताला जाणवले की, ती शांती तो तशीच अनुभवतो आहे. हा शांतीचा अनुभव अनेक महिने टिकून राहिला...

४१. चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम्"

एका भक्ताची उत्कट इच्छा होती की त्याच्या डोक्यावर श्रीदत्तमहाराजांनी आपले दोन्ही हात ठेवावेत. परंतु श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला गेले की तेथे ठेवलेली पाटी त्याला दिसत असे. 'कृपया दूरूनच दर्शन घ्यावे.'

ती पाटी पाहून त्याला आपली इच्छा श्रीदत्तमहाराजांच्या चरणी सादर करायचे धैर्य होत नसे. अनेक दिवस तो विचार करीत होता. शेवटी एक दिवस त्या भक्ताने आपली इच्छा डॉ.अशोकमहाराजांच्या कानावर घातली. त्याला वाटले आता डॉ.अशोकमहाराज काय म्हणतात कोणास ठाऊक. परंतु डॉ.अशोकमहाराज हसले आणि प्रसन्नपणे म्हणाले,"महाराजांची प्रार्थना करा."

त्या भक्ताने अधीरतेने विचारले, "केव्हा ही प्रार्थना महाराजांच्या चरणी सादर करू?" त्याची अधीरता पाहून डॉ.अशोकमहाराज पुन्हा हसले नि म्हणाले, "उद्या सकाळी या. साडेबारा वाजता श्रीमहाराज स्नानाला जातात, तेव्हा श्रीमहाराजांचे दर्शन घ्या व त्यांना आपली प्रार्थना सादर करा." डॉ.अशोकमहाराजांचे हे बोलणे ऐकून त्या भक्ताला खूपच आनंद झाला. आता आपली इच्छा नक्कीच पूर्ण होणार.

दुसऱ्या दिवशी तो श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला महाराजांच्या घरी गेला. त्यावेळी घरात डॉ.अशोकमहाराज नव्हते. भक्ताला वाटले डॉ.अशोकमहाराज घरात असते तर बरे झाले असते. एवढ्यात श्रीमहाराजांनी त्या भक्ताला आत बोलावले. समोर ठेवलेल्या खुर्चीवर बसायला सांगितले.

त्या भक्ताने लीनतेने प्रार्थना केली, "महाराज, आपले हात आपण माझ्या डोक्यावर ठेवावत अशी प्रार्थना आहे."

श्रीदत्तमहाराज म्हणाले, "प्रार्थना देवाची करतात. देवाकडे प्रार्थना करा" श्रीमहाराजांनी ऋजु शब्दात त्या भक्ताला स्पष्टपणे नकारच दिला होता.

त्या भक्ताने पुन्हा हात जोडले नि पुन्हा लीनतेने म्हणाला, "महाराज आपले दोन्ही हात माझ्या डोक्यावर ठेवावेत अशी प्रार्थना आहे."

श्रीदत्तमहाराज क्षणभर काहीच बोलले नाही. शांतपणे डोळे मिटून तसेच बसून राहिले.

त्या भक्ताने पुन्हा प्रार्थना केली, "महाराज आपले दोन्ही हात माझ्या डोक्यावर ठेवावेत अशी प्रार्थना आहे."

श्रीदत्तमहाराजांनी विषयच बदलला, "काय आणखी आठ दिवस मुक्काम आहे वाटतं?"

भक्ताने उत्तर दिले, "होय महाराज, आठ दिवस रहाणार आहे, इथे आहे तोपर्यंत रोज संध्याकाळी भजनास येत जाईन."

श्रीदत्तमहाराज म्हणाले, "बघा जमेल तसं, तब्येतीला सांभाळून असावे. जमलं तर यावे."

पुन्हा भक्त चिकाटीने म्हणाला,"महाराज आपले दोन्ही हात आपण माझ्या डोक्यावर ठेवावेत अशी प्रार्थना आहे." श्रीदत्तमहाराजांनी पुन्हा विषय बदलला "काय मुलाची प्रकृती बरी आहे ना? त्याचा अभ्यास ठीक चाललाय ना? पत्नी बऱ्या आहेत ना?" त्या भक्ताने श्रीदत्तमहाराजांच्या प्रश्नांची उत्तरे दिली व पुन्हा चिकाटीने आपली प्रार्थना श्रीचरणी सादर केली. प्रार्थना सादर करतांना डोळे मिटून घेतले होते. क्षणभर त्याला जाणवले की श्रीदत्तमहाराजांनी आपले दोन्ही हात त्याच्या डोक्यावर ठेवलेले आहेत. स्थळ, दिशा, काल या साऱ्यांच्या पलिकडे नेणारी अनुभूती क्षणभर त्याने प्रत्यक्ष अनुभवली. त्याने डोळे उघडले तो श्रीदत्तमहाराज आपल्या जागीच बसले होते.त्यांचे हात त्यांच्या मांडीवरच ठेवलेले होते.

श्रीदत्तमहाराजांनी हात आपल्या डोक्यावर ठेवले आहेत असा भास तर नाहीना झाला असे वाटून पुन्हा भक्ताने प्रार्थना श्रीचरणी सादर केली आणि आपले डोके श्रीदत्तमहाराजांच्या अगदी जवळ नेले. आता मात्र

श्रीदत्तमहाराजांनी खरोखरच आपले हात उचलले आणि एकत्र पालथे जुळवले. त्यांचे दोन्ही हात क्षणभर थरथरले आणि एकच क्षण त्या भक्ताच्या मस्तकावर श्रीमहाराजांनी ते थरथरणारे हात ठेवले. लगच क्षणार्धात विजेच्या वेगाने काढूनही घेतले.

पुन्हा एकदा त्या भक्ताला स्थळ, दिशा, काल या साऱ्यांच्या पलीकडे नेणारी अनुभूती प्राप्त झाली. त्याने श्रीदत्तमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला व कोणाशीच न बोलता तो लगेच बाहेर पडला. सारे जग नाहीसे झाले आहे असे त्याला वाटत होते. स्वप्नांत असल्यासारखे वाटत होते. फक्त कोणीतरी दरून श्रीशंकराचार्यांचे शब्द गात होते.

"चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम्।" ही एकच ओळ तालासुरात वाद्यांच्या साथीवर कोणीतरी पुनःपुन्हा आळवीत होते. ती गायलेली ओळ श्रोत्याला स्पष्टपणे ऐकू येत होती. बाकी त्याच्या जाणिवेच्या कक्षेत काहीही प्रवेश करीत नव्हते. तो भक्त घरी केव्हा पोचला, त्याला काहीच आठवत नाही. फक्त शंकराचार्यांची ती ओळ पुनःपुन्हा कोणी गात असलेले त्याला सतत ऐकू येत होते. "चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम्।"

ही एकच ओळ. त्या भक्ताच्या एवढेच स्मरणांत आहे.

* स्थूलदेह ठेवल्यानंतर साधकांना आलेले अनुभव

श्रीदत्तमहाराजांनी स्थूल देह ठेवल्यानंतरही साधकांना अनेक अतींद्रिय अनुभव येत आहेत. यापैकी काही निवडक अनुभव पुढे दिले आहेत.

४२. स्वप्नामध्ये दृष्टान्त दिला

श्रीदत्तमहाराजांनी १ मार्च, १९९९ रोजी सकाळी साडेआठ वाजता देह ठेवला. परगावच्या एका भक्ताला दूरध्वनीवरून ही वार्ता समजली. अंत्ययात्रा दुसऱ्या दिवशी सकाळी होती. तशाच काही अडचणींमुळे तो भक्त पुण्याला जाऊ शकत नव्हता. त्या गोष्टीचा त्या भक्ताला एवढा ताण वाटला की तो भक्त आजारी पडला. आजार वाढत चालला. त्या भक्ताला वाटले आपलेही जीवन आता संपले. जगण्याचे काही कारणही आता उरले नाही. हाच विचार पुनःपुन्हा त्या भक्ताच्या मनांत येत होता.

सातव्या दिवशी त्या भक्ताला स्वप्न पडले. समोर श्रीदत्तमहाराज शांतपणे बसले होते. मोठ्या श्रद्धेने तो भक्त त्यांच्याजवळ गेला. श्रीदत्तमहाराज काहीच बोलले नाहीत. न बोलताच त्यांनी त्या भक्ताच्या मस्तकावर हात ठेवला आणि त्या भक्ताचे देहभान नाहीसे झाले. स्थल, काल, दिशा यांच्या पलीकडे असलेली अनुभूती त्याला प्राप्त झाली.

तो भक्त जेव्हा जागा झाला तेव्हाही श्रीदत्तमहाराजांचा तो ईश्वरी स्पर्श त्या भक्ताला जाणवत होता आणि ती अनुभूती त्याच्या मनात रेंगाळत होती. त्यांनतर अनेक दिवस तो ईश्वरीस्पर्श त्या भक्ताला पुनःपुन्हा मस्तकावर जाणवत राहिला आणि त्या अनुभूतीचा प्रभावही तो भक्त त्यामुळे घेत राहू शकला.

चौदाव्या दिवशी तो भक्त पुण्याला गेला. वासुदेवनिवासमध्ये पाय ठेवताच तो तडक दुसऱ्या मजल्यावर ध्यानमंदिरात गेला व श्रीदत्तमहाराजांच्या छायाचित्रासमोर बसला. त्याने श्रीदत्तमहाराजांच्या छायाचित्राकडे पाहिले आणि क्षणभर त्याचा डोळ्यावर विश्वास बसेना त्याला स्पष्टपणे दिसत होते. श्रीदत्तमहाराज तेथे बसले आहेत आणि भक्ताकडे टक लावून पहात आहेत. देह ठेवण्यापूर्वी त्या भक्ताची भेट झाली नाही म्हणून त्यांना खूप वाईट वाटते आहे. त्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत.

भक्ताने डोळे चोळून चोळून पुनःपुन्हा पाहिले. खरोखरीच श्रीदत्तमहाराज अश्रूभरल्या डोळ्यांनी भक्ताकडे पहात होते. काही क्षणातच भक्त प्रगाढ ध्यानावस्थेत गेला. सर्व जगाचा विसर पडला. त्याची ध्यानावस्था उतरली तेव्हा घड्याळात पाहिले तर तासभर उलटून गेला होता. आता मात्र श्रीदत्तमहाराजांच्या छायाचित्रात ते नेहमीसारखे दिसत होते. आता डोळ्यात अश्रू नव्हते. आपण आलो तेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या डोळ्यात अश्रू होते आणि आता ते नाही हा भास होता का? का आणखी काही होते, असा विचार करतच भक्त उठला आणि रेणुकानिवासकडे निघाला.

भक्त रेणुकानिवासमध्ये गेला तेव्हा सौ.ताईमहाराज बाहेरच्या खोलीत बसल्या होत्या. भक्त ताईमहाराजांच्या दर्शनाला गेला. त्याला पहाताच ताईमहाराज गंभीरपणे म्हणाल्या, ''श्रीदत्तमहाराजांचे दर्शन झाले ना? महाराज आहेतच.''

त्या भक्ताला वाटले की ताईमहाराजांना सर्व काही माहिती आहे. मोठ्या भक्तीभावाने ताईमहाराजांचे दर्शन घेऊन तो भक्त त्या खोलीतून बाहेर आला आणि श्रीदत्तमहाराजांच्या नेहमीच्या बसायच्या खोलीत दर्शनाला गेला. त्यावेळी ताईमहाराजांचे वाक्य ''महाराज आहेतच'' त्याच्या मनांत सतत रेंगाळत होते. तेच वाक्य त्याला पुनःपुन्हा बाहेरूनही ऐकू येत होते. तेच वाक्य पुनःपुन्हा कोणीतरी म्हणत आहेत असे त्याला वाटत होते. हळूहळू ते वाक्य अधिकाधिक ठासून म्हटले जाऊ लागले. त्या वाक्यांत आवाज मोठा मोठा होत गेला. तेच वाक्य त्याला दहादिशांतून पुनःपुन्हा ऐकू येऊ लागले. अधिकाधिक मोठ्या आवाजांत ऐकू येऊ लागले. त्या वाक्याचा आवाज इतका मोठा झाला की बाहेरचे सर्व विश्व त्यांत पूर्णतया बुडून गेले, पूर्णतया नाहीसे झाले. त्या साधकाला एक अनिर्वचनीय आनंदाची अवस्था प्राप्त झाली. त्या आनंदात तो एवढा बुडून गेला की एक प्रकारच्या आनंदमय समाधी अवस्थेत तो गेला.

४३. विरक्तीचा अनुभव

एका साधकाला स्वप्नांत असे दिसले की श्रीदत्तमहाराज त्याच्या घरी आले आहेत. श्रीदत्तमहाराजांनी त्याच्या घरांत थोडी विश्रांती घेतली व त्याला म्हणाले, ''चला माझ्याबरोबर'' आणि श्रीदत्तमहाराज वेगाने चालू लागले. साधकाने विचार केला कपडे बदलायलाही वेळ नाही. श्रीदत्तमहाराज तेवढ्यांत पुढे जातील. तो साधक तसाच घरच्या कपड्यातच श्रीदत्तमहाराजांच्या मागे चालू लागला.

श्रीदत्तमहाराज वेगाने घराबाहेर आले व जिना भरभर उतरून पुढे जाऊ लागले. तो साधक अक्षरक्षः त्यांच्या मागे धावत सुटला. जिन्यातून उतरतांना मधे काही ओळखीचे साधक जिना उतरतांना दिसले. त्यांच्यामागून उतरण्यामुळे जिना उतरायला वेळ लागू लागला. श्रीदत्तमहाराज खूपच वेगाने पुढे चालले होते. ते मागे वळून त्या साधकाला म्हणाजे, ''किती वेळ लावला? चला लवकर.''

हे श्रीदत्तमहाराजांचे शब्द ऐकताच तो साधक इतर साधकांना बाजूला ढकलून श्रीदत्तमहाराजांच्यामागे तसाच पळत सुटला. तो साधक भोवतीचे

सर्व जग विसरून गेला आणि श्रीदत्तमहाराजांच्या मागे धावत धावत जाऊ लागला. येथेच स्वप्न संपले.

काही दिवसानंतर तो साधक जालना येथे सौ.ताईमहाराजांच्या दर्शनाला गेला. सौ.ताईमहाराजांना साधकाने हे स्वप्न सांगितले, तेव्हा त्या म्हणाल्या, ''श्रीदत्तमहाराजांनी तुमच्यावर कृपा केली आहे. त्यामुळे तुमचे मन संसारातून बाहेर पडेल आणि ईश्वराकडे अधिकाधिक लागेल. त्यामुळे संसार नाहीसा झाल्याचा अनुभव हळूहळू येईल. श्रीदत्तमहाराजांची अशी तुमच्यावर झालेली कृपा सूचित करणारे ते स्वप्न आहे.''

४४. चरणसेवा

एका साधकाला स्वप्नांत असे दिसले की श्रीदत्तमहाराज जमिनीवर चटई टाकून झोपले आहेत. दुसरा एक भक्त श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाला आला. त्या दुसऱ्या भक्ताने श्रीदत्तमहाराजांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला व तो निघून गेला. तो दुसरा भक्त परत जात असताना श्रीदत्तमहाराजांच्या चरणांना त्याचा धक्का लागला आणि श्रीदत्तमहाराजांचे चरण थरथरु लागले. स्वप्न पाहणारा साधक एकदम कळवळला. श्रीदत्तमहाराजांचे वय झालेले. नव्वदीच्या घरात त्यांचे वय गेलेले. त्यांच्या पायांना धक्का लागला. किती वेदना झाल्या असतील. हे विचार मनांत येऊन त्याचे हृदय कळवळले. तो धावतच पुढे गेला. त्याने श्रीदत्तमहाराजांचे चरण कुरवाळले आणि हलकेच तो चरणसेवा करू लागला. श्रीदत्तमहाराजांचे दोन्ही श्रीचरण तो अत्यंत हलक्या हाताने कोमलपणे चुरू लागला.

अशी चरणसेवा करत असतांना त्याला असे जाणवत राहिले की श्रीदत्तमहाराजांचे वय नव्वद वर्षांचे असूनही त्यांचे श्रीचरण लोण्याच्या गोळ्यासारखे मऊ मऊ आहेत. श्रीदत्तमहाराज फार मोठे योगी आहेत याची ती खूण आहे. तो साधक श्रद्धेने चरणसेवा करीत राहिला.

त्याला वाटले श्रीदत्तमहाराज स्थूल देहांत होते तेव्हा चरणसेवा करायची संधी कधीच मिळाली नाही. पण आता स्वप्नांत ही संधी मिळाली आहे. केवढे भाग्य आहे. तो खूप भक्तीने व प्रेमाने ते चरण कुरवाळू लागला. त्यामुळे त्याला असे अनुभवाला येऊ लागले की त्याच्या हातामध्ये वीज निर्माण होत

आहे. ती वीजेची स्पंदने त्याच्या शरीरांत सर्वत्र संचार करू लागली. अशी अनुभूती त्या साधकाला येत असतांनाच स्वप्न संपले.

तो साधक जागा झाला तरी त्याच्या हातांत ही वीजेची स्पंदने सतत तशीच जाणवत राहिली. दिवसांमागून दिवस उलटले पण त्या हातांतील संवेदना व स्पंदने त्या साधकाला तशीच जाणवत राहिली. त्यामुळे त्याला असे वाटू लागले की त्या हातांवरील श्रीदत्तमहाराजांच्या चरणांचा स्पर्श तसाच टिकावा म्हणून कशालाही हाताने स्पर्श करू नये.

काही दिवसानंतर तो साधक जालना येथे गेला असतांना त्याने ते स्वप्न आणि चरणसेवेमुळे त्याच्या हातात निर्माण झालेली वीजेची स्पंदने सतत चालू असल्याचा आपला अनुभव सौ.ताईमहाराजांना सांगितला. सौ.ताईमहाराज हसल्या व म्हणाल्या, ''मग नका हात लावू कशाला. त्यामुळे तुमची बर्हिमुख प्रवृत्ती कमीच होईल ना! तुमचे मन आंत आंतच वळत जाईल ना? ते चांगलेच आहे की!'' पुढे त्या म्हणाल्या, ''शक्तिपातदीक्षेने सद्गुरू आपल्या शिष्याच्या शरीरात शक्तीचा जो संचार करतात त्याची ही अनुभूती आहे.''

त्या साधकाने अश्रुपूर्ण नेत्रांनी सांगितले, ''स्वप्नांत तो चरणसेवेचा अनुभव घेतलेल्या घटनेला सहा महिने उलटून गेले आहेत. पण अजून हातावर ती वीजेची स्पंदने, त्या स्पंदनांमुळे जाणवणाऱ्या झिणझिण्या व तो महाराजांच्या चरणांचा स्पर्श अजूनही जाणवतो आहे. ध्यानाला बसलो की स्पंदने अधिकाधिक तीव्र होत जातात. महाराजांची कृपाच आहे ही!''

४५. पाठीला स्पर्श

एका साधकाला स्वप्न पडले. स्वप्नात त्याला असे दिसले की त्याला श्रीदत्तमहाराजांनी निरोप पाठवून एका मोठ्या हॉलमध्ये दुपारी चार वाजता बोलावले आहे. तो साधक लगेच त्याप्रमाणे निघाला. रस्त्यातील वाहतूकीत अडकल्यामुळे त्याला त्या हॉलमध्ये पोहोचायला पावणेपाच वाजले होते.

त्या साधकाच्या मनांत विचार आला ''आपल्याला पाऊणतास उशीर झाला. श्रीदत्तमहाराज थांबले असतील कां माझ्यासाठी? कां वाट पाहून गेले असतील?''

तो साधक त्या हॉलमध्ये लगबगीने गेला. श्रीदत्तमहाराज त्याची वाट पहात तेथेच थांबून राहिले होते. तो साधक धावतच श्रीदत्तमहाराजांकडे गेला आणि पुढे जाऊन तो उशीर झाल्याबद्दल श्रीदत्तमहाराजांची क्षमा मागणार, तेवढ्यात त्याला दिसले की श्रीदत्तमहाराज अतिशय प्रसन्न मुद्रेने त्याच्याकडे पहात आहेत.

ती प्रसन्न मुद्रा पाहून तो क्षमा मागायचे विसरून गेला. श्रीदत्तमहाराज खुर्चीवरून उठले व दोन पावले पुढे आले. त्या साधकाला दिसले की हॉलमध्ये सर्वत्र धूळ आहे. क्षणभर त्याला वाटले फडके आणून जमीन पुसून घ्यावी. पण एकदम त्याला आठवले श्रीदत्तमहाराज जेव्हा देहात होते तेव्हा त्याला नेहमी असे वाटायचे की श्रीदत्तमहाराजांची चरणधूळी घ्यावी व चांदीच्या डबीत ठेवून ती डबी आपल्या घरी नित्य पूजेत ठेवावी. परंतु ही त्याची इच्छा तशीच राहून गेली होती. श्रीदत्तमहाराज देहांत असतांना चरणधुळी घ्यायचे तसेच राहून गेले होते हे सगळे त्याला आठवले आणि त्याच्या मनांत विचार आला की निदान आता स्वप्नांत तरी श्रीदत्तमहाराजांच्या चरणांचा स्पर्श झालेली धूळ मिळते आहे.

तो साधक मोठ्या भक्तीने पुढे गेला आणि श्रीदत्तमहाराजांपुढे जमिनीवर त्याने डोके टेकले. ती धूळ जास्तीत जास्त कपाळाला आणि सर्व अंगाला लागावी म्हणून तो साधक तसाच जमिनीवर डोके ठेवून नतमस्तक राहिला. श्रीदत्तमहाराजांनी त्याच्या पाठीवर दोन्ही हात ठेवले आणि त्याला उठायला सुचवले. पण त्या साधकाला उठावेसे वाटेना. तो तसाच नतमस्तक राहिला.

श्रीदत्तमहाराजांचे दोन्ही हात त्याच्या पाठीवर तसेच स्पर्श केलेले राहिले. त्यामुळे त्याच्या शरीरांत वीजेची स्पंदने होत आहे, झिणझिण्या येत आहेत असे त्याला वाटत राहिले. येथेच ते स्वप्न संपले.

तो जाग झाला तेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या हातांचा तो पाठीवरील स्पर्श त्याला तसाच जाणवत होता. पुढे अनेक दिवस त्या साधकाला पाठीवर श्रीदत्तमहाराजांच्या हातांचा तो स्पर्श जाणवत होता. तीन आठवड्यानंतर तो साधक जालना येथे सौ.ताईमहाराजांच्या दर्शनाला गेला. सौ.ताईमहाराजांनी

त्याला भक्तनिवासमधील तळमजल्यावर असलेल्या हॉलमध्ये उतरायला सांगितले.

भक्तनिवासमधील त्या हॉलमध्ये तो प्रथमच आला होता. तेथे जाताच त्याला आश्चर्याचा धक्का बसला. स्वप्नांत जो हॉल त्याने पाहिला होता तसाच हा हॉल होता. स्वप्नांत जशी हॉलमध्ये जमिनीवर धूळ होती तशीच येथेही हॉलमध्ये जमिनीवर धूळ होती. त्याने झाडूने धूळ झाडली व एका कोपऱ्यात चटईवर सामान ठेवले.

थोड्या वेळाने सौ.ताईमहाराज तेथे आल्या व त्याला म्हणाल्या, ''महाराज, तुमची केव्हापासून वाट पहात आहेत. महाराजांनी तुम्हाला चार वाजता हॉलमध्ये बोलावले होते ना? ''

सौ.ताईमहाराजांचे शब्द ऐकून त्याला आश्चर्याचा मोठाच धक्का बसला. त्याचे ते स्वप्न व त्या स्वप्नातील श्रीदत्तमहाराजांचे दर्शन सौ.ताईमहाराजांनी अंर्तज्ञानाने जाणले आहे हे त्याच्या लक्षात आले. त्याने आपले स्वप्न सौ.ताईमहाराजांना सांगितले. त्यावर सौ.ताईमहाराज हसून म्हणाल्या, ''हाच तो हॉल. येथेच तुम्हाला बोलावले आहे. आता तीन दिवस या हॉलच्या बाहेर पडायचे नाही. जेवणही येथेच पाठवण्याची व्यवस्था करते. महाराजांच्या सहवासाचा आनंद घ्या आता इथे या हॉलमध्ये राहून!''

त्यानंतर तो साधक तीन दिवस त्या हॉलमध्येच राहिला. त्याला सारखे जाणवत होते की श्रीदत्तमहाराज त्या हॉलमध्ये आहेत. डोळे मिटले की श्रीदत्तमहाराजांची मूर्ती दिसायला लागायची. झोपला तरी स्वप्ने श्रीदत्तमहाराजांचीच पडायची. मनांत श्रीदत्तमहाराजांचेच 'विचारधन'मधील उपदेश त्याला आठवत रहायचे.

तो साधक भक्तनिवासमधील त्या हॉलमध्ये तीन दिवस राहिला. खरोखरच तीन दिवस त्याला श्रीदत्तमहाराजांच्या प्रत्यक्ष सहवासाचा लाभ रात्रंदिवस मिळत आहे असे वाटले. चोवीसतास ध्यानी मनी व स्वप्नी तो श्रीदत्तमहाराजांचा सहवास अनुभवत होता असेच त्याला वाटत होते.

श्रीदत्तमहाराज देहात असतांना त्याला प्रत्यक्षात रेणुकानिवासमध्ये वास्तव्य करण्याचा योग कधीच आला नव्हता. त्यामुळे असा

श्रीदत्तमहाराजांचा सहवास त्याला रात्रंदिवस कधीच मिळाला नव्हता. ही त्याची इच्छा राहून गेली होती. पण ती त्याची इच्छा जालन्याला भक्तीनिवासमध्ये पूर्ण झाली. त्यामुळे काही काळ एक आगळ्याचप्रकारची शांती त्याला अनुभवाला येत राहिली.

४६. 'मोठा निर्मळ माणूस'

मुंबईतील एका साधकाला स्वप्न पडले. त्या स्वप्नांत त्याला निरोप मिळाला की पुण्याला रेणुकानिवासमध्ये काही धार्मिक अनुष्ठान आहे व त्यासाठी त्याने सकाळी दहा वाजता रेणुकानिवासमध्ये यावे असा श्रीदत्तमहाराजांचा निरोप आहे.

स्वप्नांतच त्याने पहाटे बैठक वगैरे आटोपून घेतली व तो पुण्याला जाण्यासाठी गडबडीने निघाला. पुण्याला अनुष्ठानाच्या वेळी पोहोचता यावे म्हणून त्याने स्नान वगैरे शरीरशुध्दी केली नाही. त्याला आठवले सौ.ताईमहाराज नेहमी सांगतात, ''महाराजांच्या दर्शनाला जाण्यासाठी शरीरशुध्दी, स्नान वगैरे गोष्टी बाजूला राहिल्या तरी चालते. महाराजांचे दर्शनच खरी आंतरिक शुध्दी घडवून आणते.''

पुण्याला जाताना दुसऱ्या एका साधकाला बरोबर घेऊन जायचे होते. म्हणून तो त्या साधकाच्या घरी गेला. पण त्याची आंघोळ चालू होती. वेळ दवडू नये म्हणून त्या स्नानात गुंतलेल्या साधकाची वाट न पहाता तो एकटाच पुण्याला एशियाडने गेला. त्यामुळे तो साधक रेणुकानिवासमध्ये अनुष्ठानासाठी वेळेवर पोहचू शकला.

त्याला असे दिसले की अनुष्ठानाची तयारी चालू आहे. श्रीदत्तमहाराज एका खुर्चीवर बसले आहेत. सौ.ताईमहाराजही आल्या आहेत. श्रीदत्तमहाराजांचे कुटुंबीयही अनुष्ठानाची तयारी करण्यासाठी घरात इकडे तिकडे वावरत आहेत.

अनुष्ठान विधी वेळेवर सुरू झाला व यथाविधी संपन्न झाला. अनुष्ठानासाठी बाहेरून आलेले भक्त व साधक परत जाऊ लागले. एवढ्यात अनुष्ठानासाठी आलेल्या एक भक्त स्त्री त्या साधकाकडे आल्या. त्या म्हणाल्या, ''अनुष्ठान

चांगले संपन्न झाले. पण कोणीच भाषण केले नाही. निदान तुम्ही तरी चार शब्द बोलायला हवे होतेत. आम्हाला चार शब्द ऐकायची इच्छा होती.''

त्या साधकाला वाटले अनुष्ठानाच्यावेळी चार शब्द कोणी बोलायचे असले तर ते श्रीदत्तमहाराजांनीच बोलले पाहिजेत. साधक त्या भक्त स्त्रीला घेऊन तसाच श्रीदत्तमहाराजांकडे गेला. श्रीदत्तमहाराजांना त्याने भक्त स्त्रीची चार शब्द ऐकण्याची इच्छा सांगितली आणि तो म्हणाला, ''महाराज काहीतरी बोलावे आपण.''

श्रीदत्तमहाराज हसले व म्हणाले 'नको.'

तो साधक तसाच आपली विनंती श्रीचरणी पुन्हा सादर करीत म्हणाला,''महाराज ! दोन शब्द तरी बोलावे. दोन शब्द तरी''.

श्रीदत्तमहाराज आता खूपच हसले व प्रसन्नपणे म्हणाले, ''नको नको.''

यावर एखादे लहान मूल आईकडे लडिवाळपणे हट्ट करते तशा सूरात तो साधक श्रीदत्तमहाराजांना म्हणाला, ''महाराज, दोन शब्द तरी बोला ना!''

श्रीदत्तमहाराज आता खूपच प्रसन्नपणे हसू लागले. त्या भक्त स्त्रीकडे वळून ते म्हणाले, ''मोठा निर्मळ मनुष्य आहे'' आणि श्रीदत्तमहाराज प्रसन्नपणे हसत त्या साधकाकडे कृपादृष्टीने पाहू लागले. त्या प्रसन्न हास्यामुळे श्रीदत्तमहाराजांची जिवणी खूप फाकल्यासारखी झाली आणि गाल वर उचलले गेले. श्रीदत्तमहाराजांच्या चेहऱ्यावर एक परिपूर्ण प्रसन्न हास्य दिसू लागले. ते प्रसन्न हास्य पाहून साधकाला वेगळ्याच प्रकारचा एक विशुध्द आनंद प्राप्त होतो आहे असे वाटले. त्याचे हृदय विशुद्ध आनंदाने भरून गेले.

येथे स्वप्न संपले. साधक जागा झाला. पण जागा झाल्यावरही तो विशुध्द आनंद तसाच टिकून होता.

दिवसांमागून दिवस जात होते. पण तो आनंद तसाच टिकून राहिला. श्रीदत्तमहाराजांचे ते प्रसन्न हास्य, ती रूंद झालेली जिवणी व ते उंचावलेले गाल, ती कृपादृष्टी सतत साधकाला आठवत राहिली. त्यामुळे साधकामध्ये आंतरिक परिवर्तन होऊ लागले. आंतरिक शुध्दी वाढू लागली. त्याचे मन अधिकाधिक निर्मळ होत गेले. त्याच्या हृदयांत तो स्वप्नामध्ये अनुभवलेला

विशुद्ध आनंद तसाच भरून राहिला. एवढेच नव्हेतर त्याच्या व्यक्तिमत्त्वातून तो विशुद्ध आनंद बाहेर दाहीदिशांना फाकतो आहे असेही त्याला वाटू लागले. त्याच्या हृदयांतील आनंद बाहेरच्या विश्वातही सगळीकडे प्रतिबिंबित होतो आहे अशी अनुभूती त्याला येऊ लागली.

दिवसामागून दिवस जात राहिले. स्वप्नात त्याने पाहिलेले श्रीदत्तमहाराजांचे ते प्रसन्न हास्य, ती रुंदावलेली जिवणी व ते उंचावलेले गाल हळूहळू त्याच्या स्वतःच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होऊ लागले. त्याचा चेहरा तसा बदलू लागला. ते हास्य सतत तसेच त्याच्या चेहऱ्यावर राहू लागले.

त्याच्या चेहऱ्यात झालेला हा बदल इतर लोकांनाही जाणवू लागला आणि त्याला स्वतःला आरशांत पहातानादेखील तो बदल जाणवू लागलो. त्याच्या परिचयातील इतर अनेकांनी त्याला तसे बोलून दाखवले. एका वेगळ्या विशुध्द आनंदाने त्याचे जीवन व्यापून टाकले.

*****

*** श्रीदत्तमहाराज हे ईश्वरीशक्तीचे परिपूर्ण रूप आहेत असा अनेक भक्तांचा अनुभव आहे. त्यांनी स्थूल देहाचा त्याग केला हे खरे आहे. तथापि सूक्ष्म रूपात ते आहेतच. संतांनी स्थूल देह ठेवल्यावर सुद्धा श्रद्धावंतांना त्यांचे अस्तित्व जाणवत रहाते. त्यांच्या कृपेचा अनुभव येत रहातोच. म्हणूनच श्रद्धावंत भक्त पुनःपुन्हा वाडीला, गाणगापूरला, कुरवपूरला आणि गरूडेश्वरला दर्शनासाठी जात रहातात. असे दर्शन घेतल्यामुळे आपल्या व्यावहारिक अडचणी सुटतात आणि परमार्थ मार्गावरील प्रतिबंधही दूर होतात असा अनुभव बहुतेक भक्तांना येतो. स्थूल देह ठेवल्यानंतर संतांचे कार्य अधिकच व्यापक होत जाते असे इतिहास सांगतो.

श्रीदत्तमहाराजांचे कार्यही असे व्यापक होत जाणार आहे. अनेक शतके ते आपल्या कृपेच्या वर्षावाने भक्तांचा प्रपंच आणि परमार्थ सांभाळत रहाणार आहेत आणि तशी उत्कट इच्छा असलेल्या भक्तांना परमार्थ मार्गावर पुढे पुढे नेत अद्वैत अनुभूतीपर्यंत वाटचाल करायला सहाय्य करीत रहाणार आहेत.

***

किंबहूना तुमचे केले । धर्मकीर्तन हे सिद्धी गेले ।
येथ माझें जी उरलें । पाईकपण ।। १८.१७९३ ।।

श्रीज्ञानेश्वरी

महाराज, तुम्ही केलेले हे धर्मकीर्तन तुमच्याकडून शेवटाला गेले.
आता माझा फक्त सेवकपणाच काय तो उरला.

शरद्‌चंद्र कोपर्डेकर

* संदर्भ ग्रंथ

अ) चरित्र लेखनासाठी वापरलेले संदर्भ साहित्य

१. श्रीदत्तवाक्सुधा - श्री. अच्युतराव सिद्धनाथ पोटभरे
२. प्रयाग - श्रीमती नीलाताई जोशी
३. जीवनगंगा - श्री. अच्युत सिद्धनाथ पोटभरे
४. श्रीगुरूदेवचरित्र - (वासुदेवानंदसरस्वती-स्वामीमहाराज यांचे चरित्र) श्रीदत्तमहाराज कवीश्वर
५. लोकनाथतीर्थ - स्वामीमहाराज श्री. अच्युतराव सिद्धनाथ पोटभरे
६. श्रीज्ञानेश्वरी गुढार्थदीपिका - वेदान्तकेसरी श्रीबाबाजीमहाराज पंडित
७. हिरण्ययोग (स्वप्नयोग) यष्टी १५ - श्रीगुलाबरावमहाराज
८. स्वप्नयोग अर्थात स्वप्नांचा अर्थ - स्वामी शिवतत्त्वानंद (श्रीरामकृष्णमठ)
९. वासुदेवनिवास त्रैमासिकाचे अंक
१०. श्री. गोपाळराव गोडसे यांनी ठेवलेल्या नोंदी व प्रवचनांच्या धारीका

ब) "वासुदेवनिवास आणि कुंडलिनी योग" - हे परिशिष्ट लिहितांना पाहिलेले संदर्भ साहित्य :

१. सूत संहिता रहस्य - (भाग -१ व २) डॉ. जगन्नाथ वासुदेव जोशी
२. महायोगविज्ञान - श्रीयोगानंदजीमहाराज, अनुवादक : श्रीगुळवणीमहाराज
३. योगवाणी - श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थमहाराज, अनुवादक : श्रीगुळवणीमहाराज
४. वासुदेवनिवास प्रकाशन यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तिका
५. ज्ञानसुधा - श्रीपूर्णानंदतीर्थ
६. प्रबोधसुधा - श्रीपूर्णानंदतीर्थ

७. श्रीमद् शंकराचार्य यांचे
स्तोत्रवाङ्मय - (भाग -१ व २) - डॉ.श्री.द. देशमुख
८. श्रीमद् शंकराचार्यकृत स्तोत्रसंग्रह (भाग -१ व २)
- पंडित पांडुरंगशास्त्री गणेशशास्त्री गोस्वामी
९. श्रीमद् शंकराचार्य यांचे प्रकरण ग्रंथ - प्रा. सु. ग. शेवडे
१०. श्रीज्ञानेश्वरी गुढार्थदीपिका - वेदान्तकेसरी श्रीबाबाजीमहाराज पंडित
११. हिरण्ययोग (स्वप्नयोग) यष्टी १५ - श्रीगुलाबरावमहाराज
१२. स्वप्नयोग अर्थात स्वप्नांचा अर्थ - स्वामी शिवतत्त्वानंद (श्रीरामकृष्णमठ)
१३. योगप्रभाव (यष्टी-१५) - श्रीगुलाबरावमहाराज
१४. सद्गुरू साधक सुसंवाद - श्री. अच्युत सिद्धनाथ पोटभरे
१५. श्रीवासुदेव निवास प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांना श्रीदत्तमहाराजांनी
लिहिलेल्या प्रस्तावना.



- डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर यांचे प्रकाशित झालेले संतसाहित्य -

(डॉ. कोपर्डेकर यांची एकूण ५६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी ३५ पुस्तके कॉमर्स, इकॉनॉमिक्स आणि मॅनेजमेंट या विषयावरील आहेत. बाकीची पुस्तके संतसाहित्य विषयक आहेत.)

* इंद्रायणी साहित्य प्रकाशन, २७३ शनिवार पेठ, पुणे यांची प्रकाशने

१. श्रीदत्तमहाराज कवीश्वर -चरित्र आणि विचारधन (सातवी आवृत्ती)
साधकांचे प्रश्न आणि श्रीदत्तमहाराजांची उत्तरे यांचे संकलन विचारधन या नावाने पुढील तीन भागात प्रसिद्ध झाले आहे.
२. श्रीदत्तमहाराज कवीश्वर - विचारधन भाग -१ (चौथी आवृत्ती)
३. श्रीदत्तमहाराज कवीश्वर विचारधन भाग - २ (तिसरी आवृत्ती)
४. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची विचारसंपदा (विचारधन भाग ३) चौथी आवृत्ती
५. श्रीरामकृष्ण परमहंस - चरित्र
६. स्वामी विवेकानंद - चरित्र
७. श्रीगुलाबरावमहाराज - चरित्र आणि तत्त्वज्ञान
८. श्रीगाडगेमहाराज - चरित्र
९. पातंजल योगदर्शन भगवान पतंजलींची मूळ संस्कृत सूत्रे, त्या सूत्रांचा मराठी भावार्थ आणि विवरण
१०. श्रीरंगअवधूत महाराज - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)
११. श्रीचैतन्य महाप्रभू - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)
१२. श्रीरमण महर्षी - चरित्र (स्वामीमहाराज या अंकात प्रसिद्धी)

* श्रीवासुदेव निवास, कर्वेरोड, पुणे यांचे प्रकाशन

१३. गुण गाईन आवडी
(श्रीदत्तमहाराजांची प्रवचने व श्रीदत्तमहाराजांवरील तीन लेख)
(डॉ.सौ. माधुरी पणशीकर यांच्या समवेत संपादित)

* श्री भगवती प्रकाशन, पुणे यांचे प्रकाशन

१४. आनंदलहरी विचारधन - १ (आवृत्ती संपली)

* **साधुवासवानी मिशन, वासवानी रोड, पुणे-१ यांचे प्रकाशन**

१५. साधु वासवानी - चरित्र

* **नवचैतन्य प्रकाशन, शशांक सोसायटी, ए-००२, एक्सर रोड, बोरीवली(प), मुंबई-९२ यांची प्रकाशने**

१६. स्वामी शिवानंद (ऋषिकेश) - चरित्र

१७. शिकवण ज्ञानेश्वरीची(ज्ञानेश्वरीचे सार या पुस्तकात सुबोध भाषेत गद्यस्वरूपांत दिले आहे.)

* **भारतीय विद्याभवन, चौपाटी, मुंबई यांचे प्रकाशन**

१८. श्रीगुलाबरावमहाराज - चरित्र (इंग्रजी भाषेत)

***

* **आगामी प्रकाशने-**


१. संत श्रेष्ठ श्रीकृष्ण दयार्णव - यांच्या चरित्रावर आधारीत कादंबरी

2. ShriDattamaharaj Kavishwar - A Biography In English

3. Vichardhan
(English translation of selected Answers given by ShriDattaMaharaj Kavishwar)

४. कुंडलिनी योग
(कुंडलिनी योग साधना या विषयाचे तात्त्विक विवेचन आणि साधकांचे निवडक अनुभव - मराठी भाषेतील सुबोध विवरण)

5. Kundalini Yoga
(A treatise on the Theoary & Practice of Kundalini Yoga)



प्रसिद्ध झाले

पातंजल योगदर्शन

(भगवान पतंजलींची मूळ संस्कृत सूत्रे, मराठीत भावार्थ व सुबोध विस्तृत विवरण)

लेखक : डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर

प्रस्तावना : डॉ. अशोकमहाराज कवीश्वर

पृष्ठे : ३०० ● किंमत : १३० रुपये

संत शिरोमणी

श्रीकृष्ण दयार्णव

जीवन आणि वाङ्मय

लेखक : डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे

प्रस्तावना : डॉ. अशोकमहाराज कवीश्वर

संपादक : डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर

आगामी आकर्षण

संत शिरोमणी श्रीकृष्ण दयार्णव यांच्या ३२६ व्या जयंतीच्या निमित्ताने लवकरच प्रसिद्ध होत आहे.

(संत श्रीकृष्ण दयार्णव यांच्या जीवनचरित्रावर आधारीत कादंबरी)

लेखक : डॉ. शरद्‌चंद्र कोपर्डेकर

प्रस्तावना : डॉ. अशोकमहाराज कवीश्वर